# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र व ऑनलाईन शिक्षण केंद्र

बी. ए. भाग-२ : अर्थशास्त्र

सत्र ३ Minor : **सहकाराची तत्त्वे**

सत्र ४ Minor : **भारतातील सहकारी संस्था**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५०**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978 - 93 - 89327 - 73 - 1

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी**
प्रभारी कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ज्योती जाधव**
प्रभारी प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती व्ही. व्ही. मैंदरगी**
प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
प्र. अधिष्ठाता, मानव विज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) आर. व्ही. गुरव**
प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. बी. साळी**
प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी. पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अर्थशास्त्र अभ्यास मंडळ ■


**अध्यक्ष – डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**
प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, मलकापूर, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

- **प्रा. डॉ. एम. एस. देशमुख**
  अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. मनोहर आप्पासाहेब कोरे**
  विलिंग्डन कॉलेज, सांगली

- **डॉ. संतोषकुमार बबनराव यादव**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश कृष्णा टोने**
  सावित्रिबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा

- **डॉ. सचिन आप्पासाहेब सरदेसाई**
  राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध,
  जि. सातारा

- **डॉ. प्रभाकर तानाजी माने**
  जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर
  शिरोळ-वाडी रोड, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर

- **डॉ. अनिल धोंडिराम सत्रे**
  मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव,
  ता. वाळवा, जि. सांगली

- **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

- **डॉ. रमेश गणेशराव दंडगे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. मोहन गोविंद सदामते**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड कॉलेज, कुंडल,
  जि. सांगली

- **श्री. मोहन नरहर पंडितराव**
  यशोदीप ८५, मंगेशकर नगर, सुभाष रोड,
  मंगळवारपेठ, कोल्हापूर

# प्रस्तावना

जून २००७ पासून शिवाजी विद्यापीठाने बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे. शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून बी. ए. भाग-२ या अभ्यासक्रमास सत्र पद्धती सुरू झाली असून जून २०२५ पासून अभ्यासक्रम सुधारित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी सहकाराची तत्त्वे सत्र-३ व सत्र-४ भारतातील सहकारी संस्था हे पुस्तक लिहिले आहे. अर्थशास्त्र व सहकार या विषयातील तज्ज्ञांनी या पुस्तकातील वेगवेगळे घटक लिहिले आहेत. या पुस्तकातील सहकार विषयक विविध संकल्पना, विविध सहकारी संस्था त्यांची कार्यपद्धती या विषयीची मांडणी सोप्या व सुटसुटीत भाषेत करण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यार्थी व वाचकांना या विषयातील विविध संकल्पना व आशय समजावा म्हणून आवश्यक त्या ठिकाणी कोष्टके व आकृत्या काढून विषय अधिक सोपा करून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

या पुस्तकात बी. ए. भाग-२ या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या सत्र-३ 'सहकाराची तत्त्वे' व सत्र-४ 'भारतातील सहकारी संस्था' Minor पेपरच्या अभ्यासक्रमाची सत्र-३ साठी चार घटक व सत्र-४ साठी चार घटक अशा एकूण आठ घटकांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. यामध्ये सत्र-३ मध्ये सहकाराचा प्रारंभ, सहकाराचे संघटन, सहकारातील राज्याची भूमिका, सहकारी संस्थांचे अंकेक्षण व सत्र-४ मध्ये भारतातील सहकारी पतपुरवठा, भारतातील सहकारी संस्था भाग-१, भारतातील सहकारी संस्था भाग-२ आणि राष्ट्रीय संस्थांची सहकारातील भूमिका यांची सविस्तर मांडणी केली आहे.

बहिःस्थ विद्यार्थ्यांना विषयाचे त्वरित व नीट आकलन व्हावे म्हणून अभ्यास घटकांची मांडणी एका विशिष्ट विवेचन, सारांश, पारिभाषिक शब्द, स्वयं अध्ययनासाठी प्रश्न व त्यांची उत्तरे तसेच प्रत्येक घटकाच्या शेवटी सरावासाठी दीर्घोत्तरी प्रश्न व टीपा अशा पद्धतीने केली आहे. पुस्तकाच्या शेवटी जिज्ञासू विद्यार्थ्यांसाठी अधिक वाचनाकरिता संदर्भ पुस्तकांची नावे दिली आहेत. या पुस्तकाची मांडणी आणि विवेचन विद्यार्थ्यांना विषयाचे चांगले आकलन होण्यासाठी उपयुक्त ठरेल अशी अपेक्षा आहे. या पुस्तकाच्या लेखनाचे काम करणाऱ्या सर्व लेखकांना मनःपूर्वक धन्यवाद देतो. तसेच या पुस्तकाचे प्रकाशन करण्याच्या कामी मदत केलेल्या शिवाजी विद्यापीठातील प्रामुख्याने दूर शिक्षण विभागातील सर्व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांना धन्यवाद देतो.


■ संपादक ■

**डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**

प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख,

प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, पेरीड-मलकापूर,

ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर



## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–३<br>घटक क्रमांक | सत्र–४<br>घटक क्रमांक |
|---|---|---|
| **प्रा. डॉ. एस. एस. पाटील**<br>कला व वाणिज्य महाविद्यालय, वडूज | १, २ | – |
| **प्रा. पी. के. टोणे**<br>सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा | २ | – |
| **डॉ. एस. के. चव्हाण**<br>आजरा महाविद्यालय, आजरा | ३ | – |
| **प्रा. डॉ. गणपत गोपाळ गायकवाड**<br>शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज | ४ | – |
| **प्रा. डॉ. जे. एस. इंगळे**<br>प्रा. (डॉ.) एन. डी. पाटील कॉलेज, मलकापूर | – | १,२ |
| **प्रा. रोहिणी देशपांडे**<br>श्रीमती एम. जी. कन्या महाविद्यालय, सांगली | – | ३ |
| **डॉ. पी. पी. दावणे**<br>हंगामी सहाय्यक प्राध्यापक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | – | ३ |
| **डॉ. आण्णा काका पाटील**<br>सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज (स्वायत्त), कराड. | – | ४ |

■ संपादक ■

**डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**
प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख,
प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, पेरीड–मलकापूर,
ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–३** | |
| १. | सहकाराचा प्रारंभ | १ |
| २. | सहकाराचे संघटन | २१ |
| ३. | सहकारातील राज्याची भूमिका | ५६ |
| ४. | सहकारी संस्थांचे अंकेक्षण | ८५ |
| | **सेमिस्टर–४** | |
| १. | भारतातील सहकारी पतपुरवठा रचना | ९८ |
| २. | भारतातील सहकारी संस्था | १६४ |
| ३. | भारतातील सहकारी प्रक्रिया संस्था | २६१ |
| ४. | राष्ट्रीय संस्थांची सहकारातील भूमिका | २९७ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२५-२६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

सत्र–३ : घटक–१

# सहकाराचा प्रारंभ

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ सहकाराचा अर्थ व व्याख्या

१.२.२ सहकाराची वैशिष्ट्ये आणि महत्त्व

१.२.३ सहकार तत्त्वांचा विकास आणि मँचेस्टरची सहकाराची तत्त्वे

१.२.४ आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना/जागतिक सहकारी संघटना : संघटन आणि कार्ये

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ सूची

## १.० उद्दिष्ट्ये (Objectives)

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासातून आपणास पुढील बाबींचे आकलन होईल.

१. सहकाराचा अर्थ आणि व्याख्या लक्षात येईल.

२. सहकाराची वैशिष्ट्ये आणि महत्त्व लक्षात येईल.

३. सहकारी तत्त्वांचा विकास आणि मँचेस्टर सहकाराची तत्त्वे समजावून घेता येतील.

४. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची रचना आणि कार्ये जाणून घेता येतील.

## १.१ प्रस्तावना (Introduction)

प्राचीन काळापासून मानव एकमेकांच्या सहकार्याने जीवन जगत आहे. भारतातील एकत्र कुटुंब

पध्दती सहकाराचे उत्तम उदाहरण आहे. सहकार म्हणजे सर्वांच्या हितासाठी एकत्रित काम करणे. एकमेकांना मदत व सहकार्य करणे. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. त्यामुळे सहकाराचा विकास होण्यास मदत झाली. 'एकी हेच बळ' सहकाराचा मूलमंत्र आहे.

सहकारी संस्थेचा कारभार लोकशाही पध्दतीने चालतो. विशिष्ट नियम व तत्त्वांच्या आधारे कारभार चालतो. ऐच्छिक व खुले सभासदत्व आणि लोकशाही पध्दतीने कारभार ही प्रधान तत्त्वे मानली जातात. सर्व देशातील सहकारी संस्थांचा संघ म्हणजे आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना होय.

## १.२ विषय विवेचन (Subject Description)

प्रस्तुत घटकामध्ये आपण सहकाराचा अर्थ व व्याख्या, सहकाराची वैशिष्ट्ये आणि महत्त्व, सहकारी तत्त्वांचा विकास, मँचेस्टरची सहकाराची तत्त्वे, आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची रचना आणि कार्ये या बाबींचा अभ्यास करणार आहोत.

### १.२.१ सहकाराचा अर्थ व व्याख्या (Meaning and Definition of Co-operation)

❑ **प्रस्तावना :–**

सहकार हा मानवाला नवीन नाही. प्राचीन काळापासून मानव एकमेकांच्या सहकार्याने जीवन जगत आहे. सहकाराची सुरुवात मानवाच्या जन्मापासून झालेली आहे. मानव समाजशील प्राणी आहे, त्याला एकमेकांच्या सहकार्याने जीवन जगणे आवडते. भारतातील एकत्र कुटुंब पध्दती हे सहकाराचे उत्तम उदाहरण आहे. सहकार म्णजे एकत्रित काम करणे, एकमेकांना मदत करणे, एकमेकांना सहकार्य करणे. सहकार म्हणजे सर्वांच्या हितासाठी एकत्रित काम करणे. सहकार हा आर्थिक व सामाजिक प्रगतीचा कणा आहे. ॲरिस्टॉटलच्या मते, मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. मानवी जीवनात स्पर्धेपेक्षा सहकारी वृत्ती ही नैसर्गिक असून दुर्बलांच्या प्रगतीचा तो एक मार्ग आहे.

❑ **सहकाराचा अर्थ (Meaning of Co-operation) :-**

'सहकार' 'Co-operation' हा मूळ शब्द लॅटिन को-ऑपरेरी (Co-operari) या शब्दापासून बनला आहे. को (Co) याचा अर्थ 'सह' आणि आपरेरी (Operari) म्हणजे 'काम करणे' असा होतो.

सहकार म्हणजे एकत्रितपणे काम करणे, परस्पर सहकार्याने काम करणे होय. परस्पर सहकार्य करणे, एकमेकांना मदत करणे, सर्वांच्या हितासाठी एकत्रित काम करणे असा सहकाराचा अर्थ आहे. सहकारात अनेक व्यक्ती एकत्र येतात आणि एकमेकांच्या सहकार्याने आपली प्रगती साध्य करतात, त्यातून त्यांच्यात एकात्मता वाढते. समाजातील दुर्बल घटकांसाठी सहकाराची गरज आहे. समान गरजा

असलेले लोक एकत्र येतात. एकमेकांच्या सहकार्याने प्रगती करतात. 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' या उक्तीप्रमाणे कार्य करतात. सहकारात समता, एकात्मता, बंधुभाव महत्त्वाचा असतो.

इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीतून सहकाराचा उगम झाला. आधुनिक काळातील सहकारी चळवळ ही इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचे अपत्य आहे. औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादनात प्रचंड वाढ झाली. भांडवलदार हे कामगारांचे आर्थिक शोषण करीत होते. कामगारांनी आपले राहणीमान उंचावण्यासाठी सहकारी संस्थेची स्थापना केली. रॉबर्ट ओवेन यांना आधुनिक सहकारी चळवळीचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यानी 'न्यू लॅनॉर्क गिरणी कामगारांची परिस्थिती सुधारण्यासाठी सहकाराचा अवलंब केला. सन १८४४ मध्ये इंग्लंडमधील रॉश्डेल या ठिकाणी २८ विनकरांनी प्रत्येकी एक पौंड वर्गणी जमा करून जगातील पहिली ग्राहक सहकारी संस्था स्थापन केली.

## ❑ व्याख्या (Definition) :-

**१. प्रा. पी. एच. कॅसलमन :–**

''सामाजिक आशय असलेली अर्थपध्दती म्हणजे सहकार होय.''

**२. प्रा. एच. कॅलव्हर्ट :–**

''मानवी भूमिकेतून व्यक्तींनी स्वच्छेने एकत्र येऊन आपल्या आर्थिक हितसंबंधाच्या उन्नतीसाठी समानतेच्या तत्त्वावर स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकार होय.''

**३. सर होरेस प्लकेट :–**

''अधिक चांगली शेती, अधिक चांगला व्यापार आणि अधिक चांगले जीवनमान यासाठी स्वावलंबनाने संघटित केलेली संस्था म्हणजे सहकारी संस्था होय.''

## ❑ स्वयं–अध्ययन प्रश्न–१

### ✡ खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

१. आधुनिक सहकारी चळवळीचा जनक म्हणून ............. यांना ओळखले जाते.

*अ) प्रा. कॅसलमन* *क) वैकुंठलाल मेहता*

*ब) प्रा. एच. कॅलव्हर्ट* *ड) रॉबर्ट ओवेन.*

२. जगातील पहिली सहकारी संस्था ................ देशात सुरू झाली.

*अ) रशिया* *ब) इंग्लंड* *क) डेन्मार्क* *ड) जर्मनी.*

## १.२.२ सहकाराची वैशिष्ट्ये आणि महत्त्व (Features and Importance of Co-operation)

### ❑ सहकाराची वैशिष्ट्ये (Features of Co-operation) :-

**१. सहकार हे व्यक्तीचे संघटन :–**

''सहकारात भांडवलापेक्षा व्यक्तीला अधिक महत्त्व दिले जाते.'' सहकारात व्यक्तीला प्रथम स्थान व भांडवलाला दुय्यम स्थान दिले जाते. सहकार व्यक्तीचे संघटन आहे. अनेक व्यक्ती आर्थिक प्रगतीसाठी एकत्र येऊन सहकारी संस्था स्थापन करतात. एकमेकांच्या सहकार्याने प्रगती करतात. अनेक व्यक्ती एकमेकांना मदत करतात. सहकारात एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एकजन असतो. गरीब व श्रीमंत प्रत्येकाला एकच मत देण्याचा अधिकार असतो.

**२. सहकार हा एक आर्थिक व्यवहार :–**

सहकार हा एक उद्योग व्यवसाय आहे. सहकार हा एक आर्थिक व्यवहार आहे. सहकारी संस्थेत सभासदांच्या आर्थिक प्रगतीसाठी प्रयत्न केला जातो. सहकार हा एक व्यवसाय संघटनेचा प्रकार आहे. सहकारात परस्पर साहय्य व सेवा तत्त्वावर भर दिला जातो. इतर संघटन प्रकारात नफा मिळविणे प्रमुख हेतू असतो, तर सहकारात समता, सहकार्य, सेवा यावर भर असतो.

**३. सहकार हे ऐच्छिक संघटन :–**

सहकार हे ऐच्छिक संघटन आहे. सहकारी संस्थेत कोणत्याही व्यक्तीवर सक्ती केली जात नाही. सहकारात सर्व व्यक्ती स्वच्छेने एकत्र येतात. सहकारातून स्वच्छेने बाहेर पडू शकतात. कोणावरही सक्ती केली जात नाही. कोणत्याही व्यक्तीला सहकारी संस्थेत स्वेच्छेने सहभागी होता येते. तसेच बाहेर पडता येते.

**४. सहकार हे लोकशाही स्वरूपाचे संघटन :–**

सहकारी संस्थेचा कारभार लोकशाही तत्त्वानुसार चालतो. सहकारी संस्थेचा कारभार लोकशाही पध्दतीने चालतो. सहकारात 'एक सभासद, एक मत' या तत्त्वाचा अवलंब केला जातो. सभासद, संचालक मंडळाची निवड करतात. संचालक मंडळ एका व्यक्तीची अध्यक्ष व दुसऱ्या व्यक्तीची उपाध्यक्ष म्हणून निवड करते. संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी सचिव व कर्मचारी करतात. सहकारी संस्थेची अंतिम सत्ता सभासदांच्या सर्वसाधारण मंडळाच्या हाती असते.

### ५. नफ्यापेक्षा सेवा महत्त्वाची :-

सहकारी संस्थेचा मुख्य उददेश नफा मिळविणे हा नसतो. तर सभासदाची सेवा करणे हा असतो. म्हणजे इतर व्यावसायिक संस्थेपेक्षा सहकारी संस्था वेगळी असते. सहकारात नफ्यापेक्षा सेवेकडे अधिक लक्ष दिले जाते. सहकारी संस्थेत नफ्यापेक्षा सेवाभाव व व्यक्तीहिताकडे अधिक लक्ष दिले जाते.

### ६. खर्चात काटकसर :-

सहकार दुर्बलांचे संघटन आहे. सहकारी संस्था खर्चात काटकसर करतात. सभासद शक्य त्या ठिकाणी मोबदला न घेता कार्य करतात. उधळपट्टी टाळली जाते. कमी खर्चात वस्तू व सेवांचे उत्पादन केले जाते.

### ७. समता हा सहकाराचा पाया :-

सहकारात सर्व व्यक्ती समान असतात. सहकारी संस्थेतील सर्व सभासद समतेच्या तत्त्वावर एकत्र येतात, एकत्र काम करतात. एकमेकांना मदत करतात. धर्म, जात, वंश, वर्ग, लिंग, वय इत्यादीवरून भेदभाव केला जात नाही. सर्व सभासद समान आहेत असे समजले जाते.

### ८. व्यवहाराच्या प्रामणात अधिक्याचे वाटप :-

सहकारी संस्था नफा मिळविण्यासाठी स्थापन झालेल्या नसतात, परंतु सेवा व काटकसरीमुळे वाढावा मिळतो. सभासदांना नफ्याचे वाटप करतात. सभासदांनी संस्थेला पुरविलेल्या भांडवलाचा विचार न करता सभासदांनी संस्थेशी केलेल्या आर्थिक व्यवहाराच्या प्रमाणात नफ्याचे प्रमाण केले जाते. उदा. ग्राहक सहकारी संस्थेचा नफा वाटताना सभासदांनी संस्थेतून किती वस्तूंची खरेदी केली याचा विचार करून नफ्याचे वाटप केले जाते. इतर व्यावसायिक संस्था नफ्याचे वाटप भांडवलाच्या प्रमाणात करतात.

### ९. सहकार चळवळ सामाजिक व आर्थिक परिवर्तनाचे साधन :-

सहकारी चळवळीकडे सामाजिक व आर्थिक परिवर्तन घडवून आणण्याचे साधन म्हणून पाहिले जाते. सहकारी चळवळ आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणते. सहकारामुळे दुर्बल व्यक्तींचे उत्पन्न वाढते. आर्थिक विषमता कमी होते. सहकारी संस्था आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करतात.

### १०. न्याय तत्त्व :-

सहकारी चळवळ न्याय तत्त्वावर आधारलेली असते. देशातील उत्पादनातील विभाजन न्याय्य तत्त्वानुसार व्हावे ही अपेक्षा असते. सहकारात उत्पादनाचे, नफ्याचे वाटप न्याय तत्त्वानुसार केले जाते.

### ११. सहकार हे शैक्षणिक प्रचाराचे साधन :–

सहकाराचा शैक्षणिक प्रसारावर व प्रचारावर अधिक भर असतो. व्यक्तीची व्यक्तीकडून होणारी पिळवणूक थांबविणे, हे सहकाराचे महत्त्वाचे ध्येय असते. सहकारी संस्था सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देतात. सहकारी शिक्षणातून सहकाराचे फायदे, महत्त्व, कार्यपध्दती, नियम, अटी इ. माहिती होते.

### १२. सहकार हे विधायक स्पर्धेचे लक्षण :–

भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील अनिष्ठ स्पर्धा टाळण्यासाठी सहकाराचा उदय झाला. सहकारात विधायक स्पर्धा असते. सहकारात गळेकापू स्पर्धा नसते. स्पर्धेची चांगली लक्षणे ही सहकारी प्रवृत्तीतून प्रकट होतात.

## ❑ सहकाराचे महत्त्व (Importance of Co-operation) :-

आधुनिक समाजात सहकाराला अनन्यसाधारण असे महत्त्व प्राप्त झालेले आहे. सहकारात समाजातील दुर्बल घटकांचे शोषण होत नाही. सहकारात क्षमता व एकात्मता महत्त्वाची असते. सहकाराचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल.

### १. एकसंघ समाजाची निर्मिती :–

सहकारात कोणत्याही एका व्यक्तीचा एक व्यक्ती म्हणून विचार केला जात नाही, तर ती समाजाचा एक घटक म्हणून विचार केला जातो. सहकारात एका व्यक्तीच्या हितापेक्षा व्यक्तीसमूहाच्या हिताला म्हणजेच समाजहिताला जास्त महत्त्व दिले जाते. सहकारांमध्ये परस्परांच्या सहकार्याने परस्परांचे हित साधण्याचा प्रयत्न केला जातो. सहकारामुळे व्यक्तिव्यक्तींमधील दुरावा नाहीसा करून एकसंघ समाज निर्माण होण्यास मदत होते. सहकारी संस्थेमध्ये दुर्बल घटक एकत्र येऊन प्रगती करतात.

### २. दुर्बलांचे संरक्षण :–

सहकारामुळे समाजातील दुर्बल घटक, एकमेकांच्या सहकार्याने स्वत:चे संरक्षण करू शकतात. सहकारामुळे समाजातील दुर्बल घटक एकत्र येऊन अन्याय, पिळवणूकीविरुध्द लढा देऊ शकतात. त्यांचे सामर्थ्य वाढते. सहकार दुर्बलांचे आर्थिक संघटन आहे.

### ३. मध्यस्थांचे उच्चाटन :–

उत्पादक व ग्राहक यांचा प्रत्यक्ष संबंध येत नाही. उत्पादक स्वत: आपला माल प्रत्यक्षपणे ग्राहकांना विकत नाहीत. ग्राहक आपणास हव्या असणाऱ्या वस्तू प्रत्यक्ष उत्पादकांकडून खरेदी करीत नाहीत. व्यापारी वर्ग उत्पादकांकडून मालाची खरेदी करतो आणि ग्राहकांना पुरवितो. म्हणजे व्यापारी

हा उत्पादक आणि ग्राहक यांच्यामधील मध्यस्थ होय. व्यापारी लोक वस्तूंची किंमत वाढवून भरपूर नफा मिळवतात. सहकारी संस्थेच्या स्थापनेमुळे मध्यस्थ वर्गाचे उच्चाटन करणे शक्य होते. ग्राहकांना चांगल्या दर्जाच्या वस्तू रास्त किंमतीत उपलब्ध होतात.

### ४. नियोजन आणि सहकार :–

आर्थिक विकासाचे एक साधन म्हणून नियोजनाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. नियोजनाद्वारे आर्थिक विषमता कमी करणे, समतोल आर्थिक विकास साधणे, आर्थिक विकासाचा वेग वाढविणे, देशातील दारिद्र्य दूर करणे, नागरिकांचे राहणीमान उंचावणे यासारखी उद्दिष्टे साध्य करता येतात. नियोजनाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सहकारी संस्था मोलाची कामगिरी पार पाडतात.

### ५. विविध राजकीय प्रणालींचा सुवर्णमध्य :–

देशात सरकारने कोणत्या प्रकारची अर्थव्यवस्था स्थापन करावी याबाबत मतभिन्नता आढळते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलदारांचे उत्पादनावर वर्चस्व प्रस्थापित होऊन त्यांच्याकडून कामगारांची पिळवणूक होते. समाजात गरीब आणि श्रीमंत असे वर्ग निर्माण होऊन वर्ग संघर्ष वाढतो. भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील दोष सहकारामुळे दूर होऊ शकतात. साम्यवादी अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांची मालकी सरकारची असल्याने उत्पादन वाढीची प्रेरणा राहत नाही. याउलट सहकारी संस्थेत उत्पादन साधनांची मालकी संस्थेकडे असते. व्यक्तिसमूहाची मालकी असल्याने कार्यक्षमता वाढते. सहकारात भांडवलशाही अर्थव्यवस्था आणि साम्यवादी अर्थव्यवस्था या दोन्हींचे फायदे एकत्र मिळतात. विविध राजकीय प्रणालींचा सुवर्णमध्य सहकारात साधला जातो.

### ६. विश्वव्यापी स्वरूप :–

सहकारी चळवळीचा उगम इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीतून झाला. आर्थिक विषमता, पिळवणूक अन्यायाविरुध्द लढण्याचे एक प्रभावी साधन म्हणून सहकाराचा पुरस्कार करण्यात आला. जगात सहकारी चळवळ अधिक लोकप्रिय होऊ लागली. जगातील अनेक देशात सहकार आहे. इंग्लंड, अमेरिका, जर्मनी अशा विकसित, अविकसित व विकसनशील देशांमध्येही सहकारी चळवळीने खूपच प्रगती केली. जगात अनेक क्षेत्रात सहकारी संस्था महत्त्वाचे कार्य करीत आहेत. उदा. शेती, उद्योगधंदे, प्रक्रिया, कर्जपुरवठा, बँकिंग, घरबांधणी इत्यादी.

### ७. सहकार आणि विकसित देश :–

विकसित देशात सहकारी संस्था शेती उत्पादन व प्रक्रिया, विक्री, कर्जपुरवठा, घरबांधणी इत्यादी क्षेत्रात महत्त्वाचे कार्य करीत आहेत. प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे मिळविणे, सभासदांना

व ग्राहकांना कमी खर्चात सेवा पुरविणे इत्यादी कार्ये करीत आहेत. सहकारामुळे प्रगत देशातील नागरिकांच्या राहणीमानात खूपच सुधारणा झाली आहे. तेथील आर्थिक विषमता कमी करण्यास हातभार लावलेला आहे.

**८. सहकार आणि अविकसित देश :–**

अविकसित देशात आर्थिक विषमता, अज्ञान. बेकारी, दारिद्र्य प्रमुख समस्या आहेत. या समस्या दूर करून देशाची सर्वांगीण प्रगती साधण्यात सहकाराचा सहभाग मोठा आहे. अविकसित देशाचा आर्थिक विकास घडवून आणता येतो. सहकारामुळे सामाजिक व आर्थिक प्रगती होते.

विकसनशील देशात सहकाराचा अधिक उपयोग होऊ शकतो. ग्रामीण भागात कृषीउद्योगांचा विकास होऊन ग्रामीण बेकारी कमी करता येते. तेथील जनतेच्या राहणीमानात सधारणा घडवून आणता येतात. सहकारामार्फत जलद आर्थिक विकास, संपत्तीचे विकेंद्रीकरण, नफ्याचे व उत्पन्नाचे न्याय वाटप, आर्थिक विकास साध्य करता येतो.

❑ **स्वयं–अध्ययन प्रश्न–२**

✡ **खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. सहकारी संस्थेचा कारभार ............ पध्दतीने चालतो.
*अ) भांडवलशाही ब) लोकशाही क) समाजवादी ड) हुकूमशाही.*

२. सहकारात ................ संरक्षण केले जाते.
*अ) दुर्बलांचे ब) भांडवलदारांचे क) व्यवसायिकांचे ड) व्यापाऱ्यांचे.*

३. सहकारी संस्थेची सर्वोच्च सत्ता ................ हाती असते.
*अ) संचालकांच्या ब) कर्मचाऱ्यांच्या क) सर्वसाधारण सभेच्या ड) भांडवलदारांच्या.*

## १.२.३ सहकारी तत्त्वांचा विकास आणि मँचेस्टरची सहकाराची तत्त्वे (Development of Co-operative Principles and Manchester Co-operative Principles)

❑ **सहकाराची तत्त्वे (Principles of Co-Operation) :-**

सहकारी संस्थेचा कारभार विशिष्ट नियमांच्या आधारे चालतो. सहकाराची तत्त्वे म्हणजे सहकाराचे नियम होय. सहकाराची तत्त्वे म्हणजे सहकाराची प्रेरक शक्ती होय. सहकार हा आर्थिक संघटन प्रकार आहे. तो एक व्यावसायिक संघटन प्रकार आहे.

सहकाराची कार्यपध्दती, सहकारी संस्थेचे संघटन, आर्थिक व्यवहार, हिशोब पद्धती, व्यवस्थापन, प्रशासन, सभासदांचे हक्क आणि कर्तव्ये, संस्थेची कर्तव्ये इत्यादीबाबत जे नियम केलेले असतात, त्या नियमास सहकार तत्त्वे असे म्हणतात. एम. जॉर्ज डेव्हिस यांच्या मते, 'सहकारी संघटनेचे अस्तित्व व कार्यपध्दती ठरविणाऱ्या नियमांचा संच म्हणजे सहकाराची तत्वे होय. सहकाराच्या वैशिष्ट्यावर सहकार विचारवंतानी वेगवेगळी मते आहेत. प्रत्येक देशातील सहकारी तत्वामध्ये भिन्नता दिसून येते.

प्रा. वॅटकिन्सच्या मते, सहकारी चळवळीच्या कार्याबद्दलची मूलभूत धोरणे आखणे उद्दिष्टपूर्ती करणे यासाठी दिशा दाखविण्याकरिता स्वीकारलेले तत्त्वज्ञान म्हणजे सहकारी तत्त्वे होय. 'सहकाराची तत्त्वे म्हणजे सहकारी संस्थेतील कार्य आणि जीवनासंबंधी सांगितलेले काही नियम होत. त्यामुळे सहकारी चळवळ लोकांची चळवळ झाली आहे. सहकारी संस्थेचा कारभार नियंत्रित म्हणजे सहकाराची तत्त्वे होय.

## ❑ सहकार तत्त्वाचा विकास (Development of Co-Operation Principles) :-

वेगवेगळ्या विचारवंतांनी सहकाराची वेगवेगळी तत्त्वे सांगितली आहेत. रॉबर्ट ओवेन हा सहकारी चळवळीचा जनक होय. चार्लस् रॉ फोरिअर यांनी सर्वप्रथम सहकारी संस्था स्थापन करण्याची कल्पना मांडली. सहकारी संस्थेचे स्वरूप कसे असावे याबाबत विचार मांडले. सहकारी संघटन, सहकाराचे ऐच्छिक स्वरूप, लोकशाही नियंत्रण, सामाजिक उद्दिष्ट्ये या चार तत्त्वावर आधिक भर दिला. भांडवलशाहीतील दोष टाळण्यासाठी पर्याय म्हणून त्यांनी हे विचार मांडले. देशाच्या आर्थिक परिस्थितीनुसार विचार मांडण्यात आले.

## ❑ रॉश्डेल तत्त्वे (Rochdale Principles) :-

सहकारी चळवळीचा उगम इंग्लंडमध्ये झाला. सन १८४४ मध्ये इंग्लंडमधील रॉश्डेल या ठिकाणी रोडलॅन्ड गल्लीत प्रत्येकी १ पौंड वर्गणी जमा करून सहकारी तत्त्वावर ग्राहक भांडाराची स्थापना केली, त्यांच्या व्यवसायाचे नियम हे रॉश्डेल तत्त्वे म्हणून ओळखली जातात. ती याप्रमाणे आहेत.

१) खुलेसभासदत्व, २) लोकशाही नियंत्रण, ३) भांडवलावर मर्यादित व्याज, ४) सहकारी संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात आधिक्याचे वाटप, ५) रोखीचे व्यवहार, ६) सामाजिक व राजकीय तटस्थता, ७) सभासद शिक्षणाचा प्रसार, ८) निर्भेळ व शुध्द मालाची विक्री.

## ❑ शुल्झ डेलित्स तत्त्वे (Schulze-Delitzsch Principles) :-

जगातील सहकारी पतपुरवठा चळवळीची सुरुवात जर्मनीमध्ये झाली. न्यू शुल्झ यांनी शहरी

भागातील गरीब समाजातील व्यक्तीच्या व व्यापाऱ्यांच्या आर्थिक गरजा पूर्ण करता याव्यात यासाठी जनता सहकारी बँकेची स्थापना केली. त्यांनी मांडलेली तत्त्वे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) स्वावलंबन व परस्पर साहाय्य, २) विस्तृत कार्यक्षेत्र, ३) संस्थेतील सहभागाच्या प्रमाणात आधिक्याचे वाटप, ४) भागभांडवलावर महत्तम व्याज, ५) सभासदांची मर्यादित जबाबदारी, ६) व्यावसायिक विशेषीकरण, ७) आधिक्यातून १० टक्के भाग राखीव निधीत ठेवणे.

## ❑ रफायझन तत्त्वे (Raiffeisen Principles) :-

जर्मनी शेतीप्रधान देश आहे. शेती मागासलेली होती. शेतकरी दरिद्री, कर्जबाजारी होता. इ.स. १८४८ मध्ये ग्रामीण भागातील शेती व्यवसायाला पतपुरवठा करण्यासाठी सहकारी तत्त्वावर बँकांची स्थापना करण्यात आली. फ्रेडरिक निकोलसनवर जर्मनीच्या या सहकारी पतपुरवठा चळवळीचा प्रभाव पडला, त्यानी भारतासाठीही याच धर्तीवर सहकारी पतपुरवठ्याची योजना राबवावी असे सुचविले. या तत्त्वांचा सारांश पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) स्वावलंबनातून आत्मनिर्भरता, २) एका खेड्यापुरते कार्यक्षेत्र, ३) आधिक्याचे राखीव निधीत संम्मीलन, ४) भाग-वर्गणीशिवाय सर्वांना सभासदत्व, ५) फक्त सभासदांना साहाय्य, ६) मर्यादित जबाबदारी इत्यादी.

## ❑ औद्योगिक सहकारी संस्था :-

फ्रान्समध्ये औद्योगिक सहकारी संस्थांचा उगम झाला. चार्लस् फोरिअरच्या प्रेरणेने सहकारी प्रक्रिया संस्था स्थापन झाली.

सन १८५८ नंतर सहकारी प्रक्रिया संस्था अस्तित्वात आल्या. त्यांची तत्त्वे. १) परस्पर साहाय्य, २) राजकीय तटस्थता, ३) सभासदांचे कल्याण इत्यादी.

सन १८६६ मध्ये इटलीमध्ये शुल्झ पद्धतीच्या सहकारी बँका शहरी भागात स्थापन झाल्या. इटलीमधील सहकारी चळवळीचे खास वैशिष्ट्य मजूर सहकारी संस्थांची स्थापना होय. १८८३ मध्ये 'General Association of Workers' ही जगातील पहिली मजूर सहकारी संस्था स्थापन झाली. सन १८७० मध्ये स्वीडनमध्ये सहकारी ग्राहक भांडारे स्थापन झाली.

## ❑ सहकारी तत्त्वांची पुनर्मांडणी :-

सहकारी तत्त्वांची पुनर्मांडणी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेची समिती (I.C.A.) स्थापन करण्यात आली. इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह अलाइन्स (I.C.A.) या समितीने १९३७ मध्ये आपला अहवाल सादर केला. त्यामध्ये पुढील तत्त्वे सांगितली.

१) खुले सभासदत्व, २) लोकशाही नियंत्रण, ३) भांडवलावर मर्यादित व्याज, ४) सभासदांनी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात आधिक्याचे समान वाटप, ५) शिक्षणाचा प्रसार, ६) सहकारांतर्गत सहकार, ७) धार्मिक व राजकीय तटस्थता, ८) रोखीचे व्यवहार.

सहकारी तत्त्वांचा पुन्हा एकदा विचार करण्याची आवश्यकता निर्माण झाली. आंतरराष्ट्रीय सहकार काँग्रेसने सहकारी तत्त्वांचा अभ्यास करण्यासाठी श्री. डी. जी. कर्वे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. या समितीने १९६६ मध्ये आपला अहवाल सादर केला. ती तत्त्वे पुढील प्रमाणे :-

१) खुले व ऐच्छिक सभासदत्व असावे.

२) लोकशाही व्यवस्थापनाप्रमाणे कार्य चालावे.

३) भांडवलावर मर्यादित व्याज द्यावे.

४) सहकाराचे शिक्षण.

५) सहकारी संस्थांनी स्थानिक पातळीवर, राष्ट्रीय पातळीवर आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करावे.

## ❑ मँचेस्टर सहकाराची तत्त्वे (Manchester Co-operative Principles) :-

सन १९९५ मध्ये मँचेस्टर काँग्रेसने सहकाराची सात मुलभूत तत्त्वे मांडली. त्याला मँचेस्टरची सहकाराची तत्त्वे असे म्हणतात. मँचेस्टरची सहकाराची तत्त्वे पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

### १. ऐच्छिक व खुले सभासदत्व :-

सहकारी संस्थांचे सभासदत्व ऐच्छिक व खुले असते. सभासदत्व देताना धर्म, जात, वंश, भाषा, वर्ण, लिंग इत्यादीवरून भेदभाव केला जात नाही. सहकारी संस्थेचे सभासदत्व स्वीकारायचे की नाही हे व्यक्तिच्या इच्छेवर अवलंबून असते. तसेच व्यक्तीला स्वइच्छेने सहकारी संस्थेतून बाहेर पडता येते. अज्ञानी, भ्रष्टाचारी व दिवाळखोर व्यक्तीला सभासदत्व नाकारले जाते. खुले सभासदत्व याचा अर्थ पात्र व्यक्तीला सभासदत्व खुले असते. सहकारी संस्था ऐच्छिक स्वरूपाचे संघटन आहे. संस्थेत सहभागी होण्याचे व संस्थेतून बाहेर पडण्याचे स्वातंत्र्य असते. खुले सभासदत्व याचा अर्थ कोणालाही मुक्त प्रवेश असा होत नाही. प्रत्येक सहकारी संस्थेचे किफायतशीर आकारमान ठरलेले असते. उदा. गृहनिर्माण सहकारी संस्था ठेकेदाराला मजूर सहकारी संस्थेचे सभासदत्व दिले जात नाही. सहकारी नियमांचे पालन करणाऱ्याला सभासदत्व खुले असते.

### २. लोकशाही पद्धतीने कारभार :-

सहकारी संस्थेचा कारभार लोकशाही पध्दतीने चालतो. लोकशाहीत अंतिम सत्ता लोकांच्याकडे असते. त्याचप्रमाणे सहकारात अंतिम सत्ता सभासदांच्याकडे म्हणजे सभासदांच्या सर्वसाधारण सभेकडे असते. सभासद संचालक, मंडळाची निवड करतात. संचालक मंडळातून अध्यक्ष व उपाध्यक्षाची निवड केली जाते. सहकारी संस्थेचा दैनंदिन कारभार सचिव व कर्मचारी पाहतात. लोकशाहीप्रमाणे एक सभासद एकमत असते. सहकारी संस्था लोकशाही संघटना असून त्यात समानतेच्या तत्त्वावर व्यक्ती एकत्र येतात. संस्थेत भांडवलापेक्षा व्यक्तीला अधिक महत्त्व दिले जाते. सभासदाच्या भांडवलाचा विचार न करता एक व्यक्ती एक मत या तत्त्वाचा अवलंब केला जातो. लोकशाहीप्रमाणे सहकारी संस्थेचा कारभार सभासदांनी निवडून दिलेल्या कार्यकारी समितीमार्फत पाहिला जातो.

### ३. सभासदांची आर्थिक भागिदारी :-

सहकारी संस्थेने भांडवलावर मर्यादित दराने व्याज द्यावे. सहकारी संस्थेने भांडवलाचा मोबदला म्हणून जास्त व्याज देणे योग्य ठरत नाही. सभासद समतेच्या तत्त्वावर सहकारी संस्थेचे भांडवल उभारणीस मदत करतात. भांडवलावर जास्त व्याज दिले जात नाही. भांडवलावर जास्त व्याज दिल्याने आर्थिक विषमता वाढते. भांडवलदारांचा फायदा होतो. भांडवलावर व्याज द्यावे हे मान्य करण्यात आले आहे.

### ४. स्वायत्तता आणि स्वातंत्र्य :-

सहकारी संस्था या स्वायत्त आणि स्वावलंबी संघटना असाव्यात. सहकारी संस्थांना स्वातंत्र्य असावे. आज सहकारी संस्था शासनाच्या मदतीने व सहकार्याने वाढत आहेत. सहकारी संस्था इतरांवर अवलंबून असू नयेत. राजकारणापासून अलिप्त असाव्यात. व्यक्ती सहकारी संस्थेमार्फत संघटित होतात. एकमेकांना सहकार्य करतात. सहकारात एकासाठी सर्व व सर्वांसाठी एकजन असतो. परस्पर सहाय्यातूनच सहकारी संस्था स्वावलंबी बनू शकते. जर सहकारी संस्था स्वावलंबी बनली तर ती सभासदांच्या गरजा चांगल्या प्रकारे पूर्ण करू शकते.

### ५. शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती :-

सहकारी चळवळीच्या विकासासाठी व्यक्ती, समाज, सभासद, संचालक, अधिकारी, कर्मचारी यांना सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. सहकारी चळवळीचे यश शिक्षित व प्रशिक्षित सभासद, संचालक यांच्यावर अवलंबून असते. मॅडिसन यांच्या मते, ''सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण नसलेल्या लोकांच्या हातात सहकारी संस्थेचा कारभार सोपविल्यास ते हास्यास्पद होईल तसेच ती चळवळीची शोकांतिका ठरेल. प्राध्यापक डी. जे. कर्वे यांच्या मते, 'सहकाराचे कायदे, नियम, फायदे कार्यपध्दती यांची माहिती होण्यासाठी सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण आवश्यक आहे.

सहकारी संस्थेतील व्यवहाराची माहिती सर्व सभासदांना असावी. संस्थेची आर्थिक परिस्थिती ध्येय, धोरण, कार्यपध्दती, नियम, फायदे, घडामोडी याची माहिती सभासदांना असावी. अधिकारी व कर्मचारी यांना संस्थेच्या कामकाजाची, व्यवहाराची माहिती असावी. सहकारी संस्थेच्या व्यवहारात कोणत्याही प्रकारची गुप्तता असू नये.

### ६. सहकारांतर्गत सहकार :-

सहकारी संस्थोंनी परस्पर सहाय्यातून स्वावलंबन प्राप्त करावे. एकासाठी सर्व आणि सर्वांसाठी एक याप्रमाणे परस्पर सहकार्य, सहाय्य करावे. सहकार दुर्बलांचे संघटन आहे. प्रत्येकाकडे असणारी साधनसामग्री अल्प प्रमाणात व अपूरी असते. यासाठी आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी एकमेकांना सहकार्य करणे, सहकारी संस्था परस्पर सहाय्यातून स्वावलंबी बनल्या पाहिजेत. सन १९६६ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेच्या तज्ञ समितीने या तत्त्वाचा समावेश केला. 'सर्वांकरिता एक व एकाकरिता सर्व' हा सहकाराचा मूलमंत्र आहे. सहकार दुर्बलांचे आर्थिक संघटन आहे. सर्वजण एकत्र येवून स्वहित साध्य करतात. एका सहकारी संस्थेने दुसऱ्या सहकारी संस्थेस सहकार्य/मदत करावी.

### ७. समाजाशी नाते :-

सभासदांच्या, समाजाच्या गरजा भागविणे सहकारी संस्थेचे प्रधान कर्तव्य आहे. संस्थेच्या व सभासदांच्या प्रगतीबरोबर समाजाची प्रगती व्हावी. सहकारी संस्थांनी आपली सामाजिक व आर्थिक जबाबदारी पार पाडावी. सामाजिक व आर्थिक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न करावा. सहकारी संस्थांना सामाजिक जबाबदारीचे भान असणे महत्त्वाचे ठरते. सहकारी चळवळीच्या माध्यमातून समाजातील दुर्बल घटक भांडवलदारांविरुध्द यशस्वीपणे लढा देवू शकतात. समाजातील आर्थिक विषमता दूर करण्याच्या दृष्टीने तसेच सामाजिक परिवर्तनासाठी सहकाराचे योगदान महत्त्वाचे आहे. सहकारामुळे समाजरचना बळकट होते. सहकारी संस्था सामाजिक संस्था आहेत. समाजाच्या प्रगतीसाठी प्रयत्न करतात. देश विकासात महत्त्वाची भूमिका बजावतात.

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-३

**✡ खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. जगातील पहिली पतपुरवठा सहकारी संस्था .............. देशात स्थापन झाली.

*अ) रशिया   ब) अमेरिका   क) फ्रान्स   ड) जर्मनी.*

२. मँचेस्टरची सहकाराची तत्वे ................. मध्ये मांडण्यात आली.

*अ) १७९५   ब) १८९५   क) १९९५   ड) २००५.*

३. जगातील पहिली मजूर सहकारी संस्था ................ मध्ये स्थापन झाली.

*अ) १८८३* *ब) १८८५* *क) १९०४* *ड) १९९५.*

४. सहकारी संस्थेचा कारभार ................. पध्दतीने चालतो.

*अ) हुकूमशाही* *ब) लोकशाही* *क) समाजवादी* *ड) भांडवलशाही.*

## १.२.४ आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना/जागतिक सहकारी संघटन : संघटन आणि कार्ये (Organization and Functions of International Co-operative Alliance)

आज जगात सहकारी चळवळींचा प्रचार व प्रसार झालेला आहे. विविध देशात सहकारी चळवळ महत्त्वाचे कार्य करत आहे. सहकारी चळवळीचा उगम इंग्लंडमध्ये झाला. आज जगात भारत, जर्मनी, इंग्लंड, इस्त्राईल, चीन इ. देशात सहकारी चळवळ पसरली आहे. भारतात सहकारी साखर कारखाना व सहकारी बँकांची कार्ये उल्लेखनीय आहेत. डेन्मार्कमध्ये दुग्ध सहकारी संस्थांनी धवलक्रांती घडवून आणली. इस्त्राईलमध्ये सहकार शेतीने प्रगती केली आहे. जर्मनीत सहकार पतपुरवठा संस्थांचे कार्य महत्त्वाचे आहे. विविध देशातील सहकारी संस्थांमध्ये सहकार्य करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना स्थापन करण्यात आली.

जेव्हा राष्ट्रीय पातळीवर सर्व सहकारी संस्था एकत्रित येऊन सहकारी संघ स्थापन करतात, तेव्हा त्या सहकारी संघटनेला आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना असे म्हणतात. सर्व सहकारी संस्थांना आंतरराष्ट्रीय पातळीवरील सहकारी संघटना स्थापन करणे आवश्यक वाटू लागले. त्यामुळे सहकाराचे समान प्रकारचे धोरण आखता येईल, यातून आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना स्थापन झाली.

### ❑ आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना उगम/स्थापना :-

सन १८९५ मध्ये लंडन येथे आंतरराष्ट्रीय सहकार्य संघटना स्थापन करण्यात आली. त्यावेळी ६० देशातील १४३ संघटना जोडल्या आहेत. जगातील सहकार्याचा प्रश्न सोडवून सहकारातील एकात्मता वाढवणे, सहकारी संस्थांमध्ये मैत्रीचे व आर्थिक संबंध वाढवणे, जगात सहकारी तत्वांचा प्रचार व प्रसार करणे, सहकारी हितसंबंधाचे रक्षण करणे यासाठी या संघटनेची स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची तीन प्रादेशिक कार्यालये आहेत. दिल्ली, टांझानिया, मोशी येथे प्रादेशिक कार्यालये आहेत.

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना म्हणजे जगातील अनेक देशांतील सहकारी संस्थांनी एकत्रित येऊन स्थापन केलेला महासंघ होय. जगातील सर्व सहकारी संस्थांच्या प्रश्नांचा अभ्यास करते. या

संघटनेमार्फत जगातील सर्व सहकारी संस्थांशी संबंध जोडता येतो. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना विविध देशांतील सहकारी संस्थांशी प्रत्यक्ष संपर्क साधत असते.

### ❑ उद्दिष्ट्ये (Objectives) :-

१. जगात सहकारी पद्धतीचा प्रसार करणे.

२. सहकाराचे महत्त्व वाढविणे.

३. सहकारी संस्थांमध्ये मैत्रीचे व आर्थिक संबंध प्रस्थापित करणे.

४. सहकारी संघटनांचे प्रतिनिधित्व करणे.

५. जागतिक शांतता व सुरक्षितता निर्माण करणे.

६. सहकार चळवळीचा विकास करणे.

७. सहकार चळवळीचा प्रचार व प्रसार करणे.

● **सभासदत्व :** ज्या सहकारी संस्थेत आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या, उद्दिष्टांचे व धोरणांचे पालन केले जाते. त्या संस्थेस सभासदत्व दिले जाते. आंतरराष्ट्रीय संस्था या संघटनांचे सभासद आहेत. सभासदत्व ऐच्छिक व खुले असते.

● **शासन :** आंतरराष्ट्रीय सहकार संघटना शासन व्यवस्था महासभा, मध्यवर्ती समिती, मुख्य अधिकार व जर्नल सिक्रेट असते. सन १९९२ पासून या संघटनेचे मुख्य कार्यालय जिनिव्हा येथे आहे तर भारतातील दिल्लीत मोशी व टांझानियातील पश्चिम आफ्रिकेत अबीदजन येथे प्रादेशिक कार्यालये आहेत.

### ❑ आंतरराष्ट्रीय संघटनेचे सभासदत्व (Membership of ICA) :-

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचे सभासदत्व पूर्वी सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना आणि व्यक्तींना दिले जात होते. परंतु १९०२ मध्ये केलेल्या दुरुस्तीप्रमाणे कोणत्याही व्यक्तीला सभासद करून घेतले जात नाही. सध्या फक्त सहकारी संस्थांनाच सभासद करून घेतले जाते. सहकारी संस्थेला सभासदत्व देताना रॉश्डेल, आय.सी.ए. तत्त्वाप्रमाणे चालणार असल्यास सभासदत्व दिले जाते.

### ❑ आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेचे संघटन (Organization of International Co-operative Alliance) :-

#### १. काँग्रेस :–

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची काँग्रेस ही सर्वोच्च अधिकारी संस्था वा अधिकार मंडळ आहे.

काँग्रेसमध्ये संलग्न सहकारी संस्थेचे सभासद असतात आणि काँग्रेसची सभा व बैठक तीन वर्षातून एकदा होते. काँग्रेस आपल्या सभेत आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेच्या कार्याचा आढावा घेते. मध्यवर्ती समितीने वा इतर संघटनांनी विचारार्थ पाठविलेल्या ठरावावर चर्चा करून निर्णय घेते.

**२. मध्यवर्ती समिती :–**

राष्ट्रीय पातळीवरील सहकारी संघाचे सभासद हे मध्यवर्ती समितीचे सभासद असतात. सर्वसाधारणपणे प्रत्येक राष्ट्रीय सहकारी संघाला आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या मध्यवर्ती समितीवर एक प्रतिनिधी पाठविता येतो. परंतु एका देशातील एक राष्ट्रीय संघटना जास्तीत जास्त १० प्रतिनिधी आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेवर पाठवू शकते. सहकारातील महत्त्वाचे निर्णय स्वत:च्या जबाबदारीवर घेण्याचा अधिकार मध्यवर्ती समितीला आहे. त्याचप्रमाणे कार्यकारी समितीच्या निर्णयाविरुध्द करण्यात येणाऱ्या तक्रारीचे निराकरण करणे.

**३. कार्यकारी समिती :–**

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या कार्यावर सर्वसाधारण कार्यकारी समिती नियंत्रण ठेवते व मध्यवर्ती समितीची बैठक काही प्रश्नांवर निर्णय घेते. कार्यकारी समिती काँग्रेसच्या सभेची तारीख, विषय ठरविते व आपल्या कार्याचा अहवाल काँग्रेलसला सादर करते. कार्यकारी समिती प्रामुख्याने अर्थव्यवहार व सभासदत्वाच्या कार्याकडे लक्ष पुरवित असते. मध्यवर्ती समितीशी सतत संपर्क ठेवून कारभारावर नियंत्रण ठेवते.

**४. संचालक :–**

आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेचे दैनंदिन कामकाज सचिवालयामार्फत चालते व त्याचा प्रमुख संचालक असतो. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने दिल्ली व मोशी येथे प्रादेशिक कार्यालये स्थापन केली. दक्षिण पूर्व आशियासाठी असणारे कार्यालय भारतात नवी दिल्ली येथे १९६० मध्ये सुरू झाले.

**५. सचिव :–**

सचिव हा प्रशासकीय प्रमुख असतो. सचिवालयात शिक्षण, लोकसंपर्क, संशोधन, आकडेवारी इ. विभागांसाठी प्रत्येकी एक सचिव असतो.

## ❑ आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची कार्ये (Functions of International Co-operative Alliance) :-

**१. आंतरराष्ट्रीय सल्लागार मंडळ :–**

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना आंतरराष्ट्रीय संस्थांना सल्ला देण्याचे कार्य करते. विविध

जागतिक संघटनांच्या सभेत व चर्चासत्रात भाग घेते. आंतरराष्ट्रीय आर्थिक मदत मिळवून देण्याचे प्रयत्न करते. युनो, जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व इतर आंतरराष्ट्रीय संघटनांनी आयोजित केलेल्या चर्चासत्रात भाग घेते.

**२. तांत्रिक मदत :-**

आंतरराष्ट्रीय सहकार संघटनांना तांत्रिक मदत करते. विकसित देशातून तांत्रिक मदत घेतली जाते. आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापार वाढविण्यासाठी ही मदत केली जाते. बँका, विमा व पतपुरवठा यासारख्या संस्थांना विकासासाठी मदत केली जाते.

**३. विविध सहकारी संस्थांमध्ये संबंध प्रस्थापित करणे :-**

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना जगातील विविध सहकारी संस्थांमध्ये संबंध प्रस्थापित करणयाचे कार्य करते.

सहकारी बँका, सहकारी खरेदी-विक्री संस्था, दुग्ध सहकारी संकस्था इ. संस्थांमध्ये संबंध साधण्याचे कार्य करते. त्यामुळे सहकारी चळवळीचा विकास होतो.

**४. सहकाराचे महत्त्व वाढविणे :-**

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना सहकाराचे महत्त्व वाढविण्याचे कार्य करते. त्यासाठी जगात सहकारी तत्त्वे व पध्दतीचा प्रसार केला जातो. सहकारी संस्थांची संख्या वाढविलीजाते. समाजातील लोकांना सहकाराचे फायदे, महत्त्व पटवून सांगितले जाते.

**५. अलिकडच्या वर्गातील कार्य :-**

आंतरराष्ट्रीय सहकारी संस्थांचे विलीनीकरण करते. त्यामुळे सहकारी संस्था मजबूत होतात. सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाचे कार्य करते. सहकारी संस्थामार्फत निर्यात वाढविण्याचा प्रयत्न केला जातो. आंतरराष्ट्रीय सहकारी संस्था सहकारी चळवळीचा प्रसार व प्रचार करण्याचे कार्य करते.

**६. सहकारी संस्थांना प्रतिनिधीत्व देणे :-**

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना सहकारी संस्थांना प्रतिनिधीत्व देण्याचे कार्य करते. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना जागतिक पातळीवर सहकारी संस्थांचे प्रतिनिधीत्व करते. जागतिक बँक, संयुक्त राष्ट्र संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी इ जागतिक संघटनांच्या कार्यशाळा, परिषदा, चर्चासत्र, इत्यादीमध्ये सहकाराचे प्रश्न मांडते. ही संघटना जागतिक पातळीवर सहकाराचे विविध प्रश्न मांडून सोडवण्याचा प्रयत्न करते. सहकाराचे नेतृत्व करते.

**७. विकसनशील देश :-**

आज जगात विकसनशील देशात सहकारी चळवळ मोठ्या प्रमाणात पसरली आहे. आशिया व आफ्रिका देशातील विकसनशील संस्थांना मदत केली जाते. या संघटनेने आशिया, आफ्रिकाय येथे प्रादेशिक कार्यालये सुरू केली आहेत. विकसनशील देशात सहकारी साखर कारखाने, दुग्ध संस्था, सहकारी सूतगिरण्या, सहकारी बँका, मजूर सहकारी संस्था यांना आर्थिक मदत केली जाते. त्यांना सल्ला व मार्गदर्शनाचे कार्य केले जाते.

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-४**

✡ **खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची स्थापना .............. मध्ये झाली.

*अ) १६९५ ब) १७९५ क) १८९५ ड) १९९५.*

२. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना ................. येथे स्थापन करण्यात आली.

*अ) अमेरिका ब) लंडन क) रशिया ड) चीन.*

३. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचे मुख्य कार्यालय ................. येथे आहे.

*अ) जिनिव्हा ब) मोशी क) पिटसबर्ग ड) जर्मनी.*

४. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचे ................. हे सर्वोच्च अधिकारी मंडळ आहे.

*अ) मध्यवर्ती समिती क) काँग्रेस*

*ब) कार्यकारी समिती ड) संचालक.*

५. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची ................. प्रादेशिक कार्यालये आहेत.

*अ) १ ब) २ क) ३ ड) ५.*

## १.३ सारांश

सहकार मानवाला नवीन नाही. कारण प्राचीन काळापासून मानव एकमेकांच्या सहकार्याने जीवन जगत आहे. सहकारात सर्वजण एकमेकांना मदत करतात. सहकार म्हणजे सर्वांनी एकत्रित काम करणे. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीतून सहकाराचा प्रारंभ झाला. सन १८४४ मध्ये इंग्लंडमध्ये रॉश्डेल या ठिकाणी २८ विणकऱ्यांनी जगातील पहिली ग्राहक सहकारी संस्था स्थापन केली.

सहकारात काही खास गुणवैशिष्ट्ये दिसून येतात. आज जगात सहकारी चळवळ पसरली आहे.

सहकारात व्यक्तीला व सेवेला प्रथम स्थान दिले जाते आणि भांडवलाला दुय्यमस्थान दिले जाते. सहकार ऐच्छिक व लोकशाही स्वरूपाचे संघटन आहे. सहकारामुळे एकसंघ समाज निर्माण होण्यास मदत होते. सहकारी दुर्बलांचे आर्थिक संघटन आहे.

सहकारी संस्थेचा कारभार सहकाराचे नियम व तत्वांच्या आधारे चालतो. सहकारी संस्थेचे संघटन, आर्थिक व्यवहार, हिशोब पद्धती, व्यवस्थापन इ. बाबत नियम आहेत. वेगवेगळ्या विचारवंतांनी सहकाराची वेगवेगळी तत्वे सांगितली आहेत. सन १८८५ मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना स्थापन झाली. अनेक देशातील राष्ट्रीय सहकारी संस्था सभासद आहेत. जगातील सहकारी संस्थांच्या प्रश्नांची सोडवणूक करणे प्रधान कार्य समजले जाते.

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची कॉंग्रेस सर्वोच्च अधिकारी संस्था आहे. राष्ट्रीय सहकारी संघाचे सभासद हे मध्यवर्ती समितीचे सभासद असतात. सचिव हा प्रशासकीय प्रमुख असतो. विविध सहकारी संस्थांमध्ये संबंध प्रस्थापित करणे व त्यांना सहकार्य करणे प्रमुख कार्य मानले जाते.

## १.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **आधिक्याचे वाटप :** सहकारी संस्थांना सेवा व काटकसर करून जो नफा मिळतो, त्याला आधिक्य असे म्हणतात.

२. **विधायक स्पर्धा :** स्पर्धेच्या चांगल्या लक्षणाला विधायक स्पर्धा असे म्हणतात.

३. **विश्वव्यापी स्वरूप :** जगात प्रसार होणे.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

✡ **स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे**

१. *ड) रॉबर्ट ओवेन* २. *ब) इंग्लंड.*

✡ **स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे**

१. *ब) लोकशाही* २. *अ) दुर्बलांचे* ३. *क) सर्वसाधारण सभेच्या.*

✡ **स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे**

१. *ड) जर्मनी* २. *क) १९९५* ३. *अ) १८८३.*

४. *ब) लोकशाही.*

✡ **स्वयं-अध्ययन प्रश्न-४ ची उत्तरे**

१. *क) १८९५* २. *ब) लंडन* ३. *अ) जिनिव्हा.*

४. *क) काँग्रेस* ५. *क) ३.*

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

✡ **अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. सहकार म्हणजे काय? सहकाराची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. सहकाराची मँचेस्टर तत्त्वे स्पष्ट करा.

३. सहकार म्हणजे काय? सहकाराचे महत्त्व सांगा.

✡ **ब) टिपा लिहा.**

१. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना.

२. सहकारी तत्वांचा विकास.

## १.७ अधिक वाचनासाठी संदर्भ सूची


१. **Dr. B. S. Mathur** : *"Co-operation in India"*, Sahitya Bhawan Publishers and Distributors (P) Ltd., Agra - 1999.

२. **R. D. Bedi** : *"Theory, History & Practice of Co-operation"*.

३. **प्रा. भोसले, प्रा. कांटे** : *''सहकार''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४. **प्रा. डॉ.रूपा शहा व डॉ. बी. एच. दामजी** : *''सहकार''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. **प्रा. डॉ. सी. जे. जोशी, प्रा. के. सी. जोशी** : *''सहकाराचा विकास''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जून, २०१५.


✡✡✡

सत्र-३ : घटक-२

# सहकाराचे संघटन

## (Co-operation as a Form of Organization)

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ भांडवलशाहीची वैशिष्ट्ये, गुण आणि दोष

२.२.२ समाजवादाची वैशिष्ट्ये, गुण आणि दोष

२.२.३ भांडवलशाही आणि समाजवाद यामधील सहकार सुवर्णमध्य.

२.२.४ मिश्र अर्थव्यवस्थेतील सहकाराची भूमिका.

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासामध्ये आपणांस पुढील बाबींचे आकलन होईल.

१. भांडवलशाहीची वैशिष्ट्ये लक्षात येतील.

२. भांडवलशाहीच्या गुण-दोषांची माहिती होईल.

३. समाजवादाची वैशिष्ट्ये लक्षात येतील.

४. समाजवादाचे गुण व दोषांची माहिती होईल.

५. भांडवलशाही आणि समाजवाद यामधील सहकार सुवर्णमध्य आहे हे समजून येईल.

६. मित्र अर्थव्यवस्थेतील सहकाराची भूमिका समजून येईल.

## २.१ प्रास्ताविक (Introduction)

अमेरिकेने भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा स्विकार केला, तर चीनने समाजवादी अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेमध्ये काही गुण व काही दोष आहेत. प्रत्येक देशाची अर्थव्यवस्था भिन्न असते. देशाच्या अर्थव्यवसथेचे स्वरूप लक्षात घेऊन अर्थव्यवस्थेचा स्विकार लाभदायक ठरतो. भारताला कृषी, औद्योगिक व सहकार क्षेत्राचे विकास करावयाचा आहे. म्हणून भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. भांडवलशाही व समाजवाद यामधील सहकार सुवर्णमध्य आहे. मिश्र अर्थव्यवस्थेत सहकाराची भूमिका प्रधान समजली जाते.

## २.२ विषय विवेचन (Subject Discription)

प्रस्तुत घटकामध्ये आपण भांडवलशाहींची वैशिष्ट्ये, भांडवलशाहीचे गुण व दोष, समाजवादाची वैशिष्ट्ये, समाजावादाचे गुण आणि दोष, भांडवलशाही आणि समाजवाद यामधील सहकार सुवर्णमध्य, मिश्र अर्थव्यवस्थेतील सहकाराची भूमिका या बाबींचा अभ्यास करणार आहोत.

### २.२.१ भांडवलशाहीची वैशिष्ट्ये, गुण आणि दोष (Capitalism-Features, Merits and Demerits)

❑ **प्रस्तावना (Introduction) :-**

जगात सर्वप्रथम भांडवलशाही अर्थव्यवस्था निर्माण झाली. भांडवलशाहीत उत्पादन साधनावरती खाजगी मालकी असते. खाजगी मालमत्तेचा हक्क असतो. व्यक्ती व उद्योग संस्थांना खाजगी मालमत्ता मिळविता व प्राप्त करता येते, त्याचे स्वातंत्र्य असते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवल, किंमत, नफा, उत्पादन, विक्री इ. महत्त्वाचे असते. उत्पादकांना महत्तम नफा मिळतो. भांडवलशाहीत जास्तीत जास्त वस्तू व सेवांचे उत्पादन केले जाते. भांडवलशाहीत कोणत्या वस्तूचे किती प्रमाणात आणि कसे उत्पादन घ्यावयाचे असे महत्त्वपूर्ण प्रश्न किंमत यंत्रणेद्वारे सोडविले जातात. युरोपात नवीन तंत्र, यंत्र, ऊर्जा वापराने औद्योगिक विकास वेगाने झाला. अर्थव्यवस्थेत भांडवल गुंतविणाऱ्यांचे महत्त्व वाढत गेले. अशा तऱ्हेने भांडवलशाही अर्थव्यवस्था प्रस्थापित झाली.

❑ **भांडवलशाही अर्थव्यवस्थेची व्याख्या :–**

''ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनावर खाजगी मालकी असते, त्या अर्थव्यवस्थेला भांडवलशाही अर्थव्यवस्था म्हणतात.''

''ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादनाची साधने खाजगी मालकीची असतात आणि उत्पादनाचे कार्य,

विभाजन बाजार यंत्रणा बाजार यंत्रणा करावी लागते. अशा अर्थव्यवस्थेला भांडवलशाही अर्थव्यवस्था म्हणतात.''

## ❑ भांडवलशाहीची वैशिष्ट्ये (Features of Capitalism ) :-

भांडवलशाहीत खाजगी मालमत्ता बाळगण्याचे स्वातंत्र्य असते. नफ्याचा हेतूने उत्पादन केले जाते. किंमत यंत्रणेमार्फत अर्थव्यवस्था चालते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

### १. खाजगी मालमत्तेचा हक्क :–

खाजगी मालमत्ता बाळगण्याचा हक्क हे भांडवलशाहीचे ठळक वैशिष्ट्ये आहे. जमीन, कारखाने, यंत्रसामग्री, खाणी यासारख्या उत्पादन साधनसंपत्तीवर खाजगी मालकी असते. खाजगी मालमत्ता बाळगण्याचे स्वातंत्र्य असते.

### २. महत्तम नफ्याचा हेतू :–

महत्तम नफा मिळविणे हे एक वैशिष्ट्ये आहे. ज्या वस्तूत जास्त नफा मिळतो त्या वस्तूचे उत्पादन केले जाते. समाजहितापेक्षा व्यक्तीगत हिताला प्राधान्य दिले जाते.

### ३. व्यवसाय स्वातंत्र्य :–

व्यवसाय स्वातंत्र्य हे भांडवलशाहीचे वैशिष्ट्ये आहे. कोणत्याही व्यक्तीला तिच्या आवडीनुसार कोणताही व्यवसाय करण्यास स्वातंत्र्य असते. कोणतीही व्यक्ती कोणताही व्यवसाय करू शकते. कोणीही कोठेही व्यवसाय करू शकते.

### ४. उपभोक्त्यांचे सार्वभौमत्व :–

भांडवलशाही व्यवस्थेत उपभोक्त्यांना आपल्या आवडीनुसार वस्तू खरेदी करण्याचे स्वातंत्र्य असते. उपभोक्त्यांना हव्या असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन केले जाते, उपभोक्ता बाजारपेठेचा राजा असतो. त्याच्या मागणीनुसार उत्पादन केले जाते.

### ५. किंमत यंत्रणा :–

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत किंमत यंत्रणा हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. मागणीनुसार पुरवठा केला जातो. अर्थव्यवस्था किंमत यंत्रणेमार्फत चालते.

६. **बाजारासाठी उत्पादन :-**

भांडवलशाहीत बाजारपेठ व विक्री करण्याचा उद्देशाने उत्पादन घेतले जाते. बाजारात उत्पादनाची विक्री करून नफा मिळविला जातो. उपभोक्त्याच्या आवडीनुसार उत्पादन केले जाते.

७. **वर्गसंघर्ष :-**

भांडवलशाहीत वर्गसंघर्ष निर्माण होतो. भांडवलदारांचा वर्ग एका बाजूला असतो तर दुसऱ्या बाजूला कामगार वर्ग असतो. भांडवलदार श्रीमंत असतात, तर श्रमिक गरीब असतात. भांडवलदार व श्रमिक यांच्यात संघर्ष निर्माण होतो.

८. **अनियोजित अर्थव्यवस्था :-**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत नियोजनाचा अभाव असतो. नफा महत्तम देणाऱ्या वस्तूचे उत्पादन केले जाते. उत्पादकांना कोणत्याही वस्तूंचे उत्पादन करण्याचे स्वातंत्र्य असते. भांडवलशाही अर्थव्यवस्था अनियोजित स्वरूपाची असते.

९. **स्पर्धा :-**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादन संस्थेत स्पर्धा असते. उत्पादक जाहिरातींद्वारे वस्तूंची विक्री वाढवण्याचा प्रयत्न करतात. उत्पादक वस्तूंची किंमती कमी करून ग्राहकांना आकर्षित करतात.

१०. **आर्थिक विषमता :-**

भांडवलशाहीत आर्थिक विषमता आढळते. महत्तम नफा मिळविला जातो. भांडवलदार श्रीमंत असतात तर श्रमिक गरीब असतात.

## ❑ भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे गुण/फायदे (Merits of Capitalism ) :-

१. **औद्योगिक विकास :-**

भांडवलशाहीत उद्योगांना स्वातंत्र्य दिले जाते. त्यामुळे देशात विविध उद्योग व व्यवसायाची भरभराट होते. देशाचा औद्योगिक विकास जलद होतो. औद्योगिक विकासासाठी पोषक वातावरण असते.

२. **आर्थिक विकास :-**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत आर्थिक विकास वेगाने होतो. भांडवलशाही देश प्रगत आहेत.

विविध उद्योग सुरू होऊन विविध वस्तू व सेवांचे उत्पादन केले जाते. रोजगार वाढून लोकांचे उत्पन्न वाढते. लोकांचा राहणीमानाचा दर्जा सुधारतो. आर्थिक विकास घडून येतो.

**३. रोजगारात वाढ :–**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत रोजगारात वाढ होण्यास मदत होते. उद्योग व्यवसायांना पूर्ण स्वातंत्र्य असते. नियंत्रण नसते. मोठ्या प्रमाणात उत्पादन केले जाते. विविध व्यवसायात, उद्योगात लोकांना रोजगार उपलब्ध होतो.

**४. कार्यक्षमतेत वाढ :–**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत श्रमिक व संयोजकांची कार्यक्षमता वाढते. श्रमिक अधिक वेतन मिळविण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी आपली कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न करतात. आधुनिक उत्पादन तंत्राचा व यंत्राचा वापर करून कार्यक्षमता वाढविली जाते.

**५. भांडवलनिर्मितीचा उच्च दर :–**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनावर खाजगी मालकी असते. लोकांना रोजगार प्राप्त होऊन त्यांचे उत्पन्न वाढते. लोक आपल्या उत्पन्नाचा बराच भाग बचत करतात. भांडवलदार भांडवल गुंतवणूक करतात. भांडवलदारांना नफा अधिक मिळतो. त्यामुळे भांडवलात वाढ होते.

**६. स्वयंचलित कार्य :–**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग म्हणजे अर्थव्यवस्थेचे कार्य स्वयंचलित चालते. अर्थव्यवस्था किंमत यंत्रणेद्वारे आपोआप चालते. त्यामुळे सरकारी हस्तक्षेपाचे व नियंत्रणाची गरज नसते.

**७. लोकशाही व्यवस्था :–**

भांडवलशाही अर्थव्यवस्था लोकशाही स्वरूपाची व्यवस्था असते. उपभोक्त्यांना कोणत्याही वस्तू व सेवांची खरेदी करण्याचे स्वातंत्र्य असते. उद्योजकांकडून त्यांच्या आवडी-निवडीनुसार वस्तू व सेवांचे उत्पादन करता येते. उत्पादकांना कोणत्याही वस्तू व सेवांचे उत्पादन करण्याचे स्वातंत्र्य असते.

**८. लवचिकता :–**

भांडवलशाही अर्थव्यवस्था लवचिक असते. उत्पादक बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक त्या वस्तूचे उत्पादन करतात. तेजी, मंदी, युध्द यासारख्या बदलत्या परिस्थितीनुसार उत्पादन केले जाते. उत्पादन मोठ्या प्रमाणात केले जाते.

## ९. तांत्रिक प्रगती :–

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत तांत्रिक प्रगती होते. संयोजकामध्ये तीव्र स्पर्धा असते. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी प्रगत तंत्राचा व यंत्राचा वापर केला जातो. नवीन शोध लावले जातात. त्यामुळे तांत्रिक प्रगती होते.

## १०. धोके पत्करण्यास उत्तेजन :–

संयोजकांना उद्योग व्यवसायात धोका पत्कारावा लागतो.भांडवलशाही अर्थव्यवस्थेत संयोजक धोका पत्करतात. संयोजक महत्तम नफा मिळविण्यासाठी धोका स्विकारतात.

## ११. नवप्रवर्तन :–

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादन नवीन नवीन यंत्रसामग्री, उच्चतंत्र, स्वस्त व नवीन विक्रीची पद्धत, नवीन वस्तू तयार करणे, उपभोक्त्याच्या आवडी-निवडीनुसार उत्पादन करणे यासारखे बदल संयोजक करतात. त्याला नवप्रवर्तन म्हणतात.

## १२. उत्पादन साधनांचा पर्याप्त वापर :–

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत दुर्मिळ उतपादन साधनांचा पर्याप्त वापर केला जातो. उत्पादक साधनांचा अपव्यय टाळला जातो. प्रत्येक संयोजक महत्तम नफा मिळवण्याचा प्रयत्न करतो. त्यासाठी उत्पादन साधनांचा पर्याप्त वापर केला जातो. संयोजकांमध्ये स्पर्धा असते. त्यामुळे नैसर्गिक साधन संपत्तीचा व भांडवलाचा पर्याप्त वापर केला जातो.

## १३. संयोजन कौशल्याचा विकास :–

भांडवलशाहीत संयोजन कौशल्य विकासास पूर्ण वाव असतो. संयोजकामध्ये चैतन्य असते. आधुनिक तंत्राचा व यंत्राचा उत्पादन कार्यात वापर करतात. संयोजकांना सहकार्य व मदत केली जाते.

## १४. ग्राहक सार्वभौम :–

उपभोक्ते (ग्राहक) हे 'सार्वभौम' असतात. कारण ग्राहकांच्या आवडी-निवडी, सवयीनुसार, उत्पादन केले जाते. ग्राहक राजा असतो. मागणीनुसार पुरवठा केला जातो. उपभोक्त्याच्या पसंतीनुसार उत्पादन केले जाते.

## १५. शासनाचा हस्तक्षेप मर्यादित :–

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत शासनाचा हस्तक्षेप मर्यादित असतो. सरकार शांतता, सुव्यवस्था, संरक्षण आणि मर्यादित मूलभूत कार्ये करते. भांडवलदारांना पूर्ण स्वातंत्र्य असते.

## ❑ भांडवलशाहीचे दोष व तोटे (Demerits of Capitalism ) :-

भांडवलशाहीचे समाजात सर्वत्र स्वागत झाले. कारण जादा उत्पादन, संपत्ती, वैभव, चैनीच्या वस्तू यात वाढ झाली. भांडवलशाहीचे दोष/तोटे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १. अनियोजित उत्पादन व्यवस्था :-

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादन व्यवस्था अनियोजित स्वरूपाची असते. प्रत्येक उत्पादक आपल्या इच्छेनुसार उत्पादन करतो. त्यामुळे हव्या त्या वस्तूची दुर्मिळता निर्माण होते. अनावश्यक वस्तू मुबलक प्रमाणात निर्माण होतात. जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण होते, त्यामुळे त्यांची आयात करावी लागते.

### २. मानवी कल्याणाकडे दुर्लक्ष :-

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत मानवी कल्याणाकडे दुर्लक्ष होते. महत्तम नफा मिळविण्यासाठी भांडवली वस्तूंचे उत्पादन केले जाते. उत्पादक हितांचे निर्णय घेतात. त्यांचा समाज हितांचा उद्देश नसतो. परिणामी समाजाचे कल्याण दुर्लक्षित राहते.

### ३. आर्थिक अस्थिरता :-

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत आर्थिक अस्थिरता निर्माण होते. उत्पादन अमर्यादित केले जाते. उत्पादनात सतत वाढ केली जाते. अतिरिक्त उत्पादन होते, मंदी येते. व्यापारचक्रे वारंवार उद्भवतात.

### ४. बेकारीची समस्या :-

भांडवलशाहीत बेकारीची समस्या गंभीर बनते. तेजीच्या काळात रोजगार वाढत असला तरी मंदीच्या काळात प्रचंड बेकारी वाढते. आर्थिक अस्थैर्यामुळे बेकारी वाढते. अनियोजित उत्पादन व्यवस्थेमुळे अतिरिक्त उत्पादन होऊन मंदी येते. त्यामुळे बेकारी वाढते.

### ५. उधळपट्टी :-

उधळपट्टी हा भांडवलशाही अर्थव्यवस्थेतील महत्त्वाचा दोष आहे. उत्पादक एकमेकांशी तीव्र स्पर्धा करतात. उत्पादक विक्री वाढविण्यासाठी जाहिरातीवर प्रचंड खर्च करतात. तो खर्च ग्राहकांकडून वसूल करतात. त्यामुळे ग्राहकांचे नुकसान होते. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत अनावश्यक खर्च वाढतो.

### ६. साधनसंपत्तीचे गैरवाटप :-

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत साधनसंपत्तीचे गैरवाटप होते. भांडवली वस्तूंच्या उत्पादनासाठी

साधनसंपत्ती कमी पडते. साधनसंपत्तीचा वापर चैनीच्या व सुखसोयीच्या वस्तूंच्या उत्पादनासाठी केला जातो.

### ७. गैरव्यवहारात वाढ :–

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत गैरव्यवहार वाढतात. नफा म्हणजे कोणाचेतरी शोषण झालेले असते. महत्तम नफा मिळविण्यासाठी नैतिक मूल्ये पाळली जात नाहीत. अर्थव्यवस्था पैशावर/ चलनावर आधारित असते. काळा पैसा वाढतो. त्यामुळे समाजाचे नुकसान होते.

### ८. साम्राज्यवादाचा विस्तार :–

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादकांना जास्त नफा मिळतो. उत्पादक नफा मिळविण्यासाठी सतत भांडवल गुंतवणूक करतात. प्रचंड प्रमाणात उत्पादन केले जाते. उद्योजकांचे साम्राज्य निर्माण होते.

### ९. आर्थिक विषमता वाढते :–

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पन्नातील विषमता वाढत जाते. भांडवलदार व कामगार असे दोन वर्ग निर्माण होतात. भांडवलदार वर्गाकडे मोठ्या प्रमाणात उत्पन्न व संपत्ती असते. कामगारांना अल्प वेतन मिळते. त्यांना सोयीसुविधा देण्याकडे दुर्लक्ष केले जाते. गरीब व श्रीमंत भेद निर्माण होतो. भांडवलदारांकडून कामगारांचे आर्थिक शोषण केले जाते.

### १०. मक्तेदारी प्रवृत्ती :–

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादकांची मक्तेदारी वाढते. उत्पादक संगनमताने वस्तूची किंमत निश्चित करतात. श्रीमंताकडे प्रचंड संपत्ती असते. उत्पादकांचे बाजारपेठेवर वर्चस्व असते. मक्तेदारीमुळे समाजाचे आर्थिक शोषण होते.

### ११. आर्थिक संपत्तीचे केंद्रीकरण :–

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलदारांच्या हाती आर्थिक संपत्तीचे केंद्रीकरण होते. भांडवलदार जास्त नफा मिळणिव्यासाठी अधिक गुंतवणूक करतात. सरकारचे नियंत्रण मर्यादित असते. शासनाचे धोरण अलिप्ततावादाचे असते.

### १२. कामगारांचे शोषण :–

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत कामगारांचे आर्थिक व शारिरीक शोषण केले जाते. कामगारांना अल्प वेतन व विविध सोयीसुविधा दिल्या जात नाहीत. अल्पवेतन, कामाच्या ठिकाणची प्रतिकूल

परिस्थिती, सोयीसुविधांचा अभाव, कामाचे जादा तास, लहान मुलांना कामावर घेणे, स्त्रीयांना अल्प मजूरी आदी मार्गाने कामगारांचे शोषण केले जाते.

**१३. भाववाढ :-**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भाववाढ होते. पैशाचे मूल्य कमी होते. वस्तू व सेवांच्या किंमती भरमसाठ वाढतात. बहुसंख्य लोकांना दैनंदिन गरजेच्या वस्तू रास्त किंमतीत मिळणे कठीण होते.

**१४. शासनाचा हस्तक्षेप मर्यादित :-**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत शासनाचा हस्तक्षेप मर्यादित असतो. सरकार शांतता, सुव्यवस्था, संरक्षण आणि मर्यादित मूलभूत कार्ये करते. भांडवलदारांना पूर्ण स्वातंत्र्य असते.

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-१**

✡ **खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. भारताने ............. अर्थव्यवस्थेचा स्विकार केला.

*अ) समाजवादी* *ब) मिश्र* *क) भांडवलशाही* *ड) यापैकी नाही.*

२. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत ............. हे सार्वभौम असतात.

*अ) ग्राहक* *ब) व्यावसायिक* *क) उत्पादक* *ड) व्यापारी.*

३. ............. मध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्था आहे.

*अ) भारत* *ब) चीन* *क) अमेरिका* *ड) रशिया.*

## २.२.२ समाजवादाची वैशिष्ट्ये, गुण आणि दोष (Socialism - Features, Merits and Demerits)

❑ **प्रस्तावना (Introduction) :-**

समाजवादी अर्थव्यवस्था आदर्श अर्थव्यवस्था समजली जाते. समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांवर संपूर्ण समाजाची मालकी असते. समाजवादी व्यवस्थेत खाजगी व्यवस्था नसते. सर्वांना समान संधी मिळते. गरीब व श्रीमंत भेद केला जात नाही. समाजवादी अर्थव्यवस्थेत साधनसामग्रीचा पर्याप्त वापर केला जातो. पूर्ण रोजगार निर्माण होतो.

भांडवलशाही अर्थव्यवस्थेला पर्यायी म्हणून समाजवादी अर्थव्यवस्था निर्माण झाली. समाजवादात भांडवलशाहीतील दोष दूर केले जातात. देशात आर्थिक समता व समान संधी दिली जाते.

## ❑ समाजवादाची व्याख्या :–

''ज्या अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनावर समाजाची मालकी असते. त्या अर्थव्यवस्थेला समाजवादी अर्थव्यवस्था म्हणतात.''

## ❑ समाजवादाची वैशिष्ट्ये (Features of Socialism ) :-

समाजवादी अर्थव्यवस्था सार्वजनिक अर्थव्यवस्था असते. उत्पादन साधनांवर सरकारची मालकी असते. सार्वजनिक हितासाठी उत्पादन केले जाते. समाजवादाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १. उत्पादन साधनांवर समाजाची मालकी :–

समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांवर सरकारची मालकी असते. उत्पादन साधनांवर समाजाची मालकी असते. सार्वजनिक हितासाठी उत्पादन केले जाते.

### २. व्यक्तिस्वातंत्र्यावर निर्बंध :–

समाजवादी अर्थव्यवस्थेत समाजहितासाठी व्यक्तिस्वातंत्र्यावर अनेक निर्बंध असतात. व्यक्ती हितापेक्षा समाजहिताला प्राधान्य दिले जाते. व्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध असतात.

### ३. समान संधी :–

प्रत्येकाला समान संधी उपलब्ध करून देणे हे समाजवादाचे मूलभूत उद्दिष्ट असते. प्रत्येकाला शिक्षण व प्रशिक्षणाची समान संधी दिली जाते. समाजवादात समान संधी उपलब्ध करण्यावर अधिक भर दिला जातो.

### ४. आर्थिक समता :–

आर्थिक समता हे समाजवादी व्यवस्थेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. गरीब व श्रीमंत भेद नसतो. नफा सरकारकडे जमा होतो. समाजहितासाठी उत्पादन केले जाते.

### ५. खाजगी उद्योगांचा अभाव :–

समाजवादी अर्थव्यवस्थेत खाजगी उद्योगांचा अभाव आहे. उद्योग व्यवसाय सरकारच्या मालकीचे असतात, खाजगी क्षेत्राला स्थान नसते.

### ६. सामाजिक कल्याण :–

समाजवादी व्यवस्थेत सामाजिक कल्याणाला महत्त्व दिले जाते. समाजवादी अर्थव्यवस्थेत समाजहितासाठी वस्तूंचे उत्पादन केले जाते.

## ७. सामाजिक सुरक्षितता :-

पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, क्रिडा व करमणूक इत्यादी सुविधा सरकारकडून उपलब्ध करून दिल्या जातात. जनतेला लागणाऱ्या वस्तू व सेवांचे उत्पादन घेतले जाते.

## ८. वर्गहिन समाज :-

गरीब व श्रीमंत भेदभाव नसतो. सर्वजण समान असतात. प्रत्येक व्यक्तीला समान संधी दिली जाते. वर्गविहीन समाजाची निर्मिती होण्यास मदत होते.

## ९. सेवेला प्राधान्य :-

समाजवादी अर्थव्यवस्थेत नफ्यापेक्षा समाजसेवेला महत्त्व दिले जाते. वस्तूंचे उत्पादन नफ्यापेक्षा समाजाच्या सेवेसाठी केले जाते. लोकांना उपयुक्त वस्तूंचे उत्पादन केले जाते.

## १०. आर्थिक नियोजन :-

समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनावर सरकारची मालकी असते. नियोजनपूर्वक जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन केले जाते. उत्पादन साधनसामग्रीचा पर्याप्त वापर केला जातो.

## ❑ समाजवादी अर्थव्यवस्थेचे गुण/फायदे (Merits of Socialism ) :-

## १. आर्थिक समता :-

समाजवादी अर्थव्यवस्थेत सर्वांना समान संधी दिली जाते. उत्पादन साधनांवर संपूर्ण समाजाची मालकी असते. व्यक्तीगत, खाजगी मालमत्तेवर निर्बंध असतात. समाजवादी अर्थव्यवस्थेमुळे आर्थिक समता निर्माण होते.

## २. समाजाचे शोषण होत नाही :-

समाजवादी अर्थव्यवस्थेत उद्योग व साधनसंपत्तीवर समाजाची मालकी असते. सरकारी उद्योगात श्रमिकांचे आर्थिक शोषण होत नाही. श्रमिकांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला दिला जातो.

## ३. साधनसामग्रीचा पर्याप्त वापर :-

समाजवादी अर्थव्यवस्थेत उद्योग व साधनसंपत्तीवर समाजाची मालकी असते. सरकारी उद्योगात श्रमिकांचे आर्थिक शोषण होत नाही. श्रमिकांना त्यांच्या कामाचा योग्य मोबदला दिला जातो.

### ४. संपूर्ण समाजाचा विकास :–

समाजवादी अर्थव्यवस्थेत सामाजिक हिताला प्राधान्य दिले जाते. सरकारकडून समाजहितासाठी विविध बाबींवर पैसे खर्च केले जातात. सरकार कल्याणकारी योजनांवर पैसे खर्च करते. समाजवादी अर्थव्यवस्थेत संपूर्ण समाजाचा विकास होतो.

### ५. सामाजिक न्याय :–

समाजवादात सर्वांना समान संधी दिली जाते. गरीब व श्रीमंत भेद राहत नाही. आर्थिक विषमता नसते. कोणत्याही व्यक्तीचे आर्थिक शोषण होत नाही.

### ६. पूर्ण रोजगार :–

समाजवादात मागेल त्याला काम व कुवतीनुसार दाम दिले जाते. तसेच उत्पादन साधनांची मालकी सरकारकडे असते. त्यामुळे सरकारला पूर्ण रोजगाराची स्थिती राखणे शक्य होते. अर्थव्यवस्थेत बेकारी आढळत नाही.

### ७. सामाजिक सुरक्षितता :–

समाजवादी अर्थव्यवस्थेत देशातील सर्व नागरिकांना सामाजिक सुरक्षितता प्राप्त होते. सरकार.मुलांना दूध, पोषण, आरोग्यसेवा, शिक्षण इ. सेवा उपलब्ध करून देते. त्यामुळे संपूर्ण समाजाचे कल्याण होते.

### ८. कार्यक्षमतेत वाढ :–

समाजवादी अर्थव्यवस्थेत राष्ट्रीय उत्पन्नात मोठी वाढ होते. आधुनिक तंत्राने व यंत्राने उत्पादन केले जाते. स्पर्धा नसते. जाहिरातीवर खर्च करण्याची गरज नसते. उत्पादन साधनांचा पर्याप्त वापर केला जातो.

### ९. आर्थिक वृध्दी :–

समाजवादात आर्थिक वृध्दीला चालना मिळते. नियोजनाद्वारे आर्थिक वृध्दी घडवून आणली जाते. सरकारच्या आर्थिक नियोजनाने बचत व गुंतवणूक वाढते. परिणामी राष्ट्रीय उत्पन्न वाढते. आर्थिक वृध्दीला गती मिळते.

### १०. आर्थिक स्थैर्य :–

समाजवादी अर्थव्यवस्थेत आर्थिक स्थैर्य असते. उत्पादन साधनावर सरकारची मालकी व नियंत्रण असते. मागणीप्रमाणे गुंतवणूक केली जाते. त्यामुळे मागणी व पुरवठ्यात समतोल साधला

जातो. अतिरिक्त उत्पादन केले जात नाही. तेजी, मंदी, व्यापार चक्रे निर्माण होत नाहीत. देशात आर्थिक स्थैर्य राहते.

## ❑ समाजवादी अर्थव्यवस्थेचे दोष/त्रुटी (Demerits of Socialism ) :-

### १. नोकरशाहीचा प्रभाव :–

समाजवादी अर्थव्यवस्थेत/अर्थव्यवस्थेवर सरकारचे नियंत्रण असते. आर्थिक यंत्रणेतील नोकरशाहीचा प्रभाव हा या व्यवस्थेचा प्रमुख दोष आहे. नोकरशाही उद्योग, व्यवसाय चालवण्यात अकार्यक्षम राहते. नोकरशाही खाजगी व्यावसायिकांप्रमाणे उद्योग व्यवसाय चालवू शकत नाही.

### २. दप्तर दिरंगाई :–

समाजवादी अर्थव्यवस्थेत अर्थव्यवस्थेवर नोकरशाहीचा प्रभाव असतो. नोकरशाहीकडून विविध कामे तत्पर व जलद होत नाहीत. उद्योगाचा कारभार चालवताना नियमावर बोट ठेवून चालवला जातो. सरकारी यंत्रणेत दिरंगाई दिसून येते.

### ३. अपुरी साधने :–

समाजवादी अर्थव्यवस्थेत सरकार पुरेसे भांडवल उभे करू शकत नाही. भांडवलाची, साधनांची कमतरता निर्माण होते. त्याचा परिणाम उद्योग व व्यापाराच्या विस्तारावर होतो.

### ४. साधनांचा अयोग्य वापर :–

समाजवादी अर्थव्यवस्थेत भांडवली साधनांचा कार्यक्षमपणे वापर केला जात नाही. काही वस्तूंचे उत्पादन अतिरिक्त होते. तर कही वस्तूंचे उत्पादन कमी होते. वस्तूच्या मागणी–पुरवठ्यात असमतोल निर्माण होतो.

### ५. उपभोक्त्यांच्या स्वातंत्र्याची हानी :–

भांडवलशाहीत उपभोक्ता सार्वभौम असतो. उपभोक्त्यांना आवडीनुसार वस्तूची खरेदी करण्याचे स्वातंत्र्य असते. परंतु समाजवादात उपभोक्त्यांचे स्वातंत्र्य नाहीसे होते. उपभोक्त्यांना मिळेल त्या वस्तूवर समाधान मानावे लागते.

### ६. प्रोत्साहनाचा अभाव :–

समाजवादात व्यक्तीगत हिताला/लाभाला प्राधान्य दिले जात नाही. पुढे जाण्याची प्रवृत्ती नष्ट होते. विशिष्ट वेतन मिळत असल्याने अधिक नफा मिळवण्याची इच्छा होत नाही.

### ७. आर्थिक स्वातंत्र्याचे नुकसान :-

समाजवादी अर्थव्यवस्थेत आर्थिक स्वातंत्र्याचे नुकसान होते. उद्योजक व्यावसायिकांना उद्योग व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य नसते. श्रमिकांना ठराविक प्रकारची कामे दिली जातात.

### ८. सरकारकडे सत्तेचे केंद्रीकरण :-

समाजवादात आणखी एक दोष म्हणजे सरकारकडे सत्तेचे फार मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण होते. सरकारचा प्रभाव वाढतो, व्यक्तीला महत्त्व दिले जात नाही. सरकार म्हणजे सर्व काही असते. समाजवादी अर्थव्यवस्थेत सरकारचा प्रभाव असतो.

### ९. यशस्वी व्यवसायाचा अभाव :-

समाजवादात सरकार उद्योग व्यवसाय चालवते. सरकारी नोकर उद्योग-व्यवसाय चालवतात. सरकारी नोकर कार्यक्षमपणे काम करत नाहीत. त्यामुळे उद्योग व्यवसायांना तोटा होण्याची शक्यता असते.

### १०. आर्थिक समतेचा अभाव :-

समाजवादी अर्थव्यवस्थेत सरकारला आर्थिक समता प्रस्थापित करण्यात अपयश येते. गरीब, श्रीमंत यांच्यात फरक राहतो. समाजवादातही गरीब, श्रीमंती दिसून येते.

### ११. समाजवादी अर्थव्यवस्था शास्त्रीय नाही :-

समाजवादी अर्थव्यवस्थेची संकल्पना शास्त्रीय नाही. ही व्यवस्था ताठर स्वरूपाची असते. राजकीय व सरकारी यंत्रणेचा प्रभाव आढळतो.

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-२

**✡ खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. उत्पादन साधनावर समाजाची मालकी असते, त्या अर्थव्यवस्थेला ............ अर्थव्यवस्थेचा असे म्हणतात.

*अ) समाजवादी* *ब) भांडवलशाही* *क) मिश्र* *ड) यापैकी नाही.*

२. समाजवादी अर्थव्यवस्थेत आर्थिक विषमता .............. .

*अ) वाढते* *ब) स्थिर असते* *क) कमी होते* *ड) कमी होत नाही.*

३. समाजवादी अर्थव्यवस्थेत ............ प्रभाव असतो.

*अ) भांडवलदारांचा ब) सरकारचा क) व्यापाऱ्यांचा ड) यापैकी नाही.*

## २.२.३ भांडवलशाही आणि समाजवाद यामधील सहकार सुवर्णमध्य (Co-operation : A Golden mean between Capitalism and Socialism)

### ❑ सहकार : सुवर्णमध्य :–

सहकार म्हणजे भांडवलशाही व समाजवाद यांच्यातील सुवर्णमध्य आहे. कारण भांडवलशाहीत काही दोष आहेत. तसेच समाजवादातही काही दोष आहेत. त्यामुळे सहकारामुळे भांडवलशाही व समाजावादातील दोष दूर करण्याची शक्ती आहे. तसेच सहकारात भांडवलशाही व समाजवादाची वैशिष्ट्ये दिसून येतात. सहकारात भांडवलशाही व समाजवादाचे गुण आहेत. म्हणून सहकार व भांडवलशाही / सहकार व समाजवाद यामध्ये साम्य आहे. सहकार सुवर्णमध्य पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

### १. भांडवलशाही व सहकार यातील साम्य :–

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत आर्थिक स्वातंत्र्याला महत्त्व दिले जाते. तर सहकारातही आर्थिक स्वातंत्र्य असते. भांडवलशाही व सहकारात खाजगी मालमत्तेचा हक्क असतो. भांडवलशाही व सहकारात नफा प्राप्ती केली जाते. तसेच भांडवलाचा वापर केला जातो. भांडवलशाही व सहकारात व्यावसायिक कार्यक्षमतेला महत्त्व दिले जाते. सरकारी हस्तक्षेपास विरोध केला जातो. साधनांचा पर्याप्त वापर केला जातो.

### २. भांडवलशाही व सहकारातील फरक :–

भांडवलशाहीत व्यक्तीपेक्षा भांडवलाला महत्त्व दिले जाते. तर सहकारात व्यक्तीला महत्त्व दिले जाते.

भांडवलशाहीत नफ्याला तर सहकारात सेवेला महत्त्व दिले जाते. भांडवलशाहीत आर्थिक शोषण केले जाते. सहकारात आर्थिक शोषणाला प्रतिबंध केला जातो. भांडवलशाहीत संपत्तीचे विषम वाटप होते. सहकारात नफ्याचे वाटप व्यवहाराच्या प्रमाणात केले जाते.

भांडवलशाहीत आर्थिक अस्थैर्य, स्पर्धा व पैशाला महत्त्व दिले जाते. तर सहकारात आर्थिक स्थैर्य व शांतता आणि समाजहिताला महत्त्व दिले जाते. भांडवलशाहीत संपत्तीचे विषम वाटप होते. सहकारात वाढाव्याचे वाटप व्यवहाराच्या प्रमाणात केले जाते.

### ३. समाजवाद व सहकार :-

समाजवादात व सहकारात समाजहिताला महत्त्व दिले जाते. समाजवाद व सहकारात उत्पन्नाचे समान वाटप सेवा, सामुदायिक विकास, साधनांचा पर्याप्त वापर शोषणाला प्रतिबंध याला महत्त्व दिले जाते. समाजवाद व सहकार दोन्ही व्यवस्था एकमेकांशी पूरक आहेत. या दोन्हीही व्यवस्थांमध्ये समाजहितासाठी योग्य आवश्यक वस्तूंचे उत्पादन केले जाते. समाजवाद व सहकारी अर्थव्यवस्था यांच्यात बऱ्याच बाबतीत साम्य आढळते. समाजवाद आणि सहकार यांचा हातात हात असतो.

### ४. समाजवाद व सहकारातील साम्य :-

समाजवाद व सहकारात उत्पन्नाचे समान वाटप केले जाते.

समाजवाद व सहकारात व्यक्तीला व सेवेला महत्त्व दिले जाते. समाजवाद व सहकारात समाजहिताला महत्त्व दिले जाते. समाजवाद व सहकारात साधन संपत्तीचा कार्यक्षमपणे वापर व स्पर्धेचा अभाव दिसून येतो. समाजवाद व सहकारात शोषणाला प्रतिबंध केला जातो.

### ५. समाजवाद व सहकारातील फरक :-

समाजवादी अर्थव्यवस्थेत खाजगी मालमत्तेचा हक्क नसतो. तर सहकारात खाजगी मालमत्तेचा हक्क असतो. समाजवादी अर्थव्यवस्थेत निर्णय केंद्रीय नियोजन मंडळाकडून घेतले जातात. तर सहकारात संचालक मंडळामार्फत निर्णय घेतले जातात. समाजवादात नियोजनाचा अभाव आढळतो. सहकारात नियोजन केले जाते.

## ❑ भांडवलशाही आणि समाजवाद यामधील सहकार सुवर्णमध्य :-

सहकार म्हणजे भांडवलशाही व समाजवाद यामधील सुवर्णमध्य आहे. भांडवलशाहीत व सहकारात आर्थिक स्वातंत्र्य, खाजगी मालमत्तेचा, नफा प्राप्तीचा हक्क असतो. भांडवलाचा वापर केला जातो. भांडवलशाहीत भांडवलाला महत्त्व असते. सहकारात व्यक्तीला प्रथम स्थान व भांडवलाला दुय्यम स्थान दिले जाते. भांडवलशाहीत नफ्याला तर सहकारात सेवेला महत्त्व असते. भांडवलशाहीत संपत्तीचे विषम वाटप होते तर सहकारात व्यवहाराच्या प्रमाणात नफ्याचे वाटप केले जाते. शोषणाला प्रतिबंध केला जातो. भांडवलशाहीत सहकार सुवर्णमध्य आहे.

समाजवादी अर्थव्यवस्था व सहकार यामध्ये अधिक साम्य आहे. समाजवाद व सहकार अर्थव्यवस्था एकमेकांना पोषक व पूरक आहेत. दोन्ही अर्थव्यवस्थांमध्ये समाजहितासाठी योग्य, आवश्यक वस्तूंचे उत्पादन केले जाते. समाजवाद व सहकारात उत्पन्नाचे समान वाटप, समाजहित.

व्यक्तीविकास, साधनसंपत्तीचा कार्यक्षम वापर, स्पर्धेचा अभाव आढळतो. सहकारात खाजगी मालमत्तेचा हक्क असतो. लोकशाही पद्धतीने कारभार चालतो. समाजवाद व सहकारात सामुदायिक विकासाला प्राधान्य असते.

❑ **स्वयं-अध्ययन प्रश्न-३**

✡ **खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. भांडवलशाही आणि समाजवाद यामधील .............. सुवर्णमध्य आहे.

*अ) लोकशाही* *ब) सहकार*

*क) हुकूमशाही* *ड) यापैकी नाही.*

२. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत संपत्तीचे ................. वाटप होते.

*अ) विषम* *ब) सम*

*क) कमी* *ड) यापैकी नाही.*

## २.२.४ मिश्र अर्थव्यवस्थेतील सहकाराची भूमिका (Role of Co-operation in mixed Economy)

❑ **प्रस्तावना (Introduction) :-**

मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचे सह-अस्तित्व आढळते. सरकाराचे खाजगी क्षेत्रावर नियंत्रण असते. मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्र व सहकारी क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावते. भांडवलशाही व समाजवादाचे मिश्रण आढळते. मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात व्यवसाय असतात. उत्पादन साधने खाजगी मालकीची असली तरी सरकार वित्तीय व्यवहारांवर नियंत्रण ठेवते. मिश्र अर्थव्यवस्थेत सहकार क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावते.

❑ **व्याख्या (Definition) :-**

१. ''खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचे सहअस्तित्व असणारी अर्थव्यवस्था म्हणजे मिश्र अर्थव्यवस्था होय.''

२. ''मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक व खाजगी क्षेत्रे कार्य करतात. भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये ज्या आर्थिक पद्धतीत आढळतात, त्या पद्धतीला मिश्र अर्थव्यवस्था म्हणतात.''

## ❑ मिश्र अर्थव्यवस्थेतील सहकाराची भूमिका (Role of Co-operation in Mixed Economy) :–

### १. खाजगी क्षेत्रावर नियंत्रण :–

मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक व खाजगी क्षेत्र आढळते. खाजगी क्षेत्राचे व्यवस्थापन चांगले असते. मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्राचा अधिक प्रभाव निर्माण होतो. खाजगी क्षेत्राचा प्रभाव कमी करण्यासाठी सहकार क्षेत्र उपयुक्त ठरते. मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्रावर सरकारचे नियंत्रण असते.

### २. मानवी कल्याणावर भर :–

मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी उत्पादक ग्राहकांची फसवणूक करतात. उपभोक्त्यांचे शोषण करतात. खाजगी क्षेत्राचा अधिक प्रभाव निर्माण होतो. सहकारी संस्था किमान नफा मिळवून सभासदांच्या कल्याणाच्या दृष्टीने निर्णय घेतात. व्यक्तीला प्रथम स्थान दिले जाते. खाजगी क्षेत्राचा प्रभाव कमी करण्यासाठी सहकार क्षेत्र उपयुक्त ठरते.

### ३. आर्थिक विषमतेवर मात :–

मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्राच्या तुलनेत खाजगी क्षेत्राचा प्रभाव वाढल्यास आर्थिक विषमता निर्माण होते. खाजगी क्षेत्राकडे नफ्याचे अथवा उत्पन्नाचे केंद्रीकरण होते. सहकारात सर्व नफा सभासदांमध्ये वाटला जातो. वाढाव्याची वाटणी व्यवहाराच्या प्रमाणात केली जाते.

### ४. सार्वजनिक क्षेत्राच्या अवास्तव विस्तारावर मात :–

मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक व खाजगी क्षेत्र असले तरी कालांतराने सार्वजनिक क्षेत्राचा अवास्तव विस्तार होण्याची शक्यता असते. त्यामुळे अर्थव्यवस्था समाजवादी बनवण्याचा धोका निर्माण होतो. सहकारात उद्योग व व्यवसायावर सभासदांची मालकी असते.

### ५. कार्यक्षमतेत वाढ :–

आर्थिक कार्यक्षमता वाढविण्यासाठी सहकारी संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरते. मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्राला विकासासाठी मोठ्या प्रमाणात वाव मिळत नाही. खाजगी क्षेत्रावर अनेक निर्बंध असतात. सहकारी उद्योग व व्यवसायाने आर्थिक प्रगती करता येते.

### ६. खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात योग्य समन्वय :–

सहकार क्षेत्र खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात योग्य समन्वय साधतो. मिश्र अर्थव्यवस्थेत सरकार

खाजगी क्षेत्रावर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध नियम कायदे ठरवते. त्याला खाजगी क्षेत्राकडून योग्य प्रतिसाद मिळत नाही. सहकारी संस्था सरकारी नियमांचे पालन करतात. सहकारी तत्त्वानुसार लोकशाही पध्दतीने कारभार चालवला जातो.

### ७. रोजगार निर्मिती :–

सहकारी क्षेत्राला रोजगार निर्मितीच्या दृष्टीने महत्त्व आहे. मिश्र अर्थव्यवस्थेतील खाजगी क्षेत्र नफ्याचे प्रमाण उच्च राखण्यासाठी आधुनिक तंत्राचा व यंत्राचा वापर करते. त्यामुळे रोजगार घटतो. सार्वजनिक क्षेत्राची व्याप्ती मर्यादित आहे. सहकारात मोठ्या उद्योगांचा विकास होतो. सहकारी प्रक्रिया उद्योगात रोजगारात वाढ होत आहे.

### ८. लघु व कुटीर उद्योगांची प्रगती :–

सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात मोठे उद्योग सुरू आहेत. सहकार क्षेत्रात लघू व कुटीर उद्योग सुरू आहेत. छोट्या उद्योगांची प्रगती साधण्यासाठी सहकारी उद्योग क्षेत्रे महत्त्वाचे ठरते. यामुळे देशात छोट्या उद्योगांची वाढ होते. सहकारी दुग्ध व्यवसायाने प्रगती केली आहे.

### ९. प्रक्रिया उद्योगांचा विकास :–

सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात प्रक्रिया उद्योग मर्यादित आहेत. भारतात कृषी आधारित उद्योग आहेत. त्यासाठी जास्त भांडवल व अधिक जागा लागते. सहकारी साखर कारखाने, सहकारी सूतगिरण्या, दुग्धव्यवसाय, तेलगिरण्या इत्यादी प्रक्रिया उद्योग सहकार क्षेत्रात सुरू आहेत.

### १०. ग्रामीण विकास :–

मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्र ग्रामीण विकासाकडे पुरेसे लक्ष देत नाही. ग्रामीण भागात रस्ते, विजपुरवठा, पाणी पुरवठा, दळणवळण, पोस्ट इ. सोयी नसतात, त्यामुळे खाजगी क्षेत्र तेथे गुंतवणूक करत नाही. ग्रामीण विकास साधण्यासाठी सहकारी क्षेत्र महत्त्वाचे ठरते. आज सहकाराच्या विकासाने ग्रामीण भागात आमूलाग्र बदल झाला आहे.

### ११. मक्तेदारीला प्रतिबंध :–

सार्वजनिक क्षेत्रात सरकारची मक्तेदारी निर्माण होते. तर खाजगी क्षेत्रात खाजगी व्यक्तिची मक्तेदारी निर्माण होते. सहकार क्षेत्रातील उद्योग व्यवसायाची मालकी अनेक लोकांच्याकडे असते. सहकारातील उद्योग–व्यवसाय सभासदांच्या मालकीचा असतो.

### १२. ग्राहकांचे हितसंवर्धन :-

खाजगी क्षेत्रात नफ्याला प्रथम स्थान दिले जाते. भांडवलाला महत्त्व असते. सहकारात व्यक्तिला प्रथम स्थान व भांडवलाला दुय्यम स्थान दिले जाते. सर्वसाधारण नफा मिळवला जातो. ग्राहकांचे आर्थिक शोषण होत नाही. जीवनावश्यक वस्तूंची रास्त भावाने खरेदी-विक्री केली जाते.

### ❑ स्वयं-अध्ययन प्रश्न-४

**✡ खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. मिश्र अर्थव्यवस्थेत खाजगी क्षेत्रावर ............... नियंत्रण असते.

*अ) व्यक्तीचे* *ब) समाजाचे*

*क) सरकारचे* *ड) समूहाचे.*

२. मिश्र अर्थव्यवस्थेत ................ क्षेत्र महत्त्वाची भूमिका बजावते.

*अ) सहकार* *ब) सामाजिक*

*क) सार्वजनिक* *ड) यापैकी नाही.*

## ❖ सहकारी शिक्षण व प्रशिक्षण

**● उद्दिष्टे :**

१. सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाचे उद्देश समजावून घेणे.

२. सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाची गरज व महत्व समजावून घेणे.

३. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनांचे उद्देश माहित करून घेणे.

४. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनांची रचना व व्यवस्थापन समजावून घेणे.

५. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची कार्ये माहित करून घेणे.

**● प्रास्ताविक :**

सहकारी चळवळीच्या विकासासाठी सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. सहकारी संस्था आणि सहकारी चळवळ सभासद कर्मचारी पदाधिकारी आणि सहकाराशी संबंधित घटक यांना सहकार शिक्षण आणि प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे. सहकारी प्रणेत्यांनी सहकारी शिक्षणाचे महत्त्व ओळखून सहकारी शिक्षण या तत्त्वाचा अवलंब आपल्या कार्यप्रणालीमध्ये केला होता. या दृष्टीने भारतातील सहकारी शिक्षण व प्रशिक्षण यांना महत्त्व देण्यात आले.

भारतातील सहकारी चळवळ दुर्बलांच्या विकासातून व शिक्षणातून तयार झाली. सहकारी चळवळ सामान्य लोकांपर्यंत पोहोचवणे साठी मूलभूत उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून अनेक सहकार महर्षींनी सहकारी चळवळीचा पाया घातला. सहकारी चळवळ वाढवण्यासाठी सहकारी शिक्षणाची खूप मदत झाली आहे. अलीकडील अनेक बदलामुळे सहकारी चळवळीची गुणवत्ता कमी झाली आहे ती वाढवण्यासाठी सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाची गरज निर्माण झाली आहे.

**● अर्थ व व्याख्या :**

सहकारी संस्थांच्या विकासामध्ये सहकारी शिक्षण व प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाची भूमिका अदा करते. सहकारी शिक्षण व प्रशिक्षण म्हणजे संस्थेचे सभासद कर्मचारी पदाधिकारी आणि यासंबंधी चे घटक यांच्यासाठी कार्यक्रम आयोजित करणे. ज्यामुळे त्यांच्यात ज्ञान कौशल्य आणि जबाबदारीची जाणीव वाढते. सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाचे कार्यक्रम सहकारी चळवळीला मजबूत करतात. आणि संस्थांच्या प्रभावी कार्यासाठी आवश्यक असतात. यामध्ये सहकाराच्या विविध तत्वांची व्यवस्थापनाची आणि कायदेशीर बाबींची माहिती संबंधित घटकांना दिली जाते.

**● व्याख्या :**

सहकारी शिक्षण व प्रशिक्षण याचा नेमका अर्थ खालील व्याख्येवरून म्हणून समजणे सोपे जाईल.

**१) डॉ कृष्ण स्वामी :** सहकारी शिक्षण म्हणजे सहकाराशी संबंधित व्यक्तींना सहकाराची तत्वे पद्धती उद्दिष्टे आणि एकत्रितपणे कार्य करण्याची योजना किंवा कुवत या गुणांचा विकास करणे होय.

**● सहकारी प्रशिक्षण अर्थ :–**

एखादे कार्य करण्यासाठी आपली जबाबदारी लक्षात घेऊन ते कार्य पार पाडण्यासाठी लागणारे कौशल्य प्राप्त करणारी परिस्थिती किंवा शिक्षण प्रक्रिया ज्याद्वारे उपलब्ध करून दिली जाते त्याला प्रशिक्षण असे म्हणतात. सहकारी संस्थेच्या सेवकाला सहकारी धोरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्रशिक्षणाची आवश्यकता असते. कार्यालयीन कामे हिशेब लेखन व इतर प्रशासकीय कामे दर्जेदारपणे करण्यासाठी सहकारी प्रशिक्षण गरजेचे ठरते. सहकारी क्षेत्रातील कर्मचारी पदाधिकारी यांच्या कार्यक्षमतेत व गुणवत्तेत वाढ करण्यासाठी तसेच जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी जे शिक्षण दिले जाते त्याला सहकारी प्रशिक्षण असे म्हणतात.

**● सहकारी शिक्षण व प्रशिक्षण आवश्यकता व महत्त्व :**

सहकारी चळवळीची धुरा समाजातील शिक्षित आणि सुजाण लोकांच्या हाती असावी असे अनेक सहकार तज्ञांचे मत आहे. मेडिसिन यांच्यामध्ये सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षण न देता सहकारी संस्थेचा कारभार लोकांच्या हाती सोपवल्यास हे हास्यास्पद ठरेल. म्हणजेच सहकाराची तत्वे उद्दिष्टे त्यासंबंधी कायदे आणि पद्धती यांचे शिक्षण घेतलेल्या व्यक्तींच्या हाती सहकारी संस्थांचा कारभार असावा. १९१५ मध्ये नेमलेल्या मॅकलेगन

समितीने सहकारी संस्थेची संबंधित घटकांना शिक्षण व प्रशिक्षण देण्याबद्दलचे महत्त्व विशद केले आहे. भारतात नेमलेल्या डॉ. डी. डी. कर्वे आणि मिर्झा समितीनेही सहकारी शिक्षणाचे महत्त्व मान्य करून त्यासाठी आर्थिक तरतूद करण्याची ही शिफारस केली होती. एकंदरीत सहकारी संस्थांचा कारभार व्यवस्थित चालण्यासाठी सहकारी शिक्षण व प्रशिक्षण यांची गरज आहे हे पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येते.

**१) शिक्षित व सुजान सभासद वर्गाची निर्मिती :**

भारतातील सहकारी संस्थांचा विकास प्रामुख्याने ग्रामीण भागात झालेला दिसून येतो. ग्रामीण भागातील सभासदांमध्ये शिक्षणाचे प्रमाण खूप कमी आहे. त्यामुळे सहकाराची तत्वे कार्यपद्धती इत्यादींचे ज्ञान सभासदांना असेलच असे नाही. याशिवाय त्यांना सहकारापासून मिळणारे फायदे देखील माहित नसतात. सहकारी संस्थांचे सभासद शिक्षित व सुजाण असतील तरच सहकारी संस्थांनी ठरवलेली उद्दिष्टे गाठणे शक्य होईल. यासाठी सहकारी शिक्षण व प्रशिक्षण यांची गरज भासते.

**२) नेतृत्व :**

सहकारी चळवळीचे नेतृत्व किती सक्षम आहे यावर संस्थेचे भवितव्य अवलंबून असते. सहकारी चळवळीबद्दल निष्ठा किंवा आस्था असणारे सभासद सहकारी चळवळ यशस्वी करू शकतात. सहकारी संस्थेवर तत्वावर व मूल्यावर निष्ठा असणारे, कुशल संघटन असणारे, सभासदांचे व संस्थेच्या विकासाची तळमळ असणारे नेतृत्व सहकारी चळवळीला विकासाकडे नेऊ शकते. असे कार्यक्षम नेतृत्व निर्माण करण्यासाठी सभासदांना सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाची आवश्यकता भासते.

**३) सहकारी चळवळीच्या विकासासाठी :**

सहकारी चळवळीचा विकास कायमस्वरूपी घडवून आणण्यासाठी सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाची आवश्यकता भासते. सभासद सामान्य जनता कर्मचारी पदाधिकारी व इतर संबंधित घटक हे सुजाण आणि शिक्षित असतील तरच देशातील सहकारी चळवळ सुदृढ पायावर उभे राहून तिचा विकास होईल. त्यासाठी वरील घटकांना सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाची आवश्यकता आहे. एकंदरीत सहकारी क्षेत्राशी संबंधित घटकांना शिक्षण व प्रशिक्षण दिल्यामुळे सहकारी चळवळीचा विकास साधने शक्य होईल.

**४) पारदर्शकता :**

सहकारी संस्थांच्या विकासासाठी त्यांचे व्यवहार पारदर्शक असणे आवश्यक ठरते. सहकारी संस्थांच्या व्यवहारात पारदर्शकता निर्माण करण्यासाठी या क्षेत्रातील सर्व घटकांना शिक्षण व प्रशिक्षणाच्या माध्यमातून प्रशिक्षित किंवा अध्ययवत करणे महत्त्वाचे ठरते. सहकारी संस्थांच्या पारदर्शकतेमुळे संचालक मंडळ व कर्मचारी यांच्यावरील जबाबदाऱ्या निश्चित होऊ शकतात. सहकारी संस्थांच्या सभासदांना पारदर्शकतेमुळे व्यवहार पूर्णपणे कळले तर त्यांनी संस्थेची आर्थिक स्थिती समजून येईल त्यामुळे ते संस्थेच्या कारभारात क्रियाशील बनतील.

**५) कार्यक्षमतेत वाढ :**

सहकारी संस्थांची कार्यक्षमता ही संबंधित घटक किती जबाबदारीने वागतात यावर अवलंबून असते. सहकारी संस्थांची कार्यक्षमता त्यातील घटकांची पारदर्शक वृत्ती व जबाबदारीचे दायित्व यावर अवलंबून असते. यासाठी संबंधित घटकांना सहकारासंबंधी शिक्षण व प्रशिक्षण दिल्याने कार्यपद्धतीत सुधारणा होऊन संस्थेची कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल.

**६) कर्तव्यभिमुख व्यवस्थापन :**

सहकारी संस्थांच्या विकासामध्ये त्याचे व्यवस्थापन प्रभावी असणे आवश्यक असते. व्यवस्थापन हे सभासदांनी निवडून दिलेल्या संचालक मंडळाकडे असते. सहकारी तत्वे, कायदे, नियम व्यवहार, व्यवहार पद्धती, सभा घेणे इत्यादी बाबीवर विशेष लक्ष दिल्याने व्यवस्थापन कर्तव्यभिमुख बनू शकते. यासाठी संबंधित बाबींचे शिक्षण व प्रशिक्षण देऊन व्यवस्थापन कर्तव्यभिमुख बनवणे महत्त्वाचे ठरते.

**७) सभासदांमध्ये जबाबदारीची भावना वाढविणे :**

सहकारी संस्थांमध्ये सभासदांना खूपच महत्त्व असते. सहकारात सभासदांच्या वतीने संचालक मंडळ सहकारी संस्थेचा कारभार पाहते. मात्र अनेक सभासद हे आपले हक्क, कर्तव्य आणि जबाबदारी याबद्दल जागृत नसतात. त्यासाठी सभासदांना सहकारी संस्थेबद्दल जबाबदारीची भावना वाढवली आवश्यक आहे. त्यासाठी संस्थेचे कार्य, व्यवहार, वार्षिक सभा, संचालक मंडळाची कार्यपद्धती इत्यादीवर लक्ष देऊन आपली कर्तव्य व जबाबदारी पार पाडणारा सभासद वर्ग सहकारी संस्थांना आवश्यक आहे. सहकारी शिक्षण व प्रशिक्षणातून असा सभासद निर्माण करणे शक्य आहे.

**८) व्यवहारात विविधतां आणणे :**

अलीकडे सर्व क्षेत्रात नवीन बदल घडून येत आहेत. याला सहकार क्षेत्र सुद्धा अपवाद नाही. सहकारी संस्थांना आजच्या स्पर्धेचे युगात टिकून राहायचे असेल तर आपल्या कार्यात आणि व्यवहारात विविधता आणली पाहिजे. नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार आपल्या कार्यपद्धतीत करून व्यवहारात पारदर्शकता निर्माण केली पाहिजे. यासाठी संबंधित घटकांना शिक्षण व प्रशिक्षण देणे आवश्यक ठरते.

- **सहकारी शिक्षण व प्रशिक्षण उद्दिष्टे किंवा उद्देश :**

सरकारी शिक्षण व प्रशिक्षण याची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**१) सहकार संकल्पनेची जाणीव होण्यासाठी :**

सहकाराची संकल्पना उद्देश स्वरूप व्याप्ती तत्त्वे इत्यादी बाबत सामान्य जनतेने जाणीव निर्माण करणे हे सहकारी शिक्षणाचे उद्दिष्ट आहे.

**२) चांगल्या सभासद वर्गाची निर्मिती :–**

सहकारी शिक्षणाद्वारे जागरूक सुजाण व ज्ञानी सभासद सहकाराच्या विकासासाठी तयार करणे हे उद्दिष्ट असते.

**३) ज्ञान व कौशल्यात वाढ :–**

सभासद कर्मचारी पदाधिकारी व संबंधित घटक यांच्या सहकारासंबंधी ज्ञानात तसेच कौशल्यात वाढ करणे हे सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते.

**४) नेतृत्व विकास :–**

सहकारी चळवळीच्या विकासासाठी उत्तम नेतृत्वाची गरज असते. सहकारी प्रशिक्षणाद्वारे उत्तम व चांगले आणि जबाबदारीचे नेतृत्व तयार करणे हा उद्देश असतो.

**५) सहकारी चळवळीचा विकास साधणे :–**

सहकार हा आर्थिक विकासातील एक महत्त्वाचा घटक मानला जातो. अशा सहकारी चळवळीचा विकास साधण्यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षित मनुष्यबळ निर्माण करणे हा सहकारी शिक्षण आणि प्रशिक्षणाचा उद्देश असतो.

**६) संघटन दृष्टिकोण निर्माण करणे :–**

सहकारी शिक्षणाद्वारे सभासदात संघटन प्रवृत्ती निर्माण करणे हा महत्त्वाचा उद्देश असतो. यातून संस्थेच्या सभासदामध्ये संघटित होऊन सहकार्य आणि सहभागाची भावना वाढीस लागते.

**७) जबाबदारीची जाणीव :–**

सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाद्वार संस्थेच्या सभासदांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण करणे व त्यातून सहकारी संस्थेच्या विकासासाठी प्रयत्न करणे हा एक उद्देश असतो.

**८) गैरकारभार व भ्रष्टाचारी प्रवृत्तीस आळा घालणे:–**

सहकारी संस्थांमध्ये त्यांच्या विकासाबरोबर गैरकारभार व भ्रष्टाचार प्रवृत्ती जोपासली जाते. परंतु सहकारी शिक्षणामुळे संस्थेच्या व्यवहारात पारदर्शकता येऊन अशी प्रवृत्ती कमी करता येते.

**९) जनतेस माहिती देणे :–**

सहकारी शिक्षणाद्वारे सहकारी चळवळीचा प्रगतीची माहिती सामान्य जनतेस देऊन सहकारी क्षेत्राबद्दल सर्वसामान्य जनतेच्या मनात आकर्षण निर्माण करणे हा उद्देश असतो.

**१०) सहकारी व्यवस्थापन प्रभावी बनवणे:–**

सहकारी चळवळीच्या निकोप वाढीसाठी कार्यक्षम व्यवस्थापन खूप महत्त्वाचे मानले जाते. प्रभावी व्यवस्थापन निर्माण करणे हे सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाचे उद्दिष्ट असते.

- **सहकारी शिक्षण व प्रशिक्षणातील समस्या :**

सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाच्या प्रक्रियेत पुढील समस्या आढळून येतात.

**१) सभासदांचा अशिक्षितपणा :–**

भारतात सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाची प्रक्रिया राबवत असताना सभासदांचा अशिक्षित पणा ही एक मोठी समस्या आहे. भारत सरकारकडून ही प्रक्रिया राबवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले जात आहेत. परंतु भारतातील आंध्र प्रदेश, आसाम, गुजरात, मध्य प्रदेश, बिहार, ओरिसा या राज्यात अशिक्षित सभासदांची संख्या जास्त आहे. उदा. राजस्थानमध्ये ५०.३% वरिष्ठ अधिकारी व ८५.४% कनिष्ठ अधिकारी व अप्रशिक्षित आहेत.

**२) साधन सामग्रीची समस्या:–**

सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाची प्रक्रिया राबवण्यासाठी मोठ्या प्रमाणात साधनसामग्रीची व निधीची गरज भासते. लहान आकाराच्या सहकारी संस्थांची आर्थिक परिस्थिती अत्यंत नाजूक असल्याने आपल्या कर्मचाऱ्यांना त्या प्रशिक्षणासाठी पाठवू शकत नाहीत. सरकारने जरी सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाची मोहीम कार्यक्षमपणे राबवण्याचे ठरवले असले तरी त्याचा लाभ आणि सहकारी संस्था घेऊ शकत नाही त देशातील अनेक संस्था सातत्याने तोट्यात असल्याने त्यांना सहकारी शिक्षण व प्रशिक्षणासाठी आर्थिक तरतूद करता येत नाही.

**३) प्रशिक्षित सेवक वर्गाचा :–**

प्रशिक्षण देणारा सेवक वर्ग हा प्रशिक्षित व तत्पर दिसत नाही. त्याला दिले जाणारे अपुरे वेतन कामाचा ताण सततच्या बदल्या इत्यादी कारणामुळे हा वर्ग उत्साही राहत नाही. त्यामुळे ही प्रक्रिया राबवताना मर्यादा येतात.

**४) पुरेशा सोयींचा अभाव :–**

सहकारी प्रशिक्षण केंद्रात आवश्यक असणाऱ्या सोयींची कमतरता जाणवते. बऱ्याच वेळा प्रशिक्षण केंद्रात उपलब्ध असलेल्या सोयीचा वापर पुरेशा प्रमाणात होत नाही. अनेक सहकारी संस्था आपल्या कर्मचाऱ्यांना पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षणासाठी पाठवीत नाहीत. प्रशिक्षण केंद्रात ग्रंथालय, वस्तीगृह व इतर शैक्षणिक सोयी समाधानकारक नाहीत.

**५) प्रशिक्षण सोयीतील द्विरुक्ती :–**

सहकारी प्रशिक्षणाच्या सोयी ज्या शहरात उपलब्ध आहे तेथे प्रशिक्षण सोयीबाबत उदासीनता आढळते. काही शहरात एकाच वेळी दोन किंवा अधिक संस्थांमध्ये समांतर प्रशिक्षणाच्या सोयी उपलब्ध असल्याचे दिसते. यामुळे उपलब्ध प्रशिक्षण सोयींचा पर्याप्त वापर होत नाही.

**६) निधी कमतरता :–**

बदलत्या परिस्थितीनुसार सहकारी प्रशिक्षण संस्थातील प्रशिक्षण कार्यक्रमात अमुलाग्र स्वरूपाचे बदल करणे आवश्यक आहे. बदलते तंत्र व नवीन पद्धती यांचे शिक्षण देणे आवश्यक आहे. पण निधीच्या कमतरतेमुळे प्रशिक्षण संस्था आपल्या प्रशिक्षण कार्यक्रमात बदल करू शकत नाही.

**७) प्रशिक्षणाबाबत उदासीनता :-**

सहकारी संस्थांमध्ये बराच नोकरवर्ग प्रशिक्षण घेण्यास उदासीन असल्याचे दिसते. नोकर वर्गाला सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाबाबत पुरेशी आस्था नसते. कारण प्रशिक्षण घेतल्यानंतर लगेच वेतन वाढीचे किंवा ओळखीची शक्यता कमी असते. प्रशिक्षण केंद्राकडे सेवक आकर्षित होत नाही.

**८) प्रशिक्षण निरोपयोगी ठरण्याची शक्यता :-**

बऱ्याचवेळा सहकारी प्रशिक्षण संस्था आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केल्यानंतर त्याची नेमणूक संबंधित विभागाला न करता अन्य विभागाकडे किंवा कार्याकडे करतात. त्यामुळे संबंधित कर्मचाऱ्याने घेतलेले शिक्षण व प्रशिक्षण निरोपयोगी ठरण्याची शक्यता असते.

## ❖ आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना :

**● प्रस्तावना :**

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना ही जगभरातील सहकारी संस्थांचे प्रतिनिधित्व करणारी एक जागतिक संघटना आहे. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना ही मुख्यत्वे आंतरराष्ट्रीय पातळीवर, भांडवलशाही संघटना पासून समाजातील दुर्बल घटकांचे आर्थिक स्वातंत्र्य आबाधित ठेवणे आणि जीवनमान उंचावणे यासाठी कार्य करत असते. तसेच आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना या सहकारी चळवणींना ज्ञान, कौशल्य आणि समन्वयित कृतीसाठी एक व्यासपीठ उपलब्ध करून देते. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटन आहे जगभरातील सहकारी संस्थांना एकत्र करणारी, प्रतिनिधित्व करणारी आणि सेवा देणारी जागतिक संघटना आहे. त्याचबरोबर जगभरातील सुमारे ३० लाख सहकारी संस्थासह, सहकारी चळवळीसाठी सर्वोच्च संस्था म्हणून कार्य करते. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या १०५ देशांमध्ये ३०६ पेक्षा जास्त सदस्य संघटना आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने कृषी, बँकिंग, गृहपयोगी वस्तू, मत्स्य व्यवसाय, आरोग्य, विमा आणि उद्योग यासारख्या विस्तृत आर्थिक क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघटना आहेत.

**● स्थापना :**

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना ही सर्वात जुनी व  मोठी गैर-सरकारी संघटना आहे जी जागतिक स्तरावर सहकारी सदस्यांचे प्रतिनिधित्व करते. येडोर डी. बॉयव्हॅक यांनी ब्रिटन व फ्रान्समधील सहकारी संस्थामधील सहकाराबाबत निश्चित योजना मांडली होती. परंतु त्यावेळी ती योजना काही तांत्रिक अडचणीमुळे नाकारण्यात आली होती. असे असले तरी, आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकारी संघटना निर्माण करण्याच्या दृष्टीने विचार विनिमयाला तेव्हापासून सुरुवात झालेली दिसून येते. याचाच परिपाक म्हणून १९ ऑगस्ट १८९५ मध्ये लंडन येथे आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची स्थापना झाली. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचा मुख्य उद्देश हा जगभरातील सहकारी संस्थांच्या विकासाला प्रोत्साहन देणे हा आहे. तसेच

१९५४ मध्ये पॅरिस मध्ये झालेल्या सभेमध्ये एक ठराव मंजूर केला ज्यामध्ये स्थापित सहकारी चळवळींना विशेषत विकसित देशांमध्ये अविकसित देशांमधील सहकारी प्रवर्तकांना पाठिंबा देण्याची जबाबदारी अधोरेखित

करण्यात आली. त्याचप्रमाणे १९६० मध्ये आग्नेय आशियासाठी प्रादेशिक कार्यालय आणि शिक्षण केंद्राची स्थापना करून आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडी प्रथम आशिया –पॅसिफिक प्रदेशात विस्तारली.

● **उद्देश :**

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना हि जागतिक पातळीवर कार्य करणारी संघटना असून तिचा उद्देश पुढीलप्रमाणे अधोरेखित केलेला आहे.

१. सहकारी संस्थांचे महत्त्व आणि त्यांच्या योगदानाबाबत जागरूकता वाढवणे.

२. सहकारी तत्त्वांचे पालन आणि कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांचे जागतिक पातळीवर प्रतिनिधित्व करणे.

३. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील विविध प्रकारच्या सहकारी संघटनातून मित्रत्वाचे आणि आर्थिक संबंध वाढावेत म्हणून प्रयत्न करणे.

४. आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकारी संघटनांच्या चळवळीचे हितसंवर्धन करणे.

५. सहकारी चळवळ मार्फत एक प्रगतिशील अर्थव्यवस्था निर्माण करणे त्यासाठी देशादेशात सुसंवाद निर्माण करणे.

६. आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्व सहकारी संस्थांना उच्च दर्जा प्राप्त करून देणे.

७. शाश्वत विकासासाठी सहकारी मॉडेलला एक प्रमुख उपाय म्हणून प्रोत्साहन देणे.

८. २०३० पर्यंत शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सहकारी संस्थांची भूमिका अधोरेखित करणे.

● **सभासदत्व :**

सहकारी संघटनेच्या नियमातील कलम ८ प्रमाणे व्यक्तीसमूह किंवा सहकारी संघटना ज्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची तत्त्वे व धोरणे राबविण्यासाठी प्रस्थापित झालेल्या आहेत त्यांना सभासद होता येते. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या कायद्यामधील १९०२ मध्ये केलेल्या दुरुस्तीनुसार कोणत्याही व्यक्तीला सभासद करून घेता येत नाही तर फक्त सहकारी संस्थांनाच सभासद होता येते.

● **आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची रचना व व्यवस्थापन :**

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या कायद्यातील कलमानुसार व नियमावलीनुसार रचना व व्यवस्थापन पुढीलप्रमाणे.

**१. कॉंग्रेस :**

कॉंग्रेस ही सर्वोच्च अधिकारी संस्था म्हणून कार्य करते. कॉंग्रेसमध्ये संलग्न असलेल्या सहकारी संस्थेचे सभासद असतात. कॉंग्रेसची सभा व बैठक ही तीन वर्षातून एकदा होते. या सभेमध्ये कॉंग्रेस आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या कार्याचा आढावा घेते.

### २. मध्यवर्ती समिती :

मध्यवर्ती सहकारी समितीची सभा साधारणपणे वर्षातून एकदा घेतली जाते. या सभेमध्ये अध्यक्ष व दोन उपाध्यक्षांची निवड केली जाते या निवडलेल्या पदाधिकाऱ्यांची निवड व मुदत ही ३ वर्षासाठी असते. काँग्रेसने घेतलेल्या निर्णयाला व्यवहारिक स्वरूप देण्याचा व काही महत्त्वाचे निर्णय स्वतःच्या जबाबदारीवर घेण्याचा अधिकार मध्यवर्ती समितीला आहे. तसेच कार्यकारी समितीच्या निर्णयाविरुद्ध करण्यात येणाऱ्या तक्रारी ऐकणे, आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या नियमाविरुद्ध कार्य करणाऱ्या सहकारी संस्थेचे सभासदत्व रद्द करणे हे कार्य मध्यवर्ती समिती करते. राष्ट्रीय पातळीवर सहकारी संघांचे सभासद हे मध्यवर्ती समितीचे सभासद असतात.

### ३. कार्यकारी समिती :

कार्यकारी समिती काँग्रेसच्या सभेची तारीख व विषय ठरवीते आणि आपल्या कार्याचा अहवाल काँग्रेसला सादर करते. मध्यवर्ती समितीशी सतत संपर्क ठेवून कारभारावर नियंत्रण ठेवते त्याचप्रमाणे सचिवांशी संपर्क साधून सभासदत्व आणि आर्थिक बाजूचाही विचार करते. तसेच आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या कार्यावर नियंत्रण ठेवने व मध्यवर्ती समितीचे अधिवेशन नसताना काही प्रश्नांवर निर्णय घेण्याचे कार्य कार्यकारी समिती करते.

### ४. संचालक :

आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेचे दैनंदिन कामकाज सचिवालयामार्फत चालते. दक्षिण पूर्व आशियासाठी असणारे कार्यालय भारतात नवी दिल्ली येथे १९६० मध्ये तर १९६४ मध्ये पूर्व आणि मध्य आफ्रिकेसाठी टांझानियातील मोशी येथे सुरू केले आणि पश्चिम आफ्रिकेसाठी अबिदीजन येथे १९८६ मध्ये सुरू केले. संबंधीत कार्यालयामार्फत पूर्व आशिया व पुर्व, मध्य आणि पश्चिम आफ्रिका या भागाचे व्यवस्थापन केले जाते.

### ५. सचिव :

सचिव हा आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचा प्रशासकीय प्रमुख असतो. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचे सचिवालय लंडन येथे असून त्यामार्फत दैनंदिन कारभार चालविला जातो. सचिवालयाद्वारे शिक्षण, लोकसंपर्क, सभासद, शेती, मासेमारी, महिला आणि युवक सहकारी कार्यकर्ते इत्यादी विभागांसाठी कार्य केले जाते. प्रत्येक विभागासाठी एका सचिवाची निवड केली जाते.

त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना- एशिया-पॅसिफिक च्या जागतिक संरचनेच्या चौकटीत काम करते, ज्यामध्ये प्रदेशातील सदस्य संघटनामध्ये प्रभावी सहकार्य आणि निर्णय घेण्याची खात्री करण्यासाठी तयार केलेल्या विविध संस्थांचा समावेश आहे.

### १. प्रादेशिक सभा :

प्रादेशिक सभा हि सर्वोच्च संस्था आहे जिथे सर्व आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या सदस्य संघटना सहभागी होतात. प्रादेशिक कार्यालयांना मार्गदर्शन करणे आणि प्रादेशिक व जागतिक मुद्द्यावर चर्चा करणे तसेच आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या महासभेला शिफारशी करणे हे महत्त्वाचे कार्य केले जाते.

**२. प्रादेशिक मंडळ :**

प्रादेशिक मंडळ प्रादेशिक सभेने घेतलेल्या धोरणांच्या आणि निर्णयांच्या अंमलबजावणीला समर्थन देणे. तसेच आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची उद्दिष्टे प्रभावीपणे पूर्ण केले जातात की नाही याची खात्री करणे इत्यादी कार्य केले जातात.

**३. क्षेत्रीय आणि विषयगत समित्या :**

या समित्या शेती, वित्त, गृहनिर्माण आणि शाश्वत विकास यासारख्या विशिष्ट क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करतात.

● **आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची कार्य :**

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना ही जागतिक पातळीवर कार्य करणारी संघटना आहे त्या अनुषंगाने आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची विविध कार्य पुढीलप्रमाणे.

**१. आंतरराष्ट्रीय सल्लागार मंडळ :**

आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना सहकार क्षेत्रातील आपला अनुभव, ज्ञान व तज्ञ व्यक्ती विकसित देशातून विकसनशील देशांना उपलब्ध करून देते व त्याप्रमाणे आपला कारभार चालविते. युनिसेफ, युनेस्को, आंतरराष्ट्रीय कामगार संघ, अन्नधान्य व कृषी संघटना, यासारख्या आंतरराष्ट्रीय संस्था व संघटनेच्याबरोबरीने आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेला सल्लागाराचे स्थान लाभलेले आहे. अन्नधान्य व कृषी संघटना, युनो, यूनोच्या इक्रॅफे, युनेस्कोसारख्या विशेष संघटनांच्या तांत्रिक सभा, चर्चासत्रे व अभ्यासगटाच्या कार्यात आंतरराष्ट्रीय सरकार संघटना भाग घेते. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय सहकार संघटना, अन्नधान्य संघटना, आंतरराष्ट्रीय शेती उत्पादक संघटना आंतरराष्ट्रीय कामगार संघ, यांनी शेती सहकार विकास समिती स्थापना केली आहे. त्यात आंतरराष्ट्रीय सहकार संघटना सहकार्य करीत आहे. ही समिती सहकारी संस्थांच्या व्यवसायिक योजनांचा सर्व बाजूने अभ्यास करून त्यांना आंतरराष्ट्रीय आर्थिक मदत मिळवून देण्याच्या प्रयत्न करतात.

**२. विकास व तांत्रिक मदत :**

सहकारी संस्थांमध्ये संबंध प्रस्थापित करण्याच्या हेतूने आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना व तिच्या शाखा प्रगत देशांकडून आर्थिक व तांत्रिक मदत स्वीकारते. ज्या देशातून सहकारी संस्थांचा विकास झालेला आहे त्यांच्याकडून तांत्रिक मदत स्वीकारून सहकाराच्या विकासाला उत्तेजन देता यावे म्हणून आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या १९६० मध्ये कॉंग्रेसच्या सभेत दीर्घ मुदतीच्या तांत्रिक मदतीचा कार्यक्रम आखला होता. या कार्यक्रमाप्रमाणे लॅटिन अमेरिका आणि आफ्रिका या भागातील विकसित देशांच्या किंवा प्रदेशांच्या शोधांचे काम चालू ठेवून ते पूर्ण करणे, त्या प्रदेशातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांच्या प्रश्नांचे संशोधन करणे, शिक्षण प्रसार करणे, चर्चासत्र आयोजित करणे, पुस्तकांना अर्थपुरवठा करणे, शिक्षण साधने उपलब्ध करून देण्यासाठी अर्थ पुरवठा करणे, सहकारी शिक्षण प्रशिक्षण व इतर प्रकारचे संशोधन कार्य करणाऱ्या संस्थांशी संयोग करणे, विकसित देशातून सहकारी संस्थाचा विकास ज्या देशातुन मोठ्या प्रमाणावर झालेला आहे त्यांच्यात

आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापार घडून आणण्यास मदत करणे आणि बँका, विमा व वित्तपुरवठा कार्याकरिता सहकारी संस्थांचा विकास घडवून आणण्यास मदत करणे.

**३. आंतरराष्ट्रीय सहकार संघटना व सहकारी संस्थांतील संबंध :**

विविध देशातील सहकारी संस्थातून आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापारा वाढावा म्हणून १९२४ मध्ये सहकारी घाऊक संस्था पेन्ट येथे स्थापन केली आहे. सहकारी घाऊक संस्थेचा मुख्य उद्देश म्हणजे ज्या वस्तूचे उत्पादन सहकारी संस्था करीत आहेत त्यांना घाऊक व्यापार आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढविण्यास मदत करणे. १९५६ ते १९६६ या दरम्यान आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने आंतरराष्ट्रीय पातळीवर दक्षिण पूर्व आशिया देशातील सहकारी संस्थांतील व्यापारात वाढ व्हावी म्हणून त्या देशातील व्यापाराचा आढावा घेतला व सहकारी संस्थातील व्यापारात आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढ व्हावी म्हणून अनेक सूचना केल्या तसेच विविध चर्चासत्रांच्या अनेक सूचनांमधून पुढे १९६९ मध्ये तेहरान येथील आशिया आंतरराष्ट्रीय व्यापार प्रदर्शन आयोजित केले. त्यातून अनेक देशातील सहकारी संस्थेमार्फत जनावरांचे खाद्य, फळे, भाज्या यांच्या व्यापारात वाढ झाली. तसेच सहकारी संस्थांतील व्यापारात आंतरराष्ट्रीय पातळीवर वाढ होईल म्हणून आंतरराष्ट्रीय सहकारी संघटना सहकारी व्यापार मार्गदर्शिका प्रसिद्ध करते. त्यामध्ये विविध सहकारी संस्थांची नावे व्यापार केल्या जाणाऱ्या वस्तू इत्यादींची माहिती असते.

विविध पातळीवर विविध प्रकारच्या सहकारी संस्थातून सहकारांतर्गत सहकार किंवा सबंध वेगवेगळ्या पद्धतीने प्रस्थापित करता येतात त्यातील एक प्रकार म्हणजे सहभागीदारित्व. या प्रकारात एक सहकारी संस्था किंवा संघ दुसऱ्या सहकारी संस्थेच्या नफ्यात व व्यवस्थापनात भाग घेते व यामार्फत सहकारी संस्थेचा विकास व संबंध प्रस्थापित केले जातात. त्यानुषंगाने सहकारी संस्थांमधील प्रादेशिक, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवर वस्तूंची व सेवांची देवाणघेवाण करण्याकरता संबंध प्रस्थापित केले जातात त्याला सहकारी संस्थेतील संबंध असे म्हणतात. विविध सहकारी संस्थांतील संबंधामुळे उत्पादक, ग्राहक व समाज या सर्वांचा फायदा होतो. विविध सहकारी संस्थांतील संबंधामुळे माल वितरणाची प्रक्रिया सुलभतेने होते. उत्पादक व ग्राहक यांचा प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित होऊन त्यांच्यात असणाऱ्या मध्यस्थांचे उच्चाटन होते. मध्यस्थांचे कमिशन, नफा, जाहिरात यांच्यात बचत होते सहकारी संस्थेचा विकास साधला जातो.

**४. अलीकडच्या काळातील कार्य :**

१९७० मध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने काही घाऊक समित्या आणि किरकोळ विक्री समित्यांची विलीनीकरण करून आंतरराष्ट्रीय ग्राहक वाटप व्यापार संस्था स्थापन केली. ही संस्था आंतरराष्ट्रीय क्षेत्रात इंटरकॉप या छो नावाने ओळखली जाते. इंटरकॉप संस्थेतील सभासद संख्या घाऊक व्यापार, किरकोळ व्यापार आणि वितरण क्षेत्रात येणाऱ्या अनुभवांची देवाण-घेवाण करतात. अन्नधान्य आणि इतर प्रकारच्या मालाची संयुक्तपणे खरेदी आणि सभासदांच्या मालाची इतर सभासदांना विक्री केली जाते. १९७४ मध्ये युरोकोप या आर्थिक संघटनेचे इंटरकॉप मध्ये विलीनीकरण झाले. १९७२ मध्ये २५ व्या काँग्रेस अधिवेशनात असे ठरवीण्यात आले की, जगात सहकारी चळवळीची गरज भागविण्यासाठी क्रियाशील योजना आखली जावी. त्यानुसार मे १९७६

मध्ये मॉस्को येथे तरुण लोकांना सहकारी शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी एक परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी २१ देशातील ६३ प्रतिनिधी परिषदेला हजर होते. तसेच १९७२ मध्ये स्त्रियांसाठी महिला समितीची स्थापना करण्यात आली.

नॉर्वे, स्वीडन आणि डेन्मार्क या देशातील ग्राहक सहकारी संस्थांनी छअऋ या छीवळीज्ञ अपवशश्री ऋीेर्ल्पिव संस्थेची स्थापना १९१८ साली खरेदी प्रतिनिधी म्हणून केली. छअऋ मुख्य खाद्य वस्तूंच्या व्यवहारात खरेदी प्रतिनिधी म्हणून कार्य करत असून स्पेन, अर्जेंटिना, इटली, ब्राझील, डेन्मार्क, अमेरिका या देशांत तिचे डेपो आहेत. त्याचप्रमाणे युरोपमधील काही व्यापारी बँकांनी व सहकारी बँकांनी १९२२ साली आंतरराष्ट्रीय सहकारी बँकेची स्थापना केली. ती स्विसच्या कायद्याप्रमाणे १९६४ पासून व्यापारी बँक म्हणून नोंदवली आहे. सध्या विविध देशातील ५६ सहकारी संस्था या बँकेच्या सभासद आहेत. तसेच १९७३ मध्ये ग्राहक धोरण संघटना १९ देशातील सहकारी संघटनांनी स्थापन केली. ग्राहक धोरण संघटना, आंतरराष्ट्रीय जाहिरात वितरण या प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या समितीशी संपर्क साधून कार्य करीत आहे.

**५. विकसनशील देश व आंतरराष्ट्रीय सहकारी संबंध :**

आंतरराष्ट्रीय सहकार संघटना आपले विभागीय कार्यालयामार्फत सहकारी चळवळीच्या विकासासाठी प्रयत्न करीत आहे विविध देशातून सहकार, व्यवसाय, व्यवस्थापन, शेती यासारख्या प्रश्नावर नियमितपणे चर्चासत्र आयोजित करते. अविकसित देशातील सहकारी तत्वे व व्यवहार यात सुसंवाद निर्माण करून आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्माण करण्याचे कार्य करीत आहे. त्यानुषंगाने आर्थिक विकासाचा प्रयत्न करीत असणार्या देशांच्या बाबतीत आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेकडून केल्या जाणाऱ्या कार्याची रुपरेषा १९७६ मध्ये पॅरिस मध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेच्या काँग्रेसच्या सभेत मार्गदर्शक तत्वासह ठरविण्यात आली. आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेची दक्षिण पूर्व आशिया आणि पूर्व मध्य आफ्रिका येथील प्रादेशिक कार्यालयाकडून विकसनशील देशात आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेचे कार्य केले जाते. विकसनशील देशांमध्ये औद्योगिक सहकारी संस्थाकडून केल्या जाणाऱ्या देशाच्या औद्योगिक विकासात महत्त्वाचे स्थान आहे याची जाणीव ठेवून इंग्लिश सरकारने आशिया, आफ्रिका व दक्षिण अमेरिकेतील देशातील औद्योगिक संस्थांच्या यशापयशाची कारणे, घटक व त्यावर उपाय यांचा अभ्यास करणे याकरिता दोन वर्षाकरिता खास अर्थ पुरवठा केला व त्यामार्फत कार्य केले.

तसेच आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेची आशिया व आफ्रिका येथील प्रादेशिक कार्यालय आंतरराष्ट्रीय व्यापारवृद्धी व्हावी म्हणून सहकारी संस्थांना आवश्यक तो सल्ला देतात तसेच माहिती पुरवतात. स्वीडन मधील सहकारी संस्थांच्या मदतीने ग्रामीण पतपुरवठ्याबाबत सल्ला देणारी संस्था १९७३ मध्ये स्थापन करण्यात आली व त्यामार्फत कार्य करण्यात आले. तसेच १९७६ मध्ये विकसनशील देशातील औद्योगिक सहकाराच्या आर्थिक आणि सामाजिक क्षमता या प्रकारचा संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आला व पूर्व मध्यवर्ती आफ्रिकेसाठी असणारया विभागीय कार्यालयामार्फत शिक्षणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला.

## २.३ **सारांश** (Summary)

भांडवलशाहीत उत्पादन साधनांवर खाजगी मालकी असते. खाजगी मालमत्तेचा हक्क असतो.

महत्तम नफा मिळविण्यासाठी उत्पादन केले जाते. व्यवसाय स्वातंत्र्य असते. उपभोक्ता राजा असतो. उपभोक्ते सार्वभौम असतात. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत किंमत यंत्रणा महत्त्वाची असते. आर्थिक विषमता आढळते. भांडवलशाहीत नियोजनाचा अभाव असतो.

समाजवादी अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांवर संपूर्ण समाजाची मालकी असते. सर्वांना समान संधी मिळते. पूर्ण रोजगार निर्माण होतो. सरकारकडून समाजहितासाठी विविध बाबींवर खर्च केला जातो. देशातील सर्व नागरिकांना सुरक्षितता प्राप्त होते. अर्थव्यवस्थेवर सरकारचे नियंत्रण असते. नोकरशाहीचा प्रभाव असतो. उपभोक्त्याच्या स्वातंत्र्याची हानी होते. सरकारकडे सत्तेचे केंद्रीकरण होते.

भांडवलशाही व समाजवाद यामधील सहकार सुवर्णमध्य आहे. भांडवलशाहीत गुण व दोष दिसून येतात. समाजवादात गुण-दोष आहेत. सहकारामध्ये भांडवलशाही व समाजवादातील दोष दूर करण्याची शक्ती आहे. भांडवलशाहीत व्यक्तीपेक्षा भांडवलाला महत्त्व दिले जाते. सहकराात व्यक्तीला प्रथम स्थान व भांडवलाला दुय्यम स्थान दिले जाते. समाजवाद व सहकारात समाजहिताला महत्त्व दिले जाते. समाजहितासाठी प्रयत्न केला जातो.

भारताने मिश्र अर्थव्यवस्थेचा स्विकार केला. मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक व खाजगी क्षेत्र आढळते. खाजगी क्षेत्राचा प्रभाव कमी करण्यासाठी सरकार क्षेत्र उपयुक्त ठरते. सार्वजनिक क्षेत्राच्या अवास्तव विस्तारावर मात करता येते. आर्थिक कार्यक्षमता वाढविण्यासाठी सहकारी संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरते. खाजगी व सार्वजनिक क्षेत्रात योग्य समन्वय साधता येतो. सहकार क्षेत्रात मोठे प्रक्रिया उद्योग सुरू आहेत. त्यामुळे ग्रामीण विकास व रोजगारात वाढ झाली आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **सार्वभौमत्व :** स्वातंत्र्य असणे.

२. **नवे प्रवर्तन :** नवीन तंत्राचा व यंत्राचा उत्पादनात वापर करणे. नवीन शोधाचा अवलंब करणे.

३. **सुवर्ण मध्य :** भांडवलशाही व समाजवाद यामध्ये सहकार क्षेत्र सुवर्णमध्य साधते, समन्वय साधणे.

४. **मिश्र अर्थव्यवस्था :** ज्या अर्थव्यवस्थेत सार्वजनिक व खाजगी क्षेत्राचे सहअस्तित्व आढळते. त्या अर्थव्यवस्थेला मिश्र अर्थव्यवस्था असे म्हणतात. विविध अर्थव्यवस्थांचे एकत्रीकरण.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

✡ **स्वयं-अध्ययन प्रश्न-१ ची उत्तरे**

१. *(ब) मिश्र* २. *(अ) ग्राहक* ३. *(क) अमेरिका.*

✡ **स्वयं-अध्ययन प्रश्न-२ ची उत्तरे**

१. *(अ) समाजवादी* २. *(क) कमी होते* ३. *(ब) सरकारचा.*

✡ **स्वयं-अध्ययन प्रश्न-३ ची उत्तरे**

१. *(ब) सहकार.* २. *(अ) विषम.*

✠ **स्वयं-अध्ययन प्रश्न-४ ची उत्तरे**

१. *(क) सरकारच* २. *(अ) सहकार.*

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

१. सहकारी उपक्रमांना बळकटी देण्यासाठी राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC) ची स्थापना ........... मध्ये करण्यात आली.

२. १९१५ मध्ये नेमलेल्या ............. समितीने सहकारी संस्थेची संबंधित घटकांना शिक्षण व प्रशिक्षण देण्याबद्दलचे महत्त्व विशद केले आहे.

३. ..........हा सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाचा उद्देश नाही .

४. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने ............. मध्ये झालेल्या त्यांच्या मँचेस्टर कॉंग्रेसमध्ये तिसऱ्यांदा सहकारी तत्त्वांमध्ये सुधारणा केली.

५. १९३७ मध्ये आय.सी.ए. ने परिभाषित केलेल्या रोचडेलच्या तत्त्वांचे आज किती पालन केले जाते आणि किती नाही याची कारणे काय आहेत हे तपासण्यासाठी आय.सी.ए. ने ............. मध्ये एक आयोग नियुक्त केला.

६. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची स्थापना लंडनमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय सहकारी कॉंग्रेसने ............. साली केली.

७. आय.सी.ए. च्या आशिया आणि पॅसिफिक क्षेत्रीय कार्यालयाचे मुख्य कार्यालय ........... येथे आहे.

**उत्तरे :** १-१९६३, २- मॅकलेगन, ३- वयक्तिक हित,

४-१९९५,     ५- आक्टोंबर -१९६४,   ६- १८९५,      ७- नवी दिल्ली.

✡ **अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. भांडवलशाहीची वैशिष्ट्ये सांगा.

२. भांडवलशाही म्हणजे काय? भांडवलशाहीचे गुण व दोष सांगा.

३. समाजवादाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

४. समाजवादाचे गुण व दोष स्पष्ट करा.

५. मिश्र अर्थव्यवस्थेतील सहकाराची भूमिका विशद करा.

१. सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाचे महत्त्व स्पष्ट करा.

२. सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाच्या समस्या स्पष्ट करा.

३. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची कार्य सविस्तरपणे स्पष्ट करा.

✡ **ब) टिपा लिहा.**

१. सहकार सुवर्णमध्य.

२. भांडवलशाहीची वैशिष्ट्ये.

३. समाजवादाची वैशिष्ट्ये.

१. सहकारी शिक्षण व प्रशिक्षण

२. सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाचा उद्देश.

३. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेचा उद्देश.

४. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेची रचना व व्यवस्थापन.

## २.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


1. **Dr. B. S. Mathur :** *"Co-operation in India"*, Sahitya Bhawan Publishers and Distributors (P) Ltd., Agra, 1999.

२. **प्रा. भोसले, प्रा. काटे :** *''सहकार''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, दुसरी आवृत्ती, सप्टेंबर १९९९.

३. **प्रा. डॉ. रूपा शहा, डॉ. बी. एच. दामजी :** *''सहकार''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, ऑगस्ट २०१९.

४. **प्रा. डॉ. सी. जे. जोशी, प्रा. के. सी. जोशी :** *''सहकाराचा विकास''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर. जून, २०१५.

५. Kamat G.G., New Dimensions of Co-operative Management.

६. Hajela T. N., Principles, Problems and Practice of Co-operation.

७. Bedi R. D., Theory, History and Practice of Co-operation.

८. Shriniwas (1990). Organisation and Management of Co-operative Banks in India. Printwell, Jaipur.

९. Lyanger-A Study in the Co-operation in India.

१०. Chinchankar and Namjoshi, Co-operation and Dynamics of Change.

११. सहकार तत्वे आणि व्यवहार – रायखेलकर व डांगे.

१२. सहकार – डॉ. शहा आणि दामजी.

✡✡✡

सत्र-३ : घटक-३

# सहकारातील राज्याची भूमिका

## ( Role of State in Co-operation )

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ सहकारी चळवळीच्या विकासातील राज्य सरकारची भूमिका

३.२.२ सहकारी न्यायव्यवस्था

३.२.३ सहकारी निबंधकाची भूमिका

३.२.४ जागतिकीकरणाचे सहकारी चळवळीवरील परिणाम

३.३ सारांश

३.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ सूची


## ३.० उद्दिष्ट्ये

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासातून आपणांस पुढील बाबींचे आकलन होईल.

१. सहकारी चळवळीच्या विकासातील सरकारच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

२. राज्यांनी सहकाराला सहकारी कायद्यानुसार कोणती मदत केली याचा अभ्यास करणे.

३. सहकारविषयक कायद्यांची गरज आहे काय ते समजून घेता येईल.

४. सहकाराच्या वृध्दीसाठी प्रत्यक्षात कोणते कायदे केले आहेत ते जाणून घेणे.

५. सहकारी चळवळीमध्ये निबंधकांची भूमिका कशी ठरते याचा अभ्यास करणे.

६. सहकारी क्षेत्राची न्यायव्यवस्था कशी असते याची माहिती करून घेता येईल.

७. सहकारातील जागतिकीकरणाची भूमिका समजावून घेणे.

८. सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण, देखरेख या बाबींचा अभ्यास करणे.

## ३.१ प्रास्ताविक

मागील प्रकरणात आपण भांडवलशाही व समाजवादी संघटना यातील गुणदोष स्पष्ट केले आहेत. भांडवलशाही व समाजवाद या दोघांमधील सुवर्णमध्य म्हणून सहकाराचे महत्त्व विचारात घेतले आहे. त्यातूनच मिश्र अर्थव्यवस्थेमध्ये सहकाराची भूमिका किती महत्त्वाची ठरते याची कल्पना आली.

या प्रकरणामध्ये सहकाराच्या वाढीसाठी सहकार चळवळ लोकांच्या मनात, समाजात वृध्दी व्हावी म्हणून कोणकोणते प्रयत्न केले जातात. सहकारी चळवळीच्या विकासासाठी केंद्र सरकारची काय भूमिका आहे. राज्य सरकारांची काय भूमिका आहे, सहकाराची न्यायव्यवस्था, सहकारी निबंधकांची भूमिका. ते कोणत्या प्रकारे व कोणकोणत्या स्वरूपात सहकाराला मदत करतात, सहकारावर कशाप्रकारे लक्ष ठेवून असतात, त्याचा सहकारावर कोणता परिणाम होतात. या सर्व बाबींचा अभ्यास यामध्ये करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ सहकारी चळवळीच्या विकासातील राज्य सरकारची भूमिका (Role of State in the Development Co-operative Movement)

भारतातील सहकारी चळवळीची सुरूवात शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्याच्या समस्येतून निर्माण झाली. १९व्या शतकाच्या अखेरीस न्या. म. गो. रानडे यांनी सहकारी पध्दतीचा पुरस्कार आपल्या लिखाणातून केला. बडोद्याला तशी एक 'परस्पर सहयोगी मंडळ' स्थापन झालेले होते; परंतु त्यातून फारसे काही निष्पन्न झाले नाही. सन १८७५ व १८९८ या दोन मोठ्या दुष्काळांनी भारतातील शेतकऱ्यांची स्थिती भयंकर खालावली होती. कर्जबाजारीपणामुळे शेतकरी मोठ्या प्रमाणावर भूमिहीन बनू लागले. या समस्येवर काहीतरी उपाय शोधला पाहिजे, हे लक्षात घेऊन तत्कालीन ब्रिटिश सरकारने १८८४ मध्ये शेतकऱ्यांना कर्जे देण्याचा कायदा मंजूर केला. पण सरकारी प्रयत्न अपुरे पडणार याची जाणीव झाल्याने, या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी नियुक्त केलेल्या फ्रेडरिक निकोल्सन अधिकाऱ्याचा अहवाल १८९५-९७ यादरम्यान प्रसिध्द करण्यात आला. त्यानी जर्मनीतील शेतकरी

सहकारी पतपुरवठा करणाऱ्या संस्थांच्या धर्तीवर सोसायट्या स्थापन करण्याची शिफारस केली. १९०१ च्या दुष्काळ आयोगाने (फॅमिन कमिशन) सहकारी सोसायट्या स्थापन करण्याची शिफारस केली. त्यानुसार १९०४ मध्ये सहकारी सोसायट्यांसंबंधीचा पहिला कायदा करण्यात आला. हा कायदा देशव्यापी होता व त्यानुसार काही ठिकाणी सोसायट्या स्थापन झाल्या; पुढे १९१९ मध्ये जबाबदार राज्यपध्दतीच्या दिशेने कायद्यात सुधारणा ब्रिटिश सरकारने जाहीर केल्या आणि सदर कायदे सहकारी चळवळ हा विषय त्यावेळच्या प्रांतिक सरकारकडे सोपविण्यात आला. प्रांतिक सरकारनी १९१२ च्या सहकारी कायद्यात दुरुस्त्या केल्या, तर मुंबई, मद्रास व बंगालमध्ये नवे कायदे करण्यात आले. या कायद्यात सहकारी सोसायट्यांची नोंदणी करण्यासाठी निबंधकाची नेमणूक प्रांतिक सरकारने करण्याची तरतूद केली. किमान दहा व्यक्तींनी एकत्र येऊन सहकारी सोसायटी स्थापन करता येईल, सोसायटीच्या व्यवहाराबद्दल त्याची जबाबदारी अमर्यादित राहील, सोसायटीचे पोटनियम निबंधकाच्या संमतीशिवाय बदलता येणार नाहीत. एका सभासदाला एकच मत राहील. कोणालाही एकूण भांडवलाला एक पंचमांशपेक्षा अधिक भाग घेता येणार नाहीत, अशा तरतूदी होत्या.

१९०४ ते १९४० पर्यंतच्या काळात सहकारी चळवळीला कायदेशीर दर्जा व सवलती देण्याचा बराच प्रयत्न झाला; पण चळवळीने विशेष बाळसे धरले नाही. पहिल्या महायुद्धाच्या काळात थोडी फार प्रगती झाली; परंतु १९२९-३० च्या मंदीच्या लाटेने जबर धक्का बसला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर (१९४७) काही प्रांतात व विलीन झालेल्या संस्थानात सहकारी कायदे झाले व सोसायट्यांची स्थापनाही मोठ्या प्रमाणावर झाली. या चळवळीचा तपशीलवार अभ्यास करण्यासाठी नेमलेली 'सरल क्रेडिट सर्व्हे' कमिटीने केलेल्या शिफारशी सर्व राज्य सरकार केंद्र सरकार व रिझर्व्ह बँक यांनी स्वीकारून अंमलबजावणीला सुरुवात केली. १९५४ मध्ये कमिटीचा अहवाल आल्यानंतर १९५५-५६ पासून भारतीय सहकारी चळवळीच्या नव्या कालखंडास सुरुवात झाली. सहकारी चळवळीला गतिशील बनविण्यासाठी केंद्र सरकारने १९५६ मध्ये सहकारी कायदेविषयक समिती नेमली. या समितीने नव्या कायद्याचा व नियमांचा एक आदर्श नमुना तयार केला. त्या आधारावर बहुतेक सर्व राज्य सरकारांनी नवे कायदे बनविले आहेत. त्यात दुरुस्त्याही मोठ्या प्रमाणावर केल्या जात आहेत. महाराष्ट्रात १९६० मध्ये नवा सहकारी सोसायट्यांचा कायदा करण्यात आला.

**१. भागभांडवलातील मदत :-**

सहकारी संस्थांना योग्य प्रमाणात भागभांडवल निर्माण करता येत नाही. यामुळे त्यांच्या आर्थिक व्यवहारावर मर्यादा पडतात. त्यामुळे सरकारच्या सहकारी संस्थांसाठी भागभांडवल उभारणीस मदत करते. राज्य सरकार सहकारी संस्थांच्या भागभांडवलाची खरेदी करतात. त्याचबरोबर सरकार सहकारी संस्थांना कर्ज देण्यासाठी मध्यस्थांची भूमिका बजावते. यामुळे या संस्थांना पुरेशा प्रमाणात भागभांडवल उभे करून आर्थिक व्यवहारात वाढ करता येते.

## २. विविध सवलती :–

सहकारी चळवळीला उत्तेजन देण्यासाठी विकसनशील देशांमध्ये विविध सवलती उपलब्ध करून देणे आवश्यक असते. यासाठी सरकारमार्फत विविध करांमध्ये सवलत व सूट, मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क तसेच भागभांडवलातील जप्तीला माफी इ. प्रकारच्या सवलती दिल्या जातात. सहकारी संस्थांच्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस अशा प्रकारच्या सवलत खूप उपयुक्त ठरतात.

## ३. कायदेशीर तरतूदी :–

सहकारी संस्थांच्या विकासाकरिता सरकार कायदेशीर तरतुदी करते. सहकारी संस्थेच्या विकासात कायद्याची दिशा मिळण्यास मदत होते. त्यासाठी सहकारी संस्थेची स्थापना, व्यवस्थापन, कामकाज पध्दती, भागभांडवल, भागरोखे, कर्जरोखे इत्यादीबाबत कायदेशीर तरतुदी निर्माण करते. यामुळे सहकारी संस्थांचा विकास होण्यास मदत होते.

## ४. आर्थिक साहाय्य :–

आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या सहकारी संस्थांत भागभांडवलाचा मोठ्या प्रमाणात तुटवटा निर्माण होतो. हे लक्षात घेऊन केंद्र सरकार कर्जे, अनुदान, पतपुरवठा, भागभांडवल इत्यादी मार्गानी आर्थिक साहाय्य करण्याचे प्रयत्न करते. त्यामुळे सहकारी संस्थांना कोट्यावधी रुपयांची आर्थिक मदत मिळते.

## ५. विविध धोरणाचा स्वीकार :–

भारत भांडवलशाही व समाजवाद व्यवस्था नाकारून मिश्र अर्थव्यवस्थेची भूमिका बजावत आहे. त्यामुळे खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचे सहअस्तित्व मान्य केल्याने सहकारी क्षेत्राच्या विकासाला प्रोत्साहन दिले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने सहकारी चळवळीच्या विकासासाठी विविध धोरणांचा स्वीकार केला आहे. ''लोकशाही नियोजनाचे प्रभावी साधन' म्हणून नियोजन काळात या चळवळीला उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारले आहे.

## ६. व्यवस्थापनात सुधारणा :–

सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनात सुधारणा करण्यासाठी सरकार नेहमी प्रयत्नशील असते. केंद्र व राज्य सरकार सहकारी खात्यामार्फत सहकारी संस्थांच्या व्यवस्थापकीय व इतर समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतात. सहकारी संस्थांचे व्यवस्थापन, स्थापना, दैनंदिन कामकाज, हिशेब तपासणी इत्यादीबाबत सहकारी संस्थांना मार्गदर्शन केले जाते. संस्था स्थापनेच्या सुरुवातीच्या काळात योग्य प्रमाणात निधी

मिळत नाही, त्यामुळे कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येत नाही. सरकारने व्यवस्थापनामध्ये सुधारणा करण्यासाठी अनुदान देणे किंवा कर्मचाऱ्यांना सेवा उपलब्ध करून देणे आवश्यक असते.

### ७. विविध समित्यांची नियुक्ती :–

सहकारी संस्थांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने वेळोवेळी तज्ज्ञांच्या समितीची नियुक्ती केली जाते. त्या समितीकडून शासन अहवाल मागते व त्यांनी केलेल्या सूचनांचा स्वीकार करून सहकारी चळवळ गतिमान करण्यासाठी प्रयत्न केला जातो. भारतात योजना काळामध्ये अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती, मेहता समिती, ग्राहक सहकारी समिती, सहकारी खरेदी-विक्री समिती, मिर्धा समिती यांसारख्या समित्यांची नियुक्त सरकारने केली आहे.

### ८. प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती :–

सहकारी संस्थांचे कामकाज चांगल्या प्रकारे करण्यासाठी सुशिक्षित व प्रशिक्षित कर्मचारी वर्गाची आवश्यकता असते. सरकारमार्फत सहकाराचे शिक्षण देण्यासाठी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्यासाठी प्रशिक्षण करणारे केंद्र सुरू करते. तसेच सहकारी संस्थेच्या संघटनेकडून चालविल्या जाणाऱ्या प्रशिक्षण केंद्रांना आर्थिक मदत देते. यामुळे प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची कार्यक्षमता वाढते. सहकारी संस्थेच्या कामकाजामध्ये व्यवस्थापनाचा दर्जा उंचावण्यास मदत होते.

### ९. शासनाची भागिदारी :–

गोखले समितीच्या सुचनेनुसार शासन सहकारी चळवळीचे भागभांडवल विकत घेऊन प्रत्यक्ष भागिदारीमध्ये सहभागी झाले आहे. त्यामुळे सहकारी संस्थांच्या चळवळीवर शासनाचे नियंत्रण राहते व सहकारी चळवळीला नैतिक अधिष्ठानही प्राप्त होते.

### १०. निधीची स्थापना :–

सहकारी संस्थांना पुरेशा प्रमाणात आर्थिक पुरवठा करता यावा म्हणून केंद्र सरकारकडून विविध निधींची स्थापना केली जाते. भारतामध्ये सरकारने राष्ट्रीय कृषी पतपुरवठा स्थिरीकरण निधी, राष्ट्रीय कृषी पतपुरवठा साहाय्य व हमी निधी, राष्ट्रीय गुदाम विकास निधी इत्यादी निधीची सुरुवात केली आहे. त्याचबरोबर राज्य सरकारमार्फत निरनिराळ्या निधीची स्थापना केली आहे. या निधींमुळे सहकारी संस्थांच्या वित्तीय गरजा भागविण्यास मदत झाली आहे.

### ११. इतर साहाय्य :–

सहकारी संस्था हे ग्रामीण विकासाचे केंद्र आहे. दुर्बल घटकांना मदत करणे, सामाजिक

परिवर्तन घडवून आणणे, सामाजिक व आर्थिक सुधारणा करणे, सहकारी संस्थेचा स्थापनेपासून देखरेख, हिशेब तपासणीचे अनुदान यासाठी मदत इत्यादी वेगवेगळ्या कारणासाठी सहकारी संस्था सरकार मदत करते. म्हणजे सहकारी संस्थांच्या विकासात सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

- **सहकारातील सरकारच्या सहभागाचे विपरीत परिणाम (Adverse effects of State involvement in Co-operation) :-**

सहकारी संस्थांच्या चळवळीला चालना देण्यासाठी कोणकोणत्या मार्गांनी मदत करता येईल याची चर्चा केली आहे. त्यावरून असे लक्षात येते की, सरकार आणि सहकारी चळवळ यांच्यात जवळचे नाते असते. सरकारमार्फत दिल्या जाणाऱ्या मदतीमुळे सहकारी चळवळीला उत्तेजन मिळते. भारतासारख्या विकसनशील देशात सहकारी संस्थांची स्थापना व त्यांचा विकास यामध्ये सरकारची भूमिका महत्त्वाची आहे. सरकारी मदतीमुळे सहकारी चळवळ सर्वत्र पसरली आहे. तथापि, सरकारी मदत विशिष्ट मर्यादेपर्यंत योग्य ठरते. सातत्याने सरकारी साहाय्य येत राहिल्यास अगर त्याचा अतिरेक झाल्यास सहकारी चळवळीवर त्याचे विपरित परिणाम होतात. सरकारी हस्तक्षेपामुळे किंवा सरकारच्या वाढत्या सहभागामुळे सहकारी चळवळीवर वाईट परिणाम घडून येतात ते खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१. सहकार्याची भावना नष्ट :–**

स्वसाहाय्यता व स्वावलंबन ही सहकारी चळवळीची मूलभूत तत्त्वे आहेत. सभासद हे स्वत:हून एकत्र येऊन सहकारी तक्त्यांच्या आधारे संस्थेची उभारणी करतात. एकमेकांना सहकार्य करून एकमेकांच्या साहाय्याने सर्वांचा विकास साधण्याचे तत्त्व त्यामध्ये असते. सहकारी संस्थांना सरकारी मदतीची गरज लागली तर त्यांच्यातील सहकार्याची भावना संपुष्टात येते. त्यामुळे स्वयंसेवा, स्वावलंबीपणा यासारखे वैशिष्ट्ये नष्ट होतील.

**२. प्रभावी नेतृत्वाचा अभाव :–**

सरकारी मदत सहकारी संस्थांमध्ये उपक्रमशीलता व नेतृत्व गुणांचा ऱ्हास घडवून आणते. सरकारी मदत मिळविणे व सभासदांमध्ये त्याचे वाटप करणे अशी मर्यादित जबाबदारी संस्थांवर असते. त्यामुळे सहकारी संस्थांचे संचालक व अधिकारी स्वबळावर निधी उभारण्यासाठी फारसे प्रयत्न करीत नाहीत. आपल्या समस्यांवेळी सरकारी मदत मिळणार आहे ही भावना निर्माण होते. त्यामुळे अधिक मेहनत घ्यायला तयार होत नाहीत. परिणामी सहकारी संस्थांमध्ये प्रभावी नेतृत्त्वाचा अभाव निर्माण होतो.

**३. उत्स्फूर्तपणाला विरोध :–**

सहकारी संस्थेमध्ये लोक स्वेच्छेने एकत्र येतात. त्यामध्ये कोणावरही सक्ती केली जात नाही.

तथापि, सरकारी मदतीमुळे स्वेच्छेऐवजी सक्तीचा अतिरेक होण्याची शक्यता असते. सरकार सहकारविषयक उद्दिष्ट्ये गाठण्यासाठी सहकारी संस्थांवर दबाव निर्माण करू शकते. यामुळे सहकारी चळवळीच्या वाढीसाठी आवश्यक असणाऱ्या स्वेच्छा, उत्स्फूर्तपणाला विरोध केला जातो.

### ४. राजकीय लोकांचा शिरकाव :-

सहकारच्या तत्वानुसार सहकारी चळवळ ही राजकारणापासून अलिप्त आहे. पण असे होत नाही. सरकारी मदतीच्या निमित्ताने सहकारी संस्थांचा राजकारणाशी संबंध प्रस्थापित होतो. राजकारणी व्यक्ती स्वत:च्या स्वार्थासाठी सहकारी चळवळीचा वापर करतात. राजकीय लाभ मिळविण्यासाठी सहकारी संस्थांचा वापर करतात. परिणामी, सहकारी संस्था राजकारणी लोकांच्या हातातील खेळणे बनतात. यामुळे सभासदांच्या आर्थिक व सामाजिक कल्याणाची हानी होते.

### ५. अकार्यक्षम व्यक्तींकडे नेतृत्व :-

सहकारी संस्था इतर लोकांच्या मदतीवर अवलंबून राहू लागल्या, तर त्या संस्थांच्या कामकाजामध्ये राजकीय व्यक्तीचा हस्तक्षेप निर्माण होतो. राजकारणी व्यक्ती सहकारी चळवळीचे नेतृत्व स्वत:कडे घेतात. राजकारणी, जमीनदार, मोठे शेतकरी, उद्योगपती यांच्याकडे सहकारी चळवळीची सूत्रे घेतली जातात. राजकीय व्यक्ती सहकारी संस्थांच्या विकासासाठी कोणतेही प्रयत्न करीत नाहीत किंबहुना त्याचे तसे उद्दिष्ट नसते. समाजात प्रतिष्ठा मिळविण्याच्या हेतूने व सरकारी अनुदान मिळवून ते बळकावणे या उद्दिष्टाने सहकारी संस्थांचे नेतृत्व करीत असतात. त्यामुळे समाजातील सीमांत, गरीब व दुर्बल घटकांतील व्यक्तींचा विकास होत नाही.

### ६. सरकारी हस्तक्षेपाची गरज नाही :-

सहकारी चळवळीच्या सुरुवातीच्या काळात सरकारी मदतीची आवश्यकता वाटत असली तरी त्यामुळे सरकारी हस्तक्षेप निर्माण होतो हे लक्षात घ्यावयास हवे. सहकारी चळवळीसाठी कायदे करणे, सोयीसवलती देणे, आर्थिक मदत करणे, यासारखे प्रयत्न सरकार करते. यामुळे सरकारी हस्तक्षेप हे सहकारी संस्थांमध्ये वाढू लागले. सहकारी खात्यातील निबंधकाची हुकूमशाही निर्माण होण्याची भीती निर्माण होते. सहकारी संस्थांच्या संख्यात्मक वाढीकडे अधिक लक्ष पुरविले जाते; गुणात्मक वाढीकडे मात्र दुर्लक्ष केले जाते. सरकारी हस्तक्षेपामुळे सहकारी संस्थांची वाढ होत नाही. म्हणूनच सहकारी चळवळीला सरकारी हस्तक्षेपाची गरज लागत नाही.

### ७. स्वयंप्रेरणा नष्ट :-

सहकारी संस्था अर्थक्षम बनविण्यासाठी त्याना दिली जाणारी मदत थांबविली पाहिजे; पण

भारतासारख्या देशात राजकीय लाभ उठविण्यासाठी सहकारी संस्थांना मदत केली जाते. मदतीची सवय लागल्यामुळे त्यांच्यातील स्वयंप्रेरणा नष्ट पावते. या चळवळीला सरकारी चळवळीचे स्वरूप प्राप्त होते. सभासदांचा संस्थेवरचा विश्वास उडतो. ही चळवळ सरकारी प्रेरणेने चालत असल्याने सभासदांना चळवळीबाबत कोणतीही आस्था नसते. सहकारी संस्थांचे मूळ उद्दिष्ट साध्य होत नाही.

**८. अकार्यक्षम व्यवस्थापन :-**

सहकारी संस्थांच्या चळवळीतील सरकारी सहभागामुळे सहकारी संस्थांचे व्यवस्थापन फारसे कार्यक्षम बनत नाही. सरकारच्या सहभागामुळे सर्वच महत्त्वाचे निर्णय सरकारमार्फत घेतले जातात. सहकारी संस्थांच्या व्यवस्थापकांना व अधिकाऱ्यांना फारशी किंमत राहत नाही. यामुळे सहकारी संस्थांमधील अधिकारी व कर्मचारी दुबळे बनतात. व्यवस्थापन सुधारण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जात नाहीत. परिणामी, सहकारी संस्थांच्या विविध धोरणांच्या कार्यवाहीस विलंब होतो. सहकारी संस्थांच्या विकासाच्या योजना प्रभावीपणे राबविता येत नाहीत. त्यामुळे सभासदांच्या कल्याणाचा हेतू साध्य होत नाही.

## ३.२.२ सहकारी न्यायव्यवस्था (Co-operative Judicial System)

सहकार म्हणजे परस्पर सहकार्य, दहा किंवा त्याहून अधिक व्यक्ति एकत्र येऊन सहकार्यासाठी जी संस्था स्थापन करतात ती सहकारी संस्था होय. जोपर्यंत संस्थेतील सहकाऱ्यांमध्ये एकोप्याचे, एकजुटीचे वातावरण असते तोपर्यंत सर्व काही सुरळीत चालते. परंतु त्यामध्ये जेव्हा वादाचे प्रसंग येतात तेव्हा याला उत्तर या प्रकरणात दिले आहे.

सहकारी चळवळीतील वाद सोडविण्यासाठी उभारलेली यंत्रणा ही वाद सोडविण्यासाठी कमीतकमी खर्च लागणारी असावी तरच समाजातील दुबळ्या व्यक्तिंना सहकाराचा अवलंब करणे शक्य होईल. सहकारी कायद्याच्या तरतुदीनुसार सहकारी न्यायालयाची यंत्रणा ही त्यादृष्टीने वादाचे झटपट व कमी खर्चात निकाल लावणारी आहे. यापूर्वीचा 'लवाद', 'ऑफीसर्स ऑन स्पेशल ड्युटी' यंत्रणा आता रद्द करून कायम स्वरूपाच्या सहकारी न्यायालयाची स्थापना करण्यात आली आहे.

नेहमीच्या दिवाणी न्यायालयात वादाचा निकाल लागण्यास फारच कालावधी लागतो. म्हणून या कायद्यानुसार जे वाद उत्पन्न होतात, ते म्हणजे सहकारी संस्था व तिचे सभासद यामधील वाद कायद्यातील तरतुदीनुसार केवळ सहकारी न्यायालयामार्फतच सोडविणे जरूर आहे. इतर कायद्यात कोणतीही तरतूद असली तरी संस्था व सभासद यामधील वाद सहकारी न्यायालयामार्फत किंवा सहकारी अपील न्यायालयामार्फतच निकालात काढले गेले पाहिजे. याकरिता कोणतीही सहकारी संस्था कर्ज देतेवेळी, माल उधारीने विकतेवेळी, ज्यास कर्ज दिले आहे किंवा माल उधारीने दिले आहे,

त्यास नाममात्र सभासद का होईना सभासद करून घेते. परंतु तसा तो सभासद करून घेतला तरी खरेदी, कर्ज किंवा माल उधारीने देता येत नाही. सभासद नसताना तसा तो देणे धोक्याचे आहे. कारण वसुलीसंबंधी वाद उत्पन्न झाल्यास सहकारी न्यायालयामार्फत त्याचा निकाल होवू शकेलच व प्रकरण दिवाणी न्यायालयात जाणार नाही असे सांगता येणार नाही. तसेच ज्यांच्याशी संस्था आर्थिक किंवा इतर स्वरूपाचे व्यवहार करते असे सांगता येणार नाही. तसेच त्यांच्याशी संस्था आर्थिक किंवा इतर स्वरूपाचे व्यवहार करते, त्यावेळी उत्पन्न होणारा कोणताही वाद सहकारी यंत्रणेमार्फत सोडविला जाईल असा करार करून घेणे जरूर आहे आणि त्याला कर्ज माफ, उधारी देणे इत्यादीसाठी नाममात्र सभासद करून घेऊन त्यानंतरच तो देणे सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य आहे.

## ❑ सहकारी न्यायालयीन व्यवस्था :-

सहकारी संस्था व तिचे सदस्य यांच्यातील 'विवाद' सोडविण्यासाठी 'निबंधका'स अधिकार देण्याची तरतूद १९२५ च्या मुंबई सहकारी कायद्याच्या क-५४ खाली होती. संस्थेच्या व्यवहाराविषयी संस्था व तिचे सदस्य यांच्यातील विवाद या कलमान्वये प्रथम 'विवाद' आहेत का हे निबंधक तपासत असे व विवाद आहे, असे त्यांचे मत झाल्यास ते 'रजिस्ट्रार्स नॉमिनी'कडे निर्णयासाठी पाठविण्याचे आदेश निबंधक देत असत. हीच तरतूद पुढे महाराष्ट्र सहकारी अधिनियमाची क-९१ मध्येही झाली आहे. १९६३-६४ पर्यंत विवाद सोडविण्यासाठी 'रजिस्ट्रार्स नॉमिनी' प्रत्येक जिल्ह्यात नेमले जात असत. साधारणत: वकिली व्यवसाय करणाऱ्या व्यक्तिंनाच अशा प्रकारे नेमले जाई. पण काही वेळा सेवानिवृत्त झालेले सहकारी खात्यातील अधिकारी किंवा सहकारी चळवळीत काम केलेल्या व्यक्तीही नेमल्या जात.

## १. क-९१ ची व्याप्ती :-

क-९१ ची व्याप्ती सहकारी संस्था व तिचे सदस्य किंवा दोन किंवा अधिक सहकारी संस्थातील आपापसातील विवाद की जे संस्थेची घटना, समितीच्या किंवा पदाधिकाऱ्यांच्या निवडणूका, सर्वसाधारण सभांबद्दलचे विवाद किंवा संस्थेची व्यवस्था व व्यवहार याबद्दलचे विवाद सोडविण्याइतकेच आहे, त्या विवादातील कोणताही पक्ष किंवा संयुक्त संस्था किंवा संस्थेस कर्जपुरवठा करणारी संस्था देखील क-९१ प्रमाणे दावा दाखल करू शकते.

क-९१ च्या व्याप्तीबाबत व त्यायोगे जी कार्यकक्षा आखून दिली आहे, त्याबद्दल यापूर्वी अनेक प्रकारचे प्रश्न, गुंतागुंत व अडचणीही होत्या, त्याबाबत वारंवार कार्यकक्षेचे मुद्दे अपील न्यायालये, उच्च न्यायालये. उच्चतम न्यायालयामार्फत गेले. त्या सर्वांचा विचार करून विधिमंडळाने मूळ कलमात वेळोवेळी सुधारणा केल्या आहे.

## २. क–९१ मधील संस्थेची घटना, निवडणूका :–

सर्वसाधारण सभा, व्यवस्था यांचेशी संबंधित विवाद या शब्दयोजनेबद्दलही फारसा वाद नाही. मात्र ''संस्थेच्या व्यवसायाशी संबंधित'' म्हणजे नेमके कोणत्या बाबींना म्हणता येईल हा अद्यापही चर्चेचा विषय कायम आहे.

## ३. याखाली सहकारी अधिनियम क–९१ :–

क–९१ प्रमाणे प्रस्थापित न्यायालयांनी जे महत्त्वाचे निर्णय वेळोवेळी दिले. त्यापैकी काही प्रमुख व महत्त्वाचे निर्णय तसेच त्यासंबंधातील मुंबई उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांचेही काही निर्णय दिले आहेत. फक्त मुंबई उच्च न्यायालयाचेच निर्णय देण्यामागे व देशातील इतर उच्च न्यायालयाचे निर्णय येथे न देण्यामागे दोन हेतू आहेत. एक म्हणजे प्रत्येक प्रांतातील सहकारी कायद्यात काही ना काही वेगळेपणा असतो. त्यामुळे तो बारकावा न पाहताच न्यायनिर्णयाची चिकित्सा व्यर्थ असते, शिवाय या ग्रंथांच्या मर्यादेत, डायजेस्ट प्रमाणे समग्र न्यायनिर्णय देणे अशक्य आहे. दोन्हींचा विचार करून मर्यादित पण जास्तीत जास्त उपयुक्त असे न्यायनिर्णय याखाली दिले आहे.

## ४. संस्थेच्या व्यवसायाशी संबंधित :–

यासंबंधी सर्वोच्च न्यायालयाने श्रीमती कृष्णा राजपाल भाटिया वि. कु. लीला अडवाणी या कामात तपशीलवार चर्चा केली आहे. 'व्यवसाय' हा शब्द मर्यादित अर्थाने वापरला असचून त्याचा अर्थ प्रत्यक्ष व्यापार किंवा व्यवसाय किंवा तत्सम व्यापारी गतिविधी, जी करण्याचा संस्थेला कायदा, कानून व पोटनियमाप्रमाणे अधिकार आहे.

## ❑ सहकारी न्यायालयाची रचना :–

१. राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे कलम–९१ किंवा कलम–१०५ किंवा या अधिनियमाचे इतर उपबंध या अन्वये सहकारी न्यायालयाकडे सोपविण्यात आलेल्या विवादांच्या अभिनिर्णयासाठी एक किंवा अधिक सहकारी न्यायालयाची रचना करता येईल.

२. सहकारी न्यायालय हे राज्य शासनाने नियुक्त केलेल्या, विहीत करण्यात येतील अशा अर्हता असलेल्या एक सदस्याचे मिळून होईल.

३. सहकारी न्यायालयास संपूर्ण राज्यभर किंवा पोटकलम (१) खालील अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा त्याच्या कोणत्याही भागावर अधिकाराकरिता असेल.

४. महाराष्ट्र सहकारी संस्था (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९७३ याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी निबंधकापुढील किंवा या अधिनियमानुसार किंवा नियमानुसार निबंधकाचे

अधिकार प्रदान केले आहेत, अशा व्यक्ती पुढील किंवा निबंधकाकडून नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही नामनिर्देशित व्यक्तीपुढे किंवा नामनिर्देशन व्यक्तीच्या मंडळापुढे असलेले सर्व विवाद आणि इतर कामकाज हे सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे त्याबाबतीत त्याने विनिर्दिष्ट केलेले असते.

५. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९८२ याच्या प्रारंभाच्या काळापूर्वी निबंधकापुढे करण्यात आले आहे. सहकारी संस्थेचे सर्व नियम निबंधकांच्या अधिकार मंडळाकडे सोपविले जाते.

## ❑ सहकारी न्यायालयाच्या निर्णयाविरुध्द दाद मागण्यासाठी अपिलेट न्यायालय :-

अपिलेट न्यायालये निर्माण होण्यापूर्वी दाद मागण्यासाठी राज्य सहकारी न्यायाधिकरण म्हणजे स्टेट को-ऑपरेटिव्ह ट्रॅब्युनल अस्तित्वात होते आणि निबंधकांचा प्रतिनिधी किंवा ऑफीसर ऑन स्पेशल ड्युटी यांच्या निर्णयाविरुध्द या न्यायाधिकरणाकडे दाद मागता येत असे.

सहकार न्यायालयांच्या निर्मितीनंतर ट्रॅब्युनल्सचे नाव बदलून 'महाराष्ट्र राज्य सहकारी अपिलेट न्यायालये' असे करण्यात आले.

Maharashtra State Co-operative Appellate Court (Rule, 149) महाराष्ट्र राज्य सहकारी अपिलेट न्यायालयाचे मुख्यालय मुंबईमध्ये असले तरी राज्यभरातील सर्व लोकांना सहकारी न्यायालयांच्या निकालांविरुध्द मुंबईत धाव घेणे शक्य नसल्याने राज्यात चार ठिकाणी न्यायालय पीठासने (बेंचिस) निर्माण करण्यात आली आहेत.

**अपिलेट न्यायालय पीठासने व कार्यक्षेत्र**

| अ.क्र. | पीठासन | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १. | मुंबई | कोकण व नागरीक विभागातील जिल्हे |
| २. | पुणे | पुणे विभागातील जिल्हे |
| ३. | औरंगाबाद | औरंगाबाद विभागातील (मराठवाडा) जिल्हे |
| ४. | नागपूर | नागपूर व अमरावती विभागातील जिल्हे (विदर्भ) |

## ❑ अपिलेट न्यायालयाची रचना :-

महाराष्ट्र राज्य अपिलेट न्यायालयात एक अध्यक्ष तर चार सदस्य अशी रचना आहे. या सभासदांची संस्था व कालावधी राज्यशासनाकडून निश्चित करण्यात येतो.

कलम १४९(२) अपिलेट न्यायालयाचे अधिकार अध्यक्ष किंवा सभासद एकट्याने किंवा एकत्रितपणे वापरले जावू शकतात. ज्यावेळी एखाद्या अपिलाची सुनावणी विषम सदस्य संख्या असणाऱ्या पीठासनासमोर होते, तेव्हा बहुमताचा निर्णय मान्य केला जातो.

कलम १४९(६) ज्यांच्यासमोर सुनावणी झाली, अशा सदस्यांची संख्या सम असेल तर अध्यक्षांचा निर्णय ग्राह्य मानला जातो. पीठासनावर दोन किंवा त्याहून अधिक सदस्यांची नेमणूक होऊ शकते.

### ❑ अपिलेट न्यायालयाचे अधिकार (कलम १४९)

१. सहकार न्यायालयांच्या आदेशाचा पुनर्विचार करण्याचा अधिकार कलम १५० नुसार अपिलेट न्यायालयात आहे.

२. सहकारी अपिलेट न्यायालयास दिवाणी न्यायालयाचे अधिकार कलम-१५१ नुसार मिळालेले आहे.

३. राज्य शासनाच्या पूर्वसंमतीने न्यायालयाच्या कामकाजासाठी नियम तयार करून शासकीय राजपत्रात (Govt. Gazette) प्रकाशित करणे.

४. उच्च न्यायालयाने सहकारी संस्थांच्या बाबतीत दिलेले आदेश/निर्णय सहकारी न्यायालये व अपिलेट न्यायालयावर बंधनकारक असतात.

५. दाव्याची सुनावणी योग्य पध्दतीने झाली असे वाटल्यास अपिलेट न्यायालय दावा फेरसुनावणीसाठी सहकार न्यायालयाकडे पाठवू शकते.

६. गरजेनुसार अपिलेट न्यायालय एखादा लवाद दावा एका सहकार न्यायालयाकडून काढून घेऊन अन्य सहकारी न्यायालयाकडे हस्तांतरित करू शकते.

७. अपिलाच्या निर्णयापूर्वी मध्यंतरीस आदेश काढणे.

८. अपिलाच्या संदर्भात आवश्यक त्या कागदपत्रांची मागणी करणे.

९. गरजेनुसार अपिलेट न्यायालय एखादा लवाद दावा एका सहकार न्यायालयाकडून काढून घेऊन अन्य सहकारी न्यायालयाकडे हस्तांतरित करू शकते.

## ३.२.३ सहकारी निबंधकाची भूमिका (Role of Co-operative Registrar)

सहकारी संस्थांमधील सर्वोच्च अधिकार म्हणून निबंधकास ओळखले जाते. निबंधकाच्या मदतीस अप्पर निबंधक, सहनिबंधक, उपनिबंधक व दुय्यम निबंधक असे कार्यक्षेत्र व स्तर यानुसार विविध पदे सहकारी प्रशासनात निर्माण केली आहेत. निबंधक म्हणजे सहकारी खात्यातील एक

प्रशासनीय अधिकार होय. निबंधक हा सहकारी संस्थांची नोंदणी करणे, संस्थांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे, मार्गदर्शन करणे या प्रकारची महत्त्वाची कामे करतो. निबंधकास नोंदणी अधिकारी या नावानेही ओळखले जाते. मात्र सहकारी संस्थांच्या नोंदणीबरोबरच इतर अनेक महत्त्वाची कार्ये निबंधकास करावी लागत असल्याने त्याच्या कार्याची व्याप्ती व्यापक आहे.

## ❑ निबंधकाची भूमिका (Role of Registrar)

निबंधक हा सहकारी चळवळीचा जन्मदाता, पालनकर्ता आणि विनाश करणारा अशी विविध भूमिका पार पाडतो. निबंधकाला सहकारी संस्थेचा ब्रह्मा, विष्णू, महेश असेही म्हटले जाते. शंभर वर्षे पूर्ण करणाऱ्या सहकारी चळवळीपुढे गेल्या दोन दशकांत नवीन आव्हाने उभी राहिली आहेत. त्यातूनच सहकारी चळवळ कशा पध्दतीने नवीन प्रकारे उभी राहिल आणि प्रभावी कशी बनेल यादृष्टीने निबंधकाची भूमिका महत्त्वाची ठरते. निबंधकास सहकारी संस्थांबाबतीत पार पाडावी लागणारी भूमिका आणि कराव्या लागणाऱ्या कार्यांचा विचार खालीलप्रमाणे सांगता येईल.

### १. सर्वांगीण विकास करणे :-

देशातील सहकारी संस्थांना जन्म देण्याच्या कार्यात निबंधकास जन्मदाता म्हणून भूमिका पार पाडावी लागते. त्यामुळे सहकारी संस्थांचा सर्वांगीण विकास घडून यावा यादृष्टीने सतत प्रयत्न करावे लागतात. सहकारी संस्थांची कामे व्यवस्थित चालवित, सहकारी संस्था प्रवर्तक आणि कार्यकर्त्यांनी आपल्या जबाबदाऱ्या व्यवस्थित पाडाव्यात आणि संस्थेचा सतत विकास व्हावा यासाठी प्रयत्नशील राहावे लागते. त्यासाठी निबंधकाची जबाबदारी आणि कर्तव्याची भावना जागृत करावी लागते.

### २. सहकारी संस्थांचा पालक :-

सहकारी संस्थेचा निबंधक हा पालक म्हणून भूमिका बजावतो. पालक आपल्या मुलांचे पालनपोषण जसे करतो, त्याप्रकारे निबंधक हा सहकारी संस्थांचे संगोपन करीत असतो. संस्थांना पुरेसे भांडवल मिळेल, नित्यांच्या व्यवस्थापनाची कार्ये योग्यप्रकारे पार पाडली जातील, भांडवलाचा योग्य वापर होईल, भ्रष्टाचार आणि अफरातफर इत्यादी प्रवृत्तींना संस्थेत स्थान मिळणार नाही आणि सभासद, ग्राहक वर्ग आणि समाजाचे हित साधले जाईल आणि त्यातूनच संस्था मजबूत होईल यासाठी प्रयत्न करावे लागतात.

### ३. अधिकारी वर्गाला मार्गदर्शन :-

सहकारी संस्थांचे संस्थापक, प्रवर्तक, संचालक आणि अधिकारी वर्गाला सर्व बाबतीत वेळोवेळी पुरेसे मार्गदर्शन करण्यात निबंधकाची भूमिका महत्त्वाची ठरते. संस्था चालविणे, कार्यपध्दती

व्यवहार, हिशेब लेखन, प्रशासन, सामाजिक जबाबदारीची पूर्तता, शासनाबाबत जबाबदारी पार पाडणे इ. बाबतीत योग्य मार्गदर्शन केले जाते. सहकारी संस्था सुदृढ पायावर उभ्या राहण्यात आणि त्यांच्याकडून चांगले कार्य करावी लागतात.

### ४. सहकारी तत्त्वांचा वापर :–

सहकाराची तत्त्वे ही सहकाराची शक्ती आणि प्रेरणा असते, त्याद्वारे सहकारी संस्थांना मार्गदर्शन होते. ही तत्त्वे सहकारी संस्थांच्या कामकाजात लागू करावी लागतात. त्यातून संस्थेचा कारभार सुलभ होण्यासाठी ताकद मिळते. सहकारात एकत्र आलेले दुर्बल घटक आणि अन्य लोकांना आपल्या पायावर उभे राहणे आवश्यक आहे. समाजातील गरीब, श्रीमंत, वंश, जात, धर्म, पंथ इ. बाबतची मते आणि विचार विसरून एकत्रितपणे आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी लढण्याची प्रेरणा सहकारी तत्त्वामध्ये असते. त्यामुळे सहकारी तत्त्वाची जपवणूक करण्यासाठी निबंधकास काळजी घेणे आवश्यक आहे.

### ५. सहकारी संस्थांचा गुणात्मक विकास :–

सहकारी संस्थांचा गुणात्मक विकास होण्याच्यादृष्टीने निबंधकाला लक्ष द्यावे लागते. त्यासाठी संस्थेला अर्थक्षमता लाभेल, काटकसरीने व्यवहार करणे, उत्पादन खर्च कमी करणे, व्यवहार प्रामाणिकपणे चालविणे, संस्थांच्या कार्याचा सतत विस्तार होईल व समाजाला अधिकाधिक लाभ मिळू शकतील यासाठी सतत प्रयत्नशील राहावे लागते. सहकारी संस्थांची सेवा सर्वांनाच मिळाली पाहिजे व सभासद आणि जनतेचा सहकारावरील विश्वास दृढ होईल यासाठी निबंधकाने सतत प्रयत्नशील राहावे लागते.

### ६. बेकायदेशीर व्यवहाराला आळा घालणे :–

सहकारात प्रवेश करणाऱ्या सभासद किंवा व्यक्ती स्वार्थाचा विचार करीत असतात. संस्थेचे व्यवहार बेकायदेशीरपणे चालविणे, भ्रष्टाचार, रकमेचा अपहार, मालाचा अपहार, हितसंबंधांना कर्जे देणे, यासारख्या प्रवृत्तीमुळे सभासद आणि समाजाचे हित जोपासले जात नाही. सहकारी कायद्याने निबंधकास व्यापक अधिकार दिले असून त्याच्या वापराद्वारे निबंधकाने वरील बेकायदेशीर व्यवहाराला पायबंद घालतो. निबंधक या सर्व बाबींवर नियंत्रण ठेवण्याच्यादृष्टीने योग्य प्रकारे मार्गदर्शनपर भूमिका स्वीकारतो.

### ७. समस्या व उणिवा दूर करणे :–

सहकारी संस्थांच्या कार्यात व्यवस्थापन, हिशेब, भांडवल व्यवहार, सभासदांचे हितरक्षण इ.बाबत काही समस्या व उणिवा जाणवतात. सहकारी संस्थेच्या नियमित व्यवहारात अकार्यक्षमता, उत्पादन खर्चात वाढ, हिशेबात अनियमितपणा, अप्रशिक्षित कर्मचारी, व्यवहाराचा अभाव, अयोग्य

भांडवल गुंतवणूक, खरेदी-विक्रीची समस्या इ. उणिवा व समस्या दूर करण्यात निबंधकाची भूमिका महत्त्वाची असते.

## ८. शिक्षण व प्रशिक्षण :-

सहकारी संस्थांचा विकास आणि त्याच्याद्वारे सभासदांचा आर्थिक व सामाजिक विकास साध्य करणे आवश्यक आहे. संबंधित संस्था असणारे घटक म्हणजे सभासद, संचालक, कर्मचारी वर्ग, कार्यकर्ते यांच्या कार्यावर समाजाचा सहकारी संस्थेच्या विकासाकडे पाहण्याचा दृष्टीकोन अवलंबून असतो. सर्व घटकात जबाबदारीची भावना वाढावी, सहकारी तत्वावरील निष्ठा दृढ व्हावी, सहकारी संस्थेच्या हिताबाबत जागृत असावे इ. दृष्टीकोनातून सर्व घटकांना आवश्यक शिक्षण आणि प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

## ९. ब्रह्मा, विष्णू व महेश म्हणून कार्य करणे :-

निबंधक हा सहकारी चळवळीचा ब्रह्मा म्हणजे सहकारी संस्थांना जन्म देणे, विष्णू म्हणजे सहकारी संस्थांचे सर्वार्थाने पोषण करणे आणि महेश म्हणजे गैरमार्गाने व्यवहार करणाऱ्या संस्था बद किंवा पुनर्वसन करणे. सहकारी चळचळीत कार्य करणाऱ्या संस्थांना सुदृढता प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने निबंधकाची भूमिका महत्त्वाची ठरते. सहकारी चळवळीत शासन, बँका, कायदा व सहकारी परिषदा यातून सहकारी क्षेत्राबाबत योग्य भूमिका बजावणे आवश्यक आहे.

## १०. निबंधकाचे अधिकार :-

सहकारी खात्याच्या रचनेत निबंधकाला फार महत्त्व आहे. निबंधकाला सहकारी संस्थांविषयक आणि नियंत्रणविषयक अनेक कार्ये करावी लागतात. अर्थात अशी कार्ये करण्यासाठी निबंधकाला काही अधिकार देणे आवश्यक ठरते. योग्य अधिकार दिले गेले नाहीत तर निबंधकाला आपली कार्ये पार पाडता येणार नाहीत. यासाठी निबंधकाला पुढील विविध अधिकार देण्यात आले आहेत.

**निबंधकाचे अधिकार**

| **संस्थाविषयक अधिकार** | **नियंत्रणात्मक अधिकार** |
|---|---|
| १) नोंदणी करणे | १) राखीव निधी |
| २) नोंदणीस नकार देणे | २) खर्च वसुली |
| ३) पोटनियमांना मान्यता | ३) कर्ज व्यवहार |
| ४) आर्थिक दायित्व | ४) दंड आकारणे |

| | |
|---|---|
| ५) संस्थांचे विलिनीकरण | ५) व्यवस्थापकीय समिती रद्द करणे |
| ६) सर्वसाधारण सभेची मुदत | ६) मालमता व दफ्तर ताब्यात घेणे |
| ७) सभासदत्व | ७) नुकसानभरपाईचा अधिकार |
| ८) नोंदणी रद्द करणे | ८) वाद प्रकरणी निर्णय घेणे |
| | ९) संस्थेचे विसर्जन करणे |
| | १०) ऑडिट वर्ग देणे |

अशा प्रकारे सहकारी कायद्याचा सर्वेसर्वा, सामाजिक दृष्टीकोन, दारिद्यनिर्मूलन, जातीय सलोखा, बंधुभाव विकास, लोकशाहीची जपणूक व तत्त्वांचा पुरस्कार इ. अनेक दृष्टीने निबंधकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

## ❑ निबंधकाची कार्ये (Functions of Co-operative Registrar)

निबंधकाला प्रामुख्याने तीन प्रकारची कार्ये करावी लागतात. १) वैधानिक कार्ये, २) नियंत्रणात्मक कार्ये आणि ३) विकासात्मक कार्ये. या तीन कार्यांची चर्चा पुढीलप्रमाणे करता येईल.

**निबंधकाची कार्ये**

| **अ) वैधानिक कार्ये** | **ब) नियंत्रणात्मक कार्ये** | **क) विकासात्मक कार्ये** |
|---|---|---|
| १) सहकारी संस्थांची नोंदणी करणे | १) लेखापरीक्षण करणे | १) सहकारी संस्थांना मार्गदर्शन |
| २) पोटनियमाला मंजूरी देणे | २) कारभारावर नियंत्रण ठेवणे | २) निधीची गुंतवणूक करणे |
| ३) संस्थांचे तक्रारी निवारण करणे | ३) प्रोत्साहन देणे | ३) सभाविषयक कार्ये |
| ४) कर्जवसुली साहाय्य | ४) कायद्याची अंमबजावणी करणे. | ४) व्यवस्थापकीय समिती बरखास्त करणे. |
| ५) सभासदत्वास निर्णय देणे | | ५) संस्थेची पुनर्रचना व एकत्रीकरण |
| | | ६) दायित्वातील बदल. |
| | | ७) ऑडिट वर्ग देणे. |

## अ) वैधानिक कार्ये :-

### १) सहकारी संस्थांची नोंदणी करणे :-

सहकारी कायद्यानुसार सहकारी संस्थेची नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यासाठी लागणारी कागदपत्रे उदा. नोंदणी विहित नमुना, 'अ' पोटनियमाच्या ४ प्रती ना हरकत दाखला, बँक, शिल्लकी

प्रमाणपत्र इ. निबंधकाकडे सादर करावे लागतात. निबंधक या सर्व कागदपत्रांची तपासणी करून सर्व बाबींची पूर्तता होत असल्यास सहकारी संस्थेची नोंदणी करतो व त्याबाबतचे प्रमाणपत्र सहकारी संस्थेस दिले जाते.

**२) पोटनियमाला मंजूरी देणे :–**

सहकारी संस्थेची नोंदणी करताना पोटनियमांच्या चार प्रती जोडलेल्या असाव्यात. संस्थेने केलेले पोटनियम कायदेशीर व परिपूर्ण आहेत की नाही याचा अभ्यास निबंधक करून पोटनियमास मान्यता दिली जाते. तसेच सहकारी संस्था जेव्हा प्रत्यक्ष कामास सुरुवात करणार आहे तेव्हा काही अडचणी निर्माण होत असतील किंवा सभासदांच्या व संस्थेच्या सोयीसाठी पोटनियमात दुरुस्ती करतात. ही दुरुस्तीसुद्धा निबंधकाच्या मंजूरीने करता येते. निबंधक सहकारी संस्थेच्या पोटनियमातील दुरुस्तीची मागणी, त्याची गरज तसेच कायद्यातील तरतूद या सर्व बाबींची पडताळणी करून पोटनियमातील दुरुस्तीला मंजूरी दिली जाते.

**३) संस्थांचे तक्रारी निवारण करणे :–**

सहकारी संस्थेचे सभासद, संचालक मंडळ, कर्मचारी वर्ग किंवा इतर बाह्य घटकामध्ये विविध कारणांवरून अनेकवेळा संघर्ष निर्माण होतो, हे वाद सोडविण्याचे काम निबंधकास करावे लागते. निबंधक हे दोन्ही बाजूंचे म्हणजे विचार करून त्यावर तोडगा काढण्याचा प्रयत्न करतात.

**४) कर्जवसुली साहाय्य :–**

सहकारी संस्थांनी सभासदांच्या विविध कारणांसाठी दिलेल्या कर्जाची वसुली नियमितपणे होत नाही. काही सभासद कर्ज फेडण्यास टाळाटाळ करीत असतात. अशावेळी या संस्था आर्थिक संकटात येतात. तसेच ठेवीदारांची ठेवी परत देण्यातही त्या अपयशी ठरतात. अशावेळी निबंधक सहकारी खात्यामार्फत वसुली अधिकाऱ्यांची नेमणूक करून सहकारी संस्थांच्या कर्ज वसुलीस मदत करतात.

**५) सभासदत्वास निर्णय देणे :–**

सहकारी संस्थेच्या निबंधकाचे हे एक महत्त्वाचे कार्य आहे, ते म्हणजे सभासदत्वाबाबतचा निर्णय घेणे होय. सहकारी चळवळीचे एक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे 'खुले सभासदत्व' होय. संस्थेचे नियम व अटींची पूर्तता करण्याऱ्या कोणत्याही व्यक्तीस सहकारी संस्थेचे सभासद होता येते. मात्र काहीवेळा सहकारी संस्था हेतू पुरस्सयर एखाद्या व्यक्तीस सभासदत्व नाकारतात. अशावेळी जर त्या व्यक्तीने सहकारी संस्थेविरुध्द निबंधकाकडे तक्रार केल्यास, निबंधक त्या तक्रारीचा कायदेशीर अभ्यास करून अंतिम निर्णय देतो.

## ब) नियंत्रणात्मक कार्ये :-

### १) लेखापरीक्षण करणे :-

सहकारी संस्थेचा निबंधक हा लेखापरीक्षणाचे काम करतो. अर्थात हे कार्य तो ऑडिटरकडून करून घेतो. संस्थेचे हिशेब वार्षिक किंवा विशिष्ट मुदतीनंतर तपासण्याचे कार्य निबंधकाला करावे लागते. सहकारी संस्थेचा जमा-खर्च, हिशेब पुस्तके, बँक पासबुक, मालमत्ता आदी बाबी तपासल्या जातात. निबंधकाला संस्थेच्या हिशेबात काही नियमबाह्य बाबी आढळून आल्यास त्या समस्या दूर करण्याची तो सूचना देतो, त्यासाठी ठराविक मुदतीत विशिष्ट उपाय योजण्याबाबत तो सांगतो.

### २) कारभारावर नियंत्रण ठेवणे :-

सहकारी संस्थेच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य निबंधक करीत असतो. निबंधक हा सहकारी संस्थांमार्फत कायद्याचे योग्य पालन होत आहे किंवा नाही हे पाहतो. संस्थेमार्फत सभासदांचे हितसंवर्धन होत आहे आणि संस्थेचा कारभार उद्दिष्टपूर्तीसाठीच चालविला जात आहे याकडे तो लक्ष ठेवतो. तसेच सहकारी संस्था निधी व राखीव निधीचा योग्य वापर करीत आहे किंवा नाही हे तो पाहतो. थोडक्यात, निबंधक त्याला मिळालेल्या विविध अधिकारांचा वापर करून सहकारी संस्थांवर नियंत्रण ठेवण्याचे काम करतो.

### ३) प्रोत्साहन देणे :-

सहकारी चळवळीला प्रोत्साहन देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य निबंधक करतो. निबंधक हा सहकारी चळवळीच्या विकासाला चालना देतो. सहकारी संस्थेच्या स्थापनेपासून तो त्यांच्या यशस्वी वाटचालीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर निबंधक त्यांना सहकार्य करीत असतो. तो सहकारी संस्थांच्या उभारणीस साहाय्य करतो. त्यांना वित्तीय व तांत्रिक मार्गदर्शन करतो. सभासदांना सहकारविषयक शिक्षण देऊन त्याद्वारे तो जबाबदार नेतृत्व निर्माण होण्यास साहाय्य करतो. सहकारी चळवळीच्या एकंदर जडणघडणीत निबंधकाचे कार्य फार महत्त्वाचे असते. म्हणून त्याला सहकारी संस्थांचा मित्र, तत्त्ववेत्ता आणि मार्गदर्शक असे संबोधले जाते.

### ४) कायद्याची अंमबजावणी करणे :-

सहकारी संस्थेच्या निबंधकांनी नोंदणी करून मंजूरी दिलेल्या सहकारी कायदा १९६० नुसार कार्य करीत असतात. कार्यक्षेत्रातील सहकारी संस्था सहकारी कायद्याचे पालन योग्य रितीने करतात का? यावर निबंधक नियंत्रण ठेवतात. जर एखादी संस्था सहकार कायद्यानुसार कामकाज करीत नसेल किंवा सहकार कायद्याचा भंग करीत असेल तर त्या संस्थेवर दंडात्मक कारवाई करण्याचा अधिकार निबंधकास असतो.

## क) विकासात्मक कार्ये :–

### १) सहकारी संस्थांना मार्गदर्शन :–

निबंधक हा सहकारी संस्थांची नोंदणी व मार्गदर्शन करण्याचे काम करतो. नोंदणीसाठी कोणत्या कायदेशीर तरतूदी आहेत आणि कोणत्या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे, याविषयी निबंधक नियोजित संस्थेच्या सभासदांना मार्गदर्शन करतो.

### २) निधीची गुंतवणूक करणे :–

सरकारी संस्थांना दरवर्षी नफ्याच्या विशिष्ट भाग राखीव निधीच्या स्वरूपात ठेवावा लागतो. सहकारी संस्थेला राखीव निधीच्या गुंतवणूकीकरिता निबंधक मान्यता देतो. तसेच संस्थेच्या भांडवलापेक्षा राखीव निधी जास्त झाल्यास तो निधी व्यवसायाकरिता वापरण्यास निबंधक परवानगी देतो.

### ३) सभाविषयक कार्ये :–

सहकारी संस्थांच्या सभा वेळेत झाल्यास पुढील सभांची मुदत वाढविणे इत्यादी कार्ये निबंधकाला करावी लागतात. तसेच गरज वाटल्यास विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्याचे कार्यही निबंधकाला करावे लागते.

### ४) व्यवस्थापकीय समिती बरखास्त करणे :–

सहकारी संस्थेची व्यवस्थापन समिती संस्थेचे कामकाज पाहत असते. जर ती समिती कामकाज योग्यरित्या चालवत नसेल किंवा कायद्याचे योग्य पालन होत नसेल तर संबंधित व्यवस्थापन समिती बरखास्त करण्याचे कार्य निबंधकाला करावे लागते.

### ५) संस्थेची पुनर्रचना व एकत्रीकरण :–

एकाच गावात एकाच प्रकारच्या अनेक सहकारी संस्था काम करीत असतील तर सभासद व संपूर्ण समाजाच्या हितासाठी अशा संस्थांचे एकत्रीकरण करण्याच्या सूचना देणे व त्यास मान्यता देण्याचे कार्य निबंधक करतो. तसेच सहकारी संस्था अकार्यक्षम व बिगर अर्थक्षम असतील तर त्यांच्या एकत्रीकरणाद्वारे सदृढ संस्था निर्माण करण्याचे कार्य निबंधकाला करावे लागते. याशिवाय सहकारी संस्थेच्या पुनर्रचनेला मान्यता देणे व पुनर्रचनेसाठी उपाय सुचविणे ही कार्येसुध्दा निबंधकाला पार पाडावी लागतात.

### ६) दायित्वातील बदल :–

सहकारी संस्थेचे दायित्व हे फार मर्यादित असते. अमर्यादित संस्थेच्या नोंदणीच्या वेळेस निश्चित झालेले असते, नंतर संस्थेच्या दायित्वात बदल करावयाचा असल्यास आवश्यकतेनुसार तो करण्याचे कार्य निबंधकाला पार पाडावे लागते.

### ७) ऑडिट वर्ग देणे :–

सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण झाल्यानंतर त्यांच्या गुणवत्तेनुसार अ, ब, क आणि ड यापैकी एक वर्ग देण्याचे कार्य निबंधक करतो. संस्थेची संपत्तीची स्थिती, कर्जे, येणी व देणी, भाग भांडवल, भागरोखे, इतर व्यवहार इत्यादी गुणांच्या आधारे ऑडिट वर्ग दिला जातो.

थोडक्यात, निबंधक हा सहकारी संस्थेचा वैधानिक, नियंत्रणात्मक व विकासात्मक कार्ये पार पाडीत असतो. निबंधकाच्या भूमिकेवर व विविध कार्यावरच सहकारी चळवळींचा विकास अवलंबून असते.

## ३.२.४ जागतिकीकरणाचे सहकारी चळवळीवरील परिणाम (Effects of Globalization on Co-operative Movement)

भारतामध्ये जुलै–१९९१ पासून सरकारने नवीन आर्थिक धोरणाची सुरूवात केली, त्यानुसार उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण या नव्या संकल्पनांचा अवलंब करण्यात आला. त्यामुळे देशात मुक्त अर्थव्यवस्थेची प्रक्रिया सुरू झाली. मुक्त अर्थव्यवस्थेचे किंवा जागतिकीकरणाचे अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रावर परिणाम होत आहेत. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्या निर्हस्तक्षेप धोरणामध्ये या विचाराची मुळे दिसून आली. सरकारने अर्थव्यवस्थेत अडथळा आणू नये. बाजारयंत्रणेनुसार अर्थव्यवस्था चालविण्यात यावी, बाजारयंत्रणा किंवा किंमत यंत्रणा अर्थव्यवस्थेतील सर्व प्रकारच्या समस्या सोडवू शकतात, असे मत सनातनवादी शास्त्रज्ञांनी मांडले होते. याच विचारांचा आधार घेऊन जगातील बहुतेक देशांमध्ये जागतिकीकरणाचे तत्त्व स्विकारण्यात आले आहे. प्रस्तुत घटकामध्ये जागतिकीरकणाचे भारतीय सहकारी चळवळीवरील परिणाम, जागतिकीकरण व भारतीय अर्थव्यवस्था व जागतिकीकरण व सहकारी चळवळी यांचा अभ्यास करणार आहोत.

### ❑ जागतिकीकरणाचा अर्थ (Meaning of Globalization) :-

### १. हेराड, टायेल आणि रॉबर्ट :–

''जागतिकीकरण ही आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे एक काल्पनिक विश्व अर्थव्यवस्थेकडे होणारे संक्रमण दर्शविणारी संकल्पना आहे.''

२. **एडवर्ड हार्मन :–**

''जागतिकीकरण ही सीमापार उत्पादने, भांडवल सेवा आणि आर्थिक क्रिया प्रक्रियांच्या वाढत्या प्रवाहाला लक्ष करणारी प्रक्रिया आहे.''

३. **कॉक्स आणि कॉटन :–**

''जागतिक भांडवलशाहीमधून निर्माण झालेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या, संस्था यांचा प्रभाव असणारी, आंतरराष्ट्रीय आणि आर्थिक व्यवस्थेत राष्ट्रीय भूमिका मर्यादित करणारी प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.''

४. **श्री. सी. टी. कुरियन :–**

''जागतिकीकरण म्हणजे विविध प्रकारच्या अर्थव्यवस्थांचा समूह होय. एकमेकांच्या व्यवहारातून आणि राष्ट्राची व्यक्तिगत उद्दिष्टे साध्य करण्याच्या प्रक्रियेतून आस्तित्वात येणाऱ्या अर्थव्यवस्थेला जागतिक अर्थव्यवस्था असे म्हणतात.''

५. **जागतिक बँक :–**

''जागतिकीकरण म्हणजे जागतिक अर्थव्यवस्था निर्माण करण्याची प्रक्रिया होय.''

❑ **जागतिकीकरण म्हणजे काय?**

१. ज्या ठिकाणी स्वस्त आणि रास्त कच्चा माल आणि इतर स्रोत उपलब्ध असतील, अशा जगातील कोणत्याही ठिकाणी उत्पादन घेणे.

२. जगातील कोणत्याही कोपऱ्यापर्यंत वस्तू आणि सेवा पुरविते, संपूर्ण जग हीच बाजारपेठ असणे.

३. देशाच्या बृहतलक्षी घटकांपैकी परकीय क्षेत्र हे सर्वात महत्त्वाचे क्षेत्र असणे.

❑ **जागतिकीकरण व सहकारी चळवळ :–**

भारतात १९०४ मध्ये सहकारी चळवळ खऱ्या अर्थाने सुरू झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश सरकारने सहकारी चळवळीच्या विकासासाठी फार प्रयत्न केले. स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने या चळवळीचा नियोजनबद्ध विकास घडवून आणला. सहकारी पतपुरवठा संस्था, सहकारी प्रक्रिया संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्था, सहकारी खरेदी-विक्री संस्था, ग्राहक सहकारी संस्था इत्यादीची

वाढ झाली आहे. आज सहकारी चळवळ देशाच्या ग्रामीण भागात पोहोचली आहे. शेती, उद्योग, बँका, व्यापार या क्षेत्रात ही चळवळ काम करते. सरकारच्या आर्थिक मदतीमुळे या चळवळीच्या विकासाचा वेग वाढला आहे. सरकारने अवलंब केलेली समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्टे साध्य करण्यात सहकाराने महत्त्वाची भूमिका साकारली. भांडवलशाही व समाजवादी संघटना यामध्ये योग्य प्रकारे समन्वय साधण्याची जबाबदारी सहकारी संस्थेनी पार पाडली. सहकारी चळवळीच्या विकासामुळे समाजातील गरीब व दुर्बल घटकांना फार मदत झाली. सहकारी उद्योग व प्रक्रिया संस्थांमुळे ग्रामीण विकासाला चालना मिळाली. सहकारामुळे आर्थिक विषमता कमी करण्यास मदत झाली.

सन १९९१ मध्ये नवीन आर्थिक धोरण स्वीकारल्यानंतर त्याचे विविध क्षेत्रांवर परिणाम दिसून आले. सहकारी क्षेत्रावर सुद्धा त्याचा खूप प्रभाव पडला. जागतिकीकरणाच्या स्पर्धेत सहकारी संस्था टिकून राहील किंवा नाही अशी शंका व्यक्त होत होती. जागतिकीकरणात भांडवलशाही व स्पर्धा याला अधिक महत्त्व प्राप्त झाले. सहकारात परस्पर सहकार्याला जास्त महत्त्व दिले जाते. जागतिकीकरणास नफा प्रेरित व्यवस्था अपेक्षित असते. सहकारात नफ्याऐवजी सभासदांचे कल्याण महत्त्वाचे मानले जाते. जागतिकीकरणामुळे भांडवलदारवर्गाचे वर्चस्व निर्माण होण्याचा धोका असतो. मूठभर उद्योगाची मक्तेदारी निर्माण होऊ शकते. समाजातील श्रीमंत व्यक्तींच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी साधनसामग्री वापरली जाण्याची भिती असते. भांडवलदार वर्गाला किंवा गुंतवणूकदारांना ग्रामीण विकासात महत्त्व नसल्याने ग्रामीण विकासाकडे दुर्लक्ष होते.

थोडक्यात सहकाराची जागतिकीकरणाशी तुलना केल्यास हे चित्र वेगळ्या स्वरूपाचे दिसेल. हे जरी खरे असले तरी भविष्य काळात सहकारी चळवळीला जागतिकीकरणाच्या लाटेत टिकून राहावयाचे झाल्यास आपल्या कार्यक्षमतेत व स्पर्धा शक्तीत वाढ करणे गरजेचे आहे.

## ❑ परिणाम :–

जागतिकीकरण आणि सहकारी चळवळ यांच्यातील संबंधाची चर्चा आपण केली. जागतिकीकरणाचे सहकारी चळवळीवर कोणते परिणाम होणार आहेत ते खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

### १. व्यावसायिक कार्यक्षमतेत वाढ :–

जागतिकीकरणामुळे विकसित देशांतील प्रगत कंपन्या मोठ्या प्रमाणात भारतामध्ये आल्या आहेत. या कंपन्यांकडे प्रचंड भागभांडवल आहे. या कंपन्या उच्च तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन घेतात. त्यामुळे सहकार क्षेत्राला जास्त प्रमाणात स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहे. उत्पादन व उत्पादनविषयक तंत्रज्ञान यामध्ये आधुनिकता आणली जाते. सहकारी संस्थांना महाकाय कंपन्यांशी तीव्र स्पर्धा करावी लागत आहे. अशावेळी सहकारी चळवळीतील सर्वांनाच आपली कार्यक्षमता वाढविली पाहिजे.

## २. बाजारपेठांचा विस्तार :-

जागतिकीकरणामुळे प्रगत देशांतील बहुराष्ट्रीय कंपन्या मोठ्या प्रमाणात भारतात आल्या आहेत. त्या कंपन्या नवनवीन वस्तूंमध्ये बदल व उत्पादन गुणवत्तेत वाढ करतात. अशावेळी भारतीय सहकारी संस्थांनी बाजारात टिकून राहणे आवश्यक आहे. त्यासाठी जुन्या तंत्रज्ञानाचा वापर न करता मर्यादित पध्दतीने उत्पादन घेऊन नवीन बाजारपेठेत प्रवेश करणे आवश्यक आहे.

## ३. विदेशी गुंतवणूकीत वाढ :-

जागतिकीकरणामुळे विदेशी भागभांडवल मोठ्या प्रमाणात येत आहे. सरकारने विदेशी गुंतवणूकीसाठी अनेक सेवा सवलती दिल्या आहेत. त्यामुळे विदेशी गुंतवणूकीत वाढ होत आहे. अनिवासी भारतीयांकडून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली जाते. जागतिकीकरणामुळे उद्योगक्षेत्रात भांडवलाला अधिक महत्त्व दिले जाते. यातुलनेत सहकारी संस्थांची भांडवली क्षमता खूप कमी आहे. सहकारात प्रामुख्याने दुर्बल व सामान्य व्यक्तींचा सहभाग असल्याने भांडवल प्रचंड प्रमाणात उभारता येत नाही. त्यामुळे सहकारी संस्थांच्या अस्तित्वाला धोका निमाृण होत आहे.

## ४. व्यवस्थापकीय कौशल्य :-

जागतिकीरणाचा परिणाम म्हणून बाजाात स्पर्धा होत आहे. स्पर्धेमध्ये यशस्वीहोण्यासाठी आधुनिक व्यवस्थापनात कौशल्यांचा वापर केला जातो. उत्तम व्यवस्थापन कौशल्ये, आधुनिक व्यवस्थापनाची तत्त्वे, कार्यक्षम प्रशासनाची तत्त्वे इत्यादींचा वापर वाढत आहे. या तुलनेत सहकारी संस्था समाजाभिमुख असल्याने शास्त्रीय व्यवस्थापनांच्या तत्त्वांचा वापर करण्यावर मर्यादा पडतात. त्यामुळे सहकारी संस्थांना भविष्यात व्यवस्थापकीय कौशल्यात आधुनिकता आणणे गरजेचे आहे.

## ५. उत्पादन तंत्र :-

जागतिकीकरणात नवनवीन तंत्रज्ञान वापरले जाते. त्यामुळे उत्पादनाचा दर्जा वाढून उत्पादन खर्च कमी येतो. सहकारी संस्था मात्र पारंपारिक उत्पादनतंत्राचा वापर करतात. अल्प भांडवलामुळे त्यांना उच्च तंत्रज्ञानाचा अंगीकार करता येत नाही. तसेच या संस्था श्रमप्रधान तंत्राचा वापर करतात. जुन्या व पारंपारिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने उत्पादन घेणाऱ्या सहकारी संस्था बहुराष्ट्रीय कंपन्यांपुढे टिकाव धरू शकत नाहीत. सहकारी संस्थांना तंत्रज्ञानविषयक धोरण बदलावे लागत आहे. बेकारी निर्माण होणार नाही आणि कायक्षमतेत सुद्धा वाढ होईल, अशा प्रकारचे तंत्रज्ञान सहकारी संस्थांना वापरावे लागणार आहे.

## ६. गुणवत्ता व दर्जा :-

बहुराष्ट्रीय कंपन्या उच्च तंत्रज्ञानाचा वापर करतात. त्यांच्या उत्पादनाची गुणवत्ता व दर्जा उच्च

प्रतीचा असतो. नवीन उत्पादन पद्धतीमुळे त्यांना उत्पादन खर्च कमी येतो. या कंपन्या ग्राहकांना आकर्षित करण्याचे प्रयत्न करतात. बाजारपेठांवर आपले वर्चस्व निर्माण करू पाहत आहेत. याचा परिणाम सहकारी संस्थांना उत्पादनाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. अनावश्यक खर्च कमी करणे. साधनसामग्रीचा पूर्ण वापर करणे, व्यवस्थापन सुधारणे यासारखे उपाय करत आहेत.

**७. प्रसारमाध्यमाचा अभाव :-**

जागतिकीकरणाच्या धोरणामुळे बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात उलाढाल होत आहे. भारताच्या व्यापाराला भौगोलिक सीमारेषांच्या मर्यादा राहिल्या नाहीत. बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या वस्तूंच्या विक्रीसाठी मोठ्या प्रमाणात प्रसारमाध्यामाचा वापर करीत आहे. सहकारी संस्था मात्र जाहिरातीवर फार खर्च करू शकत नाही. त्यामुळे त्यांना बाजारपेठा मिळविणे अडचणीचे जाते. स्पर्धेत टिकून राहणे कठीण जाते.

**८. समन्वयाचा अभाव :-**

जागतिकीकरणाच्या तत्त्वामुळे मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांना अधिक वाव मिळत आहे. अशा कंपन्यानी अनेक देशांत आपली शाखा सुरू केल्या आहेत. आपली स्पर्धाक्षमता वाढविण्यासाठी अनेक छोट्या कंपन्यांचे विलिनीकरण होत आहे. अशा मोठ्या आकाराच्या कंपनीशी स्पर्धा करण्यासाठी सहकारी संस्थांना एकत्र येण्याची आवश्यकता आहे. एकंदरीत जागतिकीकरणाची सुरुवात झाल्यामुळे सहकारी संस्थांना अंतर्गत संघटन मजबूत करण्याची आवश्यकता भासत आहे.

**९. कर सवलती व अनुदाने :-**

भारत सरकार सहकारी चळवळीला निरनिराळ्या मार्गांनी कर सवलती व अनुदाने देत असतो. सहकारी संस्थांच्या भागभांडवलात सहभागी होतात. तसेच त्यांच्या कर्जरोख्यांच्या विक्रीस मदत करते. सरकारच्या सहभागामुळे सहकारी चळवळीला उत्तेजन मिळाले आहे; पण जागतिकीकरणामुळे कर सवलती व अनुदानावर परिणाम झाले आहेत. राजकोषीय तूट कमी करण्यासाठी निरनिराळ्या बाबींवर सरकारी खर्चामध्ये तूट निर्माण होत आहे. अनुदानाचे धोरण टप्प्याटप्प्याने कमी करणार आहे. याचा तोटा सहकारी संस्थांना बसणार आहे. सरकारी मदत मिळणे बंद झाल्यास सहकारी संस्था अडचणीत येण्याची शक्यता आहे. स्वत:ची वित्तीय साधने विकसित करावी लागतील. स्वबळावर आर्थिक विकास साधण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत.

**१०. तांत्रिक संशोधनावर भर :-**

सहकारी संस्थांना जागतिकीकरणाच्या टप्प्यात शेतमाल प्रक्रिया, पतपुरवठा आणि विपणन

कार्यापुरते आपले लक्ष मर्यादित न ठेवता तांत्रिक संशोधनावर भर देणे आवश्यक आहे. त्यामुळे सहकारी संस्थांत अशा प्रकारचे संशोधन झाल्यास आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये सहभागी होता येईल.

वरीलप्रमाणे जागतिकीकरणाचे सहकारी चळवळीवर परिणाम होत आहेत. जागतिकीकरण हा धोरणात्मक निर्णयाचा भाग असल्याने त्याला टाळता येणे शक्य नाही. सभासदांचे कल्याण व बाजाराभिमुख व्यवहार यांची योग्य सांगड घाालावी लागेल. तरच सहकारी संस्थांना भविष्यात स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवू शकेल.

## ३.३ सारांश

सन १९८८ नंतर मुक्त आयात व निर्यात अभिवृध्दीतील अपयश यामुळे महसुली खात्यावरी तूट सतत वाढत गेली. त्यानुसार भारतात जागतिकीकरण या संकल्पनेचा उदय झाला. जागतिकीकरण ही मार्मिक एकीकरणाची प्रक्रिया आहे. जॉर्ज बुश अमेरिकेचे अध्यक्ष असताना १९९१ साली नव्या जागतिक व्यवस्थेच्या विचारांची मांडणी झाल्याने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरूवात झाली. जागतिकीकरणाच्या धोरणाचा आराखडा डंकेल प्रस्तावाद्वारे मांडण्यात आला होता. या प्रस्तावात मांडलेल्या प्रमुख बाबी हाच जागतिकीकरणाचा गाभा आहे. भांडवलांचा मुक्त संचार आणि बाजारपेठांचा विस्तार या दोन प्रमुख बाबी त्यांच्यापुढे होत्या आणि त्यातूनच जागतिकीकरणाचे धोरण पुढे आले.

१९०४ च्या कायद्यानुसार सहकारी संस्थेचा प्रमुख हा निबंधक आहे. १९१९ पासून सहकार हा विषय राज्यांच्या अखत्यारित गेला आहे. प्रत्येक राज्याने स्वतंत्र कायदे केले आहेत. राज्यातील सहकारी खात्याचा प्रमुख निबंधक असतो. त्यानंतर उपनिबंधक, सहाय्यक निबंधक व कार्यालयीन अधिकक्ष, मुख्य लिपिक, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक व इतर सेवक अशी असते.

सहकारी न्यायव्यवस्थांमध्ये उत्पन्न होणाऱ्या वादांची छाननी करून योग्य न्याय देण्यासाठी सहकार खात्याच्या बाहेरील तटस्थ व्यक्तीची नियुक्ती करण्याची प्रथा महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीत आधीपासून आहे. १९८२ पूर्वी सहकारी संस्था निबंधकांचे प्रतिनिधी किंवा विशेष कर्तव्य अधिकारी वादांबाबत छाननी करून निवाडा करण्याचे काम करीत होते. आता सहकारी न्यायालये हा स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात आल्याने त्रयस्थाच्या भूमिकेतून न्यायनिवाडा होणे आणि तो कमीतकमी वेळेत होणे शक्य झाले आहे.

सहकारी संस्थेचा निबंधक हा सर्वोच्च अधिकारी असतो. सहकारी संस्थेची नोंदणी करणे, देखरेख व नियंत्रण ठेवणे, संस्थांना मार्गदर्शन करणे, ऑडिट वर्ग देणे, सहकारी चळवळीचे नेतृत्व करणे इत्यादी प्रकारची कार्ये करतो. सहकारी संस्थांचे सर्व व्यवहार करण्याबरोबरच संस्थेचे पोटनियम मंजूर करणे, पोटनियम दुरुस्तीला मान्यता देणे, नोंदणी प्रमाणपत्र देणे, सहकारी संस्थांचा वर्ग ठरविणे,

सभासदाबाबत अंतिम निर्णय घेणे व वादविवादात समन्वय घडवून आणणे यासारख्या महत्त्वाच्या भूमिका निबंधकास कराव्या लागतात.

जागतिकीकरण म्हणजे स्थानिक वस्तूंची किंवा घडामोडीची जागतिक स्तरावर स्थानांतरणाची भूमिका बजावते. देशाच्या अर्थव्यवस्थेचे जगाच्या अर्थव्यवस्थेबरोबर एकत्रीकरण करण्याचे कार्य करते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहकाराची भूमिका महत्त्वाची आहे. सहकारी व्यावसायिक कार्यक्षमता, बाजारपेठांचा विस्तार. विदेशी गुंतवणूकीत वाढ, व्यवस्थापकीय कौशल्य, उतपादन तंत्र, गुणवत्ता व दर्जा अशा अनेक दृष्टीने जागतिकीकरणात सहकाराची भूमिका बदलणे आवश्यक आहे.

## ३.४ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

❑ **पुढे दिलेल्या पर्यायातून योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. पहिला सहकारी पतपुरवठा संस्था कायदा ............. यावर्षी करण्यात आला.

*अ) १९१९ ब) १९४७ क) १९०४ ड) १९५१.*

२. सरकार विविध सहकारी संस्थांना ................ देते.

*अ) कर सवलती ब) सूट क) हमी ड) कर्जरोखे.*

३. सहकारी संस्थांची स्थापना करण्यासाठी ............... व्यक्तीची गरज असते.

*अ) दहापेक्षा कमी क) कमीतकमी दहा*

*ब) दहापेक्षा अधिक ड) यापैकी नाही.*

४. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० च्या कलम ............. मधील तरतुदीनुसार लवाद दावे दाखल होऊ शकतात.

*अ) ७७ (अ) ब) ७७ (क) क) ९१ (ए) ड) ९१ (१).*

५. सध्या महाराष्ट्रात ................ सहकारी न्यायालये कार्य करतात.

*अ) २० ब) २५ क) २४ ड) ३०.*

६. सहकारी संस्थांचे आर्थिक वर्ष ................ रोजी संपते.

*अ) ३० जून ब) २८ फेब्रुवारी क) ३१ मार्च ड) १ एप्रिल.*

७. जागतिकीकरणामुळे बाजारपेठांवर ................ चे वर्चस्व वाढत आहे.

*अ) सहकारी संस्था क) बहुराष्ट्रीय कंपन्या*

*ब) सार्वजनिक संस्था ड) सहकारी संस्थांचे सभासद.*

८. भारतात सन ........... मध्ये नवीन आर्थिक धोरण स्वीकारण्यात आले.

*अ) १९८२ ब) १९९१ क) १९९५ ड) १९९९.*

९. सहकारी संस्थांची नोंदणी करणे हे निबंधकाचे ............... कार्य आहे.

*अ) नियंत्रणात्मक ब) विकासात्मक क) वैधानिक ड) ऐच्छिक.*

१०. ................ हा सहकारी संस्थेची हिशेबपुस्तके तपासू शकतो.

*अ) निबंधक ब) लेखापाल क) आयुक्त ड) यापैकी नाही.*

११. .............. सहकारी प्रशासनाचा प्रमुख असतो.

*अ) सहनिबंधक ब) निबंधक क) सुपरवायझर ड) असहकारमंत्री.*

१२. सहकारी संस्थांच्या उत्पन्न करात ................ कडून सवलत दिली जाते.

*अ) बँका ब) सरकार क) केंद्र सरकार ड) राज्य सरकार.*

१३. सहकारी न्यायालये निर्माण होण्यापूर्वी ............ पध्दती अस्तित्वात होती.

*अ) तह ब) तडजोड क) समेट ड) लवाद.*

## ३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. *क) १९०४.*

२. *अ) कर सवलती.*

३. *क) कमीतकमी दहा.*

४. *ड) ११ (१).*

५. *ब) २५.*

६. *क) ३१ मार्च.*

७. *क) बहुराष्ट्रीय कंपन्या.*

८. *ब) १९९१.*

९. *क) वैधानिक.*

१०. *ब) लेखापाल.*

११. *ब) निबंधक.*

१२. *ब) सरकार.*

१३. *ड) लवाद.*

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

✡ **अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. सहकारी चळवळीच्या विकासात सरकारची भूमिका स्पष्ट करा.

२. अपिलेट न्यायालयांची रचना व कार्यपध्दती चर्चा करा.

३. सहकारी न्यायालयांची स्थापना का व कशी करण्यात आली?

४. सहकारी चळवळीत निबंधकाची भूमिका स्पष्ट करा.

५. निबंधकाचे कार्ये स्पष्ट करा.

६. जागतिकीकरणात सहकाराची बदलती भूमिका स्पष्ट करा.

७. जागतिकीकरण म्हणजे काय? जागतिकीकरणाचे सहरकारी चळवळीवरील परिणाम स्पष्ट करा.

✡ **ब) टिपा लिहा.**

१. सहकारातील सरकारी सहभागाचे विपरित परिणाम.

२. सहकारी न्यायव्यवस्थेची रचना.

३. अपिलेट न्यायालयाची रचना.

४. निबंधकाचे अधिकार.

५. निबंधकाची कार्ये.

६. जागतिकीकरण आणि सहकारी चळवळ.

७. सहकारी निबंधकांची भूमिका.

८. सहकारी न्यायव्यवस्था.

## ३.७ संदर्भ सूची

१. **Datt and Sundaran** : *"Indian Economy"*, S. Chand and Company, New Delhi.

२. **Dr. C. N. Sontakki** : *"Co-operative Development"*, Sheth Publication, Mumbai.

३. **Hajela, T. N.** : "Principles, Problems and Practice of Co-operation", Shivalal Agrawal Publicaton, Agra.

४. **Kamat, G. S.** : *"Principles, Practice and Management of Co-operation".*

५. **डॉ. कडवेकर** : *'विपणन व्यवस्थापन'*, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

६. **प्रा. जगत कराडे** : *'जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने'*, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

७. **प्रा. डॉ. बी. एच. दामजी व डॉ. रूपा शहा** : *'सहकार'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर. ऑगस्ट, २०१९.

८. **प्रा. डॉ. सी. जे. जोशी व प्रा. के.सी. जोशी** : *''सहकाराचा विकास'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर. जून २०१५.

९. **व. शं. जोशी** : *'सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याखालील अद्ययावत सुधारित नियम'*, न्यायदीप प्रकाशन, पुणे, २००४.

१०. **डॉ. डी. व्ही. देशपांडे** : *'महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०'*, हिंदी लॉ हाऊस, पुणे, १९९८.

११. *'सहकारीच तत्त्वे आणि भारतातील सहकारी संस्था'*, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, *दूरशिक्षण विभाग, बी.ए.भाग-२, २०१५.*

१२. **प्रा. डॉ. माधव बिराजदार** : *'सहकार'*, तिर्थरूप प्रकाशन, मोकर, जून, २००२.

✡✡✡

# सहकारी संस्थांचे अंकेक्षण

## ( Audit of Co-operative Societies )

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

  ४.२.१ सहकारी अंकेक्षणाची व्याख्या, अर्थ आणि आवश्यकता

  ४.२.२ सहकारी अंकेक्षणाचे प्रकार

  ४.२.३ लेखा परीक्षकाची भूमिका

  ४.२.४ सहकारी अंकेक्षणातील गुण व दोष

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

४.६ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ संदर्भ पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये

प्रस्तुत घटकाच्या अभ्यासामध्ये आपणांस पुढील बाबींचे आकलन होईल.

१. सहकारी अंकेक्षणाची व्याख्या आणि आवश्यकता समजून घेणे.

२. सहकारी अंकेक्षणाचे प्रकार समजून घेणे.

३. लेखा परीक्षकाची भूमिका माहित करून घेणे.

४. सहकारी अंकेक्षण पध्दतीतील गुण आणि दोष समजून घेणे.

## ४.१ प्रास्ताविक

प्रत्येक सार्वजनिक व खाजगी संस्थेला हिशेब ठेवावा लागतो व हे ठेवलेले हिशेब योग्य आहेत की नाही यासाठी सर्व संस्थांना अंकेक्षण करावे लागते. हे अंकेक्षण वर्षाच्या शेवटी केले जाते. अंकेक्षणामुळे हिशेबावर नियंत्रण राहते व संस्थांच्या व्यवहाराचे परीक्षण केले जाते व त्यातून संस्थांच्या कामाची गुणवत्ता कशी आहे हे लक्षात येते.

## ४.२ विषय विवेचन

प्रस्तुत घटकामध्ये सहकारी अंकेक्षण अर्थ, आवश्यकता, अंकेक्षणाचे प्रकार, लेखा परीक्षकाची भूमिका, सहकारी अंकेक्षणातील गुण, दोष इत्यादी घटकांचा अभ्यास करणार आहोत.

### ४.२.१ सहकारी अंकेक्षणाची व्याख्या, अर्थ आणि आवश्यकता

सहकारी संस्थेचे हिशेब तपासणे सहकारी कायद्यानुसार आवश्यक असते. सहकारी संस्थांचे सभासद हे अंकेक्षणाविषयी अज्ञानी असतात. त्यासाठी त्याना लेखापरीक्षक नेमावा लागतो. हे लेखा परीक्षक सहकारी संस्थांचे अंकेक्षण करतात.

❑ **अंकेक्षणाच्या व्याख्या :–**

१. **डॉ. ओ. आर. कृष्णस्वामी** यांच्या मते, ''ज्यामध्ये संस्थेच्या हिशेबाचा बिनचूकपणा पाहिला जातोय आणि त्याबरोबर संस्थेने पार पाडलेले व्यवहार, सहकारी तत्वानुसार आपल्या सभासदांच्या गरजा भागवून त्यांचे आर्थिक कल्याण वृद्धिंगत करण्यात कितपत उपयुक्त ठरले आहेत. याची चौकशी केली जाते, त्यास सहकारी अंकेक्षण असे म्हणतात.''

२. ''एखाद्या संस्थेचे अंतिम हिशेब त्या संस्थेच्या व्यवहांरांचे व सांपत्तिक परिस्थितीचे वास्तव व योग्य स्वरूप दाखवीत आहेत. याची खात्री करून घेण्यासाठी हिशेबासंबंधीच्या पावत्या व इतर कागदपत्रांच्या साहाय्याने एका त्रयस्थ पण स्वतंत्र तज्ञ व्यक्तीने किंवा संस्थेने केलेले काटेकोरपणे परीक्षण म्हणजे अंकेक्षण होय.''

वरील व्याख्येतून हे स्पष्ट होते की, सहकारी संस्थांच्या हिशेबांचे काटेकोर परीक्षण करण्यासाठी सहकारी अंकेक्षण आवश्यक आहे. सहकारी संस्थेचे सर्वांगीण कामकाज उत्तम असल्यास त्या संस्थेस हिशेब तपासणीस 'अ' वर्ग दर्जा देण्यात येतो.

❑ **सहकारी अंकेक्षणाची आवश्यकता :–**

सहकारी संस्थांच्या अंकेक्षणाची आवश्यकता पुढील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१. संस्थांच्या व्यवहारांवर देखरेख :–**

सहकारी संस्थेचा सभासद अर्धशिक्षित, अडाणी, गरीब असतो. त्याना सहकारी संस्थांच्या व्यवहारांचे पुरेसे ज्ञान नसते. सहकारी संस्थेचे हिशेब तपासण्यासाठी लेखापरीक्षक ठेवावा लागतो. हा लेखापरीक्षक संस्थांच्या व्यवहारांवर देखरेख ठेवतो.

**२. संस्था उद्दिष्टपूर्ती :–**

प्रत्येक सहकारी संस्थांची उद्दिष्ट्ये असतात. त्यादृष्टीने उद्दिष्टपूर्तीसाठी संस्था वाटचाल करत असतात. संस्थेने ठरविलेली उद्दिष्ट्ये कितपत साध्य झालेली आहेत हे तपासण्याची जबाबदारी लेखापरीक्षकांची असते, त्यासाठी लेखापरीक्षण हे अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**३. कर्मचारी व अधिकाऱ्यांवर नियंत्रण :–**

दैनंदिन कारभार सांभाळण्यासाठी सहकारी संस्था कर्मचारी व अधिकारी नियुक्त करतात. हे कर्मचारी व अधिकारी योग्यरित्या काम करतात का नाही हे तपासण्यासाठी लेखा परीक्षणाची आवश्यकता भासते.

**४. ठेवीदारांचे हित जोपासणे :–**

सहकारी संस्थेत संस्था सभासदाशिवाय इतर व्यक्तीच्याही ठेवी असतात. प्रत्येक ठेवीदाराला आपल्या ठेवी सुरक्षित असाव्यात असे वाटते. या ठेवीदाराच्या ठेवी किती सुरक्षित आहेत हे तपासण्यासाठी लेखा परीक्षणाची आवश्यकता असते. लेखा परीक्षक व संस्था ठेवीदाराचे हित जोपासत असतात.

**५. गैर व्यवहारास आळा घालणे :–**

सहकारी संस्थेत कारभार व्यवस्थेत नसेल तर काही वेळा गैर व्यवहार होण्याची शक्यता असते असे गैरव्यवहार होऊ नयेत यासाठी सहकारी लेखा परीक्षणाची आवश्यकता असते.

**६. वित्तीय स्थिती कळते :–**

सहकारी संस्थेची वार्षिक वित्तीय स्थिती लेखापरीक्षणामुळे लक्षात येते. संस्थेची प्रगती होत आहे की नाही यासाठी लेखा परीक्षण आवश्यक असते.

**७. कार्यक्षमता वाढीसाठी :–**

सहकारी संस्थेचे वेळोवेळी योग्यरित्या लेखापरीक्षण केल्यास संस्थेच्या व्यवहारातील चुका लक्षात येतात. झालेल्या चुका दूर करून संस्था व कर्मचारी यांची कार्यक्षमता वाढते.

### ४.२.२ सहकारी अंकेक्षणाचे प्रकार

व्यवसाय संघटन पध्दती आणि प्रकार तसेच व्यवसायाचे स्वरूप व गरजेनुसार अंकेक्षणाचे विविध प्रकार आहेत. ते पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

**अ) व्यवसायाच्या संघटन पध्दतीनुसार अंकेक्षणाचे प्रकार :–**

**१. कायद्यानुसार अंकेक्षण :–**

१९५६ च्या कंपनी कायद्यानुसार कंपन्यांना आपल्या जमाखर्चाचे, हिशेबाच्या पुस्तकाचे परीक्षण लेखकापरीक्षकाकडून करून घेणे आवश्यक आहे. तसेच प्रत्येक सहकारी संस्थांना सहकारी कायदा तरतुदीनुसार लेखा परीक्षण करणे आवश्यक असते. ३१ मार्च हे सहकारी संस्थांचे आर्थिक वर्ष असते.

**२. खाजगी अंकेक्षण :–**

देशातील खाजगी संस्था, उद्योग व्यवसाय याना अंकेक्षण करणे कायदेशीर नसते पण आज जवळ जवळ सर्व खाजगी संस्था, उद्योग स्वच्छेने अंकेक्षण करतात.

**३. सरकारी अंकेक्षण :–**

देशातील केंद्र सरकार, राज्य सरकार व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या जमाखर्चाचे हिशेबांच्या पुस्तकांचे अंकेक्षण योग्य प्रकारे करण्यासाठी सरकारी अंकेक्षणाची गरज असते. म्हणून सहकारी अंकेक्षण हा अंकेक्षणाचा प्रकार आहे.

**४. अंतर्गत अंकेक्षण :–**

संस्थेच्या हितासाठी संस्थेने लेखापरीक्षकांची स्वत:च केलेली व्यवस्था म्हणजे अंतर्गत अंकेक्षण होय.

**ब) कामाच्या स्वरूपानुसार व व्यवसाय संघटनेच्या गरजेनुसार अंकेक्षणाचे प्रकार :–**

**१. संपूर्ण अंकेक्षण :–**

या प्रकारात हिशेब पुस्तकातील सर्व व्यवहाराची पूर्णपणे तपासणी केली जाते. या प्रकारात संस्थेचे कोणतेही व्यवहार यातून सुटू शकत नाहीत. एकदा हिशेब तपासणी सुरू झाली की, ती पूर्ण केली जाते.

२. **अंशत: अंकेक्षण :–**

या प्रकारात हिशेब पुस्तकाच्या विशिष्ट बाबीची किंवा एका विशिष्ट व्यवहाराची तपासणी करण्यासाठी लेखा परीक्षकांची नियुक्ती केली जाते. म्हणून त्यास अंशत: अंकेक्षण असे म्हणतात.

### क) व्यावहारिक दृष्टिकोणातून अंकेक्षणाचे प्रकार :–

१. **वार्षिक अंकेक्षण :–**

प्रत्येक आर्थिक वर्षाच्या शेवटी सहकारी संस्थेचे लेखापरीक्षण केले जाते. त्यात वार्षिक अंकेक्षण असे म्हणतात. यामध्ये लेखापरीक्षक संस्थेच्या वर्षभराच्या आर्थिक व्यवहारांचे व तसेच हिशेबाचे परीक्षण करतो.

२. **सतत अंकेक्षण :–**

या प्रकारामध्ये लेखापरीक्षक किंवा त्यांचा कर्मचारी वर्ग संपूर्ण वर्षभर व नियमितपणे हिशेब तपासणी करतो म्हणून त्यास सतत अंकेक्षण असे म्हणतात. सहकारी साखर कारखाने, शेतकरी सहकारी संघ, जिल्हा मध्यवर्ती बँका, राज्य सहकारी बँका इत्यादी संस्थांना निरंतर किंवा सतत अंकेक्षणाची गरज असते.

३. **मध्यवर्ती अंकेक्षण :–**

आर्थिक वर्षाच्या किंवा दोन ताळेबंदपत्रांच्या मधल्या काळात केल्या जाणाऱ्या अंकेक्षणाला मध्यवर्ती अंकेक्षण असे म्हणतात.

### ड) विशिष्ट उद्देशाने केलेले अंकेक्षणाचे प्रकार :–

विशिष्ट उद्देशाने अंकेक्षणाचे विविध प्रकार आहेत, त्यात रोख खात्याचे, ताळेबंदाचे विस्तृत, परिव्यय, संयुक्त, खास, योग्यता यांचा समावेश होतो.

वरीलप्रमाणे अंकेक्षणाचे प्रकार आहेत.

## ४.२.३ लेखा परीक्षकाची भूमिका

सहकारी संस्थांच्या कार्यप्रणालीत पारदर्शीपणा येण्यासाठी सहकारी संस्थांच्या अंकेक्षणाची आवश्यकता असते. त्यासाठी लेखापरीक्षक कार्यक्षम व कुशल असला पाहिजे. लेखापरीक्षकाने आवश्यक ती शैक्षणिक पात्रता पूर्ण केली पाहिजे. लेखा परीक्षकास हिशोब तपासणीचे ज्ञान अवगत असणे आवश्यक असते. सहकार क्षेत्रात सहकारी संस्थांच्या अंकेक्षणासाठी सहकारी संस्थेच्या

सर्वसाधारण सभेत योग्य पात्रता असणारा माणूस नेमला जातो. संस्थेच्या सभासदांच्या आर्थिक हिताची जपणूक करणे ही लेखा परीक्षकाची महत्त्वाची प्रमुख जबाबदारी असते. त्याबरोबरच लेखा परीक्षकास पुढील भूमिका पार पाडाव्या लागतात.

### १. कर्तव्य पूर्ण करणे :-

लेखा परीक्षक हा सहकारी संस्थांच्या व सभासदांच्या हितासाठी नेमला जातो, त्यामुळे त्याला सभासदांचे व संस्थांचे हित जोपासणे आवश्यक असते.

### २. कागदपत्रे तपासणी करणे :-

लेखा परीक्षकास सहकारी संस्था कायद्यानुसार संस्था व्यवहार, नफा-तोटा पत्रक, रोकड वही, ताळेबंद पावत्या इत्यादी कागदपत्रे काटेकोरपणे तपासावी लागतात.

### ३. कर्जव्यवहाराची तपासणी करणे :-

सहकारी संस्थांच्या कर्जव्यववहाराची तपासणी करणे हे महत्त्वाचे असते. हे कर्ज व्यवहार तापसणीसाठी लेखापरीक्षकांची नेमणूक केली जाते.

### ४. गोपनीयता :-

लेखापरीक्षक अहवालात सर्व गोष्टी पारदर्शीपणे मांडाव्यात अशी अपेक्षा असते, त्याबरोबरच ज्या सहकारी संस्थेसाठी लेखापरीक्षक काम करतात, त्या संस्थेच्या हितासाठी आवश्यक गोपनीयता जपणे व संस्थेबाहेरच्या लोकांसमोर संस्थेच्या व्यवहारांबाबत वाच्यता न करणे ही बाब देखील लेखापरीक्षकांच्या कर्तव्याचा भाग आहे.

### ५. कर्मचाऱ्यांकडून खुलासा :-

कोणत्याही व्यवहाराबाबत शंका असल्यास लेखापरीक्षक जशी मूळ कागदपत्रे पाहू शकतो. त्याचप्रमाणे व्यवहार करणारे कर्मचारी, अधिकारी संचालक यांच्याकडून लेखी स्वरूपात खुलासाही मागवू शकतो.

### ६. सभासद व संस्थेचे हितरक्षण :-

संस्थेच्या सांपत्तिक स्थितीवर बारीक लक्ष ठेवून सभासदांचे व संस्थेचे हित जपणे हे लेखापरीक्षकांचे कर्तव्य असल्याने कोणताही गैर किंवा नियमबाह्य व्यवहार, फसवणूक अथवा निष्काळजीपणा निदर्शनास आल्यास लेखीपरीक्षकांने तो संस्थेच्या तसेच निबंधकाच्या निदर्शनास आणावा लागतो.

७. **विशिष्ट नमुन्यात अहवाल :-**

सहकारी संस्थांचे हिशेब व अहवाल एका विशिष्ट नमुन्यात व्हावेत यादृष्टीने नमुने निश्चित करून देणे व त्यानुसार नोंदणी होते किंवा नाही हे पाहण्याचे काम लेखापरीक्षकास करावे लागते.

८. **वार्षिक सर्वसाधारण सभांना उपस्थिती :-**

संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्यावेळी उपस्थित राहून संस्थेच्या एकूण व्यवहारांबाबत सभासदांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना लेखापरीक्षकांने वस्तुस्थिती समर्पक उत्तरे देणे लेखापरीक्षकांच्या कर्तव्यांचा भाग आहे.

९. **अहवाल लेखन :-**

लेखापरीक्षकांने सर्वसाधारण अहवाल व दोषदुरुस्ती अहवाल अशा दोन भागांत अहवाल देणे अपेक्षित असते. सर्वसाधारण अहवालामध्ये सामान्यपणे एक वर्षाच्या कालावधीमध्ये संस्थेच्या स्थितीत झालेले बदल नमूद केलेले असतात.

१०. **मार्गदर्शकाची भूमिका :-**

लेखापरीक्षक हा संस्थेचा मार्गदर्शक म्हणून काम करत असतो. सर्व हिशेबपुस्तकांची पावत्यांची तपासणी करतो. संस्था कर्मचाऱ्यांकडून लेखी किंवा तोंडी स्पष्टीकरण मागवून घेतो आणि त्यात चुका असल्यास संस्थेतील सभासदांच्या निदर्शनास आणून देतो.

वरील विविध भूमिका लेखापरीक्षकाला पूर्ण कराव्या लागतात.

## ४.२.४ सहकारी अंकेक्षणातील गुण व दोष

प्रत्येक सहकारी संस्थांना अंकेक्षण करणे आवश्यक आहे. त्यामुळे संस्थेच्या व्यवहाराची किंवा हिशेबाची पडताळणी होत असते. त्याबरोबर कार्यपध्दतीतील उणीवा लक्षात येत असतात व त्यावर योग्य उपाय योजना करता येते. संस्था व ठेवीदाराचे हितसंबंध जोपासता येते, असे असले तरी सहकारी अंकेक्षणाचे काही फायदे व तोटे किंवा गुण, दोष आहेत ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

❑ **सहकारी अंकेक्षणाचे गुण/फायदे :-**

सहकारी अंकेक्षणाचे पुढीलप्रमाणे फायदे आहेत.

१. **व्यवहारांवर नियंत्रण :-**

सहकारी संस्थेच्या आर्थिक व्यवहारांवर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी सहकारी अंकेक्षण होणे गरजेचे असते. त्यामुळे संस्थेच्या आर्थिक व्यवहारांना योग्य दिशा मिळते.

**२. हिशेब पद्धतीत योग्य सल्ला मिळतो :–**

सहकारी संस्थांच्या हिशेबपद्धतीबाबत अंकेक्षणामुळे योग्य सल्ला व मार्गदर्शन मिळते. त्यामुळे संस्था कारभार व व्यवहार सुधारतो.

**३. हिशेबातील चुका समजतात :–**

सहकारी संस्थेचे लेखापरीक्षण केलयामुळे हिशेबात काय चुका झालेल्या आहेत हे लक्षात येते.

**४. आर्थिक स्थिती समजते :–**

सहकारी संस्थेची आर्थिक स्थिती समजण्यासाठी लेखापरीक्षण आवश्यक असते.

**५. गैरकारभार यावर नियंत्रण :–**

सहकारी संस्थेच्या अंकेक्षणामुळे सहकारी संस्थेचा कारभार व आर्थिक बाबी लक्षात येतात व काय गैरकारभार झाला आहे हे लक्षात येते.

**६. संस्था प्रगती लक्षात येते :–**

सहकारी संस्थेची प्रगती ही व्यवहार कार्यपध्दती व व्यवस्थापन यावर अवलंबून असते. पण ही प्रगती झाली आहे किंवा नाही हे लेखापरीक्षणातून लक्षात येते.

**७. लेखापुस्तके अद्ययावत राहतात :–**

लेखापरीक्षणांमुळे सहकारी संस्थेचे लेखापुस्तके अद्ययावत राहण्यास मदत मिळते. लेखा पुस्तके अद्ययावत राहिल्यास संस्थेचे आर्थिक व्यवहार पारदर्शी होतात.

**८. संचालकांच्या गैरकारभारावर नियंत्रण :–**

सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण केल्यामुळे संस्थेचे कारभार व गैरकारभार लक्षात येतात. गैरकारभार झाल्यास त्यावर नियंत्रण ठेवण्यास मदत होते.

**९. व्यवस्थापनावरील विश्वास वाढतो :–**

सहकारी संस्थेच्या लेखापरीक्षणामुळे संस्थेच्या कामकाजातील योग्य बाबी व गुणात्मक बाबी स्पष्ट होतात. त्यामुळे संस्थेच्या व्यवस्थापनावरील विश्वास वाढतो.

**१०. कर्मचारी वर्गात कर्तव्याची जाणीव :–**

सहकारी संस्थेच्या हिशेबातील दोष वेळच्यावेळी निदर्शनास आणून दिल्यामुळे संस्थेच्या कर्मचारी वर्गात जबाबदारी व कर्तव्य यांची जाणीव निर्माण होते.

**११. भांडवल उभारणीस मदत होते :–**

सहकारी संस्थेचे लेखापरीक्षण केल्यामुळे सहकारी संस्थेची आर्थिक स्थिती किती बळकट आहे हे समजते व त्यानुसार भांडवल उभारणी करण्यास मदत होते.

**१२. संस्था नावलौकिकात भर :–**

सहकारी संस्थेचे लेखापरीक्षण केल्यामुळे त्या सहकारी संस्थेला योग्य दिशा व मार्गदर्शन मिळते. संस्थेचा कारभार व हिशेब योग्य असल्यास संस्थेची नावलौकिकता वाढते व त्यातून संस्थेच्या विकासाला गती प्राप्त होते.

त्याबरोबरच सहकारी अंकेक्षणामुळे राज्यातील सहकारी संस्थांची प्रगती योग्य दिशेने चालली आहे, याची खात्री सरकारला देता येते.

## ❑ सहकारी अंकेक्षणाचे दोष/तोटे :–

सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण करणे आवश्यक असते. कारण सहकारी संस्थांच्या व्यवहारावर नियंत्रण ठेवण्याचा अंकेक्षण हाच एकमेव मार्ग आहे. मात्र लेखापरीक्षणाच्या यंत्रणेत अंतर्गत व बाह्य असे काही दोष आहेत. ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१. लेखापरीक्षकावर कामाचा ताण :–**

लेखापरीक्षकाला विविध प्रकारची कामे करावी लागतात. त्यामध्ये नोंदणी, तपासणी, देखरेख इत्यादी यामुळे अंकेक्षणाकडे दुर्लक्ष होते.

**२. कर्मचारी वर्गाची कमतरता :–**

लेखापरीक्षणासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग असणे आवश्यक असते. पण अनेक संस्थाकडे अपुरा कर्मचारी वर्ग आहे. त्यामुळे अंकेक्षणात दोष निर्माण होतात.

**३. प्रमाणित कसोट्यांचा अभाव :–**

ज्या सहकारी संस्थाचे अंकेक्षण करण्यात आलेले आहे, त्यांचे वर्गीकरण करण्यासाठी समान कसोट्या नाहीत. देशातील विविध राज्यात विविध प्रकारच्या कसोट्या लावण्यात आलेल्या आहेत. अनिश्चित स्वरूपाच्या कसोट्या असल्यामुळे वर्गीकरण व्यक्तिनिष्ठ स्वरूपाचे बनले आहे. काही राज्यात तर सारख्याच दर्जाच्या संस्थांचे वर्गीकरण भिन्न-भिन्न गटात करण्यात आले आहे.

**४. सहकारी कायद्याचे अपुरे ज्ञान :-**

लेखापरीक्षक सहकारी संस्थेतील कर्मचारी यांना सहकारी कायद्याचे पुरेसे ज्ञान आवश्यक असते. पण काही कर्मचारी व लेखापरीक्षक यांना पुरेसे ज्ञान नसल्यामुळे लेखापरीक्षणात दोष निर्माण होतात.

**५. हिशेबपत्रकात दर्शविलेल्या उणिवा पूर्ततेचा अभाव :-**

लेखापरीक्षक सहकारी संस्थांचे अंकेक्षण करत असताना हिशेबपत्रकातील चुका, उणीवांची माहिती संस्थांना देत असतो. त्या उणीवांची पूर्तता करण्याची जबाबदारी सहकारी संस्थांची असते. पण सहकारी संस्था या बाबींकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे दर्शविलेल्या उणिवांची पूर्तता होत नाही.

**६. अंकेक्षकावरील मर्यादा :-**

सहकारी संस्थांचे लेखापरीक्षण नोंदणी अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शक सूचनांद्वारे होत असल्याने लेखापरीक्षक किंवा अंकेक्षक स्वत:चे मत स्पष्ट करू शकत नाही.

**७. हिशेब तपासणीतील अडचणी :-**

सहकारी संस्थेत हिशेब लिहिणाऱ्या व्यक्तीकडून बऱ्याचवेळा चुकीच्या व अपुऱ्या नोंदी होत असतात. त्यामुळे हिशेब तपासणी करणे अवघड होते.

**८. लेखापरीक्षकाची सहकारी खात्यापासून फारकत :-**

काही राज्यांमध्ये लेखापरीक्षणाचे काम सहकार खात्याकडून काढून घेऊन ते अर्थखात्याकडे सोपविण्यात आलेले आहे. परंतु या फारकतीमुळे सहकारी संस्थांच्या विकासावर अनिष्ठ परिणाम होईल. विकास कार्याची जबाबदारी पार पाडताना निबंधकाकडे नियंत्रणाचे अधिकार असले पाहिजेत. ही शिफारस मक्लेगन समितीने स्पष्ट केली आहे. यासाठी हिशेब तपासणी ही निबंधकांचीच वैधानिक जबाबदारी असली पाहिजे.

वरील प्रकारचे विविध दोष सहकारी अंकेक्षणात असल्यामुळे सहकारी संस्थांचे अंकेक्षण योग्यप्रमाणे होवू शकत नाही.

## ४.३ सारांश

भारतात सहकारी चळवळीचा इतिहास अनेक वर्षांचा आहे. या प्रदीर्श कालावधीत सहकारी चळवळीचा विस्तार अत्यंत वेगाने झालेला आहे. देशात पतपुरवठा व बिगर पतपुरवठा क्षेत्रात सहकारी चळवळीने आपले जाळे पसरले आहे. मात्र सहकारी चळवळीच्या संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक

विकासही होणे अत्यावश्यक आहे. यादृष्टीने सहकारी चळवळीला मार्गदर्शक पर्यवेक्षण व नियंत्रण या बाबी महत्त्वाच्या ठरतात. सहकारी हिशेब तपासणीही सहकारी चळवळीच्या गुणात्माक विकासास आवश्यक असणारी बाब आहे. अंकेक्षण हे सहकारी संस्थेचा कारभार कशा पध्दतीने सुरू आहे, त्यामध्ये काही उणिवा आहेत हे यासाठी आवश्यक आहे. अंकेक्षणात सहकारी संस्थांच्या हिशेबाचे काटेकोरपणे परीक्षण केले जाते.

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **अंकेक्षण :** सहकारी संस्था दैनंदिन कामकाज करीत असताना जे जमाखर्चाचे किंवा आर्थिक व्यवहार केले जातात. त्यांचे हिशेब, त्याचबरोबर इतर सर्व प्रकारची कागदपत्रे तपासून घेणे यास अंकेक्षण असे म्हणतात.

२. **निबंधक :** निबंधक हा सहकारी खात्यातील सर्वोच्च प्रशासकीय अधिकारी आहे. निबंधकास नोंदणी अधिकारी म्हणून ओळखले जाते.

३. **लेखापरीक्षक :** सहकारी संस्थेने लिहिलेले हिशेब तपासणीचे काम करणारा व्यक्ती म्हणजे लेखापरीक्षक होय.

४. **किर्दवही :** प्राथमिक नोंदीचे हिशेब पत्रक.

## ४.५ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

१. कायद्यानुसार होणाऱ्या अंकेक्षणास .................. अंकेक्षण असे म्हणतात.

*अ) वार्षिक* *ब) निरंतर* *क) सततचे* *ड) वैधानिक.*

२. लेखापरीक्षण अहवाल ................ सभेत वाचावा लागतो.

*अ) व्यवस्थापन समिती* *क) मासीक सभा*

*ब) सर्वसाधारण सभा* *ड) यापैकी नाही.*

३. सहकारी संस्थांचे आर्थिक वर्ष ................ रोजी संपते.

*अ) २८ फेब्रुवारी* *ब) ३१ मार्च* *क) ३० एप्रिल* *ड) ३१ मे.*

४. .............. हिशेब तपासणी सर्व सहकारी संस्थांवर सहकार कायद्यानुसार बंधनकारक असते.

*अ) वैधानिक* *ब) सातत्यपूर्ण* *क) अंतर्गत* *ड) मध्यावधी.*

५. हिशेब तपासणी हा शब्द .................. क्रियमधून निर्माण झाला.

*अ) ऐकणे* *ब) बोलणे* *क) लिहिणे* *ड) यापैकी नाही.*

६. सहकारी संस्थेचे सर्वांगीण कामकाज उत्तम असल्यास त्या संस्थेस हिशेब तपासणीस .............. वर्ग देणेत येतो.

*अ) 'ड' वर्ग* *ब) 'अ' वर्ग* *क) 'ब' वर्ग* *ड) 'क' वर्ग.*

## ४.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. *ड) वैधानिक.*

२. *ब) सर्वसाधारण सभा.*

३. *ब) ३१ मार्च.*

४. *अ) वैधानिक.*

५. *अ) ऐकणे.*

६. *ब) 'अ' वर्ग.*

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय

✡ **अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. सहकारी अंकेक्षण म्हणजे काय? त्याची आवश्यकता सांगा.

२. सहकारी अंकेक्षणाचा अर्थ सांगून त्याचे प्रकार स्पष्ट करा.

३. लेखा परीक्षकाची भूमिका स्पष्ट करा.

४. सहकारी अंकेक्षणातील गुण-दोष सांगा.

✡ **ब) टिपा लिहा.**

१. सहकारी अंकेक्षण आवश्यकता.

२. अंकेक्षणाचे प्रकार.

३. लेखापरीक्षक भूमिका.

४. सहकारी अंकेक्षणातील गुण.

५. सहकारी अंकेक्षणातील दोष.

## ४.८ संदर्भ पुस्तके

१. **प्रा. प्र. रा. कुलकर्णी** : *‘सहकाराची मूलतत्त्वे’.*

२. **टी. एस. जाधव** : *‘सहकारी संस्था रचना व कार्यपध्दती’.*

३. **डॉ. गो. स. कामत** : *‘सहकार तत्त्वे, व्यवहार आणि व्यवस्थापन’.*

४. **व्ही. टी. चौगुले, के. जी. पठाण** : *‘सहकारी मूलतत्त्वे’.*

✡✡✡

सत्र-४ : घटक-१

# भारतातील सहकारी पतपुरवठा रचना
## (Co-operative Credit Structure in India)

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

१.२.१ प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था : कार्ये व महत्त्व

१.२.२ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका : कार्ये व महत्त्व

१.२.३ राज्य सहकारी बँक : कार्ये व महत्त्व

१.२.४ नागरी सहकारी बँक : कार्ये व महत्त्व

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ सूची

## १.० उद्दिष्ट्ये (Objectives)

१. भारतातील सहकारी पतपुरवठ्याची रचना समजावून घेणे.

२. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या कार्याची माहिती घेणे.

३. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची कार्ये व महत्त्व समजून घेणे.

४. राज्य सहकारी बँकांच्या कार्यांची माहिती करून घेणे.

५. नागरी सहकारी बँकांच्या कार्यांची माहिती करून घेणे.


## १.१ प्रास्ताविक :

पतपुरवठ्याचे कार्य सहकारी तत्त्वावर करण्याचे कार्य करणाऱ्या संस्थांना किंवा बँकांना सहकारी पतपुरवठा संस्था किंवा सहकारी बँका असे म्हणतात. भारतात ब्रिटिश राजवटीत सहकारी चळवळीस किंवा सहकारी पतपुरवठा संस्थांच्या स्थापनेस सुरुवात झाली. ब्रिटिश राजवटीत भारतातील शेती व्यवसाय आणि खेड्यापाड्यातील लहान लहान उद्योग (कुटिर उद्योग, हस्तोद्योग इत्यादी) अक्षरश: मोडकळीस आले. ब्रिटिश राजकर्त्यांनी आपल्या मायदेशातील (इंग्लंडमधील) पक्का माल भारतात आणून विकण्यास सुरवात केली. त्यामुळे अनेक कारागिर बेरोजगार झाले. विविध कारणामुळे शेती व्यवसाय सुद्धा ब्रिटिश राजवटीत मोडकळीस आला होता. शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागिर हे सर्व घटक सावकार, दुकानदार, व्यापारी यांच्या कर्जाच्या पाशात अडकून पडले होते. ग्रामीण कर्जबाजारीपणा दिवसेंदिवस वाढत होता. शेतकऱ्यांना सावकारांच्या कर्जाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी ब्रिटिश सरकारने सन १८७९ साली Deccan Agriclutural Relif Act हा कायदा पास केला. १८८३ साली Land Improvement Act हा कायदा पास केला आणि १८८४ साली Agriculturalist Loan Act हा कायदा पास केला. अशा प्रकारे भारतीय शेतीची कर्जाची गरज भागविण्यासाठी आणि सावकारांचा प्रभाव कमी करण्यासाठी सरकारने वरीलप्रमाणे तीन कायदे पास केले आणि त्याची अंमलबजावणी करण्यास सुरवात केली. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांनीही शेतीला कर्जपुरवठा करण्यासाठी बँका स्थापन कराव्यात असा विचार मांडला होता. भारतीय शेतकऱ्यांची गरीबी, कर्जबाजारीपणा आणि असंतोष वाढू नये यासाठी १९०१ मध्ये ब्रिटिश सरकारने सर एडवर्ड लॉ यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून या समितीला शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्यासाठी कोणत्या प्रकारच्या संस्था स्थापन करता येतील याचा अभ्यास करण्यास सांगितले. त्याप्रमाणे या समितीने भारतीय शेतकऱ्यांच्या कर्जाच्या समस्येचा व गरजेचा अभ्यास केला आणि सरकारला आपला अहवाल सादर केला. एडवर्ड लॉ यांनी अहवालात केलेल्या शिफारशींचा विचार करून ब्रिटिश सरकारने सन १९०४ मध्ये सहकारी संस्था कायदा संमत केला. हा पहिला सहकारी कायदा होय. हा कायदा भारतीय शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण होता. कारण या कायद्याने देशभरात सहकारी तत्त्वावर पतपुरवठा करणाऱ्या संस्था स्थापन होण्यास सुरवात झाली. भारतात १९०४ पासून सहकारी पतपुरवठा चळवळीची सुरवात या कायद्याने झाली. म्हणून सहकारी पतपुरवठा चळवळीच्या इतिहासात या कायद्याला महत्त्वाचे स्थान आहे.

## १.२ विषय विवेचन :

भारतातील सहकारी पतपुरवठा संस्था आणि बँका शेतीला कर्जपुरवठा करतात. तसेच बिगर शेतीक्षेत्राला सुद्धा कर्जपुरवठा करतात. भारतातील सहकारी बँकिंग क्षेत्राकडून कृषी व बिगर कृषी क्षेत्राला अल्प, मध्यम आणि दीर्घमुदतीचा कर्जपुरवठा केला जातो. त्याची माहिती या भागात दिली आहे.

**भारतातील सहकारी पतपुरवठा संस्थांची रचना**




भारतातील शेतकऱ्यांना अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या कर्जाची गरज असते. त्याची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

**अ) अल्प मुदतीचे कर्ज** (Short Term Loan) **:**

अल्प मुदतीचे कर्ज शेतकऱ्यांना एक वर्षाच्या आत परत करावे लागते. कृषी उत्पादनांची विक्री केल्यानंतर शेतकरी त्या उत्पन्नातून कर्जाची परतफेड करतात. पेरणीपूर्व मशागत करण्यासाठी शेतकऱ्यांना कर्जाची (पैशाची) गरज लागते. नांगरण करणे, रोटर मारणे, सऱ्या पाडणे, बी-बियाणे खरेदी करणे, शेतीसाठी लागणारी खते, जंतुनाशके खरेदी करणे यासाठी शेतकऱ्यांना कर्जाची असते. या कर्जाची मुदत सहा महिने ते एक वर्ष असते. काही पिके सहा महिन्यात तयार होतात. पीकांची विक्री झाली की शेतकरी कर्ज परत करतात. या पीक कर्जाची परतफेडीची मुदत एक वर्षापर्यंत असल्यामुळे या कर्जास अल्प मुदतीचे कर्ज असे म्हणतात. अशी कर्जे शेतकऱ्यांना खूप गरजेची असतात. या कर्जाच्या सुविधेमुळे शेतकऱ्यांची शेतीची कामे खोळंबत नाहीत.

**ब) मध्यम मुदतीचे कर्ज** (Medium Term Loan) **:**

शेतकऱ्यांना अल्पमुदतीच्या कर्जाबरोबर मध्यम मुदतीच्या कर्जाची सुद्धा गरज असते. मध्यम मुदतीच्या कर्जाची मुदत एक ते पाच वर्ष एवढी असते. शेतकऱ्यांना शेतीच्या कामासाठी आवश्यक असणारी जनावरे खरेदी करण्यासाठी मध्यम मुदतीच्या कर्जाची गरज असते. शेती करण्यासाठी लागणारी अवजारे (नांगर, कुळव इत्यादी) खरेदी करणे, शेतात विहीर खुदाई करणे, शेतीची बांधबंदिस्ती करणे, शेतजमिनीचे सपाटीकरण करणे या कारणासाठी शेतकरी कर्ज घेतात. या कर्जाची परतफेड करण्याचा कालावधी पाच वर्षापर्यंत असतो. म्हणून या कर्जाला मध्यम मुदतीचे कर्ज असे म्हणतात.


**क) दीर्घ मुदतीचे कर्ज** (Long Term Loan) **:**

या कर्जाची मुदत जास्त असते. या कर्जाची मुदत पाच वर्षापासून पंचवीस वर्षापर्यंत असते. म्हणून या शेती कर्जांना दीर्घ मुदतीची कर्जे असे म्हणतात. नवीन शेतजमीन खरेदी करणे, ट्रॅक्टरसारखी यांत्रिक अवजारे खरेदी करणे, फळबागा विकसित करणे इत्यादीसाठी मोठ्या रकमेची कर्जाची गरज असते. ही गरज सहकारी पतपुरवठा यंत्रणेकडून सहकारी बँकिंग क्षेत्राकडून भागवली जाते.

**सारांश:** अशाप्रकारे भारतीय शेतकऱ्यांना वर स्पष्ट केल्याप्रमाणे अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीच्या कर्जाची गरज असते. शेतकऱ्यांना अल्प आणि मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा राज्य सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक आणि प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांकडून केला जातो. तर दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा राज्य सहकारी भूविकास बँक आणि प्राथमिक भूविकास बँकांकडून केला जातो. भारतात सहकारी पतपुरवठा यंत्रणेला शेतकऱ्यांची कर्जाची गरज भागवता यावी यासाठी राज्य सरकार (State Government), रिझर्व्ह बँक (Reserve Bank of India), आणि नाबार्ड (National Bank for Agriculture and Rular Development-NABARD- राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक) यांच्याकडून राज्य सहकारी बँकांना कर्ज पुरवठा केला जातो. राज्य सहकारी बँका जिल्हा सहकारी बँकांना कर्जपुरवठा करतात. जिल्हा सहकारी बँका प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना कर्जपुरवठा करतात आणि प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था खेड्यातील शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करतात.

प्रत्येक राज्यात एक याप्रमाणे राज्य सहकारी बँका स्थापन झाल्या असून राज्य सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण राज्य असते. जिल्हा सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण जिल्हा हे असते. जिल्हा सहकारी बँकांना जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक असेही म्हणतात. कारण सहकारी पतपुरवठा रचनेत या बँकांचे स्थान मध्यवर्ती ठिकाणी आहे. खेड्याच्या पातळीवर काम करणाऱ्या सहकारी कृषी पतपुरवठा संस्थांना प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था असे म्हणतात. अशाप्रकारे प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था, जिल्हा सहकारी बँका आणि राज्य सहकारी बँकाकडून शेतकऱ्यांना अल्प आणि मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा केला जातो. भारतातील अल्प आणि मध्यम मुदतीच्या पतपुरवठ्याची रचना ही त्रिस्तरीय असून ती पिरॅमिडसारखी आहे. सर्वात वरच्या पातळीवर राज्य सहकारी बँक आहे. म्हणून तिला शिखर बँक (Apex Bank) असे म्हणतात. मधल्या स्तरावर

जिल्हा सहकारी बँक आहे. म्हणून तिला मध्यवर्ती बँक/केंद्रिय बँक (Central Bank) असे म्हणतात. तर गावपातळीवर प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था कार्य करतात. पुढील आकृतीत अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करणाऱ्या सहकारी पतपुरवठा संस्थांची रचना दर्शविली आहे.




### १.२.१ प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था :
### (Primary Agricultural Co-operative Credit Societies-PACCS) :

**प्रास्ताविक:**

गावपातळीवर पतपुरवठ्याचे कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांना प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था असे म्हणतात. या संस्था शेतकरी सभासदांना शेती व्यवसायासाठी कर्जपुरवठा करतात. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थेची एक सर्वसाधारण व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''खेड्यातील शेतकरी सभासदांना कर्जपुरवठ्याच्या सोयीबरोबर त्यांच्या ठेवी स्वीकारणे, त्यांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे, शेतमाल साठवणुकीची सुविधा पुरवणे इत्यादी कार्ये करणाऱ्या गावपातळीवरील कृषी सहकारी पतपुरवठा संस्थेस प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था असे म्हणतात.''**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थेची आणखी एक व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''खेड्यातील शेतकरी, शेतमजूर, कारागीर यांनी स्थापन केलेल्या सहकारी पतपुरवठा संस्थेस प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था असे म्हणतात.''**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था पतपुरवठ्याबरोर शेतकऱ्यांच्या कृषीविषयक इतरही गरजा भागवण्याचे काम करतात. म्हणून या पतपुरवठा संस्थांना विविध कार्यकारी सहकारी संस्था (विकास सोसायट्या) असेही म्हणतात. किंवा बहुविध कृषी सहकारी संस्था असे म्हणतात. १९०४ च्या कायद्याने भारतात प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन होतात. सुरवातीला या संस्था शेतकऱ्यांना केवळ पतपुरवठा करण्याचेच काम करत होत्या. जागतिक महामंदीच्या तडाख्यात या संस्था तोट्यात गेल्या. थकबाकीचे प्रमाण प्रचंड वाढले. शेतकऱ्यांना पतपुरवठ्याबरोबर बी-बियाणे, खते, अवजारे यांचीही गरज असल्याने रिझर्व्ह बँकने बहुउद्देशीय सहकारी संस्थांची गरज व्यक्त केली. त्यानुसार १९४५ नंतर भारतात बहुउद्देशीय सहकारी संस्था

स्थापन होण्यास सुरवात झाली. त्यानंतर जवाहरलाल नेहरु, वैकुंठलाल मेहता समिती, राष्ट्रीय विकास मंडळ यांनी सेवा सहकारी संस्थांचा पुरस्कार केला.

**प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे स्वरूप:**

भारतातील खेड्यापाड्यात काम करणाऱ्या प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे स्वरूप खालील मुद्यांच्या साहाय्याने थोडक्यात स्पष्ट केले आहे.

**१) खुले सभासदत्व :**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे सभासदत्व खेड्यातील सर्वांसाठी खुले असते. परंतु खेड्यातील व्यापारी, सावकार सभासद होऊ शकत नाहीत. शेतकरी, शेतमजूर, कारागीर संस्थेचे सभासद होऊ शकतात. खेड्यातील किमान १० लोक एकत्र येऊन अशा प्रकारची सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन करू शकतात. परंतु हे १० लोक एकाच कुटुंबातील असून चालत नाहीत. तर ते वेगवेगळ्या कुटुंबातील असावे लागतात. संस्थेचे सर्व सभासद एकाच कुटुंबातील असतील तर सहकारी तत्त्वाला बाधा येते. म्हणून हा नियम करण्यास आला आहे. अशाप्रकारे एखाद्या गावातील वेगवेगळ्या कुटुंबातील किमान १० किंवा त्यापेक्षा अधिक शेतकरी, कारागीर एकत्र येऊन सहकारी कृषी पतपुरवठा संस्था स्थापन करू शकतात.

**कार्यक्षेत्र :**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थेचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने एक गाव किंवा एक खेडेगाव असते. परंतु एखादे खेडेगाव खूपच लहान असेल तर त्या खेड्यात अशी पतपुरवठा संस्था स्थापन होऊ शकत नाही. म्हणून तीन चार खेड्यासाठी मिळून एक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन केली जाते. लहान खेड्यातील शेतकरी आजूबाजूच्या तीन चार मैलांच्या परिसरातील एखाद्या कृषी पतपुरवठा संस्थेचे सभासद होऊ शकतात. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थां अर्थक्षम बनाव्यात यासाठी सरकारने किमान ६०० ग्रामीण कुटुंबामागे एक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था असावी असे निश्चित केले आहे.

**व्यवस्थापन :**

भारतात लोकशाही असल्याने प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचा सर्व कारभार लोकशाही तत्त्वानुसार चालतो. संचालक मंडळ संस्थेचा कारभार पाहते. सर्व सभासद निवडणुकीच्या माध्यमातून संचालकांची निवड करतात. हे संचालक आपल्यापैकी एकाची चेअरमन आणि व्हाईस चेअरमन म्हणून निवड करतात. महिन्यातून एकदा संचालक मंडळाची सभा होते. तर सर्वसाधारण सभा वर्षातून एकदा होते. सर्व सभासदांना या सभेत हजर राहण्याचा, बोलण्याचा किंवा आपली मते मांडण्याचा अधिकार असतो. सर्वसाधारण सभा ही अत्यंत महत्त्वाची असते. या सभेत अनेक महत्त्वाचे ठराव मांडले जातात. त्या ठरावांची अंमलबजावणी करण्याचे काम संचालक करतात. संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी सचिव, क्लार्क, शिपाई इत्यादी कर्मचारी असतात.

**भांडवल उभारणी :**

संस्था कोणतीही असो खाजगी किंवा सरकारी, ती आर्थिकदृष्ट्या मजबूत असावी लागते. त्यासाठी संस्था विविध मार्गांनी भांडवल (पैसा) गोळा करण्याचा प्रयत्न करत असतात. प्रवेश फी, शेअर्सची विक्री, ठेवी गोळा करणे या मार्गांनी संस्था भांडवलाची उभारणी करतात. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था सभासदाकडून प्रवेश फी घेतात. शेअर्स (भाग भांडवल) सभासदांना विकतात. शेअर्सना मराठीत भाग किंवा भाग भांडवल असे म्हणतात. कृषी पतपुरवठा संस्थांच्या शेअर्सची किंमत गरीब लोकांना परवडेल एवढी असते. त्यामुळे खेड्यातील सर्व लोक कृषी पतपुरवठा संस्थांचे सभासद होऊ शकतात. शेतकऱ्यांबरोबर जिल्हा सहकारी बँकांनासुद्धा या पतपुरवठा संस्था शेअर्सची विक्री करतात. तसेच सभासद आणि बिगर सभासदाकडून या संस्था ठेवी गोळा करतात. अशाप्रकारे प्रवेश फी, शेअर्सची विक्री, ठेवी गोळा करणे या विविध मार्गांनी खेड्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था भांडवल उभारणी करतात.

**प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे उद्देश आणि कार्ये :**

भारतातील खेड्यापाड्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे आहेत.

१) शेतकऱ्यांच्या अल्प आणि मध्यम मुदतीच्या कर्जाची गरज भागवणे

२) शेतकऱ्यांना सावकारांच्या दारात जावे लागणार नाही अशा प्रकारे कार्य करणे. शेतकऱ्यांची सावकारांच्या पाशातून मुक्तता करणे.

३) शेतकऱ्यांना खते, बियाणे, अवजारे यांचा पुरवठा करणे

४) शेतकरी सभासदांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे

५) शेतकऱ्यांना विपणनविषयक सुविधा पुरवणे

६) ग्रामीण भागातील ठेवी गोळा करणे. लोकांना बचतीची सवय लावणे.

७) सभासदांना सहकाराचे महत्त्व पटवून देणे. सहकाराचे शिक्षण देणे

८) शेती विकासासाठी (शेतीची उत्पादकता वाढावी यासाठी) शेतकऱ्यांना मदत करणे, सल्ला देणे, प्रोत्साहन देणे, तांत्रिक सल्ला देणे इत्यादी कार्ये करणे.

९) शेतकऱ्यांनी दिलेल्या कर्जाचा योग्य वापर करावा यासाठी त्यांना सहकार्य करणे. शेतकरी कर्जाचा दुरुपयोग करणार नाहीत याची काळजी घेणे.

१०) ग्रामीण विकासास हातभार लावणे.

११) शेतकऱ्यांना सेंद्रिय खते तयार करण्यास मदत करणे.

१२) शेतकऱ्यांना पुरेसा कर्जपुरवठा करता यावा यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून कर्ज घेणे

१३) शेतकऱ्यांचा शेतमाल प्रक्रिया संस्थांना विकणे किंवा प्रक्रिया करण्यासाठी माल पाठवणे.

१४) शेतकऱ्यांनी व्यापाऱ्यांना किंवा खरेदी-विक्री संस्थांना विकलेल्या मालाची किंमत वसूल करणे आणि ती शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करणे.

१५) बी-बियाणे तयार करणे, शेतकऱ्यांना बियाणांचे वाटप करणे.

**प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे महत्त्व/फायदे :**

गावपातळीवर/खेड्याच्या पातळीवर प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था काम करतात. सन १९०४ पासून या संस्था ग्रामीण भागात काम करत आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने या संस्थांना मोठी मदत केली आहे. आजही सरकार या संस्थांना मदत करत आहे. भारत सरकारने कृषी आणि ग्रामीण विकासाची मोठी आणि महत्त्वपूर्ण जबाबदारी या संस्थांवर टाकली आहे. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे महत्त्व किंवा फायदे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) कर्जाची सुविधा :**

शेतकऱ्यांना बी-बियाणे, अवजारे, खते विकत घेण्यासाठी पैशाची गरज भासते. या कर्जाची सुविधा खेड्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था शेतकऱ्यांना उपलब्ध करून देतात. त्यामुळे पेरणीपूर्वी मशागत करणे, पेरणी करणे, मजुरी देणे इत्यादी कामे शेतकऱ्यांना वेळेत पूर्ण करता येतात.

**२) कमी व्याजदरात कर्जपुरवठा :**

शेतकऱ्यांना कमी व्याज दरात किंवा परवडणाऱ्या व्याज दरात कर्जपुरवठा करण्याचे धोरण प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांनी पहिल्यापासूनच स्वीकारले आहे. शेतकऱ्यांना कमी व्याजात कर्जपुरवठा करण्यासाठीच सरकारने या संस्थांची स्थापना देशभर केली आहे. सावकार, दुकानदार, नातेवाईक, व्यापारी यांच्यापेक्षा कमी व्याजाने प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांकडून शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला जातो. कृषी पतपुरवठा संस्थांचे हे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आणि शेतकऱ्यांच्या हिताचे आहे.

**३) सावकारांचा प्रभाव कमी होण्यास मदत :**

भारतात ब्रिटिश राजवटीत सावकारांचे प्रस्थ फार वाढले होते. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर कर्जासाठी सावकारावरच अवलंबून होते. परंतु सावकारांचे कर्जावरील व्याजाचे दर खूप जास्त होते. तसेच काही सावकार लोक लबाडी करत असत. कर्जदार शेतकरी, शेतमजूर यांना फसवत असतात. कर्ज देताना गोड बोलत असत. परंतु कर्ज वसुली अमानवी पद्धतीने करत असत. जनावरे, घरे जप्त करत असत. सावकारांच्या या जुलमाला पायबंद घालण्यासाठी ब्रिटिश सरकारने १९०४ पासून भारतभर सहकारी तत्त्वावर खेड्यापाड्यात कृषी पतपुरवठा संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. यामुळे शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागीर यांना

कर्जासाठी सावकारावर अवलंबून राहण्याची गरज उरली नाही. खेड्यापाड्यात कृषी पतपुरवठा संस्था स्थापन झाल्यामुळे सावकारांनी आपल्या कार्यपद्धतीत बदल केले असून आता ते जुलूम करत नाहीत. अशाप्रकारे गावपातळीवर देशभर कृषी सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन झाल्यामुळे शेतकऱ्यावर अन्याय करणाऱ्या आणि शेती विकासात अडसर ठरलेल्या सावकारांचा प्रभाव कमी होण्यास मदत होत आहे. हा प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचा महत्त्वाचा फायदा आहे.

**४) बचतीची सवय :**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या स्थापनेमुळे ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण कारागीर यांना बचत करण्याची चांगली आणि विश्वासार्ह सुविधा सरकारने उपलब्ध करून दिली आहे. यामुळे ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर, कारागीर कृषी पतपुरवठा संस्थेत बचत करत आहेत. या बचतीवर (ठेवीवर) पतपुरवठा संस्थांकडून आकर्षक व्याज दिले जाते. त्यामुळे प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या ठेवीमध्ये दिवसेंदिवस वाढ घडून येत आहे.

**५) कृषी आदानांचा पुरवठा :**

खते, बी-बियाणे, अवजारे, जंतुनाशके, कीटकनाशके यांना शेतकी आदाने (Agricultural Inputs) असे म्हणतात. या आदानावर उत्पादनाचे प्रमाण अवलंबून असते. खेडेगावातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था शेतकऱ्यांना केवळ कर्जपुरवठा करत नाहीत. तर वर उल्लेख केलेली शेतकी आदाने सुद्धा शेतकऱ्यांना पुरवतात. ही कृषी आदाने खुल्या बाजारापेक्षा कमी किंमतीला शेतकऱ्यांना दिली जातात. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत नाही.

**६) शेतमाल साठवणुकीची सुविधा :**

पीक तयार झाल्यानंतर लगेच विक्रीसाठी बाजारात आणले तर कृषी मालाचा पुरवठा वाढून किंमती कमी होतात. म्हणून शेतमालाला चांगली किंमत येईपर्यंत शेतमाल गुदामामध्ये साठवून ठेवावा लागतो. परंतु भारतातील बहुसंख्य शेतकरी गरीब आहेत. त्यामुळे ते माल साठवणुकीची सुविधा करू शकत नाहीत. परंतु प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांकडे गुदामांची सुविधा असते. राज्य सरकार, नाफेड यांच्या मदतीने तसेच राज्य सहकारी बँकेच्या मदतीने प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था गुदामांची, शीतगृहांची सुविधा उपलब्ध करून देतात. त्याचा फायदा शेतकऱ्यांना होत आहे. कृषी पतपुरवठा संस्थांच्या स्थापनेमुळे गुदामांच्या संख्येत आणि साठवण क्षमतेत वाढ होत आहे. कृषी पतपुरवठा संस्थांचा हा महत्त्वपूर्ण फायदा शेतकऱ्यांना मिळत आहे. म्हणून जिथे जिथे आवश्यकता आहे त्या त्या ठिकाणी अशा प्रकारच्या कृषी पतपुरवठा संस्था स्थापन होणे आवश्यक आहे.

**७) पीक तारण कर्जाची सुविधा :**

भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था या शेतकऱ्यांना पीक तारण कर्जाची सुविधासुद्धा

उपलब्ध करून देतात. शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाच्या तारणावर या संस्था कर्ज देतात. या कर्जाची परतफेड पीक तयार झाल्यानंतर त्याच्या विक्रीतून केली जाते. पीक तारण कर्ज घेणारे शेतकरी आपला कृषी माल कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या मार्फत विकतात. त्यामुळे संस्थेचे संपूर्ण कर्ज वसूल होते. संस्थेचे कर्ज बुडत नाही.

**८) जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा :**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे या संस्था शेतकऱ्यांना केवळ कर्जपुरवठा करत नाहीत तर शेतकऱ्यांना काही उपभोग्य (जीवनावश्यक) वस्तूंचाही पुरवठा करतात. डाळी, साखर, कापड, अन्नधान्य अशा जीवनावश्यक वस्तूंचाही पुरवठा करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना या संस्था महत्त्वाच्या आणि आपल्या वाटतात.

**९) शेतमालाच्या विक्रीस मदत :**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्थामार्फत शेतकऱ्यांचा शेतमाल विकून देतात. शेतमालाच्या विक्रीस या संस्था मदत करतात. त्यामुळे शेतकऱ्यांना आपला माल खाजगी बाजार व्यवस्थेला कमी किंमतीत विकावा लागत नाही. सहकारी खरेदी-विक्री संस्थामार्फत माल विकता आल्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालास चांगली (योग्य) किंमत मिळते.

**१०) सहकारविषयक शिक्षण :**

खेड्यापाड्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था आपल्या सभासद शेतकऱ्यांना विविध माध्यमातून सहकारविषयक शिक्षण देतात. शेतकऱ्यांना सहकाराची गोडी लागल्याशिवाय, शेतकऱ्यांना सहकाराचे महत्त्व पटल्याशिवाय शेतकरी कृषी पतपुरवठा संस्थांचे सभासद होणार नाहीत आणि या संस्थांचे विविध लाभ घेणार नाहीत. म्हणून या संस्था केवळ कर्जपुरवठा करत नाहीत तर सभासद शेतकऱ्यांच्या मनावर सहकाराचे महत्त्व बिंबवण्याचा प्रयत्न करतात.

**११) शेतीच्या विकासास मदत :**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था आणखी एक महत्त्वपूर्ण कार्य करतात आणि ते म्हणजे या संस्था शेती विकासाला चालना देण्याचे कार्य करतात. भारतीय शेतीची उत्पादकता स्वातंत्र्योत्तर काळात वाढली आहे. परंतु विकसित राष्ट्रांच्या तुलनेत शेतीची उत्पादकता अजूनही कमी आहे. शेतीची उत्पादकता वाढली तर कृषी उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही लक्षणीय वाढ होणार आहे. कृषी पतपुरवठा संस्था शेतीची उत्पादकता वाढावी यासाठी शेतकऱ्यांना केवळ आधुनिक अवजारे किंवा यंत्रे देत नाहीत तर तांत्रिक सल्ला सुद्धा देतात. कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देतात. त्याचा फायदा कृषी विकासासाठी होत आहे.

**१२) दारिद्र्य निर्मूलनास हातभार :**

भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मूलनास मदत करत

आहेत. भारतात आजही सुमारे २० ते २५% लोक दरिद्री किंवा गरीब आहेत. बिनकिफायतशीर शेती, कर्जासाठी सावकारावर अवलंबून रहावे लागणे, शेतमालास मिळणारी कमी किंमत ही शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची प्रमुख कारणे आहेत. परंतु प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतकऱ्यांना कमी व्याजात कर्जपुरवठा करतात. त्यामुळे त्यांना सावकार, दुकानदार, व्यापारी यांच्याकडून भरमसाठ व्याजाने कर्ज घ्यावे लागत नाही. तसेच या संस्था शेतकऱ्यांना चांगला (योग्य) भाव मिळवून देतात. शेतीची उत्पादकता वाढावी यासाठी मदत करतात. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होत असून शेतकऱ्यामधील दारिद्र्याचे प्रमाण कमी होण्यास मदत होत आहे.

**१३) कर्जाच्या वापराकडे लक्ष :**

प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था शेतकऱ्यांच्यादृष्टीने आणि संस्थेच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचे काम करतात आणि ते म्हणजे या संस्था सभासद शेतकऱ्यांना केवळ कर्जपुरवठा करून थांबत नाहीत तर दिलेल्या कर्जाचा शेतकरी योग्य वापर करतात की नाही याची पाहणी करण्याचे कामसुद्धा या संस्था करत असतात. ज्या कारणासाठी कर्ज घेतले आहे त्या कारणासाठीच शेतकरी कर्जाची रक्कम खर्च करत आहेत का तेही पाहण्याचे काम कृषी पतपुरवठा संस्था करतात. त्यामुळे शेतकऱ्यांकडून कर्जाचा दुरुपयोग होत नाही. कर्जाचा योग्य त्या कामासाठीच वापर होतो. त्यामुळे शेतकऱ्यांचाही फायदा होतो आणि प्राथमिक कृषी पुतपुरवठा संस्थांचाही फायदा होतो.

**१४) अल्पभूधारक शेतकरी, सीमांत शेतकऱ्यांकडे विशेष लक्ष :**

भारतात अल्पभूधारक शेतकरी, सीमांत शेतकरी यांचे प्रमाण सुमारे ८०% एवढे आहे. सधन किंवा मोठ्या शेतकऱ्यांचे प्रमाण २०% आहे. या मोठ्या शेतकऱ्यांना कर्ज मिळवताना फारशा अडचणी येत नाहीत. परंतु अल्पभूधारक आणि सीमांत शेतकऱ्यांना अल्प आणि मध्यम मुदतीच्या कर्जाची खूप गरज असते. कर्जपुरवठा करताना कृषी पतपुरवठा संस्थांनी गरीब शेतकऱ्यांकडे आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे विशेष लक्ष द्यावे अशी भूमिका सरकारने घेतली आहे. त्याचा फायदा या शेतकऱ्यांना होत आहे.

**१५) कृषी पूरक व्यवसायांचा विकास :**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था पशुपालन (दुग्ध व्यवसाय), कुक्कुटपालन, गांडूळ खत निर्मिती प्रकल्प इत्यादी व्यवसायांना सुद्धा कर्जपुरवठा करत असतात. त्यामुळे ग्रामीण भागात या कृषी पूरक व्यवसायांची वाढ आणि विकास होण्यास मदत होत आहे. हा कृषी पतपुरवठा संस्थांचा अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**१६) सरकारी योजनांच्या अंमलबजावणीस मदत :**

भारतात राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडून ग्रामीण भागाच्या विकासासाठी अनेक योजना राबवल्या जातात. या योजनांची अंमलबजावणी गावपातळीवर काम करणाऱ्या प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या मार्फत केली जाते. अशा प्रकारे ग्रामीण भागाच्या विकासासाठी सरकारकडून या संस्थांचे सहाय्य घेतले जाते. या संस्था सरकारला सर्व प्रकारची मदत करतात.

**सारांश :** अशा प्रकारे भारताच्या ग्रामीण भागातील खेड्यापाड्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था वरीलप्रमाणे विविध कार्ये करतात. या संस्थांच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांचे दारिद्र्य नष्ट होत आहे. शेतकऱ्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावत आहे. कृषी आणि ग्रामीण विकासास हातभार लागत आहे. कृषी पतपुरवठा संस्थामुळे ग्रामीण भागातील सावकारांचा वरचष्मा कमी होण्यास मदत होत आहे. या संस्थांमुळे भारतात सहकारी चळवळ मजबूत होण्यास मदत होत आहे. हे प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे फायदे आहेत.

**प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे दोष / समस्या / अडचणी :**

भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था कृषी आणि ग्रामीण विकासाच्यादृष्टीने महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. या संस्थांची आजही गरज आहे. भविष्यातही या संस्थांची आवश्यकता भासणार आहे. परंतु या संस्थांच्या कार्यपद्धतीत काही दोष आहेत. तसेच या संस्थांना काही समस्या किंवा अडचणी भेडसावतात. कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना भेडसावणाऱ्या अडचणी, समस्या आणि दोष यांचे स्पष्टीकरण थोडक्यात खालीलप्रमाणे दिले आहे.

**१) थकबाकीची समस्या :**

भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना भेडसावणारी महत्त्वाची समस्या म्हणजे या संस्थांची थकबाकी प्रचंड आहे. विविध कारणामुळे कर्जदार शेतकरी कर्जाची परतफेड वेळेवर करत नाहीत. सरकारने कर्जमाफी दिली तर आपले नुकसान होईल असे बहुसंख्य शेतकऱ्यांना वाटते. सरकारने आतापर्यंत काही वेळा शेतकऱ्यांची कर्जमाफी केली आहे. इथून पुढेही कर्जमाफी मिळावी किंवा मिळेल असे शेतकऱ्यांना वाटते. त्यामुळे बहुसंख्य शेतकरी कर्जाची परतफेड करत नाहीत. त्यामुळे कृषी पतपुरवठा संस्थांची थकबाकी वाढत जाते. वर नमूद केलेल्या कारणाव्यतिरिक्त कर्जाचा दुरुपयोग, नैसर्गिक आपत्ती या कारणामुळे सुद्धा बहुसंख्य शेतकरी वेळेत कर्जाची परतफेड करू शकत नाहीत. त्यामुळे थकबाकीच्या समस्येला कृषी पतपुरवठा संस्थांना तोंड द्यावे लागते. या संस्था शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करतात. परंतु वरती नमूद केलेल्या विविध कारणामुळे या संस्थांची कर्जवसुली १०० टक्के होत नाही.

**२) भांडवलाची समस्या :**

भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना भेडसावणारी आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे या संस्थांना भांडवलाची चणचण जाणवते. या संस्थांना प्रवेश फी, ठेवी गोळा करणे, शेअर्सची (भागभांडवलाची विक्री करणे) या मार्गांनी भांडवल गोळा करता येते. परंतु या मार्गांनी फारसे भांडवल गोळा होत नाही. या संस्थांची सभासद प्रवेश फी खूपच कमी असते. तसेच ठेवी पुरेशा प्रमाणात गोळा होत नाहीत. मोठे (सधन) शेतकरी राष्ट्रीयीकृत (सरकारी) बँकेत ठेवी ठेवतात. परंतु सहकारी बँकेत किंवा सहकारी कृषी पतपुरवठा संस्थामध्ये ठेवी ठेवत नाहीत. ठेवी बुडण्याची किंवा संस्था बुडण्याची भीती त्यांना वाटते. त्यामुळे कृषी पतपुरवठा संस्थांना पुरेशा प्रमाणात ठेवी गोळा करता येत नाहीत. त्यामुळे कृषी पतपुरवठा संस्थांना नेहमीच भांडवलाची समस्या जाणवते.

**३) असमान विकास :**

भारतात ब्रिटिशांची राजवट असल्यापासून १९०४ पासून खेड्यापाड्यात प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था काम करत आहेत. परंतु सर्व राज्यात या संस्थांचा सारखा विकास झालेला नाही. महाराष्ट्र, गुजराथ, पंजाब, तामिळनाडू या राज्यात या संस्थांनी चांगली प्रगती केली आहे. परंतु आसामसारख्या ईशान्य पूर्वेकडील राज्यात या संस्थांची संख्या खूपच कमी आहे. बिहारमध्येही हीच परिस्थिती आहे. भारतातील मोजक्या राज्यात कृषी पतपुरवठा संस्थांची संस्थात्मक प्रगती चांगली आहे. इतर राज्यात या संस्था संख्येने खूप थोड्या आहेत. अशा प्रकारे कृषी पतपुरवठा संस्थांचा सर्व राज्यात सारखा विकास झालेला नाही. या संस्थांचा असमतोल किंवा असमान विकास झाला आहे. कर्जपुरवठ्याच्या बाबतीत सुद्धा तीच गत आहे. काही राज्यात या संस्थांनी कृषी क्षेत्राला चांगला कर्जपुरवठा केला आहे. तर काही राज्यात या संस्थांकडून कृषी क्षेत्राला गरजेपेक्षा कमी कर्जपुरवठा झाला आहे.

**४) राजकारणाचा, गटबाजीचा शिरकाव :**

निवडणुकांच्या माध्यमातून कृषी पतपुरवठा संस्थांचे संचालक निवडले जातात. काही राजकीय पक्षसुद्धा पतपुरवठा संस्थांच्या निवडणुकीत भाग घेतात. त्यामुळे संस्थांच्या कामकाजात राजकारण शिरते. गटबाजीला उत येतो. भारतातील अनेक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था या गलिच्छ राजकारणाने आणि गटबाजीने ग्रासलेल्या आहेत. हा एक अत्यंत महत्त्वाचा दोष कृषी पतपुरवठा संस्थांचा सांगता येईल.

**५) मोठ्या शेतकऱ्यांचे वर्चस्व :**

प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांचा आणखी एक दोष म्हणजे या संस्थावर संख्येने मुठभर असलेल्या मोठ्या / सधन शेतकऱ्यांचे वर्चस्व असलेले दिसते. गरीब / लहान / सीमांत शेतकरी निवडणुका खर्चिक असल्याने निवडणुका लढवत नाहीत. त्यामुळे कृषी पतपुरवठा संस्थावर मोठ्या शेतकऱ्यांचेच वर्चस्व असल्याचे दिसते. त्यामुळे त्यांना अनुकूल ठरतील असेच निर्णय घेतले जातात.

**६) कर्ज वाटपास विलंब :**

प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांचा महत्त्वाचा दोष म्हणजे या संस्थांकडून कर्जवाटपास उशीर होतो. कर्ज मिळण्यास विलंब होत असल्याने काही शेतकरी नातेवाईक, दुकानदार, सावकार यांच्याकडून चढ्या व्याजाने कर्ज काढतात आणि कर्जाच्या विळख्यात अडकून पडतात.

**७) भ्रष्टाचाराची समस्या :**

प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांना भेडसावणारी आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे भ्रष्टाचाराची समस्या. काही नोकर, काही संचालक यांच्याकडून आर्थिक भ्रष्टाचार होतो. नोकरभरतीत भ्रष्टाचार होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. त्यामुळे सहकारी पतपुरवठा चळवळ बदनाम होत आहे.

**८) अनुत्पादक (उपभोग्य) कर्जे न मिळणे :**

प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था प्रामुख्याने शेती विकासासाठी, कृषी पूरक व्यवसायासाठी कर्जपुरवठा करतात. म्हणजे उत्पादक कामासाठी कर्जपुरवठा करतात. परंतु शेतकऱ्यांना अनुत्पादक कामासाठीसुद्धा कर्जाची गरज असते. धार्मिक कार्य, मुला-मुलींची लग्ने, घर दुरुस्ती यासाठी शेतकऱ्यांना कर्जाची गरज असते. ही गरज प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था भागवत नाहीत. त्यामुळे या कारणासाठी शेतकऱ्यांना सावकारांच्या दारात जाऊन उभे राहावे लागते.

**९) सभासदांच्या कर्जवापराकडे लक्ष नसणे :**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या कार्यपद्धतीतील आणखी एक दोष म्हणजे अनेक कृषी पतपुरवठा संस्था सभासदांनी घेतलेल्या कर्जाच्या वापराकडे लक्ष देत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांकडून कर्जाचा योग्य (उत्पादक कामासाठी) वापर होत नाही. त्यामुळे शेतकरी वेळेत कर्जफेड करू शकत नाहीत. शेतकऱ्यांकडून केला जाणारा कर्जाचा अयोग्य / चुकीचा वापर हे कृषी पतपुरवठा संस्थांच्या थकबाकीचे प्रमुख कारण आहे. कर्जाच्या अयोग्य वापरामुळे संस्थेचेही हित होत नाही आणि शेतकऱ्यांचेही हित होत नाही.

**१०) निष्क्रिय संस्था :**

भारतातील हजारो प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था ह्या निष्क्रिय आहेत. सक्रिय नाहीत. या संस्थांचे अस्तित्व केवळ कागदोपत्रीच आहे. या संस्थांचा सभासद शेतकऱ्यांना लाभ होत नाही.

**११) पर्यवेक्षणाचा अभाव :**

कृषी पतपुरवठा संस्थांनी चांगले आणि कार्यक्षमतेने काम करावे यासाठी त्यांचे सतत / नियमित पर्यवेक्षण होणे आवश्यक असते. परंतु सर्वच संस्थांचे असे नियमित पर्यवेक्षण किंवा देखरेख होत नाही. पर्यवेक्षण आणि देखरेख सुविधेची कमतरता आहे. त्यामुळे काही कृषी पतपुरवठा संस्थांचे नियमित पर्यवेक्षण होत नाही.

**१२) अकार्यक्षम व्यवस्थापन :**

भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचा आढळून येणारा आणखी एक दोष म्हणजे अनेक संस्थांचे व्यवस्थापन कार्यक्षम नाही. संस्थेचे काम करणारे काही कर्मचारी अपात्र किंवा अप्रशिक्षित आहेत. या संस्था चांगले, तज्ज्ञ व्यवस्थापक नेमू शकत नाहीत. कारण त्यांना चांगला पगार द्यावा लागतो. तेवढी आर्थिक क्षमता कृषी पतपुरवठा संस्थांची नसते. त्यामुळे अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून या संस्थांना काम करून घ्यावे लागते. त्यामुळे या संस्थांची वेगाने प्रगती होत नाही.

**१३) शेतकऱ्यांची उदासिनता :**

बहुतेक ठिकाणचे शेतकरी ते ज्या कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे सभासद आहेत त्या संस्थांच्या कारभारात लक्ष घालत नाहीत. अनेक शेतकरी संस्थेशी फार कमी संपर्क ठेवतात. संस्थेशी व्यवहारही फारसे करत नाहीत. पतपुरवठा संस्थेकडून कर्ज न घेता सावकार, व्यापारी यांच्याकडून कर्ज घेतात. त्यामुळे शेतकऱ्यांचाही विकास होत नाही आणि कृषी पतपुरवठा संस्थांचीही वेगाने प्रगती होत नाही.

**१४) तोट्यात चालणाऱ्या संस्था :**

प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था ह्या सहकारी तत्त्वावर काम करतात. म्हणून या संस्था सहकारी संस्था आहेत. सहकारी संस्थांनी जास्त नफा मिळवू नये. सभासदांचे हित जपावे असे सांगितले जाते. सहकारी संस्था नफ्याच्या मागे लागल्या तर या संस्था सभासदांना योग्य दरात सेवा पुरवू शकणार नाहीत. सेवांच्या किंमती वाढवल्याशिवाय संस्थांना अधिक नफा मिळणार नाही. म्हणून सहकारी संस्थांनी नफा मिळवू नये असा विचार पूर्वीपासून मांडला जात आहे. परंतु सहकारी संस्था जर तोट्यात काम करू लागल्या तर संस्थांची वाढ होणार नाही. विविध कारणामुळे अनेक संस्थांना नफा मिळत नाही. वर्षानुवर्षे या संस्था तोट्यातच काम करत आहेत. त्यामुळे त्यांची प्रगती खुंटली आहे.

**१५) सरकारी व्यापारी बँकांशी स्पर्धा :**

भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना भेडसावणारी आणखी एक समस्या म्हणजे या संस्थांना सरकारी व्यापारी बँकांशी स्पर्धा करावी लागते. सरकारी व्यापारी बँका सुद्धा मोठ्या खेड्यात स्थापन झाल्या आहेत. या बँकासुद्धा शेतीला कर्जपुरवठा करतात. त्यामुळे कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना व्यापारी बँकांशी स्पर्धा करावी लागते.

**सारांश :** अशा प्रकारे भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना भेडसावणाऱ्या समस्या किंवा अडचणी तसेच त्यांच्या कार्यपद्धतीतील दोष या बाबींचे थोडक्यात स्पष्टीकरण वरीलप्रमाणे दिले आहे. थकबाकीची समस्या, भांडवलाची समस्या, अकार्यक्षम व्यवस्थापन, गलिच्छ राजकारणाचा शिरकाव या कृषी पतपुरवठा संस्थांना भेडसावणाऱ्या प्रमुख समस्या आहेत.

**प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे दोष/समस्या/अडचणी दूर करण्यासाठी उपाय किंवा सूचना :**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था या गावपातळीवर काम करतात. ग्रामीण भागात खेड्यात या संस्था काम करतात. या संस्था शेतकरी, शेती आणि ग्रामीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त व आवश्यक आहेत. म्हणून या संस्थांची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ झाली पाहिजे. प्राथमिक कृषी सहकारी पुतपुरवठा संस्थांच्या कार्यपद्धतीत काही दोष आहेत. तसेच या संस्थांना काही समस्यांना किंवा अडचणींना तोंड द्यावे लागते. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे दोष, समस्या किंवा अडचणी सोडवण्याची गरज आहे. त्यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**१) कर्जवसुली यंत्रणा कार्यक्षम बनवणे आवश्यक :**

थकबाकीची समस्या ही भारतातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना भेडसावणारी प्रमुख समस्या आहे. कर्जाची वसुली शंभर टक्के होत नसल्याने या संस्था पुरेसा कर्जपुरवठा करू शकत नाहीत. म्हणून कर्ज वसुली शंभर टक्के झाली पाहिजे. कर्ज वसुली यंत्रणा अत्यंत कार्यक्षम बनवली पाहिजे. कर्ज बुडव्या लोकांना या यंत्रणेचा धाक वाटला पाहिजे. कर्ज वसुली शंभर टक्के झाली तरच या संस्थांना कृषी विकासासाठी अधिक चांगले काम करता येणार आहे.

**२) कृषी माल विक्रीसासाठी प्रयत्न करणे आवश्यक :**

गावपातळीवरील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांनी आपल्या सभासदांचा शेतमाल सहकारी खरेदी-विक्री संस्थामार्फत विकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालासही चांगली किंमत मिळेल आणि कृषी पतपुरवठा संस्थांची कर्जवसुलीही जास्तीत जास्त होईल. म्हणून कृषी पतपुरवठा संस्थांनी सहकारी खरेदी-विक्री संस्थांशी संबंध ठेवून शेतकऱ्यांच्या मालाची विक्री करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

**३) व्यवस्थापनाचा दर्जा सुधारणे आवश्यक :**

भारतातील अनेक प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या व्यवस्थापनाचा दर्जा फारसा चांगला नाही. संस्थेचे यश हे संस्थेच्या व्यवस्थापनावर अवलंबून असते. म्हणून व्यवस्थापन समितीत तज्ज्ञ, प्रशिक्षित लोक असणे आवश्यक आहेत. जिल्हा सहकारी बँक, राज्य सहकारी बँक, नाबार्ड इत्यादींनी खेडेगावात काम करणाऱ्या प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण द्यावे. तसेच या संस्थांनी नोकरभरती करताना शिक्षित, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांनाच प्राधान्य द्यावे.

**४) थकबाकीदारांना कर्जपुरवठा न करणे :**

काही सभासद विविध कारणामुळे कृषी पतपुरवठा संस्थांचे कर्ज वेळेत परत करत नाहीत. कर्ज परतफेडीची मुदत संपून वर्ष-दोष वर्ष झाले तरी हे सभासद शेतकरी कर्ज फेडत नाहीत. अशा थकबाकीदारांना नवीन कर्ज न देण्याचे धोरण कृषी पतपुरवठा संस्थांनी स्वीकारावे. यामुळे शेतकरी वेळेत कर्ज परत करतील. तसेच थकबाकीदारांना नवीन कर्ज न दिल्याने थकबाकीची समस्या गंभीर होणार नाही.

**५) कर्जमाफी संदर्भात प्रबोधन आवश्यक :**

सरकार अधुनमधून शेतकऱ्यांना कर्जमाफी देत असते. सरकारने कर्जमाफी करावी अशी मागणी विरोधी पक्ष सतत करत असतात. सरकार कर्जमाफी करेल असे अनेक सभासद शेतकऱ्यांना वाटत असते. त्यामुळे कर्ज परत करण्यास ते टाळाटाळ करत असतात. त्यामुळे कृषी पतपुरवठा संस्थांना थकबाकीच्या समस्येला तोंड द्यावे लागते. म्हणून सरकार सतत दरवर्षी कर्जमाफी करणार नाही याची जाणीव सभासद शेतकऱ्यांना करून दिली पाहिजे. त्यासाठी त्यांचे प्रबोधन केले पाहिजे. तसेच सरकारने कर्जमाफी जाहीर केली तर भरलेले कर्ज परत करण्याची हमी कृषी पतपुरवठा संस्थांनी दिली पाहिजे. त्याशिवाय शेतकरी वेळेत कर्जाची परतफेड करणार नाहीत. कर्जमाफीच्या अपेक्षेने कित्येक शेतकरी कर्जाची परतफेड करत नाहीत. हे थांबले पाहिजे. त्याशिवाय प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था सक्षम होणार नाहीत.

**६) निष्क्रिय, दुर्बल संस्थांना सक्रिय व सबल करणे आवश्यक :**

भारतातील काही प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था या निष्क्रिय आणि दुर्बल आहेत. त्यामुळे त्या आपल्या सभासद शेतकऱ्यांच्या कर्जविषयक आणि इतर गरजा भागवू शकत नाहीत. म्हणून अशा निष्क्रिय संस्थांना जिल्हा सहकारी बँकांनी आणि राज्य सहकारी बँकांनी विविध उपाय योजून सक्रिय बनवले पाहिजे.

तसेच दुर्बल कृषी पतपुरवठा संस्थांनाही सबल (सक्षम) बनविले पाहिजे. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था सक्रिय आणि सक्षम (सबल / असक्षम) बनविल्याशिवाय या संस्था शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करू शकणार नाहीत आणि शेतकऱ्यांना चांगल्या सेवा देऊ शकणार नाहीत.

**७) सभासद संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक :**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांनी अर्थक्षम (Viable) होण्यासाठी आपली सभासद संख्या वाढविण्यावर भर दिला पाहिजे. कार्यक्षेत्रातील सर्व शेतकरी सभासद होतील याची काळजी घेतली पाहिजे. यामुळे कृषी पतपुरवठा संस्थांना प्रवेश फी, शेअर्सची विक्री, ठेवी यापासून अधिक भांडवल मिळू शकेल. तसेच संस्थांचे सभासद झालेल्या शेतकऱ्यांनाही कृषी पतपुरवठा संस्थांचे फायदे मिळतील. म्हणून प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांनी सभासद संख्या वाढविण्यासाठी सतत प्रयत्न केले पाहिजेत.

**८) कर्जवापराकडे लक्ष देणे आवश्यक :**

कित्येक प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था सभासद शेतकरी कर्जाचा योग्य वापर करतात की नाही याकडे लक्ष देत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांकडून कर्जाचा दुरुपयोग होतो. त्यामुळे थकबाकीची समस्या निर्माण होते. संस्थेचे नुकसान होते. तसेच शेतकऱ्यांच्या शेतीचाही विकास होत नाही. म्हणून ज्या कारणासाठी शेतकऱ्यांनी कर्ज घेतले आहे त्या कारणासाठीच (उत्पादक कामासाठीच) शेतकरी कर्जाचा वापर करतात की नाही ते पतपुरवठा संस्थांनी पाहिले पाहिजे. त्याशिवाय कर्जाचा दुरुपयोग थांबणार नाही.

**९) अल्पभूधारक आणि सीमांत शेतकऱ्यांकडे विशेष लक्ष देणे आवश्यक :**

भारतात अल्पभूधारक आणि सीमांत शेतकऱ्यांचे प्रमाण जवळ जवळ १०० टक्के एवढे मोठे आहे. त्यांना दरवर्षी अल्प आणि मध्यम मुदतीच्या कर्जाची गरज भासते. म्हणून प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांनी कर्जपुरवठा करताना आणि कृषीविषयक इतर सेवा पुरवताना अल्पभूधारक आणि सीमांत शेतकऱ्यांना विशेष प्राधान्य द्यावे. त्यामुळे या शेतकऱ्यांना शेतीची कामे वेळेत पूर्ण करता येतील.

**१०) कर्जपुरवठा वेळेत होणे आवश्यक :**

विविध कारणामुळे काही प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांकडून सभासद शेतकऱ्यांना वेळेत (गरजेच्या वेळी) कर्जपुरवठा होत नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांना दुकानदारांच्या किंवा सावकारांच्या दारात कर्जासाठी जावे लागते. शेतकऱ्यांच्यावर ही पाळी येऊ नये यासाठी कृषी पतपुरवठा संस्थांनी आपल्या सभासद शेतकऱ्यांना वेळेत कर्जपुरवठा करण्याची काळजी घ्यावी.

**११) दुर्बल संस्थांचे एकत्रीकरण :**

सक्षम होण्याची खात्री नसलेल्या प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे एकत्रिकरण किंवा विलिनिकरण करणे आवश्यक आहे. तीन-चार दुर्बल कृषी पतपुरवठा संस्थांचे एकत्रीकरण करावे. एकच चांगली, मोठी संस्था बनवावी. म्हणजे ही संस्था सक्षम होऊन शेतकऱ्यांच्या कृषीविषयक गरजा भागवू शकेल. तसेच दुर्बल/

अर्थक्षम नसलेली कृषी पतपुरवठा संस्था नजिकच्या सक्षम संस्थेत विलिन करावी. अशा प्रकारे दुबळ्या कृषी पतपुरवठा संस्थांचे एकत्रीकरण करणे किंवा मोठ्या संस्थामध्ये त्यांचे विलिनीकरण करणे हे उपाय योजले पाहिजेत.

**१२) पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा करणे आवश्यक :**

भारतातील काही प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांकडून विविध कारणामुळे शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात (मागणी इतका) कर्जपुरवठा होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना पेरणीपूर्व मशागत, पेरणी, नांगरणी, मजुरी देणे, खते व बियाणे खरेदी करणे इत्यादीसाठी दुकानदार, सावकारी करणारे मोठे शेतकरी, व्यापारी, सावकार यांच्या आश्रयाला जावे लागते. म्हणून कृषी पतपुरवठा संस्थांनी शेतकऱ्यांना गरजेइतका पतपुरवठा केला पाहिजे.

**१३) समतोल विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक :**

भारतातील सर्व राज्यात प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचा सारखा विकास झालेला नाही. काही राज्यात या संस्थांची संख्या चांगली आहे. तर काही राज्यात या संस्थांची संख्या कमी आहे. परंतु या संस्था कृषी आणि ग्रामीण विकासात महत्त्वपूर्ण कार्य करत असल्याने सर्व राज्यात या संस्थांची स्थापना पुरेशा प्रमाणात झाली पाहिजे. सरकारने त्यासाठी विशेष लक्ष दिले पाहिजे. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या संख्यात्मक प्रगतीबरोबर या संस्थांच्या गुणात्मक वाढीकडे सुद्धा लक्ष दिले पाहिजे.

**१४) बचतीचे महत्त्व पटवून देणे आवश्यक :**

संस्था यशस्वी होण्यासाठी बचती किंवा ठेवी अत्यंत आवश्यक असतात. परंतु या संस्थांना बचती/ठेवी गोळा करण्यात फारसे यश आलेले नाही. या संस्थांनी सभासदाबरोबर बिगर सभासदांकडूनही ठेवी गोळा कराव्यात. तसेच आपल्या सभासदांना विविध मार्गांनी बचतीचे महत्त्व पटवून द्यावे. जास्तीत जास्त ठेवी गोळा करण्यासाठी कृषी पतपुरवठा संस्थांनी प्रयत्न करावेत.

**१५) हिशोब तपासणी वेळच्यावेळी करून घेणे :**

संस्थांची हिशेब तपासणी वेळच्या वेळी झाली तर अफरातफर किंवा भ्रष्टाचार किंवा अयोग्य कारभाराची माहिती सभासदांना, शासनाला होते. त्यावरती वेळीच योग्य ते उपाय योजना येतात. परंतु विविध कारणामुळे काही कृषी पतपुरवठा संस्थांची हिशेब तपासणी वेळच्या वेळी होत नाही. म्हणून सर्व प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांनी आपले हिशेब वेळच्या वेळी नियमित तपासून घेतले पाहिजेत. जिल्हा सहकारी बँकांनी याबाबत विशेष काळजी घ्यावी.

**१६) पर्यवेक्षण / देखरेख व्यवस्था कडक असणे आवश्यक :**

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांनी चांगले काम करावे यासाठी या संस्थांचे सतत पर्यवेक्षण केले पाहिजे. पर्यवेक्षण किंवा देखरेख व्यवस्था अत्यंत मजबूत असणे आवश्यक आहे. त्यामुळे कृषी पतपुरवठा संस्था अयोग्य कारभार करणार नाहीत.

### १७) खते, बियाणे, गुदाम सुविधा पुरविणे आवश्यक :

प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांनी कर्जपुरवठ्याबरोबर आपल्या सभासद शेतकऱ्यांना खते, बियाणे, अवजारे यांचेही वाटप करावे. तसेच गुदाम सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून द्यावी. काही कृषी पतपुरवठा संस्था या सुविधा उपलब्ध करून देतात. परंतु या सुविधा पुरेशा प्रमाणात किंवा गरजेइतक्या नाहीत. म्हणून कृषी पतपुरवठा संस्थांनी खते, बियाणे, अवजारे आणि गुदाम सुविधा या सुविधांमध्ये पुरेशा प्रमाणात वाढ केली पाहिजे.

**सारांश :** अशा प्रकारे प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना भेडसावणाऱ्या समस्या, अडचणी आणि दोष यांचे निराकरण करण्यासाठी काही उपाय वरीलप्रमाणे सुचवले आहेत. या संस्थांचे कामकाज चांगले चालावे यासाठी या संस्थांमधील गलिच्छ राजकारण, गटबाजी नष्ट झाली पाहिजे. या संस्थांचे कामकाज राजकारणविरहित असले पाहिजे. शेतकऱ्यांनी उदासिनता झटकून सक्रिय झाले पाहिजे. तरच या संस्था कृषी व ग्रामीण विकासाला अधिक गती देऊ शकतील.

### १.२.२ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (District Central Co-operative Banks) :

**प्रास्ताविक :**

भारतात कृषी क्षेत्राला अल्प आणि मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करण्यासाठी सहकारी पतपुरवठा व्यवस्थेत जिल्हा सहकारी बँकांना मध्यवर्ती स्थान आहे. म्हणून या बँकांना मध्यवर्ती सहकारी बँक असेही म्हणतात. गावपातळीवर पतपुरवठ्याचे कार्य करणाऱ्या सहकारी संस्थेला प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था असे म्हणतात. जिल्हा पातळीवरील किंवा जिल्हा कायक्षेत्र असलेल्या सहकारी पतपुरवठा संस्थांना जिल्हा सहकारी बँक किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असे म्हणतात. आणि संपूर्ण राज्य हे कार्यक्षेत्र असलेल्या सहकारी बँकेला राज्य सहकारी बँक असे म्हणतात. अशा प्रकारे सहकारी पतपुरवठा रचनेत जिल्हा सहकारी बँकांना प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या वरचे आणि राज्य सहकारी बँकांच्या खालचे स्थान असल्याने जिल्हा सहकारी बँकांना 'मध्यवर्ती सहकारी बँक' किंवा 'जिल्हा सहकारी बँक' असे म्हतात. १९०४ च्या सहकार कायद्यात फक्त गावपातळीवर पतपुरवठा संस्थांची स्थापना करण्याची तरतूद होती. जिल्हा पातळीवर सहकारी बँक स्थापन करण्याची तरतूद नव्हती. परंतु खेडेगावात काम करणाऱ्या प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना सक्षम करण्याची आणि कृषी क्षेत्राची कर्जाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी सरकारला जिल्हा पातळीवर सहकारी बँक स्थापन करण्याची आवश्यकता वाटू लागली. परंतु १९०४ च्या कायद्यात तशी तरतूद नव्हती. म्हणून सरकारने सन १९१२ साली १९०४ च्या सहकार कायद्यात दुरुस्ती केली आणि १९१२ चा सहकार कायदा अस्तित्वात आला. या कायद्याने भारतात जिल्हा पातळीवर सहकारी तत्त्वावर सहकारी बँक स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला. १९१२ च्या सहकार कायद्यानुसार भारतात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची स्थापना संपूर्ण देशभर होण्यास सुरवात झाली. १९५०-५१ मध्ये भारतात ५०५ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका होत्या. १९७५-७६ मध्ये त्यांची संख्या ३४४ पर्यंत घटली. सध्या भारतात सुमारे ३६३ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत. प्रत्येक जिल्ह्यात एकच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असावी असा निर्णय

सरकारने घेतल्यामुळे १९५०-५१ च्या तुलनेत आज जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची संख्या घटल्याचे दिसते. १९१० साली राजस्थानमधील अजमेर या ठिकाणी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक स्थापन करण्यात आली होती. तिला पहिली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मानतात. तर १९१२ साली वर्धा येथे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना झाली. वर्धा हे सध्या महाराष्ट्र राज्यात असून पूर्वी (१९१२ साली) हे शहर मध्य प्रदेशात होते. १९१४ च्या मॅकलीन समितीने जिल्हा पातळीवर सहकारी तत्त्वावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना करावी अशी शिफारस केली होती. या शिफारशीची सरकारने अंमलबजावणी करण्यास सुरवात केली. त्यामुळे भारतात सर्वत्र जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची स्थापना होऊ लागली.

**व्याख्या** (Defination) **:**

१९६० च्या महाराष्ट्र सहकार संस्था कायद्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची व्याख्या दिली असून ती खालील शब्दात स्पष्ट केली आहे.

**''एका विशिष्ट जिल्ह्यात स्थापन झालेली आणि जिल्ह्यातील सहकारी संस्थांना कर्जपुरवठा करणारी आणि सहकाराचे कायदेकानू पाळून बँकिंगची कामे करणारी सहकारी बँक म्हणजे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक होय.''**

**सर्वसाधारण व्याख्या :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची एक सर्वसाधारण व्याख्या पुढील शब्दात स्पष्ट केली आहे.

**''ज्या सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र हे जिल्हा असते आणि जी बँक जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना, पतपुरवठा संस्थांना कर्जपुरवठा करून जिल्ह्याच्या कृषी व ग्रामीण विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते त्या बँकेला जिल्हा सहकारी बँक असे म्हणतात.''**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आणखी एक व्याख्या सांगता येईल. ती पुढील शब्दात स्पष्ट केली आहे.

**''राज्य सहकारी बँक आणि जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्था यांच्यामध्ये दुवा म्हणून (मध्यस्थ म्हणून) कार्य करणारी जिल्हा पातळीवरची सहकारी बँक म्हणजे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक होय.''**

**भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे स्वरूप :**

१) भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची स्थापना सन १९१२ च्या सहकार कायद्यानुसार झाली आहे. सध्या या बँकांना १९६० चा सहकार कायदा लागू आहे.

२) सहकारी पतपुरवठा रचनेत जिल्हा सहकारी बँकांचे स्थान मध्यवर्ती ठिकाणी आहे. गावपातळीवर प्राथमिक पतपुरवठा संस्था काम करतात. जिल्हा पातळीवर जिल्हा सहकारी बँका काम करतात

आणि राज्य पातळीवर राज्य सहकारी बँका काम करतात. अशा प्रकारे सहकारी पतपुरवठा व्यवस्थेत जिल्हा सहकारी बँकांचे स्थान दोन्ही पतपुरवठा संस्थांच्या मध्यवर्ती ठिकाणी आहे. म्हणून जिल्हा सहकारी बँकांना मध्यवर्ती सहकारी बँका किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक असे म्हणतात.

३) राज्य सहकारी बँक आणि जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्था यांच्यातील दुवा किंवा मध्यस्थ म्हणून जिल्हा सहकारी बँका काम करतात.

४) जिल्हा सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र एक जिल्हा हे असते. (आता अलीकडे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला जिल्ह्याच्या बाहेर चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यात शाखा काढण्यास परवानगी देण्यात आली आहे.)

५) जिल्हा सहकारी बँकेचे मुख्य कार्यालय जिल्ह्याच्या ठिकाणी असते. जिल्हा सहकारी बँक जिल्ह्यात विविध ठिकाणी शाखा उघडते आणि बँकिंगची कामे करते.

६) जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्था जिल्हा सहकारी बँकेचे सभासद असतात. आरबीआय च्या सुचनेनुसार व्यक्तींना सभासदत्व दिले जात नाही.

७) जिल्ह्याच्या कृषी आणि ग्रामीण विकासासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात.

८) जिल्ह्यातील सहकारी संस्थांचे आणि सहकारी चळवळीचे नेतृत्त्व करणारी बँक म्हणून जिल्हा सहकारी बँकेला ओळखले जाते.

९) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे कामकाज लोकशाही तत्त्वानुर आणि सहकारी तत्त्वानुसार चालते.

**कार्यक्षेत्र :**

भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र हे 'जिल्हा' (District) निश्चित करण्यात आले आहे. प्रत्येक जिल्ह्यात एक याप्रमाणे देशात सर्व जिल्ह्यात जिल्हा सहकारी बँकांची स्थापना करण्यात आली आहे.

**सभासदत्व :**

जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासदत्व दिले जाते. सहकारी पतपुरवठा संस्था (कृषी आणि बिगर कृषी पतपुरवठा संस्था), प्राथमिक सहकारी बँका, औद्योगिक सहकारी संस्था, सहकारी प्रक्रिया संस्था, सहकारी विपणन संस्था, सहकारी ग्राहक संस्था अशा सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे सभासदत्व मिळते. या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना

पतपुरवठा करणे व इतर बँकिंगची कामे करणे ही कामे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक करते. म्हणून या बँकेला जिल्ह्यातील सहकारी संस्थांची बँक आणि जिल्ह्यातील सहकारी संस्थांचा संघ असे म्हणतात.

**भांडवल उभारणी :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका विविध मार्गांनी भांडवलाची उभारणी करतात. (१) सभासद प्रवेश फी (२) शेअर्सची / भागभांडवलाची विक्री करून (३) सभासद आणि बिगर सभासदाकडून ठेवी गोळा करून (४) सरकारी अनुदान (५) सरकार, राज्य सहकारी बँक, रिझर्व्ह बँक यांच्याकडून कर्ज घेऊन (६) राखीव निधी व इतर निधी. अशा विविध मार्गांनी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका भांडवल उभारणी करतात.

**व्यवस्थापन :**

भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे व्यवस्थापन लोकशाही तत्त्वानुसार चालते. ग्रामपंचायत, पंचायत समिती, विधानसभा, लोकसभा यांच्या जशा निवडणुका होतात त्याप्रमाणे संचालक निवडून येतात आणि बँकेचा कारभार पाहतात. सभासद संस्थांनी निवडून दिलेले संचालक जिल्हा बँकेचा कारभार बघतात. संचालक मंडळातील संचालकांची संख्या १५ पर्यंत असते. जिल्ह्यातील सर्व संस्था संचालक निवडून देतात. हे संचालक बँकेच्या अध्यक्षांची आणि उपाध्यक्षांची निवड करतात. जिल्हा सहकारी बँकेत कृषी विभाग, बिगर कृषी विभाग, प्रशासन विभाग, हिशेब विभाग असे विविध सात विभाग असतात. प्रत्येक विभागाला १ महाव्यवस्थापक आणि २ सहाय्यक व्यवस्थापक असतात. प्रत्येक विभागासाठी १ मुख्य कार्यकारी अधिकारी असतो. जिल्ह्यातील सर्व संस्थांच्या व्यवहारावर देखरेख ठेवण्यासाठी पर्यवेक्षकही नेमलेले असतात.

**जिल्हा सहकारी बँकांचे उद्देश आणि कार्ये :**

भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका पुढील उद्देशाने काम करतात. या बँकांचे उद्देश आणि कार्ये यांची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहे.

१) जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना सभासदत्व देणे आणि त्यांना पतपुरवठा करणे.

२) सभासद, बिगर सभासदाकडून ठेवी गोळा करणे. जास्तीत जास्त ठेवी गोळा करण्यासाठी प्रयत्न करणे.

३) जनतेला बँकिंगच्या सेवा उपलब्ध करून देणे. पैसे पाठविण्याची सुविधा उपलब्ध करून देणे.

४) शेतकऱ्यांना तारणावर कर्जपुरवठा करणे.

५) जिल्ह्यात बँकेच्या शाखा सुरू करणे.

६) सरकारच्या ग्रामीण विकासाच्या योजनांची अंमलबजावणी करणे.

७) जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचे पर्यवेक्षण करणे (तपासणी व देखरेख करणे)

८) जिल्ह्यातील सर्व सहकारी संस्थांना मार्गदर्शन करणे.

९) राज्य सहकारी बँक, नाबार्ड, राज्य सरकार यांच्याकडून कर्ज घेऊन ते जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पतपुरवठा संस्थामार्फत वितरित करणे.

१०) राज्य सहकारी बँक आणि प्राथमिक सहकारी संस्था यांच्यात दुवा (मध्यस्थ) म्हणून काम करणे.

११) जिल्ह्यातील सहकारी चळवळीचे नेतृत्त्व करणे, जिल्ह्यात सहकारी चळवळीचा प्रचार आणि प्रसार करणे.

१२) जिल्ह्यात कृषी विकासासाठी, बिगर कृषी कारणासाठी कर्जाची किती गरज आहे याचा अभ्यास करून कर्ज मागणी प्रस्ताव राज्य सहकारी बँकेला सादर करणे.

१३) समाशोधन गृहांची (Clearing House) सेवा पुरवणे. ही सेवा जिल्ह्यातील पतपुरवठा संस्थांची येणी-देणी भागवण्यासाठी पुरवली जाते.

१४) सहकारी संस्था व नाणेबाजार यांच्यात दुवा म्हणून काम करणे.

१५) जिल्ह्यातील लहान उद्योग, कुटिर उद्योग यांना कर्जपुरवठा करणे.

१६) जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना गुंतवणुकीसाठी मार्गदर्शन करणे.

१७) जिल्ह्यातील पतपुरवठ्यातील कमतरता, असमतोलपणा दूर करणे.

१८) खातेदारांना आधुनिक बँकिंग सुविधा उपलब्ध करून देणे. उदाहरणार्थ मोबाईल बँकिंग किंवा इंटरनेट बँकिंग.

१९) शेतकऱ्यांनी आधुनिक पद्धतीने शेती करावी यासाठी प्रयत्न करणे.

२०) कर्जपुरवठा करताना दुर्बल घटकांकडे विशेष लक्ष देणे. त्यांना कमी व्याजात कर्जपुरवठा करणे.

२१) आपत्तीच्या काळात शासनाला मदत करणे.

**जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे महत्त्व / फायदे / विकासातील भूमिका / कार्ये :**

जिल्ह्याच्या कृषी आणि ग्रामीण विकासात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. कृषी व्यवसाय, कृषी पूरक व्यवसाय, लहान लहान उद्योग यांना कर्जपुरवठा करून त्यांचा विकास करण्याची जबाबदारी सरकारने देशातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांवर सोपवली आहे. जिल्हा सहकारी बँका जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न करतात व त्याप्रमाणे काम करतात. जिल्हा सहकारी बँकांचे महत्त्व थोडक्यात पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट केले आहे.

**१) जिल्ह्यातील पतपुरवठा संस्थांना कर्जपुरवठा करणे :**

जिल्ह्यात गावपातळीवर प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था काम करत असतात. या संस्था शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करण्याचे काम करत असतात. परंतु या संस्थांना ठेवी आणि शेअर्सची विक्री यापासून

फारसे भांडवल मिळत नाही. त्यामुळे आपल्या निधीतून या संस्था शेतकऱ्यांना फारसा कर्जपुरवठा करू शकत नाहीत. अशा प्रकारे खेडेगावात स्थापन झालेल्या पतपुरवठा संस्था शेतकऱ्यांची २० टक्के सुद्धा कर्जाची गरज भागवू शकत नाहीत. म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आपल्या जिल्ह्यातील प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांना आणि बिगर कृषी पतपुरवठा संस्थांना कर्जपुरवठा करण्याचे काम करतात. जिल्हा सहकारी बँकांकडून जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांना वित्तपुरवठा होत असल्याने या संस्था शेतकऱ्यांची कर्जाची गरज भागवू शकतात. शेतकऱ्यांना मागणीइतके कर्ज देऊ शकतात. जिल्हा सहकारी बँकांचे हे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या कार्यामुळे जिल्ह्यातील खेड्यातील कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना जिल्हा सहकारी बँकांकडून कर्ज देण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध होत आहे. या निधीतून गावपातळीवरील प्राथमिक पतपुरवठा संस्था शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करत आहेत. प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांना जिल्हा सहकारी बँकांकडून होणारा हा महत्त्वपूर्ण फायदा आहे.

**२) बचतीची सवय :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे आणखी एक महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे या बँका शेतकरी, शेतमजूर, कारागीर इत्यादी विविध घटकांकडून बचती (ठेवी) गोळा करतात. त्यांना बचतीची सोय व संधी उपलब्ध करून देतात. जिल्हा सहकारी बँकांनी जिल्ह्यातील लहान लहान खेड्यातसुद्धा शाखा उघडल्या आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील जनतेला बचत करण्याची सुविधा व संधी प्राप्त झाली आहे. जिल्हा बँका खेडोपाड्यात शाखा उघडून काम करत असल्याने जिल्हा बँकांच्या ठेवीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. या ठेवींचा उपयोग जिल्ह्यातील गरजूंना कर्ज देण्यासाठी केला जात आहे.

**३) शहरातील लोकांच्या ठेवी गोळा करण्यात यश :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आपल्या शाखा जशा खेड्यात उघडतात त्याप्रमाणे शहरात सुद्धा उघडतात. शहरातील व्यापारी, नोकरदार, इतर व्यावसायिक यांच्याकडून जिल्हा सहकारी बँका ठेवी गोळा करतात. जिल्ह्यातील शहरांच्या ठिकाणी सुद्धा जिल्हा सहकारी बँका शाखा उघडत असल्याने जिल्हा बँकांना शहरातील लोकांच्या ठेवी गोळा करता येतात. या ठेवींचा उपयोग खेड्यातील शेतकरी, कारागीर यांना कर्ज देण्यासाठी जिल्हा बँका करतात. ही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची अत्यंत महत्त्वपूर्ण कामगिरी आहे.

**४) कृषी विकास :**

जिल्हा मध्यवती सहकारी बँकांचे आणखी एक मौल्यवान कार्य म्हणजे या बँकांमुळे जिल्ह्यातील कृषी विकासाला चांगली चालना व गती मिळत आहे. या बँकांकडून जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना, विकास सोसायट्यांना कर्जपुरवठा केला जातो. आधुनिक अवजारे (यंत्रे) विकत घेण्यासाठी कर्जपुरवठा केला जातो. त्यामुळे जिल्ह्याच्या कृषी विकासास मोठा हातभार लागत आहे.

**५) सरकारला ग्रामीण विकासासाठी मदत :**

भारत सरकार ग्रामीण विकासासाठी कटिबद्ध आहे. भारतातील ग्रामीण भाग शहरी भागाच्या तुलनेत

आजही मागासलेला आहे. म्हणून सरकारला ग्रामीण विकासासाठी विविध योजना आखून त्यांची अंमलबजावणी करावी लागते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका खेड्यापाड्यात शाखा उघडून काम करत असल्याने सरकारला ग्रामीण विकास योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा सहकारी बँकांचा खूप उपयोग होतो. सरकार जिल्हा सहकारी बँकांच्यामार्फत आपल्या ग्रामीण विकास योजनांची अंमलबजावणी करते. उदाहरणार्थ एकात्मिक ग्रामीण विकास योजना. अशा योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी सरकार जिल्हा सहकारी बँकांचे सहाय्य घेते. त्यामुळे जिल्ह्याच्या ग्रामीण विकासात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण राहिली आहे.

**६) जिल्ह्यातील सहकारी संस्थांना मार्गदर्शन :**

जिल्ह्यात पतपुरवठा सहकारी संस्था, ग्राहक सहकारी संस्था, औद्योगिक सहकारी संस्था, मजूर सहकारी संस्था, सहकारी प्रक्रिया संस्था अशा विविध प्रकारच्या सहकारी संस्था असतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या सहकारी संस्थांना केवळ कर्जपुरवठा करत नाहीत तर या संस्थांना त्यांचा व्यवसाय वाढावा यासाठी सर्व प्रकारचे मार्गदर्शन करतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्ती असतात. या तज्ञांच्याकडून जिल्ह्यातील सभासद सहकारी संस्थांना गुंतवणूक व इतर बाबींचे मार्गदर्शन केले जाते. सहकारी संस्थांना त्याचा उपयोग होतो. म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे हे कार्यसुद्धा अत्यंत महत्त्वाचे मानले जाते.

**७) सरकार, राज्य सहकारी बँक यांच्याकडून कर्ज मिळवणे :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणखी एक महत्त्वपूर्ण कार्य करतात आणि ते म्हणजे या बँका सरकार, राज्य सहकारी बँक आणि नाबार्ड यांच्याकडून कर्ज घेतात आणि त्या कर्जाचे वितरण जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी संस्थांना करतात. जिल्ह्यातील कृषी क्षेत्राला कर्जाची किती गरज आहे याचा अभ्यास जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका करतात आणि त्याप्रमाणे राज्य सहकारी बँकेकडून, नाबार्डकडून आणि राज्य सरकारकडून कर्जाची मागणी करतात. अशा प्रकारे जिल्ह्याच्या विकासासाठी लागणारा पैसा सरकार, राज्य सहकारी बँक आणि नाबार्ड यांच्याकडून कर्जाच्या स्वरूपात मिळवण्याचे काम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका करतात.

**८) सहकारी चळवळीचा प्रचार आणि प्रसार :**

भारतात सहकारी चळवळीस आरंभ होऊन सुमारे सव्वाशे वर्षे झाली आहेत. शेतकरी, शेतमजूर, कारागीर इत्यादी घटकांच्या विकासात सहकारी क्षेत्राने मोलाची कामगिरी केली आहे. म्हणून देशाला आजही आणि भविष्यातसुद्धा सहकारी चळवळीची आवश्यकता राहणार आहे. म्हणून जिल्ह्यातील सहकारी चळवळीचा विकास करण्याची, सहकारी चळवळीला गतिमान करण्याची जबाबदारी सरकारने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांवर सोपवली आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक जिल्ह्यातील सहकारी चळवळीचे नेतृत्त्व करते. जिल्ह्यात सहकारी चळवळीचा प्रचार आणि प्रसार करते. नुकत्याच स्थापन झालेल्या सहकारी संस्थांना सर्व प्रकारची मदत करते. त्यामुळे जिल्ह्यात सहकारी चळवळ मजबूत होण्यास मदत होत आहे.

**९) आधुनिक बँकिंगच्या सुविधा उपलब्ध करून देणे :**

भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे या बँका केवळ ठेवी स्वीकारणे, कर्जपुरवठा करणे एवढीच पारंपारिक कार्ये करत नाहीत तर या बँका आपल्या खातेदारांना ATM, मोबाईल बँकिंग किंवा इंटरनेट बँकिंग, RTGS अशा सेवा सुद्धा पुरवतात. खाजगी, सरकारी बँकाप्रमाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आपल्या खातेदारांना आधुनिक बँकिंग सुविधा उपलब्ध करून देऊ लागल्या असल्याने या बँकांची उपयुक्तता वाढत आहे.

**१०) दुर्बल घटकांचा विकास :**

अल्पभूधारक शेतकरी, सीमांत शेतकरी, शेतमजूर, मातीची भांडी व इतर वस्तू तयार करणारे कारागीर यांना दुर्बल घटक असे म्हणतात. या दुर्बल घटकांना सबल करण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका विशेष प्रयत्न करत असतात. त्याचा फायदा दुबल घटकांना होत आहे. जिल्हा बँका कर्जपुरवठा करताना दुर्बल घटकांना प्राधान्य देतात.

**११) नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदत :**

भूकंप, अतिवृष्टी, महापूर, कोरडा दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीच्या काळात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका धाऊन येतात. हे जिल्हा सहकारी बँकेचे ठळक वैशिष्ट्य आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका केवळ जिल्ह्यातील आपत्तीसमयीच मदत करतात असे नाही तर जिल्ह्याच्या बाहेर, देशाच्या कानाकोपऱ्यात उद्‌भवणाऱ्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी सरकारला मदत करत असतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे हे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**१२) सरकारची खाती सांभाळणे :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका पंचायत समिती, ग्रामपंचायती, नगरपालिका, महानगरपालिका आणि जिल्हा परिषदा यांची खाती सांभाळतात. स्थानिक स्वराज्य संस्थांची विविध प्रकारची खाती जिल्हा सहकारी बँकेत असतात. ही खाती सांभाळण्याचे काम देशातील जिल्हा सहकारी बँका करतात.

**१३) सहकारी संस्थांची खाती सांभाळणे :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांची खाती असतात. सहकारी पतपुरवठा संस्था, सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, सहकारी खरेदी-विक्री संस्था, सहकारी मजूर संस्था अशा विविध प्रकारच्या सहकारी संस्थांची खाती जिल्हा सहकारी बँकेत असतात. ही खाती सांभाळण्याचे काम जिल्हा सहकारी बँका करत असतात. कर्जपुरवठ्याबरोबर इतर बँकिंग सुविधा देण्याचे काम जिल्हा सहकारी बँका करतात.

**१४) पर्यवेक्षण / देखरेख करणे :**

जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांच्या कार्यावर देखरेख करण्याचे काम जिल्हा मध्यवर्ती

सहकारी बँका करतात. जिल्हा सहकारी बँकांकडे पर्यवेक्षक (Supervisors) असतात. हे पर्यवेक्षक जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांना वेळोवेळी भेट देतात आणि संस्थांची तपासणी करतात. संस्थामध्ये अफरातफर किंवा भ्रष्टाचार होऊ नये, कामात दिरंगाई होऊ नये या उद्देशाने हे पर्यवेक्षण केले जाते. सहकारी पतपुरवठा संस्थांकडून अपात्र व्यक्तींना कर्जपुरवठा होत आहे का तेही पाहिले जाते. अशा प्रकारे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका जिल्ह्यातील सहकारी संस्थांना केवळ कर्जपुरवठा करत नाहीत तर सहकारी संस्थांच्या कारभारावर देखरेख ठेवण्याचे कामसुद्धा करतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या या कामामुळे सहकारी संस्थांच्या गैरकारभारास आळा बसतो.

**१५) नाणेबाजाराच्या विकासास मदत :**

नाणेबाजारात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचाही समावेश होतो. जिल्हा सहकारी बँका दिवसेंदिवस समृद्ध होत आहेत. त्यांचा शाखा विस्तार, ठेव संकलन, कर्जवितरण, भांडवल यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. त्यामुळे नाणेबाजारही समृद्ध, सक्षम होण्यास मदत होत आहे.

**१६) रोजगारात वाढ :**

भारतात सुमारे ३५२ इतक्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आहेत. महाराष्ट्रात ३५ जिल्हे असून एकट्या महाराष्ट्रात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची संख्या ३५ एवढी आहे. अशा प्रकारे संपूर्ण भारतात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या शाखांची संख्या हजारोंच्या घरात आहे. त्यामुळे या बँकांनी ग्रामीण, शहरी भागातील हजारो सुशिक्षित लोकांना रोजगार पुरवला आहे. या बँकांकडून पुरवण्यात येत असलेल्या रोजगारात दिवसेंदिवस वाढ होत असून त्यामुळे सुशिक्षितांची बेकारी कमी होण्यास मदत होत आहे.

**सारांश :** अशा प्रकारे भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात मोलाचे योगदान देत आहेत. जिल्हा सहकारी बँका जिल्ह्याच्या कृषी व ग्रामीण विकासाला चालना देतात. सरकार, सहकारी संस्था यांची खाती सांभाळतात. जिल्ह्यातील सहकारी संस्थांना कर्जपुरवठ्याबरोबर सर्व प्रकारचे मार्गदर्शन करतात. जिल्ह्यातील सहकारी चळवळ मजबूत करण्याचे कार्य करतात. सहकाराचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम करतात. सरकारच्या ग्रामीण विकास योजनांची अंमलबजावणी देशात करण्याचे काम करतात.

**जिल्हा सहकारी बँकांचे दोष / समस्या / अडचणी :**

भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका जिल्ह्याच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असल्या तरी या बँकांच्या कार्यपद्धतीत काही दोष आहेत. तसेच या बँकांना काही समस्यांना किंवा अडचणीना तोंड द्यावे लागते. जिल्हा सहकारी बँकांचे दोष, त्यांना भेडसावणाऱ्या समस्या आणि अडचणी यांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**१) असमान विकास :**

भारतात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा विकास सर्व राज्यात सारख्या प्रमाणात झालेला नाही. काही

राज्यात उदाहरणार्थ महाराष्ट्र, गुजरात या राज्यात जिल्हा बँकांनी चांगली प्रगती केली आहे. भारतातील ठराविक राज्यात जिल्हा सहकारी बँकांच्या शाखांची संख्या चांगली आहे. परंतु आसाम, बिहार राज्यात या बँकांच्या शाखांची संख्या खूपच कमी आहे.

**२) थकबाकीची समस्या :**

भारतातील कित्येक जिल्हा सहकारी बँकांना थकबाकीची समस्या भेडसावत आहे. विविध कारणामुळे या बँकांनी दिलेली सर्व कर्जे वेळेत वसूल होत नाहीत. भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची थकबाकी ३०% ते ६०% एवढी आहे. कर्जमाफीच्या अपेक्षेने शेतकरी प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांची कर्जफेड करण्यास टाळाटाळ करतात. नैसर्गिक आपत्ती आणि इतर कारणामुळे शेतकरी कर्ज परत करू शकत नाहीत. त्यामुळे प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था जिल्हा बँकांकडून घेतलेल्या कर्जाची वेळेत परतफेड करू शकत नाहीत. त्यामुळे भारतातील अनेक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना थकबाकीची समस्या जाणवते.

**३) प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची उणिव :**

भारतातील काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भेडसावणारी आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे या बँकांकडे प्रशिक्षित व अनुभवी कर्मचारी पुरेशा प्रमाणात नाहीत. त्याचा परिणाम व्यवस्थापनावर वाईट होतो. या बँका ग्राहकांना बँकिंग सुविधा तत्परतेने देऊ शकत नाहीत. नोकरभरतीत राजकीय पक्षांचे नेते इंटरेस्ट घेत असतात. त्यामुळे बँकांच्या सेवांचा दर्जा चांगला राहत नाही.

**४) पर्यवेक्षण / देखरेख सुविधा अपुरी :**

काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे पर्यवेक्षण (तपासणी किंवा देखरेख) सुविधा अपुरी आहे. जिल्हा सहकारी बँकांना जिल्ह्यातील सर्व सहकारी संस्थांचे पर्यवेक्षण करण्याचे काम करावे लागते. परंतु संस्थांचे पर्यवेक्षण वेळेवर होत नाही. कारण जिल्हा बँकांकडे पर्यवेक्षण सुविधा पुरेशा प्रमाणात नाही. काही राज्यात राज्य सरकारचे कर्मचारी प्राथमिक सहकारी संस्थांचे पर्यवेक्षण करतात. हे काम जिल्हा सहकारी बँकांकडे देण्यात आलेले नाही.

**५) व्यापारी बँकांशी स्पर्धा :**

भारतात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना जिल्ह्यातील खाजगी आणि सरकारी बँकांशी स्पर्धा करावी लागते. जिल्हा बँका जी कामे करतात तीच कामे खाजगी आणि सरकारी बँका करतात. खाजगी बँका आपल्या ग्राहकांना जेवढ्या दर्जेदार सेवा देतात तेवढ्या दर्जेदार सेवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या अनेक शाखा देऊ शकत नाहीत.

**६) भांडवलाची चणचण :**

भारतातील काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भांडवलाची चणचण जाणवते. कारण या बँकांना

पुरेशा प्रमाणात ठेवी गोळा करण्यात अद्याप यश आलेले नाही. त्यामुळे या बँकांना राज्य सहकारी बँक, नाबार्ड, राज्य सरकार यांच्यावर कर्जासाठी सतत अवलंबून रहावे लागते.

**७) राजकारणाचा शिरकाव :**

भारतात लोकशाही असल्याने जिल्हा सहकारी बँकांचे संचालकही निवडणुकीने (Election) निवडले जातात. विविध राजकीय पक्ष जिल्हा बँकेची निवडणूक लढवतात. बँक ताब्यात घेण्यासाठी राजकीय नेते आणि राजकीय पक्ष प्रयत्नांची पराकाष्ठा करतात. त्यामुळे सामान्य माणसाला जिल्हा सहकारी बँकेविषयी फारशी आस्था वाटत नाही. बँकेवर वर्चस्व मिळवलेले राजकारणी आपल्या जवळच्या लोकांना (संस्थांना) कर्ज वाटप करताना प्राधान्य देतात. नोकरभरतीतही चुकीचे व्यवहार केले जातात.

**८) बिगर शेतकऱ्यांना आकृष्ट करण्यात अपयश :**

जिल्हा सहकारी बँका या शेतकऱ्यांच्या बँका म्हणूनच ओळखल्या जातात. त्यामुळे जरी या बँकांच्या शाखा जिल्ह्यातील शहरात स्थापन झाल्या असल्या तरी शहरातील, खेड्यातील व्यापारी, दुकानदार, नोकरदार, इतर व्यावसायिक यांना आपल्याकडे आकृष्ट करण्यात या बँकांना फारसे यश आलेले नाही. बिगर शेतकऱ्यांच्या ठेवी गोळा करण्यात या बँकांना फारसे यश आलेले नाही.

**९) विलंबाने कर्जपुरवठा :**

भारतातील काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून विविध कारणामुळे जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी संस्थांना वेळेवर कर्जपुरवठा होत नाही. कर्जवितरणास विलंब लागतो. राजकीय हस्तक्षेप, कर्जमंजुरी समितीच्या बैठका वेळेवर न होणे या विविध कारणामुळे काही जिल्हा सहकारी बँकांकडून प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना वेळेवर कर्जपुरवठा होत नाही.

**१०) अयोग्य / चुकीचे गुंतवणूक धोरण :**

नफा मिळवण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आपल्याजवळील रोख निधी (जमा झालेल्या ठेव रकमेची) गुंतवणूक करावी लागते. परंतु काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आपल्या निधीची गुंतवणूक योग्य प्रकारे किंवा काळजीपूर्वक करत नाहीत असे आढळून आले आहे. काही बँकांनी एकदम नवीन उद्योगसंस्थांना भरमसाठ कर्ज दिल्याचे आढळले आहे. यापैकी काही उद्योगसंस्था बुडाल्यामुळे जिल्हा सहकारी बँकांची कर्जेही बुडाली आहेत.

**११) तोट्यातील बँक शाखांची संख्या लक्षणीय :**

भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भेडसावणारी आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे जिल्हा बँकांच्या तोट्यात चालणाऱ्या शाखांची संख्या वाढत आहे. आज जवळपास ३५०० बँक शाखा या तोट्यात आहेत.

**सारांश :** अशा प्रकारे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना वरीलप्रमाणे काही समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या बँकांना भेडसावणारी प्रमुस समस्या ही थकबाकीची समस्या आहे. तोट्यातील बँक शाखांची वाढती संख्या, चुकीचे गुंतवणूक धोरण, कर्जपुरवठा करण्यात होत असलेला विलंब या प्रमख समस्या जिल्हा सहकारी बँकासमोर आहेत. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना प्रभावीपणे काम करता येत नाही.

**जिल्हा सहकारी बँकांचे दोष आणि समस्या दूर करण्यासाठी उपाय :**

जिल्ह्याच्या कृषी आणि ग्रामीण विकासाच्या दृष्टीने जिल्हा सहकारी बँका अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. म्हणून या बँकांच्या कार्यपद्धततीतील दोष दूर होणे आवश्यक आहे. तसेच या बँकांना भेडसावणाऱ्या समस्यांचेही निराकरण होणे आवश्यक आहे. जिल्हा सहकारी बँकांचे दोष आणि समस्या नष्ट करण्यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**१) मागास भागाकडे अधिक लक्ष देणे आवश्यक :**

भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी आपापल्या जिल्ह्यातील मागास भागाच्या विकासाकडे अधिक लक्ष दिले पाहिजे. काही जिल्ह्यात दुष्काळी तालुके आहेत. मोठ्या प्रमाणात कोरडवाहू शेती केली जाते. शेतीचे उत्पन्न अत्यंत कमी आहे. त्यामुळे तेथील तात्पुरते आणि कायमचे स्थलांतर मोठ्या प्रमाणात आहे. म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना मागास, दुष्काळी आणि कोरडवाहू विभागाला कर्जपुरवठा करताना प्राधान्य द्यावे. त्याशिवाय जिल्हांतर्गत विषमतोल कमी होणार नाही. दुष्काळी प्रदेश कमी करण्याच्यादृष्टीने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी आपले कर्जविषयक धोरण तयार करावे.

**२) कर्जाच्या वापराकडे लक्ष देणे आवश्यक :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था कर्ज घेतात. परंतु विविध कारणामुळे कित्येक कृषी पतपुरवठा संस्था जिल्हा बँकेचे कर्ज वेळेत परत करू शकत नाहीत. म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या कर्जाच्या वापरावर लक्ष ठेवावे. यामुळे प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था शेतकरी कर्जाचा कसा वापर करतात याकडे लक्ष देतील.

**३) गुंतवणूक धोरण काळजीपूर्वक आखावे :**

नफा मिळवण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आपल्याजवळील रोख निधीची गुंतवणूक करावी लागते. ही गुंतवणूक त्यांनी अत्यंत काळजीपूर्वक केली पाहिजे. एकाच उद्योगाला मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा करण्याचे धोरण बंद करावे. विविध उद्योगांना कर्जपुरवठा करावा. उद्योग वर्तमानात तसेच भविष्यात चालतील की नाही याची चाचपणी करावी. अभ्यास करून निधीची गुंतवणूक करावी. राजकीय दबावाचा विचार करू नये. केलेली गुंतवणूक सुरक्षितपणे परत येईल याची काळजी घ्यावी.

**४) आवश्यक त्या ठिकाणी शाखा उघडणे :**

जिल्ह्याच्या कृषी आणि ग्रामीण विकासासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी जिल्ह्यात आवश्यक त्या

ठिकाणी (ज्या ठिकाणी शाखा नाहीत आणि शाखा उघडण्याची गरज आहे अशा ठिकाणी) आपल्या शाखा उघडाव्यात. त्यामुळे शेतकऱ्यांना पुरेसा कर्जपुरवठा होईल. तसेच ठेव संकलनातही वाढ घडून येईल.

**५) सक्षम बँकांना जिल्ह्याच्या बाहेर शाखा काढण्यास परवानगी देणे आवश्यक :**

ज्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका सक्षम आहेत, ज्यांच्याकडे ठेवी प्रचंड प्रमाणावर आहेत आणि कर्जाला फारशी मागणी नाही अशा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना जिल्ह्याच्या बाहेर मागास भागात जेथे कर्जाला मागणी आहे अशा ठिकाणी शाखा उघडण्यास रिझर्व्ह बँकेने परवानगी द्यावी. यामुळे मागास भागाचा विकास घडून येईल आणि सक्षम जिल्हा बँकांना गुंतवणूकीपासून व्याजाच्या रुपाने नफाही मिळू शकेल.

**६) प्रशिक्षण सुविधा निरंतर सुरू राहणे आवश्यक :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे व्यवस्थापन आणि दैनंदिन कारभार हा कार्यक्षमपणे चालावा यासाठी बँकेचे कर्मचारी, अधिकारी, संचालक या सर्वांना दरवर्षी वर्षातील काही दिवस बँकेच्या कामकाजाबाबत, कर्जधोरणाबाबत किंवा सुरक्षित गुंतवणूकीबाबत प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. यामुळे बँकांच्या व्यवस्थापनाचा दर्जा सुधारण्यास मदत होऊ शकेल. तसेच जिल्हा बँकांची कार्यक्षमताही वाढू शकेल.

**७) थकबाकी वसुलीकडे लक्ष देणे आवश्यक :**

भारतातील काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना थकबाकीच्या समस्येला तोंड द्यावे लागते. हजारो कोटी रुपयांची थकबाकी असून ही थकबाकी दिवसेंदिवस वाढत आहे. म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी राजकीय दबावाला न जुमानता कर्जवसुली करावी. त्याशिवाय थकबाकीचे प्रमाण कमी होणार नाही.

**८) ठेवीमध्ये वाढ घडवून आणण्यासाठी प्रयत्न :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या ठेवीमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे हे खरे असले तरी या बँकांना ठेवीमध्ये वाढ करण्यास अजून वाव आहे. या बँकांनी ठेवीमध्ये वाढ घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. शेतकऱ्यांबरोबर बिगर शेतकरी जसे की व्यापारी, दुकानदार, नोकरदार, व्यावसायिक इत्यादींच्या ठेवी कशा वाढतील याची काळजी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी घेतली पाहिजे.

**९) त्वरित व मागणीइतका कर्जपुरवठा करणे आवश्यक :**

काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका विविध कारणामुळे प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांना त्वरित आणि आवश्यक तेवढा कर्जपुरवठा करत नाहीत. त्यामुळे कृषी पतपुरवठा संस्था शेतकऱ्यांना वेळेत व पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा करू शकत नाहीत. म्हणून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांना आणि जिल्ह्यातील इतर प्रकारच्या सहकारी संस्थांना वेळेत (त्वरित) आणि मागणीइतका कर्जपुरवठा करण्याची काळजी घेतली पाहिजे.

**१०) जास्तीत जास्त कर्जपुरवठा वस्तूच्या स्वरूपात करणे आवश्यक :**

शेतकऱ्यांनी कर्जाचा दुरुपयोग करू नये यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी जास्तीत जास्त

कर्जपुरवठा वस्तूच्या स्वरूपात (अवजारे, वीज पंप इत्यादी) करावा. त्यामुळे शेतकऱ्यांकडून कर्जाचा दुरुपयोग होणार नाही.

**११) सर्व राज्यात विकास होणे आवश्यक :**

भारतातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची सर्व राज्यात सारखी प्रगती झालेली नाही. शाखा विस्तार, ठेवी संकलन, कर्जवाटप या बाबतीत या बँका खूपच मागे आहेत. महाराष्ट्रासारख्या ठराविक राज्यात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती चांगली केली आहे. म्हणून देशाच्या सर्व भागात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची प्रगती होणे आवश्यक आहे. कारण या बँका कृषी आणि ग्रामीण विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत.

**१२) पर्यवेक्षण / देखरेख व्यवस्था पुरेशी असणे आवश्यक :**

भारतातील काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे पर्यवेक्षण / देखरेख व्यवस्था पुरेशी नाही. त्यामुळे या बँका प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांचे पर्यवेक्षण नियमित करू शकत नाहीत. पतपुरवठा संस्थांचे सतत पर्यवेक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण सतत पर्यवेक्षण केल्यामुळे प्राथमिक सहकारी संस्थांना आपला कारभार अधिक चांगला व कार्यक्षमतेने करता येतो. पर्यवेक्षणाच्या धाकामुळे भ्रष्टाचार, अफरातफर अशा समस्या उद्भवत नाहीत. म्हणून ज्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडे पुरेशी पर्यवेक्षण व्यवस्था नाही त्यांनी ती व्यवस्था उभी करावी व प्राथमिक सहकारी संस्थांचे नियमित पर्यवेक्षण करावे.

**१३) तोट्यातील बँक शाखा नफ्यात आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक :**

भारतातील काही जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या काही शाखा तोट्यात आहेत. या तोट्यात चालणाऱ्या बँक शाखा नफ्यात आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. बँक शाखांच्या तोट्याची कारणे शोधून त्यांचा तोटा कमी करण्यासाठी, त्यांना नफ्यात आणण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

**सारांश :** अशा प्रकारे भारतातील जिल्हा मध्यवती सहकारी बँकांच्या कामकाजातील दोष दूर करण्यासाठी तसेच या बँकांना भेडसावणाऱ्या समस्या आणि अडचणी दूर करण्यासाठी काही उपाय वरीलप्रमाणे सुचवले आहेत. या उपायांची सरकार, राज्य सहकारी बँक आणि जिल्हा सहकारी बँकांनी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. कारण जिल्हा बँक जिल्ह्याच्या कृषी आणि ग्रामीण विकासात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. त्यांना जिल्ह्याच्या विकासात अधिक चांगले काम करता यावे यासाठी या बँकांना भेडसावणाऱ्या समस्यांचे निराकरण होणे अत्यंत आवश्यक आहे.

## १.२.३ राज्य सहकारी बँक (State Co-operative Bnaks) :

**प्रास्ताविक**

राज्य सहकारी बँकेला 'शिखर बँक' (Apex Bank) असेही म्हणतात. कारण राज्यातील सहकारी पतपुरवठा रचनेत राज्य सहकारी बँकेला सर्वात वरचे / सर्वोच्च स्थान आहे. म्हणून राज्य सहकारी बँकेला

'शिखर बँक' असे म्हणतात. सहकारी पतपुरवठा व्यवस्थेत सर्वात खालच्या पातळीवर (गावपातळीवर) प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था काम करतात. मधल्या स्तरावर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका काम करतात आणि राज्य पातळीवर राज्य सहकारी बँका काम करतात. राज्य सहकारी बँका रिझर्व्ह बँकेकडून, राज्य सरकारकडून, नाबार्डकडून कर्ज घेतात आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना देतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका ही कर्जाची रक्कम गावपातळीवरील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना देतात. ह्या प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करतात. यावरून राज्य सहकारी बँकेची व्याख्या आपणास खालीलप्रमाणे सांगता येईल.

**''ज्या सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण राज्य असते आणि जी बँक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत कृषी क्षेत्राला (शेतकऱ्यांना) कर्जपुरवठा करते, त्या बँकेला राज्य सहकारी बँक (State Co-operative Bank) असे म्हणतात.**

राज्य सहकारी बँकेची आणखी एक व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''राज्यातील सहकारी चळवळीचे नेतृत्त्व करणारी, सहकारी संस्थांना मार्गदर्शन करणारी, राज्यातील सर्व जिल्हा मध्यवती सहकारी बँकांना पतपुरवठा करणारी राज्य पातळीवरील सहकारी बँक म्हणजे राज्य सहकारी बँक होय.''**

अशा प्रकारे राज्यातील सहकारी पतपुरवठा रचनेत सर्वात वरच्या स्थानावर राज्य सहकारी बँक असते. या बँकेला राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची बँक असे म्हणतात. सन १९१५ मध्ये मॅक्लेगन समितीने राज्य सहकारी बँकांची गरज प्रतिपादन केली होती. १९१२ च्या कायद्याने स्थापन झालेल्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका शेतीची कर्जाची गरज संपूर्णपणे भागवू शकत नव्हत्या. कृषी कर्जाची मागणी दिवसेंदिवस वाढत होती. म्हणून भारतात राज्य पातळीवर राज्य सहकारी बँक असावी असे मत मॅक्लेगन समितीने मांडले होते. १९३१ च्या मध्यवर्ती बँकिंग चौकशी समितीनेसुद्धा राज्य पातळीवर राज्य सहकारी बँक स्थापन करावी असे म्हटले होते. त्यानुसार भारतात राज्य सहकारी बँका स्थापन केल्या जाऊ लागल्या. सन १९५०-५१ मध्ये भारतात राज्य सहकारी बँकांची संख्या १५ इतकी होती. सध्या ही संख्या ३८ एवढी आहे.

**कार्यक्षेत्र :**

राज्य सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र एका राज्यापुरते मर्यादित असते. उदाहरणार्थ महाराष्ट्र राज्य सहकारी बँक. देशातील राज्य सहकारी बँका राज्यातील सहकारी चळवळीला मार्गदर्शन करण्याचे काम करतात.

**सभासदत्व :**

राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका या राज्य सहकारी बँकेच्या सभासद असतात. तसेच राज्यातील सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या, जिल्हा सहकारी खरेदी-विक्री आणि इतर प्रकारच्या सहकारी संस्थांना सभासदत्व दिले जाते.

**भांडवल उभारणी :**

सभासद संस्थांना शेअर्सची विक्री करून, सभासद आणि बिगर सभासदाकडून ठेवी गोळा करून आणि रिझर्व्ह बँक, राज्य सरकार यांच्याकडून कर्ज घेऊन राज्य सहकारी बँका भांडवल उभारणी करतात.

**व्यवस्थापन :**

राज्य सहकारी बँकेचा कारभार लोकशाही तत्त्वानुसार चालतो. या बँकेचे सभासद आपले प्रतिनिधी निवडून पाठवतात. त्यांना संचालक असे म्हणतात. संचालक मंडळावर सरकारचे काही प्रतिनिधी असतात. संचालक मंडळ अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची निवड करतात.

**राज्य सहकारी बँकांचे उद्देश आणि कार्ये :**

१) राज्यातील सहकारी चळवळीचे नेतृत्त्व करणे, सहकारी चळवळीला दिशा देणे, सहकारी चळवळीला मार्गदर्शन करणे.

२) राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना पतपुरवठा करणे.

३) राज्यातील इतर प्रकारच्या सहकारी संस्थांना वित्तपुरवठा करणे.

४) रिझर्व्ह बँक, राज्य सरकार यांच्याकडून निधी घेऊन तो जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना पुरवणे.

५) सरकारच्या ग्रामीण विकास योजनांची अंमलबजावणी करणे.

६) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या कारभारावर देखरेख करणे, पर्यवेक्षण करणे.

७) राज्यात विविध ठिकाणी शाखा उघडणे.

८) सहकारी संस्थांचे पैसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवणे.

९) जिल्हा सहकारी बँकांना गुंतवणूकीसाठी मार्गदर्शन करणे.

१०) सभासद आणि बिगर सभासदांच्या ठेवी स्वीकारणे.

**राज्य सहकारी बँकांचे महत्त्व / फायदे / विकासातील भूमिका :**

राज्याच्या सहकारी चळवळीच्या विकासात राज्य सहकारी बँका महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत. राज्य सहकारी बँका राज्याच्या आर्थिक विकासात (कृषी आणि ग्रामीण विकासात) मोलाचे योगदान देत आहेत. त्याची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

**१) बचतीत / ठेवीत वाढ :**

राज्य सहकारी बँका सभासद संस्थांकडून तसेच बिगर सभासद व्यक्तीकडून बचती किंवा ठेवी गोळा

करण्याचे कार्य करतात. राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, इतर सहकारी संस्था यांची खाती राज्य सहकारी बँकेत असतात. जिल्हा बँक आणि इतर संस्था राज्य सहकारी बँकेत विविध प्रकारच्या ठेवी ठेवत असतात. या ठेवीत दिवसेंदिवस वाढ होत आहे.

**२) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना पतपुरवठा :**

राज्य सहकारी बँकांची स्थापना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठीच झाली आहे. राज्य सहकारी बँका जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना अर्थपुरवठा करतात आणि जिल्हा सहकारी बँका प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना अर्थपुरवठा करतात. या संस्था शेतकऱ्यांना अर्थपुरवठा करतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना राज्य सहकारी बँका अर्थपुरवठा करत असल्याने जिल्हा सहकारी बँका गावपातळीवरील प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांना पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा करू शकतात. अशा प्रकारे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना आवश्यक तेवढा पतपुरवठा करून या बँकांना सक्षम करण्याचे महत्वपूर्ण कार्य राज्य सहकारी बँका करत असतात.

**३) विकास योजनांची अंमलबजावणी :**

सरकार, नाबार्ड ग्रामीण विकासाच्या योजना तयार करत असते. त्याची अंमलबजावणी करण्याचे काम देशातील राज्य सहकारी बँका करत असतात. विकासाच्या योजना राबवण्यास सहाय्य करण्याचे काम राज्य सहकारी बँका करत असतात.

**४) इतर प्रकारच्या सहकारी संस्थांच्या विकासास सहाय्य :**

राज्य सहकारी बँका केवळ जिल्हा सहकारी बँकांना कर्जपुरवठा करत नाहीत तर राज्यातील औद्योगिक सहकारी संस्था, सहकारी खरेदी-विक्री संस्था, सहकारी प्रक्रिया संस्था (सहकारी साखर कारखाने, सहकारी सूत गिरण्या) इत्यादी विविध प्रकारच्या सहकारी संस्थांना अर्थपुरवठा करत असतात. सहकारी बँकाबरोबर इतर प्रकारच्या सहकारी संस्थांच्या विकासात राज्य सहकारी बँकांचे योगदान अत्यंत मोलाचे राहिले आहे.

**५) सरकार, रिझर्व्ह बँक यांच्याकडून निधी मिळवणे :**

राज्य सहकारी बँका स्वत:च्या निधीतून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना कर्जपुरवठा करत असतात. परंतु कषी क्षेत्राची कर्जाची गरज मोठी असल्याने राज्य सहकारी बँका राज्य सरकारकडून, नाबार्डकडून, रिझर्व्ह बँकेकडून निधी मिळवतात आणि तो निधी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकामार्फत शेतकऱ्यांना पुरवतात. अशा प्रकारे कृषी क्षेत्राची कर्जाची गरज भागवण्यासाठी भारतातील राज्य सहकारी बँका सरकार, रिझर्व्ह बँक इत्यादीकडून निधी मिळवण्याचे काम करतात. त्यामुळे राज्य सहकारी बँका जिल्हा सहकारी बँकांना पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा करू शकतात.

**६) नाणेबाजारातून कर्ज मिळण्याची सुविधा :**

राज्य सहकारी बँकेचा आणखी एक फायदा म्हणजे राज्य सहकारी बँकेमुळे सहकारी क्षेत्राला नाणेबाजारातून

अल्पमुदतीचे कर्ज मिळण्यास मदत होते. सहकारी संस्थांकडील कृषी हुंड्या राज्य सहकारी बँकेमार्फत नाणेबाजारात वटवता येतात व अल्पमुदतीचे कर्ज मिळवता येते. हा राज्य सहकारी बँकेचा अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**७) कृषी क्षेत्राला अर्थपुरवठा करण्यासाठी सरकारला उपयुक्त :**

शेतकऱ्यांना अल्प आणि मध्यम मुदतीच्या कर्जाची गरज दरवर्षी भासत असते. सरकारला कृषी कर्जाची ही गरज पूर्ण करण्याचे काम करावे लागते. परंतु सरकार शेतकऱ्यांना थेट कर्जपुरवठा करू शकत नाही. सरकार रिझर्व्ह बँकेला कर्जपुरवठा करते. रिझर्व बँक राज्य सहकारी बँकांना कर्जपुरवठा करते. राज्य सहकारी बँका जिल्हा सहकारी बँकांना आणि जिल्हा सहकारी बँका शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करतात. अशा प्रकारे कृषी क्षेत्राला अर्थपुरवठा करण्यासाठी सरकार राज्य सहकारी बँकांचे साहाय्य घेते. राज्य सहकारी बँकामार्फत कृषी क्षेत्राला अर्थपुरवठा करण्याचे काम सरकारकडून केले जाते.

**८) राज्यातील सहकारी चळवळीचा विकास :**

राज्य सहकारी बँक ही राज्यातील सहकारी चळवळीचे नेतृत्त्व करते. सहकारी चळवळीला दिशा देण्याची आणि सहकारी चळवळीला मार्गदर्शन करण्याची जबाबदारी सरकारने राज्य सहकारी बँकांवर सोपवली आहे. राज्यातील सहकारी संस्थांना सर्व प्रकारची मदत करून राज्यातील सहकारी चळवळीचा विकास करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य भारतातील राज्य सहकारी बँका करत असतात. राज्य सहकारी बँकांचे हे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते.

**९) पैशाच्या स्थानांतरणाची सुविधा :**

भारतातील राज्य सहकारी बँका राज्यातील सहकारी बँकांचे पैसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवण्याचे काम करतात. व्यापारी बँका (खाजगी व सरकारी व्यापारी बँका) जे कार्य करतात ते कार्य राज्य सहकारी बँका विविध प्रकारच्या सहकारी बँकांसाठी करतात. तसेच एखाद्या जिल्हा सहकारी बँकेकडे अतिरिक्त निधी असेल तर तो निधी राज्य सहकारी बँका ज्या जिल्हा सहकारी बँकांना निधीची कमतरता आहे अशा बँकांकडे पाठवते. त्यामुळे निधीची कमतरता असणाऱ्या जिल्हा सहकारी बँकांना निधीची उपलब्धता होते.

**१०) देखरेख / पर्यवेक्षण :**

भारतातील राज्य सहकारी बँका जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांवर देखरेख करण्याचे कार्य करतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका योग्य प्रकारे कार्य करतात की नाही याची तपासणी करण्याचे काम राज्य सहकारी बँका करत असतात. त्यासाठी निरीक्षक किंवा पर्यवेक्षक नेमले जातात. हे निरीक्षक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना भेट देऊन जिल्हा सहकारी बँकांचे कर्जव्यवहार तपासतात. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना जिल्हा बँकांनी योग्य प्रकारे कर्जपुरवठा केला आहे की नाही, वसुली नियमित होत आहे की नाही

इत्यादी बाबींची तपासणी राज्य सहकारी बँकेचे पर्यवेक्षक करत असतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची तपासणी करून राज्य सहकारी बँकेकडून जिल्हा सहकारी बँकांना कारभाराबाबत योग्य त्या सूचना दिल्या जातात.

**११) अयोग्य कारभार करणाऱ्या बँकांवर कारवाई करणे :**

अयोग्य किंवा चुकीचा कारभार करणाऱ्या जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकावर कारवाई करण्याचेसुद्धा काम राज्य सहकारी बँकेला करावे लागते. राज्य सहकारी बँक राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना वेळोवेळी सूचना किंवा आदेश देत असते. ज्या बँका राज्य सहकारी बँकेच्या धोरणानुसार काम करत नाहीत त्या बँकांना कर्जपुरवठा न करण्याची कारवाई राज्य सहकारी बँक करत असते.

**१२) गुंतवणूकविषयक सल्ला :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आपल्याजवळील निधीची खाजगी व सरकारी रोखे खरेदी करणे, शेअर्स खरेदी करणे, ठेवी ठेवणे या स्वरूपात गुंतवणूक करत असतात. ही गुंतवणूक बुडू नये आणि गुंतवणूकीपासून परतावा चांगला मिळावा यासाठी राज्य सहकारी बँका जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना गुंतवणूकविषयक सल्ला व मार्गदर्शन देत असतात. त्यामुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना योग्य ठिकाणी गुंतवणूक करणे शक्य होते. जिल्हा बँकांच्या गुंतवणूक धोरणावर लक्ष ठेवण्याचे काम भारतातील राज्य सहकारी बँका करत असतात.

**१३) शाखा उघडणे :**

राज्य सहकारी बँका आणखी एक महत्त्वपूर्ण कार्य करत असतात आणि ते म्हणजे या बँका राज्यात आवश्यक त्या ठिकाणी आपल्या बँकेच्या शाखा उघडत असतात. त्यामुळे या बँकांना राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सहकार्य करणे सोपे जाते. तसेच शाखा विस्तारामुळे अधिकाधिक ठेवी गोळा करणेही शक्य होते.

**१४) कृषी व ग्रामीण विकासास हातभार :**

भारतातील राज्य सहकारी बँकांची आणखी एक महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे या बँका राज्याच्या कृषी आणि ग्रामीण विकासास हातभार लावत आहेत. राज्य सहकारी बँका जास्तीत जास्त कर्जपुरवठा शेती क्षेत्राला आणि ग्रामीण भागातील लघुउद्योग, कुटीरउद्योग इत्यादी उद्योगांना करतात. त्यामुळे शेती क्षेत्राचा आणि लहान लहान उद्योगांचा विकास घडून येण्यास मदत होत आहे. राज्य सहकारी बँका कृषी क्षेत्राला जिल्हा सहकारी बँकांच्या मार्फत अल्प आणि मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करतात. पशुधन (दुभती जनावरे, बैल) खरेदी करणे, जनावरांसाठी शेड किंवा गोठे बांधणे, कृषीमाल साठवणुकीसाठी गुदामे बांधणे, शेतजमिनीत सुधारणा करणे (बंधबंदिस्ती, सपाटीकरण करणे) इत्यादींसाठी राज्य सहकारी बँका कर्जपुरवठा करतात. त्यामुळे शेतीचा विकास घडून येण्यास मदत होत आहे.

**१५) प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांचा अभ्यास :**

भारतात सुमारे एक लाख प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन झाल्या आहेत. या संस्था

गावपातळीवर / खेड्यात काम करतात. या कृषी पतसंस्थांचा शेतकऱ्यांशी थेट संबंध येत असतो. म्हणून या संस्थांनी चांगले काम करून शेतकऱ्यांचा विश्वास संपादन करण्याची गरज असते. या संस्थांनी जर चांगले काम केले नाही तर शेतकरी या संस्थांकडे पाठ फिरवून सावकारांच्या दारात जातील. म्हणून राज्य सहकारी बँका गावपातळीवरील प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांचा अभ्यास करून त्यांच्या अडचणी किंवा समस्या किंवा त्यांच्या कार्यपद्धतीतील दोष दूर करण्याचे काम करत असतात. राज्य सहकारी बँकांचे हे काम कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**सारांश :** अशा प्रकारे भारतातील राज्य सहकार बँका राज्यातील कृषी क्षेत्राच्या विकासासाठी आणि ग्रामीण विकासासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. या बँका राज्यातील सहकारी चळवळीचे / सहकारी संस्थांचे नेतृत्त्व करतात. सहकारी चळवळीला योग्य दिशा देण्याचे, सहकारी चळवळीला मार्गदर्शन करण्याचे, राज्यात सहकाराचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम करतात. म्हणून राज्य सहकारी बँकांची राज्याच्या आर्थिक व सामाजिक विकासातील भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते.

**राज्य सहकारी बँकेचे दोष / समस्या / प्रश्न / अडचणी :**

राज्य सहकारी बँका राज्याच्या कृषी विकासात, ग्रामोद्योगांच्या विकासात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असल्या तरी या बँकांच्या कार्यपद्धतीत काही दोष आहेत. या बँकांना काही समस्यांना किंवा अडचणींना तोंड द्यावे लागते. त्या समस्या आणि दोष यांची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहे.

**१) थकबाकीची समस्या :**

भारतातील काही राज्य सहकारी बँकांना थकबाकीची समस्या भेडसावते. शेतकरी कर्जफेड करू शकले नाहीत तर कृषी पतपुरवठा संस्था जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची कर्जे परत करू शकत नाहीत. त्यामुळे जिल्हा बँका राज्य सहकारी बँकांची कर्जे परत करू शकत नाहीत. नैसर्गिक आपत्ती, सरकारकडून कर्जमाफीची अपेक्षा इत्यादी कारणामुळे शेतकरी संपूर्ण कर्जे परत करू शकत नाहीत. त्यामुळे पतपुरवठा संस्था, जिल्हा सहकारी बँका आणि राज्य सहकारी बँकांना थकबाकीच्या समस्येला तोंड द्यावे लागते.

**२) भांडवलाची समस्या :**

भारतातील अनेक राज्य सहकारी बँकांना भांडवलाच्या समस्येला तोंड द्यावे लागते. राज्य सहकारी बँकाजवळ स्वत:चे भांडवल कमी प्रमाणात आहे. त्यामुळे त्यांना अपुऱ्या भांडवलाची समस्या जाणवते. अपुऱ्या भांडवलामुळे राज्य सहकारी बँकांना रिझर्व बँकेकडून (देशाच्या मध्यवर्ती बँकेकडून) किंवा सरकारकडून निधी घेऊन राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना कर्जपुरवठा करावा लागतो.

**३) देखरेख / पर्यवेक्षण सुविधा अपुरी:**

भारतातील काही राज्य सहकारी बँकांना भेडसावणारी आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे या बँकांकडे पुरेशी देखरेख किंवा पर्यवेक्षण सुविधा नाही. राज्य सहकारी बँकांना राज्यातील जिल्हा मध्यवर्ती

सहकारी बँकांची नियमित तपासणी करावी लागते. त्याला पर्यवेक्षण असे म्हणतात. परंतु त्यासाठी मोठ्या प्रमाणात कर्मचारी वर्ग लागतो. राज्य सहकारी बँकांना पर्यवेक्षक किंवा तपासणीस यांची कमतरता जाणवते. त्यामुळे राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची तपासणी वेळेवर पूर्ण होत नाही.

**४) वैयक्तिक कर्जपुरवठा :**

राज्य सहकारी बँकांनी व्यक्तींना कर्जपुरवठा न करता केवळ संस्थांना (सहकारी बँका व इतर प्रकारच्या सहकारी संस्था) कर्जपुरवठा करावा असे रिझर्व बँकेचे आदेश आहेत. तरीही भारतातील काही राज्य सहकारी बँकांनी रिझर्व बँकेचे आदेश न पाळता व्यक्तींना कर्जपुरवठा केला आहे. राज्य सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीतील हा प्रमुख दोष आहे.

**५) असमतोल विकास :**

भारतातील राज्य सहकारी बँकावर केली जाणारी आणखी एक टीका म्हणजे या बँकांचा सर्व राज्यात सारखा विकास झालेला नाही. महाराष्ट्र, गुजरात, पंजाब, तामिळनाडू इत्यादी राज्यात या बँकांनी चांगली कामगिरी केली आहे. तुलनेने आसाम, बिहार या राज्यात या बँकांची कामगिरी (प्रगती) फारशी समाधानकारक नाही.

**६) कर्जपुरवठा चुकीच्या पद्धतीने :**

कर्जपरतफेडीची क्षमता पाहून जर कर्ज दिले तर कर्ज बुडत नाही. परंतु काही राज्य सहकारी बँका कर्जपुरवठा करताना कर्जपरतफेडीची क्षमता पाहून कर्जपुरवठा करत नाहीत. त्यामुळे काही सहकारी संस्था राज्य सहकारी बँकांना वेळेत कर्ज परत करू शकत नाहीत. अशा प्रकारे काही राज्य सहकारी बँका जिल्हा बँकांना आणि सहकारी संस्थांना कर्जपुरवठा करताना त्यांची कर्ज परतफेड करण्याची क्षमता विचारात घेत नाहीत. त्यामुळे राज्य बँकांची वसुली शंभर टक्के होत नाही.

**७) राजकारणाचा शिरकाव :**

भारतातील बऱ्याच राज्य सहकारी बँकांमध्ये राजकारणाचा शिरकाव झाला आहे. राज्य सहकारी बँक आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी किंवा आपल्या कब्जात ठेवण्यासाठी राजकीय पक्ष व नेतेमंडळी प्रयत्न करत असतात. त्यामुळे सामान्य जनतेला या बँकेबद्दल फारशी आस्था वाटत नाही. राज्य सहकारी बँकांवरील राजकीय प्रभाव दिवसेंदिवस वाढत असल्याने कर्जमंजुरीसारख्या बाबी पारदर्शकपणे पार पडत नाहीत. विरोधी गटाच्या संस्थांना कर्जे विलंबाने मंजूर केली जातात.

**८) राखीव निधीचा अयोग्य वापर :**

अडचणीच्या काळात बँकेला राखीव निधीचा वापर करता येतो. अडचणींना तोंड देता यावे यासाठी राज्य सहकारी बँका विविध प्रकारचे राखीव निधी निर्माण करत असतात. या राखीव निधीचा उपयोग कर्जे देण्यासाठी

करता येत नाही. परंतु काही राज्य सहकारी बँका आपल्याजवळील राखीव निधीचा उपयोग कर्जे देण्यासाठी करतात. म्हणजे राखीव निधीचा चुकीचा किंवा अयोग्य वापर करतात.

**९) अनअनुभवी, अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांची भरती :**

राज्य सहकारी बँकावर राजकीय पक्षांचा मोठा प्रभाव असतो. त्यामुळे मर्जीतल्या लोकांची कर्मचारी म्हणून भरती केली जाते. बरेचसे उमेदवार हे अनुभव नसणारे आणि अप्रशिक्षित असतात. त्यांना सहकारी बँकिंगचे फारसे ज्ञान नसते. त्याचा परिणाम त्यांच्या कामकाजावर / कार्यक्षमतेवर प्रतिकूल होतो.

**१०) कर्जवापरावर नियंत्रण ठेवण्यात अपयश :**

राज्य सहकारी बँका जिल्हा मध्यवर्ती सहकार बँकांना कर्जपुरवठा करत असतात. जिल्हा बँका हे कर्ज जिल्ह्यातील प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांना देत असतात. या कर्जाचे वाटप जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका योग्य प्रकारे करतात की नाही हे पाहण्याचे काम राज्य सहकारी बँकेचे असते. परंतु काही राज्य सहकारी बँकांना हे कार्य करण्यात फारसे यश आलेले दिसून येत नाही. त्यामुळे जिल्हा सहकारी बँकांकडून कृषी पतपुरवठा संस्थांना योग्य प्रकारे कर्जाचे वाटप होत नाही. त्यामुळे थकबाकीची किंव वसुलीची समस्या निर्माण होते.

**११) अयोग्य गुंतवणूक :**

भारतातील काही राज्य सहकारी बँका राजकीय दबावापोटी चुकीची / अयोग्य गुंतवणूक करतात असे आढळून आले आहे. राज्य सहकारी बँकांनी सहकारी संस्थांचे शेअर्स (भागभांडवल) विकत घेऊ नये असे रिझर्व्ह बँकेने राज्य सहकारी बँकांना सांगितले आहे. तरीही काही राज्य सहकारी बँकांनी रिझर्व्ह बँकचे आदेश न पाळता सहकारी संस्थांच्या शेअर्समध्ये गुंतवणूक केली आहे. हा राज्य सहकारी बँकांच्या कारभारातील महत्त्वाचा दोष आहे.

**सारांश :** अशा प्रकारे वर स्पष्ट केल्याप्रमाणे राज्य सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीत काही दोष आहेत. तसेच या बँकांना काही समस्यांनाही तोंड द्यावे लागते. उदाहरणार्थ अपुऱ्या भांडवलाची समस्या, थकबाकीची समस्या. या समस्यांना राज्य सहकारी बँकांना तोंड द्यावे लागते.

**राज्य सहकारी बँकांचे दोष / समस्या / अडचणी दूर करण्यासाठी उपाय :**

भारतातील राज्य सहकारी बँकांची राज्याच्या कृषी आणि ग्रामीण विकासातील भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. म्हणून राज्य सहकारी बँकांच्या कारभारातील दोष आणि या बँकांना भेडसावणाऱ्या समस्या यांचे निराकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. राज्य सहकारी बँकांचे दोष / समस्या आणि अडचणी दूर करण्यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**१) प्रशिक्षण सुविधा :**

राज्य सहकारी बँकांनी आपल्या कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार सतत प्रशिक्षण द्यावे. कर्मचाऱ्यांची

कार्यक्षमता वाढेल अशा प्रकारे प्रशिक्षण व्यवस्था करावी. यामुळे राज्य सहकारी बँक कर्मचाऱ्यांकडून ग्राहकांना चांगल्या सेवा मिळू शकतील.

**२) पर्यवेक्षण व्यवस्था गतिमान करणे आवश्यक :**

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची तपासणी करण्याचे, बँकांच्या कारभारावर लक्ष ठेवण्याचे काम राज्य सहकारी बँकांना करावे लागते. परंतु काही राज्य सहकारी बँकांकडे पर्यवेक्षण सुविधा चांगली नाही. पर्यवेक्षक, तपासणी वेळेवर व पुरेशी होत नाही. तरी राज्य सहकारी बँकांनी आपली पर्यवेक्षण व्यवस्था गतिमान करणे आवश्यक आहे. पर्यवेक्षकांची (तपासणीसांची) पुरेशा प्रमाणात नेमणूक करून त्यांच्यामार्फत जिल्हा सहकारी बँकांची तपासणी वेळच्या वेळी करून घ्यावी. त्यामुळे जिल्हा बँकांचा कारभार सुधारण्यास मदत होईल.

**३) थकबाकी कमी करण्यावर भर देणे आवश्यक :**

भारतातील काही राज्य सहकारी बँकांची थकबाकी मोठी आहे. या बँकांनी आपली थकबाकी वाढणार नाही, ती कमी होईल याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. थकबाकीचे प्रमाण जास्त असेल तर बँकेची जनमाणसातील प्रतिष्ठा कमी होते. थकबाकी जास्त असणाऱ्या बँकेत ठेवी ठेवण्यास लोक घाबरतात. कर्जे बुडाली तर आपल्या ठेवी बुडतील अशी भीती त्यांना वाटते. म्हणून राज्य सहकारी बँकांनी थकबाकी कमी करण्यावर भर दिला पाहिजे. आपली कर्ज वसुली यंत्रणा अधिक गतिमान करावी. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांच्या कर्ज वितरणाकडे लक्ष द्यावे. त्यामुळे कर्ज वसुली चांगल्या प्रकारे होऊन थकबाकीचे प्रमाण कमी होईल.

**४) ठेवीत वाढ होणे आवश्यक :**

राज्य सहकारी बँकांच्या ठेवीत दिवसेंदिवस वाढ होत आहे. तरीही या बँकांच्या ठेवीत अजूनही वाढ होणे आवश्यक आहे. कित्येक शेतकरी सहकारी बँकांचे कर्ज घेतात. परंतु ठेवी मात्र सरकारी बँकेत किंवा राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकेत ठेवतात अशी समाजात चर्चा आहे. म्हणून सहकारी क्षेत्राचा लाभ घेणाऱ्यांनी आपल्या ठेवी सुद्धा जिल्हा सहकारी बँकेत, राज्य सहकारी बँकेत ठेवणे आवश्यक आहे. राज्य सहकारी बँकांच्या ठेवीत वाढ झाल्यास राज्य सहकारी बँकांचे सरकारवरील अवलंबित्व कमी होऊ शकते. तसेच या बँका जिल्हा सहकारी बँकांना पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठाही करू शकतील. म्हणून राज्य सहकारी बँकांनी ठेवीत वाढ करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

**५) कर्जमंजुरी त्वरित करणे आवश्यक :**

काही राज्य सहकारी बँका विविध कारणामुळे त्वरित कर्ज प्रकरणे मंजूर करत नाहीत. राज्य सहकारी बँकांनी आपल्या कारभारातील हा दोष काढून टाकला पाहिजे. राज्य बँकांनी कर्जप्रकरणे त्वरित मंजूर केली पाहिजेत. तसेच पुरेशा प्रमाणात (मागणीइतका) कर्जपुरवठा केला पाहिजे.

**६) जास्तीत जास्त तज्ज्ञ लोकांची संचालक मंडळावर नेमणूक करणे आवश्यक :**

राज्य सहकारी बँकांचा कारभार अधिक कार्यक्षमतपणे चालावा यासाठी राज्य सहकारी बँकांच्या

संचालक मंडळावर कृषी, सहकार, बँकिंग, उद्योग इत्यादी विविध क्षेत्रातील जास्तीत जास्त तज्ज्ञ व्यक्तींची संचालक मंडळावर नेमणूक केली पाहिजे. संचालक मंडळात ४०% पेक्षा अधिक संचालक हे विविध क्षेत्रातील तज्ज्ञ असावेत व त्यांची नेमणूक त्यांची तज्ञता, गुणवत्ता आणि सहकारी चळवळीविषयी असलेली आस्था यांचा विचार करून करण्यात यावी. अशा प्रकारे सरकारने जास्तीत जास्त तज्ज्ञ लोकांना राज्य सहकारी बँकेच्या संचालक मंडळावर स्वीकृत संचालक म्हणून नेमावे. यामुळे राज्य सहकारी बँकांचे कामकाज (व्यवस्थापन) सुधारण्यास मदत होईल.

**७) आदेश न पाळणाऱ्या बँकांवर कडक कारवाई करणे :**

गुंतवणुकीबाबत, कर्ज वाटपाबाबत आणि इतर बँकिंग व्यवहाराबाबत देशाची मध्यवर्ती बँक (रिझर्व बँक ऑफ इंडिया) देशातील राज्य सहकारी बँकांना वेळोवेळी सूचना किंवा काही आदेश देत असते. परंतु काही राज्य सहकारी बँका रिझर्व बँकचे आदेश पाळत नाहीत. त्यामुळे बँका अडचणीत येतात. म्हणून सर्व राज्य सहकारी बँकांनी रिझर्व बँकेचे आदेश पाळले पाहिजेत. ज्या राज्य सहकारी बँका रिझर्व बँकेचे आदेश पाळणार नाहीत त्यांच्यावर रिझर्व बँकेने कडक कारवाई करणे आवश्यक आहे.

**८) समतोल विकासासाठी प्रयत्न आवश्यक :**

भारतातील सर्व राज्यात राज्य सहकारी बँकांची प्रगती सारख्या प्रमाणात झालेली नाही. काही राज्यात राज्य सहकारी बँकांनी चांगली प्रगती केलेली आहे. परंतु ईशान्येपूर्वेकडील काही राज्यात या बँकांची कामगिरी समाधानकारक नाही. तरी सरकारने या बँकांचे राज्याच्या कृषी व ग्रामीण विकासातील महत्त्व लक्षात घेऊन या बँकांची ज्या राज्यात कामगिरी समाधानकारक नाही त्या राज्यातील राज्य बँकांना सर्व प्रकारची मदत देऊन या बँकांची प्रगती घडवून आणावी. कारण सहकारी पतपुरवठा रचनेत राज्य सहकारी बँकांचे स्थान किंवा भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**९) गुंतवणूक धोरण काळजीपूर्वक आखणे आवश्यक :**

चुकीची किंवा अयोग्य गुंतवणूक केली तर गुंतवणूक बुडण्याचा धोका असतो. काही राज्य सहकारी बँका रिझर्व बँकेने मार्गदर्शन केल्यानुसार गुंतवणूक करत नाहीत. त्यामुळे गुंतवणूक बुडते किंवा गुंतवणूकीपासून परतावा फारसा मिळत नाही. म्हणून सहकारी बँकांनी रिझर्व बँकेने घालून दिलेल्या नियमानुसार गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

**१०) राजकीय प्रभाव कमी होणे आवश्यक :**

राज्य सहकारी बँका ह्या कृषी आणि ग्रामीण विकासासाठी (ग्रामीण भागातील उद्योग, कुटिर उद्योग, हस्तोद्योग, मध्यम उद्योग यांच्या विकासासाठी) स्थापन करण्यात आलेल्या आहेत. म्हणून या बँकांनी अधिक चांगले काम करण्यासाठी या बँकावरील राजकीय प्रभाव कमी होणे आवश्यक आहे. संचालक मंडळाची निवडणूक झाल्यानंतर या बँकांनी राजकारणविरहित काम केले पाहिजे. कर्जमंजुरी करताना, नोकरभरती करताना राजकारण, गट, तट बघता कामा नये. तरच या बँकांची कार्यक्षमता आणि उपयुक्तता वाढणार आहे.

**सारांश :** अशा प्रकारे राज्य सहकारी बँकांचा कारभार सुधारण्यासाठी, या बँकांना भेडसावणाऱ्या समस्या किंवा अडचणी नाहीशा करण्यासाठी काही उपाय वरीलप्रमाणे सुचवले आहेत. या बँकांना सहकारी पतपुरवठा रचनेत अत्यंत महत्त्वाचे (सर्वोच्च) स्थान आहे. कृषी क्षेत्राला आणि सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना या बँका अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करत असल्याने व या कर्जाची मागणी दिवसेंदिवस वाढत असल्याने राज्य सहकारी बँकांच्या कारभारातील दोषांचे आणि त्यांच्यापुढील समस्यांचे निराकरण होणे अत्यंत आवश्यक आहे.

### १.२.४ नागरी सहकारी बँका (Urban Co-operative Banks) :

**प्रास्ताविक,**

गावपातळीवर सहकारी तत्त्वावर बँकिंगची कार्ये करणाऱ्या सहकारी बँकेस 'प्राथमिक सहकारी बँक' (Primary Co-operative Bank) असे म्हणतात. आणि बँकेऐवजी तिचे स्वरूप पतसंस्था असे असेल तर त्यास 'प्राथमिक सहकारी पतसंस्था' (Primary Co-operative Society) असे म्हणतात. गावपातळीवर किंवा खेड्यात शेतकऱ्यांनी स्थापन केलेल्या सहकारी पतसंस्थेस 'प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था' (Primary Agricultural Co-operative Credit Societies - PACCS) असे म्हणतात. तर शहरात स्थापन झालेल्या सहकारी बँकेस 'नागरी सहकारी बँक' (Urban Co-operative Bank) असे म्हणतात. आणि ही जर पतसंस्था असेल तर त्या पतसंस्थेला 'नागरी सहकारी पतसंस्था' (Urban Co-operative Credit Society) असे म्हणतात.

**व्याख्या :**

नागरी सहकारी बँकेची व्याख्या खालील शब्दात स्पष्ट केली आहे.

''**शहरातील व्यापारी, व्यावसायिक, उद्योजक, नोकरदार यांनी स्थापन केलेल्या आणि शहरी भागात सहकारी तत्त्वावर बँकिंगची कार्ये करणाऱ्या बँकेला नागरी सहकारी बँक (Urban Co-operative Bank) असे म्हणतात.**''

वरील व्याख्येप्रमाणेच नागरी सहकारी पतसंस्थेची व्याख्यासुद्धा आपणास करता येईल. ती पुढील शब्दात स्पष्ट केली आहे.

''**ज्या पतसंस्थेचे कार्यक्षेत्र शहर हे असते आणि जी पतसंस्था शहरातील लोकांच्या ठेवी स्वीकारणे, त्यांना कर्जपुरवठा करणे या कार्याबरोबरच बँकिंगची इतर कार्येसुद्धा करते त्या सहकारी पतसंस्थेस नागरी सहकारी पतसंस्था (Urban Co-operative Bank) असे म्हणतात.**''

**१९४९ चा बँकिंग रेग्युलेशन अ‍ॅक्ट :**

१९४९ चा बँकिंग रेग्युलेशन अ‍ॅक्ट १ मार्च, १९६६ पासून नागरी सहकारी बँकांना लागू करण्यात आला आहे. या अ‍ॅक्टमध्ये नागरी सहकारी पतसंस्थेची व्याख्या दिली असून ती खालील शब्दात दिली आहे.

**''ज्या पतसंस्थेचा हेतू बँकिंग व्यवसाय करणे हा आहे, ज्या पतसंस्थेचे भागभांडवल आणि निधी यांचे एकूण मूल्य १ लाख रुपयापेक्षा कमी नाही आणि ज्या संस्थेच्या पोटनियमात इतर सहकारी संस्थांना सभासदत्व देण्याची तरतूद नाही त्या पतसंस्थेला नागरी सहकारी पतसंस्था असे म्हणतात.''**

१९४९ च्या बँक नियमन कायद्यात नागरी सहकारी बँकांना 'प्राथमिक सहकारी बँका' असे म्हटले आहे.

**रिझर्व बँक :**

रिझर्व बँकेने १९५७-५८ मध्ये नागरी सहकारी बँकांची पाहणी केली. त्या पाहणीचा अहवाल (रिपोर्ट ऑन दि सर्व्हे ऑफ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स) रिझर्व बँकेने १९६१ मध्ये प्रसिद्ध केला. त्या अहवालात नागरी सहकारी बँकेची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''ज्या बँकेचे किमान भागभांडवल २०,००० रुपये आहे, ज्या बँकेचे पैसे धनादेशाद्वारे** (Cheque) **काढता येतात, पैसे दुसरीकडे पाठवण्याची सुविधा आहे, बँकिंगची इतर कार्ये केली जातात आणि नियमानुसार तरते भांडवल राखण्याची क्षमता आहे अशा सहकारी बँकेला नागरी सहकारी बँक असे म्हणतात.''**

**मेहता आणि भन्साळी समिती :**

१९३९ च्या मेहता आणि भन्साळी समितीने नागरी सहकारी पतसंस्थेची किंवा नागरी सहकारी बँकेची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''२०,००० रुपये किंवा त्यापेक्षा अधिक भागभांडवल असणारी, चालू खात्यावर ठेवी स्वीकारणारी, धनादेश आणि डिमांड ड्राफ्टद्वारे पैसे परत करणारी शहरातील संस्था म्हणजे नागरी सहकारी पतपुरवठा संस्था किंवा नागरी सहकारी बँक होय.''**

**माधवदास समिती :**

१९७९ च्या माधवदास समितीने नागरी सहकारी बँकेची व्याख्या देताना शहरांची खूप मोठी शहरे, नागरी विभाग आणि अर्धनागरी विभाग असे प्रकार पाडले आहेत. ज्या शहरांची लोकसंख्या १०लाखापेक्षा अधिक आहे त्या शहरांना खूप मोठी शहरे असे माधवदास समितीने मानले आहे. १ लाख ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांना नागरी विभाग असे म्हटले आहे. तर ज्या शहरांची / गावांची लोकसंख्या १ लाखापर्यंत आहे त्या शहरांना अर्थनागरी विभाग असे म्हटले आहे. त्यानुसार माधवदास समितीने नागरी सहकारी बँकेची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे.

**''ज्या मोठ्या शहरातील पतपुरवठा संस्थांचे सुरवातीचे भागभांडवल चार लाख रुपये आहे, नागरी विभागातील पतपुरवठा संस्थांचे सुरवातीचे भागभांडवल तीन लाख रुपये आहे आणि अर्धनागरी विभागातील ज्या पतपुरवठा संस्थांचे सुरवातीचे भागभांडवल १,५०,००० रुपये आहे अशा पतपुरवठा संस्थांना नागरी सहकारी पतपुरवठा संस्था असे म्हणतात किंवा नागरी सहकारी बँका असे म्हणतात.''**

**सर्वसाधारण व्याख्या :**

**''ज्या सहकारी बँकांचे किंवा पतपुरवठा संस्थांचे कार्यक्षेत्र शहर हे असते आणि ज्यांची स्थापना शहरातील मध्यमवर्गीय, सधन लोक किंवा व्यावसायिक, दुकानदार करत असतात अशा सहकारी बँकेला किंवा पतपुरवठा संस्थेला नागरी सहकारी बँक किंवा नागरी सहकारी पतपुरवठा संस्था असे म्हणतात.''**

**सहकार नियोजन समिती :**

१९४६ च्या सहकार नियोजन समितीने (Co-operative Planning Committee, 1946) नागरी सहकारी पतसंस्थेची आणि नागरी सहकारी बँकेची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''जी संस्था लोकांच्या ठेवी स्वीकारण्याचे कार्य करते आणि जिचे वसूल भागभांडवल २०,००० रुपये आहे, जी संस्था सहकार खात्याच्या नियमानुसार काम करते आणि निव्वळ नफ्याच्या १/३ रक्कम रिझर्व फंडात ठेवते त्या संस्थेला नागरी सहकारी पतसंस्था किंवा नागरी सहकारी बँक असे म्हणतात.''**

**व्ही. पी. वर्दे समिती :**

व्ही. पी. वर्दे यांच्या अध्यक्षतेखाली सन १९६३ मध्ये बिगर शेती पतपुरवठा अभ्यासगटाची नेमणूक करण्यात आली होती. या अभ्यासगटाने नागरी सहकारी पतसंस्थेची / नागरी सहकारी बँकेची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''शहरातील आणि निमशहरी भागातील ज्या संस्थेला सहकार कायद्याची मान्यता असते (म्हणजे ज्या संस्थेची नोंदणी सहकार कायद्याखाली झालेली असते), जी संस्था बँकिंगची कामे करते आणि ज्या संस्थेचे वसूल भागभांडवल ५०,००० रुपयापर्यंत असते अशा संस्थेला नागरी सहकारी पतपुरवठा संस्था किंवा नागरी सहकारी बँक असे म्हणतात.''**

कृषी क्षेत्राला जशी कर्जाची गरज असते त्याप्रमाणे शहरातील व्यापारी, व्यावसायिक (डॉक्टर, वकील, इंजिनिअर्स इत्यादी), नोकरदार, उद्योजक यांनासुद्धा कर्जाची गरज असते. म्हणून शहरातील व्यापारी किंवा नोकरदार एकत्र येऊन ज्या सहकारी बँका किंवा सहकारी पतसंस्था स्थापन करतात त्या बँकांना नागरी सहकारी बँका किंवा नागरी सहकारी पतसंस्था असे म्हणतात. शहरात अनेक प्रकारचे लोक वास्तव्य करत असतात. त्यामध्ये व्यापारी, कारखानदार, नोकरदार, वकील, डॉक्टर, अभियंते, बांधकाम व्यावसायिक (बिल्डर) इत्यादींचा समावेश होतो. हे सर्व लोक एकत्र येऊन किंवा स्वतंत्रपणे सहकारी तत्त्वावर पतसंस्था किंवा बँक स्थापन करतात, त्या पतसंस्थेला किंवा बँकेला नागरी सहकारी पतसंस्था किंवा नागरी सहकारी बँक असे म्हणतात. भारतात व्यापाऱ्यांच्या, नोकरदारांच्या, वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्यांच्या, दुकानदारांच्या, वकीलांच्या अशा वेगवेगळ्या नागरी सहकारी बँका किंवा नागरी सहकारी पतसंस्था दिसून येतात. या बँका किंवा पतसंस्था आपल्या सभासदांना कर्जे देतात. तसेच त्यांच्या ठेवी स्वीकारतात. भारतात सध्या १५२७ शहरी सहकारी बँका आहेत. अशा प्रकारे **शहरी भागातील मध्यमवर्गीय लोकांनी आपल्या कर्जविषयक गरजा भागवण्यासाठी**

**सहकारी तत्त्वावर स्थापन केलेल्या पतसंस्थेस किंवा बँकेस नागरी सहकारी पतसंस्था किंवा नागरी सहकारी बँक म्हणतात.**

**उगम (Orgin) :**

जगात सर्वप्रथम जर्मनी या देशात नागरी सहकारी पतपुरवठा चळवळ सुरू झाली. हर्बल शुल्स (जर्मनीतील एक निवृत्त न्यायाधीश) यांनी जर्मनीमध्ये नागरी पतपुरवठा संस्था सहकारी तत्त्वावर सन १८५५ मध्ये स्थापन केली. त्यानंतर इटली या देशात लुईगी लुझ्झाही यांनी नागरी सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन केली. या संस्थांना यश लाभल्यामुळे जगातील अनेक देशांनी आपापल्या देशात नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्यास सुरवात केली. भारतात दिनांक ५ फेब्रुवारी, १८८९ रोजी श्री. विठ्ठल लक्ष्मण कवठेकर यांनी बडोदा या ठिकाणी सयाजीमहाराज गायकवाड यांच्या मदतीने आणि आशीर्वादाने 'अन्योन्य सहाय्यकारी मंडळ, बडोदा' (परस्पर सहाय्यक संस्था) स्थापन केली. या बँकेला भारतातील पहिली नागरी सहकारी बँक मानतात. पुढे या बँकेला १९०४ चा सहकार कायदा लागू झाला. त्यामुळे कायदेशीर दर्जा मिळाला. १८८२ मध्ये न्यायामूर्ती महादेव गोविंद रानडे यांनी नागरी सहकारी पतसंस्था स्थापन केली होती. भारतात ऑक्टोबर १९०४ मध्ये तत्कालीन मद्रास राज्यातील कांजीवरम येथे नागरी पतसंस्था स्थापन झाली. तिला भारतातील पहिली नागरी सहकारी पतसंस्था असे म्हणतात. त्यावेळच्या मुंबई प्रांतातील धारवाड जिल्ह्यातील बेटेगीरी या ठिकाणी ऑक्टोबर, १९०५ मध्ये नागरी सहकारी पतसंस्था स्थापन झाली. तिचे नाव 'बेटेगिरी सहकारी पतपुरवठा संस्था' असे होते. तत्कालीन म्हैसूर राज्यातील बेंगलोर शहरात डिसेंबर, १९०५ मध्ये नागरी सहकारी पतसंस्था स्थापन झाली. तिचे नाव 'बंगलोर सिटी को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी' असे होते. १९१५ च्या मॅक्लेगन समितीने नागरी सहकारी पतसंस्थांचे महत्त्व स्पष्ट करून भारतात नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करण्याची शिफारस केली होती. त्यामुळे भारतात नागरी सहकारी पतसंस्था आणि बँका स्थापन करण्यास प्रेरणा मिळाली. पुढे १९३१ च्या 'इंडियन सेंट्रल बँकिंग इनक्वायरी कमिटीने नागरी सहकारी पतसंस्थांचे महत्त्व अधोरेखित केले. १९३९ च्या मेहता-भन्साळी समितीने नागरी सहकारी पतसंस्थांच्या / बँकांच्या स्थापनेसंदर्भात अनुकूल मते मांडली. १९४५ च्या सरैय्या कमिटीने सुद्धा नागरी सहकारी पतसंस्थांचे महत्त्व स्पष्ट केले. १९५० च्या अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समितीने सुद्धा नागरी सहकारी बँकांचे समर्थन केले. १९६३ ची वर्दे समिती, १९६८ ची पी. एन. डमरी समिती (रिझर्व बँकेचे माजी डेप्युटी गव्हर्नर), १९७२ ची रमणलाल सरैय्या समिती (बँकिंग कमिशन), १९७७ ची 'कमिटी ऑन अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स', माधवदास समिती इत्यादी समित्यांनी नागरी सहकारी पतसंस्थेच्या स्थापनेला प्रोत्साहन दिले. त्यामुळे भारतात नागरी सहकारी पतसंस्था स्थापन होऊ लागल्या. १९४९ चा Banking Regulation Act नागरी सहकारी पतसंस्थांना १ मार्च, १९६६ पासून लागू करण्यात आला आहे. अशा प्रकारे भारतात ब्रिटिश राजवटीत नागरी सहकारी बँकांचा पाया घातला गेला असून आज या बँकांनी देशात खूप चांगली प्रगती केली असल्याचे दिसून येते.

**भारतातील नागरी सहकारी बँकांचे प्रकार :**

भारतातील नागरी सहकारी बँकांना बिगर शेती पतपुरवठा संस्था असे म्हणतात. रिझर्व बँक ऑफ इंडिया ही भारताची मध्यवर्ती बँक असून या बँकेच्या शेती पतपुरवठा विभागाने नागरी सहकारी बँकांचे / नागरी सहकारी पतपुरवठा संस्थांचे तीन प्रकार खालीलप्रमाणे सांगितले आहेत.

**नागरी सहकारी बँकांचे प्रकार**

| नागरी बँक (Urban Bank) | पगारदार नोकरांच्या पतसंस्था (Salary Earners Societies) | काटकसर व पतपुरवठा संस्था (Thrift and Credit Societies) |
|---|---|---|

**१) सर्वसाधारण नागरी सहकारी बँका** (General Urban Co-operative Banks) **:**

शहरात, निमशहरात स्थापन झालेल्या आणि बँकिंगचा व्यवसाय करणाऱ्या सहकारी बँकांना प्रामुख्याने नागरी सहकारी बँका असे म्हणतात. सभासद आणि बिगर सभासदांच्या ठेवी स्वीकारणे, कर्जपुरवठा करणे, हुंड्या वटवणे इत्यादी विविध प्रकारची बँकिंगची कार्ये (व्यापारी बँकांची कार्ये) नागरी सहकारी बँका करत असतात. या नागरी सहकारी बँकांचे सभासद शहरातील नोकरी करणारे, व्यापारी, व्यावसायिक असतात. म्हणून या नागरी सहकारी बँकांना सर्वसाधारण नागरी बँका असे म्हणतात.

**२) पगारदार नोकरांच्या सहकारी पतपुरवठा संस्था** (Salary Earners Co-operative Credit Societies) **:**

खाजगी, शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना पगारदार किंवा नोकरदार असे म्हणतात. खाजगी कंपन्यामध्ये, सरकारच्या विविध भागात लोक काम करत असतात. उदाहरणार्थ सरकारच्या पाटबंधारे खात्यात काम करणारे कर्मचारी एकत्र येऊन पाटबंधारे कर्मचारी सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन करत असतात. एखाद्या शिक्षणसंस्थेतील कर्मचारी (शिक्षक, शिपाई, क्लार्क इत्यादी) एकत्र येऊन नागरी सहकारी पतसंस्था किंवा नागरी सहकारी बँक स्थापन करत असतात. पगारदार लोकांना दर महिन्याला पगार मिळत असतो. हे पगारदार लोक एकत्र येऊन पतपुरवठा संस्था स्थापन करतात आणि आपल्या सभासदांना घरबांधणीचे कर्ज, शैक्षणिक कर्ज, फर्निचर व इतर उपभोग्य वस्तू खरेदीसाठी कर्ज देत असतात आणि इतर बँकिंगची कार्ये या संस्था करत असतात.

**३) काटकसर सहकारी पतपुरवठा संस्था** (Thrift Credit Co-operative Credit Societies) **:**

काटकसर सहकारी पतपुरवठा संस्था प्रामुख्याने कमी किंवा मर्यादित उत्पन्न असणाऱ्या व्यक्ती (व्यापारी, कारागीर, कामगार इत्यादी) स्थापन करत असतात. उत्पन्नातून काटकसर करून बचत करणे किंवा सभासदांना काटकसरीची (बचतीची) सवय लावणे आणि त्यांना पतपुरवठा करणे या उद्देशाने शहरातील किंवा निमशहरातील

मर्यादित उत्पन्न असणाऱ्या लोकांनी स्थापन केलेल्या सहकारी पतपुरवठा संस्थांना काटकसर सहकारी पतपुरवठा संस्था असे म्हणतात. कमी उत्पन्न गटातील शहरातील लोक या पतपुरवठा संस्था स्थापन करत असल्याने या संस्थांचे भागभांडवलही कमी असते. बचत करणे हा प्रमुख उद्देश या संस्था स्थापन करणाऱ्यांचा असतो.

**सारांश :** अशा प्रकारे भारतात प्रामुख्याने सर्वसाधारण नागरी सहकारी बँका, पगारदार नोकरांच्या सहकारी पतपुरवठा संस्था आणि काटकसर सहकारी पतपुरवठा संस्था अशा विविध प्रकारच्या नागरी सहकारी पतसंस्था किंवा नागरी सहकारी बँका आढळतात. भारतात या बँकांची प्रगती वेगाने होत आहे.

नागरी सहकारी बँकांचे वर्गीकरण आणखी एका प्रकारे सांगितले जाते. ते म्हणजे (अ) अनुसूचित किंवा सूचित नागरी सहकारी बँका (Scheduled Urban Co-operative Banks) आणि (ब) बिगर अनुसूचित नागरी सहकारी बँका (Non-Scheduled Urbank Co-operative Banks). नागरी सहकारी बँकांच्या या प्रकारांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**नागरी सहकारी बँकांचे प्रकार**

सूचित नागरी सहकारी बँका | बिगर सूचित नागरी सहकारी बँका

भारताच्या मध्यवर्ती बँकेने (रिझर्व बँक ऑफ इंडियाने) नागरी सहकारी बँकांचे वर स्पष्ट केल्याप्रमाणे दोन प्रकार पाडले आहेत. त्याची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहे.

**(अ) सूचित नागरी सहकारी बँका :**

सूचित नागरी सहकारी बँकांना अनुसूचित नागरी सहकारी बँका (Scheduled Urban Co-operative Banks) असे म्हणतात. सूची म्हणजे यादी. सूचीला यादी असे म्हणतात. भारतातील ज्या नागरी सहकारी बँकांचा समावेश १९३४ च्या रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या कायद्याच्या (RBI Act, 1934) दुसऱ्या अनुसूचित (यादीत) असतो, त्या बँकांना सूचित किंवा अनुसूचित नागरी सहकारी बँका असे म्हणतात. १९३४ च्या Reserve Bank of India कायद्यातील Article No. 42(6) (A) मधील अटींची पूर्तता करणाऱ्या सहकारी बँकांना नागरी सहकारी बँक असे म्हणतात. या अटी खालीलप्रमाणे आहेत.

१) त्या बँकेचे वसूल भांडवल आणि राखीव निधी २५ लक्ष रुपयापेक्षा अधिक असले पाहिजे. त्यापेक्षा कमी असू नये.

२) बँकेचे कामकाज ठेवीदारांचे अहित होईल असे असता कामा नये.

३) रोख राखीव निधीच्या विशिष्ट टक्के रक्कम बँकेने रिझर्व बँकेत ठेवली पाहिजे.

वरील अटी पूर्ण करणाऱ्या किंवा १९३४ च्या RBI Act च्या दुसऱ्या सूचीत रिझर्व बँकेने ज्या नागरी सहकारी बँकांचा समावेश केला आहे, त्या नागरी सहकारी बँकांना सूचित नागरी सहकारी बँका असे म्हणतात.

सूचित नागरी सहकारी बँकांना रिझर्व बँकेकडून काही फायदे मिळतात. उदाहरणार्थ नगारी सहकारी बँकांना रिझर्व बँकेकडून बँकरेटने कर्जे मिळतात. हुंड्या वटवून मिळतात. निरसनन केंद्राची सुविधा मिळते.

**(ब) बिगर सूचित नागरी सहकारी बँका :**

बिगर सूचित नागरी सहकारी बँकांना बिगर अनुसूचित नागरी सहकारी बँका (Non-Scheduled Urbank Co-operative Banks) असेही म्हणतात. ज्या नागरी सहकारी बँकांचा समावेश Reserve Bank of India, Act 1934 च्या दुसऱ्या अनुसूचित (यादीत) नसतो त्या बँकांना बिगर अनुसूचित नागरी सहकारी बँका असे म्हणतात. या बँका १९३४ च्या RBI Act अ 42 (6)(A) मधील वर उल्लेख केलेल्या अटींची पूर्तता करू शकत नाहीत म्हणून या नागरी सहकारी बँकांना बिगर सूचित नागरी सहकारी बँका असे म्हणतात. सूचित नागरी सहकारी बँकांना वर स्पष्ट केलेले जे फायदे मिळतात ते फायदे बिगर सूचित नागरी सहकारी बँकांना मिळत नाहीत.

**एक राज्य नागरी सहकारी बँका :**

ज्या नागरी सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र एका राज्यापुरते मर्यादित असते अशा नागरी सहकारी बँकांना एक राज्य नागरी सहकारी बँका असे म्हणतात. या बँका सूचित आणि बिगर सूचित नागरी सहकारी बँका असतात.

**बहुराज्य नागरी सहकारी बँका :**

ज्या नागरी सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र दोन किंवा त्यापेक्षा अधिक राज्यात असते, अशा नागरी सहकारी बँकांना बहुराज्य नागरी सहकारी बँका (Multistate Urban Co-operative Banks) असे म्हणतात. या बँका सूचित असतात तसेच बिगर अनुसूचित असतात किंवा ज्या नागरी सहकारी बँकांची नोंदणी 'बहुराज्य सहकारी संस्था कायदा २००२' (Multistate Co-operative Societies Act 2002) नुसार झालेली असते अशा नागरी सहकारी बँकेला बहुराज्य नागरी सहकारी बँक असे म्हणतात.

**एक शाखा बँक** (Unit Banking) **:**

एक शाखा बँकेला एकल शाखा बँक असेही म्हणतात. ज्या नागरी सहकारी बँकेची एकच शाखा असते (म्हणजे शाखा आणि मुख्य कार्यालय एकच असते) अशा बँकांना एकल नागरी सहकारी बँका असे म्हणतात. या बँकांच्या शाखा नसतात. या बँका शहरात व निमशहरी भागात काम करत असतात. त्यांचा आकार लहान असतो. एकल शाखा बँका सूचित बँका असतात. तसेच बिगर सूचित बँका असतात.

**शाखा बँक** (Branch Banking) **:**

काही नागरी सहकारी बँका शाखा उघडून काम करत असतात. त्यांच्या तालुक्यात, जिल्ह्यात, राज्यात आणि राज्याच्या बाहेरही शाखा असतात. म्हणून त्यांना शाखा बँक असे म्हणतात. या बँकांचे मुख्य कार्यालय एखाद्या शहरात असते आणि दहा-वीस किंवा त्यापेक्षा जास्त शाखा राज्यात उघडून या बँका बँकिंगचे व्यवहार

करत असतात. शाखा पद्धतीच्या नागरी सहकारी बँकांची आर्थिक क्षमता (भागभांडवल, ठेवी, कर्जव्यवहार, नफा इत्यादी) एकल पद्धतीच्या शाखा बँकापेक्षा मोठी असते. या बँकाही सूचित बँका असतात किंवा बिगर सूचित बँका असतात.

**कार्यक्षेत्र, सभासदत्व, भांडवल, व्यवस्थापन इत्यादी :**

नागरी सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र, सभासदत्व, भांडवल, व्यवस्थापन इत्यादीबाबतची माहिती थोडक्यात खालीलप्रमाणे दिली आहे.

**१) स्थापना :**

नागरी सहकारी पतसंस्था आणि नागरी सहकारी बँका ह्या प्रामुख्याने नगरात (शहरात) आणि निमशहरी भागात स्थापन होत असतात. शहरात राहणारे लोक शहरात सहकारी तत्त्वावर या बँका स्थापन करत असतात. म्हणून या बँकांना नागरी सहकारी बँका किंवा नागरी सहकारी पतसंस्था असे म्हणतात. शहरात राहणारे सर्व उत्पन्न गटातील लोक नागरी पतसंस्था किंवा नागरी सहकारी बँका स्थापन करत असतात. शहरातील दुकानदार, व्यापारी, नोकरदार अशा प्रकारच्या संस्था किंवा बँका स्थापन करत असतात.

**२) कार्यक्षेत्र :**

नागरी सहकारी बँकेचे कार्यक्षेत्र शहरापुरते मर्यादित असते. या बँकांचे कार्यक्षेत्र बँकांच्या पोटनियमात स्पष्ट केलेले असते. काही नागरी सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र एका तालुक्यापुरते किंवा जिल्ह्यापुरते असते. काही नागरी सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र एक राज्य असते. तर काही नागरी बँकांचे कार्यक्षेत्र दोन किंवा त्यापेक्षा अधिक राज्य असते. एकल पद्धतीच्या नागरी सहकारी बँकांचे किंवा नागरी पतसंस्थांचे कार्यक्षेत्र एका शहरापुरते मर्यादित असते. अनेक शहरात अशा नागरी सहकारी पतपुरवठा संस्था काम करत असतात. शाखा पद्धतीच्या नागरी सहकारी बँकांचे कार्यक्षेत्र तालुका, जिल्हा राज्य किंवा राज्याच्या बाहेर असते. या बँका ठिकठिकाणी शाखा उघडून बँकिंगचे व्यवहार करत असतात.

**३) सभासदत्व :**

शहरात राहणाऱ्या सर्वांना नागरी सहकारी बँकांचे सभासदत्व मिळते. शहरातील व्यापारी, दुकानदार, नोकरदार, डॉक्टर, वकील यासारखे व्यावसायिक या सर्वांना नागरी सहकारी बँकांचे सभासद होता येते. काही नागरी सहकारी बँका किंवा पतसंस्था विशिष्ट व्यावसायिकांच्या असतात. उदाहरणार्थ नोकरदारांच्या पतसंस्था किंवा बँका. या बँकांचे सभासदत्व फक्त नोकरदारांनाच होता येते. अशा प्रकारे व्यापारी लोकांनी स्थापन केलेल्या नागरी सहकारी पतसंस्थेचे किंवा बँकेचे सभासदत्व फक्त व्यापारी लोकांनाच मिळते. अशाच प्रकारे शहरातील नोकरदार, व्यापारी, उद्योजक, दुकानदार, डॉक्टर, वकील, अभियंते हे सर्व एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर नागरी सहकारी पतसंस्था किंवा नागरी सहकारी बँक स्थापन करत असतात.

**४) भांडवल उभारणी :**

प्रवेश फी, सभासद आणि बिगर सभासदांकडून ठेवी गोळा करून, सभासदांना शेअर्सची विक्री करून या बँका भांडवल उभारणी करतात. तसेच या बँका जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून कर्ज घेतात.

**५) व्यवस्थापन :**

नागरी सहकारी बँकांची किंवा पतसंस्थांची सर्वसाधारण सभा (General Meeting) महत्त्वाची असते. नागरी सहकारी बँकेच्या सर्व सभासदांची वर्षातून एकदा सभा होते. त्या सभेला सर्वसाधारण सभा असे म्हणतात. या सर्वसाधारण सभेत सर्व सभासद निवडणुकीद्वारे संचालक मंडळ (आपले प्रतिनिधी) निवडतात. हे संचालक सभासदांचे प्रतिनिधी म्हणून नागरी सहकारी बँकेचे काम पाहतात. संचालक मंडळाची मुदत ३ ते ५ वर्षे असते. संचालक मंडळ आपल्यापैकी एकाची अध्यक्ष म्हणून तर एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात. सर्वसाधारण सभेत झालेले ठराव किंवा घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे काम संचालक मंडळ करत असते. तसेच संचालक मंडळ आपल्यापैकी एका संचालकाची निवड व्यवस्थापकीय संचालक म्हणून करत असते. हा संचालक अनुभवी, बँकिंग तज्ज्ञ असतो. नागरी सहकारी बँकेचे / पतसंस्थेचे दैनंदिन कामकाज सचिव पाहत असतो. हा पगारी अधिकारी असतो. त्याच्या मदतीला इतर अधिकारी व कारकून असतात.

**नागरी सहकारी बँकांची कार्ये :**

शहरातील सहकारी पतपुरवठा संस्थांना नागरी सहकारी पतपंस्था किंवा नागरी सहकारी बँका असे म्हणतात. या पतसंस्था किंवा बँका प्रामुख्याने पुढील कार्ये करतात.

**१) ठेवी गोळा करणे :**

चालू ठेवी, बचत ठेवी, मुदत ठेवी आणि आवर्ती ठेवी अशा विविध प्रकारच्या ठेवी असतात. या ठेवी गोळा करण्याचे काम नागरी सहकारी पतसंस्था करतात. सभासदाबरोबर बिगर सभासदांनाही नागरी सहकारी बँकेत बचत खाती उघडता येतात. त्यामुळे नागरी सहकारी बँकांना बिगर सभासदाकडूनही ठेवी गोळा करता येतात. शहरातील सर्व उत्पन्न गटातून आणि सर्व प्रकारच्या व्यावसायिकांकडून नागरी सहकारी बँका ठेवी गोळा करतात. नागरी सहकारी बँकांच्या स्थापनेमुळे शहरातील लोकांना बचत करण्याची व त्यावर व्याज म्हणून मोबदला मिळवण्याची चांगली संधी प्राप्त झाली आहे.

**२) कर्जपुरवठा करणे :**

नागरी सहकारी बँका ह्या प्रामुख्याने शहरातील छोटे दुकानदार, व्यावसायिक, नोकरदार यांच्या कर्जाची गरज भागवण्यासाठी स्थापन झालेल्या असतात. म्हणून या लोकांना कर्जपुरवठा करण्याचे काम नागरी सहकारी बँका करतात. या बँका सोन्याचे दागिणे, शेतजमीन, राहते (सुस्थितीतील) घर तारण म्हणून घेतात आणि या तारणावर गरजूंना कर्जपुरवठा करतात.

**३) हुंड्या वटवून देणे :**

उधार विक्री व्यवहारातून हुंड्या निर्माण होत असतात. एक व्यापारी दुसऱ्या व्यापाऱ्यावर हुंडी काढत असतो. हुंडीची मुदत संपल्याशिवाय हुंडीत नमूद केलेली रक्कम विक्रेत्याला किंवा उत्पादकाला मिळत नाही. अशावेळी ज्यांना हुंड्या दिलेल्या असतात असे व्यापारी आपल्या हुंड्या नागरी सहकारी बँकांकडे जमा करतात व त्या हुंड्यांच्या तारणावर कर्ज घेतात. अशा प्रकारे उधार विक्री व्यवहारातून निर्माण झालेल्या हुंड्या वटवून देण्याचे काम नागरी सहकारी बँका करत असतात. त्यामुळे हुंडीधारक विक्रेत्यांना किंवा व्यापाऱ्यांना नागरी बँकांकडून पैशाची (कर्जाची) सोय मिळते.

**४) मौल्यवान वस्तू, कागदपत्रे सुरक्षित ठेवणे :**

नागरी सहकारी बँका शहरातील लोकांच्या मौल्यवान वस्तू, कागदपत्रे, सुरक्षित ठेवण्याचे कार्य करतात. त्यासाठी या बँका लॉकर्स (सुरक्षित खण) उपलब्ध करून देतात. शहरातील लोकांकडे सोन्याचे दागिणे, घराची, दुकानाची व जमिनीची कागदपत्रे असतात. ती चोरीस जाण्याचा, आगीत व पावसाच्या पाण्यात नष्ट होण्याचा मोठा धोका असतो. त्यामुळे अशा मौल्यवान वस्तू सुरक्षित राहणे आवश्यक असते. ती सोय नागरी सहकारी बँका सभासदांना आणि बिगर सभासदांना उपलब्ध करून देतात आणि त्याबद्दल योग्य तो मोबदला घेतात. नागरी सहकारी बँकांचे हे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**५) व्यापारी बँकांची कार्ये करणे :**

खाजगी आणि सरकारी (राष्ट्रीयकृत) व्यापारी बँका जी कार्ये करतात ती कार्ये नागरी सहकारी बँकासुद्धा करतात. उदाहरणार्थ सभासदांचे पैसे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवणे, ATM सुविधा पुरवणे, Online Banking किंवा Mobile Banking सुविधा पुरवणे इत्यादी कार्ये नागरी सहकारी बँका किंवा नागरी सहकारी पतसंस्था करत असतात.

**६) कर्जाच्या वापरावर लक्ष ठेवणे :**

नागरी सहकारी बँका सभासदांना कर्जपुरवठा करत असतात. घरबांधणी, वाहन खरेदी इत्यादीसाठी या बँका कर्जपुरवठा करत असतात. ज्या कारणासाठी सभासदांनी कर्ज घेतले आहे त्याच कारणासाठी सभासद कर्जाचा वापर करतात की नाही हे पाहण्याचे काम नागरी सहकारी बँका करत असतात. त्यामुळे नागरी सहकारी बँकांचे कर्जे बुडण्याचे प्रमाण कमी असते.

**७) शाखा उघडणे :**

नागरी सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतसंस्था आणखी एक महत्त्वपूर्ण कार्य करतात आणि ते म्हणजे या बँका व पतसंस्था तालुक्यात किंवा जिल्ह्यात ठिकठिकाणी शाखा उघडून बँकिंगची कार्ये करत असतात. काही नागरी सहकारी बँका राज्यात आणि राज्याच्या बाहेरही शाखा उघडत असतात.

**८) जिल्हा सहकारी बँकांकडून निधी (कर्ज) मिळवणे :**

सभासदांना पुरेसा (मागणीइतका) कर्जपुरवठा करता यावा यासाठी नागरी सहकारी पतसंस्था जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून कर्ज घेतात आणि ते कर्ज आपल्या सभासदांना वितरित करतात.

**९) सरकारला पूरक कार्य करणे :**

खेड्यातील, शहरातील वंचित, दुर्बल घटकांना मदत करण्याची सरकारची भूमिका आहे. या भूमिकेला पूरक असे कार्य नागरी सहकारी बँका करत असतात. शहरातील वंचित व दुर्बल लोकांना कर्जपुरवठा करण्याचे कार्य या बँका करत असतात.

**१०) इतर कार्ये :**

नागरी सहकारी पतसंस्था इतरही काही उपयुक्त कार्ये करतात. उदाहरणार्थ ग्राहकांची विजेची बिले भरणे, रकमांचे स्थानांतरण करणे (एका ठिकाणाहून अन्य ठिकाणी पैसे पाठवणे, ग्राहकांच्या वतीने रकमा स्वीकारणे) अशा प्रकारची कार्ये सुद्धा नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था करतात.

**सारांश :** अशा प्रकारे भारतातील नागरी सहकारी बँका वर स्पष्ट केल्याप्रमाणे विविध प्रकारची कार्ये करतात. नागरी सहकारी बँका ह्या सुद्धा व्यापारी बँकाच आहेत. व्यापारी बँका जी कार्ये करतात ती सर्व कार्ये नागरी सहकारी बँका करतात.

**नागरी सहकारी बँकांचे महत्त्व / फायदे / गरज / विकासातील भूमिका :**

नागरी सहकारी बँकांचे अनेक फायदे आहेत. हे फायदे सभासदांना, बिगर सभासदांना, सहकार क्षेत्राला आणि सरकारला होतात. हे फायदे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) सावकारांच्या कचाट्यातून मुक्तता:**

शहरी भागातील लोकांना सावकारांच्या कर्जाच्या विळख्यात अडकू न देणे, कर्जासाठी त्यांना सावकारांच्या दारात जायला लागू नये म्हणून नागरी सहकारी पतसंस्थांची स्थापना भारतात करण्यात आली आहे. स्वातंत्र्यपूर्वकाळात केवळ शेतकरीच सावकारावर विसंबून होते असे नाही. तर शहरातील छोटे छोटे व्यावसायिक, दुकानदार हे सुद्धा सावकारांकडून कर्ज काढत असत. स्वातंत्र्यपूर्वकाळात भारतात खाजगी आणि सरकारी व्यापारी बँकांची संख्या खूपच कमी होती. तसेच या बँका शहरातील व्यावसायिक, नोकरदार, कामगार यांना फारसा कर्जपुरवठा करत नसत. म्हणून नागरी सहकारी पतसंस्थांची व नागरी सहकारी बँकांची स्थापना करण्यास सरकारने, सामाजिक व राजकीय नेत्यांनी सुरवात केली. भारताला स्वातंत्र्य मिळून आज जवळ जवळ ८० वर्षे झाली आहेत. तरीही शहरातील दुर्बलांना सावकारांच्या कचाट्यातून सोडवण्यासाठी नागरी सहकारी पतसंस्थांची आणि नागरी बँकांची आवश्यकता आहे. शहरात आणि निमशहरात नागरी सहकारी बँका स्थापन केल्या जात असल्याने शहरातील फेरीवाले, दुकानदार, किरकोळ व्यापारी, कामगार, नोकरदार यांना सावकारांच्या दारात कर्जासाठी जावे लागत नाही. त्यामुळे त्यांची सावकारांच्या कचाट्यातून सुटका झाली आहे. सावकारांऐवजी

नागरी सहकारी पतसंस्थांकडे कर्जासाठी जाणाऱ्या शहरी लोकांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून नागरी सहकारी पतसंस्थांमुळे शहरातील सावकार लोकांचा प्रभाव खूपच ओसरला आहे. हे नागरी सहकारी बँकांनी व पतसंस्थांनी मिळवलेले फार मोठे यश आहे. शहरी जनतेला सावकारांच्या दारात कर्जासाठी जाण्याची वेळ येऊ न देणे हे नागरी सहकारी पतपुरवठा संस्थेचे प्रमुख ध्येय आहे. म्हणून शहरात नागरी सहकारी पतसंस्थांची आणि नागरी सहकारी बँकांची गरज आहे.

**२) वाजवी व्याजदराने कर्जपुरवठा :**

नागरी सहकारी बँका आपल्या सभासदांना कमी व्याज दरात किंवा वाजवी व्याज दराने कर्जपुरवठा करतात. सावकार भरमसाठ व्याजाने कर्ज देतात. त्यामुळे लोकांना सावकारांचे कर्ज परवडत नाही. परंतु नागरी सहकारी बँका लोकांना सावकार, दुकानदार, सराफ लोक यांच्यापेक्षा खूपच कमी व्याजाने कर्ज देतात. त्यामुळे नागरी सहकारी पतसंस्थांची कर्जे घेणे लोकांना किफायतशीर वाटते.

**३) अनुत्पादक कार्यासाठी कर्जपुरवठा :**

नागरी सहकारी बँका ग्राहकांना केवळ उत्पादक कर्जे देत नाहीत तर अनुत्पादक कार्यासाठीसुद्धा कर्जपुरवठा करतात. शहरातील लोकांना मुला-मुलीचे लग्न, धार्मिक कार्यक्रम इत्यादीसाठीसुद्धा कर्ज हवे असते. हे कर्ज नागरी सहकारी पतसंस्था देतात. त्यामुळे लोकांना या अनुत्पादक कर्जासाठी सावकार किंवा सावकारी करणाऱ्या व्यापाऱ्यांकडे जावे लागत नाही.

**४) काटकसरीची सवय लावण्यात यश :**

भारतातील नागरी सहकारी बँकांनी व नागरी सहकारी पतसंस्थांनी शहरी लोकांना काटकसर करून बचत करण्याची सवय लावण्यात मोठे यश मिळवले आहे. आज या नागरी बँकांकडे आणि पतसंस्थांकडे हजारो कोटी रुपयांच्या ठेवी असून या ठेवी शहरातील विविध उत्पन्न गटातील लोकांनी खर्चात काटकसर करून ठेवल्या आहेत. अनावश्यक खर्च कमी केल्याशिवाय (काटकसर केल्याशिवाय) बचत करता येत नाही. नागरी सहकारी बँकांनी शहरी जनतेला बचतीच्या संधी उपलब्ध करून दिल्या असून बचतीवर आकर्षक व्याजदर या बँका देतात. त्यामुळे बचत करण्याची लोकांची प्रवृत्ती वाढत आहे. या बचतीचा उपयोग या बँका गरजूंना कर्ज देण्यासाठी करतात.

**५) व्यापारवाढीस मदत :**

आर्थिक विकासात व्यापाराचीही भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. नागरी सहकारी पतसंस्था आणि बँका व्यापारी लोकांना अल्प आणि मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करतात. व्यापाऱ्यांना अशा प्रकारच्या कर्जाची गरज असते. ही गरज नागरी सहकारी बँका भागवतात. त्यामुळे व्यापाऱ्यांची पैशाची अडचण दूर होते. नागरी सहकारी बँका अशा प्रकारे व्यापार क्षेत्राला कर्जपुरवठा करत असल्याने शहरातील व्यापार वाढीस मदत होत आहे.

**६) औद्योगिक विकासास हातभार :**

नागरी सहकारी बँका शहरातील लघु व कुटिर उद्योगांना, कारागिरांना कर्जपुरवठा करतात. त्यामुळे या लहान उद्योगांची पैशाची अडचण दूर होते. अशा प्रकारे शहरातील नागरी सहकारी बँका व पतसंस्था शहरातील उद्योजकांना अल्प व मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करत असल्याने औद्योगिक विकासास हातभार लागत आहे.

**७) दारिद्र्य व बेकारी निर्मूलनास मदत :**

नागरी सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतसंस्था शहरातील दुर्बल घटकांनासुद्धा व्यवसायासाठी कर्जपुरवठा करतात. त्यामुळे दुर्बल घटकांना स्वत:च्या पायावर उभे राहता येऊन त्यांना सक्षम बनणे शक्य होत आहे. अशा प्रकारे नागरी सहकारी बँका दुर्बल घटकांनाही मदत करत असल्याने त्यांच्यातील दारिद्र्य आणि बेकारी कमी होण्यास मदत होत आहे.

**८) बँकिंग व्यवसायात वाढ :**

नागरी सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतसंस्थांच्या स्थापनेमुळे देशातील बँकिंग व्यवसायाचाही फायदा होत आहे. नागरी बँकांनी व पतसंस्थांनी देशात हजारो शाखा उघडून बँकिंग व्यवसाय सुरू केला आहे. त्यामुळे देशातील बँकिंग व्यवसायाची प्रगती व वाढ होत आहे. आर्थिक विकास हा बँकिंग क्षेत्रावरही अवलंबून असतो. देशातील बँकिंग क्षेत्र समृद्ध किंवा मजबूत असेल तर हे क्षेत्र अर्थव्यवस्थेच्या कृषी, उद्योग, व्यापार या सर्व क्षेत्रांची कर्जाची गरज भागवू शकते. म्हणून बँकिंग क्षेत्र मजबूत असणे अत्यंत आवश्यक असते. नागरी सहकारी बँकांच्या शाखा विस्तारामुळे आणि वाढत्या व्यवहारामुळे भारतातील बँकिंग व्यवसायात वाढ व सुधारणा होत आहे. हा नागरी सहकारी बँकांचा आणि नागरी सहकारी पतसंस्थांचा अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**९) परिसराच्या विकासासाठी मदत :**

भारतातील सहकारी तत्त्वावरील नागरी बँका आणि पतसंस्था ज्या ठिकाणी काम करतात त्या ठिकाणी विविध समाजोपयोगी कामे करतात. बँका आपल्या कार्यक्षेत्रात सामाजिक विकासाची कामे करतात. रक्तदान शिबिरांचे आयोजन, मोफत वैद्यकीय शिबीरांचे आयोजन, मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषधोपचार, नेत्ररोग, हृदयरोग, मधुमेह तपासणी व उपचार शिबीर अशा विविध प्रकारच्या शिबीरांचे आयोजन करतात. त्याचा लाभ सभासदाबरोबर बिगर सभासदांना (कार्यक्षेत्रातील जनतेला) मिळत असतो. तसेच या नागरी सहकारी बँका व पतसंस्था परिसरातील शाळांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करणे, गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना पारितोषिके देणे, आदर्श शिक्षक पुरस्कार देणे अशी कामे करत असतात. अशा प्रकारे नागरी सहकारी पतसंस्था व बँका परिसराच्या विकासात आपले महत्त्वपूर्ण योगदान देत असतात. म्हणून या नागरी बँका लोकप्रिय झाल्या आहेत.

**१०) बँकिंग सुविधेत वाढ :**

नागरी सहकारी बँका ह्या खाजगी व सरकारी व्यापारी बँकाप्रमाणे ठेवी स्वीकारणे, कर्जपुरवठा करणे,

हुंड्या वटवून देणे, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पैसे पाठवणे, मोबाईल बँकिंग किंवा इंटरनेट बँकिंगची सेवा पुरवणे अशा सोयी पुरवतात. त्यामुळे या सेवा मिळवण्यासाठी ग्राहकांना आणि सभासदांना खाजगी व सरकारी बँकेत जावे लागत नाही. अशा प्रकारे नागरी सहकारी बँकामुळे आणि नागरी सहकारी पतसंस्थामुळे बँकिंग सुविधेत चांगली वाढ घडून येत आहे. त्यामुळे लोकांना कमी वेळेत बँकिंगची कामे करता येणे शक्य झाले आहे. नागरी सहकारी बँकांचा परिसरातील जनतेला मिळत असलेला हा फायदा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

**११) स्वयंरोजगार वाढीस मदत :**

नागरी सहकारी बँका आणि पतसंस्था स्वयंरोजगारास प्राधान्याने कर्जपुरवठा करतात. सायकलचे दुकान, किराणा मालाचे दुकान, पानपट्टी, चहा स्टॉल, नाष्टा स्टॉल, वाहन दुरुस्ती व्यवसाय अशा विविध व्यवसायांना नागरी सहकारी बँका कर्जपुरवठा करतात. त्यामुळे देशात स्वयंरोजगार वाढीस मदत होत आहे. एका व्यवसायावर चार ते पाच माणसांचे कुटुंब उपजीविका करत असते. म्हणून रोजगारात वाढ घडवून आणण्याच्या दृष्टीने स्वयंरोजगार अत्यंत महत्त्वाचे असतात. नागरी सहकारी पतसंस्था स्वयंरोजगारास कर्जपुरवठा करत असल्याने देशात स्वयंरोजगारात वाढ होण्यास मदत होत आहे.

**१२) राहणीमानाच्या दर्जात सुधारणा :**

नागरी सहकारी बँका उत्पादक कर्जाबरोबर ग्राहकांना फर्निचर खरेदी, वाहन खरेदी, इतर इलेक्ट्रिक व इलेक्ट्रॉनिक वस्तूंची खरेदी, घरबांधणी यासाठीसुद्धा कर्जपुरवठा करतात. त्यामुळे लोकांच्या राहणीमानाच्या दर्जात वाढ व सुधारणा घडून येत आहे. देशातील जनतेचे केवळ दारिद्र्य नष्ट होऊन चालत नाही तर लोकांच्या राहणीमानाचा दर्जाही उंचावणे अत्यंत आवश्यक असते. नागरी सहकारी बँका फर्निचर, वाहन, घरबांधणी इत्यादीसाठी कर्जपुरवठा करत असल्याने शहरातील लोकांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास मदत होत आहे. हा नागरी सहकारी बँकांचा अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**१३) बाजारपेठांना चालना :**

भारतात देशभर लहान मोठ्या शहरात नागरी सहकारी बँका स्थापन झाल्या आहेत. या बँका ग्राहकांना उत्पादक कामासाठी तसेच अनुत्पादक कामासाठी कर्जपुरवठा करतात. त्यामुळे ग्राहकांची खरेदीशक्ती वाढून त्यांची विविध वस्तू व सेवांना असलेली मागणी वाढत आहे. अशा प्रकारे नागरी सहकारी बँका व नागरी पतसंस्था ग्राहकांना कर्जपुरवठा करत असल्याने त्यांच्याकडून बाजारातील विविध वस्तूंना मागणी वाढत आहे. बांधकाम उद्योगाला व त्यावर अवलंबून असलेल्या अनेक उद्योगांना चालना मिळत आहे. नागरी सहकारी बँकांच्या कर्जव्यवहारामुळे बाजारपेठांना चालना मिळत असल्याने नागरी सहकारी बँकांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

**१४) सभासदांचे मजबूत संघटन :**

व्यापारी, उद्योजक, व्यावसायिक, नोकरदार, माथाडी कामगार व इतर कामगार एकत्र येऊन किंवा

स्वतंत्रपणे नागरी सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतसंस्था स्थापन करतात. त्यामुळे या सर्व घटकांना एकत्र येण्याची संधी मिळत आहे. उदाहरणार्थ व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन नागरी सहकारी पतसंस्था स्थापन केली तर व्यापारी त्यानिमित्ताने एकत्र येतात. त्यांना आपल्या अडीअडचणीवर चर्चा करण्याची, अडचणी सोडवण्याची संधी मिळते. त्यामुळे व्यापार वाढीस मदत होते. अशा प्रकारे नोकरदार, कामगार, वकील, डॉक्टर, अभियंते एकत्र येतात आणि जेव्हा सहकारी तत्त्वावर नागरी सहकारी बँक स्थापन करतात तेव्हा त्यांचे मजबूत संघटन निर्माण होते. त्याचा फायदा या लोकांना आपले प्रश्न सोडविण्यासाठी होतो. म्हणून नागरी सहकारी बँकांची आवश्यकता आहे.

**१५) नैसर्गिक आपत्तीच्या काळात मदत :**

भारतातील नागरी सहकारी बँका व पतसंस्था आणखी एक महत्त्वपूर्ण कार्य करतात आणि ते म्हणजे या बँका व पतसंस्था राज्यात, देशात नैसर्गिक आपत्ती उद्‌भवली तर त्या आपत्तीतून सावरण्यासाठी सरकारला यथाशक्ती मदत करतात. त्यामुळे नैसर्गिक आपत्तीशी मुकाबला करणे सरकारला शक्य होते.

**१६) सभासदांना लाभांश सुविधा :**

नागरी सहकारी बँका आणि पतसंस्था आपल्या सभासदांना वर्षातून एकदा लाभांशाचे (Dividend) वाटप करतात. झालेल्या नफ्यातील काही हिस्सा १० टक्केपासून १६ टक्केपर्यंत सभासदांना वाटतात. सभासदांनी संस्थेशी केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात लाभांशाचे वाटप केले जाते. त्यामुळे संस्थेशी जास्तीत जास्त व्यवहार करण्याची प्रेरणा सभासदांना लाभांश वाटपामुळे मिळते. नागरी सहकारी पतसंस्थांच्या लाभांश वाटपाच्या धोरणामुळे पतसंस्थांची वाढ होण्यास मदत होते.

**१७) सभासद, कर्मचाऱ्यांना सहकारविषयक शिक्षण :**

नागरी सहकारी बँका आणि पतसंस्था आपल्या सभासदांना आणि कर्मचाऱ्यांना सहकारविषयक शिक्षण आणि प्रशिक्षण वेळोवेळी देत असतात. त्यामुळे सहकारी चळवळीविषयी सभासद व कर्मचाऱ्यांच्या मनात आस्था निर्माण होण्यास मदत होते. हा नागरी सहकारी पतसंस्थांचा अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**१८) सहकारी पतपुरवठा चळवळ मजबूत होण्यास मदत :**

भारतातील नागरी सहकारी बँकांना आणि पतसंस्थांना भारतातील सहकारी पतपुरवठा रचनेत अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. नागरी सहकारी बँका आणि पतसंस्था प्रामुख्याने अल्प आणि मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करतात. या बँका शहरी भागातील व्यापारी, दुकानदार, नोकरदार, व्यावसायिक, कामगार यांना कर्जपुरवठा करतात. त्यामुळे भारतातील सहकारी पतपुरवठा चळवळ मजबूत होण्यास मदत होत आहे.

**१९) सभासदांच्या शैक्षणिक प्रगतीस मदत :**

नागरी सहकारी बँका सभासदांना आणि बिगर सभासदांना शैक्षणिक कर्जही पुरवतात. मुलाबाळांच्या उच्च शिक्षणासाठी नागरी सहकारी बँका व पतसंस्था कर्जपुरवठा करतात. त्यामुळे शैक्षणिक प्रगतीस मदत होत आहे.

**२०) सरकारला सहकार्य :**

ग्रामीण भागाप्रमाणे शहरातही अनुसूचित जाती, भटक्या जाती व जमातीचे लोक राहत असतात. तसेच हमाली करून जगणारे आणि इतर गरीब लोक शहरात राहत असतात. त्यांच्या विकासासाठी सरकार योजना आखत असते. त्या योजनांची अंमलबजावणी करण्यास नागरी सहकारी बँका व पतसंस्था सरकारला मदत करत असतात.

**सारांश :** अशा प्रकारे नागरी सहकारी बँका वर स्पष्ट केल्याप्रमाणे विविध प्रकारची महत्त्वपूर्ण कार्ये करत असतात. ठेवी गोळा करणे, कर्जपुरवठा करणे, हुंड्या वटवून देणे या कार्याबरोबरच या बँका आपल्या ग्राहकांना आधुनिक बँकिंग सुविधासुद्धा उपलब्ध करून देतात. या बँकामुळे लघु व कुटिर उद्योग, व्यापार या क्षेत्रांचा विकास घडून येत आहे. या बँकामुळे रोजगार आणि स्वयंरोजगारात वाढ होत आहे. सभासदांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावण्यास मदत होत आहे. म्हणून शहरी भागाला नागरी सहकारी बँकांची आणि नागरी सहकारी पतसंस्थांची आवश्यकता आहे.

**नागरी सहकारी बँकांचे दोष / समस्या / प्रश्न / अडचणी :**

भारतातील नागरी सहकारी बँका शहरातील छोटे व्यावसायिक, कामगार, नोकरदार, व्यापारी, दुकानदार यांच्यासाठी उपयुक्त कार्य करत आहेत. परंतु या बँकांच्या आणि पतसंस्थांच्या कार्यपद्धतीत काही दोष आहेत. तसेच या बँकांना आणि पतसंस्थांना काही समस्यांना किंवा अडचणींना तोंड द्यावे लागते. त्या समस्यांचे आणि दोषांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**१) कर्जवाटप सदोष :**

भारतातील काही नागरी सहकारी बँकांचे आणि पतसंस्थांचे कर्जवाटप धोरण सदोष आहे. कर्जवाटप धोरणात पारदर्शकता आढळून येत नाही. काही नागरी बँका राजकीय दबावातून कर्जवाटप करतात. कर्जमंजुरी प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप होतो. तसेच संचालकही हस्तक्षेप करतात. त्यामुळे ठराविक लांकांना मोठ्या प्रमाणात कर्ज मिळते. तारण पुरेसे दिलेले आहे की नाही याचाही विचार केला जात नाही. त्यामुळे कर्जवसुलीची समस्या गंभीर होते.

**२) अपुरी सभासद संख्या :**

भारतात काही नागरी सहकारी बँकांची आणि पतसंस्थांची सभासद संख्या पुरेशा प्रमाात आहे. तर काही बँकांची व पतसंस्थांची संख्या पुरेशा प्रमाणात नाही. व्यापारी, दुकानदार, नोकरदार यांची संख्या कमी असणे व शहरात एकापेक्षा जास्त नागरी सहकारी पतसंस्था असणे ही त्याची कारणे आहेत. तसेच या बँका व पतसंस्था सभासद वाढवण्यासाठी फारसे प्रयत्न करत नाहीत असे दिसते.

**३) ठेवींचे कमी प्रमाण :**

भारतातील काही नागरी सहकारी बँका आणि पतसंस्था शाखा न उघडता व्यवहार करतात. त्यांचे

कार्यक्षेत्र खूपच लहान (एखाद्या शहरापुरते) असते. त्यामुळे त्यांना इतर बँकाप्रमाणे मोठ्या प्रमाणात ठेवी गोळा करता येत नाहीत. कार्यक्षेत्र लहान असल्याने नागरी सहकारी बँकांचे ठेव संकलन कमी आहे.

**४) तीव्र स्पर्धा :**

भारतातील नागरी सहकारी बँकांना भेडसावणारी आणखी एक समस्या म्हणजे या बँकांना खाजगी आणि सरकारी व्यापारी बँकांशी स्पर्धा करावी लागते. शहरात आणि निमशहरी भागात खाजगी व सरकारी बँकांच्या शाखा वाढत आहेत. या खाजगी व सरकारी बँकांची आर्थिक शक्ती नागरी बँकापेक्षा खूप दांडगी आहे. त्यामुळे नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्था खाजगी व सरकारी व्यापारी बँकांशी स्पर्धा करू शकत नाहीत.

**५) बदनामीची समस्या :**

भारतातील नागरी सहकारी बँकांना भेडसावणारी आणखी एक महत्वाची समस्या म्हणजे या बँकांना अलीकडच्या काळात बदनामीला तोंड द्यावे लागत आहे. देशातील एखादी बँक जरी बंद पडली तरी तिला देभशर प्रिंटमिडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडियामधून प्रसिद्धी (कुप्रसिद्धी) मिळते. त्यामुळे बँकिंग क्षेत्र बदनाम होते. लोकांचा बँकावरील विश्वास उडतो. मध्यंतरी काही नागरी सहकारी बँकांचे गैरव्यवहार चव्हाट्यावर आले. त्याला मोठी प्रसिद्धी मिळाली. तसेच बुडालेल्या, NPA चे प्रमाण अधिक असलेल्या नागरी सहकारी बँकांची माहिती प्रसिद्धी माध्यमामार्फत लोकांच्यापर्यंत पोहचल्याने चांगले काम करणाऱ्या नागरी सहकारी बँकाकडेसुद्धा लोक संशयाने बघू लागले आहेत. त्याचा परिणाम ठेव संकलनावर होत आहे. अशा प्रकारे एखादी नागरी सहकारी बँक किंवा नागरी सहकारी पतसंस्था घोटाळ्यामुळे किंवा भ्रष्टाचारामुळे चर्चेत आली की त्यामुळे बाकीच्या चांगल्या नागरी सहकारी बँका बदनाम होतात. म्हणून बदनामीची समस्या ही एक गंभीर समस्या नागरी सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतसंस्थांना भेडसावत आहे.

**६) थकबाकीची समस्या :**

भारतातील काही नागरी सहकारी बँकांना व नागरी पतसंस्थांना आणखी एका महत्त्वाच्या समस्येला तोंड द्यावे लागते आणि ती समस्या म्हणजे थकबाकीची समस्या होय. विविध कारणामुळे नागरी सहकारी बँकांना थकबाकीच्या समस्येला तोंड द्यावे लागते. या बँकांची कर्जवुली वेळेवर होत नाही. कर्जमंजुरी प्रक्रियेत राजकीय हस्तक्षेप, संचालकांचा हस्तक्षेप यामुळे कर्जपरतफेडीची क्षमता न पाहता कर्जे दिली जातात. त्यामुळे कर्ज वसुली होत नाही. तसेच नागरी सहकारी बँकाजवळ कर्ज वसुली यंत्रणा प्रभावी किंवा कार्यक्षम नाही त्यामुळे सुद्धा कर्ज वसुली १०० टक्के होत नाही.

**७) आर्थिक क्षमता कमी :**

भारतातील काही नागरी सहकारी बँका आणि पतसंस्थांची आर्थिक क्षमता कमी आहे. त्याची विविध कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे या बँकांची सभासद संख्या कमी आहे. तसेच ठेवींची आणि कर्जव्यवहारांचे प्रमाण कमी आहे. त्यामुळे नफासुद्धा कमी मिळतो. या विविध कारणामुळे काही नागरी सहकारी बँकांची आर्थिक क्षमता (स्थिती) चांगली नाही.

**८) सभासदांची उदासिनता :**

नागरी सहकारी बँकांच्या प्रगतीमधील आणखी एक अडसर म्हणजे या बँकांचे सभासद बँकांच्या कारभाराविषयी फारसे जागरूक नसतात. सर्वसाधारण सभेला, संचालक मंडळाच्या निवडणुकीला त्यांची उपस्थिती कमी असते. सभासद बँकेच्या कारभाराबाबत फारशा सूचना करत नाहीत. सभासद नागरी बँकांच्या कामकाजात लक्ष घालत नसल्याने नागरी सहकारी बँकांची वेगाने प्रगती होत नाही.

**९) अकार्यक्षम व्यवस्थापन :**

भारतातील काही नागरी सहकारी बँकांचे आणि नागरी सहकारी पतसंस्थांचे व्यवस्थापन फारसे कार्यक्षम नाही. संस्थेचे यश हे व्यवस्थापनाच्या दर्जावरही अवलंबून असते. परंतु व्यवस्थापनाचा दर्जा चांगला नसल्याने ठेवीत, कर्जव्यवहारात, सभासद संख्येत, ग्राहकांना आधुनिक बँक सुविधा पुरविण्यात, नफ्याचे प्रमाण वाढविण्यात यश येत नाही.

**१०) सरकारी बँकापेक्षा व्याजदर अधिक :**

भारतातील काही नागरी सहकारी बँकांचा कर्जावरील व्याजदर हा सरकारी बँकापेक्षा जास्त आहे. त्यामुळे ग्राहक नागरी सहकारी बँकांऐवजी राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकांकडे कर्जासाठी जात असल्याचे दिसते.

**११) असमतोल विकास :**

भारतातील नागरी सहकारी बँकांची वाढ सर्व राज्यात सारखी झालेली नाही. काही राज्यात उदाहरणार्थ महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, तामिळनाडू, आंध्र प्रदेश या राज्यात नागरी सहकारी बँकांनी संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या चांगली प्रगती केली आहे. तर आसाम, बिहार इत्यादी राज्यात नागरी सहकारी बँकांची फारशी प्रगती झालेली नाही.

**१२) गरजेपेक्षा कमी कर्जपुरवठा :**

भारतातील काही नागरी सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतसंस्था ग्राहकांना त्यांच्या मागणीइतका (गरजेइतका) कर्जपुरवठा करू शकत नाहीत. शहरातील कामगार, व्यापारी, दुकानदार, कामगार, नोकरदार, यांची कर्जाला मोठी मागणी असते. परंतु नागरी सहकारी बँकांची आर्थिक क्षमता मोठी नसल्याने या बँका शहरातील विविध घटकांना मागणीइतका (गरजेइतका) कर्जपुरवठा करू शकत नाहीत.

**१३) अनुत्पादक कर्जाचे अधिक प्रमाण :**

नागरी सहकारी बँका उत्पादक कामाबरोबर अनुत्पादक कामासाठीसुद्धा कर्जपुरवठा करतात. फर्निचर खरेदी, इलेक्ट्रीक व इलेक्ट्रॉनिक वस्तूंची खरेदी, घरबांधणी इत्यादीसाठी (अनुत्पादक बाबींसाठी) कर्जपुरवठा करतात. या अनुत्पादक कर्जाचे प्रमाण वाढत आहे. अनुत्पादक कर्जामुळे थकबाकीची समस्या गंभीर होत आहे.

**१४) राजकीय पक्षांचा प्रभाव :**

नागरी सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतसंस्था आपल्या ताब्यात राहाव्यात असे अनेक राजकीय पक्षांना आणि कार्यकर्ते, नेतेमंडळी यांना वाटत असते. त्यामुळे राजकीय पक्ष निवडणुका लढवून बँका व पतसंस्था ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत असतात. निवडून आलेले राजकीय कार्येकर्ते कर्ज मंजूर करताना आपल्याच गटाच्या किंवा आपल्याच पक्षाच्या लोकांना प्राधान्य देताना दिसतात. त्यामुळे कर्जवसुली १००% होत नाही.

**सारांश :** अशा प्रकारे नागरी सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीतील दोष आणि या बँकांना भेडसावणाऱ्या समस्या, अडचणी आणि प्रश्न या बाबींची माहिती वरीलप्रमाणे दिली आहे. नागरी सहकारी बँकांना प्रामुख्याने भांडवलाची, थकबाकीची आणि अपुऱ्या कर्मचाऱ्यांची समस्या भेडसावते.

**नागरी बँकांचे दोष आणि समस्या यांच्या निराकरणासाठी उपाय :**

नागरी सहकारी बँका शहरी आणि निमशहरी भागातील दुकानदार, व्यापारी, कामगार, नोकरदार यांची कर्जाची गरज भागवत असतात. तसेच त्यांना बचत करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून देत असतात. म्हणून नागरी सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतसंस्था शहरवासियांच्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत. म्हणून या बँकांच्या कार्यपद्धतीतील दोष आणि त्यांना भेडसावणाऱ्या समस्या यांचे निराकरण होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**१) समतोल विकासासाठी प्रयत्न :**

नागरी सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतसंस्था अत्यंत महत्त्वपूर्ण कार्ये करत असल्याने या बँकांची सर्व राज्यात प्रगती होणे आवश्यक आहे. ज्या राज्यात नागरी सहकारी बँका संख्येने खूपच कमी आहेत, अशा राज्यात या बँकांची आणि पतसंस्थांची स्थापना करण्यावर सरकारने, रिझर्व बँकने भर द्यावा. तसेच महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्रातसुद्धा नागरी सहकारी बँकांचा समतोल विकास झालेला नाही. काही जिल्ह्यात या बँकांची संख्या चांगली आहे तर काही जिल्ह्यात संख्या कमी आहे. म्हणून संपूर्ण देशात नागरी सहकारी बँकांचा समतोल विकास घडून आला पाहिजे.

**२) दुर्बल नागरी सहकारी बँकांकडे लक्ष देणे आवश्यक :**

भारतात आर्थिकदृष्ट्या दुर्बल किंवा कमकुवत नागरी सहकारी बँकांची आणि नागरी सहकारी पतसंस्थांची संख्या लक्षणीय आहे. या बँकांची स्थिती सुधारण्याकडे लक्ष दिले नाही तर या बँका भविष्यात बुडू शकतात. म्हणून दुर्बल नागरी सहकारी बँका आणि पतसंस्था सक्षम करण्याकडे सरकारने लक्ष दिले पाहिजे.

**३) सभासद संख्येत पुरेशी वाढ होणे आवश्यक :**

नागरी सहकारी बँकांची आणि पतसंस्थांची सभासद संख्या खूपच कमी असेल तर या संस्था चांगल्या प्रकारे काम करू शकत नाहीत. सभासद संख्या पुरेशी असेल तर प्रवेश फी, ठेवी, शेअर्सची विक्री यापासून नागरी

सहकारी बँकांना पुरेसे भांडवल मिळू शकेल. या बँकांची आर्थिक क्षमता भक्कम होऊ शकेल. म्हणून नागरी सहकारी बँकांनी आणि नागरी सहकारी पतसंस्थांनी सभासद संख्येत वाढ होण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**४) शाखा विस्तारास परवानगी देणे :**

ज्या नागरी सहकारी बँकांची आणि पतसंस्थांची आर्थिक क्षमता चांगली आहे आणि ज्या बँकांनी व पतसंस्थांनी चांगला नावलौकिक मिळवला आहे अशा बँकांना व पतसंस्थांना जिल्ह्यात, जिल्ह्याच्या बाहेर शाखा उघडण्यास सरकारने परवानगी आणि प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. यामुळे शहरातील लोकांना गरजेइतके कर्ज मिळणे शक्य होईल.

**५) राजकीय हस्तक्षेप टाळणे आवश्यक :**

भारतात लोकशाही असल्यामुळे नागरी बँकांच्यासुद्धा निवडणूका होतात. परंतु निवडणुका झाल्यानंतर वाईट राजकारणाला पूर्णविराम दिला पाहिजे. कर्जप्रकरणे मंजूर करताना कर्ज मागणाऱ्यांची जात, राजकीय पक्ष, गट-तट या बाबी न बघता कर्ज परतफेडीची क्षमता बघावी. यामुळे विरोधी पार्टीचे लोक कर्जासाठी दुसऱ्या बँकेत जाणार नाहीत.

**६) राज्य सहकारी बँकांनी भागभांडवल खरेदी करणे आवश्यक :**

नागरी सहकारी बँका आणि नागरी सहकारी पतसंस्थांना चांगल्या क्षमतेने काम करता यावे यासाठी राज्य सहकारी बँकांनी नागरी बँकांचे व पतसंस्थांचे भागभांडवल (शेअर्स) खरेदी करावेत. राज्य बँकांनी नागरी बँकांचे शेअर्स मोठ्या प्रमाणात खरेदी केल्यास नागरी बँका आर्थिकदृष्ट्या सक्षम बनतील आणि गरजूंना गरजेइतके कर्ज देऊ शकतील.

**७) ठेवीत वाढ घडवून आणण्यासाठी प्रयत्न आवश्यक :**

भारतातील काही नागरी सहकारी बँकांना व पतसंस्थांना ठेवी गोळा करण्यात फारसे यश आलेले नाही. या बँकांनी व पतसंस्थांनी ठेवीत पुरेशी वाढ घडवून आणली पाहिजे. सभासदाबरोबर बिगर सभासदाकडूनही जास्तीत जास्त ठेवी गोळा कराव्यात. त्यासाठी कर्मचाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले पाहिजे. या बँकांनी व पतसंस्थानी ठेव संकलनासाठी विशेष कर्मचारी नेमावेत.

**८) अंकेक्षण (Audit) वेळच्या वेळी होणे आवश्यक :**

भारतातील काही नागरी सहकारी बँकांचे आणि नागरी सहकारी पतसंस्थांचे अंकेक्षण (ऑडिट) वेळेवर होत नाही. त्यामुळे गैरव्यवहार किंवा चुकीचे व्यवहार लवकर समजून येत नाहीत. म्हणून नागरी सहकारी बँकांचे व पतसंस्थांचे अंकेक्षण वेळेवर होणे आवश्यक आहे.

**९) सर्व ठेवींचा विमा उतरवणे आवश्यक :**

भारतातील काही नागरी सहकारी बँका आणि काही नागरी सहकारी पतसंस्था ठेव विमा महामंडळाकडे

ठेवींचा विमा उतरवत नाहीत. म्हणून सर्व नागरी बँकांनी व पतसंस्थांनी ठेवींचा विमा उतरवणे आवश्यक आहे. तसेच विमा उतरवला असल्याचे ग्राहकांच्या आणि जनतेच्या निदर्शनास आणावे. त्यामुळे ग्राहकांचा नागरी बँकावरील विश्वास वाढून बँकांच्या ठेव संकलनात मोठी वाढ होईल.

**१०) कर्मचारी प्रशिक्षणाची सुविधा :**

नागरी सहकारी बँकांचे आणि पतसंस्थांचे व्यवस्थापन दर्जेदार व्हावे यासाठी जिल्हा सहकारी बँका, राज्य सहकारी बँक यांनी नागरी बँकांच्या व पतसंस्थांच्या कर्मचाऱ्यांसाठी निरंतर प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून द्यावी. यामुळे नागरी बँकांचा आणि पतसंस्थांचा व्यवस्थापनाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल.

**११) पर्यवेक्षण / देखरेख / तपासणी वेळच्या वेळी होणे आवश्यक :**

नागरी सहकारी बँकेत आणि पतसंस्थेत भ्रष्टाचार, आर्थिक घोटाळे होऊ नयेत यासाठी या बँकांचे व पतसंस्थांचे नियमित पर्यवेक्षण केले पाहिजे. या बँकांची तपासणी वेळच्या वेळी केल्यास गैरव्यवहार, अनियमितता यांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल.

**१२) कर्ज वसुली यंत्रणा सक्षम असणे आवश्यक :**

नागरी सहकारी बँकांची आणि पतसंस्थांची कर्जवसुली १०० टक्के व्हावी यासाठी या बँकांची व पतसंस्थांची कर्जवसुली यंत्रणा सक्षम / कार्यक्षम असणे आवश्यक आहे.

**१३) सभासदांनी जागरूक राहणे आवश्यक :**

नागरी सहकारी बँकातील आणि पतसंस्थातील भ्रष्टाचारावर, अनियमितपणावर, आर्थिक धोरणावर (पैशाच्या अफरातफरीवर) अंकुश बसावा यासाठी नागरी बँकांच्या सभासदांनी बँकांच्या कारभाराकडे लक्ष देणे आवश्यक आहे. सभासदांनी उदासिनता झटकून सक्रिय व जागरूक राहणे आवश्यक आहे.

**१४) व्याजदर सरकारी बँकापेक्षा जास्त असू नये :**

काही नागरी सहकारी बँकांचा व पतसंस्थांचा कर्जावरील व्याजदर खाजगी आणि सरकारी व्यापारी बँकांपेक्षा अधिक आहे. त्याचा परिणाम या बँकांच्या कर्जव्यवहारावर प्रतिकूल होतो. म्हणून नागरी सहकारी बँकांनी व पतसंस्थांनी खाजगी व सरकारी व्यापारी बँकांपेक्षा अधिक व्याजदर आकारू नये.

**१५) मागणीइतका कर्जपुरवठा करण्याची काळजी घेणे आवश्यक :**

विविध कारणामुळे काही नागरी सहकारी बँका आणि पतसंस्था सभासदांना व बिगर सभासदांना गरजेइतका (मागणी एवढा) कर्जपुरवठा करत नाहीत. त्यामुळे या बँकांची व पतसंस्थांची सभासद संख्या वाढत नाही. तसेच या बँकांचे कर्जव्यवहारही वाढत नाहीत. म्हणून नागरी बँकांनी व पतसंस्थांनी गरजूंना गरजेइतका (मागणी इतका) कर्जपुरवठा करण्याची दक्षता घ्यावी.

**१६) अनुत्पादक कर्जे देताना कर्जे बुडणार नाहीत याची काळजी घेणे आवश्यक :**

नागरी सहकारी बँका शहरातील जनतेला धार्मिक कारणासाठी, उपभोग्य वस्तू खरेदी करण्यासाठी, घरबांधणीसाठी सुद्धा कर्जे देतात. या कर्जांना अनुत्पादक कर्जे म्हणतात. ही कर्जे देताना ती बुडणार नाहीत याची काळजी नागरी बँकांनी व पतसंस्थांनी घ्यावी. त्यासाठी कर्ज परतफेडीची क्षमता पाहूनच अशी अनुत्पादक कर्जे द्यावीत.

**१७) ए. टी. एम., आर. टी. जी. एस. सारख्या आधुनिक सुविधा पुरवणे :**

भारतातील काही नागरी सहकारी बँका आणि पतसंस्था आजही आधुनिक बँकिंग सुविधा पुरवत नाहीत. म्हणून या बँकांनी आणि पतसंस्थांनी ATM, RTGS, हुंड्या वटवणे, मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग अशा सुविधा पुरवाव्यात. त्यामुळे सभासदांची संख्या आणि ठेवी वाढण्यास मदत होईल.

**सारांश :** अशा प्रकारे भारतातील नागरी सहकारी बँका आणि पतसंस्थांच्या कार्यपद्धतीतील दोष दूर करण्यासाठी, त्यांना भेडसावणाऱ्या समस्या, अडचणी, प्रश्न यांचे निराकरण करण्यासाठी काही उपाय वरीलप्रमाणे सुचवले आहेत. काही नागरी सहकारी बँकांनी आणि पतसंस्थांनी खूप चांगली कामगिरी केली आहे. परंतु काही बँका व पतसंस्था याबाबतीत मागे आहेत. या बँकांची समाजाला गरज आहे. म्हणून या बँका बंद पडून चालणार नाही. या बँकासमोरील अडचणी दूर केल्यास या बँका चांगली प्रगती करू शकतील. म्हणून कमकुवत बँका बंद न करता किंवा त्यांचे इतर बँकांत विलिनीकरण न करता त्यांचे अस्तित्व कायम ठेवून त्या अधिक सक्षम कशा बनतील याची काळजी घेतली पाहिजे. त्यांचे विलिनिकरण केले किंवा त्या बंद केल्या तर लोकांचा नागरी बँकावरील विश्वास कमी होईल.

## १.३ सारांश :

भारतातील कृषी आणि बिगर कृषी क्षेत्रात आजही भांडवलाची (वित्तपुरवठ्याची) मोठी गरज आहे. ही गरज गेली १०० वर्षे सहकारी बँकिंग क्षेत्राकडून भासवण्याचा प्रयत्न केला जात आहे. सहकारी बँका कृषी व बिगर कृषी क्षेत्राला अल्प, मध्यम आणि दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करतात. सहकारी बँकिंग क्षेत्राकडून कृषी व बिगर कृषी क्षेत्राला केल्या जाणाऱ्या कर्जपुरवठ्यात दिवसेंदिवस वाढ होत आहे. यावरून सहकारी बँकांची गरज आणि महत्त्व वाढत असल्याचे दिसून येते.

## १.४ पारिभाषिक शब्द व त्यांचा अर्थ :

**१) पतपुरवठा :** पतपुरवठ्यास कर्जपुरवठा असे म्हणतात.

**२) सहकारी पतपुरवठा :** सहकारी बँकिंग क्षेत्राकडून केला जाणारा कर्जपुरवठा.

**३) दुर्बल पतसंस्था :** तोट्यात असलेल्या, अर्थक्षम नसलेल्या पतसंस्था.

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्न :

**१. खालील पर्यायापैकी योग्य पर्याय निवडा.**

१. भारतातील पहिला सहकारी कायदा ............. साली संमत झाला.

अ) १९०० ब) १९०१ क) १९०३ ड) १९०४

२. भारतात ........... पासून सहकारी पतपुरवठा चळवळीस सुरवात झाली.

अ) १९०१ ब) १९०२ क) १९०३ ड) १९०४

३. सहकारी पतपुरवठा रचनेत राज्य सहकारी बँकेचे स्थान .............. आहे.

अ) सर्वोच्च ब) मध्यवर्ती क) खालचे ड) गावपातळीवरचे

४. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची स्थापना .............. करतात.

अ) शेतकरी ब) सरकार क) नोकरदार ड) यापैकी नाही

५. वेगवेगळ्या कुटुंबातील .............. व्यक्ती एकत्र येऊन प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था स्थापन करू शकतात.

अ) ०५ ब) १० क) २० ड) १००

६. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था .............. पातळीवर काम करतात.

अ) गाव ब) जिल्हा क) राज्य ड) यापैकी नाही

७. शेतकऱ्यांनी सावकारांकडे कर्जासाठी जाऊ नये म्हणून तत्कालीन ब्रिटिश सरकारने .............. संस्थांच्या स्थापनेवर भर दिला होता.

अ) भिशी ब) चिटफंड क) विश्वस्त ड) प्राथमिक सहकारी कृषी संस्था

८. भारतात सध्या .............. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्था आहेत.

अ) ब) क) ड)

९. .............. कायद्याने भारतात जिल्हा सहकारी बँका स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला.

अ) १९०४ ब) १९१० क) १९११ ड) १९१२

१०. भारतात सध्या सुमारे .............. जिल्हा सहकारी बँका आहेत.

अ) ३५२ ब) ३६० क) ३७० ड) ३८०

११. राज्य सहकारी बँकेला ............. म्हणतात.

अ) मध्यवर्ती बँक ब) केंद्रीय बँक क) शिखर बँक ड) यापैकी नाही

१२. भारतात सध्या ............. राज्य सहकारी बँका आहेत.

अ) ३० ब) ३१ क) ३२ ड) ३४

१३. भारतात सध्या नागरी सहकारी बँकांची संख्या ............. एवढी आहे.

अ) १००० ब) ११०० क) १३०० ड) १५२७

## १.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**१. योग्य पर्याय निवडा.**

१. ड, २. ड, ३. अ, ४. अ, ५. ब, ६. अ, ७. ड,

८. ९. ड, १०. अ, ११. क, १२. ड, १३. ड

**२. टीपा द्या.**

१. प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था

२. जिल्हा सहकारी बँक

३. राज्य सहकारी बँक

४. नागरी सहकारी बँक

**३. सविस्तर उत्तरे द्या.**

१. प्राथमिक कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची कार्ये (महत्त्व) स्पष्ट करा.

२. जिल्हा सहकारी बँकेची कार्ये (महत्त्व) स्पष्ट करा.

३. राज्य सहकारी बँकांची कार्ये (महत्त्व) स्पष्ट करा.

४. नागरी सहकारी बँकांची कार्ये (महत्त्व) स्पष्ट करा.

❑❑❑

सत्र-४ : घटक-२

# भारतातील सहकारी संस्था

## (Co-operative Societies in Indian - I)

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ भारतातील सहकारी विपणन संस्था

  २.२.२ सहकारी शेती - प्रकार आणि महत्त्व

  २.२.३ सहकारी ग्राहक संस्था

  २.२.४ सहकारी गृहनिर्माण संस्था

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्न

२.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये

१. भारतातील सहकारी विपणन संस्थांची माहिती करून घेणे. या संस्थांचे महत्त्व, दोष यांची माहिती करून घेणे.

२. सहकारी शेतीचे महत्त्व आणि समस्या जाणून घेणे.

३. ग्राहक सहकारी चळवळीसमोरील आव्हाने समजून घेणे.

४. सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या समस्या जाणून घेणे.

## २.१ प्रास्ताविक

'भारतातील सहकारी संस्था' असे या दुसऱ्या घटकाचे शीर्षक आहे. या प्रकरणात भारतातील सहकारी विपणन संस्था, सहकारी शेती संस्था, ग्राहक सहकारी संस्था, सहकारी गृहनिर्माण संस्थांची माहिती दिली आहे. या संस्थांच्या समस्या, महत्त्व या बाबींची माहिती दिली आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ सहकारी विपणन (Co-operative Marketing) :

**प्रास्ताविक**

कृषी माल खरेदी-विक्री व्यवस्थेतील दोष दूर करण्यासाठी भारत सरकारने भारतात सहकारी विपणन व्यवस्थेला मोठे प्रोत्साहन दिले आहे. सहकारी तत्त्वावर शेतमालाची खरेदी-विक्री करणाऱ्या संस्थांना सहकारी विपणन किंवा सहकारी खरेदी-विक्री संस्था असे म्हणतात. (१) ऐच्छिक आणि खुले सभासदत्त्व. (२) लोकशाही पद्धतीचा कारभार (३) भांडवलदार मर्यादित व्याज (४) व्यवहाराच्या प्रमाणात वाढाव्याचे (नफ्याचे) वाटप (५) सहकारी शिक्षण (६) सहकारांतर्गत सहकार (७) राजकीय व धार्मिक तटस्थता (८) सामाजिक मालकी (९) प्रामाणिक व्यवहार (१०) काटकसरीने कामकाज (११) बंधुभाव इ. तत्त्वांना सहकाराची तत्त्वे असे म्हणतात. या तत्त्वाप्रमाणे कार्य करणाऱ्या संस्थेला सहकारी संस्था असे म्हणतात. सहकारी संस्थांचे काही प्रकार आहेत. उदाहरणार्थ, (१) ग्राहक सहकारी संस्था (२) गृहनिर्माण सहकारी संस्था (३) दुग्ध उत्पादन सहकारी संस्था (४) सहकारी प्रक्रिया संस्था (५) मजूर सहकारी संस्था. अशा अनेक सहकारी संस्था सहकारी तत्त्वावर स्थापन झाल्या असून सहकारी खरेदी-विक्री संस्था ही सहकारी तत्त्वावर कृषी मालाची खरेदी आणि विक्री करणारी संस्था अत्यंत महत्त्वाची मानली जाते. भारतभर अशा प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन झाल्या असून सरकारकडून सर्व प्रकारची मदत अशा संस्थांना दिली जाते.

भारतात सन १९०४ साली सहकारविषयक पहिला कायदा पास करण्यात आला. १९१२ साली सहकारविषयक दुसरा कायदा संमत करण्यात आला. या कायद्यानुसार भारतात सहकारी तत्त्वावरील खरेदी-विक्री संस्थांच्या स्थापनेस बळ मिळाले. त्यानुसार भारतात सर्वप्रथम १९१५ मध्ये मुंबई प्रांतातील हुबळी या ठिकाणी सहकारी खरेदी-विक्री संस्था स्थापन झाली. मॅक्लेगन समिती (१९१५), रॉयल कमिशन ऑन ॲग्रिकल्चर (१९२८), सेंट्रल बँकिंग इन्कॉयरी कमिटी (१९३१), सहकारी रजिस्ट्रार परिषद (१९३४) आणि को-ऑपरेटिव्ह प्लॅनिंग कमिटी (१९४५) इत्यादी विविध समित्यांनी भारतात सहकारी खरेदी-विक्री संस्थांची स्थापना करण्याची आवश्यकता स्पष्ट केली होती. त्यानुसार सरकारने भारतात सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या स्थापनेकडे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विशेष लक्ष दिले. आज संपूर्ण देशभर सहकारी खरेदी-विक्री संस्था स्थापन होऊन विपणनविषयक कार्य करत असल्याचे दिसून येते.

**सहकारी विपणन म्हणजे काय?**

सहकारी विपणन ही संकल्पना प्रामुख्याने कृषी मालाची सहकारी तत्त्वावर जी खरेदी-विक्री केली जाते त्याच्याशी संबंधित संकल्पना आहे. विपणन संकल्पनेत वस्तूची खरेदी आणि विक्री या प्रमुख दोन बाबी

समाविष्ट असतात. कृषी मालाची खरेदी आणि विक्री सहकारी तत्त्वावर करणाऱ्या संस्थांना सहकारी खरेदी-विक्री संस्था (Co-operative Marketing Societies) असे म्हणतात. सहकारी विपणनाच्या / सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या काही व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत.

**१) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया** (RBI) **:**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया ही भारताची मध्यवर्ती बँक असून या बँकेने सहकारी खरेदी-विक्री संस्थेची व्याख्या खालीलप्रमाणे दिली आहे.

''**खाजगी व्यापारी लोकांपेक्षा अधिक फायदेशीरपणे शेतमालाची खरेदी आणि विक्री करण्याच्या हेतूने शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी खरेदी-विक्री संस्था होय.**''

**२) मार्गारेट डिग्बी :**

मार्गारेट डिग्बी यांनी सहकारी खरेदी-विक्री संस्थेची व्याख्या खालील शब्दात स्पष्ट केली आहे.

''**उत्पादकांपासून उपभोक्त्यांपर्यंत शेतमालाशी संबंधित विपणन क्रिया सहकारी तत्त्वावर करणारी संस्था म्हणजे सहकारी खरेदी-विक्री संस्था होय.**''

**३) सर्वसाधारण व्याख्या :**

सहकारी विपणनाची व्याख्या किंवा सहकारी खरेदी-विक्री संस्थेची सर्वसाधारण व्याख्या खालील शब्दात स्पष्ट केली आहे.

''**कृषी मालाचे उत्पादन करणारे काही शेतकरी स्वेच्छेने अधिक फायदा मिळवण्यासाठी एकत्र येतात आणि सहकारी तत्त्वावर कृषी मालाची खरेदी-विक्री करतात त्यास सहकारी विपणन असे म्हणतात.**''

**सहकारी विपणनाची वैशिष्ट्ये :**

सहकारी विपणनाच्या वरील विविध व्याख्यांवरून सहकारी विपणनाची / सहकारी खरेदी-विक्री संस्थांची काही वैशिष्ट्ये आपणास सांगता येतात. ही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**१. शेतकऱ्यांची संघटना :**

सहकारी खरेदी विक्री संस्थांची स्थापना त्या विशिष्ट गावातील किंवा परिसरातील शेतकरी एकत्र येऊन करत असतात.

**२. सहकारी तत्त्वावर कार्ये :**

कृषी मालाची खरेदी आणि विक्री करणाऱ्या संस्था विपणनविषयक सर्व कार्ये सहकारी तत्त्वावर करतात. म्हणून या संस्थांना सहकारी खरेदी-विक्री संस्था असे म्हणतात.

**३. कृषी मालास चांगला दर मिळण्यासाठी स्थापना :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांची स्थापना व्यापारी, मध्यस्थ व इतर सर्व प्रकारच्या ग्राहकांकडून शेतकऱ्यांची जी फसवणूक होत असते, ती फसवणूक थांबवण्यासाठी केली जात असते. कृषी मालाला चांगला भाव मिळवून देण्यासाठी सहकारी खरेदी-विक्री संस्थांची स्थापना केली जात असते.

**४. खरेदी-विक्री बरोबर प्रक्रिया, वाहतूक, साठवणूक यावर भर :**

सहकारी खरेदी-विक्री संस्था केवळ शेतमालाची खरेदी आणि विक्री करत नाहीत तर कृषी विपणनाशी संबंधित प्रक्रिया करणे, वाहतूक करणे, मालाची साठवणूक करणे इत्यादी कार्ये सुद्धा करतात.

**सहकारी विपणनाचे उद्देश :**

सहकारी विपणनाचे किंवा सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे प्रमुख उद्देश खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत. खालील उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी सहकारी तत्त्वावर कृषी मालाची खरेदी-विक्री करणाऱ्या संस्थांची स्थापना केली जाते.

१) सभासद शेतकऱ्यांना त्यांच्या मालास योग्य किंमत मिळवून देणे (वाजवी किंवा परवडणारी किंमत शेतकऱ्यांना मिळवून देणे.)

२) कृषी मालाच्या खरेदी-विक्रीमध्ये असणाऱ्या अनावश्यक मध्यस्थांची संख्या कमी करणे.

३) गरजेच्या वेळी शेतकऱ्यांना पतपुरवठा करणे.

४) सरकारच्या वतीने आवश्यक तो कृषी माल खरेदी करणे.

५) शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करून तो परदेशात निर्यात करणे.

६) चांगला कृषी माल उत्पादित करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे.

७) शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते, अवजारे इ. चा पुरवठा करणे.

८) शेतमालाची वाहतूक, प्रतवारी, प्रक्रिया, साठवणूक इत्यादी कार्ये करणे.

९) शेतकऱ्यांना कृषी मालाची ने-आण करण्यासाठी वाहतूक सुविधा पुरवणे.

**सहकारी खरेदी-विक्री संस्थांची कार्ये :**

भारतातील सहकारी खरेदी-विक्री संस्था प्रामुख्याने पुढील प्रकारची कार्ये करतात.

१) कृषी मालाचे एकत्रीकरण करणे.

२) कृषी मालाची वाहतूक करणे.

३) प्रतवारी करणे.

४) कृषी मालाची साठवणूक करणे.

५) कृषी मालावर प्रक्रिया करणे.

६) मालाचे पॅकिंग करणे/माल बांधणे.

७) बाजारविषयक माहिती गोळा करणे.

८) शेतमालाच्या तारणावर कर्जपुरवठा करणे.

९) कृषी आदानांचा शेतकऱ्यांना पुरवठा करणे.

१०) शेतमालाची विक्री करणे.

११) कृषी मालाची परदेशात निर्यात करणे.

१२) सरकारच्या वतीने शेतमालाची खरेदी करणे.

१३) कृषी उत्पादन वाढीस प्रोत्साहन देणे.

१४) शेतकऱ्यांनी पतपुरवठा संस्थांकडून घेतलेले कर्ज भागवणे.

१५) कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

१६) गुदामांची निर्मिती करणे.

सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या वरील कार्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**१) कृषी मालाची खरेदी करणे :**

शेतकऱ्यांच्या कृषी मालाची खरेदी करणे हे सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे प्रमुख कार्य आहे. सहकारी खरेदी-विक्री संस्थांकडे स्वत:च्या मालकीची वाहतूक साधने असतात. या वाहतूक साधनांच्याद्वारे सहकारी खरेदी-विक्री संस्था आपल्या कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या कृषी मालाची खरेदी करतात. ज्या संस्थांकडे स्वत:च्या मालकीची वाहतूक साधने नसतात त्या संस्था वाहतूक साधने भाड्याने घेतात आणि शेतमालाचे एकत्रीकरण आणि खरेदी ही कार्ये पार पाडतात. अशा प्रकारे सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतमालाचे एकत्रीकरण, शेतमालाची वाहतूक आणि शेतमालाची खरेदी ही कार्ये करतात. कृषी माल विपणनाच्या दृष्टीने आणि सभासद शेतकऱ्यांच्यादृष्टीने खरेदी-विक्री संस्थांची ही कार्ये अत्यंत महत्त्वाची आहेत.

**२) कृषी मालाची प्रतवारी आणि वर्गीकरण करणे :**

कित्येक शेतकरी कृषी मालाची प्रतवारी आणि वर्गवारी करत नाहीत. सरसकट कृषी माल विकतात. परंतु विक्रीपासून चांगले उत्पन्न मिळवण्यासाठी कृषी मालाची प्रतवारी, वर्गीकरण करण्याची गरज असते. म्हणून सहकारी खरेदी-विक्री संस्था कृषी माल स्वच्छ करणे, वर्गवारी करणे, प्रतवारी करणे अशी कामे करतात. त्यामुळे खरेदीदारांना चांगल्या दर्जाचा कृषी माल खरेदी करणे शक्य होते.

**३) कृषी मालाची साठवणूक करणे :**

खरेदी केलेला शेतमाल साठवून ठेवण्याचे कार्य सहकारी खरेदी-विक्री संस्था करतात. कारण एकदम माल विक्रीसाठी काढला तर पुरवठा वाढून किंमती कोसळतात. तसेच एकदम सगळा माल खरेदीदारही विकत घेत नाहीत. म्हणून मालाला चांगली किंमत येईपर्यंत माल साठवून ठेवावा लागतो. त्यासाठी गुदामांची, शीतगृहांची सुविधा सहकारी खरेदी-विक्री संस्था निर्माण करतात. कित्येक खरेदी-विक्री संस्थाकडे स्वत:च्या मालकीची गुदामे आहेत. ज्यांच्याकडे अशी सुविधा नाही त्या संस्था भाड्याने गुदामे घेऊन त्यामध्ये माल साठवून ठेवतात. अशा प्रकारे कृषी मालाची साठवणूक करून माल सुरक्षित ठेवण्याचे काम सहकारी खरेदी-विक्री संस्था करत असतात.

**४) कृषी मालावर प्रक्रिया करणे :**

काही कृषी माल जसाच्या तसा विकला तरी चालतो. उदाहरणार्थ ज्वारी, बाजरी, गहू इत्यादी. परंतु काही कृषी मालावर प्रक्रिया करावी लागते. प्रक्रिया केल्यामुळे माल अधिक काळ टिकतो. मालाला किंमतही चांगली मिळते. म्हणून सहकारी विपणन संस्था कृषी मालावर प्रक्रिया करण्याचे कार्य करतात. काही विपणन संस्थांकडे स्वत:ची प्रक्रिया व्यवस्था असते. तर काही विपणन संस्थाकडे स्वत:च्या मालकीची प्रक्रिया व्यवस्था नसते. या संस्था खाजगी किंवा सहकारी क्षेत्रातून कृषी मालावर प्रक्रिया करून घेतात.

**५) मालाची बांधणी करणे :**

विशिष्ट वजनाच्या मालाची बांधणी करण्याचे कार्य सहकारी खरेदी-विक्री संस्था करतात. ५० किलो, १०० किलो अशा विविध वजनाचा माल पॅकिंग करून विकला जातो. १ किलो पासून १०० किलोपर्यंत वेगवेगळ्या वजनाचा माल पॅकिंग करून खरेदी-विक्री संस्था विकतात. त्यामुळे मालाची वाहतूक करणे शक्य होते. मालाची बांधणी केल्यामुळे माल खराब होत नाही. सुरक्षितपणे साठवून ठेवता येतो. जागा कमी लागते. भरणी, उतरणी करताना हमालांना त्रासदायक होत नाही. विक्रीच्या ठिकाणी वाहतूक करणे सुलभ होते. म्हणून सहकारी खरेदी-विक्री संस्था विविध प्रकारचा कृषी माल जसाच्या तसा विकत नाहीत. त्याची चांगली बांधणी करून विकतात. मालाचे पॅकिंग केल्यामुळे देशाच्या कोणत्याही भागात आणि जगभरसुद्धा कृषी मालाचे सहज वितरण करता येते.

**६) बाजारविषयक माहिती गोळा करणे :**

शेतमालाच्या किंमतींची माहिती गोळा करण्याचे काम सहकारी खरेदी-विक्री संस्था करत असतात. वेगवेगळ्या बाजारात वेगवेगळ्या किंमती असतात. मालाची खरेदी-विक्री करण्यासाठी सहकारी खरेदी-विक्री संस्थांना शेतमालाच्या किंमती माहित करून घ्याव्या लागतात. तसेच कोणत्या बाजारपेठेत माल चांगला खपू शकेल याचीही माहिती या संस्था गोळा करत असतात.

**७) शेतमालाच्या तारणावर कर्जपुरवठा करणे :**

शेतकऱ्यांना पैशाची गरज भासली तर सहकारी खरेदी-विक्री संस्था सभासद शेतकऱ्यांना शेतमालाच्या तारणावर कर्जपुरवठा करतात. त्यामुळे अडचणीच्या काळात शेतकऱ्यांना सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा मोठा आधार मिळतो.

**८) कृषी आदानांचा शेतकऱ्यांना पुरवठा करणे :**

खते, अवजारे, बियाणे इत्यादी कृषी आदानांचा शेतकऱ्यांना पुरवठा करण्याचे काम सहकारी खरेदी-विक्री संस्था करतात. खाजगी दुकानापेक्षा कमी किंमतीला ही कृषी आदाने खरेदी-विक्री संस्थांकडून शेतकऱ्यांना पुरवली जातात.

**९) शेतमालाची विक्री करणे :**

शेतकऱ्यांचा शेतमाल खरेदी करणे हे जसे सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे प्रमुख कार्य आहे त्याप्रमाणे शेतमालाची विक्री करणे हे सुद्धा सहकारी खरेदी-विक्री संस्थेचे प्रमुख कार्य आहे. किरकोळ व्यापारी, घाऊक व्यापारी, प्रक्रिया संस्था यांना कृषी मालाची विक्री करण्याचे कार्य विविध पातळीवरील सहकारी खरेदी-विक्री संस्था करतात.

**१०) निर्यात करणे :**

कृषी मालाच्या देशांतर्गत व्यापाराबरोबर कृषी माल परदेशात विकण्याचे काम सुद्धा सहकारी खरेदी-विक्री संस्थांना करावे लागते. कृषी मालासाठी विदेशी बाजारपेठा शोधून काढणे आणि त्या बाजारपेठेत शेतकऱ्यांचा माल पोहचवणे हे महत्त्वपूर्ण कार्य सहकारी खरेदी-विक्री संस्था करत असतात.

**११) सरकारच्या वतीने शेतमालाची खरेदी करणे :**

सरकारला बफर स्टॉक करण्यासाठी (अन्नधान्याचा सुरक्षित शिलकी साठा करण्यासाठी) कृषी मालाची (अन्नधान्याची, डाळींची) गरज असते. असा कृषी माल सरकारसाठी खरेदी करण्याचे कार्य सहकारी खरेदी-विक्री संस्था करत असतात.

**१२) कर्मचाऱ्यांना विपणनविषयक प्रशिक्षण देणे :**

सहकारी खरेदी-विक्री संस्था आपल्या कर्मचाऱ्यांना विपणनविषयक प्रशिक्षण देत असतात. सहकारी खरेदी-विक्री संस्था चांगल्या कार्यक्षमतेने आणि नफ्यात चालाव्यात यासाठी या संस्थांनी व्यावसायिक तत्त्वावर काम करणे आवश्यक असते. त्यासाठी सहकारी खरेदी-विक्री संस्था आपल्या कर्मचाऱ्यांसाठी सतत प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करत असतात. मार्गदर्शन शिबीरे, चर्चासत्रे यांचे आयोजन करत असतात. विशेष व्याख्यानांचे आयोजन करत असतात.

**सारांश :** अशा प्रकारे गावपातळीवरील सहकारी खरेदी विक्री संस्था, तालुका, जिल्हा, राज्य आणि

राष्ट्रीय पातळीवरील खरेदी-विक्री संस्था वरीलप्रमाणे विविध प्रकारची कार्ये करतात. कृषी मालाची खरेदी आणि विक्री करणे या मुख्य कार्याबरोबर मालाची साठवणूक करणे, प्रक्रिया करणे, मालाचे पॅकिंग करणे, शेतकऱ्यांना कृषी आदानांचा पुरवठा करणे ही सुद्धा विपणनाशी संबंधित कार्ये सहकारी खरेदी-विक्री संस्था करतात.

**सहकारी विपणनाचे फायदे / महत्त्व :**

भारतात जवळ जवळ शंभर वर्षापासून सहकारी तत्त्वावर कृषी मालाची खरेदी-विक्री केली जात आहे. सहकारी खरेदी-विक्री व्यवस्थेचे महत्त्व आजही कमी झालेले नाही. उलट दिवसेंदिवस सहकारी विपणन व्यवस्थेचे महत्त्व वाढत आहे. सहकारी तत्त्वावरील खरेदी-विक्रीचे काही फायदे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) सौदाशक्तीत वाढ :**

एकटा शेतकरी जेव्हा आपला माल व्यापाऱ्यांना विकण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्याची सौदाशक्ती (खरेदीदाराबरोबर किंमती संदर्भात चर्चा किंवा वाटाघाटी करण्याची क्षमता) कमी पडते. त्यामुळे चांगली/ किफायतशीर किंमत त्याला पदरात पाडून घेता येत नाही. परंतु सहकारी खरेदी-विक्री संस्थांची सौदाशक्ती चांगली असते. व्यापारी किंवा खरेदीदार एखाद्या शेतकऱ्याची फसवणूक करू शकतात. मालाचे दर पाडून त्याचे नुकसान करू शकतात. परंतु सहकारी संस्थांना कमी किंमत देऊ शकत नाहीत. त्यामुळे खरेदी-विक्री संस्थेच्या सभासदांचे नुकसान होत नाही. सभासद शेतकऱ्यांना सहकारी विपणन संस्थेमार्फत आपल्या कृषी मालाला चांगली किंमत मिळते. हा मोठा फायदा शेतकऱ्यांना सहकारी खरेदी-विक्री संस्थांमुळे मिळतो. म्हणून शेतकऱ्यांच्यादृष्टीने सहकारी खरेदी-विक्री संस्था महत्त्वाच्या आहेत.

**२) प्रतिक्षा क्षमतेत वाढ :**

शेतमालाला अपेक्षित / चांगली किंमत येईपर्यंत शेतमाल न विकणे, चांगली किंमत येईपर्यंत थांबणे याला प्रतिक्षा क्षमता असे म्हणतात. प्रतिक्षा क्षमता जितकी जास्त तितकी चांगली किंमत मिळण्याची खात्री असते. एकट्या शेतकऱ्याची प्रतिक्षा क्षमता खूपच कमी असते. शेतकरी गरीब असतात आणि त्यांना पैशाची निकड असते. त्यामुळे कृषी उत्पादन हाती आले की त्यांना बाजारात नेऊन ते उत्पादन विकावे लागते किंवा दारात आलेल्या व्यापाऱ्यांना माल विकावा लागतो. त्यामुळे चांगली किंवा योग्य किंमत त्यांना मिळत नाही. परंतु खरेदी-विक्री संस्थांची प्रतिक्षा क्षमता चांगली असते. त्यांच्याकडे माल साठवणुकीची सुविधा चांगली असते. ज्या शेतकऱ्यांना पैशाची निकड असते त्या शेतकऱ्यांना उचल किंवा कर्ज सुविधा खरेदी-विक्री संस्था उपलब्ध करून देतात. त्यामुळे ताबडतोब माल विकण्याची पाळी शेतकऱ्यांवर येत नाही. उचल (कर्ज) सुविधा शेतकऱ्यांना सहकारी खरेदी-विक्री संस्थांनी उपलब्ध करून दिल्यामुळे शेतकऱ्यांची पैशाची अडचण दूर होते त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतमालास चांगली किंमत येईपर्यंत थांबू शकतात. त्यामुळे शेतमालास चांगली किंमत मिळण्यास मदत होते. अशा प्रकारे सहकारी खरेदी-विक्री संस्थामुळे शेतकऱ्यांचाही फायदा होतो आणि खरेदी-विक्री संस्थांचाही फायदा होतो.

### ३) मध्यस्थांच्या संख्येत घट :

शेतकरी आपला शेतमाल सहकारी खरेदी-विक्री संस्थामार्फत विक्री करतात. त्यामुळे शेतकऱ्यांचा आणि खरेदी-विक्री संस्थेचा फायदा होतो. खरेदी-विक्री संस्था कृषी मालाच्या खरेदी-विक्रीची व्यवस्था करत असतात. मालाच्या खरेदी-विक्रीसाठी त्यांना कमीत कमी मध्यस्थ पुरेसे होतात. अनावश्यक मध्यस्थ टाळले जातात. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थांचाही फायदा होतो आणि शेतकऱ्यांचाही आर्थिक फायदा होतो. अनावश्यक मध्यस्थामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होते. पण सहकारी तत्त्वावरील खरेदी-विक्री संस्थामार्फत मालाची विक्री केल्याने अनावश्यक मध्यस्थ टाळले जातात. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक शोषण होत नाही. हा एक मोठा फायदा सहकारी खरेदी-विक्री संस्थेमुळे शेतकऱ्यांना मिळतो. म्हणून सहकारी खरेदी-विक्री संस्थांची आवश्यकता आहे.

### ४) गुदामे, शीतगृहे यांची निर्मिती :

कृषी माल दीर्घकाळ आणि सुरक्षितरित्या साठवण्यासाठी शास्त्रीय पद्धतीची चांगली गुदामे आणि शीतगृहे यांची गरज असते. एकटा शेतकरी हे करू शकत नाही. कारण त्यासाठी खूप खर्च करावा लागतो. तसेच शेतकऱ्याचे धारण क्षेत्र खूपच कमी असते. जमीन तुटपुंजी असल्याने उत्पादनही कमी असते. एवढे कमी उत्पादन ठेवण्यासाठीही जागा नसते. त्यामुळे शेतकऱ्यांना ताबडतोब माल विकण्याशिवाय गत्यंतर नसते. परंतु अनेक शेतकरी एकत्र येऊन जेव्हा सहकारी तत्त्वावर खरेदी-विक्री संस्था स्थापन करतात तेव्हा अशा संस्था गुदामांची, शीतगृहांची सुविधा निर्माण करू शकतात. कारण एका शेतकऱ्याच्या तुलनेत अनेक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेला सहकारी खरेदी-विक्री संस्थांची आर्थिक ताकद मोठी असते. त्यामुळे संस्था गुदामे, शीतगृहे यांची निर्मिती करू शकतात. तसेच त्यासाठी लागणारे कर्ज त्यांना बँकांकडून मिळू शकते. भारतात आजमितीस अनेक सहकारी खरेदी-विक्री संस्थांची स्वतःच्या मालकीची गुदामे किंवा वखारी आहेत. तसेच शीतगृहेसुद्धा आहेत. त्यामुळे अन्नधान्याची आणि इतर कृषी मालाची नासाडी थांबण्यास मदत झाली आहे. पाऊस, उंदीर, घुशी, चोर यामुळे कृषी मालाचे नुकसान थांबण्यास मदत झाली असून मालाला योग्य किंमत येईपर्यंत थांबता येणे शक्य झाले आहे. अशा प्रकारे एकटा शेतकरी गुदामे, शीतगृहे निर्माण करू शकत नसला तरी सहकारी खरेदी-विक्री संस्था मात्र अशी सोय करू शकते. त्यामुळे शेतमालाला योग्य किंमत मिळेपर्यंत थांबता येते. शिवाय मालाची नासाडीही थांबते. हा खरेदी-विक्री संस्थांचा शेतकऱ्यांना, संस्थांना आणि सरकारला मिळणारा अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

### ५) वाहतूक साधनांची सुविधा :

कृषी मालाची वाहतूक करण्यासाठी ट्रक, टेंपो, ट्रॅक्टर अशी वाहतुकीची साधने आवश्यक असतात. या साधनांची किंमत जास्त असते. गरीब शेतकऱ्यांना अशी साधने विकत घेणे परवडत नाही. परंतु सहकारी खरेदी-विक्री संस्थांची आर्थिक शक्ती चांगली असते. शिवाय वाहतूक साधने विकत घेण्यासाठी खरेदी-विक्री संस्थांना बँका व इतर वित्तीय संस्थांकडून सहज मदत मिळत असते. त्यामुळे खरेदी-विक्री संस्था वाहतूक साधने विकत

घेऊ शकतात. भारतात अनेक सहकारी खरेदी-विक्री संस्थांकडे स्वत:च्या मालकीची वाहतूक साधने आहेत. त्यामुळे वाहतूक साधनांच्या भाड्यावरील खर्च त्यांचा वाचला आहे. वाहतूक साधने भाड्याने घ्यावी लागत नसल्याने त्यांचा कृषीमालाच्या विपणनाचा (खरेदी-विक्रीचा) खर्च खूपच कमी झाला आहे. ज्या खरेदी-विक्री संस्थांकडे स्वत:च्या मालकीची वाहतूक साधने नाहीत त्या संस्था ही साधने भाड्याने घेतात आणि खरेदी-विक्रीची कार्ये पूर्ण करतात.

**६) शेतमालास रास्त भाव :**

काही खाजगी व्यापारी, दुकानदार किंवा सावकार शेतकऱ्यांच्या शेतमालास रास्त भाव देत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते. हे नुकसान होऊ नये यासाठी म्हणजेच शेतकऱ्यांच्या शेतमालास रास्त भाव मिळावा यासाठी सहकारी खरेदी-विक्री संस्थांची स्थापना करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालास रास्त किंवा वाजवी भाव मिळवून देणे हा सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा मुख्य उद्देश आहे. हा उद्देश साध्य करण्यात सहकारी खरेदी-विक्री संस्था यशस्वी झाल्या आहेत. सहकारी खरेदी-विक्री संस्थांची सौदाशक्ती, प्रतिक्षा क्षमता मोठी असते. या संस्था सर्वदूर माल विकू शकतात. कारण त्यांची स्वत:ची वाहतुकीची साधने असतात. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगली किंमत मिळण्यास मदत होते. सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे सभासद शेतकरीच असतात. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक होत नाही. खाजगी व्यापारी किंवा दुकानदार ज्याप्रमाणे कुषी मालाला कमी किंमत देऊन शेतकऱ्यांचे शोषण करतात त्याप्रमाणे सहकारी खरेदी-विक्री संस्था करत नाहीत. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे शेतकऱ्यांचे जीवनातील स्थान मोठे आणि महत्त्वपूर्ण आहे. अशा प्रकारे सहकारी खरेदी-विक्री संस्थांमुळे शेतकऱ्यांच्या शेतमालास रास्त (वाजवी) भाव मिळतो. म्हणून ज्या ठिकाणी अशा संस्था नाहीत आणि जेथे गरज आहे अशा ठिकाणी सहकारी खरेदी-विक्री संस्थांची स्थापना होणे आवश्यक आहे.

**७) शेतमालाच्या किंमतीतील घट रोखण्यास यश :**

शेतमालाच्या किंमतीत फार मोठे चढ-उतार होत राहणे अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने चांगले नसते. कारण त्यामुळे शेतकरी, ग्राहक यांचे नुकसान होते. शेतमालाच्या किंमतीत फार मोठी घट झाली तर शेतकरी उत्पादक यांचे नुकसान होते आणि शेतमालाच्या किंमतीत फार मोठी वाढ झाली तर ग्राहकांचे नुकसान होते. त्यांचा उपभोग कमी होतो. त्यांची शेतमालाची मागणी कमी होते. म्हणून शेतमालाच्या किंमतीतील मोठे चढ-उतार टाळले पाहिजेत. शेतमालाच्या किंमतीत वार्षिक २% ते ४% वाढ ग्राहकांच्या दृष्टीने नुकसानीची ठरत नाही. कारण ग्राहकांच्याही उत्पन्नात वाढ होत असते. परंतु किंमतीत फार मोठी वाढ किंवा फार मोठी घट चांगली नसते. सहकारी खरेदी-विक्री संस्था गुदामात माल साठवून ठेवतात आणि मागणीनुसार पुरवठा करतात. सहकारी विपणन संस्थांचे पुरवठ्यावर नियंत्रण असते. त्यामुळे मागणीपेक्षा पुरवठा अधिक होऊन किंमती कोसळत नाहीत किंवा मागणीपेक्षा पुरवठा कमी होऊन किंमती वाढत नाहीत. अशा प्रकारे सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या खरेदी व्यवहारामुळे शेतमालाच्या किंमती घटत नाहीत. सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतमालाची खरेदी आणि विक्री योग्य पद्धतीने करत असल्याने शेतमालाच्या किंमतीतील चढ-उतार टाळण्यास मदत होते.

### ८) दर्जेदार शेतमालाचे उत्पादन :

सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा आणखी एक फायदा सांगता येईल आणि तो म्हणजे सहकारी खरेदी-विक्री संस्थांमुळे सभासद शेतकऱ्यांना चांगला, दर्जेदार शेतमाल तयार करण्यास उत्तेजन मिळते. शेतकऱ्यांनी चांगला, दर्जेदार कृषी माल तयार करावा यासाठी सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतकऱ्यांना सर्व प्रकारचे सहाय्य करतात. तसेच उपयुक्त मार्गदर्शन करतात. त्यामुळे चांगल्या कृषी मालाचे उत्पादन शेतकरी घेऊ शकतात. दर्जेदार कृषी उत्पादनांच्या निर्मितीमुळे शेतकऱ्यांना किंमतही चांगली मिळते.

### ९) ग्राहक सहकारी संस्था, प्रक्रिया संस्थांना उपयुक्त :

सहकारी खरेदी-विक्री संस्थामुळे ग्राहक सहकारी संस्था आणि सहकारी प्रक्रिया संस्था या दोन संस्थांचाही चांगला फायदा होतो. सहकारी खरेदी-विक्री संस्थांकडून सहकारी ग्राहक संस्था आणि सहकारी प्रक्रिया संस्थांना विक्रीसाठी, प्रक्रियेसाठी कृषीमाल मिळतो. या दोन संस्था सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे प्रमुख ग्राहक आहेत. सहकारी प्रक्रिया संस्थांना कृषी मालावर प्रक्रिया करण्यासाठी कच्च्या मालाची गरज असते. हा कच्चा माल सहकारी खरेदी-विक्री संस्था पुरवतात. तसेच सहकारी ग्राहक भांडारांना गहू, तांदूळ, ज्वारी, फळे इत्यादी कृषी माल ग्राहकांना विकण्यासाठी हवा असतो. तो कृषी माल सहकारी विपणन संस्थांकडून त्यांना मिळतो. अशा प्रकारे सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा लाभ ग्राहक सहकारी संस्था आणि सहकारी प्रक्रिया संस्था यांनाही होतो. तसेच या दोन संस्था सहकारी खरेदी-विक्री संस्थांकडून कृषी माल खरेदी करत असल्याने सहकारी खरेदी-विक्री संस्थांचाही फायदा होतो. म्हणून जिथे आवश्यकता आहे त्या ठिकाणी सहकारी विपणन संस्था स्थापन होणे आवश्यक आहे.

### १०) सहकारी पतपुरवठा संस्थांना फायदेशीर :

बरेच शेतकरी गावातील किंवा तालुक्यातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्थांचे सभासद असतात. हे शेतकरी या पतपुरवठा संस्थांकडून कर्ज घेत असतात. जे शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे सभासद असतात आणि पतपुरवठा संस्थांचेही सभासद असतात त्या शेतकऱ्यांनी पतपुरवठा संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची वसुली सहकारी खरेदी-विक्री संस्था पतपुरवठा संस्थांना करून देतात. त्यामुळे सहकारी पतपुरवठा संस्थांची कर्जे बुडत नाहीत. अशा प्रकारे जे शेतकरी खरेदी-विक्री संस्थेचे आणि पतपुरवठा संस्थेचे सभासद असतात त्या शेतकऱ्यांच्या कर्जाची वसुली खरेदी-विक्री संस्था करतात. त्यामुळे पतपुरवठा संस्थांचाही फायदा होतो आणि शेतकऱ्यांचाही फायदा होतो.

### ११) सावकारांचा प्रभाव कमी होण्यास मदत :

ज्या भागात सहकारी खरेदी-विक्री संस्था पुरेशा संख्येने आहेत आणि चांगल्या कार्यक्षमतेने काम करतात त्या ठिकाणी शेतकऱ्यांना कर्जासाठी सावकारांच्या किंवा व्यापाऱ्याच्या दारात जावे लागत नाही. कारण सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात आगावू रक्कम / उचल किंवा कर्ज देतात. पुढे शेतमालाच्या किंमतीमधून या संस्था कर्जाची रक्कम कापून घेतात. त्यामुळे सावकारांवर अवलंबून राहण्याची

पाळी शेतकऱ्यांवर येत नाही. म्हणून ज्या ज्या ठिकाणी गरज आहे त्या त्या ठिकाणी सहकारी खरेदी-विक्री संस्थांची स्थापना होणे आवश्यक आहे.

**१२) विपणन खर्चात बचत :**

सहकारी तत्त्वावरील खरेदी-विक्रीचा आणखी एक फायदा म्हणजे खरेदी-विक्री संस्थांना विपणन खर्च कमी येतो. एकट्या शेतकऱ्याला विपणन खर्च किंवा विक्री खर्च जास्त येतो. मालाचे एकत्रीकरण करणे, मालाची वाहतूक करणे, मालाची साठवणूक करणे, मालावर प्रक्रिया करणे, प्रतवारी, वर्गीकरण करणे इत्यादी विविध विपणनविषयक क्रिया सहकारी खरेदी-विक्री संस्था करत असतात. त्यांच्याकडे ही सुविधा पुरेशा प्रमाणात असते. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थांना विपणन खर्च कमी येतो.

**१३) वाजवी दरात कृषी आदानांचा पुरवठा :**

सहकारी खरेदी-विक्री संस्था आपल्या सभासद शेतकऱ्यांना वाजवी दरात कृषी आदानांचा पुरवठा करतात. खते, बी-बियाणे, अवजारे, जंतुनाशके इत्यादींना कृषी आदाने असे म्हणतात. या आदानांचा शेतकऱ्यांना पुरवठा केला जातो. खरेदी-विक्री संस्थांकडून कृषी आदानांचा वाजवी दरात आणि पुरेशा प्रमाणात पुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना शेतीची कामे चांगल्या प्रकारे करण्यासाठी आणि शेतीची उत्पादकता वाढवण्यासाठी मदत होत आहे. हा सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा एक महत्त्वाचा फायदा आहे.

**१४) कृषी माल प्रक्रिया सुविधेत वाढ :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा आणखी एक फायदा म्हणजे या संस्थामुळे कृषी मालावर प्रक्रिया करणारे कारखाने स्थापन होतात. सहकारी खरेदी-विक्री संस्था सगळा कृषी माल जसाच्या तसा विकत आणत नाहीत. काही कृषी मालावर प्रक्रिया करतात. मालावर प्रक्रिया करण्यासाठी कारखाने काढतात. मालावर प्रक्रिया केल्याने मालाला चांगली किंमत मिळते. यामुळे खरेदी-विक्री संस्थांचाही फायदा होतो आणि शेतकऱ्यांचाही फायदा होतो.

**१५) उपभोग्य वस्तूंचा पुरवठा :**

सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतकऱ्यांना केवळ कृषी आदानांचा पुरवठा करत नाहीत तर काही उपभोग्य वस्तूंचा किंवा जीवनावश्यक वस्तूंचा सुद्धा पुरवठा करतात. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे महत्त्व वाढत आहे.

**१६) कृषी मालाचा खप वाढण्यास मदत :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा आणखी एक फायदा म्हणजे या संस्थामुळे कृषी मालाचा खप वाढण्यास मोठी मदत होते. कारण काही खरेदी-विक्री संस्थांची स्वत:ची विक्री केंद्रे आहेत. तसेच या संस्थांकडे स्वत:ची वाहतूक साधने असल्याने जिल्ह्यात, राज्यात व राज्याच्या बाहेरसुद्धा या संस्था विक्रीसाठी माल पाठवतात.

एकटा शेतकरी हे करू शकत नाही. अशा प्रकारे सहकारी खरेदी-विक्री संस्थांकडे स्वत:ची विक्रीची साधने असतात. वाहतूक साधने असतात. त्यामुळे कृषी मालाची विक्री मोठ्या प्रमाणात करणे खरेदी-विक्री संस्थांना शक्य होते. त्याचा फायदा खरेदी-विक्री संस्थांनाही होतो आणि शेतकऱ्यांनासुद्धा होतो.

**१७) उपभोक्त्यांच्या हिताची काळजी :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे या संस्था शेतकऱ्यांच्या हिताची जशी काळजी घेतात तशी सामान्य उपभोक्त्यांची सुद्धा काळजी घेतात. शेतकऱ्यांना चांगला दर देताना ग्राहकांना त्याचा भुर्दंड बसणार नाही याची काळजी घेतात. या संस्था ग्राहकांना चांगला, निर्भेळ माल रास्त किंमतीला विकतात. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतकऱ्यांच्याप्रमाणे सामान्य ग्राहकांनाही उपयुक्त आहेत.

**१८) निर्यात व्यापारात वाढ :**

राज्य पातळीवरील आणि राष्ट्रीय पातळीवरील सहकारी खरेदी-विक्री संस्था देशांतर्गत व्यापाराबरोबर आंतरराष्ट्रीय व्यापारातही भाग घेतात. या संस्था जगातील विविध देशांना कृषी मालाची निर्यात करतात. त्यामुळे सरकारला परकीय चलन प्राप्त होते. तसेच देशाचा एकूण निर्यात व्यापार वाढण्यासाठी त्यामुळे मदत होते.

**१९) फसवणुकीस पायबंद :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या स्थापनेमुळे शेतकरी आपला माल या संस्थांना विकू लागले आहेत. खाजगी व्यापाऱ्यांपेक्षा या संस्था कृषी मालास चांगला भाव देतात. तसेच खोटी वजन मापे या संस्था वापरत नाहीत किंवा अनावश्यक कपातीसुद्धा बिलातून करत नाहीत. सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतमालास जो दर देतात त्यापेक्षा कमी दर व्यापारी देत नाहीत हा एक महत्त्वाचा फायदा आहे. शेतकऱ्यांचा माल मिळवण्यासाठी खाजगी व्यापाऱ्यांना सहकारी खरेदी-विक्री संस्थेच्या दराएवढा किंवा त्यापेक्षा जास्त दर द्यावा लागतो. त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होतो.

**२०) आदिवासींचा विकास :**

आदिवासी भागातील सहकारी खरेदी-विक्री संस्था आदिवासींच्या कृषी मालाबरोबर वनउत्पादने (Minor Forest Produce) सुद्धा विकत घेतात. त्यांच्या कलाकुसरीच्या वस्तू देश, विदेशात खपवतात. आदिवासींच्या उत्पादनांच्या विक्रीची व्यवस्था या संस्था करतात. त्यामुळे आदिवासींच्या वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांची, कौशल्याची माहिती देशाच्या कानाकोपऱ्यातील लोकांना होते. जगभरातील लोक मोठ्या आस्थेने आणि आपुलकीने आदिवासींची उत्पादने विकत घेतात. त्यामुळे आदिवासी बांधवांना चार पैसे अधिक मिळून त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होते.

**२१) वाढाव्याचा लाभ शेतकऱ्यांना :**

सहकारी विपणन संस्थांना जो नफा मिळतो त्याला नफा असे न म्हणता वाढावा असे म्हणतात. या वाढाव्याचे वाटप सहकारी खरेदी-विक्री संस्थेच्या सभासद शेतकऱ्यांना त्यांनी केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात

केले जाते. शेतकऱ्यांनी आपला सर्व शेतमाल सहकारी खरेदी–विक्री संस्थांना विकावा यासाठी वाढाव्याचे वाटप या संस्था व्यवहारांच्या प्रमाणात करतात. त्यामुळे शेतकरी आपला सर्व माल या संस्थांना विकण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे खरेदी–विक्री संस्थांचाही फायदा होतो आणि शेतकऱ्यांचाही फायदा होतो.

**सारांश :** अशा प्रकारे सहकारी खरेदी–विक्री संस्थांचे फायदे वरीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत. शेतकऱ्यांना रास्त भाव मिळवून देण्यात या संस्था यशस्वी झाल्या आहेत. या संस्था गुदामे, शीतगृहे यांची निर्मिती करतात. मालाच्या खरेदी–विक्रीसाठी वाहतुकीची साधने उपलब्ध करून देतात. शेतकऱ्यांचा शेतमाल देश–विदेशात विकतात. शेतीची उत्पादकता वाढावी यासाठी या संस्था चांगली बियाणे, खते, अवजारे शेतकऱ्यांना पुरवतात. त्यामुळे चांगले, दर्जेदार कृषी उत्पादन निर्माण होण्यास मदत होते.

**सहकारी खरेदी–विक्री संस्थांचे दोष / समस्या / उणिवा :**

सहकारी खरेदी–विक्री संस्था कृषी मालाच्या विपणनाशी संबंधित विविध कार्ये करतात. त्यामुळे शेतकरी, ग्राहक या विविध घटकांना विविध फायदे मिळत आहेत. परंतु या खरेदी–विक्री संस्थांच्या कार्यपद्धतीत काही उणिवा किंवा दोष आहेत. तसेच या संस्थांना काही अडचणींना किंवा समस्यांना तोंड द्यावे लागते. या समस्या आणि त्यांच्या कार्यपद्धतीतील काही दोष यांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**१) माल साठवणुकीची अपुरी सुविधा :**

भारतातील बऱ्याच सहकारी खरेदी–विक्री संस्थाजवळ शेतमालाचा साठा करून ठेवण्यासाठी पुरेशी सुविधा नाही. काही खरेदी–विक्री संस्थाकडे स्वत:च्या मालकीची गुदामे नाहीत. तर काही खरेदी–विक्री संस्थांकडे स्वत:च्या मालकीची गुदामे आहेत. परंतु त्यांची साठवणक्षमता कमी आहे. कित्येक सहकारी खरेदी–विक्री संस्थांकडे स्वत:ची शीतगृहे नाहीत. सहकारी खरेदी–विक्री संस्थांना भाड्याने गुदामे घ्यावी लागतात. त्यामुळे त्यांचा विपणन खर्च वाढतो.

**२) भांडवलाची समस्या :**

गावपातळीवर आणि तालुका पातळीवर काम करणाऱ्या सहकारी खरेदी–विक्री संस्थांना भेडसावणारी आणखी एक समस्या म्हणणे भांडवलाची समस्या होय. अनेक सहकारी संस्थांना ही समस्या भेडसावते. कृषी मालाची खरेदी–विक्री करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पैसा लागतो. शेतमालाच्या विपणनाशी संबंधित विविध कार्ये करण्यासाठी (मालाचे एकत्रीकरण करणे, मालाची वाहतूक करणे, मालावर प्रक्रिया करणे, मालाच्या विक्रीची व्यवस्था पाहणे) सहकारी खरेदी–विक्री संस्थांना भांडवलाची गरज असते. शेतकरी सभासद संस्थेत फार कमी ठेव ठेवतात. तसेच या संस्थांना बँकांकडून पुरेसे कर्ज मिळत नाही. त्यामुळे या खरेदी–विक्री संस्थांना मोठ्या प्रमाणात शेतमाल विकत घेता येत नाही. भांडवलाची समस्या ही समस्या अनेक खेड्यातील सहकारी खरेदी–विक्री संस्थांना भेडसावते.

**३) सहकारी पतपुरवठा संस्था आणि सहकारी खरेदी-विक्री संस्था यांच्यात समन्वयाचा अभाव :**

जे शेतकरी सहकारी पतपुरवठा संस्था आणि सहकारी खरेदी-विक्री संस्था या दोन्ही संस्थांचे सभासद असतात त्या दोन्ही संस्थांच्या फायद्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या सोयीसाठी या दोन्ही संस्थांमध्ये योग्य प्रकारच्या समन्वय असणे आवश्यक असते. म्हणजे शेतकऱ्यांनी सहकारी पतपुरवठा संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड सहकारी खरेदी-विक्री संस्थांनी कृषी मालाच्या बिलातून परस्पर केली पाहिजे. शेतकरी कृषी सहकारी खरेदी-विक्री संस्थांना माल विकत असतात. ज्या शेतकऱ्यांनी सहकारी पतपुरवठा संस्थांकडून कर्ज घेतलेले असते त्या शेतकऱ्यांच्या कर्जाची रक्कम शेतमालाच्या बिलातून वसूल करून खरेदी-विक्री संस्थांनी पतपुरवठा संस्थांना भरली पाहिजे. यामुळे पतपुरवठा संस्थांची कर्जे बुडत नाहीत. कर्जाची वेळेवर वसुली होते. परंतु असा समन्वय अनेक सहकारी खरेदी-विक्री संस्था आणि सहकारी पतपुरवठा संस्था यांच्यात दिसत नाही. त्यामुळे पतपुरवठा संस्थांची कर्जवसुली वेळेवर होत नाही.

**४) शेतकऱ्यांची उदासिनता :**

सर्वच शेतकरी आपल्या गावातील किंवा तालुक्यातील सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे सभासद नाहीत. सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे आपण सभासद झालो तर खरेदी-विक्री संस्था आपण पतपुरवठा संस्थेकडून घेतलेले कर्ज शेतमालाच्या बिलातून वसूल करून घेतील अशी भीती शेतकऱ्यांना वाटते. ही बाब अनेक शेतकऱ्यांना आवडत नाही. त्यामुळे ते सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे सभासद होणे टाळतात. सरकारने भविष्यात जर कर्जमाफी केली तर आपणाला त्या कर्जमाफीचा लाभ होणार नाही असे काही शेतकऱ्यांना वाटते. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे सभासद ते होत नाहीत. आपला शेतमाल ते खाजगी व्यापाऱ्यांना विकतात. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे नुकसान होते.

**५) कार्यक्षम व्यवस्थापनाचा अभाव :**

सहकारी खरेदी-विक्री संस्था पगारी नोकर आणि अधिकारी नेमून संस्थेचे काम करत असतात. परंतु खेड्यापाड्यातील गावपातळीवरील अनेक सहकारी खरेदी-विक्री संस्थांची आर्थिक स्थिती फारशी चांगली नाही. त्यामुळे ते चांगले, कुशल व्यवस्थापक व इतर तज्ज्ञ व्यक्ती नेमू शकत नाहीत. त्यांना भरपूर पगार द्यावा लागतो. तेवढी आर्थिक क्षमता सहकारी खरेदी-विक्री संस्थांची नसते. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थांना अप्रशिक्षित किंवा कमी कार्यक्षम लोकांकडून खरेदी-विक्री संस्थेचे कामकाज करून घ्यावे लागते. कोणत्याही आर्थिक संस्थेचे यश हे तिच्या व्यवस्थापनावर अवलंबून असते. व्यवस्थापन चांगले, कार्यक्षम असेल तर संस्थेची चांगली व अल्पावधीत प्रगती होते. परंतु वर नमूद केलेल्या विविध कारणामुळे अनेक सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या व्यवस्थापनाचा दर्जा फारसा समाधानकारक नाही.

**६) उधारीचे व्यवहार कमी :**

खाजगी घाऊक व्यापारी किंवा मोठे व्यापारी विक्रीचे व्यवहार मोठ्या प्रमाणात उधारीने करतात. उधारीने मालाची विक्री करतात. त्यामुळे त्यांची उलाढाल मोठी असते. परंतु सहकारी खरेदी-विक्री संस्था मात्र खाजगी

व्यापाऱ्यांप्रमाणे मोठ्या प्रमाणात उधारीने व्यवहार करत नाहीत. त्याचा प्रतिकूल किंवा वाईट परिणाम त्यांचा विक्रीवर होतो.

**७) वाहतूक साधनांची कमतरता :**

शेतकऱ्यांचा शेतमाल गोळा करून तो बाजारपेठेपर्यंत पोहचवण्यासाठी सहकारी खरेदी-विक्री संस्थांकडे पुरेशा प्रमाणात वाहतूक साधने आवश्यक असतात. परंतु काही सहकारी खरेदी-विक्री संस्थांकडे स्वत:ची मालकीची वाहतूक साधने नाहीत किंवा काही खरेदी-विक्री संस्थांकडे पुरेशा प्रमाणात स्वत:च्या मालकीची वाहतूक साधने नाहीत. या संस्थांना भाड्याने वाहतूक साधने घ्यावी लागतात. वाहतूक भाड्यावर खर्च करावा लागतो. तसेच स्वत:ची वाहतूक साधने नसलेल्या सहकारी खरेदी-विक्री संस्थांना पुरेशा प्रमाणात किंवा मोठ्या प्रमाणात शेतमालाची खरेदी करता येत नाही.

**८) खेड्यातील व्यापारी, सावकार यांना माल विकावा लागतो :**

विविध कारणामुळे शेतकरी आपला शेतमाल सहकारी खरेदी-विक्री संस्थांना न विकता खेड्यातील व्यापारी, दुकानदार किंवा सावकार यानांच विकतात. काही शेतकरी खूपच गरीब असतात. त्यांच्याकडे बाजारात विक्रीयोग्य माल खूपच कमी असतो. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थेकडे नेऊन माल विकणे त्यांना परवडत नाही. विक्रीयोग्य माल कमी असल्याने गावातच माल विकून टाकणे शेतकरी पसंत करतात. दुसरे कारण असे की, आजही काही शेतकरी सहकारी पतपुरवठा संस्था आणि सहकारी खरेदी-विक्री संस्था यांच्याकडून कर्ज किंवा उचल घेत नाहीत. व्यापारी, सावकार यांच्याकडून कर्ज घेतात. त्यामुळे त्यांना आपला कृषी माल, व्यापारी, सावकार यांनाच विकावा लागतो. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थांना मोठ्या प्रमाणात कृषी माल गोळा करता येत नाही.

**९) प्रक्रिया सुविधांची कमतरता :**

भारतातील सर्वच सहकारी खरेदी-विक्री संस्थांकडे कृषी मालावर प्रक्रिया करण्याची सुविधा उपलब्ध नाही. काही खरेदी-विक्री संस्थांकडे स्वत:च्या मालकीची प्रक्रिया सुविधा नाही. त्यामुळे कृषी माल त्यांना जसाच्या तसा विकावा लागतो. कृषी मालावर प्रक्रिया केली तर अधिक किंमत मिळते. यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थांचाही फायदा होतो आणि शेतकऱ्यांचाही फायदा होतो. परंतु काही सहकारी खरेदी-विक्री संस्थांकडे प्रक्रिया सुविधा नाही किंवा प्रक्रिया सुविधा अपुरी आहे. त्यामुळे खरेदी-विक्री संस्थांना अधिक नफा मिळवता येत नाही.

**१०) व्यापाऱ्यांशी स्पर्धा :**

गावपातळीवरील कित्येक सहकारी खरेदी-विक्री संस्थांना खाजगी व्यापाऱ्यांशी स्पर्धा करावी लागते. हे खाजगी व्यापारी शेतकऱ्यांच्या शेतमालास सहकारी खरेदी-विक्री संस्थापेक्षा अधिक किंमत देतात. शेतकऱ्यांनी त्यांचा सगळा कृषी माल आपणालाच विकावा यासाठी काही क्लृप्त्या करतात. शेतकऱ्यांना काही आमिषे

दाखवतात. त्यामुळे काही शेतकरी आपला कृषी माल सहकारी खरेदी-विक्री संस्थांना न विकता व्यापाऱ्यांना विकतात. अशा प्रकारे गाव पातळीवरील सहकारी खरेदी-विक्री संस्थांना व्यापाऱ्यांशी स्पर्धा करावी लागते. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्था मोठ्या प्रमाणात शेतमालाची खरेदी करू शकत नाहीत. शेतमालाची खरेदी कमी राहिल्यामुळे शेतमालाच्या विक्रीचे प्रमाणही कमी राहते. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थांची प्रगती मंद गतीने होते.

**११) मालाची किंमत उशीरा मिळणे :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांना शेतकरी आपला माल विकत असतात. परंतु बऱ्याच सहकारी खरेदी-विक्री संस्था शेतकऱ्यांना त्यांच्या मालाची किंमत उशीरा देतात. वेळेवर देत नाहीत. त्यामुळे शेतकरी नाराज होतात. खाजगी व्यापारी शेतकऱ्यांच्या बिलाची रक्कम ताबडतोब रोख देतात. त्यामुळे काही शेतकरी खरेदी-विक्री संस्थेपेक्षा व्यापाऱ्यांना माल विकणे पसंत करतात.

**१२) राजकीय हेवेदावे :**

भारतातील बऱ्याच सहकारी खरेदी-विक्री संस्था गलिच्छ राजकारणापासून, राजकीय हेव्यादाव्यापासून, गटबाजीपासून मुक्त नाहीत. गलिच्छ राजकारण, गटबाजी यामुळे काही शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा लाभ होत नाहीत. विरोधी गटाचे सदस्य संस्था मोडकळीस आणू पाहतात. आपला माल संस्थेला विकण्याऐवजी दुकानदार व्यापारी यांना विकणे ते पसंत करतात.

**१३) आदिवासी भागात रस्त्यांची सुविधा अपुरी :**

आदिवासी भागात रस्त्यांची सुविधा फारशी समाधानकारक नाही. आदिवासी डोंगराळ भागात शेती करतात. विविध पाड्यावर राहतात. राहत्या ठिकाणापासून, शेतापासून रस्ते दूर अंतरावर आहेत. त्यामुळे कृषी माल खरेदी-विक्री संस्थांच्या विक्री केंद्रापर्यंत घेऊन जाणे परवडत नाही. गावात किंवा पाड्यावर आलेल्या खाजगी दुकानदारांना माल विकून टाकणे आदिवासी पसंत करतात. त्यामुळे आदिवासी भागातील या संस्थांना पुरेशा प्रमाणात कृषी माल व जंगल उत्पादने गोळा करणे शक्य होत नाही.

**१४) गुणात्मक प्रगतीकडे कमी लक्ष :**

शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने सहकारी खरेदी-विक्री संस्था अत्यंत महत्त्वाच्या असल्याने सरकारने या खरेदी-विक्री संस्थांच्या स्थापनेवर स्वातंत्र्योत्तर काळात मोठा भर दिला. त्याप्रमाणे देशभर या संस्थांची स्थापना होऊ लागली. अशा प्रकारे सरकारच्या प्रोत्साहनामुळे देशभर सहकारी खरेदी-विक्री संस्थांची स्थापना होऊ लागली. परंतु या संस्थांच्या गुणात्मक प्रगतीकडे मात्र काहीसे दुर्लक्ष झाले. सहकारी खरेदी-विक्री संस्थांची संख्यात्मक प्रगती चांगली झाली. परंतु गुणात्मक प्रगतीकडे दुर्लक्ष झाले अशी टीका सहकारी खरेदी-विक्री संस्थावर केली जाते.

**१५) पतपुरवठा संस्थांची स्पर्धा :**

भारतातील सहकारी खरेदी-विक्री संस्थांना भेडसावणारी आणखी एक महत्त्वाची समस्या म्हणजे या संस्थांना खाजगी व्यापाऱ्याबरोबर पतपुरवठा संस्थांशी सुद्धा स्पर्धा करावी लागते. काही पतपुरवठा संस्था कृषी मालाची खरेदी-विक्री करतात. त्याचा परिणाम खरेदी-विक्री संस्थांच्या खरेदी-विक्रीवर होतो. त्यांची उलाढाल कमी होते.

**१६) वशिलेबाजी, लाचलुचपत :**

काही सहकारी खरेदी-विक्री संस्थामध्ये वशिलेबाजी, लाचलुचपतीसारखे गैरप्रकार आढळून येतात. राजकारणी लोकांकडून, हितसंबंधी लोकांकडून नोकरभरतीत हस्तक्षेप केला जातो. त्यामुळे चांगले, कार्यक्षम मनुष्यबळ खरेदी-विक्री संस्थांना मिळत नाही. नोकर भरतीसाठी लाचखोरीचे प्रकार केले जातात. त्यामुळे खरेदी-विक्री संस्था बदनाम होत आहेत. सर्व खरेदी-विक्री संस्थामध्ये राजकारण, वशिलेबाजी, लाचखोरी हे प्रकार चालत नाहीत. काही संस्थांमध्ये हे प्रकार चालतात. परंतु त्यामुळे सर्वच संस्थांची बदनामी होते.

**१७) हिशेबतपासणी वेळेवर न होणे :**

काही सहकारी खरेदी-विक्री संस्थांची हिशेब तपासणी वेळेवर होत नाही. वेळच्यावेळी हिशेब तपासणी करून घेण्यास काही खरेदी-विक्री संस्था तत्परता दाखवत नाहीत. त्यामुळे भ्रष्टाचार, गैरव्यवहार याबाबतची माहिती लवकर कळत नाही. संस्थेचे कामकाज कशा प्रकारे चालले आहे ते समजण्यासाठी संस्थेची नियमित वेळच्यावेळी तपासणी होणे आवश्यक असते. पण काही सहकारी खरेदी-विक्री संस्था नियमित हिशेब तपासणी करून घेत नाहीत.

**१८) पगारी नोकरामध्ये निष्ठेचा अभाव :**

गावातील किंवा तालुक्यातील शेतकरी एकत्र येऊन सहकारी खरेदी-विक्री संस्था स्थापन करत असतात. संचालक मंडळात शेतकरी असतात. परंतु संस्थेचे विपणनविषयक आणि इतर व्यवहार पगारी नोकरी नेमून करावे लागतात. या नोकरांना दरमहा नियमित पगार मिळत असतो. त्यांचा पगार संस्थेच्या उलाढालीवर (विक्रीवर) अवलंबून नसतो. त्यामुळे पगारी नोकरी निष्ठेने किंवा आस्थेने काम करत नाहीत. फार थोड्या नोकरांना सहकाराबद्दल आस्था किंवा आपुलकी असते. अशा प्रकारे पगारी नोकर फारसे प्रामाणिकपणे काम करत नाहीत. शेतकरी शेतीची कामे करत असतात. त्यांना संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्यास फारसा वेळ नसतो.

**१९) सभासद संख्या अपुरी :**

परिसरातील सर्व शेतकऱ्यांनी सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे सभासद होणे आवश्यक आहे. परंतु सर्व शेतकरी सभासद होत नाहीत. त्यामुळे त्यांना सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे फायदे मिळत नाहीत. तसेच हे सभासद आपला माल खरेदी-विक्री संस्थांना विकत नसल्यामुळे खरेदी-विक्री संस्थांचीही उलढाल कमी होते.

**२०) व्यापाऱ्यांचे वर्चस्व :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे सभासदत्व परिसरातील व्यापाऱ्यांनासुद्धा दिले जाते. त्यामुळे हे व्यापारी लोक आपले हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करतात. सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा जास्तीत जास्त लाभ आपणालाच होईल असे प्रयत्न ते करत राहतात. त्यामुळे संस्थेवर व्यापाऱ्यांचे वर्चस्व निर्माण होते.

**२१) मोठ्या शेतकऱ्यांचे वर्चस्व :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा आणखी एक दोष म्हणजे या संस्थांवर मोठ्या शेतकऱ्यांचे वर्चस्व आहे. मुठभर मोठे शेतकरी संचालक मंडळात असतात. गरीब शेतकरी निवडणुकीला उभे राहत नाहीत. उभे राहिले तर त्यापैकी काहीजण निवडून येत नाहीत. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थावर मोठ्या शेतकऱ्यांचेच वर्चस्व निर्माण होते.

**सारांश :** अशा प्रकारे भारतातील सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे दोष / उणिवा यांचे थोडक्यात स्पष्टीकरण वरीलप्रमाणे दिले आहे. सर्वच सहकारी खरेदी-विक्री संस्थांमध्ये हे दोष नाहीत. हे खरे असले तरी त्यामुळे संपूर्ण सहकारी विपणन व्यवस्थाच बदनाम होते हे मात्र खरे आहे.

**भारतातील सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे दोष / उणिवा / समस्या / अडचणी दूर करण्यासाठी उपाय / शिफारशी :**

भारतातील सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या कार्यपद्धतीत काही दोष किंवा उणिवा आहेत. तसेच या संस्थांना काही समस्यांना / अडचणींना / आवाहनांना तोंड द्यावे लागते. शेतमालाची खरेदी-विक्री करणाऱ्या सहकारी संस्था शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असल्याने या संस्थांची संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी या संस्थांना भेडसावणाऱ्या समस्या आणि या संस्थांच्या उणिवा/ दोष यांचे निर्मूलन झाले पाहिजे. सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे दोष आणि समस्या नाहीशा करण्यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**१) ठेवी गोळा करण्यावर भर देणे आवश्यक :**

भारतातील गावपातळीवरील सहकारी खरेदी-विक्री संस्थांना भांडवलाची समस्या जाणवते. त्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात कृषी मालाची खरेदी करता येत नाही. सहकारी खरेदी-विक्री संस्थांची आर्थिक स्थिती भक्कम होण्यासाठी या संस्थांनी मोठ्या प्रमाणात ठेवी गोळा केल्या पाहिजेत. खरेदी-विक्री संस्थांचे सभासद असणाऱ्या शेतकऱ्यांनी संस्था सुदृढ होण्यासाठी खरेदी-विक्री संस्थेमध्येच ठेवी ठेवल्या पाहिजेत. गरीब शेतकऱ्यांच्या तुलनेत मोठ्या शेतकऱ्यांना खरेदी-विक्री संस्थेकडून अधिक उत्पन्न मिळते. म्हणून मोठ्या शेतकऱ्यांनी खरेदी-विक्री संस्थांकडे जास्तीत जास्त ठेवी ठेवल्या पाहिजेत. सहकारी खरेदी-विक्री संस्थांनी जास्तीत जास्त ठेवी गोळा करण्यावर भर दिला तर त्यांची आर्थिक स्थिती भक्कम होऊन त्यांना कृषी मालाची खरेदी आणि इतर विपणनविषयक क्रिया मोठ्या प्रमाणात करता येतील.

**२) शेतकऱ्यांना सहकारी विपणन व्यवस्थेचे महत्त्व पटवून देणे आवश्यक :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या स्थापनेचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणणे हा आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठीच सहकारी खरेदी-विक्री संस्थांची स्थापना सरकारच्या पुढाकाराने संपूर्ण देशभर झाली आहे. परंतु कित्येक शेतकरी आपला कृषी माल सहकारी खरेदी-विक्री संस्थांना विकत नाहीत. खाजगी व्यापाऱ्यांना विकतात. तसेच काही शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संस्थेचे सभासद होत नाहीत. म्हणून शेतकरी बांधवांना सहकाराचे / सहकारी चळवळीचे आणि सहकारी विपणन व्यवस्थेचे महत्त्व पटवून दिले पाहिजे. खरेदी-विक्री संस्थेच्या कार्यक्षेत्रातील सर्व शेतकरी सहकारी खरेदी-विक्री संस्थेचे सभासद होतील आणि ते आपला संपूर्ण कृषी माल सहकारी खरेदी-विक्री संस्थेलाच विकतील या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्याशिवाय सहकारी खरेदी-विक्री संस्था मजबूत होणार नाहीत आणि शेतकऱ्यांच्या लाभातही वाढ होणार नाही.

**३) गुदाम व्यवस्थेवर भर :**

भारतातील काही सहकारी खरेदी-विक्री संस्थांची स्वत:च्या मालकीची गुदामे नाहीत. तसेच शीतगृहे नाहीत. त्यामुळे या खरेदी-विक्री संस्थांना मोठ्या प्रमाणावर कृषी मालाची खरेदी करता येत नाही. म्हणून सर्व खरेदी-विक्री संस्थांनी गुदाम बांधणीवर आणि शीतगृहांच्या बांधणीवर भर दिला पाहिजे. गुदाम बांधण्यासाठी राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील विपणन संस्था तसेच गुदाम महामंडळ मदत करत असते. त्याचा लाभ या खरेदी-विक्री संस्थांनी घेतला पाहिजे. सर्व सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या मालकीची गुदामे आणि शीतगृहे असली पाहिजेत.

**४) सभासदसत्व फक्त शेतकऱ्यांनाच द्यावे :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे सभासदत्व व्यापाऱ्यांना देऊ नये. फक्त शेतकरी बांधवांनाच द्यावे. त्यामुळे व्यापाऱ्यांकडून संस्थेचे आणि सभासद शेतकऱ्यांचे होणारे अहित थांबू शकेल. एखादा शेतकरी व्यापारी असेल आणि त्याच्यामुळे संस्थेचे अहित होत असेल तर त्यालाही सभासदत्व देऊ नये.

**५) सरकारचे सहाय्य आवश्यक :**

दुर्बल सहकारी खरेदी-विक्री संस्थांना सरकारने सर्वतोपरी सहकार्य करणे आवश्यक आहे. सरकारने या संस्थांचे जास्तीत जास्त भागभांडवल विकत घ्यावे. त्यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थांच्या भांडवलात वाढ होईल.

**६) इतर सहकारी संस्थांची जबाबदारी :**

गावपातळीवर सहकारी खरेदी-विक्री संस्थांबरोबर सहकारी प्रक्रिया संस्था, सहकारी पतपुरवठा संस्था, विकास सोसायट्या कामे करत असतात. या संस्थांनी सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे भागभांडवल विकत घेऊन खरेदी-विक्री संस्थांना मदत करावी. त्यामुळे खरेदी-विक्री संस्थांना भांडवलाची चणचण भासणार नाही.

**७) सहकारी आणि सरकारी बँकांची जबाबदारी :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांना शेतमालाची खरेदी करण्यासाठी मोठ्या प्रमाणात पैसा लागतो. म्हणून सहकारी बँकांनी या संस्थांना पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा करणे आवश्यक आहे. तसेच सरकारी किंवा राष्ट्रीयीकृत व्यापारी बँकांनी सुद्धा खरेदी-विक्री संस्थांना कर्जपुरवठा करणे आवश्यक आहे. त्यांच्याकडील मालाच्या तारणावर सहकारी बँकांनी व सरकारी बँकांनी कमी व्याजदरात पुरेसा कर्जपुरवठा केला पाहिजे.

**८) कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणाची सुविधा :**

सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे यश-अपयश हे कर्मचारी, अधिकारी यांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. प्रशिक्षित, तज्ञ कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता चांगली असते. म्हणून सहकारी खरेदी-विक्री संस्थांचे कर्मचारी हे प्रशिक्षित असले पाहिजेत. म्हणून सहकारी खरेदी-विक्री संस्थांनी त्यांच्यासाठी प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून दिली पाहिजे. तसेच वर्षातील काही वेळा त्यांना विपणन क्षेत्रातील तज्ञांच्या व्याख्यानाचा किंवा मार्गदर्शनाचा सुद्धा लाभ दिला पाहिजे.

**९) स्वत:ची वाहतूक साधने असणे गरजेचे :**

काही सहकारी खरेदी-विक्री संस्थांकडे स्वत:च्या मालकीची वाहतुकीची साधने नाहीत. त्यांना भाड्याने वाहतूक साधने घ्यावी लागतात. त्यामुळे खरेदी-विक्री खर्च वाढतो. म्हणून प्रत्येक सहकारी खरेदी-विक्री संस्थेकडे स्वत:ची वाहतूक साधने असणे आवश्यक आहे.

**१०) ग्राहक भांडारांची जबाबदारी :**

खाजगी आणि सहकारी ग्राहक भांडारांनी त्यांना विक्रीसाठी आवश्यक असणारा जास्तीत जास्त कृषी माल सहकारी खरेदी-विक्री संस्थांकडूनच विकत घ्यावा. खाजगी व्यापाऱ्यांकडून विकत घेऊ नये. यामुळे सहकारी खरेदी-विक्री संस्थांना अधिक नफा मिळू शकेल.

**११) प्रक्रिया कारखाने उभारणे आवश्यक :**

प्रत्येक सहकारी खरेदी-विक्री संस्थेने स्वत:च्या मालकीचे प्रक्रिया कारखाने उभे केले पाहिजेत. माल जसाच्या तसा न विकता प्रक्रिया करूनच माल विकला पाहिजे. ज्या मालावर प्रक्रिया करणे आवश्यक आहे अशा सर्व मालावर खरेदी-विक्री संस्थानी प्रक्रिया केली पाहिजे. त्यामुळे खरेदी-विक्री संस्थांना अधिक उत्पन्न मिळून शेतकऱ्यांनाही अधिक लाभ मिळू शकेल.

**१२) शेतकरी संघटनांची जबाबदारी :**

आपले शेतकरी बांधव व्यापारी किंवा सावकार यांच्या दारात कर्जासाठी जाणार नाहीत याची काळजी शेतकरी संघटनांनीसुद्धा घेतली पाहिजे. शेतकऱ्यांनी सहकारी पतपुरवठा संस्था किंवा सरकारी बँकेकडूनच कर्ज घेतले पाहिजे. तरच सावकारांचा प्रभाव कमी होईल. शेतकऱ्यांनी सावकारांकडून जर कर्ज काढले नाही तर

सावकाराचे मिंधे व्हावे लागणार नाही आणि सावकारांना आपला माल विकण्याची पाळी येणार नाही. ग्रामीण भागातील सावकारांचा प्रभाव कमी करण्यासाठी शेतकरी संघटनांनी प्रयत्न केले पाहिजेत.

**सारांश :** अशा प्रकारे सहकारी खरेदी–विक्री संस्थांचे दोष आणि समस्या दूर करण्यासाठी काही उपाय वरीलप्रमाणे सुचवले आहेत. सहकारी खरेदी–विक्री संस्था शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असल्याने त्यांच्यासमोरील समस्यांचे त्वरित निराकरण होणे आवश्यक आहे.

**भारतातील सहकारी खरेदी–विक्री संस्थांची रचना :**

भारतात सहकारी तत्त्वावर कृषी मालाची खरेदी–विक्री करणाऱ्या संस्था असून त्यांचे कार्यक्षेत्र गावपातळीपासून राष्ट्रीय पातळीपर्यंत आहे. अशा प्रकारे भारतातील सहकारी विपणन व्यवस्था ही संघीय स्वरूपाची आहे. त्याची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

१. प्राथमिक सहकारी खरेदी–विक्री संस्था

२. जिल्हा सहकारी खरेदी–विक्री संघ

३. राज्य सहकारी खरेदी–विक्री संघ

४. राष्ट्रीय सहकारी खरेदी–विक्री संघ (NAFED)

अशा प्रकारे भारतात कृषी मालाची खरेदी–विक्री करण्यासाठी प्राथमिक सहकारी खरेदी–विक्री संस्था, जिल्हा सहकारी खरेदी–विक्री संघ, राज्य सहकारी खरेदी–विक्री संघ आणि राष्ट्रीय सहकारी खरेदी–विक्री संघ इत्यादी संस्था आणि संघ अस्तित्वात असून त्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**१) प्राथमिक सहकारी खरेदी–विक्री संस्था :**

गाव पातळीवर किंवा तालुका पातळीवर कृषी मालाची खरेदी आणि विक्री करणाऱ्या व इतर आनुषंगिक कार्ये करणाऱ्या सहकारी संस्थांना प्राथमिक सहकारी खरेदी–विक्री संस्था (Primary Agricultural Co-operative Marketing Societies) असे म्हणतात. प्राथमिक सहकारी खरेदी–विक्री संस्थेचे कार्यक्षेत्र एका गावापुरते असते. गाव खूपच लहान असेल तर दोन गावापुरते कार्यक्षेत्र असते. तसेच तालुका हे सुद्धा कार्यक्षेत्र असते. अशा प्रकारे भारतात गावपातळीपासून तालुका पातळीपर्यंत प्राथमिक सहकारी विपणन संस्था कार्यरत आहेत. गावातील किंवा तालुक्यातील कृषी मालाची खरेदी–विक्री करणे हा या सहकारी विपणन संस्थांचा प्रमुख उद्देश असतो. कार्यक्षेत्रातील शेतमाल उत्पादक या सहकारी विपणन संस्थांचे सभासद असतात. तसेच कार्यक्षेत्रातील प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था, कारागिर यांनाही प्राथमिक सहकारी खरेदी–विक्री संस्थांचे सभासदत्व मिळते. प्राथमिक सहकारी खरेदी–विक्री संस्था पुढील कार्ये करतात किंवा पुढील सेवा पुरवतात.

१. सभासद शेतकऱ्यांचा शेतमाल गोळा करणे, त्याची वाहतूक करून तो संस्थेच्या केंद्रापर्यंत आणणे,

माल स्वच्छ करणे, प्रतवारी करणे, वर्गीकरण करणे, प्रक्रिया करणे, बांधणी (पॅकिंग) करणे, बाजारपेठेत विक्रीसाठी पाठवणे ही कार्ये खरेदी-विक्री संस्था करतात.

२. सर्व कृषी माल एकदम विक्रीसाठी बाजारात पाठवला जात नाही. कारण पुरवठा वाढून किंमती कोसळण्याचा धोका असतो. म्हणून मालाला चांगली किंमत येईपर्यंत माल साठवून ठेवणे हे काम खरेदी-विक्री संस्थेला करावे लागते. गुदामाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे कार्य या संस्था करतात.

३. सभासद शेतकऱ्यांना त्यांच्या कृषी मालाच्या तारणावर कर्ज देण्याची सुविधा या संस्था पुरवतात.

४. सभासदांना खते, अवजारे, बी-बियाणे इत्यादी आदाने प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था पुरवतात

५. सरकारच्या वतीने धान्याची खरेदी करण्याचे काम खरेदी-विक्री संस्था करतात.

६. कृषी आदानाबरोबर उपभोग्य वस्तूंचा पुरवठा खरेदी-विक्री संस्था सभासद शेतकऱ्यांना करतात.

७. शेतकऱ्यांना शेतमालाच्या तारणावर कर्जपुरवठा करण्याचे काम प्राथमिक सहकारी विपणन संस्था करतात.

८. सभासद शेतकऱ्यांनी इतर सहकारी पतपुरवठा संस्थांकडून घेतलेल्या कर्जाची वसुली करून देण्याचे काम खरेदी-विक्री संस्था करतात.

९. प्राथमिक सहकारी विपणन संस्था आपल्या सभासदांना बचतीची किंवा काटकसरीची सवय लावतात. सहकारी चळवळीबद्दलची आस्था सभासदांच्या मनात निर्माण करतात.

१०. प्राथमिक सहकारी विपणन संस्था शेतकऱ्यांना चांगले, दर्जेदार कृषी उत्पादन घेण्यास प्रोत्साहन देतात व सर्व प्रकारची मदत करतात.

**२) जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ :**

जिल्ह्यातील सर्व प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था या जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघाचे सभासद असतात. जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघाला केंद्रीय सहकारी खरेदी-विक्री संघ किंवा मध्यवर्ती सहकारी खरेदी-विक्री संघ असेही म्हणतात. जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संस्था सर्व राज्यात नाहीत. काही ठराविक राज्यातच हे संघ आहेत. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, गुजरात, पंजाब, हिमाचल प्रदेश, तामिळनाडू, उत्तर प्रदेश या राज्यात जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ अस्तित्वात आहेत. जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघाचे कार्यक्षेत्र जिल्हा असल्याने या संघांना जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ असे म्हणतात. जिल्हा सहकारी विपणन संघ पुढील कार्ये करतात.

१. जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्थांनी शेतकऱ्यांकडून खरेदी केलेल्या शेतमालाची विक्री करण्याचे काम जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघाकडून केले जाते.

२. जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्थांना लागणाऱ्या कृषी आदानांचा (खते, बियाणे, अवजारे) पुरवठा करण्याचे काम जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ करतो.

३. प्राथमिक सहकारी खरेदी विक्री संस्थांनी खरेदी-विक्रीचे कार्य उत्तम प्रकारे करावे यासाठी त्यांच्या कार्यात समन्वय साधण्याचे काम सहकारी खरेदी-विक्री संघाकडून केले जाते.

४. प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्थांनी शेतकऱ्यांना चांगल्या सेवा पुरवाव्यात यासाठी त्यांना मार्गदर्शन करण्याचे काम सहकारी खरेदी-विक्री संघ करतो.

५. प्राथमिक सहकारी विपणन संस्थांना कृषी मालाची साठवणूक योग्य प्रकारे आणि पुरेशा प्रमाणात करता यावी यासाठी मदत व मार्गदर्शन करण्याचे काम जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ करतो.

६. प्राथमिक सहकारी विपणन संस्थांना त्यांच्याकडील कृषी माल विकण्यासाठी मार्गदर्शन करण्याचे काम जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ करतो.

७. प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्थांना कर्जपुरवठा करण्याचे काम जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघाकडून केले जाते.

८. जिल्ह्यात, जिल्ह्याच्या बाहेर कृषी मालाची खरेदी-विक्री करण्याचे काम जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ करतो.

**३) राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ :**

कृषी मालाच्या खरेदी-विक्रीशी संबंधित विविध कार्ये राज्यपातळीवर करणाऱ्या सहकारी विपणन संघास राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ (State Co-operative Marketing Federation) असे म्हणतात. राज्य सहकारी खरेदी-विक्री संघाचे कार्यक्षेत्र संपूर्ण राज्य हे असते. उदाहरणार्थ, महाराष्ट्र राज्य सहकारी विपणन संघ (The Maharashtra State Co-operative Marketing Federation) या संघाचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्यापुरते आहे. प्रत्येक राज्यात १ याप्रमाणे राज्य सहकारी खरेदी-विक्री संघाची स्थापना केली जाते. असे सुमारे ३४ राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ भारतात अस्तित्वात आहेत. राज्यातील सर्व प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्था, जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ, राज्यातील सर्व प्राथमिक सहकारी पतपुरवठा संस्था या राज्य सहकारी खरेदी-विक्री संघाचे सभासद असतात. राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ पुढील कार्ये करतो.

१. कृषी मालाची खरेदी-विक्री करण्याचे कार्य करणाऱ्या राज्यातील सर्व प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्थांना आणि जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघांना कर्जपुरवठा करण्याचे काम राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ करतो.

२. राज्य सहकारी संघ कृषी मालाची खरेदी-विक्री करण्याचे काम करतो.

३. प्राथमिक व जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघांना खरेदी व विक्रीविषयक मदत आणि मार्गदर्शन करण्याचे काम राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ करतो.

४. शेतकऱ्यांना रासायनिक खते, सिमेंट इत्यादी वस्तू लागतात. त्या राज्यातून तसेच इतर राज्यातून आणणे आणि प्राथमिक सहकारी खरेदी-विक्री संस्थामार्फत शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्याचे कार्य राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ करतो.

५. राज्यातील सर्व प्राथमिक आणि जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघांच्या कार्यात समन्वय साधण्याचे काम राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ करतो.

६. बाजारपेठविषयक माहिती प्राथमिक, जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संस्थांना देण्याचे काम राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ करतो.

७. कृषी मालावर प्रक्रिया करण्याचे कार्य राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ करतो.

८. रासायनिक खते तयार करणे, बी-बियाणे तयार करणे ही कामे राज्य सहकारी खरेदी-विक्री संघाकडून केली जातात.

९. कृषी मालाचा निर्यात व्यापार वाढावा यासाठी प्रयत्न करणे, राज्यातील प्राथमिक आणि जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संस्थांना मार्गदर्शन करण्याचे काम राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ करतो.

**४) राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघ** (NAFED : National Agricultural Co-operative Marketing Federation) **:**

राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री महासंघाला 'नाफेड' असेही म्हणतात. सहकारी कृषी विपणन व्यवस्थेतील ही सर्वोच्च (राष्ट्रीय पातळीवरील) संस्था आहे. नाफेडची स्थापना २ ऑक्टोबर, १९५८ रोजी झाली असून तिची नोंदणी 'बहुराज्य सहकारी संस्था कायदा' (Multistate Co-operative Societies Act) या कायद्यांतर्गत झाली आहे. नाफेडचे मुख्यालय नवी दिल्ली येथे असून दिल्ली, मुंबई, चेन्नई, कलकत्ता इत्यादी ठिकाणी नाफेडची कार्यालये आहेत. देशात २८ क्षेत्रीय कार्यालये आहेत. भारत सरकारच्या कृषी मंत्रालयाच्या अंतर्गत येणारी नाफेड ही एक सर्वोच्च संस्था आहे. भारतातील सहकारी कृषी विपणन संस्थांशी संबंधित राष्ट्रीय पातळीवर अत्यंत महत्त्वाची ही संस्था आहे. भारतातील सर्व राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ हे नाफेडचे सदस्य असतात. म्हणून नाफेडला देशातील राज्य पातळीवरील सहकारी खरेदी-विक्री संस्थांचा संघ किंवा महासंघ असे म्हणतात. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतातील कृषी मालाचा व्यापार वाढावा यासाठी आणि देशभरातील सर्व प्रकारच्या सहकारी विपणन संस्थांना मार्गदर्शन करण्यासाठी राष्ट्रीय सहकारी खरेदी-विक्री महासंघाची स्थापना भारत सरकारने केली आहे.

## २.२.२ सहकारी शेती – प्रकार आणि महत्त्व (Co-operative Farming) :

### प्रास्ताविक

सहकारी शेती ही शेती करण्याची एक पद्धत आहे. भारतात आणि जगाच्या अनेक देशात जी शेती केली

जाते ती वैयक्तिक शेती पद्धत आहे. वैयक्तिक शेती आणि सहकारी शेती यामध्ये फरक आहे. शेतकरी जेव्हा शेतीविषयक सर्व निर्णय स्वत: घेतो आणि स्वत:च्या इच्छेप्रमाणे शेती करतो त्या शेती पद्धतीला वैयक्तिक शेती पद्धत असे म्हणतात. या पद्धतीत शेतकरी एकटा शेती करतो. शेतजमीन त्याच्या नावावर असते. सहकारी शेती पद्धतीत अनेक शेतकरी एकत्र येऊन शेती करतात. शेतीविषयकचे सर्व निर्णय सर्व शेतकरी एकत्र येऊन घेतात. या पद्धतीत अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी एकत्र केल्या जातात आणि सामूहिकरित्या शेती केली जाते. म्हणून अशा शेतीस सहकारी शेती असे म्हणतात. भारतासारख्या अनेक देशात लोकशाही आहे. लोकशाहीमुळे वारसा हक्क कायद्याने कुटुंब प्रमुखाच्या मृत्यूनंतर त्याची शेतजमीन त्याच्या वारसांना (मुलांना व मुलींना) मिळते. त्यामुळे शेतजमिनीचे विभाजन आणि तुकडीकरण ही समस्या निर्माण होते. वारसा हक्क कायद्यामुळे पूर्वी १० एकर शेती असणाऱ्या कुटुंबाकडे आता १ एकर किंवा अर्धा एकर एवढीच जमीन शिल्लक राहिली आहे. वारसा हक्क कायद्यामुळे शेतजमिनीचे कित्येक तुकडे एवढे लहान बनले आहेत की, त्या तुकड्यातून किफायतशीर शेती करता येणे अशक्य बनले आहे. अशा शेतजमिनीच्या तुकड्यांना अनार्थिक (Uneconomic)) तुकडे असे म्हणतात. म्हणून देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सहकारी पद्धतीने शेती करावी तरच शेतीतील उत्पादन वाढेल, शेती आधुनिक पद्धतीने करता येईल असे विचार भारतात तज्ज्ञांकडून आणि राजकीय नेतेमंडळीकडून मांडले जाऊ लागले. रशिया, डेन्मार्क यासारख्या काही देशांनी सहकारी शेतीचा प्रयोग यशस्वीपणे करून दाखवल्यामुळे भारत सरकारनेही स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सहकारी शेती पद्धतीचा पुरस्कार केला.

### सहकारी शेती म्हणजे काय?

सहकारी शेतीची एक सर्वसाधारण व्याख्या पुढील शब्दात स्पष्ट केली आहे.

**''सहकारी तत्त्वावर स्थापन झालेली शेती संस्था म्हणजे सहकारी शेती संस्था (Co-operating Farming Society) होय.''**

जेव्हा वेगवेगळ्या कुटुंबातील अनेक लोक (१००, २०० इत्यादी) एकत्र येऊन एखादी संस्था स्थापन करतात तेव्हा त्यास सहकारी संस्था असे म्हणतात. ग्राहक सहकारी संस्था, मजूर सहकारी संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था, सहकारी विपणन संस्था, सहकारी प्रक्रिया संस्था अशा विविध प्रकारच्या सहकारी संस्था असतात. त्याप्रमाणे सहकारी शेती संस्था ही एक सहकारी संस्था आहे. या संस्थेची स्थापना काही शेतकरी एकत्र येऊन करत असतात.

**''एखाद्या ठिकाणच्या किंवा एखाद्या गावातील अनेक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर स्थापन केलेली शेती संस्था म्हणजे सहकारी शेती होय.''**

सहकारी शेती ही शेतकऱ्यांची संस्था असते. शेतजमिनीचे लहान लहान तुकडे शेतकरी एकत्र करतात आणि सर्वजण मिळून शेती करतात. म्हणून या शेती पद्धतीला सहकारी शेती पद्धत असे म्हणतात. थोडक्यात, सहकारी तत्त्वांचा (खुले सभासदत्व, ऐच्छिक सभासदत्व, लोकशाही, सहकारांतर्गत सहकार इत्यादी) अंगीकार करून जी शेती केली जाते त्या शेतीला सहकारी शेती असे म्हणतात.

**भारतीय नियोजन मंडळ :**

भारतीय नियोजन मंडळाने सहकारी शेतीची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''ज्या शेती पद्धतीत सभासद शेतकऱ्यांची शेतजमीन एकत्र केली जाते आणि शेतीचे व्यवस्थापन संयुक्तरित्या केले जाते, त्या शेतीला सहकारी शेती असे म्हणतात.''**

**सहकारी शेती समिती / सहकारी शेती अभ्यास गट (१९५९) :**

१९५९ च्या वर्किंग ग्रुप ऑन को-ऑपरेटिव्ह फार्मिंग कमिटीने (सहकारी शेती अभ्यास गटाने) सहकारी शेतीची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''कृषी उत्पादनात, रोजगारात आणि उत्पन्नात वाढ करण्यासाठी मनुष्यबळाचा आणि शेतजमिनीचा चांगला वापर करण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वेच्छेने एकत्र येऊन स्थापन केलेली संघटना म्हणजे सहकारी शेती होय.''** (Co-operative farming is a voluntary association of cultivotors for better use of resources including man-power and lands pooled and in which the majority of members participate in farm operations with a view to increasing agricultural production, employment and income.)

**मोरीस** (Mr. Moris) **:**

मोरीस यांनी सहकाराची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''सहकारी शेती हे शेतकऱ्यांचे संघटन असून ते देशाच्या आर्थिक-सामाजिक बदलासाठी अस्तित्वात येते. शेतीतील सहकारी तत्त्वांचा विस्तार म्हणजे सहकारी शेती होय.''** (According to Moris, "Co-operative farming is an organisation of the farmers which comes into existence as a result of efforts to effect certain socio economic changes in the country side. Broadly co-operative farming is the extension of the principles of co-operation in Agriculture.")

**अन्न शेती संघटना** (F.A.O.) **:**

**''अधिक उत्पादन मिळवण्यासाठी शेतकऱ्यांच्याकडील उत्पादन साधनांचे एकत्रीकरण करणे आणि सहकारी पद्धतीने शेतजमीन कसणे म्हणजे सहकारी शेती होय.''** (The F.A.O. has emphasised that co-operative farming includes co-operative cultivation fo land and pooling of resources of farmers to promote efficient production.)

**डॉ. शिलर** (Dr. Schiller) **:**

डॉ. शिलर यांनी सहकारी शेतीची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''शेतीला सहकाराची तत्त्वे लागू करणे म्हणजे सहकारी शेती होय. सहकारी संयुक्त शेती पद्धतीमध्ये**

**जमिनीची सामुदायिक मालकी आणि शेतजमिनीच्या प्रमाणात शेतकऱ्यांना उत्पन्नाचे वाटप या बाबी समाविष्ट असतात. सहकारी शेती पद्धतीमध्ये सभासदांच्या सर्व शेतजमिनींचे आणि उत्पादन साधनांचे एकत्रिकरण केले जाते.''** (According to Dr. Schiller, "Co-operative farming means application of the principles of co-operation of land, Co-operative joint farming includes collecitve ownership of land and equal distribution of income according to the land holding. In co-operative collective farming in addition to land all other resources of the members are pulled together and the ownership of land disappears in so far as income is divided among the members only according to the work done by each member.")

**महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० :**

१९६० च्या महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यामध्ये 'कृषि संस्थेची' (सहकारी शेती संस्थेची) व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''शेतकी उत्पादन, शेतमजुरीची कामे व उत्पन्न यात वाढ करण्याच्या हेतूने ज्या संस्थेत सदस्यांच्या जमिनी एकत्रित केल्या जातात व त्यांची संयुक्तपणे लागवड करण्यात येते ती संस्था, मग अशा जमिनी (अ) सदस्यांच्या मालकीच्या असोत किंवा त्यांना (त्यापैकी काहींना) पट्ट्याने दिलेल्या असोत किंवा त्या इतर कोणत्याही प्रकारे संस्थेच्या ताब्यात दिलेल्या असोत.''**

**सहकारी शेतीची व्याख्या :**

सहकारी शेतीची आणखी एक व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''तुटपुंजी (बिनकिफायतशीर) शेतजमिन असणारे अनेक शेतकरी एकत्र येऊन जमीन आणि इतर उत्पादन साधने यांचे एकत्रीकरण करून सहकारी संस्था स्थापन करून शेती करतात तेव्हा त्या शेती पद्धतीला सहकारी शेती असे म्हणतात.''**

**सर्वसाधारण व्याख्या :**

''कृषी उत्पादनात आणि उत्पन्नात वाढ घडवून आणण्यासाठी शेतकरी लोकांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या संघटनेला किंवा कृषी संस्थेला सहकारी शेती असे म्हणतात.''

**सर्वसाधारण व्याख्या :**

सहकारी शेतीची आणखी एक सर्वसाधारण व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

**''दारिद्र्य, कर्जबाजारीपणा, कमी उत्पादक शेती, तुटपुंजी (बिन किफायतशीर शेती), सावकार, व्यापारी, जमीनदार यांचे वर्चस्व, भांडवलाची टंचाई, बिनकिफायतशीर किंमत या समस्यावर मात करण्यासाठी, कृषी उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी शेतकऱ्यांनी एकत्र येऊन स्थापन केलेली सहकारी संस्था म्हणजे सहकारी शेती होय.''**

**सर्वसाधारण व्याख्या :**

सहकारी शेतीची आणखी एक सर्वसाधारण व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''**शेतजमिनीचे मालक असणारे शेतकरी मग ते गरीब असोत की सधन असोत, त्यांची शेतजमीन लहान आकाराची असो की मोठ्या आकाराची असो हे शेतकरी एकत्र येतात आणि शेतजमीन कसण्याचा अधिकार आपणच स्थापन केलेल्या संस्थेला देतात त्या संस्थेला सहकारी शेती संस्था असे म्हणतात.**''

**सर्वसाधारण व्याख्या :**

''**कृषी उत्पादनासंदर्भातील सर्व क्रिया सहकारी तत्त्वावर करणारी शेती संस्था म्हणजे सहकारी शेती संस्था होय.**''

**भारतीय शेती संशोधन परिषद** (ICAR) **:**

भारतीय शेती संशोधन परिषदेने (Indian Council for Agricultural Research) सहकारी शेतीची व्याख्या खालील शब्दात दिली आहे.

''**सहकारी शेती हा शेतीचा असा प्रकार आहे की ज्यामध्ये शेतजमिनीची मालकी ही प्रत्येक शेतकऱ्याकडे असते परंतु शेती मात्र एकत्र कसली जाते.**'' (According to ICAR, "Co-operative farming means a type of farming where each cultivator reatains his rights in his land but cultivation is carried jointly.")

**सहकारी शेतीची सर्वसाधारण व्याख्या :**

सहकारी शेतीची आणखी एक सोपी, सर्वसाधारण व्याख्या खालील शब्दात स्पष्ट केली आहे.

''**कृषी उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी एकमेकांना मदत करण्यासाठी अनेक शेतकऱ्यांनी आपल्या शेतजमिनीचे एकत्रीकरण करून स्थापन केलेली संस्था म्हणजे सहकारी शेती संस्था होय.**''

**सहकारी शेतीची वैशिष्ट्ये :**

सहकारी शेतीच्या वरील विविध व्याख्यावरून सहकारी शेतीची काही ठळक वैशिष्ट्ये आपणास सांगता येतात. ही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**१) शेतकऱ्यांचे संघटन :**

सहकारी शेती हे शेतकऱ्यांचे संघटन असते. सहकारी शेती संस्थेची स्थापना अनेक शेतकरी एकत्र येऊन करतात. हे शेतकरी एकाच कुटुंबातील नसतात तर वेगवेगळ्या कुटुंबातील असतात. म्हणून सहकारी शेती ही शेतकऱ्यांची एक संघटना असते.

**२) उत्पादन साधनांचे एकत्रीकरण :**

शेतजमीन, अवजारे, ट्रॅक्टर, जनावरे या उत्पादन साधनांचे एकत्रीकरण करून शेती करणे म्हणजे सहकारी

शेती होय. सर्व सभासदांची शेतजमीन एकत्र केली जाते. त्यामुळे मोठ्या आकाराचा शेतजमिनीचा तुकडा तयार होतो.

**३) मालकी शेतकऱ्यांची :**

सहकारी शेती पद्धतीत शेतजमिनीची मालकी शेतकऱ्यांचीच राहते. शेतजमिनीचे एकत्रीकरण केले तरी शेतजमिनीची मालकी अबाधित राहते.

**४) मोबदला :**

शेतकरी शेतात किती काम करतात? आणि त्यांनी संस्थेला किती जमीन दिली आहे याचा विचार करून प्रत्येकाला मोबदला दिला जातो.

**५) शेतीची कामे :**

शेतीत कोणती पिके घ्यायची? खते कोणती टाकायची? बियाणे कोणती वापरायची? अवजारे कोणती वापरायची? याबाबतीतील सर्व निर्णय सहकारी शेती संस्था घेते. त्याप्रमाणे संयुक्तरित्या शेती केली जाते. वैयक्तिक निर्णय न घेता सामूहिक निर्णय घेतले जातात.

**६) कारभार / व्यवस्थापन :**

सहकारी शेती संस्थेचा कारभार सभासद शेतकऱ्यांनी निवडून दिलेल्या संचालक मंडळामार्फत केला जातो. वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासद शेतकरी संचालक मंडळावर आपले प्रतिनिधी निवडून पाठवतात.

**७) शेतमजूर, कारागिर यानांही सभासदत्व :**

सहकारी शेतीचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे सहकारी शेती संस्थांचे सभासदत्व केवळ शेतजमिनीचे मालक असणाऱ्या शेतकऱ्यांना दिले जात नाही किंवा केवळ शेतजमिनीचे मालकच सहकारी शेती संस्था स्थापन करू शकतात असे नाही. भूमिहीन शेतमजूर, भूमिहीर कारागिर किंवा कुळे हे सुद्धा एकत्र येऊन सरकारची किंवा जमीनदारांची शेती खंडाने घेऊन सहकारी तत्त्वावर शेती संस्था स्थापन करू शकतात.

**८) उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी स्थापना :**

सहकारी शेती संस्था स्थापन करण्याचा प्रमुख उद्देश हा शेती उत्पादनात वाढ घडवून आणणे हा असतो. हे सहकारी शेतीचे ठळक वैशिष्ट्य आहे. शेतीतील उत्पादन वाढावे यासाठी विशिष्ट भागातील शेतकरी एकत्र येतात आणि एकत्रपणे शेती करतात. हे सहकारी शेतीचे वैशिष्ट्य आहे. स्वतंत्रपणे शेती केली तर विविध कारणामुळे (भांडवल कमी असणे, कृषीविषयक मार्गदर्शनाचा अभाव असणे, अत्याधुनिक यंत्रांचा व तंत्राचा वापर नसणे) कृषी उत्पादन वाढत नाही. म्हणून शेतकरी एकत्र येतात आणि एकत्रपणे आपली शेतजमीन करतात. अशा प्रकारे कृषी उत्पादनात वाढ घडवून आणणे हा सहकारी तत्त्वावर शेती करण्याचा प्रमुख उद्देश असतो.

**९) भांडवल उभारणी :**

सहकारी शेती संस्था आपल्या सभासदांकडून ठेवी गोळा करतात. तसेच त्यांना संस्थेचे शेअर्स (भागभांडवल) विकतात आणि त्याद्वारे भांडवल उभारणी करतात. तसेच सहकारी शेती संस्थांना सहकारी बँकांकडून कर्जेही मिळवता येतात. अशा प्रकारे ठेवी गोळा करून, शेअर्सची विक्री करून, कर्जे घेऊन सहकारी शेती संस्था भांडवल उभारणी करतात.

**१०) सभासद कल्याण :**

सहकारी शेती संस्थांच्या स्थापनेमागचा उद्देश केवळ शेतीचे उत्पादन वाढवणे हा नसतो तर सभासद शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास करणे हाही उद्देश असतो. सहकारी शेती संस्था आपल्या सभासदांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत असतात. त्यामुळे सामाजिक विकास व सामाजिक कल्याणात वाढ होते.

**११) नफ्याचे वाटप :**

सहकारी शेती संस्थांना जो नफा मिळतो त्याला वाढावा / आधिक्य (surplus) असे म्हणतात. या वाढाव्यातील काही हिस्सा भविष्यकालीन तरतूद म्हणून बाजूला काढून ठेवला जातो. त्याला राखीव निधी असे म्हणतात. राहिलेल्या वाढाव्याचा काही भाग सभासद शेतकऱ्यांना त्यांनी केलेल्या व्यवहारांच्या प्रमाणात (त्यांनी संस्थेला दिलेल्या शेतजमिनीच्या प्रमाणात) वाटून दिला जातो. त्याला लाभांश (Dividend) म्हणतात.

**१२) लोकशाही :**

सहकारी शेती संस्थेचा कारभार लोकशाही तत्वानुसार चालतो. 'एक व्यक्ती-एक मत' या लोकशाही तत्त्वाचे पालन सहकारी शेती संस्था करतात.

**१३) ऐच्छिक संघटना :**

सहकारी शेती संस्था हे शेतकऱ्यांचे ऐच्छिक संघटन असते. सभासद होण्यासाठी कोणावरही सक्ती केली जात नाही. गरीब शेतकरी स्वेच्छेने आपली शेतजमीन संस्थेला देतात. एखादा सभासद संस्थेचा राजीनामा देऊ शकतो. सभासद होण्यासाठी किंवा राजीनामा देण्यासाठी (संस्था सोडून जाण्यासाठी) कोणावरही सक्ती केली जात नाही.

**१४) परस्पर सहाय्य :**

परस्परांना सहाय्य करण्याच्या उद्देशाने सहकारी शेती संस्थेची स्थापना केली जात असते. एकमेकांना सहकार्य करणे हा सहकारी शेती संस्थेचा प्रमुख हेतू असतो.

**१५) विपणन व्यवस्था :**

सहकारी शेती संस्था केवळ पीक घेत नाही किंवा उत्पादन काढत नाही तर उत्पादनाच्या खरेदी-विक्रीची व्यवस्थासुद्धा करते. कृषी मालाची विक्री हे सहकारी शेती संस्थांचे महत्त्वाचे कार्य आहे. कारण उत्पादनाबरोबर

विक्री हा भाग सुद्धा अत्यंत महत्त्वाचा असतो. कारण विक्री व्यवस्था चांगली, कार्यक्षम असेल तर नफा चांगला मिळून शेती व्यवसाय किफायतशीर बनतो.

**१६) सहकारी तत्त्व हा प्रमुख आधार :**

सहकारी शेतीचा प्रमुख आधार सहकारी तत्त्वे हा असतो. सहकाराच्या प्रमुख तत्त्वांच्या आधारावर सहकारी शेती संस्था काम करत असते.

**१७) गरीब शेतकऱ्यांचे संघटन :**

सहकारी शेती संस्था हे प्रामुख्याने गरीब शेतकऱ्यांचे संघटन असते. गरीब शेतकरी किफायतशीर शेती करू शकत नाहीत. म्हणून ते आपल्या शेजमिनी एकत्र करून शेती करत असतात. सधन शेतकरी सुद्धा सहकारी तत्त्वावर शेती करू शकतात. सहकारी शेती हा गरीब शेतकऱ्यांच्या गरीबी निर्मूलनाचा चांगला व विधायक मार्ग आहे.

**१८) सधन शेतकऱ्यांचे संघटन :**

सहकारी शेतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे केवळ गरीब शेतकरीच एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर शेती संस्था स्थापन करतात असे नाही तर मोठे किंवा श्रीमंत शेतकरी सुद्धा एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर शेती संस्था स्थापन करू शकतात.

**सहकारी शेतीचे उद्देश :**

सहकारी शेतीचे ठळक उद्देश खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

१) सभासद शेतकऱ्यांची शेतजमीन एकत्र करून किफायतशीर धारण क्षेत्र बनवणे आणि शेती करणे. विस्तृत प्रमाणावर किंवा मोठ्या प्रमाणावर शेती करणे.

२) शेतजमिनीबरोबर सभासद शेतकऱ्यांच्या जवळची उत्पादनाची इतर साधनेही एकत्र करणे आणि त्या साधनांचा शेतीत पर्याप्त वापर करणे.

३) शेती आधुनिक, यांत्रिक पद्धतीने करणे.

४) शेतीच्या उत्पादनात, उत्पन्नात वाढ करणे, संकरित (सुधारित) बी-बियाणांचा वापर करणे.

५) शेतकऱ्यांचे सावकार, व्यापारी, जमीनदार यांच्यावरील अवलंबित्व कमी करणे.

६) शेतकऱ्यांचे दारिद्र्य, कर्जबाजारीपणा नष्ट करणे.

७) कृषी माल विक्रीची व्यवस्था करणे, कृषी माल खरेदी-विक्री व्यवहारातील मध्यस्थांची संख्या कमी करणे.

८) शेतजमिनीचे विभाजन व तुकडीकरण टाळणे.

९) कृषी पूरक व्यवसाय सुरू करणे उदाहरणार्थ शेळी-मेंढी पालन, पशुपालन इत्यादी

१०) सभासद शेतकऱ्यांचा सामाजिक दर्जा उंचावणे.

११) सरकारकडून, सहकारी बँकांकडून कर्ज (भांडवल) मिळवणे.

१२) शेतीसाठी आवश्यक असणारी शेतकी आदाने उदाहरणार्थ खते, बियाणे, यंत्रे (ट्रॅक्टर इत्यादी), जंतूनाशके, कीटकनाशके यांची खरेदी करणे.

१३) शेतमालावर प्रक्रिया करणे किंवा प्रक्रियेची सोय करणे.

१४) ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करणे.

**सहकारी शेतीचे प्रकार :**

सहकारी शेतीचे किंवा सहकारी शेती संस्थांचे प्रमुख प्रकार चार असून त्यांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**१) सहकारी सुधार शेती संस्था** (Co-operative Better Farming Society) **:**

सहकारी सुधार शेती संस्था हा सहकारी शेती संस्थेचा एक महत्त्वाचा प्रकार आहे. या प्रकारच्या सहकारी शेतीचे वैशिष्ट्य म्हणजे अशा प्रकारची शेती करताना शेतकऱ्यांना आपल्या शेतजमिनीचे एकत्रीकरण करावे लागत नाही. शेतकरी आपली जमीन सहकारी शेती संस्थेला देत नाही. स्वत: शेतकरी स्वत:ची शेती करतात. या पद्धतीत शेतजमिनीची मालकी शेतकऱ्यांकडेच राहते. तसेच सहकारी सुधार शेती संस्थेच्या सभासद शेतकऱ्यांना आपल्या शेतजमिनीचे एकत्रीकरणही करावे लागत नाही. शेतजमिनीचे एकत्रीकरण न करता सहकारी सुधार शेती संस्थेचे सभासद शेतकरी वैयक्तिकरित्या आपली शेती कसत असतात. सहकार सुधार शेती संस्थेकडून शेतकऱ्यांना संकरित व सुधारित बी-बियाणे, खते, शेतीची अवजारे उपलब्ध करून दिली जातात. एकटा शेतकरी भारी किंमतीची ट्रॅक्टर, नांगर इत्यादीसारखी अवजारे विकत घेऊ शकत नाही. शेतीची कामे झाली की ट्रॅक्टर, अवजारे पडून राहतात. म्हणून सहकारी सुधार शेती संस्था सर्व शेतकऱ्यांच्यादृष्टीने फायदेशीर पडते. या संस्थेचे जेवढे शेतकरी सभासद असतात ते सर्व शेतकरी ट्रॅक्टर व इतर कृषी अवजारांचा वापर करतात. संस्थेकडून ट्रॅक्टर व इतर कृषी अवजारे सभासद शेतकऱ्यांना पुरवली जात असल्याने शेतकऱ्यांना ही शेती अवजारे विकत घ्यावी लागत नाहीत. त्यांचा तेवढा (मोठा) खर्च वाचतो. सहकारी सुधार शेती संस्थेकडून सभासद शेतकऱ्यांना चांगली बियाणे, चांगली खते, चांगली कृषी अवजारे आणि चांगला कृषीविषयक सल्ला दिला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होते. सहकारी सुधारणा शेती संस्था स्थापन करण्याचे उद्देश शेतीची सुधारणा करणे, आधुनिक पद्धतीने शेती करणे, कृषी उत्पादनात वाढ घडवून आणणे, कृषी मालाचा उत्पादनाचा आणि विपणनाचा खर्च कमी करणे, संस्थेकडून आधुनिक कृषी अवजारे व तज्ञ सल्ला मिळवणे हे असतात. शेतीचे उत्पादन वाढावे आणि शेती किफायतशीर व्हावी यासाठी सहकारी सुधार शेती संस्था पेरणीपूर्व मशागतीपासून पीक ग्राहकांच्या हातात पडेपर्यंत सर्व प्रकारचे मार्गदर्शन सभासद शेतकऱ्यांना करत

असते. संस्थेच्या सभासद शेतकऱ्यांनी उत्पादन केलेल्या मालाची विक्रीसुद्धा संस्थेकडून केली जाते. सभासद शेतकऱ्यांच्या शेतीच्या विकासासाठी सहकारी सुधार शेतीसंस्थेकडून कृषी विकासाची योजना बनवली जाते. त्या योजनेप्रमाणे सभासद शेतकरी शेती करतात. सहकारी सुधार शेतीसंस्थेकडून सभासद शेतकऱ्यांना ज्या सवलती दिल्या जातात त्याबद्दल संस्था शेतकऱ्यांकडून सेवा शुल्क घेते. हे या शेती संस्थेचे उत्पन्न असते. सहकारी सुधार शेती संस्थेला जो नफा होतो त्या नफ्यातील काही भाग राखीव निधीत ठेवून उर्वरित भाग सभासदांना वितरित केला जातो. अशा प्रकारे शेतीत सुधारणा करण्यासाठी, आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी, आधुनिक अवजारे आणि कृषीविषयक सल्ला व मार्गदर्शन मिळवण्यासाठी शेतकरी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर जी शेती संस्था स्थापन करतात त्या शेती संस्थेला 'सहकारी सुधार शेती संस्था' असे म्हणतात. या प्रकारच्या सहकारी शेतीत शेतजमिनीचे एकत्रीकरण केले जात नाही.

**२) कूळ सहकारी शेती संस्था** (Tennant Co-operative Farming Society) **:**

ज्या सहकारी शेती संस्थेचे सभासद भूमिहीन मूजर किंवा भूमिहीन व्यक्ती असतात, अशा सहकारी शेती संस्थेला कूळ सहकार शेती संस्था असे म्हणतात. ग्रामीण भागातील शेती करू इच्छिणारे परंतु स्वत:च्या मालकीची शेतजमीन नसणारे काही लोक एकत्र येतात आणि सरकारकडून किंवा मोठ्या शेतकऱ्यांकडून भाडेपट्ट्याने काही वर्षांच्या मुदतीसाठी शेती घेतात आणि तिचे तुकडे पाडून स्वतंत्रपणे शेती करतात. त्या शेती पद्धतीला कूळ सहकारी शेती असे म्हणतात. या सहकारी शेती संस्थेच्या सभासदांना 'कुळे' असे म्हणतात. कारण या सभासदांना शेतजमिनीचा वापर केल्याबद्दल सहकारी शेती संस्थेला खंड द्यावा लागतो. अशा प्रकारे ग्रामीण भागातील भूमिहीन लोक एकत्र येऊन जी सहकारी शेती संस्था स्थापन करतात त्या शेती संस्थेला कुळ सहकारी शेती संस्था असे म्हणतात. ही कुळ सहकारी शेती संस्था सरकारच्या मालकीची पडीक परंतु पिकावू जमीन मिळवते किंवा मोठ्या जमीनदार लोकांकडून शेतजमीन मिळवते. सरकार किंवा जमीनदार आपली शेतजमीन कूळ सहकारी शेती संस्थांना विकत देत नाही तर भाड्याने किंवा भाडेपट्ट्याने किंवा खंडाने देते. पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक वर्षासाठी कूळ सहकारी शेती संस्थांना सरकार, मोठे शेतकरी यांच्याकडून जमीन कसण्यासाठी मिळते. कूळ सहकारी शेती संस्था या शेतजमिनीचे विशिष्ट आकाराचे तुकडे करते आणि हे तुकडे कसण्यासाठी आपल्या सभासदांना देते. शेती कसणारे सभासद हे मालक नसल्यामुळे त्यांना 'कुळे' असे म्हणतात. कूळ सहकारी शेती संस्थेने दिलेली जमीन सभासद कूळ म्हणून कसतात. अशा प्रकारे कुळांना (भूमिहीन मजुरांना) कूळ सहकारी शेती संस्थेकडून खंडाने कसण्यासाठी जमीन दिली जाते. म्हणून कुळे सहकारी शेती संस्थेला पीक निघाल्यावर खंड देत असतात. कूळ सहकारी शेती पद्धतीत शेतजमिनीचे एकत्रीकरण केले जात नाही. शेती संस्थेचे सभासद (कुळे) स्वतंत्रपणे शेती कसतात. कूळ सहकारी शेती संस्था आपल्या सभासदांना कृषीविषयक सल्ला व मार्गदर्शन पुरवत असतात. कोणती पिके घ्यावीत याबाबतसुद्धा संस्था मार्गदर्शन करत असते. कूळ शेती संस्था आपल्या सभासदांना संकरित आणि सुधारित बियाणांचा व चांगल्या दर्जेदार खतांचा पुरवठा करत असते. तसेच शेतीची आधुनिक अवजारे यांचा सुद्धा पुरवठा संस्थेकडून केला जातो. कूळ सहकारी शेती संस्थेने पुरवलेल्या वस्तू आणि सेवांचा मोबदला कुळे संस्थेला देतात. कुळे जे उत्पादन घेतात

त्याची खुल्या बाजारात विक्री करण्याचा अधिकार कुळांना असतो. विशिष्ट रक्कम या कुळांना खंड म्हणून आपल्या संस्थेला द्यावी लागते. ती रक्कम या कूळ सहकारी शेती संस्था ज्यांच्याकडून जमीन भाडेपट्ट्याने (खंडाने) घेतली आहे. त्यांना खंड म्हणून देते. सभासदांना भाड्याने दिलेली अवजारे, विकलेली खते, बियाणे, जंतूनाशके, खंड ही कूळ सहकारी शेती संस्थेची उत्पन्नाची साधने असतात. उत्पन्नातून खर्च वजा केल्यानंतर जो नफा (वाढावा) शिल्लक राहतो त्यातील काही हिस्सा संस्थेच्या भवितव्यासाठी (भविष्यातील अडचणींना तोंड देण्यासाठी) संस्था बाजूला काढून ठेवते आणि राहिलेला नफा लाभांशाच्या स्वरूपात सभासद कुळांना वाटते. कूळ सहकारी शेती संस्थेचे अनेक फायदे आहेत. उदाहरणार्थ १) खेड्यातील भूमिहीन मजुरांना संस्थेकडून कसण्यासाठी शेतजमीन मिळते.त्यांना चरितार्थाचे / उपजीविकेचे साधन मिळते. २) शेती संस्थेकडून कुळांना कसण्यासाठी जमीन मिळत असल्याने दुसऱ्याच्या शेतावर मजूर म्हणून राबण्याची पाळी येत नाही. ३) एकट्या भूमिहीन मजूराला सरकारकडून किंवा जमीनदारांकडून शेती खंडाने कसण्यासाठी मिळवता येत नाही. परंतु अनेक शेतकरी एकत्र येतात आणि सहकारी तत्त्वावर शेती संस्था स्थापन करतात तेंव्हा शेती संस्थेची ताकद आणि प्रतिष्ठा वाढते. त्यामुळे या संस्था सरकारकडून कसण्यासाठी शेतजमिनी मिळवू शकतात. ४) कूळ सहकारी शेती संस्था कमी दरात (वाजवी दरात) आपल्या सभासदांना कृषी अवजारे व इतर कृषी आदानांचा पुरवठा करते. त्यामुळे खुल्या बाजारातून अधिक किंमत देऊन कृषी आदाने आणावी लागत नाहीत. त्यामुळे शेतमाल उत्पादनाचा खर्च कमी येतो. ५) सरकार, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून कूळ सहकारी शेती संस्थांना कमी व्याज दरात कर्जपुरवठा होतो. त्यामुळे या संस्थांना कृषी अवजारे व इतर शेतकी आदाने खरेदी करता येतात व ती आपल्या सभासदांना वेळेत देता येतात. ६) कुळांना खुल्या बाजारात आपला कृषी माल विकण्याची परवानगी असते. ७) या संस्थामुळे पडीक जमिनी लागवडीखाली येतात. त्यामुळे एकूण कृषी उत्पादनात वाढ होण्यास मदत होते. ८) कूळ सहकारी शेती पद्धतीमुळे सरकारला आणि मोठ्या शेतकऱ्यांना कूळ सहकारी शेती संस्थेकडून खंड मिळतो. त्यामुळे सरकारचा आणि मोठ्या शेतकऱ्यांचा फायदा होतो. ९) कुळे जरी शेतजमिनीची मालक नसली तरी कूळ सहकारी शेती संस्थांमुळे त्यांना स्वाभिमानाने जगता येते. १०) अशा प्रकारच्या सहकारी शेती संस्थामुळे भूमिहीन मजुरांची, गरीबी, बेकारी दूर होते.

**३) संयुक्त सहकारी शेती संस्था** (Co-operative Joint Farming Society) **:**

लहान शेतकरी, सीमांत शेतकरी, गरीब शेतकरी एकत्र येऊन संयुक्त सहकारी शेती संस्था स्थापन करतात. शेतजमिनीचे तुकडे आकाराने एवढे लहान असतात की एकेकट्याला शेती करणे परवडत नाही. तसेच काही शेतकरी खूप गरीब असतात. त्यांना वैयक्तिकरित्या शेती करणे परवडत नाही. असे गरीब शेतकरी एकत्र येतात आणि एकत्र येऊन शेती करतात. लहान-लहान शेतजमिनीचे तुकडे एकत्र करतात आणि संयुक्तपणे सर्वजण मिळून शेती करतात. या शेती पद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे शेतकरी आपल्या मालकीची शेतजमीन एकत्र कसत असले तरी त्यांचा शेतजमिनीचा मालकी हक्क नष्ट होत नाही. संयुक्त सहकारी शेती संस्थेकडून सभासद शेतकऱ्यांना शेतकी आदाने पुरवली जातात. उदाहरणार्थ, ट्रॅक्टर, नांगर, कुळव, खते, बी-बियाणे, जंतूनाशके, औषधे इत्यादी शेतकी आदानांचा पुरवठा शेतकरी सभासदांना केला जातो. पेरणीपूर्व मशागतीपासून पीक

निघेपर्यंत सर्व कामे शेतकरी मिळून करतात. जे सभासद शेतकरी शेतात काम करतात त्यांना मजुरी मिळते. काम न करणाऱ्यांना शेती संस्था मजुरी देत नाही. संयुक्त सहकारी शेती संस्थेला जो नफा होतो त्याचा काही हिस्सा सभासद शेतकऱ्यांना लाभांशाच्या स्वरूपात दिला जातो. संयुक्त सहकारी शेती संस्थेचे काही फायदे आहेत. उदाहरणार्थ १) ही संस्था जिल्हा सहकारी बँकेकडून कर्ज मिळवते आणि त्या कर्जाच्या रकमेतून शेतकी आदाने खरेदी करते. एकट्या शेतकऱ्याला हे शक्य होत नाही. २) ही शेती संस्था आधुनिक पद्धतीने शेती करते. त्यामुळे कृषी उत्पादनात वाढ होते. ३) शेतजमिनीचे तुकडे लहान (अनार्थिक – Uneconomic) असतात. असे तुकडे एकत्र केल्याने शेतजमिनीचा आकार मोठा बनतो. त्यामुळे अशा शेतीत ट्रॅक्टरसारखी अवजारे वापरता येतात. त्यामुळे शेती किफायतशीरपणे करता येते. कृषी उत्पादनात वाढ होते. ४) संयुक्त सहकारी शेती पद्धतीचा आणखी एक फायदा म्हणजे अशा प्रकारच्या शेतीमुळे सभासद शेतकऱ्यांना मजूर म्हणून काम करण्याचीही संधी मिळते. मजुरीसाठी त्यांना बाहेर जावे लागत नाही किंवा गाव सोडून स्थलांतरही करावे लागत नाही. ५) संयुक्त सहकारी शेती संस्था कर्जाऊ रकमेतून किंवा नफ्यातून शेतीत कायम स्वरूपाच्या काही सुधारणाही करतात. उदाहरणार्थ जमिनीची बांधबंदिस्ती, सपाटीकरण, सिंचन सुविधा, विहिर खुदाई किंवा नदीतून पाईपद्वारा पाणी आणणे अशा प्रकारच्या सुविधा या संस्था करतात. त्यामुळे कृषी उत्पादनात वाढ होण्यास, शेतमालाचा उत्पादन खर्च कमी होण्यास मदत होते. एकटा शेतकरी हे सर्व करू शकत नाही. ६) संयुक्त सहकारी शेती संस्था कृषी मालाची विक्री करतात. संस्थेकडून कृषी माल विकला जात असल्याने माल विक्रीत फसवणूक होत नाही. शेतमालाला चांगली किंमत मिळते. सभासद शेतकऱ्यांनाही त्याचा फायदा होतो. ७) संयुक्त सहकारी शेती संस्थेला जर नफा झाला तर लाभांशाच्या रुपाने सभासदामध्ये त्याचे वाटप केले जाते. ८) संयुक्त सहकारी पद्धतीच्या शेतीत शेतजमिनीचे एकत्रीकरण केले जात असले तरी शेतकऱ्यांचा मालकी हक्क नष्ट होत नाही.

**४) सहकारी सामूहिक शेती संस्था** (Co-operative Collective Farming Society) **:**

सहकारी सामूहिक शेती पद्धतीचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे या पद्धतीच्या शेतीत शेतजमिनीची मालकी शेतकऱ्यांची नसते तर शेती संस्थेची असते किंवा शेतजमिनीचा मालक सरकार असतो. सहकारी सामूहिक शेती संस्था शेतकऱ्यांच्या शेतीचे एकत्रीकरण करतात आणि मोठ्या आकाराची शेती बनवतात. सर्व सभासद शेतकरी मिळून एकत्रपणे शेती करतात. शेतजमिनीवर शेतकऱ्यांचा हक्क नसतो. म्हणून या शेती संस्थेला सहकारी सामूहिक शेती संस्था असे म्हणतात. या संस्थेचे सर्व सभासद शेतीत मजूर म्हणून काम करतात. त्याबद्दल त्यांना सामूहिक शेती संस्थेकडून मजुरी दिली जाते. सहकारी सामूहिक शेती संस्था शेतीविषयक सर्व निर्णय घेते. खते, बियाणे, अवजारे सामूहिक शेती संस्थेकडून पुरवली जातात. कोणती पिके घ्यायची? याचे निर्णय सामूहिक शेती संस्था घेते. सहकारी सामूहिक शेती पद्धतीचे काही फायदे आहेत. उदाहरणार्थ १) शेतजमिनीचे लहान-लहान तुकडे एकत्र केल्यामुळे शेतजमिनीचा आकार मोठा होतो. त्यामुळे आधुनिक यंत्रांचा (मोठ्या यंत्रांचा) वापर करून शेती करता येते. २) मोठ्या आकाराच्या शेतीमुळे शेती उत्पादनात वाढ घडून येते. सहकारी सामूहिक शेती पद्धतीचे काही तोटे आहेत. उदाहरणार्थ १) या पद्धतीत शेतजमिनीची मालकी शेतकऱ्यांची राहत नाही तर सामूहिक शेती संस्थेची राहते. त्यामुळे शेती करण्यात उत्साह राहत नाही. २) सामूहिक शेती संस्था सांगेल ते उत्पादन घ्यावे

लागते. उत्पादनाबाबत किंवा शेती कसण्याच्या पद्धतीबाबत कसलेही स्वातंत्र्य सभासद शेतकऱ्यांना नसते. अशा प्रकारची सामूहिक शेती प्रामुख्याने रशिया, चीनसारख्या समाजवादी देशात आढळते. भारतात लोकशाही असल्याने भारतात सहकारी शेतीचा हा प्रकार शेतकऱ्यांनी अव्हेरला आहे.

**सारांश :** अशा प्रकारे सहकारी शेतीचे (अ) सहकार सुधार शेती संस्था (ब) कूळ सहकारी शेती संस्था (क) संयुक्त सहकारी शेती संस्था (ड) सहकारी सामूहिक शेती संस्था असे चार प्रमुख प्रकार आहेत. जगातील अनेक देशात सहकारी पद्धतीने शेती केली जाते. वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या प्रकारची सहकारी शेती केली जाते. समाजवादी किंवा साम्यवादी देशात सरकारची हुकुमशाही असते. त्यामुळे तेथील सहकारी शेती संस्थांच्या सभासदांना उत्पादन वाढीची फारशी प्रेरणा नसते. कारण अशा देशात शेतजमिनीची मालकी ही शेतकऱ्यांची नसते. तर सरकारची असते.

**सहकारी शेतीचे फायदे / महत्त्व / समर्थन / गरज :**

सहकारी शेती हा शेती कसण्याचा एक प्रकार आहे. भारतात सहकारी चळवळीस ब्रिटिश राजवटीत १९०४ पासून सुरवात झाली. १९०४ च्या पहिल्या सहकार कायद्याने भारतात सहकारी पतपुरवठा संस्थांच्या स्थापनेला बळ आणि प्रोत्साहन मिळाले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने भारतात सहकारी तत्त्वावर शेती संस्थांच्या स्थापनेवर भर दिला. सहकारी शेतीचे समर्थन प्रामुख्याने खालील कारणासाठी केले जाते.

**१) विभाजन व तुकडीकरणास पायबंद :**

सहकारी शेती पद्धतीचा प्रमुख फायदा म्हणजे या पद्धतीच्या शेतीमुळे शेतजमिनीच्या विभाजनास आणि तुकडीकरणास पायबंद बसतो. भारतासारख्या ज्या देशांनी लोकशाही स्वीकारली आहे त्या देशात वारसा हक्क कायदा अस्तित्वात आहे. या कायद्याने कुटुंब प्रमुखाच्या मृत्यूनंतर त्याची शेतजमीन त्याच्या मुलांना व मुलींना किंवा जवळच्या वारसांना वाटून दिली जाते. त्यामुळे भारतात पूर्वी ज्यांना २० एकर शेतजमीन होती त्यांच्या वाट्याला आता अर्धा एकर ते एक एकर एवढी तुटपुंजी शेतजमीन वाट्याला आली आहे. अशा प्रकारे वारसा हक्क कायद्यामुळे शेतजमिनीचे लहान लहान तुकड्यात विभाजन होते. त्यामुळे शेती व्यवसाय किफायतशीर होत नाही. परंतु सहकारी पद्धतीने शेती केली तर शेतजमिनीचे विभाजन व तुकडीकरण होत नाही. वारसा हक्क कायद्याचा परिणाम सहकारी शेती संस्थेवर होत नाही. एखाद्या सभासद शेतकऱ्याचा मृत्यू झाला तर त्याच्या वारसांना शेती संस्थेचे सभासदत्व मिळते. परंतु शेती संस्थेकडे असलेल्या सर्व सभासदांच्या एकूण शेतजमिनीचे तुकडे पडत नाहीत. शेतजमिनीचे तुकडे फारच लहान असतील तर अशा अनार्थिक (Uneconomic) तुकड्यात किफायशीरपणे शेती करता येत नाही. सहकारी शेती पद्धतीच्या शेतीमुळे सभासदांचा मृत्यू झाला तरी शेतजमिनीचा आकार आहे तेवढाच कायम राहतो. शेतजमिनीचे तुकडे पडत नाहीत. हा सहकारी शेतीचा अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**२) सीमांत, अल्पभूधारक शेतकऱ्यांना फायदेशीर :**

सहकारी शेती पद्धत सीमांत, अल्पभूधारक किंवा गरीब शेतकऱ्यांना फायदेशीर आहे. गरीब शेतकरी भांडवलाअभावी, मार्गदर्शनाअभावी किफायतशीर शेती करू शकत नाहीत. अशा गरीब शेतकऱ्यांसाठी सहकारी पद्धतीची शेती हे मोठे वरदान आहे. सहकारी शेती पद्धतीत परिसरातील सर्व गरीब शेतकरी एकत्र येतात. सहकारी तत्त्वावर शेती संस्था स्थापन करतात. शेतजमिनीचे, अवजारांचे, जनावरांचे, भांडवलाचे एकत्रीकरण करतात. त्यामुळे त्यांना शेती किफायतशीरपणे करणे शक्य होते. एकटा शेतकरी किफायतशीरपणे शेती करू शकत नाही. म्हणून सहकारी पद्धतीची शेती फायदेशीर ठरते.

**३) आधुनिक पद्धतीने शेती करणे शक्य :**

सहकारी शेती पद्धतीचा आणखी एक फायदा म्हणजे या पद्धतीने जर शेती केली तर शेतीत आधुनिक यंत्रांचा व तंत्राचा अवलंब करता येतो. शेती आधुनिक पद्धतीने करणे शक्य होते. लहान आकाराच्या शेतजमिनीत ट्रॅक्टरसारखी यंत्रे वापरता येत नाहीत. त्यासाठी शेतजमिनींचा आकार मोठा असावा लागतो. सहकारी पद्धतीच्या शेतीमुळे शेतजमिनीचा आकार मोठा होतो. सर्व शेतकरी आपली शेतजमीन शेती संस्थेला देत असल्यामुळे शेतजमिनीचा आकार मोठा होतो. त्यामुळे मोठ्या आकाराच्या शेतीत ट्रॅक्टर, मळणी यंत्रे, कापणी यंत्रे वापरता येतात. तसेच ग्रीन हाऊस आणि पॉलीहाऊस उभारता येतात. लहान आकाराच्या शेतीत गरीब शेतकऱ्याला एकट्याला आधुनिक पद्धतीने शेती करता येत नाही. परंतु सहकारी पद्धतीने शेती केली तर आधुनिक पद्धतीने शेती करणे शक्य होते.

**४) सिंचनाची सुविधा :**

एकटा शेतकरी तो गरीब असल्याने जलसिंचनाची सुविधा करू शकत नाही. परंतु जर सहकारी पद्धतीने शेती केली तर सहकारी शेती संस्था शेतीला पाणीपुरवठ्याची सोय करू शकते. शेतजमिनीत विहिरींची खुदाई करू शकते. उपसा जलसिंचन सुविधा उपलब्ध करू शकते. जवळपास तलाव, नदी असेल तर सहकारी शेती संस्था शेतीला पाण्याची सुविधा देऊ शकते. अशा प्रकारे एकट्या शेतकऱ्याला शेतीसाठी जलसिंचन सुविधा करणे शक्य होत नाही. परंतु अनेक गरीब शेतकरी एकत्र आले आणि त्यांनी सहकारी तत्त्वावर शेती संस्था स्थापन केली तर अशा शेतीसंस्थेला शेतीसाठी सिंचनाची सुविधा करणे शक्य होते. कारण वैयक्तिक प्रयत्नापेक्षा संघटित प्रयत्न फायदेशीर ठरतात. सहकारी तत्त्वावर संस्था स्थापन केल्यामुळे संस्थेची (सभासदांची) आर्थिक ताकद वाढते. त्यामुळे सहकारी शेती संस्थेला शेतीला जलसिंचनाची सुविधा करणे अशक्य होत नाही. अशा प्रकारे सहकारी शेती पद्धतीमुळे शेतजमिनीला कमी खर्चात, कमी वेळेत सिंचन सुविधा करणे शक्य होते.

**५) शेतजमिनीची सुधारणा :**

शेतजमीनीचे सपाटीकरण करणे, शेतजमीनीला योग्य आकाराचे बांध घालणे, शेतीला कुंपनाची सोय

करणे, ज्या ठिकाणी जमिनी खोलगट आहेत त्या ठिकाणी माती विकत आणून माती घालणे, शेतजमिनीतील पाण्याचा निचरा व्हावा यासाठी शेतजमिनीत सच्छिद्र पाईपची व्यवस्था करणे या बाबींना शेतजमिनीची सुधारणा करणे असे म्हणतात. एकटा शेतकरी गरीब असल्याने हे सर्व करू शकत नाही. परंतु सहकारी शेती संस्था मात्र जमिनीत वर उल्लेख केलेल्या कायम स्वरूपाच्या सुधारणा करू शकतात. कारण सहकारी शेती संस्था सहकारी बँकेकडून कर्ज घेऊन अशा सुधारणा करू शकतात. त्यामुळे शेतीची सुधारणा करणे शक्य होऊन शेती किफायतशीररित्या करता येते. एकटा शेतकरी आपल्या जमिनीत कायम स्वरूपाच्या सुधारणा करू शकत नाही. परंतु सहकारी तत्त्वावर शेती संस्था स्थापन केल्यास शेती संस्थेची आर्थिक ताकद वाढते. त्यामुळे सहकारी शेती संस्थेला शेतीत सुधारणा करणे कठीण होत नाही.

**६) उत्पादन खर्चात घट :**

सहकारी शेती पद्धतीचा आणखी एक फायदा म्हणजे या पद्धतीने शेती केली तर शेती कमी खर्चात आणि किफायतशीरपणे करता येते. सहकारी पद्धतीच्या शेतीमुळे शेतमालाचा उत्पादन खर्च कमी येतो. सहकारी पद्धतीच्या शेतीत संस्था आधुनिक अवजारे, यंत्रे यांचा वापर करते. जमिनीची बांधबंदिस्ती, सपाटीकरण करते. शेतीला सिंचनाची सुविधा उपलब्ध करून देते. त्यामुळे शेतमालाचा उत्पादन खर्च कमी येतो. गरीब शेतकरी जेव्हा एकट्याने शेती करतो तेव्हा त्याला शेतीत मोठी गुंतवणूक करता येत नाही. शेतीत सुधारणा करता येत नाहीत. त्यामुळे त्याच्या शेतमालाचा उत्पादन खर्च अधिक येतो. म्हणून शेतमालाच्या उत्पादनाचा खर्च कमीत कमी राखायचा असेल, शेती व्यवसाय किफायतशीर करायचा असेल तर गरीब शेतकऱ्यांनी सहकारी शेती पद्धतीलाच जवळ केले पाहिजे.

**७) कर्जाची सुविधा :**

सहकारी शेती संस्थांना जेवढ्या सहजपणे आणि पुरेशा प्रमाणात सहकारी बँकांकडून, सरकारी व्यापारी बँकांकडून शेती विकासासाठी कर्जे उपलब्ध होऊ शकतात तेवढ्या सहजपणे एखाद्या शेतकऱ्याला उपलब्ध होऊ शकत नाहीत. सहकारी चळवळीला आणि सहकारी शेतीला भारत सरकारचे मोठे प्रोत्साहन आहे. त्यामुळे सरकारकडून, सहकारी बँकांकडून सहकारी शेती संस्थांना कर्जाची सुविधा पुरेशा प्रमाणात आणि कमी व्याजदरात उपलब्ध आहे. सहकारी शेती संस्थांना त्यांच्याकडील शेतजमिनीच्या तारणावर कर्जाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. शेतजमीन तारण ठेवल्यामुळे शेती संस्थांना दिलेली कर्जे बुडत नाहीत. एकट्या शेतकऱ्याला सहकारी व सरकारी व्यापारी बँकांकडून कर्ज मिळताना अडचणी येतात. कारण त्यांच्याकडील जमिनीचे धारणक्षेत्र अत्यंत लहान असते. परंतु सहकारी तत्त्वावर शेती संस्था स्थापन केली तर सर्व शेतकऱ्यांची शेतजमीन एकत्र केली जाते. त्यामुळे शेतजमिनीचा आकार मोठा होतो. त्यामुळे सहकारी शेती संस्थांना जमीन सुधारणेसाठी कर्जे मिळवताना अडचणी येत नाहीत. हा सहकारी शेती पद्धतीचा एक प्रमुख फायदा आहे.

**८) कृषी उत्पादनात वाढ :**

सहकारी शेती पद्धतीचा आणखी एक महत्त्वपूर्ण फायदा म्हणजे या पद्धतीच्या शेतीमुळे कृषी उत्पादनात

वाढ घडवून आणणे शक्य होते. अत्यंत लहान आकाराच्या शेतजमिनीच्या तुकड्यात आधुनिक पद्धतीने शेती करता येत नाही. शेतीत यंत्रांचा वापर करता येत नाही. शेतीत सुधारणा करता येत नाही. लहान आकाराची (अनार्थिक) शेतजमीन असणारे बहुसंख्य शेतकरी गरीब असतात. त्यामुळे ते शेतीत पुरेशी गुंतवणूक करून शेतजमिनीची उत्पादकता वाढवू शकत नाहीत. परंतु सहकारी पद्धतीने जर गरीब लोकांनी शेती केली तर शेतीची उत्पादकता वाढून शेतीच्या उत्पादनात चांगली वाढ घडून येते. सहकारी शेती पद्धतीत अनेक शेतकऱ्यांची लहान लहान तुकड्यात विखुरलेली शेतजमीन एकत्र केली जाते. त्यामुळे शेतजमिनीचा आकार मोठा होतो. त्यामुळे अशा शेतीत कायम स्वरूपाच्या सुधारणा करता येतात. सिंचनाची सोय शेतीला करता येते. त्यामुळे शेतीची उत्पादकता वाढून कृषी उत्पादनात वाढ घडून येण्यास मदत होते. हा सहकारी शेती पद्धतीचा अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**९) शेतकऱ्यांना कमी दरात कृषी आदानांचा पुरवठा :**

सहकारी शेती संस्थांचे विविध प्रकार आहेत. त्यामध्ये सहकार सुधार शेती संस्था हा एक महत्त्वाचा प्रकार आहे. या प्रकारात अनेक शेतकरी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर आधारित शेती संस्था स्थापन करतात. आपल्या शेतजमिनीची सुधारणा करणे, शेतीची उत्पादकता वाढवणे, कृषी आदाने स्वस्तात आणि पुरेशा प्रमाणात मिळवणे हे प्रमुख उद्देश सहकार सुधार शेती संस्था स्थापन करण्यामागे असतात. या पद्धतीच्या सहकारी शेतीत शेतजमिनीचे एकत्रीकरण केले जात नाही. शेतकरी आपापली शेतजमीन स्वतंत्रपणे कसत असतात. सहकारी सुधार शेती संस्थेकडून सभासद शेतकऱ्यांना खते, बी-बियाणे, अवजारे, पाणी, जंतुनाशके, कीटकनाशके, औषधे इत्यादी कृषी आदानांचा पुरवठा केला जातो. सहकारी शेती संस्था अशी कृषी आदाने मोठ्या प्रमाणात खरेदी करत असल्याने त्यांना ती उत्पादकांकडून, व्यापाऱ्यांकडून कमी दरात उपलब्ध होतात. त्यामुळे सभासद शेतकऱ्यांनासुद्धा शेती संस्थेकडून कृषी आदाने वाजवी दरात (खुल्या बाजारापेक्षा कमी दरात) आणि आवश्यक तेवढी उपलब्ध होतात. हा सहकारी पद्धतीच्या शेतीचा एक अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**१०) पडीक जमिनींचा विकास :**

सहकारी शेती पद्धतीचा आणखी एक मोठा फायदा म्हणजे या पद्धतीच्या शेतीमुळे देशातील पडीक शेतजमिनींचा विकास घडून येतो. देशात सरकारची हजारो हेक्टर जमीन पडीक आहे. ही जमीन लागवडीखाली आणली तर या जमिनीपासून उत्पादन प्राप्त करता येते. परंतु विविध कारणामुळे आजही भारतात हजारो हेक्टर जमीन पडीक आहे. अशी पडीक जमीन कसण्यासाठी लोकांना देता येते. सरकार आपली पडीक जमीन कसण्यासाठी कूळ सहकारी शेती संस्थांना देते. या संस्थेचे सभासद सरकारची जमीन खंडाने कसण्यासाठी घेतात. म्हणून या सभासदांना 'कुळे' (tenants) असे म्हणतात. कूळ सहकार शेती संस्थामुळे सरकारची पडीक जमीन लागवडीखाली येते. त्यामुळे पडीक जमिनींचा विकास होतो. पडीक जमिनी लागवडीखाली आल्याने एकूण कृषी उत्पादनात वाढ घडून येते.

**११) शेतजमिनीचा पर्याप्त वापर शक्य :**

वैयक्तिक शेती पद्धतीत शेतजमिनीचा पर्याप्त वापर करता येत नाही. बहुसंख्य शेतकऱ्यांचे शेतजमिनीचे

तुकडे लहान लहान आकाराचे आहेत. या शेतकऱ्यांना आपल्या शेतीच्या सभोवती चारी बाजूला बांध घातलेले आहेत. त्यामुळे त्यांना शेतजमिनीचा पर्याप्त वापर करता येत नाही. बांधामुळे जमीन वाया जाते. पिक घेता येत नाही. परंतु सहकारी पद्धतीने शेती केली तर अनावश्यक बांध नष्ट होतात. लहान आकाराचे शेकडो जमिनीचे तुकडे एकत्र केले जातात. त्यामुळे बांध नष्ट होतात. बांधाखालच्या जमिनीत पिके घेता येतात. सहकारी पद्धतीच्या शेतीचा आकार मोठा असतो. मोठ्या आकाराचे तुकडे तयार करून शेती केली जाते. त्यामुळे सहकारी शेतीत जादा किंवा अनावश्यक बांध घालावे लागत नाहीत. मोजकेच बांध घालून शेती केली जाते. त्यामुळे सहकारी शेतीत वैयक्तिक शेतीत जशी बांधाखाली जमीन वाया जाते तशी जात नाही. शेतजमिनीचा संपूर्ण (पर्याप्त) वापर करता येतो. त्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ घडून येण्यास मदत होते.

**१२) सरकारी मदतीचा फायदा :**

सहकारी शेतीचा आणखी एक मोठा फायदा सांगता येईल आणि तो म्हणजे सहकारी पद्धतीच्या शेतीमुळे सहकारी शेती संस्थांना सरकारकडून चांगली मदत मिळते. जगातील अनेक देशांनी सहकारी चळवळीला (विविध प्रकारच्या सहकारी संस्थांना) मदत करण्याचीच भूमिका घेतली आहे. भारतही त्याला अपवाद नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने सहकारी शेतीला सर्व प्रकारचे सहाय्य करण्याचेच धोरण अनुसरले आहे. भारतात सहकारी चळवळीला सरकारकडून मोठे प्रोत्साहन आहे. त्यामुळे सहकारी शेती संस्थांना सहकारी बँका, सरकारी व्यापारी बँका यांच्याकडून मदत मिळण्यात अडचण येत नाही.

**१३) शेतीतील गुंतवणूकीत वाढ :**

भारतात विविध कारणामुळे शेतीतील खाजगी गुंतवणूक कमी आहे. शेतकऱ्यांची गरीबी हे त्याचे प्रमुख कारण आहे. बहुसंख्य शेतकरी सीमांत व अल्पभूधारक आहेत. त्यामुळे त्यांना शेतीतून फार कमी वाढावा मिळतो. त्यामुळे ते शेतीत फारशी गुंतवणूक करत नाहीत. तसेच शेतकऱ्यांचे काही उत्पन्न मुलाबाळांचे शिक्षण, लग्न, धार्मिक कार्यक्रम (जत्रा, यात्रा इत्यादी) यावर खर्च होतो. त्यामुळे ते शेतीत फारशी गुंतवणूक करू शकत नाहीत. कित्येक शेतकरी कर्जाऊ रक्कमही बऱ्याच प्रमाणात अनुत्पादक बाबीवर खर्च करतात. शेतीत गुंतवणूक केल्याशिवाय शेतीचा विकास होत नाही व शेतीतील उत्पादन वाढत नाही. परंतु गरीब शेतकऱ्यांना शेतीत पुरेशी गुंतवणूक करता येत नाही. म्हणून जर परिसरातील गरीब शेतकरी एकत्र आले आणि आपली शेतजमीन एकत्र करून त्यांनी सहकारी शेती संस्था स्थापन केली तर या संस्थेमार्फत शेतीत गुंतवणूक होऊ शकते. कारण सहकारी शेती संस्था सर्व नफा सभासदांना वाटत नाहीत. नफ्याचा काही हिस्सा बाजूला काढून ठेवतात. त्याला राखीव निधी असे म्हणतात. या संस्था वेगवेगळ्या प्रकारचे राखीव निधी तयार करतात. त्या राखीव निधीतून शेतीत गुंतवणूक करतात. त्यामुळे शेतीचा विकास होण्यास मदत होते. व्यक्ती ज्याप्रमाणे शेतीतून मिळालेल्या नफ्याचा उपयोग धार्मिक कारणासाठी किंवा इतर अनुत्पादक बाबींसाठी खर्च करतात त्याप्रमाणे सहकारी शेती संस्था नफ्याची रक्कम अनुत्पादक बाबीवर खर्च करत नाहीत. त्यामुळे शेती विकासात अडचणी येत नाहीत. शेतीच्या प्रगतीसाठी शेतीतून मिळणारा वाढावा (नफा) शेतीतच गुंतवला पाहिजे. एकट्या शेतकऱ्यांकडून हे फारसे शक्य होत नाही. सहकारी शेती संस्था हे अधिक चांगल्या प्रकारे करू शकते. म्हणून सहकारी शेतीचे समर्थन केले जाते.

**१४) शेतजमिनीची मालकी अबाधित राहते :**

सहकारी सुधार शेती संस्था, संयुक्त सहकारी शेती संस्था हे सहकारी शेती संस्थांचे प्रमुख प्रकार आहेत. या प्रकारच्या शेतीचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे शेतकरी या प्रकारच्या शेती संस्थांचे सभासद झाले तरी शेतकऱ्यांचा शेतजमिनीचा मालकी हक्क संपुष्टात येत नाही. शेतकरी सहकारी शेती संस्थांचे सभासद झाले तरी त्यांचा मालकी हक्क अबाधित राहतो. भारतासारख्या देशात शेतकऱ्यांना आपली मालकी हक्क सोडावासा वाटत नाही. परंतु सहकारी शेती संस्थांचे काही प्रकार हे भारतीय शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहेत. कारण त्यांनी एकत्र येऊन अशा प्रकारच्या सहकारी शेती संस्था स्थापन केल्या तरी त्यांचा मालकी हक्क नष्ट होत नाही. शेतजमिनीवर त्यांचा मालकी हक्क कायम राहतो. हा सहकारी शेती पद्धतीचा महत्त्वाचा फायदा शेतकऱ्यांना मिळतो.

**१५) कृषी मालाच्या विक्रीची सुविधा :**

सहकारी शेती संस्थांचा आणखी एक फायदा म्हणजे सहकारी शेती संस्था शेतकऱ्यांच्या कृषी मालाची विक्रीची सोय करतात. शेतमालाची विक्री करण्यात सहकारी शेती संस्था पुढाकार घेतात. सहकारी खरेदी-विक्री संस्थामार्फत सहकारी शेती संस्था शेतमालाची विक्री करतात. तसेच प्रक्रिया संस्थांना आणि मोठ्या व्यापाऱ्यांना शेतमाल विकतात. एकट्या शेतकऱ्याला हे शक्य होत नाही. परंतु सहकारी शेती संस्थांची सौदाशक्ती (Bargaining Power) मोठी असते. त्यामुळे शेती संस्थांची माल विक्रीत फसवणूक होत नाही. तसेच शेतमालाला किंमतही चांगली मिळते. शेतमाल विपणन व्यवस्थेतील अनावश्यक मध्यस्थांचे उच्चाटन होते. त्याचा फायदा सहकारी शेती संस्थांनाही होतो आणि संस्थेच्या सभासदानांही होतो.

**१६) दुष्काळाच्या काळात सहकारी शेती उपयोगी :**

भारतात कधी कोरडा दुष्काळ पडतो तर कधी ओला दुष्काळ पडतो. त्यामुळे शेतीचे मोठे नुकसान होते. शेतकऱ्यांचे जगणे मुश्कील होते. परंतु शेती जर वैयक्तिक पद्धतीने न करता सहकारी पद्धतीने केली तर दुष्काळाच्या कठीण प्रसंगाला तोंड देणे शेतकऱ्यांना शक्य होते. कारण सहकारी शेती संस्था पशुपालनासारखे पूरक व्यवसायही करत असतात. त्यामुळे दुष्काळामुळे शेतीचे नुकसान झाले तरी पूरक व्यवसायामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत नाही. म्हणून दुष्काळासारख्या नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी सहकारी शेती पद्धत उपयुक्त मानली जाते.

**१७) शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ :**

सहकारी पद्धतीच्या शेतीमुळे शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळते. हा सहकारी पद्धतीच्या शेतीचा शेतकऱ्यांना मिळणारा अत्यंत महत्वाचा फायदा आहे. सहकारी शेती संस्थांमुळे कृषी उत्पादनात वाढ होते. उत्पादन खर्चात बचत होते. शेतमालाला किंमत चांगली मिळते. त्याचा फायदा शेती संस्थेचे सभासद असणाऱ्या शेतकऱ्यांनाही होतो. काही शेतकरी शेती संस्थेला केवळ आपली शेतजमीन देत नाहीत. तर बैल, अवजारे इत्यादी शेती संस्थेला देतात. त्याचे भाडे त्या शेतकऱ्यांना मिळते. काही शेतकरी शेती संस्थेच्या शेतीत मजूर म्हणून सुद्धा काम करतात. त्याबद्दल शेती संस्थेकडून शेतकऱ्यांना मजुरीच्या रूपाने उत्पन्न मिळते. वर्षाच्या शेवटी

सहकारी शेती संस्था शेतकऱ्यांना लाभांशाच्या स्वरूपात काही रक्कम देते. अशा प्रकारे सहकारी शेतीमुळे शेतकरी सभासदांना विविध स्वरूपात उत्पन्न मिळते. एकट्याने शेती करून जेवढे उत्पन्न मिळते त्यापेक्षा अधिक उत्पन्न सहकारी पद्धतीच्या शेतीमुळे शेतकऱ्यांना मिळते.

**१८) शेतजमिनीची सुपीकता टिकून राहण्यास मदत :**

सहकारी शेती पद्धतीचा आणखी एक महत्त्वपूर्ण फायदा म्हणजे सहकारी शेतीमुळे शेतजमिनीची सुपीकता कमी होते. सुपीकता टिकून राहते. तसेच जमिनीच्या सुपीकतेत वाढ होते. कारण सहकारी शेती संस्था शेतीत एकच पीक वर्षानुवर्षे घेत नाही. शेतीत पिके आलटून पालटून घेतली जातात. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होत नाही. काही शेतकरी आपल्या शेतात एकच पीक वर्षानुवर्षे घेतात. त्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होते. परंतु सहकारी शेती संस्था मात्र पिके आलटून पालटून घेतात. त्यामुळे शेतजमिनीची सुपीकता कमी होत नाही. तसेच सहकारी शेती संस्थांकडे शेतजमीन भरपूर असते. त्यामुळे शेती संस्था एकाच तुकड्यात वर्षानुवर्षे शेती करत नाहीत. काही तुकडे पीक न घेता पाडून ठेवतात. त्यामुळे जमिनीला विश्रांती मिळते. त्यामुळे शेतीची उत्पादकता व सुपीकता वाढण्यास मदत होते. गरीब शेतकरी अशा प्रकारे शेतजमीनीला विश्रांती देऊ शकत नाहीत. कारण जमीन पाडून ठेवणे त्यांना परवडत नाही. अशा प्रकारे सहकारी पद्धतीने शेती केली तर शेतीची सुपीकता टिकून तर राहतेच. उलट सुपीकतेत वाढ होण्यास मदत होते.

**१९) गुदाम सुविधेत वाढ :**

सहकारी शेतीचा आणखी एक फायदा म्हणजे सहकारी शेतीमुळे गुदामांच्या संख्येत आणि साठवण क्षमतेत वाढ घडून येते. कृषी मालास योग्य किंमत येईपर्यंत कृषी माल गुदामामध्ये साठवून ठेवावा लागतो. एकटा शेतकरी अशी सुविधा करू शकत नाही. कारण त्यासाठी खर्च खूप जास्त असतो. परंतु सहकारी शेती संस्थांची आर्थिक शक्ती मोठी असल्याने आणि शेती संस्थांना गुदाम बांधण्यासाठी सहकारी बँका कर्जपुरवठा करत असल्याने शेती संस्था गुदामे बांधू शकतात. त्यामुळे गुदाम सुविधेत वाढ होते. गुदाम सुविधेमुळे किंवा सहकारी शेती संस्थांच्या गुदाम बांधणीच्या कार्यामुळे मालाला किंमत येईपर्यंत माल साठवता येतो. गुदाम सुविधेमुळे शेतमालाला किंमत चांगली मिळते. त्याचा फायदा सभासद शेतकऱ्यांनाही होतो.

**२०) रोजगारात वाढ :**

सहकारी शेतीमुळे रोजगारात वाढ होते. भारतात लोकसंख्या प्रचंड आहे. ग्रामीण भागात त्यामुळे बेकारीची समस्या आढळते. परंतु सहकारी पद्धतीच्या शेतीमुळे रोजगारात वाढ होण्यास मदत होते. सहकारी शेती संस्था अस्तित्वात आल्यामुळे शेतीला बारमाही पाण्याची सुविधा उपलब्ध होते. त्यामुळे कोरडवाहू शेती बागाईत होते. कोरडवाहू शेतीपेक्षा बागाईत शेतीत अधिक रोजगार उत्पन्न होत असतो. कोरडवाहू शेतीत वर्षातून एकदा किंवा दोनदा पिके घेता येतात. बागाईत शेतीत वर्षात ३ ते ४ पिके घेता येतात. त्यामुळे कोरडवाहू शेतीपेक्षा बागाईत शेतीत अधिक रोजगार निर्माण होतो. सहकारी शेती कोरडवाहू शेतीला बागाईत शेती बनवत असल्यामुळे सहकारी शेती अधिक लोकांना रोजगार देऊ शकते. हा सहकारी शेतीचा महत्त्वाचा फायदा आहे.

**२१) कर्जबाजारीपणा आणि आत्महत्या यावर रामबाण उपाय :**

गेल्या १५-२० वर्षापासून भारतीय शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र चालू असून आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. त्याला विविध कारणे जबाबदार आहेत त्यामध्ये शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा हे प्रमुख कारण आहे. विविध कारणामुळे शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा वाढत आहे आणि त्यामुळे शेतकरी आत्महत्या करत आहेत. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर शेती केली तर शेती किफायतशीर होऊन शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागणार नाहीत. सहकारी तत्त्वावर शेती केली तर सरकारी बँका, सहकारी बँका यांच्याकडून पुरेशा प्रमाणात कर्ज मिळू शकेल. कर्जासाठी सावकाराच्या दारात जावे लागणार नाही. त्यामुळे कर्जाच्या विळख्यात अडकून पडावे लागणार नाही. अशा प्रकारे गरीब किंवा तुटपुंजी शेती असणाऱ्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर शेती केली तर कर्जबाजारीपणा आणि आत्महत्या या समस्यांचे निराकरण होण्यास मदत होईल.

**२२) हरित क्रांती यशस्वी करण्यासाठी फायदेशीर :**

भारतात पहिली हरित क्रांती १९६० नंतर झाली. परंतु या हरित क्रांतीचे लाभ मोठ्या शेतकऱ्यांना अधिक झाले आणि गरीब शेतकऱ्यांना कमी झाले. हरित क्रांतीचा लाभ मोठ्या शेतकऱ्यांनाच अधिक झाला याचे कारण त्यांच्याजवळ भरपूर भांडवल होते. खते, बियाणे, अवजारे विकत घेण्यासाठी लागणारे भांडवल मोठ्या शेतकऱ्याजवळ होते. त्यामुळे त्यांना हरित क्रांतीचा अधिक फायदा झाला. गरीब शेतकऱ्यांजवळ भांडवल नसल्यामुळे त्यांना हरित क्रांतीचे लाभ घेता आले नाहीत. म्हणून हरित क्रांतीचा लाभ गरीब शेतकऱ्यांनासुद्धा मिळवून द्यायचा असेल तर सहकारी शेतीचा मार्ग अनुसरला पाहिजे. शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर शेती केली तर शेतजमिनीच्या आकार मोठा होतो. अवजारे व इतर साधने एकत्र करता येतात. सहकारी बँकेकडून पुरेशा प्रमाणात कर्ज मिळवता येते आणि किफायतशीर शेती करता येते. एकटा शेतकरी हरित क्रांतीचे लाभ मिळवू शकत नाही. परंतु अनेक शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर जर शेती संस्था स्थापन केली तर गरीब शेतकऱ्यांची आर्थिक ताकद वाढून त्यांना हरितक्रांतीचे लाभ मिळवता येतात. गरीब शेतकऱ्यांपर्यंत हरित क्रांतीचे लाभ पोहचवण्यासाठी सहकारी शेती पद्धतीची कास धरली पाहिजे. गरीब शेतकऱ्यांना हरित क्रांतीचा लाभ झाला तरच हरित क्रांती यशस्वी झाली असे म्हणता येते. म्हणून हरित क्रांती यशस्वी होण्यासाठी भारतात गरीब शेतकऱ्यांनी सहकारी पद्धतीने शेती करणे आवश्यक आहे.

**२३) क्रांतीशिवाय विकास करण्यासाठी सहकारी शेती उपयुक्त :**

आर्थिक विकास करण्यासाठी सरकार अपयशी ठरले, देशात गरीबी, बेकारी, महागाई, भ्रष्टाचार या समस्या सरकारमुळे उग्र बनल्या तर आर्थिक विकासासाठी देशातील जनता क्रांतीचा मार्ग अनुसरते. लोक रस्त्यावर उतरतात. जाळपोळ करतात. हिंसाचार करतात. राजकीय नेत्यांचे खून करतात. सत्ताधीशांना देशाबाहेर पळवून लावतात. अशा प्रकारच्या रक्तलालंच्छित राजकीय क्रांत्या काही देशात झाल्या आहेत. भारतासारख्या देशात अशी क्रांती होऊ नये यासाठी गरीबांची गरीबी, बेकारी नष्ट झाली पाहिजे. सहकारी पद्धतीने शेती केली

तर गरीबीचे, बेकारीचे निर्मूलन करणे शक्य होते. त्यामुळे लोकांना क्रांतीचा (हिंसक मार्गाचा) अवलंब करावा लागत नाही. म्हणून देशात क्रांती उद्‌भवू नये यासाठी क्रांतिशिवाय आर्थिक आणि कृषी विकास घडवून आणण्यासाठी सहकारी पद्धतीची शेती हा उत्तम उपाय आहे. हा सहकारी शेतीचा एक महत्त्वाचा फायदा सांगता येईल.

**२४) दारिद्र्य निर्मूलनास मदत :**

कूळ सहकारी शेती संस्था हा सहकारी शेतीचा एक अत्यंत महत्त्वाचा प्रकार आहे. या संस्थेचे सभासद हे भूमिहीन शेतमजूर असतात. हे शेतमजूर गरीब किंवा दरिद्री असतात. ते एकत्र येऊन कुळ सहकारी शेती संस्था स्थापन करतात. सरकारकडून किंवा मोठ्या जमीनदारांकडून कुळ सहकारी शेती संस्था शेतजमीन भाडेपट्ट्याने किंवा खंडाने घेते आणि भूमिहीन शेतमजूरांना कसण्यासाठी देते. त्यामुळे भूमिहीन गरीब शेतकऱ्यांना जगण्याचे खात्रीचे साधन मिळून त्यांचे दारिद्र्य नष्ट होण्यास मदत होते. भूमिहीन गरीब मजूरांना सरकारकडून शेती संस्था स्थापन करण्यासाठी शेतजमीन मिळत असल्याने गरीब मजूरांची गरीबी नष्ट होते. हा सहकारी शेतीचा महत्त्वाचा फायदा आहे.

**२५) लोकशाहीचे पालन :**

सहकारी शेती संस्थांचा कारभार लोकशाही तत्त्वानुसार चालतो. 'एक व्यक्ती एक मत' या लोकशाही तत्वाने शेती संस्था काम करतात. प्रत्येक सदस्याला मत देण्याचा अधिकार असतो. एखाद्या शेतकऱ्याची जमीन आकाराने कमी असली तरी त्याला एकच मत देता येते. तसेच एखाद्या शेतकऱ्याची शेती संस्थाकडे भरपूर जमीन असली तरी त्याला एकच मत देण्याचा अधिकार असतो. शेती संस्थेचे सर्व सदस्य आपल्यामधून काहींची संचालक म्हणून निवड करतात. हे संचालक अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची निवड करतात. संचालक मंडळ शेती संस्थेचा कारभार पाहतात.

**२६) समानतेची वागणूक :**

सहकारी शेती संस्थेचे सभासद असणाऱ्या काही शेतकऱ्यांची शेतजमीन कमी असते तर काही शेतकऱ्यांची शेतजमीन जास्त असते. तरीही सहकारी शेती संस्थांकडून सर्व उत्पन्न गटातील शेतकऱ्यांना सारखीच किंवा समानतेची वागणूक मिळते. शेतमालाच्या विक्रीची किंमत आणि वाढावा शेतकऱ्यांनी संस्थेने दिलेल्या शेतजमिनीच्या प्रमाणात सभासद शेतकऱ्यांना दिली जाते. त्यामुळे ज्यांनी सहकारी शेती संस्थेला जास्त शेतजमीन दिली आहे त्यांचे नुकसान घेत नाही.

**२७) शेतकऱ्यांचे उत्तम संघटन :**

सहकारी पद्धतीच्या शेतीचा आणखी एक फायदा म्हणजे सहकारी शेती संस्थामुळे शेतकऱ्यांचे उत्तम संघटन तयार होते. वर्षातून काही वेळा शेतकरी एकत्र येतात. त्यामुळे त्यांच्यात परस्पर सहकार्याची वृत्ती वाढीस लागते. त्यामुळे सहकारी शेती संस्थांचा कारभारही चांगला चालण्यास मदत होते.

**२८) शेतकऱ्यांकडील उत्पादन साधनांचा पर्याप्त वापर :**

सहकारी शेती संस्था स्थापन करताना शेतकरी आपल्या शेतजमिनीबरोबर बैल, अवजारे इत्यादी उत्पादन साधनेही संस्थेला देतात. या साधनांचा वापर शेती करण्यासाठी केला जातो. सहकारी शेतीमुळे शेतजमिनीचा आकार मोठा होतो. त्यामुळे बैल, अवजारे या साधनांचा पुरेपूर वापर करता येतो. उत्पादन साधने वापराअभावी पडून राहत नाहीत. उत्पादन साधने शेती संस्थेला दिल्याबद्दल शेती संस्थेकडून शेतकऱ्यांना भाड्याच्या रुपाने उत्पन्न मिळते किंवा शेती संस्था ही उत्पादन साधने शेतकऱ्यांकडून विकत घेतात.

**२९) सेंद्रिय / नैसर्गिक शेती करणे शक्य :**

रासायनिक शेतीचे दुष्परिणाम संपूर्ण जगाला जाणवू लागले आहेत. त्यामुळे सरकारनेही सेंद्रिय (नैसर्गिक) शेतीला प्रोत्साहन देण्यास सुरवात केली आहे. सरकार सहकारी शेती संस्थांना मोठी मदत करत असल्याने सरकारने सहकारी शेती संस्थांना सेंद्रिय शेतीचा आग्रह धरला तर सहकारी शेती संस्था सेंद्रिय पद्धतीने शेती करतील. त्यामुळे सेंद्रिय कृषी उत्पादनात वाढ घडून येण्यास मदत होईल. हा सहकारी शेतीचा एक फायदा सांगता येईल.

**३०) शेती संशोधनाला चालना :**

सहकारी तत्त्वावरील शेतीचा आणखी एक फायदा म्हणजे अशा प्रकारच्या शेतीमुळे शेती विकासाला तसेच शेती संशोधनाला चांगली चालना मिळते. कृषी उत्पादनात वाढ घडून येण्यासाठी शेतीविषयक संशोधनाची गरज असते. सहकारी शेतीचा आकार मोठा असतो. तसेच शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येतो. त्यामुळे शेतीच्या संशोधनाला चालना मिळण्यास मदत होते.

**३१) सामाजिक विकासाला चालना :**

सहकारी शेतीमुळे सामाजिक विकासाला चांगली चालना मिळते. कारण सहकारी शेती संस्थांचे सभासदत्व सर्व जाती, धर्मांसाठी खुले असते. सर्व जाती, धर्मांच्या लोकांना सभासदत्व मिळते. त्यामुळे जातीभेद कमी होण्यास मदत होते. सहकारी शेतीमुळे आर्थिक विकासाबरोबर सामाजिक विकासही घडून येण्यास मदत होते.

**३२) मोठ्या शेतकऱ्यांनाही फायदेशीर :**

सहकारी तत्त्वावरील शेती केवळ गरीब किंवा तुटपुंजी शेती असणाऱ्या शेतकऱ्यांनाच फायदेशीर असते असे नाही तर मोठ्या शेतकऱ्यांनासुद्धा फायदेशीर असते. मोठे शेतकरी किंवा मोठ्या आकाराची शेतजमीन असणारे शेतकरी सुद्धा सहकारी तत्त्वावर एकत्र येऊन शेती संस्था स्थापन करू शकतात. जमिनीचे एकत्रीकरण न करता शेतजमिनीला लागणारी यंत्रे, अवजारे, बियाणे, खते, भांडवल मिळवण्यासाठी आणि त्यामाध्यमातून शेती अधिक किफायतशीर बनवण्यासाठी मोठे शेतकरीसुद्धा सहकारी तत्त्वावर शेती करू शकतात.

**३३) स्थानिक नेतृत्त्वाला वाव :**

सहकारी शेती संस्था चालवण्यासाठी चांगले नेतृत्त्व असावे लागते. सहकारी शेती संस्थेच्या संचालकांना,

अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना नेते असे म्हणतात. ते निवडणुकीद्वारे निवडून आलेले असतात. अशा प्रकारे सहकारी शेती संस्थामुळे ग्रामीण भागात चांगले नेतृत्त्व तयार होते. लोकांच्या नेतृत्त्व गुणाला वाव मिळतो. त्यातून गावाला, तालुक्याला, राज्याला चांगले नेतृत्त्व मिळते. त्यामुळे गावाचा, सहकारी चळवळीचाही फायदा होतो.

**३४) आरोग्य, खेळ, मनोरंजन सुविधा :**

सहकारी शेती संस्था केवळ शेती करत नाहीत तर आपल्या सभासद शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सुद्धा झटत असतात. वैद्यकीय शिबीरांचे आयोजन, मोफत उपचार किंवा सवलतीच्या दराने उपचार, खेळाची सुविधा, करमणूकीची सुविधा आपल्या सभासदांना पुरवत असतात.

**३५) लघु आणि कुटिर उद्योगधंद्यात वाढ :**

सहकारी शेती पद्धतीचा आणखी एक फायदा म्हणजे या प्रकारच्या शेतीमुळे शेती संस्थांच्या आसपास लघु आणि कुटिर उद्योगांची किंवा शेती पूरक उद्योगांची चांगली वाढ होते. कारण सहकारी शेती मोठ्या प्रमाणावर केली जाते. त्यामुळे विविध प्रकारच्या शेतमालाचे उत्पादनही मोठ्या प्रमाणात होते. त्यामुळे सहकारी शेती संस्थांच्या आसपास भात गिरण्या, फळ प्रक्रिया उद्योग इत्यादी लहान लहान उद्योग निर्माण होतात. त्यामुळे ग्रामीण औद्योगिकीकरणास चालना मिळते. हा सहकार शेती संस्थांचा महत्त्वाचा फायदा आहे.

**३६) समाजवादी देशातील शेतीपेक्षा फायदेशीर :**

काही समाजवादी देशात सामूहिक शेती केली जाते. सहकारी शेती सुद्धा सामूहिकपणे केली जाते. परंतु समाजवादी देशातील सामूहिक शेती आणि सहकारी सामूहिक शेती यामध्ये फरक आहे. सहकारी शेती संस्थांचा कारभार लोकशाही तत्त्वानुसार चालतो. सभासदाला संस्था सोडून जाण्याचा (राजीनामा देण्याचा) अधिकार असतो. परंतु समाजावादी देशातील सामूहिक शेती संस्थांचे सभासदत्व शेतकऱ्यांना सोडता येत नाही. म्हणून समाजवादी देशातील सामूहिक शेतीपेक्षा लोकशाही देशातील सहकारी शेती पद्धत शेतकऱ्यांच्या दृष्टीने अधिक चांगली मानली जाते. हा सहकारी शेतीचा एक चांगला गुणधर्म आहे.

**सारांश :** अशा प्रकारे सहकारी शेती पद्धतीचे काही फायदे वरीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत. सहकारी शेतीमुळे शेतजमिनीचे विभाजन व तुकडीकरण थांबते. आधुनिक पद्धतीने शेती करता येते. शेतीच्या उत्पादकतेत आणि उत्पादनात वाढ घडवून आणता येते. शेतकऱ्यांचे दारिद्र्य, बेकारी नष्ट होते. त्यांचा राहणीमानाचा दर्जा उंचावतो. हे सहकारी शेतीचे ठळक फायदे आहेत.

**सहकारी शेतीचे दोष / समस्या / अडचणी :**

सहकारी पद्धतीच्या शेतीचे जसे काही फायदे आहेत त्याप्रमाणे या शेती पद्धतीचे काही दोष सुद्धा आहेत. तसेच या सहकारी शेती संस्थांना काही समस्यांना किंवा अडचणींनासुद्धा तोंड द्यावे लागते. सहकारी शेती संस्थांचे दोष, समस्या किंवा अडचणी यांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**१) अत्यंत असमाधानकारक कामगिरी :**

भारतातील सहकारी शेती संस्थांची कामगिरी समाधानकारक नाही. भारतात सहकारी शेतीचा प्रयोग जवळ जवळ अयशस्वी झाला आहे. सन १९८२ मध्ये भारतात ५६८६ संयुक्त सहकारी शेती संस्था होत्या आणि ३१७५ सामूहिक सहकारी शेती संस्था होत्या. परंतु यामध्ये नफ्यात असणाऱ्या शेती संस्थांची संख्या खूपच कमी होती. भारतात तोट्यात चालणाऱ्या सहकारी शेती संस्थांचे प्रमाण मोठे आहे. अशा प्रकारे भारतात सहकारी शेती संस्थांची कामगिरी फारशी समाधानकारक नाही.

**२) बेकारीची समस्या भेडसावणाऱ्या देशांना निरूपयोगी :**

भारतासारख्या ज्या देशात लोकसंख्या प्रचंड आहे आणि बेकारीची समस्या गंभीर आहे, अशा देशांना सहकारी शेती निरूपयोगी आहे अशी टीका काही टीकाकारांनी केली आहे. कारण सहकारी शेतीत मोठ्या यंत्रांचा वापर केला जातो. यांत्रिक पद्धतीने सहकारी शेती केली जाते. सहकारी शेतीचे यांत्रिकीकरण घडवून आणले जाते. त्यामुळे रोजगार फारसा निर्माण होत नाही. परंतु ज्या देशात लोकसंख्या विरळ आहे, बेकारीची समस्या अस्तित्वात नाही त्या देशात सहकारी पद्धतीने शेती करणे योग्य ठरते.

**३) स्वेच्छेने पुढे येणाऱ्यांचे प्रमाण कमी :**

लोकांनी स्वेच्छेने पुढे येऊन सहकारी तत्त्वावर शेती संस्था स्थापन कराव्यात असे सरकारला, तज्ञांना वाटते. परंतु आपली शेतजमीन सहकारी शेती संस्थेला स्वेच्छेने देण्यासाठी पुढे येणाऱ्यांचे प्रमाण जगात खूपच कमी आहे. भारताही याला अपवाद नाही. म्हणून भारतात सहकारी शेतीची प्रगती खूपच मंद गतीने होत आहे.

**४) सहकारी नव्हे सरकारी शेती :**

भारतातील सहकारी पद्धतीच्या शेतीवर करण्यात येणारी प्रमुख टीका म्हणजे भारतातील सहकारी शेती ही सहकारी शेती नसून सरकारी शेती आहे. या टीकेत बरेच तथ्य आहे. कारण भारतात सहकारी शेती संस्था स्थापन करण्यास सरकारकडूनच प्रोत्साहन दिले जाते. तसेच सरकारकडून सहकारी तत्त्वावर शेती संस्था स्थापन करण्यास सर्व प्रकारची मदत केली जाते. सरकारकडून सहकारी शेती संस्था स्थापन करण्यासाठी शेतकऱ्यांना एकत्र केले जाते. त्यामुळे भारतातील सहकारी शेती हा लोकांना सरकारी कार्यक्रम वाटतो. सरकारने आपली पडीक, मोकळी जमीन मोठ्या प्रमाणात सहकारी शेती संस्थांना दिली आहे. म्हणून टीकाकार भारतातील सहकारी शेतीला सहकारी शेती असे न मानता सरकारी शेती असे मानतात.

**५) चांगल्या नेतृत्त्वाची कमतरता :**

भारतातील सहकारी शेती संस्थांची मंद गतीने प्रगती होण्याचे प्रमुख कारण म्हणजे सहकारी शेती चळवळीला चांगले नेतृत्त्व पुरेशा प्रमाणात मिळू शकले नाही हे आहे. सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका, सहकार सूत गिरण्या, सहकारी दूध संस्था यांना जसे चांगले नेतृत्त्व लाभले आहे तसे चांगले, प्रभावी नेतृत्त्व

सहकारी शेती चळवळीला लाभलेले नाही. यामुळे भारतात सहकारी शेतीचा प्रयोग फारसा यशस्वी झालेला नाही.

**६) शेतकऱ्यांचा मोठा विरोध :**

सहकारी शेती हा शेतकऱ्यांच्या दारिद्र्य निर्मूलनाचा, बेरोजगारी निर्मूलनाचा सरकारी पाठबळ लाभलेला अत्यंत महत्त्वपूर्ण कार्यक्रम आहे. परंतु या कार्यक्रमालाच बहुसंख्य शेतकऱ्यांचा मोठा विरोध आहे. ९५ टक्केपेक्षा अधिक शेतकऱ्यांचा सहकारी पद्धतीच्या शेतीला (आपली शेतजमीन सहकारी शेती संस्थेला देण्याला) विरोध आहे. बहुसंख्य शेतकरी शेतजमिनीचा मालकी हक्क सोडण्यास तयार नाहीत. आपल्या हितासाठीच सहकारी शेतीचा प्रयोग करण्यात येत आहे. याची समजच शेतकऱ्यांना नाही. त्यामुळे ते सहकारी शेतीला विरोध करतात. अशा प्रकारे भारतातील बहुसंख्य शेतकऱ्यांचा सहकारी पद्धतीच्या शेतीला विरोध आहे. त्यामुळे भारतात सहकारी शेतीचा प्रयोग यशस्वी होत नाही.

**७) अकार्यक्षम व्यवस्थापन :**

भारतातील बहुतेक सहकारी शेती संस्थांचे व्यवस्थापन हे अकार्यक्षम आहे. त्याला काही कारणे जबाबदार आहेत. त्यामध्ये अप्रशिक्षित कर्मचारी व अधिकारी हे प्रमुख कारण आहे. सहकारी शेती संस्थांचे व्यवस्थापन चांगले किंवा कार्यक्षम नाही. त्यामुळे सहकारी शेती संस्थांची प्रगती गतीने होत नाही.

**८) जमीनदारांकडून गैरवापर :**

सहकारी शेती पद्धतीचा भारतातील काही जमीनदार लोकांनी गैरवापर केल्याचे नियोजन मंडळाला आढळून आले होते. या मंडळाला पाहणीत असे आढळले की, सरकारने जे जमीन सुधारणा कायदे केले होते त्या कायद्यापासून आपली जमीन वाचवण्यासाठी जमीनदार लोकांना सहकारी शेती संस्था स्थापन केल्या होत्या. सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १८४८ मध्ये कमाल जमीन धारणा कायदा संमत केला. या कायद्यामुळे ज्यांच्या अतिरिक्त जमिनी शासनाकडे जाणार होत्या त्या जमीनदारांनी जमिनी द्याव्या लागू नयेत म्हणून सहकारी तत्त्वावर शेती संस्था स्थापन केल्या आणि जमिनी आपल्याकडेच ठेवण्यात यश मिळवले. नियोजन मंडळाने काही २२ सहकारी शेती संस्थांची तपासणी केली त्यावेळी नियोजन मंडळाला ही धक्कादायक बाब आढळून आली. नियोजन मंडळाने असे मत व्यक्त केले होते की, या खऱ्याखुऱ्या सहकारी शेती संस्था नव्हत्या. शेतजमिनी वाचवण्यासाठी जमीनदारांनी सहकाराचा आभास निर्माण केला होता.

**९) दुर्बल घटकांना कमी महत्त्व :**

सहकारी शेती संस्थांचे सभासद सारख्याच उत्पन्न गटातील नसतात. काही शेतकऱ्यांची शेतजमीन जास्त असते. तर काही सभासद शेतकऱ्यांची शेतजमीन आकाराने लहान असते. त्यामुळे सहकारी शेती संस्थांच्या संचालक मंडळावर दुर्बल, गरीब शेतकऱ्यांना फारसे स्थान नसते. मोठ्या शेतकऱ्यांचेच संचालक मंडळावर वर्चस्व दिसते. त्यामुळे गरीब शेतकऱ्यांना सहकार आपला वाटत नाही.

**१०) सवलती मिळवण्यासाठी सहकारी शेती संस्थांची स्थापना :**

१९६५ च्या धनंजयराव गाडगीळ समितीला सहकारी शेती संस्थांच्या अभ्यासात असे आढळले की, काही सहकारी शेती संस्थांनी सरकारकडून मिळणाऱ्या सवलती लाटण्यासाठीच सहकारी शेती संस्थांची स्थापना केली आहे. कृषी उत्पादन वाढवावे हा त्यांचा उद्देश नव्हता. त्यामुळे सहकारी शेती चळवळ वाढू शकली नाही. उलट ही चळवळ काही लोकांमुळे बदनाम झाली.

**११) निकृष्ट जमिनींचा पुरवठा :**

भारतातील सहकारी शेती चळवळ अपयशी होण्याचे आणखी एक कारण म्हणजे अनेक शेतकऱ्यांनी सहकारी शेती संस्थांना आपल्या जवळची फक्त निकृष्ट शेतजमीन दिली. चांगली सुपीक जमीन स्वत:कडे ठेवली. त्यामुळे सहकारी शेती संस्थांची प्रगती होऊ शकली नाही. लोकांचा सहकाराकडे बघण्याचा दृष्टिकोन चांगला नसल्यामुळे लोकांनी चांगल्या जमिनी स्वत:कडे ठेवून निकृष्ट जमिनी सहकारी शेती संस्थांना दिल्या.

**१२) नोकरशाहीचा अडथळा :**

भारतातील सहकारी शेतीची प्रगती अतिशय मंद गतीने होण्याचे प्रमुख कारण म्हणजे काही सरकारी नोकरांची सहकारी शेतीबद्दल आस्था नसणे हे आहे. नोकरशाहीला सहकारी शेतीबद्दल व गरीब शेतकऱ्यांबद्दल फारसा कळवळा नाही. त्यामुळे सहकारी शेतीची प्रगती वेगाने होत नाही. सहकारी शेतीवर विश्वास नसणारे कर्मचारी हे सहकारी शेतीच्या विकासाच्या मार्गातील अडथळा बनून राहिले आहेत.

**१३) संख्यात्मक वाढीवर भर :**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने शेतकऱ्यांचे दारिद्र्य हटविण्यासाठी आणि शेती उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी सहकारी शेती संस्थांच्या स्थापनेकडे लक्ष दिले. भारत सरकारने प्रत्येक पंचवार्षिक योजनेत सहकारी शेतीवर भर दिला. देशात जास्तीत जास्त संख्येने सहकारी शेती संस्था स्थापन करण्याकडे सरकारने लक्ष दिले. परंतु त्यामुळे सहकारी शेती संस्थांच्या गुणात्मक प्रगतीकडे मात्र दुर्लक्ष झाले. त्यामुळे सहकारी शेती पद्धती देशात फारशी यशस्वी होऊ शकली नाही.

**१४) भांडवलशाहीकडे वाटचाल :**

भारतात सहकारी शेतीची वाढ होऊ शकत नाही त्याचे एक प्रमुख कारण म्हणजे भारत सरकारने सन १९९१ पासून खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या आर्थिक सुधारणांची अंमलबजावणी देशात सुरू केली आहे. त्यामुळे भारताची वाटचाल भांडवलशाहीकडे वेगाने सुरू झाली आहे. समाजवादी देशात सहकारी शेतीचा प्रयोग यशस्वी करता येतो. परंतु लोकशाही आणि भांडवलशाही असलेल्या देशात मात्र सहकारी शेतीचा प्रयोग यशस्वी करणे सोपे नसते. अशा प्रकारे १९९१ नंतर भारताची वाटचाल भांडवलशाहीकडे सुरू असल्याने भारतात सहकारी शेती संस्थांची संख्यात्मक प्रगती होत नाही. सरकारला सहकारी शेतीची सक्ती करता येत नाही. राजकीय परिणाम वाईट होतील या भीतीपोटी सरकार सहकारी शेती पद्धत सक्तीने राबवत नाही.

**१५) सभासदामधील मतभेद :**

सहकारी तत्त्वावरील शेतीचा प्रयोग भारतात फारसा यशस्वी झाला नाही याचे प्रमुख कारण म्हणजे सभासदामध्ये असलेल्या एकवाक्यतेचा अभाव हे आहे. कोणतीही संस्था यशस्वी व्हायची असेल तर त्या संस्थेच्या सभासदांमध्ये कोणत्याही प्रकारचे मतभेद असता कामा नयेत. संस्थेने घेतलेल्या निर्णयांना सर्वांची सहमती असली पाहिजे. निर्णय किंवा धोरणाबाबत एकवाक्यता असली पाहिजे. परंतु त्याचा अभाव असल्याने सहकारी शेतीची संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती देशात फारशी होऊ शकली नाही हे वास्तव आहे.

**सारांश :** अशा प्रकारे भारतातील सहकारी शेतीवर वरीलप्रमाणे टीका केल्या जातात. भारतीय सहकारी शेती पद्धतीतील दोष, उणिवा यांचीही माहिती वर स्पष्ट केली आहे. भारतीय शेतीच्या प्रगतीचा वेग मंद असण्याची काही कारणे वरीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**सहकारी शेतीचा प्रयोग यशस्वी होण्यासाठी उपाय :**

भारतात सहकार शेती चळवळीला फारसे यश लाभलेले नाही. सहकारी चळवळीची संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती खूपच कमी आहे. परंतु शेतकऱ्यांच्या दारिद्र्य निवारणासाठी, रोजगारात वाढ घडवून आणण्यासाठी, कृषी उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी भारतात सहकारी शेतीचा प्रयोग यशस्वी होणे आवश्यक आहे. सहकारी शेतीच्या यशस्वीतेसाठी, सहकारी शेती संस्थांचा कारभार सुधारण्यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**१) गरीब शेतकऱ्यांना सहकारी शेतीचे महत्त्व पटवून देणे आवश्यक :**

भारतात गरीब शेतकऱ्यांना सहकारी शेतीचे महत्त्व पटलेले नाही. सहकारी पद्धतीने शेती केल्यास शेतीतील धोके कमी करता येतात. शेतीतील अनिश्चिततेला तोंड देता येते. याची माहिती शेतकऱ्यांना देणे आवश्यक आहे. शेती सहकारी पद्धतीने केल्यास शेतीच्या उत्पादनात वाढ होते. शेतजमिनीचा मालकी हक्क नष्ट होत नाही. याची माहिती शेतकऱ्यांना दिली, सहकारी शेतीचे महत्त्व शेतकऱ्यांना पटवून दिले तर सहकारी शेती संस्थांची संख्या वाढेल. जास्तीत जास्त गरीब शेतकरी सहकारी पद्धतीने शेती करतील.

**२) चांगले व स्थानिक नेतृत्त्व पुढे येणे आवश्यक :**

सहकारी शेतीचा प्रयोग यशस्वी होण्यासाठी चांगले व स्थानिक नेतृत्त्व पुढे आले पाहिजे. त्याशिवाय सहकारी शेती संस्थांची संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती होणार नाही. सहकारी शेतीविषयी आणि गरीब शेतकऱ्यांविषयी आस्था असणाऱ्या सामाजिक, राजकीय कार्यकर्त्यांनी सहकारी शेती संस्था उभ्या करण्यासाठी आणि त्या यशस्वीपणे चालविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

**३) सहकारी शेती संस्थांना पुरेसा कर्जपुरवठा होणे आवश्यक :**

जिल्ह्यातील मध्यवर्ती सहकारी बँका, सरकारी व्यापारी बँका, भू-विकास बँका इत्यादींनी सहकारी शेती

संस्थांना पुरेशा प्रमाणात व कमी व्याज दरात कर्जपुरवठा करणे आवश्यक आहे. कारण सहकारी शेती संस्थांचा शेतजमिनीचा आकार मोठा असतो. त्यामुळे आधुनिक पद्धतीने शेती करण्यासाठी भांडवलाची (कर्जाची) मोठ्या प्रमाणात गरज लागते. म्हणून सहकारी शेती संस्थांना पुरेशा प्रमाणात कर्जपुरवठा होणे आवश्यक आहे.

**४) सरकारची भूमिका महत्त्वाची :**

भारतात सहकारी चळवळीच्या विकासात सरकारची भूमिका सुरवातीपासूनच महत्त्वाची राहिली आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने सहकारी चळवळीच्या विकासाकडे (विविध प्रकारच्या सहकारी संस्थांच्या विकासाकडे आणि सहकारी बँकांच्या प्रगतीकडे) विशेष लक्ष दिले आहे. सहकारी शेतीच्या विकासाकडेही सरकारने लक्ष दिले आहे. यासंदर्भात सरकारवर जरी टीका होत असली तरी या टीकेकडे दुर्लक्ष करून सरकारने सहकारी शेती संस्थांसारख्या विविध सहकारी संस्थांच्या प्रगतीकडे विशेष लक्ष द्यावे. गेली ८० वर्षे सरकार सहकारी शेती संस्थांच्या विकासासाठी प्रयत्न करत आहे. सरकारने हे प्रयत्न सोडू नयेत. सरकारने सहकारी शेती संस्थांच्या प्रगतीसाठी निरंतर मदत करावी. त्यामुळे शेतकऱ्यांचे दारिद्र्य, बेकारी या समस्या सुटण्यास मदत होईल.

**५) प्रशिक्षणाची व्यवस्था :**

सहकारी शेती संस्थांचे व्यवस्थापन कार्यक्षम, दर्जेदार व्हावे यासाठी शेती संस्थांच्या अधिकारी, कर्मचारी, संचालक मंडळ यांना सरकारने प्रशिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे. सहकारी शेती संस्था चालवण्याचे प्रशिक्षण या घटकांना देणे आवश्यक आहे. त्याशिवाय सहकारी शेती संस्थांच्या कारभार सुधारणार नाही.

**६) सरकारी नोकरांनी सहकार्य करणे गरजेचे :**

सरकारी नोकरांनी सहकारी शेती संस्थांना सहकार्य करण्याची भूमिका घेतली पाहिजे आणि ही भूमिका त्यांनी कायम ठेवली पाहिजे. सरकारी कर्मचाऱ्यांना सहकाराबद्दल, सहकारी शेतीबद्दल, गरीब शेतकऱ्यांबद्दल आस्था व कळवळा असला पाहिजे. बेजबाबदार कर्मचारी हे सरकारी चळवळीच्या प्रगतीतील प्रमुख अडसर आहेत. त्यांनी सहकाराकडे पाहण्याचा आपला नकारात्मक दृष्टिकोन बदलला पाहिजे.

**७) सभासदामध्ये एकवाक्यता असणे आवश्यक :**

सहकारी शेती संस्थांच्या सभासदामध्ये मतभिन्नता असेल तर शेती संस्थांना कार्यक्षमपणे काम करता येत नाही. सहकारी शेती संस्थांची प्रगती होत नाही. म्हणून सहकारी शेती संस्थांच्या सर्व सभासदांनी एकदिलाने, विश्वासाने काम करणे आवश्यक आहे. उत्पादन, विक्री याबाबतचे सर्व निर्णय एकमताने घेतले पाहिजेत. तरच शेतीसंस्था कार्यक्षमतेने काम करू शकतील.

**८) पशुपालन व्यवसायासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक :**

सहकारी शेती संस्थांकडे मोठ्या प्रमाणावर शेतजमीन असते. शेतीतून चाराही मोठ्या प्रमाणात उपलब्ध

होत असतो. म्हणून सहकारी शेती संस्थांनी केवळ कृषी मालाचे उत्पादन न घेता शेळी–मेंढी पालन, कुक्कुटपालन, गाय, म्हैस पालन हे व्यवसाय सुरू करावेत. सहकारी शेती संस्थांकडे शेतजमीन मोठ्या प्रमाणात असल्याने व शेतीतून चारा (वैरण) व इतर पशुखाद्य उपलब्ध होत असल्याने सहकारी शेती संस्थांना कमी खर्चात पशुपालन व कुक्कुटपालन व्यवसाय करता येतील. तसेच पशुखाद्य व्यवसायही कमी खर्चात करता येईल. त्यामुळे सहकारी शेती संस्थांच्या सभासद शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही वाढ होण्यास मदत होईल. म्हणून सहकारी तत्त्वावरील शेती संस्थांनी केवळ शेती व्यवसाय न करता पशुपालन, कुक्कुटपालन, पशुखाद्य, खतनिर्मिती इत्यादी पूरक व्यवसायसुद्धा करावेत. तसेच कृषी मालावर प्रक्रिया करणारे व्यवसाय सुद्धा करावेत.

**९) फळझाडांच्या लागवडीला प्राधान्य देणे आवश्यक :**

सहकारी शेती संस्थांनी अन्नधान्य, कडधान्य, ऊस, कापूस या पीकाबरोबरच फळझाडांच्या लागवडीलासुद्धा प्राधान्य देणे आवश्यक आहे. कारण भारतात मध्यमवर्गीयांचे उत्पन्न वाढत आहे. फळांचे आहारातील महत्त्व लोकांना समजू लागले आहे. त्यामुळे विविध प्रकारच्या फळांना मागणी मोठ्या प्रमाणात वाढत आहे. तसेच फळांना किंमतही चांगली मिळत आहे. म्हणून सहकारी शेती संस्थांनी जमिनीतील काही हिश्शावर चिक्कू, केळी, आंबे, सिताफळ, फणस, पेरू इत्यादी विविध प्रकारच्या फळझाडांची लागवड करणे आवश्यक आहे. त्यामुळे सहकारी शेती संस्थांच्या नफ्यात वाढ होण्यास मदत होऊ शकेल.

**१०) गुदाम बांधणीसाठी मदत करणे आवश्यक :**

शेतमालाची नासाडी होऊ नये यासाठी शेतमाल चांगल्या प्रकारे साठवून ठेवावा लागतो. त्यासाठी चांगल्या, शास्त्रीय पद्धतीच्या गुदामांची गरज असते.तसेच शेतमालाला चांगली किंमत मिळेपर्यंत शेतमाल साठवून ठेवावा लागतो. मालावर प्रक्रिया करण्यासाठीसुद्धा शेतमाल साठवून ठेवावा लागतो. त्यामुळे गुदामे चांगली असणे आवश्यक असते. म्हणून सरकारने सहकारी शेती संस्थांना गुदाम बांधण्यासाठी पुरेसा कर्जपुरवठा करणे आवश्यक आहे. तसेच गुदामे चांगल्या पद्धतीची बांधता यावीत यासाठी तांत्रिक मार्गदर्शनही सहकारी शेती संस्थांना पुरवले पाहिजे.

**सारांश :** अशा प्रकारे सहकारी शेती संस्थांचा कारभार सुधारण्यासाठी, सहकारी शेती संस्था किफायतशीर (नफ्यात) चालण्यासाठी, सहकारी शेती संस्थांची संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती घडवून आणण्यासाठी काही उपाय वरीलप्रमाणे सुचवले आहेत. या उपायांची अंमलबजावणी प्रभावीपणे झाली तर सहकारी शेती संस्थांच्या प्रगतीचा वेग वाढू शकेल.

## २.२.३ भारतातील ग्राहक सहकारी संस्था (Consumers Co-operative Societies in India) :

### प्रास्ताविक

जगातील ग्राहक सहकारी चळवळीचा उगम इंग्लंड या देशात झाला. सन १८४४ मध्ये इंग्लंडमधील 'रॉश्डेल' या खेड्यातील २८ विणकर एकत्र आले आणि त्यांनी 'रॉश्डेल इक्विटेबल पायोनिअर्स को–ऑपरेटिव्ह

सोसायटी' या ग्राहक सहकारी संस्थेची स्थापना केली. जगातील ही पहिली सहकारी ग्राहक संस्था मानली जाते. व्यापारी भेसळयुक्त माल विकत होते. मालाची साठेबाजी करून, काळाबाजार करून, मालाचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून इंग्लंडमधील व्यापारी भरमसाठ किंमतीला जीवनावश्यक वस्तू विकत होते. ग्राहकांचे मोठे आर्थिक शोषण करत होते. या बाबींना पायबंद बसावा म्हणून इंग्लंडमधील रॉश्डेल या खेड्यातील २८ विणकरांनी एकत्र येऊन ग्राहक सहकारी संस्था स्थापन केली. पुढे जगभर अशा प्रकारच्या ग्राहक सहकारी संस्था स्थापन होऊ लागल्या. भारतातही दुसऱ्या महायुद्धापासून अशा प्रकारच्या ग्राहक सहकारी संस्था स्थापन होण्यास सुरवात झाली. जगातील जवळ जवळ सर्व देशांना ग्राहक सहकारी चळवळीचे (ग्राहक सहकारी संस्थांचे) महत्त्व पटलेले आहे. भारतातही सरकारकडून इतर प्रकारच्या सहकारी संस्थांप्रमाणे ग्राहक सहकारी संस्थांना मदत केली जाते. जागतिक सहकारी चळवळीची सुरवातच ग्राहक सहकारी संस्थांच्या स्थापनेतून झाली आहे. ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.

**व्याख्या :**

ग्राहक सहकारी संस्थेची एक सर्वसाधारण व्याख्या खालील शब्दात स्पष्ट केली आहे.

''**ग्राहकांनी आपणास लागणाऱ्या विविध वस्तू रास्त किंमतीला आणि दर्जेदार मिळाव्यात यासाठी सहकारी तत्त्वावर स्थापन केलेली एक आर्थिक संस्था म्हणजे ग्राहक सहकारी संस्था होय.**''

ग्राहक किंवा उपभोक्ते एकत्र येऊन स्वेच्छेने, लोकशाही तत्त्वावर जी संस्था स्थापन करतात, त्या सहकारी संस्थेला ग्राहक सहकारी संस्था असे म्हणतात.

**ग्राहक सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये :**

ग्राहक सहकारी संस्थेची ठळक वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**१) ग्राहकांचे आर्थिक संघटन :**

ग्राहक सहकारी संस्था हे ग्राहकांचे आर्थिक संघटन असते. या संस्थांची स्थापना ग्राहक किंवा उपभोक्ते एकत्र येऊन करत असतात. ग्राहक सहकारी संस्थांचे सभासदत्व दुकानदार, व्यापाऱ्यांना दिले जात नाही.

**२) विशिष्ट व्यवसायातील लोकांच्या संस्था :**

विशिष्ट व्यवसायातील लोक एकत्र येऊन ग्राहक सहकारी संस्था स्थापन करू शकतात. उदाहरणार्थ आपल्या देशात महाविद्यालयीन आणि विद्यापीठातील विद्यार्थी यांच्यासाठी सहकारी ग्राहक भांडारे आहेत. औद्योगिक कामगारांची स्वतंत्र ग्राहक भांडारे आहेत.

**३) लोकशाही कारभार :**

ग्राहक सहकारी संस्थांचा कारभार लोकशाही तत्त्वानुसार चालतो. प्रत्येक सभासदाला निवडणुकीत एकच मत देण्याचा अधिकार असतो. इतर सहकारी संस्थाप्रमाणे ग्राहक सहकारी संस्थेच्या सर्वसाधारण सभेला निर्णय प्रक्रियेत किंवा संस्थेचे धोरण ठरविण्याच्या बाबतीत महत्त्वाचे स्थान असते.

**४) नफ्याचे वाटप व्यवहारांच्या प्रमाणात :**

ग्राहक सहकारी संस्थांना जो नफा मिळतो त्या नफ्यातील काही भाग संस्था राखीव निधीत ठेवतात आणि उर्वरित नफ्याचे वाटप सभासदांना करतात. त्यास लाभांश (Dividend) असे म्हणतात. हा नफा सभासदांना सारख्याच प्रमाणात वाटला जात नाही तर सभासदांनी ग्राहक सहकारी संस्थेशी केलेल्या व्यवहारांच्या (खरेदीच्या) प्रमाणात वाटला जातो. जे ग्राहक ग्राहक सहकारी संस्थेकडून अधिक माल खरेदी करतात त्यांना नफ्यात अधिक हिस्सा मिळतो. म्हणजे त्यांना लाभांश अधिक मिळतो. कारण त्यांनी मोठ्या प्रमाणात मालाची खरेदी केलेली असल्याने ग्राहक सहकारी संस्थांना अधिक नफा प्राप्त झालेला असतो. जे सभासद ग्राहक सहकारी संस्थेकडून कमी प्रमाणात मालाची खरेदी करतात त्यांना संस्थेकडून कमी लाभांश मिळतो.

**५) भांडवल उभारणी :**

ग्राहक सहकारी संस्था शेअर्सची किंवा भागभांडवलाची विक्री करून भांडवल उभारणी करतात. शेअर्सची विक्री फक्त ग्राहकांनाच केली जाते.

**६) सभासदांबरोबर इतरांनाही वस्तूंची विक्री :**

ग्राहक सहकारी संस्था केवळ आपल्या सभासदांनाच वस्तूंची विक्री करत नाहीत तर समाजातील इतर घटकांनाही वस्तूची विक्री करतात.

**७) नफ्यापेक्षा सेवेवर अधिक भर :**

ग्राहक सहकारी संस्थांचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे या संस्था नफा मिळवण्याच्या उद्देशाने स्थापन झालेल्या नसतात. तर सभासदांना व इतर ग्राहकांना चांगल्या सेवा पुरवण्यासाठी (निर्भेळ वस्तू पुरवण्यासाठी) स्थापन झालेल्या असतात. ग्राहक सहकारी संस्था नफा मिळवतात. परंतु नफा मिळवण्यासाठी कोणत्याही वाईट मार्गांचा अवलंब करत नाहीत.

**८) सरकारचे पाठबळ :**

भारतातील ग्राहक सहकारी संस्थांना सरकारचे मोठे पाठबळ लाभलेले आहे. इतर सहकारी संस्थाप्रमाणे भारतात सरकारकडून ग्राहक सहकारी संस्थांना सर्व प्रकारची मदत केली जाते.

**९) स्वेच्छा तत्त्वाचे पालन :**

ग्राहक सहकारी संस्थेचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे ग्राहक किंवा उपभोक्ते स्वेच्छेने एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर रास्त दरात व निर्भेळ वस्तू मिळाव्यात यासाठी ग्राहक सहकारी संस्था स्थापन करतात. संस्था स्थापन करण्यासाठी ग्राहकांवर कोणताही दबाव नसतो. मात्र सरकारचे प्रोत्साहन असते. सरकारची सर्व प्रकारची मदत असते. भारतात हे प्रकर्षाने दिसून येते.

**१०) विविध प्रकारच्या / स्वरूपाच्या ग्राहक सहकारी संस्था :**

भारतात कार्यक्षेत्रानुसार ग्राहक सहकारी संस्थांचे वेगवेगळे प्रकार आढळून येतात. उदाहरणार्थ प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था गावपातळीवर काम करतात. घाऊक ग्राहक सहकारी संस्था जिल्हा पातळीवर काम करतात. राज्य सहकारी ग्राहक संघाचे कार्यक्षेत्र राज्य हे असते. राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघाचे कार्यक्षेत्र संपूर्ण देश आहे. याशिवाय भारतात विभागीय बाजार किंवा सुपर बाजारही आढळून येतात.

**ग्राहक सहकारी संस्थांचे उद्देश आणि कार्ये :**

खाजगी व्यापाऱ्यांकडून ग्राहकांचे होणारे शोषण थांबवणे हा ग्राहक सहकारी चळवळीचा प्रमुख उद्देश आहे. ग्राहक सहकारी संस्था प्रामुख्याने पुढील कार्ये करतात.

१) सभासद आणि बिगर सभासद ग्राहकांना जीवनावश्यक आणि इतर वस्तूंचा पुरवठा पुरेशा प्रमाणात आणि योग्य (वाजवी) किंमतीला करणे.

२) ग्राहकांना चांगल्या, दर्जेदार वस्तूंचा पुरवठा करणे.

३) सार्वजनिक वितरण व्यवस्थेला सहकार्य करणे.

४) उत्पादकांकडून घाऊक प्रमाणावर मालाची खरेदी करणे.

५) वस्तूवर प्रक्रिया करून घेणे किंवा वस्तूवर प्रक्रिया करण्यासाठी प्रक्रिया केंद्रे (कारखाने) स्थापन करणे.

६) नफ्यापेक्षा सेवेवर अधिक भर देणे.

७) काही खाजगी व्यापारी विविध मार्गांनी ग्राहकांची फसवणूक करतात, ती फसवणूक टाळणे. ग्राहकांची वजन-मापात फसवणूक न करणे, भेसळयुक्त माल न विकणे अशी काळजी घेणे.

८) संस्थेच्या सभासदांना काटकसरीचे किंवा बचतीचे महत्त्व पटवून देणे. त्यांची बचत गोळा करणे.

**ग्राहक सहकारी संस्थांची गरज / महत्त्व / आवश्यकता / फायदे :**

भारतासारख्या अनेक देशात ग्राहक सहकारी चळवळ अस्तित्वात असून तिचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. ग्राहक सहकारी संस्था ग्राहक, सरकार, उत्पादक यांच्या दृष्टीने महत्त्वाची कार्ये करतात. त्यामुळे ग्राहक सहकारी संस्थांना आर्थिक, सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. ग्राहक सहकारी संस्थांची आवश्यकता पुढील कारणासाठी भासते. ग्राहक सहकारी संस्था विविध उपयुक्त कार्ये करत असल्याने संपूर्ण समाजाच्या दृष्टीने ग्राहक सहकारी चळवळीला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. ग्राहक सहकारी संस्थांचे फायदे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) वाजवी दरात मालाचा पुरवठा :**

ग्राहक सहकारी संस्थांचा एक अत्यंत महत्त्वाचा फायदा म्हणजे या संस्था ग्राहकांना वाजवी दरात (योग्य किंमतीला) विविध वस्तू आणि सेवांचा पुरवठा करतात. त्यामुळे ग्राहकांचे आर्थिक नुकसान होत नाही. काही खाजगी व्यापारी जादा किंमतीला (भरमसाठ किंमतीला) मालाचा पुरवठा करतात. परंतु ग्राहक सहकारी संस्था मात्र अवाजवी किंमत न आकारता वाजवी किंमतीला मालाचा पुरवठा करतात. हा ग्राहक सहकारी संस्थांचा अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**२) दर्जेदार आणि निर्भेळ मालाचा पुरवठा :**

काही खाजगी व्यापारी कमी दर्जाचा किंवा भेसळयुक्त मालाचा पुरवठा ग्राहकांना करतात. परंतु सहकारी तत्त्वावरील ग्राहक संस्था किंवा सहकारी ग्राहक भांडारे मात्र ग्राहकांना चांगला, निर्भेळ, दर्जेदार माल पुरवतात. ग्राहकांना चांगल्या दर्जाच्या वस्तू आणि सेवा पुरवणे हा ग्राहक सहकारी संस्थांचा प्रमुख हेतू असतो. त्याचा ग्राहकांना चांगला लाभ होतो. म्हणून देशात जास्तीत जास्त ग्राहक सहकारी संस्थांची स्थापना होणे आवश्यक आहे.

**३) अनुचित व्यापारी प्रथांना पायबंद :**

ग्राहक सहकारी संस्थांचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे सहकारी तत्त्वावरील ग्राहक संस्था किंवा सहकारी ग्राहक भांडार एखाद्या गावात अस्तित्वात असेल तर त्या गावातील व्यापारी लोक खोटी वजन मापे वापरणे, कमी प्रतीचा माल विकणे, मालात भेसळ करणे, अवाजवी (जादा) किंमतीला मालाची विक्री करणे अशा चुकीच्या, गैर (अनुचित) व्यापारी प्रथांचा अवलंब करू शकत नाहीत. तसे केले तर सर्व ग्राहक केवळ ग्राहक सहकारी संस्थामधूनच माल खरेदी करतील. त्यामुळे गावात किंवा परिसरात जर एखादी ग्राहक सहकारी संस्था असेल तर तेथील व्यापाऱ्यांना अनुचित व्यापार प्रथांचा अवलंब करता येत नाही. म्हणून ग्राहक सहकारी संस्था अत्यंत आवश्यक वाटतात. गावागावातील खाजगी व्यापाऱ्यांनी अनुचित व्यापारी प्रथांचा अवलंब करू नये यासाठी गावागावात ग्राहक सहकारी संस्था किंवा ग्राहक सहकारी भांडारे स्थापन होणे आवश्यक आहे.

**४) दर्जेदार मालाच्या उत्पादनास प्रोत्साहन :**

ग्राहक सहकारी संस्थांचा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे या संस्थामुळे उत्पादकांना दर्जेदार किंवा चांगला माल तयार करावा लागतो. ग्राहक सहकारी संस्था या ग्राहकांना चांगल्या प्रतीचा किंवा चांगल्या दर्जाचा माल पुरवत असतात. ग्राहक सहकारी संस्थांना चांगला माल पुरवावा लागत असल्याने उत्पादकही चांगल्या प्रतीचा, दर्जेदार माल उत्पादित करतात. त्यामुळे दर्जेदार मालाच्या उत्पादनात वाढ होते. अशा प्रकारे ग्राहक सहकारी संस्था उत्पादकांकडून चांगल्या मालाची मागणी करत असल्याने उत्पादकही चांगला, दर्जेदार माल उत्पादित करतात.

**५) कुटिर उद्योग, लघुउद्योगांना फायदेशीर :**

ग्राहक सहकारी संस्थांचा परिसरातील कुटिर उद्योग आणि लघुउद्योगांनाही चांगला फायदा होतो. कारण या संस्था किंवा सहकारी ग्राहक भांडारे आसपासच्या लघु, कुटिर उद्योगातील माल खरेदी करून त्याची विक्री ग्राहकांना करत असतात. अशा प्रकारे सहकारी तत्त्वावरील ग्राहक भांडारे परिसरातील लघु व कुटिर उद्योगातील माल खरेदी करत असल्याने ग्राहक संस्थामुळे कुटिर व लघु उद्योगांचाही फायदा होतो. म्हणून लघु व कुटिर उद्योगांच्या विकासासाठी, त्यांच्या मालाचा खप वाढावा यासाठी प्रत्येक गावात किमान एक सहकारी ग्राहक भांडार स्थापन होणे आवश्यक आहे.

**६) अनावश्यक मध्यस्थांचे उच्चाटन :**

ग्राहक सहकारी संस्था बराचसा माल थेट उत्पादकांच्याकडून खरेदी करतात. त्यामुळे त्यांना उत्पादकांकडून कमी किंमतीत माल मिळतो. मध्यस्थामार्फत माल खरेदी केला जात नसल्याने ग्राहक सहकारी संस्थांचा फायदा होतो. या संस्था ग्राहकांना कमी किंमतीत माल विकू शकतात. त्यामुळे ग्राहकांचाही फायदा होतो.

**७) साठेबाजीस पायबंद :**

ग्राहक सहकारी संस्थांचा आणखी एक फायदा म्हणजे या संस्थामुळे खाजगी व्यापाऱ्यांकडून मालाची जी साठेबाजी होते त्या साठेबाजीस पायबंद बसतो. व्यापारी सणासुदीला मालाची साठेबाजी करून ठेवतात. विविध वस्तूंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करतात आणि किंमत वाढवून प्रचंड नफा मिळवतात. याला सट्टेबाजी असे म्हणतात. त्यामुळे ग्राहकांचे मोठे आर्थिक नुकसान होते. परंतु गावात जर ग्राहक सहकारी संस्था असेल तर तेथील व्यापाऱ्यांना मालाची साठेबाजी व सट्टेबाजी करता येत नाही. तसे केले तर त्यांचेच नुकसान होईल. सर्व ग्राहक सहकारी ग्राहक संस्थांकडूनच माल खरेदी करतील. म्हणून खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारी जीवनावश्यक वस्तूंची कृत्रिम टंचाई, साठेबाजी, सट्टेबाजी रोखण्यासाठी गावागावात पुरेशा प्रमाणात सहकारी तत्त्वावरील ग्राहक संस्थांची व ग्राहक भांडारांची स्थापना होणे आवश्यक आहे.

**८) शेतकऱ्यांना फायदेशीर :**

ग्राहक सहकारी संस्था आणि लहान, मोठी सहकारी ग्राहक भांडारे केवळ उद्योगातील वस्तूच विक्रीसाठी ठेवत नाहीत. तर दूध, फळे, भाजीपाला, कडधान्ये, धान्य यांचीही विक्री करत असतात. हा कृषी माल ग्राहक सहकारी संस्था परिसरातील शेतकऱ्यांकडून खरेदी करत असतात. त्यामुळे शेतकऱ्यांचा शेतमाल खपून त्यांना योग्य मोबदला मिळतो. ग्राहक भांडारे फळे, फळभाज्या यांची विक्री करत असल्याने शेतकऱ्यांना या कृषी उत्पादनांचे उत्पादन वाढवण्यास प्रोत्साहन मिळते. त्यामुळे फळे, भाज्या यांचे उत्पादन वाढून शेतकऱ्यांचाही फायदा होतो आणि ग्राहकांचाही फायदा होतो.

**९) संपूर्ण समाजाला फायदेशीर :**

ग्राहक सहकारी संस्थांचा लाभ केवळ संस्थांच्या सभासदांनाच होतो असे नाही. तर जे या संस्थांचे सभासद नसतात त्यांनाही या संस्थांचे काही लाभ मिळत असतात. एखाद्या गावातील ५ ते १० टक्के लोक ग्राहक सहकारी संस्थांचे सदस्य असतात. ९० ते ९५ टक्के लोक सभासद नसतात. परंतु त्यांना सुद्धा ग्राहक सहकारी संस्था मालाची विक्री करत असतात. केवळ सभासदांनाच मालाची विक्री केली जात नाही. समाजातील सर्व लोकांना (सर्व ग्राहकांना) ग्राहक सहकारी संस्था मालाची विक्री करत असतात. त्यामुळे ग्राहक सहकारी संस्थांचा संपूर्ण समाजाला लाभ होत असतो. हा ग्राहक सहकारी संस्थांचा अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**१०) भाववाढीस आळा :**

ग्राहक सहकारी संस्था, सहकारी ग्राहक भांडारे भाववाढीस आळा घालण्यास अत्यंत उपयोगी ठरतात. हा ग्राहक सहकारी संस्थांचा एक अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे. देशात पुरेशा प्रमाणात ग्राहक सहकारी संस्था असतील तर खाजगी व्यापाऱ्यांना वस्तूंच्या किंमती वाढवता येत नाहीत. त्यामुळे भाववाढीची समस्या उद्भवत नाही. ज्या गावात एखादी सहकारी ग्राहक संस्था चांगल्या प्रकारे कार्य करत असते, त्या गावातील व्यापारी योग्य किंमतीलाच वस्तू विकतात. भरमसाठ किंमतीला वस्तू विकत नाहीत. त्यामुळे भाववाढ घडून येत नाही. तसेच ग्राहक सहकारी संस्था थेट उत्पादकांकडून माल खरेदी करत असल्याने त्यांना कमी किंमतीत माल मिळतो. त्यामुळे या संस्था भाववाढ न करता वाजवी किंमतीला माल विकू शकतात. हा सहकारी तत्त्वावरील ग्राहक संस्थांचा अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**११) ग्राहकांच्या आरोग्यात सुधारणा :**

ग्राहक सहकारी संस्था ग्राहकांना दर्जेदार निर्भेळ मालाची विक्री करतात. कारखान्यातील वस्तूप्रमाणे दूध, फळे, भाज्या, फळभाज्या यांचीही विक्री करतात. अशा प्रकारे ग्राहक सहकारी संस्था सर्व प्रकारचा माल दर्जेदार व भेसळ नसलेला पुरवत असल्याने ग्राहकांचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. ग्राहकांच्या आरोग्यात सुधारणा होते.

**१२) उत्पादकांना फायदेशीर :**

ग्राहक सहकारी संस्थांचा फायदा ग्राहकांबरोबर उत्पादकांनाही होतो. उत्पादकांना ग्राहक सहकारी संस्थांकडून योग्य मोबदला मिळतो. तसेच ग्राहक सहकारी संस्था उत्पादकांकडून मोठ्या प्रमाणात माल खरेदी करत असल्याने त्यांचा खप वाढून त्यांचा फायदा होतो. परराज्यातील काही व्यापाऱ्यांनी महाराष्ट्रातील शेतकरी व इतर उत्पादकांचा माल खरेदी करून त्यांचे पैसे बुडवले आहेत. महाराष्ट्रात दरवर्षी अशा घटना घडत असतात. त्यामुळे उत्पादकांचे मोठे नुकसान होते. परंतु ग्राहक सहकारी संस्था उत्पादकांचे मालाचे पैसे बुडवत नाहीत. त्यामुळे उत्पादकांचे नुकसान होत नाही. हा उत्पादकांना ग्राहक सहकारी संस्थापासून मिळणारा महत्त्वाचा फायदा आहे.

**१३) भारतासारख्या विकसनशील देशांना फायदेशीर :**

ग्राहक सहकारी चळवळ भारतासारख्या विकसनशील देशांना अत्यंत फायदेशीर आहे. भारत हा विकसनशील देश असून भारतात २५% लोक गरीब आहेत. ५०% लोक मध्यमवर्गीय आहेत. अशा प्रकारे भारतात आजही गरीब आणि मध्यमवर्गीयांची संख्या मोठी आहे. या लोकांना जीवनावश्यक वस्तू रास्त दरात आणि पुरेशा प्रमाणात मिळणे अत्यंत आवश्यक आहे. ग्राहक सहकारी संस्था सर्वच वस्तू वाजवी दरात आणि मागणीप्रमाणे पुरवत असल्याने भारतासारख्या ज्या देशात गरीब आणि मध्यमवर्गीयांची संख्या मोठी आहे अशा देशांना ग्राहक सहकारी चळवळ अत्यंत उपयुक्त आहे. देशातील मोठ्या संख्येने असलेल्या गरीब आणि मध्यमवर्गीयांच्या हितासाठी सहकारी ग्राहक संस्थांची संख्यात्मक आणि गुणात्मक वाढ होणे अत्यंत आवश्यक आहे.

**१४) औद्योगिक कामगारांना फायदेशीर :**

भारतात औद्योगिक कामगारांची संख्याही लक्षणीय आहे. भारतात मोठमोठ्या शहरात लहान मोठे कारखाने स्थापन झाले असून या कारखान्यात कामगार काम करत आहेत. अशा कामगारांना जीवनावश्यक वस्तू पुरेशा प्रमाणात आणि योग्य किंमतीत मिळाव्यात यासाठी ज्या औद्योगिक शहरांची लोकसंख्या ५०,००० पेक्षा जास्त आहे, अशा शहरात ग्राहक भांडारांची स्थापना करण्यासाठी सरकारकडून सर्व प्रकारची मदत मिळते. त्याचा फायदा औद्योगिक कामगारांना होत आहे. औद्योगिक कामगारांची आर्थिक परिस्थिती चांगली नसते. त्यामुळे त्यांच्यासाठी ग्राहक भांडारे स्थापन होणे आवश्यक असते.

**१५) ग्राहकांची वेळेची बचत :**

ग्राहकांना लागणाऱ्या जवळजवळ सर्व वस्तू ग्राहक सहकारी संस्था किंवा सहकारी ग्राहक भांडारे विक्रीसाठी ठेवत असतात. कृषी माल, दूध, कारखानदारी वस्तू ग्राहक भांडारात मिळत असतात. बऱ्याच वस्तू ग्राहकांना एकाच ठिकाणी ग्राहक भांडारात मिळत असल्याने ग्राहकांची वेळेची बचत होते. त्यांना वस्तू खरेदीसाठी एका दुकानातून दुसऱ्या दुकानात एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी फिरावे लागत नाही. त्यामुळे ग्राहकांची वेळेची बचत होते.

**१६) खरेदीचा आनंद, समाधानात वाढ:**

ग्राहक सहकारी संस्थांचा आणखी एक फायदा म्हणजे ग्राहक सहकारी संस्थामुळे ग्राहकांना खरेदीचा चांगला आनंद मिळतो. खाजगी दुकानात असा खरेदीचा आनंद अजिबात मिळत नाही. सहकारी ग्राहक भांडारात मालाची मांडणी आकर्षक पद्धतीने केलेली असते. स्टेशनरी वस्तूंचा विभाग स्वतंत्र असतो. भांडी विभाग स्वतंत्र असतो. त्याचप्रमाणे धान्य विभाग, खाद्यतेल विभाग, साबण विभाग, ड्रायफ्रूटस, दूध व दूधाचे पदार्थ, फळे असे वेगवेगळे विभाग असतात. या विभागात विविध कंपन्यांचा माल विक्रीसाठी उपलब्ध असतो. ज्या कंपन्यांचा माल ग्राहकांना आवश्यक असतो त्या कंपन्यांचा माल ग्राहक खरेदी करू शकतात. धान्य, कडधान्ये असा सर्व माल निवडून ठेवलेला असतो. माल स्वच्छ व शुद्ध असतो. त्यामुळे ग्राहकांना खरेदीचा आनंद मिळतो.

**१७) ग्राहकांच्या बचतीत वाढ :**

सहकारी ग्राहक संस्थांचा आणि ग्राहक भांडारांचा आणखी एक फायदा म्हणजे या संस्था खरेदीवर ग्राहकांना भरघोस सूट देतात. सहकारी ग्राहक भांडारातून ग्राहकाने १०,००० रुपयाचा माल खरेदी केला तर भांडारे ग्राहकांना ५०० ते १००० रुपये कमी आकारतात. ग्राहकांनी १०,००० रुपयांचा माल खाजगी दुकानातून घेतला तर त्याला अशी भरघोस मोठी सूट मिळत नाही. दर महिन्याला सहकारी ग्राहक भांडारातून १०,००० रुपयांचा माल खरेदी करणाऱ्यांना दर महिन्याला ५०० ते १००० रुपये फायदा होतो. या पैशाची ते बचत करू शकतात. त्यामुळे ग्राहक भांडारामुळे ग्राहकांच्या बचत क्षमतेत वाढ होण्यास मदत होते.

**१८) लाभांशाचा लाभ :**

ग्राहक सहकारी संस्थांचा सभासदांना होणारा आणखी एक फायदा म्हणजे सभासदांना ग्राहक सहकारी संस्थांकडून नफ्यातील काही हिस्सा लाभांशाच्या स्वरूपात मिळतो. ग्राहक संस्थेला जो एकून नफा मिळतो त्यातील काही हिस्सा संस्था ग्राहकांना लाभांश म्हणून वाटतात. त्यामुळे ग्राहकांचा फायदा होतो. जे ग्राहक जास्तीत जास्त माल खरेदी करतात त्यांना जास्त लाभांश मिळतो. त्यामुळे जास्त लाभांश मिळवण्यासाठी सभासद आपल्या ग्राहक संस्थेकडूनच मालाची खरेदी करतात. त्यामुळे ग्राहक संस्थेची विक्री वाढून त्यांच्या नफ्यातही वाढ होते. अशा प्रकारे सहकारी ग्राहक संस्था त्यांना झालेल्या नफ्याची (वाढाव्याची) वाटणी सभासदांमध्ये त्यांनी केलेल्या खरेदी व्यवहारांच्या प्रमाणात करत असल्याने सभासदांच्या उत्पन्नात वाढ होते आणि संस्थेचीही विक्री वाढते.

**१९) ग्रामीण भागातील जनतेसाठी उपयुक्त :**

ग्राहक सहकारी संस्था ग्रामीण भागातील जनतेसाठी सुद्धा अत्यंत उपयुक्त आहेत. भारत सरकारने, राज्य सरकारांना ग्रामीण भागातील लोकांना रास्त दराने वस्तू मिळाव्यात यासाठी ग्रामीण भागातही ग्राहक सहकारी भांडारे स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले आहे.

**२०) सरकारला उपयुक्त :**

सरकार जीवनावश्यक वस्तू ग्राहक सहकारी संस्थामार्फत विकते. ज्यावेळी देशात पुरेशा प्रमाणात ग्राहक सहकारी संस्था नव्हत्या त्यावेळी म्हणजे युद्धाच्या काळात सरकारने जीवनावश्यक वस्तूंचे वाटप प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थमार्फत केले होते. त्यामुळे सरकारच्या आणि जनतेच्या दृष्टीने ग्राहक सहकारी संस्था अत्यंत उपयुक्त आहेत.

**२१) आपत्तीच्या काळात फायदेशीर :**

युद्ध, दुष्काळ, मंदी अशा आपत्तीच्या काळात ग्राहकांच्या सहकारी संस्था संपूर्ण समाजाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असतात. युद्ध व दुष्काळाच्या काळात खाजगी व्यापारी मालाची अधिक किंमतीला विक्री करत

असतात. तसेच पुरेसा माल विक्रीसाठी बाजारात आणत नाहीत. परंतु ग्राहक सहकारी संस्था मात्र असे दुर्वतन करत नाहीत. आपत्तीच्या काळात सहकारी ग्राहक भांडारे मालाची किंमत वाढवत नाहीत. जनतेला अधिक चांगली सेवा देतात. हा ग्राहक सहकारी संस्थांचा अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**२२) विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त :**

सहकारी ग्राहक भांडारे विद्यार्थी वर्गाच्या दृष्टीनेसुद्धा अत्यंत उपयुक्त आहेत. अनेक विद्यापीठात सहकारी तत्त्वावर विद्यार्थी ग्राहक भांडारे स्थापन झाली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना लागणारे बरेचसे शैक्षणिक साहित्य व इतर जीवनावश्यक वस्तू विकत घेण्यासाठी विद्यापीठाचा परिसर सोडून बाहेर जावे लागत नाही. त्यांना विद्यापीठाच्या परिसरातच ग्राहक भांडारांकडूनच सुविधा रास्त दरात मिळतात. त्यामुळे त्यांची वेळेचीही बचत होते आणि पैशाचीही बचत होते.

**२३) प्रक्रिया सुविधेत वाढ :**

काही ग्राहक सहकारी संस्था केवळ मालाची विक्री करत नाहीत तर माल खरेदी करून त्या मालावर प्रक्रिया करण्याचे सुद्धा काम करतात. त्यामुळे प्रक्रिया सुविधेत किंवा प्रक्रिया उद्योगात वाढ होते. काही ग्राहक संस्था बाहेरून कच्च्या मालावर प्रक्रिया करून आणतात. त्यामुळे खाजगी आणि सहकारी प्रक्रिया संस्थांचा फायदा होतो.

**२४) ग्राहक संस्थांच्या फायद्यात वाढ :**

ग्राहक सहकारी संस्था थेट उत्पादकांकडून मालाची खरेदी करतात. त्यामुळे त्यांना कमी किंमतीत माल मिळतो. तसेच या संस्था मोठ्या प्रमाणात (घाऊक प्रमाणात) मालाची खरेदी करत असल्याने त्यांना कमी किंमतीत माल मिळतो. त्यामुळे या संस्थांच्या नफ्यात वाढ होते.

**२५) गुदाम सुविधेत वाढ :**

दुष्काळ व इतर नैसर्गिक आपत्तीच्या काळात कृषी उत्पादनात मोठी घट होते. त्यामुळे दुष्काळाशी सामना करण्यासाठी पुरेशा प्रमाणात गुदामे बांधावी लागतात. ग्राहक सहकारी संस्था माल साठवण्यासाठी गुदामे बांधतात. त्यामुळे गुदाम सुविधेत वाढ होते. ग्राहक सहकारी संस्थांमुळे गुदाम सुविधेत वाढ होत असल्याने नैसर्गिक आपत्तीच्या काळात त्याचा चांगला उपयोग होतो.

**२६) सांस्कृतिक विकास :**

काही ग्राहक सहकारी संस्था महिला सभासद, महिला ग्राहक यांच्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करत असतात. हळदी-कुंकू कार्यक्रम, व्याख्यान, कीर्तन, प्रवचन असे कार्यक्रम आयोजित करत असतात. संक्रांतीसारख्या सणाला महिला ग्राहकांना आकर्षक भेट वस्तू देत असतात. त्यामुळे महिलांना घराबाहेर पडण्याची, व्यक्तिमत्त्व विकासाची संधी मिळते.

**२७) आर्थिक विकासाला चालना :**

ग्राहक सहकारी संस्था किंवा लहान मोठी सहकारी ग्राहक भांडारे देशात पुरेशा प्रमाणात असतील तर व्यापारात किंवा उलाढालीत चांगली वाढ होते. त्याचा फायदा देशाच्या आर्थिक विकासाला होतो. देशाच्या आर्थिक विकासाची गती वाढते.

**सारांश :** अशा प्रकारे सहकारी ग्राहक चळवळीचे (ग्राहक सहकारी संस्थांचे / लहान व मोठ्या सहकारी ग्राहक भांडारांचे) काही फायदे वरीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत. सहकारी ग्राहक चळवळीमुळे ग्राहकांचा, सभासदांचा, सरकारचा, उत्पादकांचा फायदा होतो. या विविध घटकांना सहकारी ग्राहक संस्थांपासून विविध फायदे मिळतात. भारतासारख्या लोकशाही देशात तर ग्राहक सहकारी संस्थांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण ग्राहक सहकारी संस्थांचा कारभार लोकशाही तत्त्वानुसार चालत असतो. त्यामुळे सभासदांना लोकशाहीचे शिक्षण व प्रशिक्षण मिळण्यास मदत होते.

**भारतातील ग्राहक सहकारी संस्थांची रचना :**

भारतात सुमारे २९ घटक राज्ये आहेत. या सर्व राज्यात सहकारी ग्राहक संस्थांची रचना एकसारखी नाही. वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळी रचना आढळते. भारतात साधारणपणे ग्राहक सहकारी संस्थेची रचना खालीलप्रमाणे आढळते.

सहकारी ग्राहक संस्थांची रचना

१) प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था

२) घाऊक सहकारी ग्राहक संस्था

३) राज्य सहकारी ग्राहक संघ

४) राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघ

सहकारी ग्राहक संस्थांच्या वरील प्रकारांचे थोडक्यात स्पष्टीकरण खालीलप्रमाणे दिले आहे.

**१) प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था :**

प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थेचे कार्यक्षेत्र लहान असते. ते एखाद्या गावापुरते मर्यादित असते. म्हणून गावपातळीवर वस्तूची विक्री सहकारी तत्त्वावर करणाऱ्या ग्राहक भांडारांना प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था असे म्हणतात. सहकारी कायद्यानुसार एखाद्या गावातील वेगवेगळ्या कुटुंबातील ११ व्यक्ती एकत्र येऊन प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था स्थापन करू शकतात. परंतु ११ व्यक्तींनी संस्था स्थापन करावयाची ठरवले तर संस्था अर्थक्षम बनत नाही. पुरेसे भांडवल उभे करता येत नाही. म्हणून सरकारने प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांची स्थापना करण्यासाठी वेगवेगळ्या कुटुंबातील ४०० व्यक्ती सभासद असल्या पाहिजेत आणि त्यांनी प्रत्येकी ४००० रुपये भांडवल संस्थेला दिले पाहिजे अशी अट घातली आहे. प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थांचा

कारभार लोकशाही तत्त्वानुसार आणि सहकारी संस्थांच्या विविध तत्त्वानुसार चालतो हे प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थेचे ठळक वैशिष्ट्य आहे. भारतात वेगवेगळ्या व्यवसायातील लोकांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर ग्राहक भांडारे स्थापन केली आहेत. उदाहरणार्थ रेल्वेचे कर्मचारी, वैद्यकीय क्षेत्रातील कर्मचारी व अधिकारी, औद्योगिक कामगार, विद्यार्थी इत्यादी घटकांनी सहकारी ग्राहक संस्थांची स्थापना केली असून त्यांचा समावेश प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थामध्ये होतो. प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांचा कारभार लोकशाही तत्त्वानुसार चालतो. निर्णय प्रक्रियेत किंवा धोरण ठरविण्याच्या बाबतीत सर्वसाधारण सभेला महत्त्व असते. भारतात पहिली सहकारी ग्राहक संस्था चेन्नईजवळील ट्रिपलीकेन येथे स्थापन झाली असे म्हटले जाते. या ग्राहक संस्थेचे नाव Triplicane Urban Co-operative Society (TUCS) असे होते. या संस्थेची स्थापना २० सप्टेंबर १९०५ रोजी झाली होती. भारतात सन १९१२ साली दुसरा सहकारी कायदा संमत झाला. या कायद्यामुळे सहकारी तत्त्वावरील ग्राहक भांडारांच्या स्थापनेला वेग आला.

**प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थांची कार्ये :**

प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था प्रामुख्याने पुढील कार्ये करतात.

१) जनतेला (सभासदांना आणि बिगर सभासदांना) रास्त दराने जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे. तसेच स्टेशनरी वस्तूंचीही विक्री करणे.

२) प्रक्रिया संस्था (भात गिरण्या, तेल गिरण्या) स्थापन करण्यास मदत करणे.

३) ग्राहकांना चांगल्या दर्जाचा, भेसळ नसलेला माल पुरवणे.

४) कारखान्यातील वस्तूबरोबर गहू, तांदूळ, ज्वारी, बाजरी, कडधान्ये, खाद्यतेल, साबण इत्यादी वस्तूंची जनतेला विक्री करणे.

५) घाऊक सहकारी ग्राहक संस्था, राज्य सहकारी ग्राहक संघ, राष्ट्रीय ग्राहक सहकारी संघ यांच्याकडून वस्तू विकत घेऊन त्या वस्तू ग्राहकांना विकणे.

**प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांची संख्यात्मक प्रगती :**

खालील तक्ता क्र. १ मध्ये भारतातील प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांची विविध वर्षातील संख्यात्मक माहिती दिली आहे.

**तक्ता क्र. १**


**भारतातील प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांची सांख्यिकीय माहिती**

| अ.क्र. | वर्ष | प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांची संख्या | शाखांची संख्या |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| १ | १९६१-६२ | ७२६६ | ६७८ |
| २ | १९७९-८० | १५००० | २६५७ |
| ३ | १९९०-९१ | २४१९० | - |
| ४ | १९९५-९६ | २५७५० | ९५०९ |
| ५ | १९९८-९९ | २७१२६ | १०४४४ |
| ६ | २०००-२००१ | २३९७५ | १०७६० |
| ७ | २००१-२००२ | २६४२६ | १०३०५ |
| ८ | २०२३ | २१०६७ | - |
| ९ | २०२४ | २२७९१ | - |

**आलेख क्र. १**

**भारतातील प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांची संख्या**



**महाराष्ट्रातील प्राथमिक सहकारी भांडारांची, घाऊक सहकारी भांडारांची माहिती (३१/३/२०२४)**

खालील तक्ता क्र. २ मध्ये प्राथमिक सहकारी भांडारांची संख्या, सभासद संख्या इत्यादी बाबींची माहिती दिली आहे. ही माहिती दिनांक ३१/३/२०२४ रोजीची आहे.

**तक्ता क्रमांक २**

**महाराष्ट्रातील प्राथमिक सहकारी भांडारांची माहिती (३१/३/२०२४)**

| प्राथमिक सहकारी भांडारांची संख्या | | सभासद संख्या (००) | | नफ्यातील भांडारे | | तोट्यातील भांडारे | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०२३ | २०२४ | २०२३ | २०२४ | २०२३ | २०२४ | २०२३ | २०२४ |
| १५०० | १८३१ | १३१३३ | १७०४४ | ८०० | ७६२ | ७०० | ७८५ |

स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२४-२५, पृ. क्र. १५७.

**तक्ता क्रमांक ३**


**महाराष्ट्रातील घाऊक सहकारी भांडारांची माहिती**

| घाऊक सहकारी भांडारांची संख्या | | सभासद संख्या (००) | | नफ्यातील भांडारे | | तोट्यातील भांडारे | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २०२३ | २०२४ | २०२३ | २०२४ | २०२३ | २०२४ | २०२३ | २०२४ |
| १२६ | १२५ | ३७६९ | ३९१६ | ७४ | ७२ | ५२ | ५२ |

स्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२४-२५, पृ. क्र. १५७.


**आलेख क्र. २**

**प्राथमिक सहकारी भांडारांची संख्या**





आलेख क्र. ३

महाराष्ट्रातील प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची सभासद संख्या (०००)



**आलेख क्र. ४**

**महाराष्ट्रातील नफ्यातील व तोट्यातील प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारे**




**२) घाऊक सहकारी ग्राहक संस्था :**

घाऊक सहकारी ग्राहक संस्थांना मध्यवर्ती घाऊक भांडारे (Central Wholesale Stores) असेही म्हणतात. सन १९६२ साली भारत-चीन युद्ध झाले. त्यावेळी सरकारला घाऊक सहकारी ग्राहक संस्थांच्या स्थापनेची गरज वाटली. युद्धाच्या काळात जीवनावश्यक वस्तूंचे वितरण योग्य प्रकारे व्हावे यासाठी भारत सरकारने घाऊक सहकारी ग्राहक संस्थांच्या स्थापनेवर भर दिला. ज्या शहरांची लोकसंख्या ५०,००० पेक्षा अधिक आहे, अशा शहरात घाऊक सहकारी ग्राहक संस्था स्थापन करण्याची भूमिका सरकारने घेतली. त्यानुसार देशात या संस्था स्थापन होण्यास सुरवात झाली. भारतात घाऊक सहकारी ग्राहक भांडारे जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या ठिकाणी आढळतात. घाऊक सहकारी ग्राहक संस्थांचे सभासदत्व जिल्ह्यातील प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थांना आणि इतर सहकारी संस्थांना तसेच व्यक्तींनाही मिळते. घाऊक सहकारी ग्राहक भांडारे शेअर्सची विक्री करून भांडवल उभारणी करतात. तसेच ही भांडारे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडूनही कर्ज मिळवतात. संचालक मंडळाकडून घाऊक सहकारी ग्राहक संस्थांचे व्यवस्थापन पाहिले जाते. संचालक मंडळावर प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांना स्थान दिले जाते.

**घाऊक सहकारी ग्राहक संस्थांची कार्ये :**

घाऊक सहकारी ग्राहक संस्था प्रामुख्याने पुढील कार्ये करतात.

१) घाऊक प्रमाणावर / मोठ्या प्रमाणावर मालाची खरेदी करणे.

२) जिल्ह्यातील प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांना त्यांच्या मागणीप्रमाणे विविध वस्तूंचा पुरवठा करणे.

३) उत्पादकांकडून माल खरेदी करून त्याची साठवणूक करून ठेवणे.

४) जिल्ह्यातील प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या कार्यात एकसूत्रीपणा निर्माण करणे, त्यांच्यासाठी परिसंवाद, प्रदर्शने, व्याख्याने आयोजित करणे.

५) जिल्ह्यात आपल्या शाखा उघडणे.

६) मालावर प्रक्रिया करणे, प्रक्रिया कारखाने स्थापन करणे.

७) कृषी विभाग, धान्य विभाग, औषध विभाग असे वेगवेगळे विभाग स्थापन करणे.

**घाऊक सहकारी ग्राहक संस्थांची संख्यात्मक माहिती :**

खालील तक्ता क्रमांक ४ मध्ये घाऊक सहकारी ग्राहक संस्थांची संख्यात्मक माहिती दर्शविली आहे.


**तक्ता क्रमांक ४**

**घाऊक सहकारी ग्राहक संस्थांची संख्यात्मक माहिती**

| अ.क्र. | वर्ष | घाऊक सहकारी ग्राहक संस्थांची संख्या |
|---|---|---|
| १ | १९६१ | २५२ |
| २ | १९७१ | ४२४ |
| ३ | १९८१ | ४८७ |
| ४ | २००४ | ४९० |
| ५ | २०२३ | ५१२ |

**आलेख क्रमांक ५**

**भारतातील घाऊक सहकारी भांडारांची संख्या**




**३) राज्य ग्राहक सहकारी संघ (State Co-operative Consumers Federation) :**

राज्य ग्राहक सहकारी संघाचे कार्यक्षेत्र राज्य (State) हे आहे. भारतात राज्य ग्राहक सहकारी संघांची स्थापना सन १९६५-६६ मध्ये करण्यात आली आहे. राज्यातील सर्व ग्राहक सहकारी संस्था राज्य ग्राहक सहकारी संघाचे सभासद आहेत.

**राज्य ग्राहक सहकारी संघाची कार्ये :**

राज्य ग्राहक सहकारी संघ पुढील कार्ये करतो.

१) राज्यातील ग्राहक सहकारी संस्थांना वस्तूंचा पुरवठा करणे.

२) ग्राहक सहकारी संस्थांना वस्तूंचा पुरवठा करणे शक्य व्हावे यासाठी घाऊक प्रमाणावर उत्पादकांकडून, राष्ट्रीय ग्राहक सहकारी संघाकडून विविध वस्तूंची खरेदी करणे.

३) राज्यातील घाऊक ग्राहक सहकारी संस्थांच्या कार्यात एकसूत्रीपणा निर्माण करणे.

४) राज्यातील सहकारी ग्राहक संस्थांना मार्गदर्शन करणे, व्यवस्थापनाचा दर्जा सुधारण्यासाठी मदत करणे.

५) राज्यातील ग्राहक सहकारी संस्थांची वाढ करणे.

६) मालाचा सुरक्षित साठा करून ठेवणे.

७) राज्यातील ग्राहक सहकारी संस्थांकडून मालाची मागणी मागवणे आणि त्यांना मागणीप्रमाणे मालाचा पुरवठा करणे.

८) मालावर प्रक्रिया करणारे उद्योग स्थापन करणे.

९) राज्यातील घाऊक ग्राहक संस्थांच्या कार्यावर देखरेख ठेवणे.

१०) राज्यात ग्राहक सहकार चळवळ वाढावी यासाठी प्रयत्न करणे.

११) राज्यातील ग्राहक सहकारी संस्थांच्या प्रगतीसाठी व्याख्याने, सेमिनार इत्यादींचे आयोजन करणे.

१२) ग्राहक सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यांच्या विकासासाठी काम करणे. कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढावी यासाठी त्यांना शिक्षण, प्रशिक्षण देणे.

१३) सरकारने जप्त केलेल्या मालाची किंवा स्मगलिंगच्या मालाची विक्री करणे.

१४) मालाची प्रतवारी करणे, वर्गीकरण करणे, पॅकिंग करणे.

**भारतातील राज्य ग्राहक सहकारी संघाची संख्या :**

खालील तक्ता क्रमांक ५ मध्ये भारतातील राज्य ग्राहक सहकारी संघांची संस्था दर्शविली आहे.


**तक्ता क्रमांक ५**

**भारतातील राज्य ग्राहक सहकारी संघांची संख्या**

| अ.क्र. | वर्ष | राज्य ग्राहक सहकारी संघांची संख्या |
|---|---|---|
| १ | १९७८ | १७ |
| २ | १९८१ | २० |
| ३ | २००१ | २८ |
| ४ | २०२३ | ३० |

**आलेख क्रमांक ६**

**भारतातील राज्य ग्राहक सहकारी संघांची संख्या**




**४) राष्ट्रीय ग्राहक सहकारी संघ (National Co-operative Consumers Federation) :**

राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघाचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारत असून या संघाची स्थापना सन १९६५ मध्ये करण्यात आली आहे. देशातील सर्व राज्य ग्राहक सहकारी संघ हे राष्ट्रीय ग्राहक सहकारी संघाचे सभासद आहेत.

**राष्ट्रीय ग्राहक सहकारी संघाची कार्ये :**

राष्ट्रीय ग्राहक सहकारी संघ पुढील कार्ये करतो.

१) देशातील ग्राहक सहकारी संस्थांना त्यांच्या मागणीप्रमाणे विविध वस्तूंचा पुरवठा करणे.

२) वाहतूक, बँकिंग इत्यादी सेवांची राज्यातील ग्राहक संस्थांना उपलब्धता करून देणे.

३) देशातील ग्राहक सहकारी संस्थांना मार्गदर्शन करणे, त्यांच्या अडचणी सोडविणे.

४) देशात ग्राहक सहकारी चळवळीचा विकास करणे. ग्राहक सहकारी संस्थांचे महत्त्व लोकांच्या मनावर ठसवणे.

५) विविध जीवनावश्यक वस्तूंचे उत्पादन करणे, वस्तूवर प्रक्रिया करणे.

६) उपभोग्य वस्तू खरेदी करून त्याची परदेशात आयात करणे, तसेच परदेशात निर्यात करणे.

७) देशातील ग्राहक सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यांना व्यवस्थापकीय व इतर प्रशिक्षण देणे.

८) सरकारने जप्त केलेल्या वस्तूंची विक्री प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थामार्फत करणे.

**५) विभागीय भांडार (सुपर बाजार) :**

भारतात विभागीय भांडारे किंवा सुपर मार्केटस् आढळून येतात. ही भांडारे सहकारी तत्त्वावर काम करतात. भारतात पहिल्या विभागीय भांडाराची स्थापना दिल्ली येथे १९६६ मध्ये झाली. भारतात मोठ्या शहरात अशी सुपर मार्केटस् (विभागीय भांडारे) दिसून येतात. विभागीय भांडारात विविध वस्तूंचे स्वतंत्र विभाग असतात. उदाहरणार्थ धान्य विभाग, स्टेशनरी विभाग, औषध विभाग इत्यादी. म्हणून या भांडारांना विभागीय भांडार असे म्हणतात. ही भांडारे ग्राहकांना वस्तूंच्या विक्रीबरोबर इतरही महत्त्वाच्या सेवा पुरवतात. उदाहरणार्थ, दुरुस्ती सेवा इत्यादी. ग्राहकांना रास्त दरात वस्तू व सेवा पुरवण्याचे काम विभागीय भांडारे करतात.

**भारतातील सहकारी ग्राहक संस्थांचे दोष / समस्या / अडचणी / प्रश्न :**

भारतातील सहकारी ग्राहक संस्थांच्या कार्यपद्धतीत किंवा व्यवस्थापनात काही दोष आहेत. तसेच या संस्थांना काही अडचणींना किंवा समस्यांनाही तोंड द्यावे लागते. त्याची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे दिली आहे.

**१) अफरातफर / भ्रष्टाचार :**

काही ग्राहक सहकारी संस्थांमध्ये रकमेचा अपहार झाल्याच्या घटना उघडकीस आल्या आहेत. कर्मचारी किंवा अधिकाऱ्यांकडून भ्रष्टाचार होत असल्याने ग्राहक सहकारी संस्थांची प्रगती अपेक्षित वेगाने होत नाही.

**२) वेळच्या वेळी हिशेब लिहिले न जाणे :**

विविध कारणामुळे कित्येक प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था हिशेब वेळच्या वेळी लिहित नाहीत. हिशेब मध्यवर्ती घाऊक भांडारांना वेळच्यावेळी सादर केले जात नाहीत. त्यामुळे संस्थांच्या प्रगतीचा अंदाज येत नाही.

**३) मोजक्या वस्तूंची विक्री :**

भारतातील कित्येक ग्राहक सहकारी संस्था मोजक्या (निवडक) वस्तूंचीच विक्री करतात. ग्राहकांना आवश्यक असणाऱ्या किंवा जास्तीत जास्त वस्तूंची विक्री करत नाहीत. त्यामुळे ग्राहकांना खाजगी दुकानातून माल खरेदी करावा लागतो.

**४) घाऊक भांडारांचे अपुरे प्रमाण :**

गावपातळीवर काम करणाऱ्या प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांच्या कामकाजावर लक्ष ठेवण्याची, त्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी मध्यवर्ती घाऊक भांडारावर सोपवली आहे. ही घाऊक सहकारी भांडारे तालुका किंवा जिल्हा पातळीवर कार्यरत असतात. परंतु तुलनेने घाऊक भांडारांची संख्या कमी आहे. त्यामुळे त्यांचा प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांना फारसा लाभ होत नाही.

**५) भांडवलाची समस्या :**

भारतातील अनेक प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थांना भांडवलाची समस्या भेडसावते. सभासद संख्या

अपुरी असल्याने, सरकारची भागिदारी कमी असल्याने, ठेव संकलन पुरेसे होत नसल्याने, पुरेशा प्रमाणात कर्ज मिळत नसल्याने प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांना भांडवलाची समस्या भेडसावते. त्यामुळे खरेदी-विक्रीचे व्यवहार या संस्थांना मोठ्या प्रमाणात करता येत नाहीत. त्यामुळे संस्थांची प्रगती वेगाने होत नाही.

**६) अप्रशिक्षित कर्मचारी :**

भारतातील अनेक प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थांना पुरेशा प्रमाणात प्रशिक्षित, कुशल कर्मचारी मिळत नाहीत. अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांकडून काम करून घ्यावे लागते. त्यामुळे ग्राहक संस्थांच्या प्रगतीवर मर्यादा पडतात.

**७) ग्रामीण भागात अपुरा प्रसार :**

सहकारी ग्राहक चळवळीचा ग्रामीण भागात अद्याप फारसा प्रवेश झालेला नाही असे दिसते. लहान, मोठ्या ग्राहक सहकारी संस्था आणि सहकारी ग्राहक भांडारे मोठ्या शहरातच मोठ्या प्रमाणात दिसून येतात. ग्रामीण भागात सहकारी ग्राहक भांडारे फार कमी आहेत.

**८) खाजगी व्यापाऱ्यांशी स्पर्धा :**

भारतातील प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थांना खाजगी व्यापाऱ्यांशी स्पर्धा करावी लागते. गावातील खाजगी व्यापाऱ्यांचे ग्रामस्थांशी चांगले, सौहार्दाचे संबंध असतात. हे व्यापारी उधारीवर मालाची विक्री करतात. त्यामुळे ग्राहक व्यापाऱ्यांकडून माल खरेदी करतात. सहकारी ग्राहक संस्था रोखीने माल विकतात. उधारीने माल विकत नाहीत. त्यामुळे लोक सहकारी ग्राहक संस्थाऐवजी खाजगी व्यापाऱ्यांकडून माल विकत घेणे पसंत करतात. त्यामुळे ग्राहक सहकारी संस्थांचा खप किंवा विक्री मोठ्या प्रमाणात होत नाही.

**९) सदस्यांची उदासिनता :**

सहकारी ग्राहक संस्थांचे बहुतेक सभासद बराचसा माल खाजगी दुकानातून खरेदी करतात. खाजगी व्यापारी उधारीने माल देतात. त्यामुळे सभासदही त्यांच्याकडूनच माल विकत घेतात. त्यामुळे ग्राहक सहकारी संस्थेची प्रगती होत नाही. सभासदांनी आपल्याच सहकारी ग्राहक संस्थांकडे पाठ फिरवणे हे संस्थांचा हिताचे नसते.

**१०) खाजगी व्यापाऱ्यांपेक्षा अधिक खर्च :**

नोकरांचा पगार, खरेदी-विक्रीवरील खर्च, जागा भाडे यावरील खर्च हा अत्यंत महत्त्वाचा असतो. हा खर्च कमीतकमी असेल तरच नफा चांगला मिळतो. परंतु बऱ्याच सहकारी ग्राहक संस्थांचा हा खर्च खाजगी व्यापाऱ्यांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे या संस्थांना नफा कमी मिळतो.

**११) लहान आकाराच्या संस्था :**

भारतातील बहुतेक सर्व सहकारी ग्राहक संस्थांचा आकार लहान आहे. त्यास विविध कारणे जबाबदार आहेत. त्यामध्ये सभासद संख्या कमी असणे हा एक प्रमुख घटक आहे. सहकारी ग्राहक संस्थांचा आकार लहान असल्याने या संस्थांची उलाढाल किंवा खरेदी-विक्री सुद्धा कमी आहे.

**१२) कर्मचाऱ्यांची समस्या :**

सहकारी ग्राहक संस्थेतील कर्मचाऱ्यांना समाधानकारक पगार दिला जात नाही. विविध कारणामुळे पगार खूपच कमी दिला जातो. त्यामुळे कर्मचारी फार काळ काम करत नाहीत. दुसरीकडे अधिक पगार मिळत असेल तर कर्मचारी काम सोडून निघून जातात.

**१३) घाऊक सहकारी भांडारांच्या समस्या :**

सहकारी घाऊक भांडारांनाही काही समस्यांना तोंड द्यावे लागते. ही सहकारी घाऊक भांडारे प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थांना विविध वस्तू विकतात. परंतु प्राथमिक ग्राहक संस्था वेळच्या वेळी रक्कम आदा करत नाहीत. त्यामुळे सहकारी घाऊक भांडारांना थकबाकीच्या समस्येला तोंड द्यावे लागते.

**१४) तोट्यातील ग्राहक संस्थांचे प्रमाण लक्षणीय :**

भारतातील प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थांना भेडसावणारी आणखी एक महत्वाची समस्या म्हणजे तोट्याची समस्या होय. देशातील एकूण प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थापैकी ४० टक्के पेक्षा अधिक संस्था या तोट्यात आहेत. त्यामुळे त्यांची प्रगती खुंटली आहे.

**१५) पुरेशा जागेची समस्या :**

मोठ्या शहरात सहकारी ग्राहक भांडारे स्थापन करण्यात येणारी प्रमुख अडचण म्हणजे जागेची अडचण. ग्राहक भांडार उघडण्यासाठी पुरेशी मोकळी जागा मिळत नाही किंवा चांगली, भव्य, मोठी तयार इमारत मिळत नाही. तसेच जागा व इमारती यांच्या किंमती व भाडी खूप जास्त आहेत. त्यामुळे शहरात सुद्धा पुरेशा प्रमाणात सहकारी ग्राहक भांडारे उघडता येत नाहीत.

**१६) चांगल्या, प्रभावी राजकीय, सामाजिक नेतृत्त्वाचा अभाव :**

भारतात सहकारी साखर कारखानदारीला जसे चांगले, प्रभावी, निष्ठावान नेतृत्त्व लाभले आहे तसे ग्राहक सहकारी चळवळीला लाभलेले नाही. त्यामुळे ग्राहक सहकारी संस्थांची प्रगती मंद गतीने होत आहे. फार थोड्या ग्राहक सहकारी संस्थांना चांगले नेतृत्त्व लाभलेले आहे.

**१७) उत्पादनाकडे दुर्लक्ष :**

भारतातील कित्येक ग्राहक सहकारी संस्था केवळ वस्तूंची विक्री करतात. उत्पादन करत नाहीत. त्यांच्या स्वतःच्या उत्पादन संस्था किंवा कारखाने नाहीत. त्यामुळे त्यांना नफा खूप कमी मिळतो.

**सारांश :** अशा प्रकारे भारतातील ग्राहक सहकारी संस्थांना वरीलप्रमाणे काही अडचणींना किंवा समस्यांना तोंड द्यावे लागते. या अडचणीमुळे आणि त्यांच्या कामकाज पद्धतीत काही दोष असल्यामुळे सहकारी ग्राहक संस्थांची प्रगती होत नाही.

**सहकारी ग्राहक संस्थांच्या प्रगतीसाठी उपाय :**

सहकारी ग्राहक चळवळ ही सामान्य, मध्यवमर्गीय तसेच श्रीमंत लोकांसाठी अत्यंत उपयुक्त आहे.

खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारी साठेबाजी, काळाबाजार, भाववाढ, भेसळ रोखण्यासाठी सहकारी ग्राहक संस्था किंवा सहकारी ग्राहक भांडारे खूप चांगली भूमिका बजावतात. म्हणून सहकारी ग्राहक संस्थांची संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**१) सभासद संस्थेत पुरेशी वाढ करणे आवश्यक :**

बहुतेक सहकारी ग्राहक संस्थांची सभासद संख्या खूपच कमी आहे. सभासद संख्या पुरेशी नसल्याने या संस्थांना मोठ्या प्रमाणात व्यवहार करता येत नाहीत. म्हणून सहकारी ग्राहक संस्थांची सभासद संख्या किमान २००० असावी. २००० ते ५०००, १०००० एवढी सभासद संख्या असावी. त्यामुळे या संस्थांना भांडवलाची समस्या भेडसावणार नाही. तसेच सभासद संख्या मोठी असल्याने वस्तूंचा खपही वाढण्यास मदत होईल.

**२) ठेवी गोळा करण्यावर भर देणे :**

बहुतेक सहकारी ग्राहक संस्थांना भांडवलाची समस्या भेडसावते. माल खरेदी करणे, जागा खरेदी व इतर कामासाठी भांडवल लागते. त्यासाठी सहकारी ग्राहक संस्थांनी सभासद व बिगर सभासदांकडून ठेवी गोळा करण्यावर भर द्यावा. या संस्थांनी जास्तीत जास्त ठेवी गोळा केल्या तर या संस्था अर्थक्षम होतील. त्यांची उलाढाल (विक्री व्यवहार) वाढण्यास मदत होईल.

**३) सरकारने सहभाग वाढवणे आवश्यक :**

भारतात सहकारी ग्राहक चळवळीला सरकारचा मोठा पाठिंबा आहे. ग्राहक सहकारी चळवळीच्या विकासासाठी स्वातंत्र्यप्राप्तीपासून सरकार प्रयत्न करत आहे. ग्राहक संस्थांची संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती व्हावी यासाठी सरकारने या संस्थांना पुरेशी वित्तीय मदत करावी. या संस्थांचे ५० टक्कपेक्षा अधिक शेअर्स विकत घ्यावेत. त्यामुळे ग्राहक संस्थांना भांडवलाच्या समस्येला तोंड द्यावे लागणार नाही.

**४) देखरेख, तपासणी नियमित होणे आवश्यक :**

अफरातफर, भ्रष्टाचार किंवा गैरकारभार या प्रकारांना आळा घालण्यासाठी सहकारी ग्राहक संस्थांची हिशेब तपासणी, माल तपासणी नियमित होणे आवश्यक आहे. त्यासाठी जिल्हा व तालुका पातळीवरील मध्यवर्ती सहकारी घाऊक भांडारांनी काळजी घेतली पाहिजे.

**५) जास्तीत जास्त वस्तूंची विक्री करणे आवश्यक :**

बहुतेक सहकारी ग्राहक संस्था थोड्या किंवा निवडक वस्तू विकतात. त्यामुळे या संस्थांची उलाढाल विक्री व उत्पन्न कमी आहे. म्हणून सहकारी ग्राहक संस्थांनी ग्राहकांना लागणाऱ्या सर्व वस्तू ग्राहक भांडारात विक्रीसाठी ठेवाव्यात.

**६) प्रशिक्षित, कुशल, अनुभवी कर्मचारी नेमणे आवश्यक :**

सहकारी ग्राहक संस्थांचे यश हे प्रशिक्षित, कुशल आणि अनुभवी कर्मचाऱ्यावर अवलंबून असते.

बहुतेक सहकारी ग्राहक भांडारातील कर्मचारी प्रशिक्षित व अनुभवी नाहीत. म्हणून कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची सोय केली पाहिजे. कर्मचारी कुशल किंवा प्रशिक्षित असल्याशिवाय ग्राहक सहकारी संस्थांची उलाढाल व उत्पन्न यात वाढ होणार नाही.

**७) चांगले नेतृत्त्व आवश्यक :**

भारतातील सहकारी ग्राहक संस्थांची संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती वेगाने होण्यासाठी, या संस्थांची विक्री व नफा यात वाढ होण्यासाठी या संस्थांना चांगले सामाजिक व राजकीय नेतृत्त्व लाभले पाहिजे. ग्राहक संस्थांच्या विकासासाठी देशातील तरूणांनी पुढे येऊन नेतृत्त्व केले पाहिजे. त्यामुळे या संस्थांची आणखी चांगली प्रगती होऊ शकेल. तसेच तोट्यात भांडारे नफ्यात येतील.

**८) ग्रामीण भागात संस्था स्थापन करण्यास प्राधान्य देणे आवश्यक :**

भारतात लहान व मोठ्या शहरातच सहकारी ग्राहक संस्थांची स्थापना मोठ्या प्रमाणावर झाली आहे. ग्रामीण भागात या संस्थांची संख्या खूपच कमी आहे. देशातील ६० कोटीपेक्षा अधिक लोक खेड्यात राहतात. तसेच खेड्यातील दारिद्र्य हळूहळू कमी होत असून खेड्यातील लोकांचे दरडोई उत्पन्न वाढत आहे. म्हणून सहकारी ग्राहक संस्था ग्रामीण भागातसुद्धा पुरेशा प्रमाणात स्थापन झाली पाहिजेत. त्यामुळे ग्राहक सहकारी संस्थांचाही फायदा होईल आणि ग्रामीण जनतेलाही चांगल्या, दर्जेदार वस्तू रास्त किंमतीला मिळतील.

**९) ग्राहकांच्या मागणीचा, आवडीचा विचार करणे आवश्यक :**

सहकारी ग्राहक संस्थांनी ग्राहकांची मागणी, आवड-निवड यांचा विचार करून वस्तू विक्रीसाठी ठेवाव्यात. त्यामुळे विक्रीही वाढेल आणि ग्राहकांचाही फायदा होईल. ग्राहकांना आवडीच्या वस्तू मिळतील.

**१०) अनावश्यक खर्च कमी करणे आवश्यक :**

काही ग्राहक संस्थामध्ये कर्मचाऱ्यांची संख्या जास्त आहे. म्हणून सहकारी ग्राहक संस्थांनी पगारावरील खर्च कमी करण्यासाठी कर्मचाऱ्यांची संख्या गरजेएवढीच ठेवावी. अनावश्यक कर्मचारी नेमू नयेत. खाजगी व्यापाऱ्यांप्रमाणे व्यापार करावा.

**११) सभासदांची जबाबदारी :**

सहकारी ग्राहक संस्थांच्या विक्रीत, उत्पन्नात आणि नफ्यात वाढ व्हावी यासाठी या संस्थांच्या सभासदांनी आपल्या संस्थेशी प्रामाणिक राहणे आवश्यक आहे. त्यांनी आपल्या संस्थेतूनच सर्व वस्तू विकत घेतल्या पाहिजेत. तरच या संस्था स्वावलंबी होतील व चांगल्या चालतील.

**१२) कर्मचाऱ्यांना पुरेसा पगार देणे आवश्यक :**

बहुतेक सहकारी ग्राहक संस्था आपल्या कर्मचाऱ्यांना पुरेसा पगार देत नाहीत. कर्मचारी संतुष्ट असले

पाहिजेत. तरच ते निष्ठेने, प्रामाणिकपणे सेवा करतील. म्हणून सहकारी ग्राहक संस्थांनी आपल्या कर्मचाऱ्यांना पुरेसा पगार दिला पाहिजे.

**१३) इतर सहकारी संस्थांकडून माल खरेदी करणे :**

ग्राहक सहकारी संस्था आणि इतर सहकारी संस्थांची प्रगती एकमेकावर अवलंबून आहे. म्हणून सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांनी एकमेकांकडून वस्तू आणि सेवांची खरेदी केली पाहिजे. ग्राहक सहकारी संस्थांनी सहकारी खरेदी-विक्री संस्था, सहकारी प्रक्रिया संस्था यांच्याकडून मालाची खरेदी केल्यास त्यांना खाजगी व्यापाऱ्यांपेक्षा कमी दरात माल मिळू शकेल. त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात आणि नफ्यात मोठी वाढ होईल.

**१४) विक्री खर्चावर नियंत्रण ठेवणे आवश्यक :**

विक्री खर्चात वाढ झाली तर त्याचा नफ्यावर प्रतिकूल परिणाम होतो. म्हणून सहकारी ग्राहक संस्थांनी आपला विक्री खर्च कमीत कमी राहील या दृष्टीने प्रयत्न करणे आवश्यक आहे. विक्री खर्च कमी केल्याशिवाय सहकारी ग्राहक संस्थांच्या नफ्यात वाढ होणार नाही.

**१५) राज्य व राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघांची जबाबदारी :**

भारतातील गावपातळीवरील प्राथमिक सहकारी ग्राहक संस्थांच्या विकासाची जबाबदारी राज्य व राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघांची आहे. हे दोन्ही संघ प्राथमिक आणि मध्यवर्ती घाऊक सहकारी ग्राहक भांडारांना मार्गदर्शन करत असतात. या दोन्ही संघांनी प्राथमिक आणि मध्यवर्ती घाऊक सहकारी संस्थांच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले पाहिजे. ग्राहक संस्थांची मागणी विचारात घेऊन त्यांना वस्तूंचा पुरवठा करावा. तसेच व्यवस्थापकीय आणि तांत्रिक मार्गदर्शन निरंतर पुरवावे.

**१६) उत्पादन करणे आवश्यक :**

अनेक प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था केवळ वस्तूंची विक्री करतात. उत्पादन करत नाहीत. त्यामुळे त्यांना नफा कमी मिळतो किंवा नफाच मिळत नाही. या संस्थांच्या उत्पन्नात आणि नफ्यात वाढ व्हावी यासाठी या संस्थांनी काही वस्तूंचे उत्पादन केले पाहिजे. वस्तूवर किंवा कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे कारखाने उभे केले पाहिजेत. त्यामुळे या संस्था तोट्यात जाणार नाहीत. केवळ बाहेरून माल विकत आणून तो विकण्याचे काम करू नये.

**१७) व्यवस्थापन कार्यक्षम असणे आवश्यक :**

कोणत्याही संस्थेचे यश हे चांगल्या आणि कार्यक्षम व्यवस्थापनावर अवलंबून असते. विविध कारणामुळे काही सहकारी ग्राहक संस्थांचे व्यवस्थापन कार्यक्षम नाही. म्हणून ग्राहक संस्थांचे व्यवस्थापन कार्यक्षम असणे आवश्यक आहे. त्यासाठी संस्था चालकांना राज्य व राष्ट्रीय सहकारी ग्राहक संघांनी सहकार्य करणे आवश्यक आहे. या संस्थांना त्यांनी चांगले, तज्ज्ञ व्यवस्थापक पुरवले पाहिजेत.

**१८) घरपोच सुविधा देणे आवश्यक :**

काही खाजगी भांडारे आपल्या ग्राहकांना घरपोच माल देतात. त्यांच्याकडे स्वत:ची वाहतूकीची साधने आहेत. त्यामुळे त्यांची विक्री मोठ्या प्रमाणात होते. सहकारी तत्त्वावरील ग्राहक भांडारांनी सुद्धा ग्राहकांना घरपोच माल देण्याची सुविधा दिली पाहिजे. शहरातील उच्चशिक्षित, उच्च उत्पन्न गटातील लोकांना माल खरेदीसाठी पुरेसा वेळ नसतो. म्हणून सहकारी ग्राहक भांडारांनी ज्यांची मागणी आहे त्यांना घरपोच माल देण्याची सुविधा पुरवावी. यामुळे सहकारी ग्राहक संस्थांचाही फायदा होईल आणि ग्राहकांचाही फायदा होईल.

**१९) समाजाशी नाळ जोडणे आवश्यक :**

जनतेला सहकारी ग्राहक संस्था आपल्या वाटल्या पाहिजेत. तरच ग्राहक संस्थांच्या विक्रीत, उत्पन्नात आणि नफ्यात वाढ होऊ शकेल. परिसरातील जास्तीत जास्त लोकांनी ग्राहक संस्थांकडून मालाची खरेदी केली पाहिजे. त्यासाठी काही उपाय या संस्थांनी योजले पाहिजेत. उदाहरणार्थ प्रबोधनपर व्याख्यानमाला आयोजित करणे, करमणूक कार्यक्रम आयोजित करणे इत्यादी उपक्रम राबवले तर सहकारी ग्राहक संस्थांची लोकप्रियता वाढून त्यांची विक्री वाढण्यास मदत होईल.

**२०) महिला ग्राहकांना आकृष्ट करणे आवश्यक :**

पुरुषांपेक्षा महिलांचे खरेदीचे प्रमाण वाढत चालले आहे. म्हणून सहकारी ग्राहक संस्थांनी महिला ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी अधिक प्रयत्न केले पाहिजेत. महिलांसाठी वर्षातून दोनदा-तीनदा हळदी-कुंकू कार्यक्रम आयोजित करणे, त्यांना भेटवस्तू देणे, रांगोळी स्पर्धा आयोजित करणे, व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम घेणे किंवा महिला सक्षमीकरणाचे इतर कार्यक्रम आयोजित करणे या माध्यमातून सहकारी ग्राहक संस्था महिला ग्राहकांना आकर्षित करू शकतात. ग्राहकांची संख्या वाढल्याशिवाय सहकारी ग्राहक संस्थांच्या विक्रीत व नफ्यात वाढ होणार नाही.

**२१) ग्राहक भांडारातील वातावरण आकर्षक असणे आवश्यक :**

सहकारी ग्राहक भांडारातील वातावरण अत्यंत चांगले, प्रसन्न, आकर्षक असले पाहिजे. वस्तूंची मांडणी आकर्षक पद्धतीने केली पाहिजे. तरच ग्राहक वस्तू खरेदी करण्याला चांगली पसंती देतील. ग्राहक संस्थांच्या व्यवस्थापकांनी याचा विचार केला पाहिजे. कारण खाजगी ग्राहक भांडारांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून ही खाजगी भांडारे ग्राहकांना चांगल्या सेवा पुरवत आहेत. तसेच ही भांडारे अतिशय आकर्षक पद्धतीने सजवली जात आहेत. सहकारी ग्राहक संस्थांनी सुद्धा या बाबीचा विचार केला पाहिजे.

**२२) सहकारी बँकांनी, सरकारी बँकांनी पुरेसा कर्जपुरवठा करणे आवश्यक :**

सहकारी ग्राहक भांडारांना स्थापनेसाठी आणि स्थापना झाल्यानंतर वाढीसाठी भांडवलाची गरज असते. म्हणून सहकारी बँकांनी, सरकारी बँकांनी सहकारी ग्राहक संस्थांना पुरेसा कर्जपुरवठा करणे आवश्यक आहे. त्याशिवाय या संस्थांची संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती होणार नाही.

**२३) 'भ्रष्टाचारमुक्त संस्था' अभियान राबवणे आवश्यक :**

काही ग्राहक सहकारी संस्थामध्ये भ्रष्टाचार आढळतो. त्यामुळे सहकारी ग्राहक चळवळ बदनाम होते. लोकांचा पाठिंबा राहत नाही. म्हणून सहकारी ग्राहक संस्थांमध्ये भ्रष्टाचार, अफरातफर हे प्रकार घडणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे. त्याशिवाय सहकारी ग्राहक चळवळ लोकप्रिय होणार नाही.

**२४) तोट्यातील संस्था नफ्यात आणण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक :**

भारतात जवळ जवळ निम्म्या प्राथमिक सहकारी ग्राहक संस्था या तोट्यात आहेत. त्यांना नफा मिळत नाही. म्हणून या संस्थांच्या तोट्याची कारणे शोधून काढून त्यांना आवश्यक ती मदत करून या संस्था नफ्यात आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे.

**सारांश :** भारतातील सहकारी ग्राहक संस्थांची संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती होणे आवश्यक आहे. कारण या संस्था युद्धाच्या काळात, नैसर्गिक आपत्तीच्या काळात चांगली कामगिरी करतात. या संस्था गरीब, मध्यमवर्गीय आणि श्रीमंतांना  लागणाऱ्या वस्तूंची विक्री करतात. जीवनावश्यक वस्तू रास्त दरात या संस्था विकतात. या संस्थामुळे खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारी साठेबाजी, काळा बाजार यांना आळा बसतो. म्हणून या संस्थांच्या विकासाकडे व वाढीकडे सरकारने, समाजाने लक्ष दिले पाहिजे.

## २.२.४ **भारतातील सहकारी गृहनिर्माण संस्था (Co-operative Housing Societies in India) :**

**प्रास्ताविक**

भारतात इतर प्रकारच्या सहकारी संस्थांप्रमाणे सहकारी गृहनिर्माण संस्थासुद्धा आढळतात. सन १९१५ मध्ये भारतात पहिली सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाली. ही संस्था मुंबई येथे स्थापन झाली. त्यापूर्वी म्हणजे सन १९१४ मध्ये मद्रास या ठिकाणी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाली होती. परंतु तिचे कार्य १९२३ मध्ये सुरू झाले होते. घरांच्या वाढत्या किंमती, जागेची टंचाई इत्यादी विविध कारणामुळे भारतात सध्या सहकारी गृहनिर्माण संस्थांचे महत्त्व वाढत चालले आहे.

**सहकारी गृहनिर्माण संस्थेची व्याख्या :**

सहकारी गृहनिर्माण संस्थेची एक सोपी, सर्वसाधारण व्याख्या खालील शब्दात स्पष्ट केली आहे.

**''गरीब किंवा अल्प उत्पन्न गटातील लोकांनी घराचा किंवा निवाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी स्वेच्छेने एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर स्थापन केलेल्या संस्थेला सहकारी गृहनिर्माण संस्था म्हणतात.''**

वरील व्याख्येत गरीब किंवा अल्प उत्पन्न गटातील लोक सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करतात असे म्हटले आहे. परंतु मध्यमवर्गीय किंवा उच्च उत्पन्न गटातील लोकसुद्धा एकत्र येऊन सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करू शकतात. म्हणून वरील व्याख्या अपूर्ण आहे.

**१९६० च्या महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा :**

१९६० च्या महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थेची व्याख्या दिली आहे. ती खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

**''सहकारी गृहनिर्माण संस्था म्हणजे अशी संस्था की जिचा उद्देश संस्थेच्या सभासदांना घरे बांधण्यासाठी मोकळ्या जागा पुरवणे, घरे व सदनिका (फ्लॅटस्) पुरवणे तसेच सभासदांना निवासाशी संबंधित सर्वसामान्य सोई व सेवा पुरवणे हा असतो.''** (According to Maharashtra Co-operative Societiec Act, 1960, "Housing society means a society the object of which is to provide it's members with open plots for housing, dwelling houses of flats; or if open plots, the dwelling houses or flats are already aquired, to provide it's members common amenities and services.")

थोडक्यात, कमी खर्चात चांगली घरे बांधून देणाऱ्या आणि सहकारी तत्त्वावर काम करणाऱ्या व सहकारी कायद्याने स्थापन झालेल्या संस्थेला सहकारी गृहनिर्माण संस्था असे म्हणतात. आपल्या सभासदांसाठी निवाऱ्याची कायम स्वरूपाची सोय करणे हा सहकारी गृहनिर्माण संस्थेचा प्रमुख उद्देश असतो.

**सहकारी गृहनिर्माण संस्थेची वैशिष्ट्ये :**

सहकारी गृहनिर्माण संस्थेची ठळक वैशिष्ट्ये थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

**१) लोकशाही तत्त्वानुसार कामकाज :**

सहकारी गृहनिर्माण संस्थेचे कामकाज इतर सहकारी संस्थाप्रमाणे लोकशाही तत्त्वानुसार चालते. 'एक व्यक्ती एक मत' या तत्त्वानुसार निवडणुका होतात. प्रत्येक सभासदाला एकच मत देण्याचा अधिकार असतो. संस्थेचा कारभार करण्यासाठी सभासद आपल्यातील काही सभासदांना संचालक मंडळावर निवडून पाठवतात. संचालक मंडळ अध्यक्ष व उपाध्यक्षांची निवड करतात. संचालक मंडळ गृहनिर्माणासंबंधी निर्णय घेते.

**२) कायदेशीर स्वरूप :**

सहकारी गृहनिर्माण संस्था सहकारी कायद्यानुसार स्थापन होत असते. म्हणून तिला कायदेशीर स्वरूप प्राप्त झालेले असते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० नुसार सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन होते.

**३) मालक सभासद असतात :**

सहकारी गृहनिर्माण संस्था सभासदांना घरे बांधून देत असते. त्या घरांचा मालकी हक्क सभासदांचा असतो. संस्थेचे सभासद घराचे मालक असतात.

**४) विविध प्रकारच्या गृहनिर्माण संस्था :**

भारतात विविध प्रकारच्या सहकारी गृहनिर्माण संस्था आढळतात. उदाहरणार्थ, भाडेकरू-मालकी गृहनिर्माण संस्था, भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था, हाऊसिंग मॉरगेज सोसासयटी, हाऊसिंग कन्स्ट्रक्शन सोसायटी इत्यादी.

**५) खुले सभासदत्व :**

सहकारी गृहनिर्माण संस्थेचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे या संस्थेचे सभासदत्व सर्वांना खुले असते. ज्यांना निवाऱ्याची गरज आहे त्या सर्वांना संस्थेचे सभासदत्व मिळते.

**सहकारी गृहनिर्माण संस्थेची उद्दिष्टे व कार्ये :**

सहकारी गृहनिर्माण संस्थेची प्रमुख उद्दिष्टे खालीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत.

१) घरे बांधण्यासाठी जमीन मिळवणे.

२) घरे, फ्लॅटस बांधणे आणि सभासदांना त्याचे वाटप करणे.

३) घरबांधणीसाठी लागणारे कर्ज वित्तीय संस्थाकडून मिळवणे.

४) रस्ता, वीज, पाणी इत्यादी सुविधा पुरविणे.

५) सभासद मिळवणे, गरजूंना संस्थेचे सभासद करून घेणे.

६) घर दुरुस्तीची सेवा उपलब्ध करून देणे.

**सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्रमुख प्रकार :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्रमुख प्रकार खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) ग्रुप हाऊसिंग सोसायटी** (Group Housing Society) **:**

ग्रुप हाऊसिंग सोसायटीमध्ये वैशिष्ट्य म्हणजे इमारतीची आणि जमिनीची मालकी संस्थेची असते. सभासद एकत्र येऊन घरे बांधतात.

**२) भाडेकरू सहकारी गृहनिर्माण संस्था** (Tenant Co-operative Housing Society) **:**

भाडेकरू सहकारी गृहनिर्माण संस्था घरे बांधते आणि सभासदांना देते. जमिनीची आणि इमारतीची मालकी संस्थेची असते. सभासद संस्थेच्या घरात राहतात आणि त्याबद्दल घराचे भाडे संस्थेला देतात.

**३) स्वयं-सहाय्य गृहनिर्माण संस्था** (Self-Help Housing Societies) **:**

समाजातील गरीब किंवा अल्प उत्पन्न गटातील लोक एकत्र येऊन स्वयंसहाय्य गृहनिर्माण संस्था स्थापन करत असतात. घरे बांधण्यासाठी सरकार मदत करते.

**४) कमी उत्पन्न गटांसाठी गृहनिर्माण संस्था** (Low-Income Group Housing Societies) **:**

ज्यांचे उत्पन्न कमी असते ते स्वत: घरे बांधू शकत नाहीत. अशा कमी उत्पन्न असलेल्या लोकांसाठी गृहनिर्माण संस्था घरे बांधून देतात. या संस्थांचे सभासदत्व गरीब किंवा कमी उत्पन्न असलेल्या लोकांना दिले जाते. म्हणून या सहकारी गृहनिर्माण संस्थांना कमी उत्पन्न गटासाठी गृहनिर्माण संस्था असे म्हणतात.

**५) सामायिक मालकी गृहनिर्माण संस्था** (Co-ownership Housing Society) **:**

सामायिक मालकी गृहनिर्माण संस्था सभासदांना घरे किंवा सदनिका बांधून देतात. जमीन आणि इमारतीची मालकी संस्थकडे असते.

**भारतातील विविध राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांची सांख्यिकीय माहिती :**

खालील तक्ता क्रमांक १ मध्ये भारतातील विविध राज्यात आणि केंद्रशासित प्रदेशात किती सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत याची माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक १**

**भारतातील विविध राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्थांची सांख्यिकीय माहिती**

| अनु. क्र. | राज्य / केंद्रशासित प्रदेश | सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्या |
|---|---|---|
| १ | उत्तर प्रदेश | २३३६५ |
| २ | महाराष्ट्र | २१३८० |
| ३ | गुजरात | १५८३९ |
| ४ | पश्चिम बंगाल | ११६४५ |
| ५ | मध्य प्रदेश | १०५७९ |
| ६ | तामिळनाडू | १००७५ |
| ७ | राजस्थान | ९४०८ |
| ८ | बिहार | ८९४१ |
| ९ | हरियाणा | ७३९८ |
| १० | कर्नाटक | ७३१३ |
| ११ | आंध्र प्रदेश | ७३२४ |
| १२ | केरळ | ४६९६ |


| | | |
|---|---|---|
| १३ | पंजाब | ४५५७ |
| १४ | तेलंगणा | ४१७९ |
| १५ | ओडिशा | ३७७६ |
| १६ | झारखंड | ३२०७ |
| १७ | छत्तीसगड | २८३७ |
| १८ | दिल्ली | २४९८ |
| १९ | उत्तराखंड | २२९८ |
| २० | आसाम | १८६१ |
| २१ | जम्मू व काश्मीर | १६५४ |
| २२ | गोवा | ४९९ |
| २३ | त्रिपुरा | ४३७ |
| २४ | हिमालच प्रदेश | ३४५ |
| २५ | मणिपूर | ३०४ |
| २६ | चंदिगड | २५९ |
| २७ | पाँडेचरी | १९७ |
| २८ | मिझोराम | १९४ |
| २९ | मेघालय | १९३ |
| ३० | अंदमान, निकोबार | १९० |
| ३१ | नागालँड | १८१ |
| ३२ | अरुणाचल प्रदेश | ५१ |

| | | |
|---|---|---|
| ३३ | सिक्कीम | ३६ |
| ३४ | लडाख | ०४ |
| ३५ | लक्षद्वीप | ०४ |
| | संपूर्ण भारत | १६७४३९ |

**संदर्भ :** https://rentechdigital.com

**आलेख क्रमांक १**

**भारतातील विविध राज्यातील सहकारी गृहनिर्माण संस्था**




वरील तक्ता क्रमांक १ वरून असते दिसते की, भारतात सर्वात जास्त सहकारी गृहनिर्माण संस्था उत्तर प्रदेश या राज्यात असून त्यांची संख्या २३३६५ एवढी आहे. त्या खालोखाल महाराष्ट्राचा क्रमांक लागतो.

महाराष्ट्रात २१३८० सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. गुजरात राज्यात १५८३९, पश्चिम बंगाल राज्यात ११६४५, पंजाबमध्ये ४५५७ सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. केवळ राज्यांचा विचार केला तर असे दिसते की, भारतात सिक्कीम या राज्यात सर्वात कमी (३६) सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत.

**भारतातील विविध राज्यातील ग्रामीण व शहरी भागातील प्राथमिक सहकारी गृहनिर्माण संस्थांची माहिती:**

खालील तक्ता क्रमांक २ मध्ये भारतातील विविध वर्षातील प्राथमिक सहकारी गृहनिर्माण संस्थांची सांख्यिकीय माहिती दिली आहे.

**तक्ता क्रमांक २**


**भारतातील विविध सालातील प्राथमिक सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्या**

| अनु. क्र. | वर्ष | प्राथमिक सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्या |
|---|---|---|
| १ | १९५९-६० | ५५६४ |
| २ | १९६३-६४ | ९८९६ |
| ३ | १९६७-६८ | १३८३४ |
| ४ | १९७१-७२ | २०२३४ |
| ५ | १९७५-७६ | २७६४६ |
| ६ | १९७९-८० | ३४०५२ |
| ७ | १९८३-८४ | ४५७७८ |
| ८ | १९८७-८८ | ५३८०५ |
| ९ | १९९१-९२ | ६१८३२ |
| १० | २०२५ | १६७४३९ |

**स्रोत :** 1) Hajela T. N., Co-operation, Konark Publishers, 1997, पृ. क्र. 536
2) https://tentecndigital.com.

**आलेख क्रमांक २**

**भारतातील विविध वर्षातील प्राथमिक सहकारी गृहनिर्माण संस्था**




वरील तक्ता क्र. २ व आलेख क्र. २ वरून असे दिसते की, भारतात प्राथमिक सहकारी निर्माण संस्थांची संस्था सतत वाढत आहे. सन १९५९-६० मध्ये भारतात ५६६४ प्राथमिक सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या. १९९१-९२ मध्ये त्यांची संख्या ६१,८३२ एवढी होती. तर सन २०२५ मध्ये भारतातील प्राथमिक सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्या १,६७,४३९ एवढी होती.

**सहकारी गृहनिर्माण संस्थांचे फायदे / महत्त्व / गरज / आवश्यकता :**

सहकारी गृहनिर्माण संस्था म्हणजे लोकांना (आपल्या सभासदांना) वाजवी किंमतीत घराची (निवासाची) सुविधा पुरवणारी संस्था होय. भारतात स्वातंत्र्यपूर्वकाळापासून सहकारी गृहनिर्माण संस्था अस्तित्वात असल्याचे दिसतात. भारताची सन १९४७ साली फाळणी झाली त्यावेळी लाखो हिंदू निर्वासित भारतात आले. त्यांच्या

राहण्याची (घराची) कायमची सोय करण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाल्याचे आढळते. सहकारी गृहनिर्माण संस्थांचे काही फायदे थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**१) प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या देशांसाठी फायदेशीर :**

भारतासारख्या ज्या देशांची लोकसंख्या प्रचंड आहे. अशा देशांना सहकारी गृहनिर्माण संस्था अत्यंत फायदेशीर आहेत. वाढत्या लोकसंख्येमुळे घरांची मागणी वाढत आहे. भारतात तर आजही घरांचा प्रश्न बिकट आहे. लोकसंख्या प्रचंड असल्याने घरांना मागणी प्रचंड आहे. घरांचा हा प्रश्न सोडवण्यासाठी सहकारी तत्त्वावरील गृहनिर्माण संस्थांची आवश्यकता आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था मोठ्या प्रमाणावर घरे बांधू शकतात. त्यामुळे घरांचा प्रश्न सुटू शकतो. म्हणून भारतासारख्या ज्या देशांची लोकसंख्या प्रचंड आहे. अशा देशांमध्ये सहकारी तत्त्वावरील गृहनिर्माण संस्थांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे.

**२) वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण झालेले प्रश्न सोडविण्यास उपयुक्त :**

सहकारी तत्त्वावरील गृहनिर्माण संस्थांचे आणखी एका कारणासाठी समर्थन केले जाते आणि ते म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्थामुळे वाढत्या शहरीकरणामुळे निर्माण झालेले निवाऱ्याशी संबंधित प्रश्न सोडवता येतात. भारतासारख्या अनेक देशात शहरांची आणि शहरात राहणाऱ्या लोकांची संख्या वाढत आहे. शहरावरील लोकसंख्येचा ताण दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुहे शहरात घरांचा तुटवडा मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. तसेच घरे बांधण्यासाठी, सदनिका बांधण्यासाठी लागणारी जागाही पुरेशा प्रमाणात लोकांना मिळत नाही. परंतु ५० किंवा १०० लोक एकत्र आले आणि त्यांनी सहकारी तत्त्वावर गृहनिर्माण संस्था स्थापन केली तर त्यांना जागा मिळू शकते. तसेच कमी जागेत सदनिका (अपार्टमेंटस) बांधून जास्तीत जास्त लोकांची राहण्याची सोय सहकारी गृहनिर्माण संस्था करू शकतात. म्हणून लहान, मोठ्या शहरात निर्माण झालेला घरांचा व जागेचा प्रश्न सोडविण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांची गरज आहे.

**३) सरकारचे पाठबळ :**

भारतात सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना सरकारचे मोठे पाठबळ आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थासुद्धा याला अपवाद नाहीत. सरकारने स्वातंत्र्यप्राप्तीपासून भारतातातील सहकारी गृहनिर्माण चळवळीला मोठा आधार दिला आहे. सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुरेसा वित्तपुरवठा होईल याची काळजी केंद्र सरकार व राज्य सरकारे घेत आहेत. सहकारी गृहनिर्माण संस्थांना सरकारचा पाठिंबा असल्याने सहकारी तत्त्वावर गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यात कोणत्याही अडचणी येत नाहीत. म्हणून भारतात सहकारी गृहनिर्माण संस्थांची सांख्यिकीय प्रगती चांगली झाली आहे व होत आहे.

**४) वेळेच्या दृष्टीने फायदेशीर :**

एखाद्या व्यक्तीने स्वत: घर बांधायचे ठरवले तर घर बांधून होण्यासाठी खूप वेळ लागतो. परंतु सहकारी गृहनिर्माण संस्था कमी वेळेत घरे बांधतात. व्यक्तीला घर बांधताना ज्या अडचणी येतात त्या अडचणी सहकारी

गृहनिर्माण संस्थांना येत नाहीत. व्यक्तीपेक्षा सहकारी गृहनिर्माण संस्थांचे घरे बांधण्याचे व्यवस्थापन चांगले असते. त्यामुळे व्यक्तीपेक्षा कमी वेळेत सहकारी गृहनिर्माण संस्था घरे बांधू शकतात. हा सहकारी गृहनिर्माण संस्थांचा महत्त्वाचा फायदा आहे. म्हणून लोकांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर संस्था स्थापन करून आपल्या घरांचा प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

**५) बांधकाम खर्चात बचत :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांचा आणखी एक फायदा म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्थामार्फत घरांचे बांधकाम केले तर घरबांधणी खर्च कमी येतो. व्यक्तीने घर बांधायचे ठरवले तर त्याला घर बांधण्याचा जो खर्च येतो त्यापेक्षा सहकारी गृहनिर्माण संस्थांना कमी खर्च येतो. कारण सहकारी गृहनिर्माण संस्था ५० ते ५०० घरे किंवा फ्लॅटस् बांधत असतात. त्यासाठी त्यांना वाळू, सिमेंट, सळी, विटा, दरवाजे, खिडक्या मोठ्या प्रमाणात खरेदी कराव्या लागतात. सर्व बांधकाम साहित्य सहकारी गृहनिर्माण संस्था घाऊक किंवा मोठ्या प्रमाणावर खरेदी करतात. त्यामुळे त्यांना हे साहित्य कमी किंमतीत मिळते. त्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांचा बांधकामाचा खर्च कमी येतो. त्यांचा सभासदांनाही फायदा होतो. हा सहकारी गृहनिर्माण संस्थांचा अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**६) सरकारला फायदेशीर :**

लोकांची निवाऱ्याची सोय करणे ही सरकारची जबाबदारी आहे. परंतु भारताची लोकसंख्या सुमारे १४० कोटी आहे. एवढ्या लोकसंख्येची निवाऱ्याची सोय सरकार करू शकत नाही. सरकारला अन्य कार्येही मोठ्या प्रमाणात करावी लागतात. सहकारी तत्त्वावर गृहबांधणी संख्या जर मोठ्या प्रमाणावर स्थापन झाल्या तर सरकारचा ताण त्यामुळे कमी होतो. सहकारी गृहनिर्माण संस्थांनी घरबांधणीचा वेग वाढवला तर सरकारला जनतेचा रोष पत्करावा लागणार नाही. म्हणून सरकारच्या दृष्टीनेसुद्धा सहकारी गृहनिर्माण संस्था अत्यंत उपयुक्त आहेत.

**७) फसवणूकीचा धोका नसणे :**

काही खाजगी बांधकाम व्यावसायिकांकडून लोकांची फसवणूक होत असते. घर वेळेत बांधून न देणे, चांगले मजबूत घर बांधून न देणे, जास्त रक्कम घेणे, हलक्या दर्जाचे बांधकाम साहित्य वापरणे अशा प्रकारची फसवणूक खाजगी बिल्डरकडून होऊ शकते. तशा प्रकारची कोणतीही फसवणूक सहकारी गृहनिर्माण संस्थाकडून होत नाही. त्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्था अत्यंत आवश्यक आहेत.

**८) घरासाठी जागा मिळवणे सोपे :**

व्यक्तीला घरासाठी जागा मिळवणे कठीण जाते. परंतु सहकारी गृहनिर्माण संस्थांना मात्र घरासाठी जागा मिळवताना फारशा अडचणी येत नाहीत. कारण सहकारी गृहनिर्माण संस्थांची स्थापन सहकारी कायद्यानुसार झालेली असते. सहकारी गृहनिर्माण संस्थांना कायद्याची आणि सरकारची मान्यता असते. त्यामुळे सहकारी

गृहनिर्माण संस्थांना घरे बांधण्यासाठी शासनाची पडीक जागा सुद्धा मिळू शकते. हा सहकारी गृहनिर्माण संस्थांचा मुख्य फायदा आहे

**९) कर्जाची सुविधा :**

अनेक लोक एकत्र येऊन सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करत असतात. त्यांनी जरी आपल्या जवळचे काही भांडवल एकत्र केले असले तरी एवढ्या पैशात घरे बांधून होत नाहीत. वित्तीय संस्था किंवा बँकांकडून मोठ्या प्रमाणात कर्ज घ्यावे लागते. सहकारी गृहनिर्माण संस्था घरबांधणीचे अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य करत असल्यामुळे बँका व वित्तीय संस्थांकडून सहकारी गृहनिर्माण संस्थांना पुरेशा प्रमाणात व कमी व्याजदरात कर्ज मिळते. कर्ज मिळवण्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांना यातायात करावी लागत नाही हा सहकारी तत्त्वावर घरे बांधण्याचा मुख्य फायदा आहे.

**१०) दलाल / मध्यस्थांचे उच्चाटन :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांचा आणखी एक फायदा म्हणजे या संस्था जास्तीत जास्त बांधकाम साहित्य थेट उत्पादकांकडून खरेदी करत असल्याने दलाल किंवा मध्यस्थांकडे त्यांना जावे लागत नाही. दलाल किंवा मध्यस्थांना कमिशन द्यावे लागत नाही. त्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांचा आर्थिक फायदा तर होतोच शिवाय या व्यवसायातील अनावश्यक मध्यस्थ, दलाल यांचे उच्चाटन होते.

**११) अल्पदरात इतर सोयीसुविधा :**

सहकारी गृहनिर्माण संस्था सभासदांना केवळ घरे बांधून देत नाहीत तर त्यांना चांगले जीवन जगता यावे, त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावा यासाठी स्विमिंग टँक, बगिचे, खेळाचे मैदान, व्यायामशाळा, वृद्धांसाळी बगिचे, विश्रांतीगृह, लहान मुलांसाठी बगिचे इत्यादी विविध सुविधा अल्पदरात उपलब्ध करून देतात. त्यामुळे सभासदांचे शारीरिक व मानसिक आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. सभासदांच्या राहणीमानात वाढ व सुधारणा होते. म्हणून सहकारी गृहनिर्माण संस्थांची गरज आहे.

**१२) एकोपा, एकजूट, सहकार्य वाढण्यास मदत :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांचा आणखी एक फायदा सांगता येईल आणि तो म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था आपल्या सभासदांसाठी विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रम किंवा मनोरंजनाचे कार्यक्रम सादर करत असतात. तसेच गणेश उत्सव, नवरात्र उत्सव यासारखे उत्सव साजरे करत असतात. मुलांच्या, महिलांच्या खेळण्याच्या व इतर स्पर्धा आयोजित करत असतात. त्यामुळे वर्षातील काही दिवस सर्व सभासद एकत्र येतात त्यामुळे त्यांच्यात परस्पर सहकार्य वृत्ती वाढीस लागते. त्यांच्यातील एकोपा, एकजूट वाढण्यास मदत होते. अडचणीत एकमेकांना मदत करण्याची वृत्ती वाढीस लागते. हा सहकारी तत्त्वावर घरे बांधण्याचा अत्यंत महत्त्वाचा फायदा आहे.

**१३) लोकशाहीचे पालन :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांचा कारभार हा लोकशाही तत्त्वानुसार चालतो. सर्व सभासद आपल्यापैकीच काही लोकांना संचालक मंडळावर निवडून पाठवतात. एका सभासदाला एकच मत देण्याचा अधिकार असतो. सर्व सभासदांना मान्य होईल, पसंत पडेल अशी घरे बांधली जातात. त्यामुळे घरात राहण्याचा चांगला आनंद सभासदांना मिळतो.

**१४) संस्थेला फायदेशीर :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या सभासदाकडून विविध प्रकारचे सेवा शुल्क मिळते. या संस्था आपल्या सभासदांना काही सेवा पुरवतात. त्याबद्दल त्यांच्याकडून शुल्क घेतात. काही सहकारी गृहनिर्माण संस्था फ्लॅट, घरे, दुकान गाळे, हॉल किंवा मंगल कार्यालय भाड्याने देतात आणि त्यापोटी शुल्क किंवा भाडे वसूल करतात. अशा प्रकारे सहकारी गृहनिर्माण संस्थांना सभासदांकडून व बिगर सभासदांकडून विविध सेवा पुरवल्याबद्दल विविध प्रकारचे शुल्क मिळते. त्यामुळे गृहनिर्माण संस्थांचा फायदा होतो.

**१५) तत्पर व कमी खर्चात सेवा :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांचा आणखी एक फायदा म्हणजे या संस्थांकडून आपल्या सभासदांना ज्या सेवा किंवा सुविधा पुरवल्या जातात त्या तत्पर (विनाविलंब) व कमी खर्चात पुरवल्या जातात. घर जरी नवीन असले तरी काही सेवा पुरवाव्या लागतात किंवा घरात राहायला गेल्यानंतर काही दिवसांनी प्लंबर, वायरमन, सुतार, पेंटर यांची गरज भासते. एखाद्या व्यक्तीला या सेवा लवकर मिळत नाहीत. परंतु सहकारी गृहनिर्माण संस्थेची प्रतिष्ठा व्यक्तीपेक्षा मोठी असल्याने आणि व्यक्तीपेक्षा गृहनिर्माण सहकारी संस्थांकडून मोठ्या प्रमाणात कामे मिळत असल्याने प्लंबर, सुतार, वायरमन सहकारी गृहनिर्माण संस्थांची कामे पटकन स्वीकारतात. त्यामुळे संस्थेच्या सभासदांना सर्व प्रकारच्या सेवा त्वरित मिळतात. हा सहकारी गृहनिर्माण संस्थाचा महत्त्वाचा फायदा आहे.

**१६) इच्छेनुसार बांधकाम :**

काही सहकारी गृहनिर्माण संस्था आपल्या सभासदांना मोकळे प्लॉट घेऊन देतात. त्या मोकळ्या प्लॅटमध्ये सभासद आपल्या इच्छेप्रमाणे घर बांधू शकतात. तसेच घरबांधणी करणाऱ्या सहकारी संस्था सभासदांना त्यांच्या इच्छेप्रमाणे व मागणीप्रमाणे घरे बांधून देतात. त्यामुळे सभासदांना चांगल्या घरात राहण्याचा आनंद मिळतो.

**१७) मालमत्ता व जीविताची सुरक्षितता :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांचा त्यांच्या सभासदांना मिळणारा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे या संस्थामुळे सभासदांच्या मालमत्तेचे आणि जीविताचे उत्तम प्रकारे संरक्षण होते. सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून कुंपणाची सोय केली जाते. सुरक्षा रक्षक नेमले जातात. त्यामुळे चोर, दरोडेखोर, खंडणीखोर, फाळकूटदादा

(गुंडलोक), पाळीव व जंगली जनावरे यांचा सभासदांना (स्त्रियांना, मुलांना, पुरुषांना) त्रास होत नाही. अशा प्रकारे सहकारी गृहनिर्माण संस्था सभासदांना केवळ घरे बांधून देत नाहीत. तर त्यांच्या मालमत्तेचे व जीविताचेसुद्धा संरक्षण करतात. म्हणून सहकारी तत्त्वावरील गृहनिर्माण संस्था दिवसेंदिवस लोकप्रिय होत आहेत.

**१८) सभासदांना बँकांकडून घरासाठी त्वरित मदत :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सभासद बँकांकडून आणि वित्तीय संस्थांकडून कर्ज घेऊन गृहनिर्माण संस्थांना भरत असतात. सभासद कमी उत्पन्न गटातील असल्याने त्यांना कर्ज काढावे लागते. व्यक्ती सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या सभासद असतील तर त्यांना बँका ताबडतोब कर्ज मंजूर करतात. कारण सहकारी गृहनिर्माण संस्था ताबडतोब किंवा वेळेत घर बांधणी प्रकल्प पूर्ण करत असतात. त्यामुळे बँका सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या सभासदांची अडवणूक करत नाहीत. त्यांना ताबडतोब कर्ज मंजूर करतात. त्यामुळे गृहनिर्माण संस्थांना वेळेत काम सुरू करून वेळेत सभासदांना घरे सुपूर्द करता येतात. हा सहकारी गृहनिर्माण संस्थांचा सभासदांना मिळणारा महत्त्वाचा फायदा आहे.

**१९) सभासदांना कमी किंमतीत घरे :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांचा त्यांच्या सभासदांना मिळणारा आणखी एक महत्त्वाचा फायदा म्हणजे या संस्थांकडून त्यांच्या सभासदांना कमी किंमतीत किंवा परवडणाऱ्या दरात घरे पुरवली जातात. खाजगी बांधकाम व्यावसायिकांपेक्षा सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या घरांच्या किंमती असतात. त्याचा फायदा गरीबांना किंवा अल्प उत्पन्न गटातील लोकांना होतो. म्हणून भारतात जास्तीत जास्त सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन होणे आवश्यक आहे.

**२०) दर्जेदार आणि मजबूत बांधकाम :**

काही खाजगी बांधकाम व्यावसायिकांची घरांचे बांधकामे दर्जेदार, टिकावू किंवा मजबूत नसतात. परंतु सहकारी गृहनिर्माण संस्थांची बांधकामे मात्र चांगली, दर्जेदार, टिकावू व मजबूत असतात. सहकारी गृहनिर्माण संस्थांची घरे दीर्घकाळ टिकणारी आणि मजबूत असतात. म्हणून सहकारी गृहनिर्माण संस्थांकडून बांधकाम करून घेण्याला पसंती देणाऱ्यांची संख्या वाढत आहे.

**२१) इतर फायदे :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांचे इतरही काही फायदे संस्थांच्या सभासदांना मिळतात. सहकारी गृहनिर्माण संस्थांचा कारभार सहकारी तत्वावर, लोकशाही तत्त्वावर चालतो संस्थेकडून सभासदांची अडवणूक केली जात नाही. सभासद होण्यासाठी किंवा संस्था सोडून जाण्यासाठी संस्था सभासदावर सक्ती करत नाही. सभासदाला आपले घर भाड्याने देता येते किंवा विकतासुद्धा येते.

**सारांश :** अशा प्रकारे सहकारी गृहनिर्माण संस्थांचे काही फायदे वरीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत. सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सभासदांना, समाजाला, शासनाला होतात. भारतात गरीब व मध्यमवर्गीयांची संख्या प्रचंड

असल्याने आणि घरांचा प्रचंड तुटवडा असल्याने सहकारी गृहनिर्माण संस्थांची उपयुक्तता दिवसेंदिवस वाढत आहे.

**सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या समस्या / दोष / अडचणी :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांना काही समस्यांना आणि अडचणींना तोंड द्यावे लागते. त्या समस्या व अडचणी थोडक्यात खालीलप्रमाणे स्पष्ट केल्या आहेत.

**१) भांडवलाची समस्या :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांना भांडवलाची / पैशाची समस्या भेडसावते. कारण सहकारी गृहनिर्माण संस्थांचे बहुतेक सर्व सभासद गरीब किंवा अल्प उत्पन्न गटातील असतात. त्यामुळे त्यांच्याकडून पुरेसे भांडवल मिळत नाही. त्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांना कर्जासाठी बँका व इतर वित्तीय संस्थावर अवलंबून रहावे लागते.

**२) घरबांधणी साहित्याच्या वाढत्या किंमती :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांना भेडसावणारी आणखी एक समस्या म्हणजे घरे बांधण्यासाठी लागणाऱ्या वाळू, सिमेंट, सळी यांच्या किंमती दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे घरबांधणीचा खर्चही वाढत आहे. त्याचा आर्थिक फटका सभासदांना बसत आहे.

**३) गरीबांना कमी लाभ :**

मध्यमवर्गीय आणि सधन लोकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्था वेगाने वाढत आहेत. तुलनेने गरीब किंवा अल्प उत्पन्न गटातील सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्यात्मक आणि गुणात्मक प्रगती चांगली नाही. त्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांचा गरीबांना फारसा लाभत होत नाही.

**४) घरासाठी जागा मिळण्याची अडचण :**

शहरात जागांची तीव्र टंचाई आहे. त्यामुळे जागा मिळवण्याची समस्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना भेडसावते. शहरात चांगल्या ठिकाणी व योग्य किंमतीला जागा मिळत नाही. शहरापासून दूर अंतरावर जागा मिळते. त्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सभासद होण्यास लोक तयार होत नाहीत.

**५) तज्ज्ञ, कुशल कारागिरांची कमतरता :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांना भेडसावणारी आणखी एक समस्या म्हणजे घरबांधणीसाठी आवश्यक असणारे तज्ज्ञ, कुशल कामगार पुरेशा प्रमाणात मिळत नाहीत. तसेच अकुशल कामगारही फारसे मिळत नाहीत. बांधकाम क्षेत्रातील ८० टक्केपेक्षा अधिक कामगार हे परप्रांतिय आहेत. ते वर्षातून दोन तीन महिने आपल्या गावी जातात. त्यामुळे कामे वेळेत पूर्ण करणे शक्य होत नाही.

**६) ग्रामीण भागात लोकांचा कमी प्रतिसाद :**

ग्रामीण भागातही सहकारी गृहनिर्माण संस्था चांगले काम करू शकतात. परंतु ग्रामीण भागातील लोकांचा प्रतिसाद कमी आहे. सहकारी तत्त्वावर गृहबांधणी संस्था स्थापन करून घराची सुविधा मिळवण्यासाठी खेड्यातील लोक फारसे स्वारस्य दाखवत नाहीत. त्यामुळे साध्या घरात त्यांना रहावे लागते. शहरी भागाच्या तुलनेत ग्रामीण भागात सहकारी गृहनिर्माण संस्था कमी आढळतात.

**७) थकबाकीची समस्या :**

विविध कारणामुळे सहकारी गृहनिर्माण संस्था वित्तीय संस्था व बँकांकडून घेतलेले कर्ज वेळेत परत करू शकत नाहीत. त्यामुळे थकबाकीच्या समस्येला तोंड द्यावे लागते. निम्म्यापेक्षा अधिक सहकारी गृहनिर्माण संस्थांची कर्जे थकली आहेत.

**८) भ्रष्टाचाराची समस्या :**

भारतातील काही सहकारी गृहनिर्माण संस्थांना भ्रष्टाचाराच्या समस्येने घेरले आहे. आर्थिक भ्रष्टाचारामुळे लोक सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सभासद होण्यास तयार होत नाहीत.

**९) सभासदांची भ्रष्ट वृत्ती :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांचे काही सभासद प्रामाणिक नाहीत. ते सहकारी गृहनिर्माण संस्थेचा गैरफायदा घेतात. संस्थेचे सभासद होऊन कमी किंमतीत घर मिळवतात आणि काही दिवसांनी भरमसाठ किंमतीला विकून नफा कमवतात.

**१०) चांगल्या नेतृत्त्वाचा अभाव :**

सहकारी साखर कारखानदारी, सहकारी दृध संस्था इत्यादी सहकारी संस्थांना जसे चांगले नेतृत्त्व लाभले आहे तसे नेतृत्त्व सहकारी गृहनिर्माण चळवळीला लाभलेले नाही. त्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्यात्मक व गुणात्मक प्रगती वेगाने होत नाही.

**सारांश :** अशा प्रकारे भारतातील सहकारी गृहनिर्माण संस्थांना ज्या अडचणींना, समस्यांना तोंड द्यावे लागते त्याची थोडक्यात माहिती वरीलप्रमाणे स्पष्ट केली आहे. तसेच या संस्थांचे काही दोषही वरीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

**सहकारी गृहनिर्माण संस्थांचे दोष / समस्या / अडचणी दूर करण्यासाठी काही उपाय :**

भारतातील सहकारी गृहनिर्माण चळवळ ही अत्यंत महत्त्वाची चळवळ आहे. सामान्य लोकांच्या जीवनात या चळवळीला (सहकारी गृहनिर्माण संस्थांना) अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. म्हणून सहकारी गृहनिर्माण संस्थांची संख्यात्मक व गुणात्मक प्रगती होणे आवश्यक आहे. त्यासाठी सहकारी गृहनिर्माण संस्थांना भेडसावणाऱ्या समस्या, अडचणी व दोष दूर होणे आवश्यक आहे. त्यासाठी काही उपाय खालीलप्रमाणे सुचवले आहेत.

**१) गरजूंनाच सभासदत्व द्यावे :**

भारतात आजही घरांचा तुटवडा प्रचंड आहे. म्हणून ज्यांच्या मालकीचे घर नाही त्यांनाच संस्थेने सभासद करून घ्यावे व त्यांनाच घर द्यावे. एकापेक्षा अधिक घरे व्यक्तीला मिळणार नाहीत याची काळजी सहकारी गृहनिर्माण संस्थांनी घेणे आवश्यक आहे.

**२) घरफाळा माफ करणे आवश्यक :**

गरीबांनी स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना नगरपालिका, महानगरपालिका, ग्रामपंचायत इत्यादींनी घर बांधून झाल्यानंतर किमान पाच वर्षे घरपट्टी वसूल करू नये. त्याचा फायदा सभासदांना व गृहनिर्माण संस्थांना होईल.

**३) सवलतीच्या दराने बांधकाम साहित्य पुरवणे आवश्यक :**

भारतात बांधकाम साहित्याच्या किंमती दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यामुळे सहकारी गृहनिर्माण संस्थांचा घरबांधणीचा खर्च वाढत आहे. त्यामुळे सभासदांना घरासाठी अधिक किंमत द्यावी लागत आहे. म्हणून सरकारने सहकारी गृहनिर्माण संस्थांना बांधकाम साहित्य कमी दरात देण्याचे धोरण स्वीकारावे.

**४) व्यवस्थापनाचा दर्जा सुधारणे आवश्यक :**

कित्येक सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या व्यवस्थापनाचा दर्जा फारसा चांगला नाही. म्हणून सहकारी चळवळीच्या विकासासाठी काम करणाऱ्या संघटनांनी सहकारी गृहनिर्माण संस्थांना तांत्रिक, व्यवस्थापकीय मदत पुरवावी. तज्ञांचे मार्गदर्शन व सल्ला या संस्थांना पुरवणे आवश्यक आहे.

**५) पुरेसे कर्ज मिळणे आवश्यक :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांना वेळेत घरबांधणी प्रकल्प पूर्ण करता यावा यासाठी बँकांनी व वित्तीय संस्थांनी त्यांना पुरेशा प्रमाणात आणि वेळेवर कर्जपुरवठा करणे आवश्यक आहे.

**६) गरीबांच्या संस्था स्थापन करण्यावर भर देणे आवश्यक :**

भारतात मध्यम आणि सधन लोकांच्याही सहकारी गृहनिर्माण संस्था आढळून येतात. परंतु गरीबांची घराची समस्या दिवसेंदिवस बिकट बनत आहे. म्हणून गरीबांच्या जास्तीत जास्त सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन होणे अत्यंत आवश्यक आहे.

**७) ग्रामीण भागात संस्था स्थापन करण्यावर भर देणे आवश्यक :**

भारतात मध्यम आणि सधन लोकांच्याही सहकारी गृहनिर्माण संस्था आढळून येतात. परंतु गरीबांची घराची समस्या दिवसेंदिवस बिकट बनत आहे. म्हणून गरीबांच्या जास्तीत जास्त सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन होणे अत्यंत आवश्यक आहे.

**८) सभासदांची जबाबदारी :**

सभासदांनी सहकारी गृहनिर्माण चळवळीशी प्रामाणिक राहिले पाहिजे. सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून कमी किंमतीत घर घेऊन भरमसाठ किंमतीला विकणे, सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या घरातन राहता घर भाड्याने देणे, एकापेक्षा अधिक घरे बाळगणे, कर्जाचे हप्ते न भरणे या बाबी सभासदांनी टाळल्या पाहिजेत. तरच सहकारी गृहनिर्माण चळवळ वेगाने प्रगती करू शकेल.

**९) सरकारने जमीन देणे आवश्यक :**

सहकारी गृहनिर्माण संस्थांना कमी किंमतीत चांगल्या ठिकाणी जमीन मिळत नाही. त्यामुळे घरबांधणी प्रकल्प वेळेत पूर्ण होत नाही. म्हणून सरकारने सहकारी गृहनिर्माण संस्थांना आपल्या मोकळ्या जमिनी द्याव्यात. त्यामुळे कमी खर्चात या संस्थांना घरे बांधता येतील.

**१०) हिशेब तपासणी वेळेवर होणे आवश्यक :**

बऱ्याच सहकारी गृहनिर्माण संस्थांची तपासणी वेळच्यावेळी होत नाही. तसेच काही संस्था वेळच्यावेळी हिशेब लिहित नाहीत. म्हणून सहकारी गृहनिर्माण संस्थांची तपासणी वेळच्या वेळी होणे अत्यंत आवश्यक आहे.

**सारांश :** अशा प्रकारे सहकारी गृहनिर्माण संस्थांचे दोष दूर करण्यासाठी आणि त्यांना भेडसावणाऱ्या समस्यांच्या निराकरणासाठी काही उपाय वरीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत. भारतातील घरांचा तुटवडा दिवसेंदिवस वाढत असून या समस्येवर मात करण्यासाठी, झोपडपट्ट्यांचे निर्मूलन करण्यासाठी भारतात सहकारी गृहनिर्माण चळवळीची संख्यात्मक आणि गुणात्मक अशी वेगाने प्रगती होणे आवश्यक आहे.

## २.४ पारिभाषिक शब्द :

**१) विपणन –** वस्तूची खरेदी विक्री करण्याशी संबंधित विपणन हा शब्द आहे.

**२) सहकारी विपणन –** सहकारी तत्त्वावर शेतमालाची व इतर वस्तूंची खरेदी-विक्री करणे म्हणजे सहकारी विपणन होय.

**३) प्राथमिक वस्तू –** कृषी माल, दूध, अंडी, फळे या वस्तूंना प्राथमिक वस्तू असे म्हणतात.

## २.५ स्वयंअध्ययन प्रश्न :

**रिकाम्या जागा भरा.**

१) भारतात पहिली सहकारी खरेदी-विक्री संस्था ............... येथे स्थापन झाली.

अ) मुंबई ब) पुणे क) दिल्ली ड) हुबळी

२) सहकारी विपणन ............... शी संबंधित आहे.

अ) शेतकरी ब) कारखानदार क) सरकार ड) व्यापारी

३) ............... पातळीवर प्राथमिक सहकारी विपणन संस्था काम करतात.

अ) तालुका ब) गाव क) जिल्हा ड) राज्य

४) जगात पहिली ग्राहक सहकारी संस्था ........... मध्ये स्थापन झाली.

अ) इंग्लंड ब) फ्रान्स क) इटली ड) अमेरिका

५) भारतात ............... मध्ये पहिली सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन झाली.

अ) १९१५ ब) १८१५ क) १९२० ड) १९४०

## २.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

१) ड, २) अ, ३) ब, ४) अ, ५) अ

## २.७ सरावासाठी स्वाध्याय :

**(अ) टीपा द्या.**

१) सहकारी विपणनाचे महत्त्व

२) सहकारी शेती

३) ग्राहक सहकारी संस्था

४) सहकारी गृहनिर्माण संस्था

**(ब) थोडक्यात उत्तरे द्या.**

१) सहकारी विपणनाचे दोष सांगा.

२) सहकारी शेतीचे फायदे सांगा.

३) ग्राहक सहकारी संस्थांचे दोष सांगा.

४) सहकारी गृहनिर्माण संस्थांचे महत्त्व स्पष्ट करा.

**(क) सविस्तर उत्तरे द्या.**

१) सहकारी विणनाचे दोष व उपाय सांगा.

२) सहकारी शेतीचे प्रकार सांगा.

३) सहकारी गृहनिर्माण संस्थांचे महत्त्व व समस्या सांगा.

४) ग्राहक सहकारी संस्थांचे दोष व उपाय सांगा.

❑❑❑

# भारतातील सहकारी प्रक्रिया संस्था

## ( Co-operative Processing Societies in India )

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ अभ्यास विषय

    ३.२.१ सहकारी साखर उद्योग (संस्था)- समस्या व उपाय

    ३.२.२ सहकारी दुग्ध प्रक्रिया संस्था-समस्या व उपाय

    ३.२.३ कामगार सहकारी संस्था

    ३.२.४ सेवा सहकारी संस्था

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

३.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

३.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ सूची


## ३.० उद्दिष्ट्ये

भारतातील सहकारी प्रक्रिया संस्था या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणांस पुढील गोष्टींचे आकलन करता येईल.

१. सहकारी प्रक्रिया संस्थांची ग्रामीण विकासातील भूमिका समजावून घेणे.

२. साखर सहकारी संस्थांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास करणे.

३. भारतातील दुग्ध सहकारी संस्थांच्या समस्या व त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास करणे.

४. भारतातील सहकारी प्रक्रिया संस्थांच्या माध्यमातून महिलांचे सक्षमीकरण करता येईल याचा आढावा घेवून त्याचा अभ्यास करणे.

## ३.१ प्रस्तावना

विविध वस्तूंवरचे रूपांतरण अंतिम उपयोगासाठी उपयुक्त असणाऱ्या स्वरूपामध्ये करणे याला प्रक्रिया असे संबोधले जाते. सहकारी प्रक्रिया ही अशा प्रक्रिया संघटनेचा एक भाग आहे. ज्यामध्ये केले जाणारे उत्पादन सहकारी तत्वावर चालणाऱ्या संस्थांमार्फत केले जाते.

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालावर प्रक्रिया करून पक्क्या मालात रूपांतर करणाऱ्या व सहकारी तत्वावर कार्य करणाऱ्या सहकारी संस्थांना सहकारी प्रक्रिया संस्था असे म्हणतात. सहकारी प्रक्रिया संस्थांची ग्रामीण विकासातील भूमिका अनन्यसाधारण महत्त्वाची आहे. अशाच सहकारी संस्थांच्या समस्यांचा अभ्यास करण्याचा प्रयत्न सदरच्या प्रकरणामध्ये केला आहे. या सहकारी प्रक्रिया संस्थांमध्ये साखर सहकारी संस्था तसेच दुग्ध सहकारी प्रक्रिया संस्थांचा विशेष अभ्यास करण्यात आला आहे. सहकारी प्रक्रिया संस्था आणि महिलांचे सक्षमीकरण यांचा निकटचा संबंध आहे. या संस्थांच्या माध्यमातून स्त्रियांच्या आर्थिक स्वातंत्र्य व सबलीकरण/सक्षमीकरणाचा परामर्श घेतला आहे.

## ३.२ अभ्यास विषय

भारतातील सहकारी प्रक्रिया यांच्यामध्ये अनेक संस्थांचा समावेश होतो. या घटकामध्ये भाराताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थांच्या विकासातील भूमिका समजून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. याचबरोबर भारतातील दुग्ध सहकारी संस्था व सहकारी साखर प्रक्रिया उद्योग संस्थांचा सर्वांगीण अभ्यासही या घटकामध्ये करणार आहोत. याचबरोबर महिलांच्या सक्षमीकरणामध्ये या प्रक्रिया संस्थांची भूमिका बजावलेली आहे. हेही अभ्यासणार आहोत.

### ३.२.१ सहकारी साखर उद्योग (संस्था)– समस्या व उपाय

भारतातील साखर उद्योग हा भारतीय अर्थव्यवस्थेला प्रतिवर्षी जवळपास ७.५% रोजगार उपलब्ध करून देणारा उद्योग आहे. जागतिक बाजारपेठेत ब्राझीलनंतर भारतातील साखर उद्योग द्वितीय क्रमांकावर असणारा प्रमुख उद्योग आहे, ज्या उद्योगामधून जागतिक साखर आणि ऊस उत्पादनापैकी अनुक्रमे १५ व २५% उत्पादन केले जाते. सध्या भारतीय साखर उद्योगाचे प्रतिवर्षीचे उत्पादन सुमारे ८०,००० कोटींचे आहे. ३१.०७.२०१७ पर्यंत भारतामध्ये ७३२ इतके साखर उद्योग (कारखाने) प्रस्थापित झाल्याची नोंद असून या कारखान्यांची पर्याप्त गाळप क्षमता ३३९ लाख मेट्रीक टन इतकी आहे. कृषी आधारित उद्योगांपैकी साखर उद्योग हा अत्यंत महत्त्वाचा उद्योग मानला जातो, कारण या

उद्योगांच्या ५० मिलीयन (दशलक्ष) ऊस उत्पादक शेतकरी आणि ५ लाख साखर कारखान्यांमध्ये काम करणारे श्रमिक संबंधीत आहेत. साखर उद्योग हा रोजगार निर्मिती करणारा महत्त्वाचा उद्योग आहे. या उद्योगाशी संबंधीत इतर पूरक व्यवसाय उदा. वाहतूक दळणवळण, यंत्रसामग्रीचा व्यापार, कृषी उत्पादनांचा पुरवठा इ.ची निर्मिती होवून रोजगार वृध्दी होते.

भारतातील मोठ्या उद्योगांमध्ये स्वातंत्र्योत्तर काळात साखर उद्योगाने महत्त्वाचे स्थान प्राप्त करून घेतले आहे. ब्राझीलला मागे टाकून भारतातील साखर उद्योगाने जगात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. भारताच्या कृषी औद्यागिक क्षेत्रात साखर उद्योग हा एक महत्त्वाचा व मोठा घटक आहे. भारताच्या ग्रामीण भागाचे आर्थिक, शैक्षणिक व सामाजिक स्थित्यंतर करणारा हा उद्योग नवसमाज निर्मितीचे नवे दालन उघडत आहे. साखर कारखाना व ग्रामीण भागातील कृषी औद्योगिक समाज रचनेच्या पुनर्बांधणीस सर्वांगीण प्रगतीचे केंद्र बिंदू मानून ग्रामीण भागाचे नंदनवन करणारा साखर उद्योग भारताला व विशेषत: महाराष्ट्राला निश्चितच भूषणास्पद ठरला आहे. साखर उद्योग हा शेतीवर आधारित दुसऱ्या क्रमांकाचा उद्योग आहे. जगात उद्यापासून साखर उत्पादनामध्ये पहिला क्रमांक लागतो. ३१ मार्च २००२ अखेर देशात एकूण ५२७ साखर कारखाने होते. देशात सुमारे ४५ दशलक्ष ऊस उत्पादक शेतकरी आहेत.

महाराष्ट्रातील साखर उद्योग हा कृषि-औद्योगिक क्षेत्रातील एक प्रमुख संघटीत उद्योग आहे. महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी ग्रामीण विकास आणि परिवर्तनाचे साधन म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली आहे. साखर कारखान्यांनी साखर उत्पादनाबरोबर जोड/उपउत्पादने निर्माण करणारी कारखानदारी काढली. त्याचा शेती क्षेत्रावर अनुकूल परिणाम होऊन ग्रामीण भागात पायाभूत संरचनाही वाढत आहे. त्यामुळे साखर कारखानदारीला आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्व आहे. राज्यात २००४-०५ मध्ये १८५ तर २००५-०६ मध्ये १८७ साखर कारखाने होते.

प्रस्तुत प्रकरणामध्ये भारतातील साखर उद्योगाचे स्थान व प्रगती तसेच साखर उद्योगापुढील समस्या व त्यावरील उपाययोजना यासंबंधी विवेचन केलेले आहे.

सन १९०० पासून भारतात आधुनिक साखर उद्योगाचा विकास झाला. १७८४ ते १९१४ या काळात फक्त १८ साखर कारखाने स्थापन झाले होते. पहिल्या महायुद्ध काळात साखर उद्यघोगाच्या विकासाचा वेग कमी झाला. मार्च १९१८ मध्ये १०% मार्च १९२१ मध्ये १५%, मार्च १९२२ मध्ये २५% साखर आयात शुल्कात वाढ केली. १९३० मध्ये साखर कारखान्यांची संख्या २१ होती. २९ जानेवारी १९३१ रोजी सादर केलेल्या 'टॅरीक बोर्ड रिपोर्ट' मध्ये साखर उद्योगाला संरक्षण द्यावे व हे संरक्षण १५ वर्षे देण्यात यावे अशी शिफारस होती. त्याचा परिणाम १९३२ मध्ये ब्रिटिश सरकारने भारतीय साखर उद्योगाला संरक्षण दिले. त्यामुळे भारतीय साखर उद्योगाच्या विकासाला चालना

मिळाली. स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय साखर उद्योगाच्या विकासाला चालना मिळाली. स्वातंत्र्यपूर्व काळातील साखर उद्योगाची प्रगती पुढील तक्ता क्रमांक ३.१ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्रमांक ३.१**

**स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय साखर उद्योगाची प्रगती**

| वर्ष | साखर कारखान्यांची संख्या | निर्देशांक | साखर उत्पादन (लाख टन) | निर्देशांक |
|---|---|---|---|---|
| १९१४ | १८ | १००.०० | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही |
| १९२३ | २० | १११.०० | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही |
| १९२५ | २१ | ११६.६६ | उपलब्ध नाही | उपलब्ध नाही |
| १९३० | २१ | ११६.६६ | १.२ | १००.०० |
| १९३२ | ३२ | १७७.७७ | १.६ | १३३.३३ |
| १९३७ | १३८ | ७६६.६६ | १०.० | ८३३.३३ |
| १९४०-४१ | १४८ | ८२२.२२ | ११.२ | ९३३.३३ |
| १९४५-४६ | १४५ | ८०५.५५ | ९.६ | ८००.०० |
| (**संदर्भ :** गोडवा, साखर भवन, मुंबई, २१, मे १९८८ पा.नं,१२) | | | | |

**तक्ता क्रमांक ३.२**

**भारतीय साखर उत्पादक राज्ये**

| राज्ये | साखर उत्पादन (% मध्ये) |
|---|---|
| पंजाब | १.८ % |
| हरियाणा | २.१ % |
| गुजरात | ६.१ % |
| महाराष्ट्र | २७.१ % |
| कर्नाटक | १०.२ % |
| उ. प्रदेश | ३०.१ % |
| बिहार | २.२ % |
| आंध्र प्रदेश | ६.४ % |
| तामिळनाडू | १०.९ % |

(**संदर्भ :** ISMA Handbook of Sugar Statistics, Sep. 2006, KPMG analysis.)

**तक्ता क्रमांक ३.३**

**स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय साखर कारखान्यांची संख्या**

| कालावधी | | क्षेत्रे | |
|---|---|---|---|
| | खाजगी | सार्वजनिक | सहकारी |
| २००१-०२ | १४० | ३७ | २५९ |
| २००२-०३ | १४५ | ३७ | २५१ |
| २००३-०४ | १५५ | २९ | २६९ |
| २००४-०५ | १५९ | २९ | २३५ |
| २००५-०६ | १६६ | ३० | २८४ |
| २००६-०७ | १८४ | २९ | २४० |
| (**संदर्भ :** ISMA, KPMG, Analysis.) | | | |

वरील तक्ता क्र. ३.२ नुसार भारतातील साखरेचे सर्वाधिक उत्पादन उत्तर प्रदेशमधून होते, त्या खालोखाल महाराष्ट्राचा दुसरा तर तामिळनाडूचा तिसरा क्रमांक लागतो. तर तक्ता क्र. ३.३ नुसार भारतात साखर कारखान्यांची संख्या सातत्यपूर्ण रितीने वाढल्याचे दिसतो. सार्वजनिक क्षेत्राच्या तुलनेत खाजगी व सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या साखर कारखान्यांची संख्या सन २००१-०२ पासून वाढल्याचे दिसते. सन २००६-०७ मध्ये सहकारी साखर कारखान्यांची संख्या २४० इतकी आहे. तर खाजगी मालकीचे एकूण १८४ साखर कारखाने कार्यरत आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर साखर कारखान्यांच्या संख्येत वाढ झाल्याचे दिसून येते.

अलीकडील काही वर्षात सहकार तत्वावर आधिकाधिक साखर कारखाने स्थापन करण्यात येत आहेत. सहकारी तत्त्वावर साखर कारखाने काढण्याची प्रथा महाराष्ट्रात सुरू झाली व इतर घटक राज्यात पसरली. साखर उद्योगाच्या बाबतीत सहकारी तत्वाने घट्ट मुळ धरले आहे. ऊस उत्पादक शेतकरी साखर कारखान्याचे भागधारक असल्यामुळे लाखो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना सहकारी साखर कारखान्यापासून लाभ मिळत आहे.

खासगी मालकीच्या साखर कारखान्यांशी तुलना करता, सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत काही फायदे आहेत. सहकारी साखर कारखान्यांच्या आजूबाजूला ऊस पिकविणाऱ्या क्षेत्रातील शेतकरी भागधारक असल्यामुळे व त्यांच्या ऊसाला ठरलेली किंमत व ऊस विकल्याबरोबर ताबडतोब रोख किंमत मिळत असल्यामुळे सर्वसाधारणपणे सहकारी साखर कारखान्यांना आवश्यक असलेला ऊसाचा नक्की पुरवठा होत राहतो व त्या बाबतीत सहकारी साखर कारखान्यांच्या व्यवस्थापकांना कच्च्या मालाच्या पुरवठ्याबाबत काळजी करण्याचे कारण राहत नाही.

सहकारी साखर कारखान्यांनी मिळविलेला नफा खासगी व्यक्तिंच्या खिशात न जाता हजारो ऊस उत्पादकांमध्ये वाटला जातो. या कारखान्यांनी ऊस उत्पादकांचे उत्पन्न वाढविण्यास खूपच हातभार लावला आहे.

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांनी ऊस उत्पादक भागधारकांकडून वर्गणीच्या रूपाने पैसा गोळा करून ग्रामीण भागात बालवाड्या, अंगणवाड्या, शाळा, कॉलेजेस, दवाखाने इ. स्थापन करून सहकारी साखर कारखान्यांच्या आजूबाजूला ग्रामीण प्रदेशांचा चेहरामोहराच बदलून टाकला आहे. या कारखान्यांमुळे ग्रामीण भागात लोकांना मोठ्या संख्येने रोजगार उपलब्ध झाला आहे. त्या भागात औद्योगिक संस्कृती व आधुनिक विचार पसरण्यास मदत झाली आहे. मध्यवर्ती सरकारचे असे धोरण आहे की, यापुढील सर्व साखर कारखाने सहकारी क्षेत्रातच काढावयास परवानगी घ्यावयाची.

साखर कारखान्यांचे हे फायदे असले तरी काही बाबतीत या कारखान्यांवर कठोर टीका केली जात आहे. ऊसाची किंमत शेतकऱ्यांना देताना त्यांच्याकडून सक्तीने काही रक्कम गोळा केली जाते. सहकारी साखर कारखान्यांमध्ये व्यवस्थापक मंडळाकडून पैशाची मोठ्यज्ञा प्रमाणात उधळमाधळ होते, त्याचबरोबर पैशाच्या बाबतीतील गैरव्यवहार इत्यादी प्रकारही काही कारखान्यामध्ये आढळतात, ते राजकारणाचे अड्डे बनले आहेत व सहकारी साखर कारखाने पक्षीय राजकारणासाठी वापरले जात आहेत. साखर कारखान्यांमुळे ग्रामीण भागाच्या औद्योगिकीकरणास चालना मिळाली. महाराष्ट्रात विशेषत: पश्चिम महाराष्ट्रामध्ये सहकारी साखर कारखानदारीचा विकास मोठ्या प्रमाणात झाला. तथापि, राज्यातील तसेच देशातील साखर कारखान्यांना अनेक समस्यांनी ग्रासलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने नैसर्गिक पर्जन्यमान, अपुरा ऊस पुरवठा, ऊसाच्या अनियमित पुरवठा, ऊसाचा अयोग्य मोबदला, उत्पादन खर्चातील मोठी वाढ, कामगारांच्या हंगामी रोजगारीची समस्या, साखर उद्योगाची तुलनात्मक गाळपाची क्षमता कमी, सरकारचे धोरण, साखर उद्योगातील राजकारण, गुळ व खांडसरी उद्योगाशी स्पर्धा, जुनी यंत्रसामुग्री, अकार्यक्षम व्यवस्थापन, प्रादेशिक असमतोल इ. महत्त्वाच्या समस्यांची सविस्तर चर्चा पुढील प्रमाणे केली आहे.

**१) दर एकरी ऊसाची अल्प उत्पादकता :-**

भारतात प्रति हेक्टर ऊसाचे उत्पादन सापेक्षतेने अल्प आहे. आधिकाधिक सिंचन सोयी उपलब्ध करून देऊन व जादा खत व चांगले बी-बियाणे वापरून प्रतिहेक्टरी उसाच्या उत्पादनाचे प्रमाण वाढविले जाणे यावर उद्योगाच्या भावी काळातील प्रगतीच्या दृष्टीने आवश्यक आहे.

**२) उसाचे अयोग्य वाटप :-**

काही ठिकाणी उसाची प्रचंड कमतरता तर त्याचवेळी काही ठिकाणी साखर कारखान्यांसाठी

उसाचा अतिरिक्त पुरवठा अशी असमाधानकारक उसाच्या वाटपाची स्थिती आढळून येते. उसाच्या अशा प्रकारच्या असमान वाटपातून मार्ग काढणे आवश्यक आहे.

### ३) गळीताच्या कमी कालावधीचा हंगाम :–

भारतात ऊसाचा पुरवठा हंगामी स्वरूपाचा आहे व त्यामुळे देशातील साखर कारखान्यांपुढे गंभीर स्वरूपाच्या समस्या उद्‌भवतात. ऊसाच्या पुरवठ्याचा हंगाम सुमारे १०० ते १२० दिवस मुदतीचा म्हणजेच ३ ते ४ महिन्यांचाच असतो. यामुळे साखर कारखान्यांतील रोजगार हंगामी स्वरूपाचा असतो. त्यामुळे साखर कारखान्यांतील यंत्रसामग्री विनाउपयोग बराच काळ पडून राहते व साखरेच्या उत्पादन खर्चातही वाढ होते.

### ४) साखर कारखानंची अल्प कार्यक्षमता :–

भारतातील साखर कारखान्यांची कार्यक्षमता सापेक्षतेने अत्यल्प आहे. परिणामी ऊसापासून मिळणाऱ्या साखरेची उपलब्धता खूपच कमी आहे.

### ५) साखर उद्योग व ऊस उत्पादन करणारी क्षेत्रे यांच्यामधील समस्या :–

जगातील काही देशांमध्ये साखर कारखान्यांच्या स्वत:च्या मालकीची ऊस पिकविणारी क्षेत्रे आहेत. त्यामुळे ऊसाचा पुरवठा व साखर कारखान्यांचे कार्य यामध्ये सुरळीत संबंध राखता येणे शक्य होते. भारतात बहुसंख्य साखर कारखान्यांची स्वत:च्या मालकीची क्षेत्रे नाहीत, या कारणाने बहुसंख्य साखर कारखान्यांपुढे पुरेसा व नियमित असा ऊसाचा पुरवठा कसा करता येईल ही समस्या नेहमी भेडसावित असते.

### ६) ऊसापासून तयार होऊ शकणाऱ्या उप–उत्पादनांच्या (By Products) उत्पादनाची समस्या :–

ऊसापासून साखरेचे उत्पादन केले जात असताना ऊसाचा रस काढला गेल्यावर उरणारे चिपाड व पुढे साखरेची मळी उपलब्ध होतात. आजपर्यंत चिपाडांचा उपयोग केला जात असे. पण चिपाडापासून कागद व पुठ्ठे तयार होऊ शकतात, तर मळीपासून अल्कोहोल, दारू व इतर रासायनिक पदार्थ तयार होऊ शकतात. परंतु अशी उप–उत्पादने करण्यासाठी फार मोठी गुंतवणूक करणे आवश्यक आहे. भारतातील साखर कारखान्यांचा आकार लहान असल्याने उप–उत्पादनांच्या उत्पादनाची समस्या निर्माण होते व अशी चिपाडे व मळी हा कच्चा माल वाया जातो.

### ७) साखरेची वाढती किंमत :–

भारतातील साखरेचे उत्पादन सतत वाढत असले तरी साखरेची किंमतही सातत्याने वाढत आहे व त्याचा भार उपभोक्त्यांवर पडतो. आंतरराष्ट्रीय बाराजातील साखरेच्या किंमतीच्या मानाने भारतात

तयार होणाऱ्या साखरेची किंमत फारच मोठी आहे. त्यामुळे साखरेची आंतरराष्ट्रीय बाजारातील मागणी कमी होते म्हणून निर्यातीचे प्रमाणही कमी होते.

**८) ऊसापासून तयार होणाऱ्या गुळ व खांडसरी उद्योगांमुळे निर्माण होणारी समस्या :-**

भारतातील लाखो खेड्यांमध्ये आजही गुळाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्यामुळे गुळाची किंमत वाढू लागली कि ऊस हा साखरेच्या उत्पादनाऐवजी गुळ उत्पादनासाठी वापरला जातो व साखर कारखान्यांसाठी पुरविल्या जाणाऱ्या ऊसाच्या पुरवठ्यात घट येते. त्यामुळे भारतातील साखर कारखाने ऊसाच्या पुरवठ्यासंदर्भात नेहमीच संचित असतात.

भारतात साखर उद्योगाने मोठ्या प्रमाणावर प्रगती केली आहे हे निश्चत परंतु भविष्यात साखर उद्योगाचा पाया अधिक मजबूत व्हावा व त्याची प्रगती व्हावी यादृष्टीने साखर उद्योगापुढील समस्या समाधानकारक रीतीने सोडविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने समन्वित असे साखर उद्योगाबाबत धोरण आखण्याची व त्याची कार्यवाही होण्याची आवश्यकता आहे.

❑ **उपाययोजना :-**

याबाबतची उपाययोजना पुढील प्रमाणे सुचविता येईल.

**१) ऊसाचा योग्य पुरवठा :-**

देशातील साखर कारखान्यांना ऊसाचा पुरवठा बाराही महिने चालू राहील अशा तऱ्हेची व्यवस्था करणे आवश्यक आहे. ऊसाची दोन किंवा तीन पिके काढणयसाठी सिंचनसोयी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे लवकर तयार होणाऱ्या ऊसाच्या नव्या जाती-बीयाणांचा शोध घेण्यासाठी संशोधन होणे जरूरीचे आहे.

**२) ऊसाला योग्य भाव/किंमत देणे :-**

सहकारी साखर कारखान्यांपासून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पादनाचा खर्च भागून त्याला किमान नफा प्राप्त होईल या अनुषंगाने त्याने पुरविलेल्या ऊसाला योग्य भाव देणे आवश्यक आहे की, ज्यामुळे शेतकरी अधिक प्रमाणात ऊसाचे पिक घेण्यास उद्युक्त होईल व ऊसाा पुरवठाही वाढेल. ऊस उत्पादक शेतकऱ्याला परवडेल असा उसाचा भाव निश्चित करणारी सरकारी धोरणे आखणे आवश्यक आहे.

**३) ऊस उत्पादन व पाणीपुरवठा यामध्ये सहसंबंध :-**

ऊस उत्पादन करताना इतर पिकांच्या तुलनेत अधिक पाण्याची मात्रा द्यावी लागते. त्यामुळे पाणी पुरवठ्यावरील खर्च वाढत जातो. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी पाटाने पाणी न देता ठिंबक

सिंचन सोयीचा वापर वाढविला पाहिजे. ठिंबक सिंचन सुविधा मोठ्या प्रमाणात वापरता यावी यासाठी स रकारने अनुदान देण्याची उपाययोजना करावी कि ज्यामुळे शेतकऱ्याला कमी पाण्यावर ऊस उत्पादन घेता येईल व त्यावरचा खर्चही कमी होईल.

### ४) योग्य प्रमाणात उस उत्पादन घेणारे पूरक उद्योगांची स्थापना :-

ऊसापासून दुय्यम तयार करावयाचे झाल्यास फार मोठी गुंतवणूक करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर चिपाडे व मळी यासारखा कच्चा मालाचा पुरवठा होणेही आवश्यक आहे. याकरिता साखर कारखान्यांचे आकारमान वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी अनुदानित कर्जपुरवठाकरणे, नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक आहे अशा तंत्रज्ञानाची आयात बाहेरील देशातून करावी व साखर उद्योगाला योग्य प्रमाणात उप-उत्पादन घेणारे पूरक उद्योग स्थापन करता यावेत याकरिता सरकारने पुढाकार घेऊन स्वतंत्र धोरण आखणे आवश्यक आहे. अलिकडे महाराष्ट्रात काही साखर कारखाने एकत्र येऊन चिपाडे व मळी एकत्रित करून त्यांच्यापासून अल्कोहोल, दारू व इतर रासायनिक पदार्थ तयार करीत असल्याचे आढळून येते. ऊसापासून तयार होणाऱ्या दुय्यम उत्पादनांचा भरपूर वापर करून घेणे आवश्यक आहे. भारतातील सहकारी साखर कारखान्यांनी इथेनॉल प्रकल्प सुरू केल्यास साखरेच्या किंमतीतील चढउतारामुळे होणारे नुकसान भरून काढता येईल. भारतातील सहकारी साखर क्षेत्राने हा बदल स्वीकारणे आवश्यक आहे.

### ५) साखर निर्यातीला चालना :-

आंतरराष्ट्रीय बाजारातील साखरेच्या किंमतीबरोबर भारतातील साखरेची किंमत ठेवण्याकरिता भारतीय देशांतर्गत बाजारपेठेतील साखरेची किंमत स्थिर ठेवणे आवश्यक आहे. काहीवेळा अवपुंजनासारख्या मार्गाचा वापर करून भारतीय साखरेची निर्यात वाढविणे आवश्यक आहे. त्याकरिता साखर उत्पादनाचा खर्च कमी करणे, साखरेच्या प्रशासकीय किंमती स्पर्धात्मक स्वरूपाच्या निश्चित करणे इ. उपायांचा अवलंब करणे आवश्यक आहे कि, ज्यामुळे साखर निर्यातीचे प्रमाण वाढविणे शक्य होईल.

### ६) नवीन यंत्रसागग्री व तंत्रज्ञानाचा वापर :-

भारतातील बरेचसे साखर कारखाने जुने आहेत. ज्या कारखान्यांची यंत्रसामग्री जुनी व कालबाह्य झाली आहे, त्यांचे वाजवीकरण करणे आवश्यक आहे. कारखान्यांची क्षमता वाढविणे व त्यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रे व तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे. यासाठी लहान व जुन्या कारखान्यांना नाबार्ड तसेच राज्य सहकारी बँकांनी पुरेशी मदत करावी व सवलतीच्या दरात भांडवलपुरवठा/कर्जपुरवठा करणे आवश्यक आहे.

**७) सहकारी साखर कारखान्यांचे खाजगीकरण करणे :-**

सहकारी साखर कारखाने तोट्यात जाण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या संस्थांचे गैरव्यवस्थापन व सत्ताधारी लोकांची मक्तेदारी होय. ज्या संस्थांच्या संचालक मंडळाने सुरुवातीपासून व्यवस्थापन चांगले ठेवले त्यांची परिस्थिती चांगली आहे. परंतु काही संस्थांचे व्यवस्थापन चांगले नाही, संचालकांच्या हस्तक्षेपामुळे ही व्यवस्था बिघडली आहे. अशा संस्था तोट्यात गेल्या आहेत. संचालक मंडळाचा पाच वर्षाचा कार्यकाल संपेपर्यंत त्यांच्या हातात अशा संस्थांची सुत्रे असल्यामुळे त्यांच्या कारभारात कमालीचा गोंधळ व गैरव्यवहार आढळतो, म्हणून आर्थिक व्यवहारात कोठेही पारदर्शकताघ नसते. त्यामानाने खाजगी क्षेत्रात स्वत:च्या मालकीचे कारखाने कार्यरत आहेत ते लाखोंचा फायदा कमवताना आढळतात, त्यामुळे या क्षेत्रात अंशत: खाजगीकरण करणे आवश्यक वाटते.

**८) विभागीय पध्दती** (Zonal System) **:-**

ऊसाच्या योग्य वाटपाची समस्या सोडविण्यासाठी विभागीय पध्दती (नेपरश्र ड्ढींशा) चा अवलंब करण्यात येत आहे. राज्यातील अनेक साखर कारखान्यासाठी ऊसाचे विशिष्ट क्षेत्र ठरवून देणे आवश्यक आहे.

**९) अद्ययावत तंत्रज्ञानाचा अभाव :-**

भारतात प्रतिहेक्टरी ऊसाचे उत्पादन वाढविण्यासाठी अधिक जलसिंचन सोयी, ठिंबक सिंचन पध्दतीचा मोठ्या प्रमाणावर वापर घेणे, उत्तम प्रकारचे बीयाणे निर्माण करणे आवश्यक आहे, ज्यामुळे प्रतिहेक्टरी ऊसाचे उत्पादन वाढून साखर उद्योगाची भविष्यात प्रगती होईल.

याबरोबरच सहकारी साखर उद्योगातील संचालक व राजकारणी मंडळींना शिस्त लावणे आवश्यक आहे, अवास्तव खर्च बंद करणे, उत्पादन खर्चात घट करणे, कामगारांना पूरक रोजगाराची व्यवस्था करणे, साखर कारखान्यांच्या गाळप क्षमतेत वाढ करणे व उताऱ्याचे प्रमाण योग्य ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याकडे लक्ष पुरविणे गरजेचे आहे.

## ३.२.२ सहकारी दुग्ध प्रक्रिया संस्था : समस्या व उपाय

दुग्ध व्यवसाय हा शेती व्यवसायाशी पूरक असा व्यवसाय आहे. भारतातील दुग्ध व्यवसाय व महाराष्ट्रातील दूध व्यवसाय यामध्ये साम्य आढळून येते. दुग्ध व्यवसायाशी निगडीत गायी, म्हैशी, मेंढ्या इ.मुळे दुग्ध निर्मिती होते. त्याशिवाय शेण व लेंढ्यापासून खत निर्मिती होते. दुधापासून तूप, लोणी, दही, श्रीखंड इ. पदार्थ निर्माण केले जातात.

दूध उत्पादनात भारत संपूर्ण विश्वामध्ये पहिल्या क्रमांकावर असून जागतिक दुग्ध उत्पादनातील

१७% दूध उत्पादन भारतात होते. भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सुदृढ बनविण्यामध्ये शेती नंतर दुग्ध उद्योगाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. दुसऱ्या स्थानावर अमेरिका तर तृतीय स्थानावर पाकिस्तानचा क्रमांक लागतो.

ग्रामीण भागातून दूध संकलन करण्यासाठी गाव स्तरावर प्राथमिक सहकारी संस्था, तालुका आणि जिल्हा स्तरावर सहकारी दूध संघ आणि त्यांच्यामार्फत होणारी शासनाकडील दूध स्वीकृती अशा तऱ्हेची साखळी निर्माण करण्याच्या दृष्टीने जिल्हा स्तरावर जिल्हा दुग्धव्यवसाय आधिकारी या पदाची निर्मिती १९७८ मध्ये करण्यात आली. तसेच त्यांना मदत करण्यासाठी सहाय्यक जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी आणि सहनिबंधंक (सहकारी संस्था) व इतर कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली.

दुग्धव्यवसाय हा शेतीचा जोडधंदा म्हणून केला जातो. ग्रामीण भागात उत्पादित केलेले दुग्ध शहरी ग्राहकांना रास्त दराने पुरविण्यासाठी शासन कटिबध्द आहे. याकरिता महाराष्ट्र राज्यात दुधाचे संकलन, वाहतूक, प्रक्रिया, पॅकेजिंग करण्याकरिता सुविधा निर्माण केल्या आहेत. १९६० पर्यंत फक्त मुंबईसाठी असलेले शासकीय दूध वितरण हळूहळू महाराष्ट्रातील अन्य शहरांमध्ये सुरु करण्यात आले; त्यात प्रामुख्याने पुणे, नागपूर व नाशिक इ. शहरांचा समावेश होतो.

सहकारी दुग्ध संस्था स्थापन करणे, शेतकऱ्यांना सवलतीच्या योजना देणे, दुग्ध उत्पादनात वाढ करणे, खाजगी तबेल्यांना परवाना देणे व त्यांच्याकडून परवानशुल्क वसूल करणे इ. स्वरूपाचे काम जिल्हा दुध उत्पादक सहकारी प्रक्रिया संस्था करीत असतात. खेड्यातून होणारा दुग्धपुरवठा मोसमी स्वरूपाचा असल्याने पावसाळ्यात व हिवाळ्यात त्यात वाढ होई व उन्हाळ्यात घट होई. पावसाळ्यात दुग्धोत्पादन वाढल्याने उत्पादकाला कमी किंमत मिळत असे. वाढीव दूधापासून मलई, खवा, दही, तूप, ताक, लोणी, श्रीखंड, बासुंदी, पनीर इ. पदार्थ बनविले जात असत. खाजगी क्षेत्राकडे दुग्धव्यवसायाचा एकाधिकार असावयाचा. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शहराचे औद्योगिकीकरण झपाट्याने झाल्याने तेथील लोकवस्तीत भरमसाठ वाढ झाली. भारतात १९७१ साली १० लाख लोकवस्ती असलेली ९ शहरे होती, जवळपास ११ कोटी शहरवासियांपैकी २ कोटी लोक मुंबई, मद्रास, दिल्ली व कलकत्ता या चार शहरांमध्ये राहत होते. आज ही संख्या कैक पटींनी वाढली आहे. त्यामुळे शहरवासियांची दुधाची मागणी वाढून ती ७३% झाली. तर दुध उत्पादनातील वाढ ही केवळ २१% होती. केंद्र शासनाने १९६५ मध्ये राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ स्थापन केले. ज्या मंडळाचा मुख्य उद्देश राज्य शासनाच्या आनंद पॅटर्नच्या धर्तीवर दुग्धोत्पादकांनी सहकारी संघ स्थापन करण्यास मदत करते हा आहे. या मंडळाने ‘ऑपरेशन फ्लड’ नावाच्या प्रकल्पाची १९६८-६९ मध्ये आखणी करून त्याची दुग्ध व्यवसाय महामंडळामार्फत कार्यवाही पण सुरू केली. जागतिक अन्न व शेती संघटना आणि जागतिक अन्न कार्यक्रम यांच्याकडून ‘ऑपरेशन फ्लड’ या प्रकल्पाला मदत मिळाली आहे. ही

मदत १९७०-७५ अखेर टप्प्याटप्प्याने ३ लाख ९६ हजार टन स्किल दुधाची भुकटी, ४२००० टन निर्मळ दुग्धवसा (बटर फॉईल) या रुपाने करण्यात आली आहे. यापासून बनविलेले दूध विकून त्यापासून मिळणाऱ्या ९० कोटी ५४ लाख रुपयांचा विनियोग या कार्यासाठी करण्यात आला.

दूध हा नाशवंत पदार्थ असल्यामुळे तो ग्राहकापर्यंहकत सुस्थितीत पोहोचविण्यासाठी त्यावर योग्य ती प्रक्रिया करणे ही आधुनिक दुग्ध व्यवसायामध्ये अत्यावश्यक बाब आहे. वाढती मजूरी, दुग्धोत्पादनातील वाढ, सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टिकोनातून या व्यवसायावर आलेली बंधने, धातु विज्ञान, अभियांत्रिकी व प्रशीतन तंत्र यामध्ये झालेल्या प्रगतीमुळे दुधावर करण्यात येणाऱ्या प्रक्रियेसाठी यंत्राचा वापर दिवसेंदिवस आधिकाधिक होत आहे. भारतामध्ये दुग्धव्यवसायातील प्रक्रिया आणि वितरण या बाबींना चालना मिळाली ती शहरातील वाढत्या मागणीमुळे व त्यामुळेच या व्यवसायाचे आधुनिकीकरण करण्यात आले. पारंपारिक, खाजगी, राज्यशासनाची दुग्धविकास खाती व सहकारी संस्था या चार मार्गांनी दुधावरील प्रक्रिया आणि वितरण होऊन ग्राहकांना दूधपुरवठा करण्यात येतो. पारंपारिक पध्दतीमध्ये दुधाचे उत्पादन करणारे लोकच ग्राहकांना दुधाचे रतीब घालीत किंीवा अडत्याला ते विकित. हे दूध मिळेल त्या उपलब्ध वाहणाने, डोक्यावरून, सायकल, घोडगाडी, मोटार, रेल्वे इ. ने शहरांकडे नेण्यात येते. मुंबईसारख्या मोठ्या शहरांमध्ये तेथील लोकवस्तीतील दुग्धशास्त्र व आजूबाजूच्या ग्रामीण भागातील दूध उत्पादक किंवा अडते लोक दूध घरपोच करीत असत. अद्यापही मोठ्या शहरांचा दुग्धपुरवठा काही प्रमाणात या पारंपारिक पध्दतीने चालू आहे. यामध्ये दूधावर कधिही प्रक्रिया केली जात नाही. खाजगी क्षेत्रांमध्ये दुग्धोत्पादन करून अथवा ग्रामीण भागातील दूध गोळा करून खाजगी दुग्ध प्रक्रियालयात प्रक्रिया करून त्यांच्याच वितरण यंत्रणेमार्फत ग्राहकांना पुरवितात. काहीवेळा खाजगी क्षेत्रामधील दुग्धोत्पादक त्यांच्या जवळील अतिरिक्त दूध राज्य शासनाच्या दुग्धप्रक्रियालयाकडे पाठवितात. दूध उत्पादकांकडून दूध गोळा करून संस्थेच्या प्राथमिक प्रक्रिया केंद्रामध्ये त्यावर प्रक्रिया करून ते ग्राहकांना त्यांच्याच वितरण केंद्रामार्फत पुरविण्यात येते. दिवसेंदिवस दुग्धोत्पादकांचे सहकारी संघ व दुग्ध व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्था यांच्या संख्येत वाढ होत आहे. भारतातील दुग्धव्यवसायाची वाटचाल १९२० नंतर सहकारी तत्त्व प्रणालीचा वापर करून चालू आहे. राज्य आणि केंद्र शासनाच्या प्रयत्नांची दिशाही हीच आहे. १९६९ अखेर सहकारी दुग्धोत्पादकांचे १४३ संघ, १००१० प्राथमिक सहकारी प्रक्रिया केंद्रे, ३८ सहकारी दूध योजना, ५ सहकारी पशुखाद्य कारखाने व ११ सहकारी दूध प्रक्रियालये स्थापण्यात आली. महाराष्ट्रात दोन मोठी सहकारी दुग्ध प्रक्रियालये वारणानगर (कोल्हापूर) आणि जळगांव येथे स्थापन होऊन त्यांचे कामकाजही मोठ्या प्रमाणावर चालू आहे.

सहकारी दूध प्रक्रिया उद्योगांमध्ये दूध प्रक्रिया करण्याचे प्रतिमान (Model) पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. ३.४**

**सहकारी दूध प्रक्रिया उद्योगांमध्ये दूध प्रक्रिया करण्याचे प्रतिमान** (Model)

| अ.नं. | घटक | प्रमाण (%) |
|---|---|---|
| १) | कच्चे दूध | ३० % |
| २) | फरमेंटेड बटर | ३८ % |
| ३) | दूध पावडर | ०८ % |
| ४) | पाश्चराईज दूध | १५ % |
| ५) | योगई व दही | १ % |
| ६) | इतर चिझ | १ % |
| ७) | QYD (कॉटेज चिज) | ६ % |
| ८) | पाश्चराईज्ड टेबल बटर | १ % |
| **संदर्भ स्रोत** (Souce) : Basic Animal Husbandary Statistics. | | |

**तक्ता क्र. ३.५**

**भारतीय दुग्ध व्यवसायाची रचना**

**भारतीय दूध उद्योग**

संघटीत (२०%)
औपचारिक

असंघटित (३०%) अनौपचारिक
उदा.ग्रामीण फिरते विक्रेते (गवळी)
स्थानिक हलवाई, लहान समाजातील
खाजगी दुग्धालय

खाजगी दुग्धशाळा (Dairies)
५२३
उदा. Nestle, Smith,
Kline इ.

सहकारी सोसायट्या
३५४

सरकारी दुग्धशाळा
४६

**संदर्भ स्रोत** (Souce) : Global Agribusiness & food processing summit, 12.

**तक्ता क्र. ३.६ : भारतीय सहकारी दुग्ध प्रक्रिया संस्थांची रचना**

| अ.नं. | घटक | संख्या |
|---|---|---|
| १) | सर्वोच्च पातळीवरील संघ (राज्य) | १ |
| २) | जिल्हा पातळीवरील दुध उत्पादक संघ | १७ |
| ३) | ग्रामीण स्तरावरील/प्राथमिक सहकारी सोसायट्या | ०८ % |
| **संदर्भ स्रोत** (Souce) : Global Agribusiness & food processing summit, 12. | | |

**अ) भारतातील दूध उत्पादनाची सद्यस्थिती (सन २०१९ ची आकडेवारी)**

१) दूध उत्पादनाचे एकूण आकारमान - 187.7 MMT

२) गाईच्या दूध उत्पादनाचे एकूण आकारमान - 78.1 MMT

३) भारतातील सर्वाधिक दूध उत्पादनाचे राज्य - उत्तर प्रदेश.

**ब) ग्रामीण भागातील दूध उत्पादनाची स्थिती (सन २०१९ ची)**

१) दूध उत्पादनाचे प्रमाण (हिस्सा) - 92 %.

२) तूप उत्पादनाचा हिस्सा - 5 %

३) इतर दूध प्रक्रिया घटकांचे प्रमाण - 3 %

४) प्रतिमहा दरडोई दुधावरील सरासरी खर्च प्रमाण - 193 INR.

**क) शहरी भागातील दूध उत्पादनाची स्थिती (सन २०१९ ची)**

१) प्रतिमहा प्रतिडोई दुधावरील सरासरी खर्च प्रमाण - 285 INR.

२) दूध उत्पादनाचे प्रमाण (हिस्सा) - 85 %

३) योगर्ट/दही उत्पादनाचा हिस्सा - 4.3 %

४) इतर दूध प्रक्रिया घटकांचे प्रमाण - 10.7 %

**तक्ता क्र. ३.७**

**सन २०१७ च्या बाजार किंमतीनुसार** (भारतीय दूध उत्पादनाची एकूण किंमती अब्ज रुपयांमध्ये)

| घटक | एकूण किंमती | घटक | एकूण किंमती |
|---|---|---|---|
| चिज | २० | पनीर | ३०० |
| बटर | ३५ | दही व योगर्ट | ३५० |
| ताक/लस्सी | १३० | Souce : www.nddb.coop>information>stats | |

## ❑ भारतातील दूध सहकारी संस्थांसमोरील समस्या :-

भारतीय दूध व्यवसाय हा अलिकडे प्रगतीच्या मार्गाने जाणारा महत्वाचा उद्योग असून तो भारतीय शेतीला पूरक म्हणून कार्य करतो. ग्रामीण भागातील जवळपास ७०% लोकसंख्या या व्यवसायाशी जोडली गेलेली आहे. तथापि, या व्यवसायाच्या समस्या पुढीलप्रमाणे विचारात घेता येतील.

१) जागतिक पातळीवरील स्पर्धेत टिकून राहण्यासाठीची क्षमता देशातील सहकारी दूध व्यवसायात नाही. त्यांचे आकारमान व गुंतवणूक क्षमता खूपच कमी आहे.

२) दूध व्यवसायासाठी लागणारे आधुनिक तंत्रज्ञान भारतामध्ये उपलब्ध नाही.आजही पारंपारिक पध्दतीचा वापर केला जातो.

३) दुधाची मागणी व पुरवठा तसेच दुधावर प्रक्रिया केलेल्या उत्पादनांचीही मागणी व पुरवठा यामध्ये विसंगती दिसून येते, त्यामुळे किंमतीचा प्रश्न मोठा आहे.

४) उच्च दर्जाच्या दूध उत्पादनासाठी आवश्यक असणाऱ्या सदृढ जनावरांची गरज असते. भारतात पशुधनाची संख्या मोठी आहे, परंतु त्यांची उत्पादकता खूपच कमी आहे. त्यामुळे दूध उत्पादनांचा खर्च खूप मोठा असतो.

५) 'एक जिल्हा एक सहकारी दूध संस्था' हे प्रमाण दूध संस्थांचा विकासाबाबत अनुभवले जात होते. त्यामागे दूध संस्था कार्यक्षम व्हाव्यात ही कल्पना होती; परंतु अलिकडे शासनाने एका जिल्ह्यात अधिक दूध संस्था स्थापन करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे दूध संस्थांत स्पर्धा सुरू झाली आहे. त्यातून संस्था आर्थिक दृष्टीने सक्षम राहण्यासाठी किमान दूध संकलन करणे आवश्यक आहे, तेवढे त्या करू शकत नाहीत.

६) प्राथमिक दूध संस्था ग्रामीण भागातील दूध संकलन करून जिल्हा संघाकडे पाठवितात. दूधाचे उत्पादन दिवसेंदिवस वाढत आहे. दूध संघाची दूध संकलनाची क्षमता ठरलेली आहे. पावसाळ्यानंतर दूधाचा पुरवठा आणि काही वेळेस आधिक दूध स्वीकारणे दूध संस्थांना अवघड जाते.

७) दूध हा नाशवंत पदार्थ असल्याने त्याच्यावर ताबडतोब प्रक्रिया करावी लागते किंवा शीतगृहात ठेवावे लागते. दूध संघाने दूध नाकारल्यास शीतगृहाअभावी सभासदांना त्यांचा साठा करणे अवघड जाते. त्यामुळे नुकसान सोसावे लागते.

८) दूधाला मिळणारा चांगला भाव आणि मोठ्या शहरातून दूधाच्या वाढत जाणाऱ्या मागणीबरोबर दूधात भेसळ करण्याची प्रवृत्ती वाढत असून त्यामुळे दूध संस्थांद्वारे निर्भेळ दूधाचा पुरवठा करण्याच्या उद्देशाला तडा जात आहे.

९) दूध व्यवसायाद्वारे ताजा पैसा आणि आधिक नफा मिळत असल्याने खाजगी उद्योगांनी या क्षेत्रात प्रवेश केला असून सहकारी संस्थांना त्यांच्याकडून मोठी स्पर्धा होण्याची शक्यता आहे.

१०) दूध संघाकडे दूधावर प्रक्रिया करण्यासाठी वापरले जाणारे तंत्रज्ञान व यंत्रे जुनी असून त्यात बदल होणे आवश्यक आहे.

११) प्राथमिक दूध संस्थांना दिवसा ३०,००० लिटरपेक्षा जादा दूध उत्पादन करावयाचे असल्यास शासनाची परवानगी घ्यावी लागते, अशा नियमांमुळे दूध व्यवसायाचा विकास अडचणीत आला आहे.

१२) दूधाचा व दूग्धजन्य पदार्थांचा उत्पादन खर्च हा अपेक्षित मदतीपेक्षा आधिक आहे आणि या व्यवसायात उत्पादकांकडून व्यावसायिकांना अंगिकारली जात नाही.

१३) दूध नासू नये म्हणून दूधाची साठवणूक वातानुकूलित शीतगृहात करण्याची गरज असते. परंतु दूध शीतगृहांची संख्या उत्पादनाच्या तुलनेत कमी असल्याने अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

१४) सहकारी दूध प्रक्रिया उद्योगांना खर्च वजा जाता मिळणारा नफा हा अत्यंत कमी आहे तर काही दूध प्रक्रिया संघ तोट्यज्ञात चालताना आढळतात.

१५) सहकारी तत्वावर चालणाऱ्या दूध प्रक्रिया उद्योगांमध्ये संचालक, सभासद तसेच व्यवस्थापकांचा मोठा हस्तक्षेप असल्याने व्यावसायिक तत्वावर न चालवता ते राजकारणाचे आकडे बनलेले आढळतात.

१६) पक्षीय राजकारणासाठी अशा सहकारी प्रक्रिया दूध उद्योगांचा वापर केल्याचे सर्रास आढळते.

१७) सहकारी क्षेत्रातील प्रक्रिया उद्योगांपैकी साखर उद्योगांकडे शासनाचे अधिक लक्ष आहे, त्यामानाने दूध व्यवसायाच्या विकासाकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही.

सहकारी दुग्ध व्यवसायाच्या वरील समस्या सोडविण्यासाठी विविध प्रकारचे धोरणात्मक निर्णय घेण्याची गरज आहे. त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

## ❑ उपाययोजना :-

१) सहकारी दूध संस्थांच्या बाबतीत जिल्हा पातळीवर चालू असलेली स्पर्धा अनिष्ठ आणि या क्षेत्राला मारक आहे. राजकीय स्वार्थापोटी एकपेक्षा अधिक दूध संघ स्थापन करण्यास परवानगी केल्याचे धोरण असल्याचे दिसते. या संस्था आर्थिकदृष्ट्या कार्यक्षम होण्याकरिता

प्रयत्न होणे आवश्यक आहे. संस्थांना परवानगी देताना प्रति कि.मी. ३०० लीटर दूध संकलनाची खात्री बाळगणे व एक संघ उपलब्ध असताना त्याच ठिकाणी दुसऱ्या संघाची स्थापना करण्यास परवानगी देऊ नये?

२) भारतात दूध महापूर योजनेला खूप यश मिळाले व दुधाचे उत्पादन वाढले, परंतु त्यासाठीची दूध संकलन क्षमता मात्र त्यामानाने वाढली नाही. सरकारने दूध संघांना दूध संकलन क्षमता वाढविण्यासाठी परवानगी आणि मदत देणे आवश्यक आहे.

३) ऊसावर त्यांच्या उत्पादनानंतर लगेच प्रक्रिया करावी लागते, परंतु ऊसाचे उत्पादन वाढल्याने अस्तत्वात असलेल्या प्रक्रिया क्षमतेवर ताण पडतो यासाठी प्रत्येक जिल्हा पातळीवर प्रक्रिया क्षमता वाढविणे गरजेचे आहे, त्याचा फायदा दूध उत्पादकांना मिळू शकेल.

४) दूध व्यवसायाचा विकास होताना त्यातून होणाऱ्या फायद्यामुळे प्रक्रिया संस्थांची दूधात व दूध पदार्थात भेसळ करण्याची व दूध उत्पादनाची मानके व सांभाळण्याची वृत्ती वाढत आहे. ही वृत्ती या व्यवसायास मारक आहे. सहकारी दूध प्रक्रिया संस्थांनी व्यावसायिक नितिमत्ता जोपासावी. तसेच ऊर्जा व गुणवत्तेबाबत असणारी निर्देशित मानके सांभाळावीत.

५) सहकारी दूध प्रक्रिया संस्था सध्या वापरत असलेले प्रक्रिया तंत्रज्ञान जुने आहे. त्यांनी नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा. या संस्थांना खाजगी क्षेत्राकडून होणारी स्पर्धा वाढत असल्याने सहकारी प्रक्रिया संस्थांनी आपल्या तंत्रज्ञानात बदल करणे आवश्यक आहे.

६) जनावरांच्या पैदास व व पोषण तंत्रज्ञानात गेल्या काही काळात प्रचंड बदल झाले असून त्याची माहिती दूध संस्थांनी दूध उत्पादकांतून देणू आवश्यक आहे. त्यामुळे दुधाचा दर्जा सुधारून उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल.

७) सहकारी दूध संस्थांनी जनावरे पाळणे, त्यांची पैदास करणे, दूध उत्पादन, दूध संकलन इ. बाबतीत दूध उत्पादकांना प्रशिक्षण देण्याच्या सोयी केल्या पाहिजेत. त्यामुळे दूध व्यवसाय वाढीस मोठी मदत होईल.

८) शासन अनेक कारणांसाठी दूध उत्पादन व संकलनाबाबत बंधने घालते. त्याचा विपरीत परिणाम त्या व्यवसायावर होतो. उलट शासनाने दूध उत्पादन, संकलन व प्रक्रिया याबाबतीत प्रोत्साहनात्मक भूमिका स्विकारणे आवश्यक आहे. तसेच दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या निर्यातीला प्रोत्साहन देणारे धोरण स्विकारणे गरजेचे आहे.

९) प्रक्रिया क्षेत्रातील दूध व्यवसायाच्या वाढीबरोबर प्रक्रिया खर्चाच्या प्रमाणात वाढ होत आहे. हा खर्च असाच वाढत राहिला तर दूधाला योग्य भाव देणे शक्य होणार नाही.

त्याचा व्यवसाय वृध्दीवर विपरीत परिणाम होईल. यासाठी सहकारी दूध संघ आणि प्रक्रिया संस्थांनी आपल्या व्यवस्थापकीय खर्च कमी ठेवण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

१०) सहकारी दूध संस्थांनी दूध व उपउत्पादनांच्या निर्यातीवर भर द्यावा. त्यासाठी राज्य शासन व केंद्र शासनाचे पुरेसे सहकार्य व मदत वाढविणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने शासनाने दूध व्यवसाय नियोजनबध्द पध्दतीने कसा विस्तारित होईल यावर भर दिला पाहिजे.

याबरोबरच शेतकऱ्यांना संकरीत जनावरांचा पुरवठा करणे, जनावरांचा चारा साठवून ठेवणे, जनावरांना पौष्टीक आहार देणे, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांची व्यवस्था करणे, दुधाची मागणी व पुरवठा यामध्ये समन्वय साधणे, दूधापासून उपपदार्थ बनविणे, नवीन तंत्रज्ञानाची आयात करणे, जागतिक स्तरावरील स्पर्धात्मकता वाढविणे, दूधाचा दर्जा योग्य राखणे, शीतगृहांची आधिक सोय, व्यवस्था करणे आणि दूध उत्पादन खर्च नियंत्रीत करणे, वाहतुकीसाठी वातानुकूलित व्यवस्था निर्माण करणे, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची नियुक्ती व व्यवस्था करणे इ. उपाययोजनांचा अवलंब केला पाहिजे?

### ३.२.३ कामगार सहकारी संस्था (Labour Co-operative Societies) :

**भारतातील कामगार सहकारी संस्थांचा इतिहास :**

**पूर्व–स्वातंत्र्य काळ (Pre-Independence Era)** :

ब्रिटिशांनी १९०४ मध्ये ‘सहकारी पतसंस्था कायदा’ (Co-operative Credit Societies Act, 1904) लागू केला, ज्यामुळे सहकारी संस्थांना कायदेशीर मान्यता मिळाली. ज्यातून ग्रामीण कर्जबाजारीपणा कमी करण्याचा प्रयत्न झाला; मात्र कामगार चळवळीच्या संदर्भात, १८९० मध्ये एन.एम. लोखंडे यांनी स्थापन केलेली बॉम्बे मिल्स हँड्स असोसिएशन ही पहिली संघटना मानली जाते, आणि त्यानंतर ससिपदा बॅनर्जींनी १९७० मध्ये वर्किंग मॅन क्लब सुरू केला, यातून कामगार हक्क आणि कल्याणकारी संस्थांची पायाभरणी झाली, ज्यातून कालांतरास कामगार सहकारी संस्थांचा विकास झाला, ज्याचा उद्देश कामगारांना संघटित करणे आणि त्यांचे आर्थिक शोषण थांबवणे हा होता, जसे की १९२५ मध्ये केरळमध्ये स्थापन झालेली उरलुंगल लेबर कॉन्ट्रॅक्ट कोऑपरेटिव्ह सोसायटी (ULCCS) यांसारख्या संस्थांनी स्वातंत्र्यापूर्वीच काम सुरू केले होते. ही भारतातील सर्वात जुनी हयात असलेली कामगार सहकारी संस्था मानली जाते, जी बांधकाम क्षेत्रात काम करते. स्वदेशामध्ये देशातील उद्योगाना चालना देण्यासाठी मोठया प्रमाणात चळवळी सुरू झाल्या यातून कामगार सघटना एकजूट होऊन स्वदेशी सहकारी संस्थांनी वसाहतवादी राजवटीविरुद्ध एकजूट आणि सामूहिक प्रतिकाराचे प्रतीक म्हणून काम सुरू केले. १९०४ चा हा कायदा सुरुवातीला केवळ पतपुरवठा करणाऱ्या संस्थांपुरता मर्यादित होता.नंतर तो सुधारणा करून १९१२ मध्ये संपूर्ण सहकार क्षेत्राला लागू केला.

जरी १९०४ चा कायदा प्रामुख्याने शेती पतपुरवठ्यासाठी होता, तरीही यानंतरच्या काळात कामगार

आणि विणकर संघटनांनी एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर काम सुरू केले आणि या कायद्याचा आधार घेऊन सहकारातून विकास साधता येतो, संघटना कामगाराना अनेक सोई सुविधा उपलब्ध करून देतात यामुळे गिरणी कामगार आणि कापड संबंधित अनेक संघटना नवीन निर्माण होऊ लागल्या.

**स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचा काळ** (Post-Independence Era) **:**

स्वातंत्र्यानंतर, नवीन सरकारने विकेंद्रीकरण आणि आर्थिक विकासाच्या योजनांमध्ये सहकारी संस्थांना महत्त्वाचे स्थान दिले. पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून सहकारी संस्थांना शासकीय योजनांचा अविभाज्य भाग बनवण्यात आले.

कामगार सहकारी संस्था केवळ पतपुरवठ्यापुरत्या मर्यादित न राहता बांधकाम, शेती प्रक्रिया, लघुउद्योग, दुग्धव्यवसाय (उदा. अमूल,गोकुळ), ग्राहक भांडारे अशा विविध क्षेत्रांत पसरल्या होत्या.

राज्य सरकारांचे नवीन कायदे १९१९ आणि १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्यांनुसार 'सहकार' हा विषय प्रांतिक/राज्य सरकारांकडे हस्तांतरित करण्यात आला. त्यामुळे प्रत्येक राज्याने आपापल्या गरजेनुसार स्वतःचे सहकारी कायदे (उदा. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६०) संमत केले, ज्यामुळे चळवळीला बळकटी मिळाली. आज, लिज्जत पापड आणि IFFCO (इंडियन फार्मर्स फर्टिलायझर कोऑपरेटिव्ह) सारख्या संस्था कामगार आणि उत्पादक सहकारी संस्थांच्या यशस्वी मॉडेलची उदाहरणे आहेत. कामगार सहकारी संस्थांची तत्त्वे आंतरराष्ट्रीय सहकारी आघाडी (International Co-operative Alliance - ICA) द्वारे निर्धारित केलेल्या व्यापक सहकारी तत्त्वांवर आधारित आहेत. ही तत्त्वे संस्थेचे कामकाज न्याय्य, लोकशाही आणि सदस्याभिमुख असल्याची खात्री करतात. भारतामध्ये कामगार सहकारी संस्थांची सुरुवात २० व्या शतकाच्या सुरुवातीला झाली. त्यावेळेस, देशात औद्योगिकरण वाढत होते आणि कामगारांचे शोषण मोठ्या प्रमाणात होत होते. कामगारांना कमी वेतन, असुरक्षित कामाची परिस्थिती आणि इतर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत होते. या पार्श्वभूमीवर, कामगारांना एकत्र आणून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कामगार सहकारी संस्थांची स्थापना करण्यात आली.

**कामगार सहकारी संस्थेची वैशिष्ट्ये :**

१. कामगारच संस्थेचे मालक आणि व्यवस्थापक असतात, प्रत्येक कामगाराला निर्णय प्रक्रियेत समान संधी मिळते.

२. नफा कमावण्यापेक्षा कर्मचाऱ्यांची आणि समाजाची सेवा करणे हा मुख्य उद्देश असतो, असे Canadian Worker Co-op Federation Canadian Worker Co-op Federation Canadian Worker Co-op Federation नमूद करते.

३. 'एक व्यक्ती, एक मत' या तत्त्वावर आधारित लोकशाही पद्धतीने व्यवस्थापन चालते.

४. रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि कामगारांचे आर्थिक व सामाजिक विकास साधणे हे त्यांचे ध्येय आहे.

**नोंदणी आणि नियमन :–**

भारतात राष्ट्रीय सहकारी डेटाबेस (National Cooperative Database) 'कामगार सहकारी संस्था' या प्रकारच्या संस्थांची नोंदणी होते.

महाराष्ट्रामध्ये, सहकार आयुक्त आणि निबंधक, महाराष्ट्र राज्य या संस्थांची नोंदणी आणि नियमन करतात, तसेच धोरणात्मक निर्णय घेतात.

**उद्देश आणि कार्ये :–**

**१. आर्थिक साहाय्य करणे :–** कामगार सहकारी संस्थांचे मुख्य उद्दिष्ट कामगारांना आर्थिक साहाय्य करणे हे होते. या संस्था कामगारांना कर्ज उपलब्ध करून देणे, त्यांच्या बचती स्वीकारणे आणि त्यांना आर्थिक सल्ला देणे यांसारख्या सेवा पुरवून संभासदाचे हित जोपासणे.

**२. रोजगार निर्मिती करणे:–** काही कामगार सहकारी संस्थांनी स्वतःचे उद्योग सुरू केले, ज्यामुळे कामगारांना रोजगार मिळाला. उदाहरणार्थ, वस्त्रोद्योग, हस्तकला आणि इतर लघु उद्योगांमध्ये सहकारी संस्थांनी कामगारांना एकत्र आणून उत्पादन सुरू केले. यातून सभासदाना मोट्या प्रमाणात रोजगार कसा उपलब्ध होईल हे पाहणे

**३. सामाजिक विकास करणे :–** कामगार सहकारी संस्थांनी कामगारांच्या सामाजिक विकासासाठीही कार्य केले. शिक्षण, आरोग्य आणि इतर सामाजिक सेवा पुरवून त्यांनी कामगारांच्या जीवनात सुधारणा घडवून आणली.

**४. सामूहिक सौदेबाजी:–** कामगार सहकारी संस्थांनी कामगारांच्या वतीने मालकांशी सामूहिक सौदेबाजी केली, ज्यामुळे कामगारांना चांगले वेतन आणि कामाच्या चांगल्या शर्ती मिळण्यास मदत झाली.

**कामगार सहकारी संस्थेचे फायदे :–**

**१. आर्थिक सुरक्षा मिळते :** कामगारांना नियमित रोजगार आणि चांगले वेतन मिळण्यास मदत होते.

**२. उत्पन्नाचे समान वितरण होते :** संस्थेच्या नफ्यात सदस्यांना समान वाटा मिळतो, ज्यामुळे आर्थिक विषमता कमी होते.

**३. लोकशाही व्यवस्थापन :** कामगारांना संस्थेच्या व्यवस्थापनात सहभागी होण्याची संधी मिळते, ज्यामुळे निर्णय प्रक्रियेत त्यांची भूमिका महत्त्वाची ठरते.

**४. कौशल्य विकास करणे :** कामगारांना विविध कौशल्ये शिकण्याची संधी मिळते, ज्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढते.

**५. सामाजिक विकास करणे:** संस्थेच्या माध्यमातून कामगारांना शिक्षण, आरोग्य आणि इतर सामाजिक सेवा उपलब्ध होतात.

**कामगार सहकारी संस्थांची मुख्य तत्त्वे :–**

**१. ऐच्छिक आणि खुली सदस्यता** (Voluntary and Open Membership) **:**

संस्थेमध्ये सामील होण्याची इच्छा असलेल्या आणि संस्थेचे नियम पाळण्यास तयार असलेल्या कोणत्याही व्यक्तीसाठी सदस्यता खुली असते.जात, धर्म, लिंग किंवा राजकीय विचारसरमाणीवर आधारित कोणताही भेदभाव केला जात नाही.

**२. लोकशाही सदस्य नियंत्रण** (Democratic Member Control) **:**

संस्था सदस्यांद्वारे लोकशाही पद्धतीने नियंत्रित केली जाते. निर्णय प्रक्रियेत समानता सुनिश्चित करण्यासाठी 'एक सदस्य, एक मत' (One Member, One Vote) हे तत्त्व पाळले जाते.सदस्य व्यवस्थापन समिती निवडतात, जी संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहते.

**३. सदस्यांचा आर्थिक सहभाग** (Member Economic Participation) **:**

संस्थेचे सदस्य संस्थेच्या भांडवलासाठी समानतेने योगदान देतात.हाताला आलेल्या नफ्याचा वापर सामान्यतः खालील बाबींसाठी केला जातो, संस्थेच्या विकासासाठी निधी बाजूला ठेवणे,कामगारांनी केलेल्या कामाच्या प्रमाणात त्यांना नफा वाटणे (बोनस/पगार),सदस्यांनी गुंतवलेल्या भांडवलावर मर्यादित व्याज देणे (असल्यास).

**४. स्वायत्तता आणि स्वातंत्र्य** (Autonomy and Independence) **:**

कामगार सहकारी संस्था स्वायत्त आणि स्वतंत्र संस्था आहेत.जरी त्यांनी सरकार किंवा इतर संस्थांबरोबर करार केले तरी, संस्थेचे लोकशाही नियंत्रण सदस्यांकडेच राहते आणि त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा येत नाही.

**५. शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती** (Education, Training and Information) **:**

संस्थेच्या प्रभावी विकासासाठी सदस्यांना, निवडलेल्या प्रतिनिधींना, व्यवस्थापकांना आणि कर्मचाऱ्यांना शिक्षण आणि प्रशिक्षण दिले जाते.सहकारी चळवळीबद्दल माहिती देण्यासाठी आणि संस्थेचे फायदे लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न केले जातात.

**६. सहकारी संस्थांमधील सहकार्य** (Co-operation among Co-operatives) **:**

स्थानिक, राष्ट्रीय, प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर इतर सहकारी संस्थांशी सहकार्य केले जाते. यामुळे सहकारी चळवळीची एकत्रित ताकद वाढते आणि सदस्यांना अधिक चांगल्या प्रकारे सेवा पुरवता येतात.

**७. समाजाबद्दलची बांधिलकी** (Concern for Community) **:**

कामगार सहकारी संस्था केवळ आपल्या सदस्यांच्या हिताचा विचार करत नाहीत, तर शाश्वत विकासासाठी आणि पर्यावरण रक्षणासाठी कटिबद्ध राहून आपल्या स्थानिक समुदायाच्या कल्याणासाठी देखील काम करतात. कामगार सहकारी संस्थांची कार्यपद्धती (Working Procedure) ही इतर खाजगी कंपन्यांपेक्षा वेगळी असते, कारण तिचा मुख्य भर नफा कमावण्याऐवजी सदस्यांचे कल्याण आणि लोकशाही नियंत्रणावर असतो.

**कार्यपद्धतीचे मुख्य टप्पे खालीलप्रमाणे आहेत:-**

**१. स्थापना आणि नोंदणी** (Establishment and Registration) **:**

उद्देश निश्चिती:- काही समान गरजा असलेले आणि एकत्र काम करण्याची इच्छा असलेले कामगार एकत्र येतात आणि संस्थेचा उद्देश ठरवतात.

भांडवल उभारणी:- प्रत्येक सदस्य संस्थेमध्ये ठराविक भागभांडवल (Share Capital) गुंतवतो.

नोंदणी:- महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० किंवा संबंधित राज्य कायद्यानुसार संस्थेची निबंधकाकडे (Registrar of Co-operative Societies) नोंदणी केली जाते.

**२. व्यवस्थापन आणि निर्णय प्रक्रिया** (Management and Decision Making) **:**

सर्वसाधारण सभा (General Body Meeting) :- ही संस्थेची सर्वोच्च संस्था असते. वर्षातून किमान एकदा सर्व सदस्यांची बैठक होते, ज्यात मोठे धोरणात्मक निर्णय घेतले जातात.

व्यवस्थापन समिती (Management Committee) :- सदस्यांमधून लोकशाही पद्धतीने (निवडणुकीद्वारे) काही प्रतिनिधी निवडले जातात. ही समिती संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहते.

अध्यक्ष आणि पदाधिकारी :- समितीमधून अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव आणि खजिनदार निवडले जातात, जे जबाबदाऱ्या पार पाडतात.'एक सदस्य, एक मत':- कोणताही निर्णय घेताना प्रत्येक सदस्याला एकच मत देण्याचा अधिकार असतो, ज्यामुळे सत्तेचे केंद्रीकरण होत नाही.

**३. दैनंदिन कामकाज** (Daily Operations) **:**

कामाचे वाटप:- संस्थेच्या उद्देशानुसार सदस्यांमध्ये कामाचे वाटप केले जाते. (उदा. बांधकाम संस्थेत मजुरीचे काम, विणकर संस्थेत कापड विणणे).

नियम आणि कायदे:- संस्थेचे कामकाज नियमावली (Byelaws) नुसार चालते, ज्यामध्ये कामाचे तास, पगार, सुट्ट्या आणि इतर नियम स्पष्ट केलेले असतात.

**४. आर्थिक व्यवहार आणि नफा वाटप** (Financial Management and Profit Distribution) **:**

उत्पन्न आणि खर्च :- संस्थेला मिळालेले उत्पन्न (उदा. उत्पादनाची विक्री किंवा कामाचे कंत्राट) आणि खर्च यांचा हिशोब ठेवला जातो.

लेखापरीक्षण (Audit) :- वर्षाच्या शेवटी संस्थेच्या हिशोबाचे सरकारी किंवा मान्यताप्राप्त लेखापरीक्षकाद्वारे ऑडिट केले जाते.

नफा वाटप:- नफा झाल्यास, कायद्यानुसार काही निधी राखीव ठेवला जातो (उदा. राखीव निधी, शिक्षण निधी). उरलेला नफा सदस्यांमध्ये त्यांच्या कामाच्या प्रमाणात किंवा समानतेने वाटला जातो.

**कामगार सहकारी चळवळीचे प्रकार :**

भारतामध्ये कामगार सहकारी संस्था विविध प्रकारच्या आहेत, ज्या त्यांच्या कार्यक्षेत्रानुसार आणि सदस्यांनुसार ओळखल्या जातात. काही प्रमुख प्रकार खालीलप्रमाणे आहेत:

**१. क्रेडिट सोसायट्या** (Credit Societies)**:–** या संस्था कामगारांना कमी व्याजदरात कर्ज पुरवतात.

**२. ग्राहक सहकारी संस्था** (Consumer Co-operative Societies) **:–** या संस्था कामगारांना स्वस्त दरात आवश्यक वस्तू पुरवतात.

**३. उत्पादन सहकारी संस्था** (Production Co-operative Societies) **:–** या संस्था कामगारांना एकत्र आणून उत्पादन कार्य करतात, जसे की वस्त्रोद्योग, हस्तकला, इत्यादी.

**४. गृहनिर्माण सहकारी संस्था** (Housing Co-operative Societies) **:–** या संस्था कामगारांना घरे बांधण्यासाठी किंवा खरेदी करण्यासाठी मदत करतात.

**५. श्रम सहकारी संस्था** (Labour Co-operative Societies) **:–** या संस्था बांधकाम आणि इतर शारीरिक श्रमाची कामे करतात आणि कामगारांना रोजगार पुरवतात.

**कामगार सहकारी संस्थेचे प्रकार :**

**१. उत्पादन सहकारी संस्था:–** या संस्थांमध्ये कामगार एकत्र येऊन वस्तूंचे उत्पादन करतात.

**२. सेवा सहकारी संस्था:–** या संस्था कामगारांना विविध प्रकारच्या सेवा पुरवतात, जसे की वाहतूक, गृहनिर्माण आणि वित्तीय सेवा.

**३. उपभोक्ता सहकारी संस्था:–** या संस्था कामगारांना आवश्यक वस्तू आणि सेवा वाजवी दरात पुरवतात.

**४. पतपुरवठा सहकारी संस्था:–** या संस्था कामगारांना कर्ज आणि इतर वित्तीय सुविधा पुरवतात.

**भारतातील कामगार सहकारी संस्थां :**

**१. औद्योगिक कामगार सहकारी संस्था** (Industrial Workers' Co-operatives) **:**

या संस्था लघुउद्योग, कुटीर उद्योग आणि हस्तकला क्षेत्रात काम करतात.

**उद्देश :** सदस्यांना कच्चा माल पुरवणे, उत्पादनासाठी साधने उपलब्ध करून देणे आणि तयार माल विकण्यासाठी बाजारपेठ मिळवून देणे.

**उदाहरणे :** डेक्कन मिल, महात्मा फुले सहकारी सूत गिरणी

विणकर सहकारी संस्था (Weavers' Co-operatives), चर्मकार सहकारी संस्था, बांबू कामगार संस्था. लिज्जत पापड हे या प्रकारचे उत्तम उदाहरण आहे.

**२. बांधकाम आणि कंत्राटी कामगार सहकारी संस्था** (Construction and Labour Contract Co-operatives) **:**

या संस्था प्रामुख्याने बांधकाम क्षेत्रातील मजुरांसाठी असतात.

**उद्देश :** मजुरांना रोजगाराच्या संधी मिळवून देणे, सरकारी किंवा खाजगी बांधकामाची कंत्राटे घेणे आणि मजुरांचे कंत्राटदारांकडून होणारे शोषण थांबवणे.

**उदाहरणे :** केरळमधील Uralungal Labour Contract Co-operative Society (ULCCS) ही या क्षेत्रातील एक प्रसिद्ध संस्था आहे.

**३. सेवा सहकारी संस्था** (Service Co-operatives) **:**

या संस्था सदस्यांना विविध सेवा पुरवतात.

**उद्देश :** यामध्ये प्रामुख्याने वाहतूक सहकारी संस्था (Transport Co-operatives), दूध उत्पादक सहकारी संस्था (Dairy Co-operatives), ग्राहक सहकारी संस्था आणि आरोग्य सेवा पुरवणाऱ्या संस्थांचा समावेश होतो.

**उदाहरणे :** अमूल, गोकुळ, यळगूड, वारणा डेअरी, (Gujarat Co-operative Milk Marketing Federation) हे दुग्धव्यवसायातील सर्वात मोठे आणि यशस्वी उदाहरण आहे.

**४. शेतकरी उत्पादक कंपन्या/सहकारी संस्था** (Farmer Producer Organisations - FPOs) **:**

जरी या थेट ‘कामगार’ संस्था नसल्या तरी, शेतकरी हेच उत्पादक आणि मालक असल्यामुळे त्या तत्त्वतः कामगार सहकारी संस्थांसारख्याच काम करतात. उदाहरणे

**उद्देश :** शेतकऱ्यांना एकत्रितपणे शेती निविष्ठा खरेदी करणे, तंत्रज्ञान वापरणे आणि आपले उत्पादन थेट बाजारपेठेत विकणे यामुळे अधिक नफा मिळतो.

**५. वित्तीय आणि पतपुरवठा संस्था** (Credit Co-operative Societies) **:**

**उद्देश :** या संस्था सदस्यांमध्ये बचतीची सवय लावतात आणि त्यांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देतात, जेणेकरून ते सावकारांकडे जाणे टाळतील.

**उदाहरणे :** अनेक कर्मचारी सहकारी पतपेढ्या (Employees' Co-operative Credit Societies) या प्रकारात मोडतात. भारतातील कामगार सहकारी संस्थांची सद्यस्थिती मिश्र स्वरूपाची आहे, जिथे काही संस्था अत्यंत यशस्वी आहेत, तर बऱ्याच संस्थांना विविध आव्हानांचा सामना करावा लागत आहे. सरकारने ‘सहकारातून समृद्धी’ (Sahkar-se-Samriddhi) या दृष्टिकोनातून या क्षेत्राला बळ देण्यास सुरुवात केली आहे.

**भारतातील कामगार सहकारी संस्थांची सद्यस्थिती:–**

**१. संख्या आणि व्याप्ती** (Numbers and Coverage) **:**

**मोठ्या प्रमाणात संख्या :–** २०२४–२५ पासून भारतात एकूण ८.४४ लाखांहून अधिक सहकारी संस्था आहेत, ज्यापैकी सुमारे ४४,५४५ कामगार सहकारी संस्था आहेत.

**२. विविध क्षेत्रांत अग्रेसर :–** या संस्था बांधकाम, लघुउद्योग, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय आणि सेवा अशा ३० हून अधिक क्षेत्रांमध्ये कार्यरत आहेत.

**३. ग्रामीण भागात पोहोचलेल्या आहेत :–** भारतातील ९१% ग्रामीण भाग सहकारी संस्थांद्वारे जोडला गेला आहे, ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत त्यांचे मोठे योगदान आहे.

**कामगार सहकारी संस्थांचे यशस्वी मॉडेल्स (Successful Models) :**

काही कामगार आणि उत्पादक सहकारी संस्थांनी जागतिक स्तरावर आपली छाप सोडली आहे. IFFCO, GCMMF (अमूल), आणि ULCCS (उरालुंगल लेबर कॉन्ट्रॅक्ट को–ऑपरेटिव्ह सोसायटी) गोकुळ, यळगूड, वारणा, यांसारख्या संस्थांनी कार्यक्षम व्यवस्थापन आणि आर्थिक यश मिळवले आहे.महिला–आधारित सहकारी संस्था, जसे की लिज्जत पापड,महिला सुमंगल सहकारी विविध उत्पादक संस्था, कार्यरत विविध बचत गट हि महिला सक्षमीकरणाचे उत्तम उदाहरण आहेत.

**कामगार सहकारी संस्थां समोरील आव्हाने :**

अनेक संस्थांना अजूनही खालील समस्यांचा सामना करावा लागतो:

**१. भांडवलाची कमतरता :** बहुतांश संस्थांकडे निधीची आणि भांडवलाची कमतरता असते, ज्यामुळे विस्तारावर मर्यादा येतात.

**२. व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव :** व्यवस्थापनात व्यावसायिकतेची कमतरता आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची अनुपलब्धता हे एक मोठे आव्हान आहे.

**३. सरकारी हस्तक्षेप आणि जुने कायदे :** अनेकदा सरकारी हस्तक्षेप आणि कालबाह्य झालेले कायदे संस्थेच्या स्वायत्त कार्यात अडथळे निर्माण करतात.

**४. राजकरणाचा हस्तक्षेप :** काही सहकारी संस्थांचा वापर राजकीय फायद्यांसाठी केला जातो, ज्यामुळे त्यांच्या मूळ उद्देशाला बाधा पोहोचते.

**५. तंत्रज्ञानाचा अभाव :** अनेक संस्थांनी अद्याप आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केलेला नाही, ज्यामुळे त्यांची कार्यक्षमता कमी होते.

६. नविण्याचा अभाव दिसून देतो.

**सहकाराबाबत नवीन सरकारी उपक्रम (New Government Initiatives) :**

केंद्र सरकारने सहकार क्षेत्राला पुनरुज्जीवित करण्यासाठी नवीन पावले उचलली आहेत:

१. सहकार मंत्रालय:- जुलै २०२१ मध्ये स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना करण्यात आली, ज्याचा उद्देश सहकार चळवळीला बळकट करणे हा आहे.

२. नवीन सहकार धोरण २०२५ - 'विकसित भारत २०२४७' साठी सहकारी संस्थांना विकासाचे प्रमुख चालक बनवण्याचे उद्दिष्ट ठेवून नवीन धोरण आखले जात आहे, जे कायदेशीर सुधारणा आणि डिजिटायझेशनवर भर देते.

३. डिजिटल परिवर्तन :- प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS) संगणकीकृत केल्या जात आहेत, ज्यामुळे कामकाजात पारदर्शकता आणि कार्यक्षमता येईल.

४. आर्थिक सहाय्य :- राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC) द्वारे सहकारी संस्थांना मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत आणि कर्जपुरवठा केला जात आहे.

भारतात सध्या कार्यरत असलेल्या कामगार सहकारी संस्थांची यादी खूप मोठी आणि वैविध्यपूर्ण आहे. देशभरात सुमारे ४४,००० हून अधिक कामगार सहकारी संस्था विविध क्षेत्रांत पसरलेल्या आहेत.

यापैकी काही प्रमुख आणि यशस्वी उदाहरणे खालीलप्रमाणे आहेत.

**भारतातील कामगार सहकारी संस्था :**

भारतामध्ये कामगार सहकारी चळवळ वाढत आहे. अनेक राज्यांमध्ये कामगार सहकारी संस्था यशस्वीपणे काम करत आहेत. या संस्था कामगारांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणत आहेत. उदा.

(A) महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना : या संस्थेत ऊस उत्पादक शेतकरी आणि कामगार एकत्र येऊन साखर उत्पादन करतात.

(B) गुजरात राज्य सहकारी तेलबिया उत्पादक संघ : या संस्थेत तेलबिया उत्पादक शेतकरी आणि कामगार एकत्र येऊन तेल उत्पादन करतात.

**महाराष्ट्र कामगार सहकारी संस्थांचे प्रकार –**

१. औद्योगिक कामगार सहकारी संस्था:

२. बांधकाम कामगार सहकारी संस्था:

३. वाहतूक कामगार सहकारी संस्था:

४. सेवा सहकारी संस्था:

५. गृहनिर्माण सहकारी संस्था:

६. खरेदी-विक्री सहकारी संस्था:

७. आरोग्य सहकारी संस्था:

८. शिक्षण सहकारी संस्था:

९. मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था:

१०. दुग्ध व्यवसाय सहकारी संस्था:

११. कृषी कामगार सहकारी संस्था:

### ३.२.४ सेवा सहकारी संस्था (Service Co-operative Societies) :

**१. स्वातंत्र्यपूर्व काळ** (Pre-Indeendence Era) **:**

१८९९ च्या दुष्काळ आयोगाच्या शिफारसींनुसार, ब्रिटिश सरकारने 'सहकारी पतसंस्था कायदा, १९०४' (Co-operative Credit Societies Act, 1904) लागू केला हा कायदा भारतातील सहकारी चळवळीचा पाया मानला जातो. सुरुवातीला या संस्था फक्त कर्जपुरवठा करण्यापुरत्या मर्यादित होत्या १९०४ च्या कायद्यातील उणिवा दूर करण्यासाठी आणि बिगर-पतपुरवठा (non-credit) क्षेत्रातील सहकारी संस्थांना कायदेशीर मान्यता देण्यासाठी 'सहकारी संस्था कायदा, १९१२' (Co-operative Societies Act, 1912) संमत करण्यात आला. या कायद्यामुळे ग्राहक भांडारे, पणन संस्था (marketing societies) आणि इतर सेवा संस्था स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला.

मॉन्टेग्यू-चेम्सफोर्ड (१९१९) सुधारणांनंतर, 'सहकार' हा विषय प्रांतिक सरकारांकडे हस्तांतरित करण्यात आला यामुळे मद्रास, मुंबई (१९२५), आणि इतर प्रांतांनी आपापले कायदे केले, ज्यामुळे स्थानिक गरजेनुसार सेवा सहकारी संस्थांची वाढ झाली.

**२. स्वातंत्र्योत्तर काळ** (Post-Independence Era) **:**

**नियोजनाचा भाग :** स्वातंत्र्यानंतर, सहकारी संस्थांना देशाच्या नियोजित आर्थिक विकासाचा अविभाज्य भाग बनवण्यात आले, पहिल्या पंचवार्षिक योजनेपासून (१९५१-५६) कृषी आणि ग्रामीण विकासात सहकारी संस्थांना मोठे महत्त्व देण्यात आले.

**सेवा सहकारी संस्थांची संकल्पना (१९५८) :** राष्ट्रीय विकास परिषदेने (NDC) १९५८ मध्ये 'सेवा सहकारी संस्था' (Service Co-operative Societies) स्थापन करण्याची शिफारस केली प्राथमिक पतसंस्थांचे रूपांतर बहुउद्देशीय सेवा संस्थांमध्ये करण्याचा टप्पा येथून सुरू झाला.

पांढरी क्रांती (धवल क्रांती) १९७० च्या दशकातील 'ऑपरेशन फ्लड' (Operation Flood) कार्यक्रमामुळे दुग्ध सहकारी संस्थांचे (Dairy Co-operatives) जाळे देशभर पसरले. अमूल (Amul) हे या क्रांतीचे सर्वात मोठे आणि यशस्वी उदाहरण ठरले, ज्याने लाखो दूध उत्पादकांना सेवा पुरवल्या.

**सहकार संबंधी नवीन कायदे आणि धोरणे :–** १९८४ मध्ये बहुराज्य सहकारी संस्था कायदा (Multi-State Co-operative Societies Act) आणि २००२ मध्ये नवीन राष्ट्रीय सहकार धोरण (National Policy on Co-operatives) आणले गेले, ज्यामुळे संस्थांना अधिक स्वायत्तता मिळाली आणि त्यांची कार्यपद्धती सुव्यवस्थित झाली.

**सेवा सहकारी संस्थांची प्रमुख तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत :–**

१. ऐच्छिक आणि खुली सदस्यता (Voluntary and Open Membership)

२. 'एक सदस्य, एक मत' (One Member, One Vote)

३. सदस्यांचा आर्थिक सहभाग (Member Economic Particiation)

४. स्वायत्तता आणि स्वातंत्र्य (Autonomy and Independence)

५. शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती (Education, Training and Information)

६. सहकारी संस्थांमधील सहकार्य (Co-operation among Co-operatives)

७. स्थानिक समुदायाच्या कल्याणासाठी काम

सेवा सहकारी संस्थांचे प्रमुख उद्दिष्ट खालीलप्रमाणे आहेत:

**आर्थिक उद्दिष्टे (Economic Objectives) :**

**१. आर्थिक शोषण थांबवणे:–**

सावकार, मध्यस्थ आणि खाजगी व्यापाऱ्यांकडून होणारे सदस्यांचे आर्थिक शोषण थांबवणे.

कर्जपुरवठा करणे :– सदस्यांना आवश्यकतेनुसार आणि कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देणे (उदा. शेतीसाठी किंवा घर बांधणीसाठी).

वाजवी दरात वस्तू पुरवणे :– जीवनावश्यक वस्तू, शेतीसाठी निविष्ठा (बियाणे, खते) किंवा इतर सेवा वाजवी आणि स्थिर दरात उपलब्ध करून देणे

उत्पादन खर्च कमी करणे :– एकत्रित खरेदीमुळे (Bulk purchase) सदस्यांचा उत्पादन खर्च कमी करणे.

रोजगार निर्मिती : काही संस्था अप्रत्यक्षपणे रोजगार निर्मितीस प्रोत्साहन देतात.

**२. सामाजिक आणि कल्याणकारी उद्दिष्टे** (Social and Welfare Objectives) **:**

जीवनमान उंचावणे : सदस्यांचे आणि त्यांच्या कुटुंबाचे जीवनमान सुधारणे.

बचतीची सवय : सदस्यांमध्ये बचतीची आणि काटकसरीची सवय लावणे.

लोकशाहीची रुजवणूक : 'एक सदस्य, एक मत' या तत्त्वामुळे समाजात लोकशाही मूल्यांची आणि सामूहिक निर्णय घेण्याच्या प्रक्रियेची रुजवणूक करणे

सामूहिक शक्ती : लहान आणि विखुरलेल्या लोकांना एकत्र आणून त्यांना एक सामूहिक शक्ती प्रदान करणे, जेणेकरून ते बाजारपेठेत किंवा सरकारसमोर आपला आवाज प्रभावीपणे मांडू शकतील.

**३. संस्थात्मक उद्दिष्टे** (Institutional Objectives) **:**

पारदर्शकता : संस्थेच्या कामकाजात आणि आर्थिक व्यवहारात पारदर्शकता राखणे

स्वायत्तता : संस्थेचे कामकाज स्वायत्तपणे (Independent) आणि बाह्य हस्तक्षेपाशिवाय चालवणे

सहकार शिक्षण : सदस्यांना आणि समाजाला सहकाराचे महत्त्व पटवून देणे आणि त्याबद्दल शिक्षण देणे.

भारतातील सेवा सहकारी संस्थांचे प्रमुख प्रकार खालीलप्रमाणे आहेत :-

**१. पत सहकारी संस्था** (Credit Co-operative Societies) **:**

या सर्वात सामान्य सेवा सहकारी संस्था आहेत.

उद्देश : सदस्यांमध्ये बचतीची सवय लावणे आणि त्यांना कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देणे, जेणेकरून ते सावकारांच्या शोषणातून वाचतील.

उदा : १. प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS) : ग्रामीण भागात शेतकऱ्यांना बियाणे, खते आणि इतर शेती निविष्ठा खरेदी करण्यासाठी कर्ज देतात.

२. शहरी सहकारी बँका (Urban Co-operative Banks) : शहरी भागातील नोकरदार आणि लहान व्यापाऱ्यांना आर्थिक सहाय्य पुरवतात.

**२. ग्राहक सहकारी संस्था** (Consumer Co-operative Societies) **:**

या संस्था सदस्यांना वाजवी दरात दैनंदिन गरजेच्या वस्तू पुरवतात.

उद्देश :- मध्यस्थांना वगळून थेट उत्पादकांकडून माल खरेदी करणे आणि तो सदस्यांना स्वस्त दरात विकणे, ज्यामुळे महागाईवर नियंत्रण मिळवता येते.

उदा.१. केंद्रीय भांडार (Kendriya Bhandar) : सरकारी कर्मचाऱ्यांसाठी आणि सामान्य नागरिकांसाठी वाजवी दरात वस्तू पुरवणारी संस्था.

२. आपणा बझार (Ana Bazar) : महाराष्ट्रासह इतर राज्यांत कार्यरत असलेली प्रसिद्ध ग्राहक संस्था.

३. गृहनिर्माण सहकारी संस्था (Housing Co-operative Societies)

या संस्था सदस्यांना परवडणारी घरे मिळवून देण्यासाठी मदत करतात.

उद्देश : जमीन खरेदी करणे, ती विकसित करणे आणि सदस्यांना कमी किमतीत घरे किंवा फ्लॅट बांधून देणे. उदा: अनेक कर्मचारी गृहनिर्माण संस्था (Employees' Housing Societies) या प्रकारात मोडतात.

४. वाहतूक सहकारी संस्था (Transport Co-operative Societies)

या संस्था वाहतूक सेवा पुरवतात. उद्देश : सदस्यांना (उदा. टॅक्सी/रिक्षा चालक) वाहन खरेदीसाठी कर्ज मिळवून देणे, परवाने काढण्यास मदत करणे आणि एकत्रितपणे व्यवसाय चालवणे.

५. आरोग्य आणि शिक्षण सहकारी संस्था (Health and Education Co-operatives)

उद्देश: सदस्यांना आणि त्यांच्या समुदायाला परवडणाऱ्या दरात आरोग्यसेवा (उदा. सहकारी रुग्णालये) आणि शिक्षण (उदा. सहकारी शाळा/महाविद्यालये) पुरवणे.

थोडक्यात, भारतातील सेवा सहकारी संस्थांनी ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांत आर्थिक समावेशन आणि समुदाय विकासात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**सेवा सहकारी संस्थांची वाढती संख्या आणि व्याप्ती** (Increasing Numbers and Scoe) **:**

भारतात ८.४४ लाखांहून अधिक सहकारी संस्था आहेत, ज्यापैकी बहुतांश सेवा क्षेत्रात (पतपुरवठा, ग्राहक, गृहनिर्माण, डेअरी) कार्यरत आहेत तसेच देशातील ९१% ग्रामीण भाग सहकारी संस्थांद्वारे जोडला गेला आहे, ज्यात १३ कोटींहून अधिक सदस्य आहेत. सरकारने नवीन बहुउद्देशीय प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS) डेअरी आणि मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था स्थापन करण्यास मान्यता दिली आहे, ज्यामुळे एकाच संस्थेद्वारे अनेक सेवा पुरवणे शक्य होत आहे.जुलै २०२५ पर्यंत २३,००० हून अधिक नवीन बहुउद्देशीय संस्थांची नोंदणी झाली आहे.

**सहकारी सेवा संस्थाचे आधुनिकीकरण आणि डिजिटायझेशन** (Modernization and Digitization) **:**

**संगणकीकरण :–** प्राथमिक कृषी पतसंस्था (PACS) च्या संगणकीकरणाचे प्रकल्प मंजूर झाले आहेत आणि हजारो संस्थांना एकात्मिक ERP प्लॅटफॉर्मवर (unified ERP Platform) आणले गेले आहे, ज्यामुळे कामकाजात पारदर्शकता येत आहे.ई–सेवा वितरण:- ४७,९०० हून अधिक PACS कॉमन सर्व्हिस सेंटर (CSC) म्हणून काम करत आहेत. (१.५.५) यामुळे ग्रामीण नागरिकांना बँकिंग, विमा, आधार नोंदणी/ अपडेट, पॅन कार्ड आणि तिकीट बुकिंग अशा ३०० हून अधिक ई–सेवा एकाच ठिकाणी मिळत आहेत. GeM पोर्टल :- सहकारी संस्थांना शासकीय ई–मार्केटप्लेस (GeM) पोर्टलवर 'खरेदीदार' म्हणून नोंदणी करण्याची परवानगी मिळाली आहे, ज्यामुळे त्यांना पारदर्शकपणे आणि किफायतशीरपणे वस्तू खरेदी करता येतात.

**सहकारी सेवा संस्था समोरील आव्हाने आणि कमतरता** (Challenges and Shortcomings) **:**

**१. भांडवलाची कमतरता :** अनेक संस्थांना निधी उभारणीमध्ये अडचणी येतात, ज्यामुळे विस्तारावर मर्यादा येतात.

**२. व्यावसायिक व्यवस्थापनाचा अभाव :** व्यवस्थापनात व्यावसायिक कौशल्याची कमतरता हे एक मोठे आव्हान आहे, ज्यामुळे कार्यक्षमता कमी होते

**३. सरकारी हस्तक्षेप :** काही संस्थांमध्ये जास्त सरकारी नियंत्रण किंवा राजकीय हस्तक्षेपामुळे स्वायत्त कार्यप्रणालीत अडथळे येतात.

**४. निष्क्रिय संस्था :** मोठ्या संख्येने संस्था कार्यरत असल्या तरी, त्यापैकी काही संस्था निष्क्रिय (dormant) आहेत किंवा तोट्यात आहेत.

**सहकार संबंधी नवीन सरकारी धोरणे** (Future Outlook and Government Policies) **:**

नवीन सहकार मंत्रालय: जुलै २०२१ मध्ये स्थापन करण्यात आलेले स्वतंत्र सहकार मंत्रालय सहकार चळवळीला पुनरुज्जीवित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे.'सहकारातून समृद्धी': या दृष्टिकोनातून नवीन राष्ट्रीय सहकार धोरण २०२५ (National Co-operative Policy 2025) आखले जात आहे, जे शाश्वत विकासावर भर देते. निर्यात प्रोत्साहन: नॅशनल कोऑपरेटिव्ह एक्सपोर्ट्स लिमिटेड (NCEL) द्वारे सहकारी संस्थांना कृषी उत्पादनांची निर्यात करण्यास प्रोत्साहन दिले जात आहे.

**रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा.**

१. स्वातंत्र्य पूर्व काळात .................... रोजी पहिला सहकारी कायदा संमत झाला

२. .................... या तत्त्वावर आधारित लोकशाही पद्धतीने व्यवस्थापन चालते.

३. महाराष्ट्रामध्ये .................... हे महाराष्ट्र राज्य या संस्थांची नोंदणी आणि नियमन करतात.

४. १९३५ च्या भारत सरकारच्या कायद्यांनुसार .................... हा विषय प्रांतिक/राज्य सरकारांकडे हस्तांतरित करण्यात आला.

५. केरळमधील .................... ही बांधकाम या क्षेत्रातील एक प्रसिद्ध संस्था आहे.

६. .................... मध्ये स्वतंत्र सहकार मंत्रालयाची स्थापना करण्यात आली

७. .................... या सर्वात सामान्य सेवा सहकारी संस्था आहेत.

८. .................... मध्ये बहुराज्य सहकारी संस्था कायदा.

९. .................... राज्य कायद्यानुसार संस्थेची निबंधकाकडे नोंदणी केली जाते.

१०. .................... या दृष्टिकोनातून या क्षेत्राला बळ देण्यास सुरुवात केली आहे.

**उत्तरे :**

१. १९०४ २. 'एक व्यक्ती, एक मत'

३. सहकार आयुक्त आणि निबंधक ४. 'सहकार'

५. Uralungal Labour Contract Co-operative Society (ULCCS)

६. जुलै २०२१

७. पत सहकारी संस्था (Credit Co-operative Societies)

८. १९८४ ९. महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६०

१०. 'सहकारातून समृद्धी'

## ३.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

✡ **अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१. भारतात सर्वप्रथम ............. राज्यात सहकारी जीनिंग सुरू झाले.

*अ) महाराष्ट्र ब) केरळ क) म्हैसूर ड) गुजरात.*

२. भारतात ........... मध्ये सहकारी क्षेत्रात पहिली सूतगिरणी सुरू झाली.

*अ) सन १९४७ ब) सन १९५० क) सन १९६६ ड) सन १९५१.*

३. सहकारी प्रक्रिया संस्था स्थापनेचा उद्देश ............ हा आहे.

*अ) उत्पादन निर्मिती ब) रोजगार निर्मिती क) ग्रामीण विकास ड) वरील सर्व.*

४. भारतीय साखर उद्योगातून प्रतिवर्षी ............... % रोजगार पुरविला जातो.

*अ) २.५% ब) ७.५% क) ६.५% ड) ८.५%.*

५. भारतातील पहिला सहकारी साखर कारखाना .................. मध्ये स्थापन झाला.

*अ) १९८० ब) १९०१ क) १७८४ ड) १७८५.*

६. जागतिक बाजारपेठेत भारतीय साखर उद्योगाचा ............... क्रमांक आहे.

*अ) प्रथम ब) द्वितीय क) तृतीय ड) चतुर्थ.*

७. भारतामध्ये ............. राज्य साखर उत्पादनामध्ये अग्रेसर आहे.

*अ) पंजाब ब) हरियाणा क) महाराष्ट्र ड) उ.प्रदेश.*

८. सन २००७ मध्ये भारतात सहकारी साखर कारखान्यांची एकूण संख्या ............ इतकी आहे.

*अ) २४० ब) २९ क) १८४ ड) २८४.*

९. जगातील पहिली दुग्धविकास सहकारी संस्था ............. मध्ये स्थापन झाली.

*अ) १८८० ब) १८८१ क) १८८२ ड) १८८३.*

१०. भारतामध्ये सर्वाधिक सहकारी दूध उत्पादन संस्था ............ राज्यात आहेत.

*अ) गुजरात ब) हरियाणा क) उ.प्रदेश ड) महाराष्ट्र.*

११. भारतातील सहकारी दूध व्यवसायाची सुरुवात खऱ्या अर्थाने ......... च्या स्थापनेने झाली.

*अ) गोकुळ डेअरी ब) आनंद डेअरी क) महानंदा डेअरी क) वारणा डेअरी.*

१२. भारतामध्ये ............... साली राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना करण्यात आली.

*अ) १९९१ ब) १९९० क) १९६९ ड) १९८८.*

१३. महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेचे ............ वैशिष्ट्य आहे.

*अ) स्त्रीयांना सामाजिक-आर्थिक न्याय मिळवून देणे.*

*ब) स्त्रियांचा मानसिक व बौध्दिक निकाल करणे.*

*क) स्त्रियांचा निर्णय निर्धारण प्रक्रियेतील सहभाग वाढविणे.*

*ड) वरील सर्व.*

१४. स्त्रियांच्या सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत ............ ची भूमिका अत्यंत महत्वाची आहे.

*अ) सहकारी साखर कारखाना ब) सहकारी दुग्ध उत्पादन संस्था*

*क) महिला बचत गट ड) वरीलपैकी सर्व.*

१५. आधुनिक काळात मानवाच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी कुटुंबात ............... वाढविणे आवश्यक आहे.

*अ) उपभोग ब) विनियोग क) अर्थार्जन ड) वरीलपैकी नाही.*

## ३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. *क) म्हैसूर.*

२. *ड) सन १९५१.*

३. *ड) वरील सर्व.*

४. *ब) ७.५%.*

५. *क) १७८४.*

६. *ब) द्वितीय.*

७. *ड) उ.प्रदेश.*

८. *अ) २४०.*

९. *क) १८८२.*

१०. *ड) महाराष्ट्र.*

११. *ब) आनंद डेअरी.*

१२. *ब) १९९०.*

१३. *ड) वरील सर्व.*

१४. *ड) वरीलपैकी सर्व.*

१५. *क) अर्थार्जन.*

## ३.५ सरावासाठी स्वाध्याय

✡ **अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. सहकारी प्रक्रिया उद्योगांची ग्रामीण विकासातील भूमिका विशद करा.

२. भारतातील सहकारी उद्योगाची कार्ये स्पष्ट केला आहे?

३. सहकारी साखर कारखानदारी समोरील समस्या सांगून त्या सोडविण्यासाठी उपाययोजना सुचवा.

४. भारतीय साखर उद्योगाची सद्यस्थिती सांगा.

५. भारतातील सहकारी दुग्ध प्रक्रिया उद्योगाची सद्यस्थिती स्पष्ट करा.

६. भारतातील दुग्ध सहकारी संस्थेची रचना लिहा.

७. भारतातील सहकारी दुग्ध संख्येच्या समस्या व त्यावरील दूध उत्पादक संख्येची भूमिका.

८. ग्रामीण महिला सक्षमीकरणामध्ये महिला सहकारी दूध उत्पादक संख्येची भूमिका.

९. महिला सक्षमीकरण म्हणजे काय ते सविस्तर स्पष्ट करा.

१०. महिला सक्षमीकरणाची गरज का आहे ते सविस्तर स्पष्ट करा.

✡ **क) टिपा लिहा.**

१. सहकारी प्रक्रिया संस्थांची ग्रामीण विकासातील भूमिका.

२. भारतीय सहकारी साखर उद्योगापूर्वीच समस्या.

३. भारतीय सहकारी साखर उद्योगाच्या समस्यांवरील उपाययोजना.

४. भारतीय सहकारी दुग्ध प्रक्रिया उद्योग.

५. भारतीय सहकारी दूध प्रक्रिया उद्योगापुढील समस्या.

६. भारतीय सहकारी दुग्ध प्रक्रिया उद्योगांच्या समस्यांवरील उपाययोजना.

७. महिला सक्षमीकरण.

८. महिला सक्षमीकरणात सहकारी प्रक्रिया संस्थांची भूमिका.

९. दुग्ध व्यवसाय व ग्रामीण महिला/महिला सक्षमीकरण.

## ३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ सूची


१. **प्रा. मोहन सराफ व प्रा. ना. मा. आचार्य** : *''सहकार''*, श्री जमनादास आणि कंपनी, मुंबई-१९९०.

२. **प्रा. ए. आर. रायखेडकर व प्रा. अशोक डांगे** : *''सहकार तत्वे आणि व्यवहार''*, मेहता प्रकाशन, पुणे, १९९९.

३. **प्रा. डॉ. रुपा शहा व प्रा. डॉ. बी. एच. दामजी** : *''सहकार तत्त्वे व चळवळ''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर-२०१२.

४. **प्रा. डॉ. माधव बिरादार** : *''सहकार''*, तीर्थरूप प्रकाशन, मंजुळे नगर, मोकाट, नांदेड, सन-२००४.

५. **प्रा. डॉ. सी. जे. जोशी व प्रा. के. सी. जोशी** : *''सहकाराचा विकास''*, फडके प्रकाशन, कोल्हापूर-२०१२.

६. **डॉ. गंगाधर वि. कायदे-पाटील** : *''सहकार''*, चैतन्य पब्लिकेशन, नाशिक-१३, सन २००७.

७. **L. D. Singh** : *"Co-operation Marketing".*

८. **Ajit Kumar** : *"Co-operation".*

९. **Agarwal** : *"Indian Economy".*

१०. **Jain P. C.** : *"Agricultural and Co-operation in India".*

११. **Mehta V. L.** : *"Towards Co-operative Socialist Common Wealth".*

१२. **Bedi R. D.** : *"Theory : History and Practice of Co-operation".*

१३. **I.C.A.R.** : *"Handbook of Animal Husbandary", New Delhi, 1967.*

१४. National Policy Development Board, Dainging in India, New Delhi-1974.

१५. **गद्रे य. त्र्यं.** : *''दुग्ध व्यवसाय : अर्थात डेअरीचा धंदा''*, नागपूर-१९६१.

१६. www.fao.org.

१७. www.nddb.co-op>information>status.

१८. info.ceicdata.com/India.premium/database.

१९. www.nchfidia.net.

✡✡✡

# राष्ट्रीय संस्थांची सहकारातील भूमिका

## ( Role of National Institutions in Co-operation )

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड)

४.२.२ राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ

४.२.३ भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ

४.२.४ ९७ वी घटनात्मक दुरुस्ती आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यातील प्रमुख बदल

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भसूची

## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला –

१. नाबार्डची स्थापना, भांडवली रचना व संघटन याविषयी माहिती सांगता येईल.

२. नाबार्डची कार्ये व भूमिका स्पष्ट करता येईल.

३. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाची स्थापना व व्यवस्थापन याविषयी माहिती सांगता येईल.

४. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाची उद्दिष्ट्ये व कार्ये विशद करता येतील.

५. भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाची स्थापना व सभासदत्व याविषयी माहिती सांगता येईल.

६. भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाचे व्यवस्थापन व उद्दिष्ट्ये स्पष्ट करता येतील.

७. भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाची कार्ये व कामगिरी विशद करता येईल.

८. ९७ वी घटना दुरुस्ती आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यातील प्रमुख बदल समजून घेता येतील.

## ४.१ प्रास्ताविक

भारतात शंभर वर्षांहून अधिक कालावधीपासून सहकार क्षेत्र विकसित होत असताना दिसून येत आहे. यापूर्वीच्या घटकात आपण भारतातील सहकारी चळवळीच्या विकासात शासनाची भूमिका कशी महत्वपूर्ण आहे, शासनाने विविध प्रकारे सहकाराच्या विकासासाठी कशा पद्धतीने मदत केली याचे विश्लेषण पाहिले आहे. याशिवाय भारतीय सहकारी चळवळीच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय पातळीवरील काही आर्थिक धोरणांचा परिणामही झालेला आपण पाहिला आहे. तसेच जागतिकीकरणाचा भारतातील सहकारी चळवळीवर झालेल्या परिणामांचाही आढावा घेण्यात आलेला आहे.

सहकारी चळवळींचा विकास होत अताना राष्ट्रीय पातळीवरील संस्था व संघटना यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. या घटकात आपण नाबार्डचे सहकारी चळवळीत योगदान कसे महत्त्वपूर्ण ठरले आहे; हे पाहणार आहोत. नाबार्डने वित्तीय संस्था, राज्य सरकार यांना शेती आणि ग्रामीण विकासासाठी केलेल्या पुनर्वित्त पुरवठ्याचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. तसेच राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाची स्थापना, व्यवस्थापन, उद्दिष्ट्ये आणि कार्ये सहकारी चळवळीच्या विकासास प्रोत्साहन देत आहे. राष्ट्रीय क्षेत्रातील सहकारी संस्थांना दीर्घकालीन पतपुरवठा करते. ग्रामीण भागातील विविध प्रकारच्या सहकारी संस्थांना मदत करणे व त्याद्वारे त्यांचा विकास घडवून आणणे हे या महामंडळाच्या स्थापनेमागील उद्दिष्ट आहे. त्याचबरोबर भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ ही सहकार क्षेत्रातील शिखर संघटना आहे. ही संस्था अखिल भारतीय पातळीवर सहकारी चळवळीचे नेतृत्व करते. लोकांना सहकारी चळवळीच्या विकासासाठी प्रवृत्त करणे यासारखी कार्ये ही संस्था करते.

## ४.२ विषय विवेचन

भारतीय सहकारी चळवळीच्या विकासात राष्ट्रीय पातळीवरील संस्था व संघटना यांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सहकार क्षेत्राचे योगदान अनन्यसाधारण असे आहे.

## ४.२.१ राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) (National Bank of Agricultural and Rural Development (NABARD) :-

### अ) नाबार्डची स्थापना :-

आर्थिक नियोजनाच्या सुरुवातीपासून सरकारने कृषी आणि ग्रामीण विकासाकडे लक्ष देण्याचे धोरण स्वीकारले. रिझर्व्ह बँकेनेही अनेक योजना राबविल्या आहेत. १९६३ मध्ये रिझर्व्ह बँकेने 'कृषी पुनर्वित्त व विकास महामंडळ' (ARDC) स्थापन करून कृषी क्षेत्राला कर्ज पुरवठा केला. १९७१ मध्ये 'पत हमी महामंडळ' (CGC) स्थापन केले. १९७४ मध्ये अग्रक्रम क्षेत्राची संकल्पना मांडण्यात आली. कृषी आणि ग्रामीण भागाच्या विकासाकरिता पतपुरवठा करणाऱ्या संस्थांच्या कार्यात एकसूत्रीपणा निर्माण करणे, त्यांच्या कार्याला योग्य दिशा देणे, यासाठी शिखर बँकेची (Apex Bank) गरज वाटू लागली. या दृष्टीने १२ जुलै, १९८२ मध्ये 'राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँकेची' (नाबार्ड) स्थापना करण्यात आली. कृषी पुनर्वित्त व विकास महामंडळाचे (ARDC) कार्य नाबार्डकडे सोपविण्यात आलो. नाबार्डचे मुख्य कार्यालय मुंबई येथे असून ३० विभागीय कार्यालये आहेत.

### ब) नाबार्डची भांडवल रचना :-

नाबार्डचे सुरुवातीचे भागभांडवल ५०० कोटी रु. आहे. त्यातील १०० कोटी रुपयांचे वसूल भागभांडवल आहे. नाबार्डच्या एकूण भागभांडवलापैकी ५० टक्के भागभांडवल रिझर्व्ह बँकेचे व इतर उर्वरित ५० टक्के भागभांडवल केंद्र सरकारचे आहे. नाबार्डच्या भागभांडवलात गेल्या काही वर्षात प्रचंड वाढ झाली असून २००२ साली २००० कोटी रु.पर्यंत वाढ करण्यात आली आहे. सद्या अधिकृत भांडवल ५००० कोटीपर्यंत वाढविण्यात आले आहे.

१९९५-९६ च्या केंद्रीय अंदाजपत्रकापासून नाबार्डने 'ग्रामीण पायाभूत सोयी विकास निधी' (RIDF) द्वारे मोठ्या प्रमाणात निधी उभा केला आहे. २००२ मध्ये हा निधी ९७२५ कोटी रुपये होता, तो मार्च २००७ मध्ये २०,१५४.७० कोटी रु. पर्यंत वाढविला आहे. मार्च २०१९ अखेर १,१९,७६३ कोटी रुपयांचा (RIDF) निधी होता.

याशिवाय नाबार्डला जागतिक बँक (IBRF), आंतरराष्ट्रीय विकास मंडळ (IDA), आंतरराष्ट्रीय वित्तीय महामंडळ (IFC) इत्यादी आंतरराष्ट्रीय संस्थांकडून मदत प्राप्त होते. तसेच अमेरिका, इंग्लंड, नेदरलँड, स्वीत्झर्लंड, पश्चिम जर्मनी यासारख्या देशांकडून नाबार्डला कर्जे मिळाली आहेत.

### क) नाबार्डची कार्ये :-

नाबार्डची स्थापना आणि भांडवली रचना तुमच्या लक्षात आली असेल. तेव्हा आता नाबार्डची कृषी आणि ग्रामीण विकासाच्या दृष्टिकोनातून कोणती महत्त्वाची कार्ये आहेत याचा अभ्यास करू.

## १. पुनर्वित्त सुविधा :–

नाबार्ड कृषी व ग्रामीण विकाससंबंधित वित्तीय संस्थांना पुनर्वित्त पुरवठा करते. यामध्ये सहकारी पतपुरवठा संस्था, प्रादेशिक ग्रामीण बँका इत्यादींचा समावेश होतो. देशातील शेती उत्पादन, शेती विपणन, शेती आदानांचे वितरण, लघुउद्योग, कुटिरोद्योग, हस्त व्यवसाय अशा व्यवसायांना नाबार्ड पतपुरवठा करण्यास उत्तेजन देते.

## २. कर्ज पुरवठा :–

नाबार्ड राज्य सहकारी बँका, भूविकास बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व इतर मान्यताप्राप्त संस्थांना अल्प, मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे देते. २००१ मध्ये नाबार्डने अशा संस्था १२९८ कोटी रुपयांचे कर्ज दिले तर मार्च २००७ पर्यंत ३७,५५१.९२ कोटी रुपयांचे कर्ज वितरण केले आहे. नाबार्डने शेतीसाठी ३१ मार्च २०१९ अखेर ३१७.७ लाख कोटीचे कर्ज वितरण केले.

## ३. राज्य सरकाराना दीर्घकालीन कर्जे :–

सहकारी पतपुरवठा संस्थांच्या भागभांडवलात सहभागी होता यावे, यासाठी नाबार्ड राज्य सरकारांना २० वर्षे मुदतीचे दीर्घकालीन कर्ज देते.

## ४. कृषी आणि ग्रामीण विकास संस्थांना कर्जे :–

कृषी व ग्रामीण विकास कार्यात सहभागी असणाऱ्या शासनमान्य संस्थांना नाबार्ड कर्ज पुरवठा करते. त्याचबरोबर अशा प्रकारच्या संस्थांच्या स्थापनेच्या काळात भागभांडवल उभारण्यासाठीही नाबार्ड मदत करते.

## ५. समन्वय :–

नाबार्ड कृषी आणि ग्रामीण विकास कार्यासाठी समन्वय साधते. केंद्र सरकार, राज्य सरकार, नियोजन आयोग आणि ग्रामीण विकासाशी संबंधित केंद्र व राज्य पातळीवरील संस्थांच्या कार्यात समन्वय साधण्याचे कार्य नाबार्ड करते.

## ६. संशोधन आणि विकास :–

कृषी आणि ग्रामीण क्षेत्राच्या विकासासाठी प्रोत्साहन मिळावे म्हणून नाबार्ड सातत्याने संशोधन करीत आहे. यासाठी बँकेने 'संशोधन व विकास निधी' स्थापन केला आहे. ग्रामीण भागातील गरजा पाहून प्रकल्प व कार्यक्रम आखण्याच्या कामी संशोधन उपयुक्त ठरते.

### ७. एकात्मिक ग्रामीण विकासाला चालना :–

नाबार्ड कृषी, लघुउद्योग, ग्रामीण कारागीर व हस्तव्यवसाय इत्यादी क्षेत्रांना पतपुरवठा करून एकात्मिक ग्रामीण विकासाला उत्तेजन देणे.

### ८. कृषीविषयक कार्यासाठी मदत :–

नाबार्डमार्फत कृषी यांत्रिकीकरण व लघुपाटबंधारे योजनांसाठी मदत दिली जाते. त्यामुळे कृषी व ग्रामीण भागाचा विकास होण्यास मदत होते.

### ९. तपासणी अधिकार :–

प्रादेशिक विकास बँका, सहकारी बँका आणि भूविकास बँका यांची पाहणी करण्याचा अधिकार नाबार्डला आहे. तसेच या संस्थांना कार्यासंबंधी सूचना व मार्गदर्शन नाबार्ड करते.

### १०. शिखर बँक (Apex Bank) :-

नाबार्ड ग्रामीण पतपुरवठा क्षेत्रात 'शिखर बँक' म्हणून काम पाहते. पूर्वी हे काम रिझर्व्ह बँकेकडे होते.

## ड) नाबार्डची भूमिका (Role of NABARD) :-

नाबार्डची उद्दिष्टे किंवा कार्ये तुमच्या लक्षात आली असतील. आता आपणाला नाबार्ड कृषी आणि 'ग्रामीण भागातील विकास करण्यासाठी कोणती भूमिका पार पाडते, नाबार्ड कशा पद्धतीने ग्रामीण विकासासाठी पतपुरवठा करते याची माहिती खालीलप्रमाणे सांगता येईल.

### १. कृषी व ग्रामीण विकासासाठी कर्जपुरवठा :–

नाबार्ड कृषी आणि ग्रामीण विकासासाठी अल्प–मध्यम व दीर्घकालीन कर्जपुरवठा करते. नाबार्ड लघुउद्योग, कुटिरोद्योग, कारागीर इत्यादी व्यवसायांना अल्पकालीन कर्जपुरवठा करते. मार्च २००२ मध्ये नाबार्डने बँकदरापेक्षा ३% कमी व्याजदराने १०,४०८ कोटी रुपयांची अल्पकालीन कर्जे दिली.

त्याचबरोबर नाबार्ड राज्य सहकारी बँका व प्रादेशिक ग्रामीण बँकांना मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा करते. राज्य सरकारांना सहकारी संस्थांचे भागभांडवल खरेदी करता यावे म्हणून नाबार्ड दीर्घकालीन कर्ज देते. मार्च २००२ मध्ये नाबार्डने ३६६ कोटी रुपयांचे मध्यम व दीर्घ मुदतीचे कर्ज वाटप केले. हाच कर्जपुरवठा मार्च २००७ मध्ये ६१,५३९.८७ कोटी रुपयांपर्यंत वाढविला.

## २. पुनर्वित्त पुरवठा :-

नाबार्ड कर्ज पुरवठा करण्याबरोबर पुनर्वित्त पुरवठाही करते. राज्य सहकारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व भूविकास बँका यांना नाबार्ड अल्प व मध्यम कालावधीचा पुनर्वित्त पुरवठा करते. राज्य सरकारांना दीर्घकालीन पुनर्वित्त पुरवठा करते. २०००-२००१ मध्ये अल्प व मध्यम मुदतीचा ६९८४ कोटी रुपयांचा पुनर्वित्त पुरवठा केला तर राज्य सरकारांना ५०० कोटी रुपयांचा दीर्घकालीन पुनर्वित्त पुरवठा केला. अलिकडे नाबार्डने सहकारी बँकांच्या भागभांडवलात राज्य सरकारांनी कमी सहभाग घ्यावा अशा सूचना दिल्या आहेत.

## ३. वीस कलमी कार्यक्रमांतर्गत साहाय्य :-

नाबार्ड वीस कलमी कार्यक्रमांतर्गत दुर्बल घटकांना आर्थिक सहाय्य करते. यामध्ये लघु व सीमांत शेतकरी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा समावेश होतो. यांना विशिष्ट प्रमाणात कर्जपुरवठा करण्याबाबत नाबार्ड पुढाकार घेते.

## ४. अल्पविकसित व मागासलेल्या राज्यांना मदत :-

नाबार्ड समतोल प्रादेशिक विकासासाठी प्रयत्न करते. यासाठी अल्प, विकसित व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या राज्यांना अधिक कर्जे उपलब्ध करून दिली आहेत. त्यामध्ये उत्तर प्रदेश, बिहार, ओरिसा, मध्यप्रदेश, राजस्थान या अल्पविकसित राज्यांचा समावेश होतो.

## ५. शेतीपूरक उद्योगांना पुनर्वित्त :-

नाबार्डने शेती व शेती आधारित उद्योगांना मोठ्या प्रमाणावर पुनर्वित्त पुरवठा केला आहे. यामध्ये लघु पाटबंधारे, शेतीचे यांत्रिकीकरण तसेच फलोद्यान व्यवसाय, दुग्ध व्यवसाय, मत्स्य व्यवसाय, शेळी-मेंढी पालन, जमीन सुधारणा व विविध कार्यक्रमांचा समावेश होतो. नाबार्डने शेती व शेती उद्योगांना १९९९-२००० मध्ये ५,२१५ कोटी रुपये एवढा पुनर्वित्त पुरवठा केला.

## ६. सहकारी बँकांची पुनर्रचना :-

जिल्हा व राज्य पातळीवर कार्य करणाऱ्या सहकारी बँकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी नाबार्डने पुढाकार घेतला आहे. ज्या सहकारी बँका आर्थिकदृष्ट्या कमकुवत आहेत, त्यांची पुनर्रचना करण्याचे कार्य नाबार्ड करते.

## ७. कर्जाचे रूपांतर :-

नाबार्ड सूचित व्यापारी बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांना दिलेल्या अल्पकालीन कर्जाचे

मध्यमकालीन कर्जामध्ये रूपांतर करू शकते. पतपुरवठा संस्थांना आर्थिक अडचणीच्या काळात नाबार्ड सामान्यपणे ७ वर्षांपर्यंत मुदतवाढ देते.

### ८. सहकार विकास निधी :–

शेती विषयीच्या संसदीय समितीने 'सहकार विकास निधी' स्थापन करण्यासाठी नाबार्डला शिफारस केली होती. त्यानुसार नाबार्ड प्राप्त नफ्याचा ठराविक हिस्सा 'सहकार विकास निधी' म्हणून वापरते.

### ९. लघु व कुटिरोद्योगांना सवलतीच्या दराने कर्जपुरवठा :–

नाबार्ड लहान उद्योग, अतिलहान उद्योग (Tiny Industry), ग्रामोद्योग, हस्त व्यवसाय या ग्रामीण विकासाशी निगडीत असणाऱ्या उद्योगांना सवलतीच्या दराने कर्जपुरवठा करते. त्यामुळे अशा उद्योगांच्या आर्थिक विकासास उत्तेजन मिळते.

### १०. शेती प्रक्रिया उद्योगांना मदत :–

नाबार्ड शेतीमालावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना अर्थपुरवठा करते. यामध्ये साखर कारखाने, सूतगिरण्या, दुग्ध प्रक्रिया उद्योग यांचा समावेश होतो. अशा उद्योगांना नाबार्ड आर्थिक मदत करते. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी नाबार्ड शेती प्रक्रिया उद्योग निमशहरी व शहरी भागात विकसित होत असल्यास कर्जपुरवठा करते.

### ११. संशोधन व विकास निधी :–

नाबार्डने 'संशोधन व विकास निधी' स्थापन केला आहे. या निधीमार्फत सहकारी पतपुरवठा संस्था आणि प्रादेशिक ग्रामीण बँकांना मदत केली जाते. शेती व बिगर शेती क्षेत्राबाबत तांत्रिक व नियंत्रणात्मक विभाग सुरू केला आहे. शेती क्षेत्रात सर्वेक्षण व संशोधन करून शेती उत्पादकता वाढावी, ग्रामीण उद्योगांचा विकास व्हावा याबाबत नाबार्ड सतत प्रयत्न करते.

### १२. ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी (RIDF) :-

१९९५–९६ च्या केंद्रीय अंदाजपत्रकात ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीचा (Rural Infrastructure Development Fund) प्रस्ताव मांडण्यात आला. नाबार्डने या निधीची स्थापना करून राज्य सरकारांना ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी मदत केली आहे.

**तक्ता क्र. ४.१**

**ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी**

**(आकडे कोटी रुपये)**

| वर्ष | कर्ज मंजूरी | कर्ज वितरण | वितरण आणि कर्जाचे मंजूर कर्जाशी प्रमाण% |
|---|---|---|---|
| १९९५-१९९६ | १,९०२.२१ | १,७६०.८७ | ९२.४ |
| २०००-२००१ | ४,५०३.५३ | ३,९५६.९५ | ८७.९ |
| २००१-२००२ | ४,६२४.७२ | ३,९४७.२८ | ८५.४ |
| २००२-२००३ | ५,९८७.२६ | ४,७७०.२८ | ७९.७ |
| २००५-२००६ | ६,८२०.९२ | २,४५५.५९ | ३६.० |
| २००६-२००७ | १०,५५५.३६ | १,५४०.६९ | १४.६० |
| २०१०-२०११ | १८,३१४.८८ | १,६००.०० | ८७.३४ |
| २०१९-२०२० | ६,५७७,९८.०० | ३,३३,९३७.०० | ७८.०० |
| **संदर्भ :** http://birbhum.mic.in/nabard/htm. | | | |

वरील तक्ता क्र. ५.१ वरून आपणास असे दिसून येते की, RIDF अंतर्गत कर्जमंजुरी व कर्जवितरणाचे प्रमाण हे घटत असताना दिसते.

नाबार्डच्या कार्याचा आढावा घेण्याचे काम खुस्रो समितीकडे सोपविले होते. या समितीच्या मते, नाबार्डने शेती व लघुउद्योगांना पुनर्वित्ताचे कार्य चांगल्या प्रकारे पार पाडले आहे. नाबार्डच्या कार्याचा सर्व देशभर विस्तार झाला आहे.

## ४.२.२ राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (National Co-operative Development Corporation) :-

### अ) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाची स्थापना :-

केंद्र सरकारने १९५४ साली अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पाहणी समिती All India Rural Credit Survey Committee) स्थापन केली. या समितीच्या शिफारशीनुसार १९५६ मध्ये 'राष्ट्रीय सहकारी विकास व गुदाम महामंडळ' स्थापन केले. १९६३ मध्ये गुदाम महामंडळ वेगळे करून 'राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाची' (NCDC) स्वतंत्र स्थापना करण्यात आली. शेतीमालाचे उत्पादन,

प्रक्रिया, साठवणूक खरेदी-विक्री यासारखी कार्ये करण्याची जबाबदारी या महामंडळावर येते. महामंडळ प्रामुख्याने बिगर पतपुरवठा क्षेत्रातील सहकारी संस्थांना दीर्घकालीन पतपुरवठा करते. भारताच्या सहकारी चळवळीच्या विकासात या महामंडळाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. या महामंडळाच्या उद्दिष्टांचा व कामगिरीचा आढावा आपण खालीलप्रमाणे अभ्यासू.

## ब) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाची उद्दिष्ट्ये (Objectives) :-

महामंडळाच्या स्थापनेची पार्श्वभूमी तुमच्या लक्षात आली असेल. आता आपण महामंडळाची प्रमुख उद्दिष्ट्ये कोणती आहेत याचा विचार करू.

१. राज्यातील सहकारी संस्थांना आर्थिक मदत करता यावी यासाठी राज्य सरकारांना पतपुरवठा उपलब्ध करून देणे.

२. प्रशासकीय व अन्य सेवक वर्ग नेमण्याकरिता राज्य सरकारला आर्थिक साहाय्य करणे.

३. महामंडळ अन्नधान्य, कापूस, कच्चामाल, आगपेट्या, रॉकेल, कापड, खते, बियाणे, जंतुनाशके, शेती उपयुक्त अवजारे इत्यादीच्या खरेदीसाठी राज्य सरकारच्या माध्यमातून सहकारी संस्थांना मदत करणे.

४. सहकारी संस्थांची स्थापना करणे, परवाना मिळविणे, योग्य यंत्रसामग्रीची निवड करणे, प्रकल्पाची उभारणी करणे इत्यादीबाबत आर्थिक व तांत्रिक साहाय्य करणे.

५. शेती उत्पादकता वाढीसाठी सहकारी संस्थांना खते, बी-बीयाणे, जंतुनाशके यासारख्या आदानाच्या वापरास मदत करणे.

६. सहकारी संस्थांना व्यवस्थापन व तांत्रिक प्रशिक्षणाकरिता राज्य सरकारमार्फत अर्थसाहाय्य करणे.

७. दुग्ध व्यवसाय, मासेमारी, वनोत्पादन, कुक्कुटपालन इत्यादीबातचे व्यवहार करणे.

८. आदिवासी भागात सहकारी संस्थांची स्थापना करणे आणि सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्तींना मदत करणे.

९. शेती उद्योगाच्या विकासातून ग्रामीण विकासाला उत्तेजन देणे.

१०. सहकारी संस्थांना सेवक वर्गांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात मार्गदर्शन करणे.

## क) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाचे व्यवस्थापन :-

महामंडळाच्या प्रशासनाकरिता 'सामान्य मंडळा'ची स्थापना केली जाते. महामंडळावर एकूण ५१ प्रतिनिधी असतात. यामध्ये केंद्रीय कृषिमंत्री महामंडळाचे अध्यक्ष असतात. कृषी राज्यमंत्री उपाध्यक्ष

असतात. राज्य सरकारातील मंत्री, सरकारी महामंडळातील उच्च पदस्थ व्यक्ती व सहकारी क्षेत्रातील तज्ज्ञ या महामंडळाचे सदस्य असतात. सामान्य मंडळातील १२ सभासदांची 'कार्यकारी समिती' तयार केली जाते. ही समिती महामंडळाचे दैनंदिन कामकाज पाहते. महामंडळाची बंगलोर, भुवनेश्वर, भोपाळ, चेन्नई, चंदीगड, डेहराडून, गुवाहटी, गांधीनगर, हैद्राबाद, पाटणा, पुणे, लखनौ, जयपूर, रांची, रायपूर, सिमला, तिरुअनंतपूरम इ. १८ विभागीय कार्यालये आहेत.

## ड) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाची कार्ये :-

महामंडळाचे व्यवस्थापन पाहिल्यानतंर आता आपण याची कार्ये कोणत्या पद्धतीने चालतात याचा विचार करू.

### १. सहकारी विपणन :-

शेतीमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे. यासाठी महामंडळ शेती उत्पादन, साठवण, खरेदी-विक्री याबाबत आराखडा आखते. सहकारी संस्थांच्या माध्यमातून त्याची कार्यवाही करते. सहकारी विपणन कार्यात सहभागी होता यावे म्हणून महामंडळ राज्यसरकारांना पतपुरवठा करते. या संस्थांवर तज्ज्ञ मार्गदर्शक नेमण्यासाठी आर्थिक मदत केली जाते. सहकारी संस्था सक्षम होण्यासाठी महामंडळ राज्य सरकारमार्फत अनुदान देते.

शेतमालाच्या किंमतीत सतत चढ-उतार होत असतात. याचा विचार करून महामंडळाने 'चढ-उतार निधी' स्थापन केला आहे. दरवर्षी सहकारी संस्थेने आपल्या नफ्याच्या १० टक्के रक्कम या निधीत जमा करावयाची असते. राज्यसरकार या निधीसाठी ३ टक्के रक्कम देते.

### २. सहकारी प्रक्रिया :-

भारताचा फळे व भाजीपाला उत्पादनात जगात दुसरा क्रमांक लागतो. भारत जागतिक उत्पादनाच्या १०% फळे व १४% भाजीपाला उत्पादन करतो. या व इतर कृषी मालावर प्रक्रिया केल्यास चांगला प्रकारचा भाव मिळू शकतो. महामंडळाने अशा सहकारी प्रक्रिया संस्थांना साहाय्य केले आहे. सहकारी संस्थांना तांत्रिक साहाय्य महामंडळ उपलब्ध करून देते. उदा. महामंडळाने सहकारी साखर कारखान्यांसाठी मार्च २००६ अखेरपर्यंत एकूण २,७६,७४९.२० कोटी रुपयांचे साहाय्य केले आहे.

### ३. साठागृहे :-

शेतमालाच्या साठवणुकीच्या अपुऱ्या सुविधा ही शेतमाल किंमत चढ-उताराची समस्या आहे. साठवणुकीच्या पुरेशा सुविधा उपलब्ध असल्यास शेतकऱ्यांची प्रतिक्षाक्षमता वाढते, साठागृहे सुविधांमुळे शेतमालाच्या किंमतीत स्थिरता निर्माण होते. याशिवाय महामंडळ नाशवंत शेतमालाच्या साठवणुकीसाठी

शीतगृहे उभारण्याकरिता वित्तपुरवठा करते. महामंडळाने मार्च २००६ अखेर ९.२२ लाख टन क्षमतेची ३१६ शीतगृहे पूर्ण केली आहेत. या शीतगृहांसाठी महामंडळाने १५३.१४ कोटी रुपयांचे साहाय्य केले आहे.

## ४. कृषी पतपुरवठा :-

प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राज्य सहकारी बँका यांच्यामार्फत महामंडळ शेती क्षेत्राला कर्जपुरवठा करते. या संस्था लघु व सीमांत शेतकऱ्यांना पुरेसा वित्तपुरवठा करण्यास तयार होत नाहीत. तारण स्वरूपात देण्यासाठी त्यांच्याकडे पुरेशा स्वरूपात मालमत्ता नसते. अशा शेतकऱ्यांना जास्तीत जास्त कर्जे उपलब्ध करून देता यावीत यासाठी महामंडळाने 'बुडीत कर्ज अनुदानाची' योजना आखली आहे.

महामंडळ बुडीत कर्ज अनुदानाबरोबरच व्यवस्थापन खर्च अनुदानही देते. या अनुदानाच्या माध्यमातून सहकारी संस्था व प्रशिक्षित कर्मचारी वर्ग नेमते. परिणामी व्यवस्थापन कार्यक्षम होऊनही सहकारी संस्थांना फायदा होतो.

## ५. दुर्बल घटकांना मदत :-

महामंडळाने ग्रामीण भागातील दुर्बल घटकांना मोठ्या प्रमाणात मदत केली आहे. मार्च १९७६ पर्यंत कर्नाटक, आंध्र प्रदेश, राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश येथे २५ सहकारी दूध संस्था स्थापन करण्यासाठी ५.७ कोटी रुपये मंजूर केले होते. मार्च २००६ अखेर महामंडळाने सर्व राज्यांतील दुग्ध व्यवसायाच्या विकासासाठी ६,१२९.६५ लाख रुपयांचे कर्ज मंजूर केले तर यापैकी ४,०४७.६१ लाख रुपयांचे कर्ज वितरण केले आहे. महामंडळ मच्छिमार सहकारी संस्था, पशुपालन, कुक्कुटपालन सहकारी संस्थांनाही साहाय्य करते. मार्च २००६ अखेर पशुपालन व्यवसायासाठी महामंडळाने ६५.५ लाख रुपये साहाय्य मंजूर केले तर प्रत्यक्ष २८.४५ लाख रुपयांचे वितरण केले आहे. याच कालावधीत कुक्कुट पालन व्यवसायासाठी महामंडळाने ६७१५.७७ लाख रुपयांचे वित्तीय सहाय्य मंजूर केले तर त्यापैकी ६०४०.९५ लाख रुपयांचे प्रत्यक्ष साहाय्य वितरित केले आहे.

## ६. शासकीय धोरण निश्चितीत साहाय्य :-

केंद्र व राज्य सरकार सहकारी संस्थांच्या विकासासाठी धोरणे ठरवितात. अशी धोरणे ठरविताना महामंडळ शासनास मदत करते. पंचवार्षिक योजनेत सहकारविषयक कार्यक्रम आखण्यासाठी आणि त्याची कार्यवाही करण्यासाठी महामंडळ मदत करते. याशिवाय सहकारी संस्थांना तांत्रिक सल्ला आणि सेवकांना प्रशिक्षण देते.

### ७. समन्वय :-

महामंडळ राष्ट्रीय पातळीवरील सर्व प्रकारच्या संघटनांमध्ये एकसूत्रीपणा साधण्याचे कार्य करते. अन्नधान्य व इतर वस्तूंच्या व्यापारावरील सामाजिक नियंत्रण वाढत आहे. अशावेळी भारतीय अन्न महामंडळ, ताग महामंडळ, वस्त्रोद्योग महामंडळ यासारख्या उत्पादन संस्थांमध्ये योग्य समन्वय साधला गेला पाहिजे. महामंडळ सरकारी यंत्रणा, सहकारी संस्था आणि वित्तीय संस्था यांच्या कार्यात सुसूत्रता निर्माण करून समस्या सोडविते.

### ८. परिषदा-चर्चासत्राद्वारे मार्गदर्शन :-

महामंडळ सहकारी संस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि कार्यशाळेचे आयोजन करते. प्रादेशिक स्तरावर समस्या सोडविण्यासाठी महामंडळ विचारांची देवाणघेवाण करते. यामध्ये सहकारी संस्था, सरकार यांचे प्रतिनिधी उपस्थित असतात.

### ९. प्रसिद्धी :-

सहकारी चळवळीच्या प्रगतीची माहिती प्रादेशिक आणि राष्ट्रीय पातळीवर प्रसिध्द होण्याची आवश्यकता असते. महामंडळ सहकारी चळवळीची माहिती व महत्त्व सामान्य लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करते. सहकारी खरेदी-विक्री, साठा, पुरवटा आदींची माहिती महामंडळाद्वारे दिली जाते.

## ४.२.३ भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ (National Co-operative Union of India)

### अ) भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाची स्थापना :-

भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ (NCUI) सहकार क्षेत्रातील राष्ट्रीय पातळीवरील शिखर संघटना (Apex Organisation) आहे. संघामार्फत सहकारी चळवळीच्या वाढीसाठी प्रयत्न केले जातात. यामध्ये लोकांना सहकाराचे शिक्षण देणे, मार्गदर्शन करणे, सहकारी क्षेत्राचा विस्तार करणे यासारख्या कार्यांचा समावेश होतो. १९२९ मध्ये 'अखिल भारतीय सहकारी संस्था संघटन' स्थापन करण्यात आली. पुढे 'भारतीय प्रांतीय बँक संघटना' (Indian Provincial Banks Accocisation) चे विलीनीकरण करण्यात आले. १९६१ पासून भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ (NCUI) या नावाने संस्था कार्य करू लागली. या संघाचे सर लल्लुभाई सामलदास हे पहिले अध्यक्ष होते. प्रा. एच. एल. काझी हे पहिले सचिव होते. सहकारी क्षेत्रातील सर्वोच्च संघटना असल्याने या संघाचे महत्त्वाचे योगदान आहे. याचा सविस्तर अभ्यास आपण खालीलप्रमाणे करू.

### ब) भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाची उद्दिष्टे :-

संघाची स्थापना तुमच्या लक्षात आली असेल आता संघाची उद्दिष्टे आपण अभ्यासू.

१. सहकारी शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करणे.

२. सहकाराची तत्त्वे व व्यवहारांचा प्रसार करणे.

३. विविध सहकारी संस्थांच्या कार्यात समन्वय साधणे.

४. सहकारातील समस्यांवर संशोधन करून प्रकल्प अहवालाच्या माध्यमातून सहकाराचा विकास करणे.

५. सहकारी चळवळीच्या विकासाला अनुकूल परिस्थिती निर्माण करणे, सहकाराचे यश प्रसिध्द करणे.

६. भारतीय सहकारी चळवळीचा प्रतिनिधी म्हणून सहकारी धोरणाविषयी मत मांडणे.

७. राष्ट्रीय सभेचे आयोजन करणे, सहकाराविषयी चर्चासत्रे, बैठका, परिषदा आदींचे आयोजन करणे.

८. राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये संघाच्या वतीने प्रतिनिधी व निरीक्षक पाठविणे.

९. सहकारी संस्थांच्या कार्य विस्तारासाठी प्रोत्सान देणे, सहकारी चळवळीचे लोकशाही स्वरूप टिकवून ठेवणे.


१०. आंतरराष्ट्रीय महासंघ (ICA), युनो (UNO), आंतरराष्ट्रीय श्रम संघटना (ILO) आणि इतर आंतरराष्ट्रीय पातळीवरील सहकारी संस्थांशी संबंध प्रस्थापित करणे.

## क) भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाचे सभासदत्व :-

संघाचे सभासदत्त्व राष्ट्रीय, राज्य आणि बहुराज्यीय पातळीवरील सहकारी संस्थांना खुले आहे. सहकारी संस्थांनाही संघाचे सभासदत्व खुले असते. यामध्ये राज्य सहकारी बँका, राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ, राज्य सहकारी कृषी आणि ग्रामीण विकास बँका इत्यादींचा समावेश होतो. ३१ मार्च २००० पर्यंत संघाचे एकूण २१४ सहकारी संस्था सभासद होत्या.


संघाचे सभासदत्व आपणास खालील तक्त्याच्या साहाय्याने अधिक समजून घेता येईल.

**NCUI चे सभासदत्व**



## ड) भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाचे व्यवस्थापन :–

संघाच्या सर्वसाधारण सभेत (General Body) सर्व सभासद संस्थांचा समावेश होतो. हे संघाचे सर्वोच्च अधिकार मंडळ आहे. सर्वसाधारण सभेत मागील वर्षांतील सहकारी संस्थांच्या प्रगतीचा आढावा घेतला जातो. पुढील वर्षांसाठी नियोजन व धोरणे निश्चित केली जातात. सर्वसाधारण सभेतून प्रशासकीय मंडळ ३ वर्षांसाठी निवडले जाते. प्रशासकीय मंडळात संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष यांचा समावेश होतो. यामध्ये राज्य व राष्ट्रीय पातळीवरील सहकारी संघाचा प्रत्येकी एक प्रतिनिधी समाविष्ट असतो. प्रत्येक तीन महिन्यानंतर मंडळाची बैठक होते. मंडळाचे कार्य कार्यकारी समितीमार्फत चालते. कार्यकारी समितीत संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व इतर १५ सभासद असतात. संघाचा अध्यक्ष हा संघाचा प्रमुख असतो. त्यांच्या मदतीला प्रमुख कार्यकारी अधिकारी नियुक्त केला जातो. वरील प्रमाणे संघाचे व्यवस्थापन तुम्हाला समजले असेल हे खालील तक्त्यावरून अधिक सोपे होईल.




## इ) भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाची कार्ये :–

संघाच्या व्यवस्थापन मंडळाची रचना अभ्यासल्यानंतर आता संघाच्या कार्याचा आढावा घेऊ.

१. सहकारी चळवळीला उत्तेजन व बळकटी प्राप्त करून देणे.

२. सहकारी संस्थांतील कर्मचाऱ्यांची शिक्षण व प्रशिक्षणाची व्यवस्था करणे.

३. संघाच्या संशोधन विभागामार्फत सहकारी चळवळीच्या समस्यांचा अभ्यास करणे व उपाययोजना सुचविणे.

४. सहकारविषयक माहिती व आकडेवारीचे संकलन व विश्लेषण करून प्रसिद्ध करणे.

५. अखिल भारतीय पातळीवर सहकारी चळवळीचे नेतृत्व करणे.

६. सहकारी संस्थांतर्गत होणाऱ्या व्यापाराला प्रोत्साहन देणे.

७. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारतीय सहकारी संस्थांचे प्रतिनिधीत्व करणे.

८. संघामार्फत विविध सहकारी संस्थांना आपापसात सहकार्य करण्याबाबत प्रोत्साहन दिले जाते.

## ई) भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाची कामगिरी :-

संघाच्या कार्यांचा अभ्यास केल्यानंतर भारतातील सहकारी चळवळीच्या उभारणीत संघाची भूमिका कशी महत्त्वपूर्ण ठरली आहे. तिचे स्पष्टीकरण आपणास खालीलप्रमाणे सांगता येईल.

### १. सहकारी चळवळीस प्रोत्साहन व बळकटीकरण :

राष्ट्रीय सहकारी संघाने सहकारी चळवळ कशी वाढीस लागेल यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले आहेत. तिच्या बळकटीकरणासाठी विविध सहकारी संस्थांचे केंद्र व राज्य सरकारशी समन्वय निर्माण केले आहेत. संघ लोकशाही तत्त्वांच्या प्रसारासाठी प्रयत्न करतो. सहकारी संस्थांच्या निवडणूका घेणे, त्यांना अधिक स्वायत्तता देण्यासाठी सहकारी कायद्यात दुरुस्ती करण्यासाठी सरकारशी विचारविनिमय संघाकडून केले जातात. तसेच संघामार्फत सहकारी चळवळीच्या सामर्थ्यासाठी ३ वर्षांतून एकदा 'राष्ट्रीय सहकारी काँग्रेस'चे आयोजन केले जाते.

### २. सहकारविषयक धोरण :

सहकार हा राज्याच्या अखत्यारीतील विषय आहे. तरी राष्ट्रीय पातळीवर त्याचा धोरणात्मक विकास व्हावा यासाठी संघाकडून नेहमी प्रयत्न केले जातात. सरकारी धोरणामुळे सहकारी संस्थांच्या व्यवहारात अडचणी येत असल्यास संघ सरकारशी विचारविनिमय करते आणि धोरणात्मक बदल सुचविते. यासाठी संघाने 'संसदीय मंडळा'ची स्थापना केली आहे.

### ३. सहकारी संस्थांमध्ये समन्वय :

संघामार्फत देशातील विविध सहकारी संस्थांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जातो. सहकारी क्षेत्रातील शिखर संस्था म्हणून संघ सहकारी संस्थांमधील संबंध दृढ करतो. संघाने १९३६ मध्ये आंतरराष्ट्रीय महासंघाचे सभासदत्व स्वीकारले आहे. संघ देशांतर्गत सहकारी संस्थांना विदेशी सहकारी संस्थांच्या सहयोगाने व्यापार व तंत्रज्ञानासाठी मार्गदर्शन करतो.

## ४. आंतरराष्ट्रीय संस्थांचे सहकार्य :

संघ आंतरराष्ट्रीय संस्थांच्या मदतीने दशातील सहकारी चळवळीला गती देण्याचा प्रयत्न करतो. यामध्ये आंतरराष्ट्रीय सहकारी महासंघ (ICA), युनो (UNO), आंतरराष्ट्रीय श्रम संघटना (ILO), संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) इत्यादी संस्थांचा समावेश होतो. आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकारी विकासाच्या कार्यक्रमाची देवाण-घेवाण करणे सहकारी संस्थांचे प्रतिनिधीत्व करण्याचे काम संघामार्फत केले जाते.

## ५. राष्ट्रीय सहकारी माहिती बँक :

देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यवहार करताना सहकारी संस्थांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. अशा संस्थांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि योग्य निर्णय घेण्यासाठी व्यवस्थापनाला साहाय्य करण्यासाठी प्रभावी माहिती असावी लागते. ही गरज ओळखून संघाने १९८१ मध्ये माहिती केंद्र म्हणून 'राष्ट्रीय सहकारी माहिती बँक' स्थापन केली आहे. या माहिती बँकेद्वारे सहकारी संस्थांच्या समस्या सोडविणे शक्य झाले आहे.

## ६. संशोधन :

सहकारी संस्थांची रचना संघीय स्वरूपाची आहे. राज्य, जिल्हा व गाव पातळीवर संस्था कार्य करीत आहेत. याशिवाय राष्ट्रीय पातळीवर २१ शिखर संस्था कार्य करीत आहेत. या संस्थांमध्ये परस्परसंबंध निर्माण करून सहकारी चळवळ गतिमान करण्यासाठी संघ प्रयत्नशील असतो. यामध्ये सहकारी संस्थांचे सर्वेक्षण करणे, आकडेवारी गोळा करणे, वर्गीकरण व विश्लेषण करणे इत्यादीद्वारे संस्थांच्या समस्यांवर उपाय सुचविले जातात. उदा. महाराष्ट्रातील ऊस दराचा प्रश्न, सहकारी बँकांच्या थकबाकीचा प्रश्न इत्यादींबाबत संघ संशोधन करीत असतो.

## ७. सहकार चळवळीचा प्रसार :

राष्ट्रीय सहकारी संघामार्फत सहकारी चळवळीची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला जातो. सहकारी संस्थांची कार्ये, व्यवस्थापन, भागभांडवल, सभासदत्व आदीबाबत लोकांना माहिती दिली जाते. वर्तमानपत्रे, मासिके, सहकार विशेषांक, रेडिओ, दूरदर्शन इत्यादी विविध प्रसार माध्यमांच्या साहाय्याने संघ लोकांना सहकाराची माहिती देत असतो.

## ८. राष्ट्रीय सहकारी ग्रंथालय :

राष्ट्रीय सहकारी संघाने दिल्ली येथे कार्यालय परिसरात 'राष्ट्रीय सहकारी ग्रंथालय' सुरू केले आहे. या ग्रंथालयात १०,००० पेक्षा अधिक सहकाराविषयी पुस्तके, ग्रंथ उपलब्ध आहेत. तसेच देशाच्या

विविध भागात प्रसिद्ध होणारी मासिके, त्रैमासिके, वार्षिक अंक व इतर साहित्य उपलब्ध आहे. सहकाराचे अभ्यासक, तज्ज्ञ, संशोधक या ग्रंथालयास संदर्भ ग्रंथांसाठी भेट देतात. राष्ट्रीय ग्रंथालयामुळे सहकारविषयक सर्व माहिती एकत्रितरित्या अभ्यासता येते.

**९. सहकार शिक्षणासाठी राष्ट्रीय केंद्र (NCCE) :**

देशातील विविध सहकारी संस्थांमध्ये काम करणाऱ्या कर्मचारी व प्रशासकीय सेवकांना शिक्षण व प्रशिक्षण देण्यासाठी राष्ट्रीय सहकारी संघाने १९६२ मध्ये सहकार प्रशिक्षणासाठी राष्ट्रीय महामंडळाची स्थापना केली आहे. विविध राज्यात १९ प्रशिक्षण संस्था उभारल्या आहेत. यापैकी पुणे येथील 'वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ को-ऑपरेटिव्ह मॅनेजमेंट' (VMNICOM) आपणांस परिचित असेलच. अशा प्रशिक्षण संस्थांच्या साहाय्याने संघ सहकाराविषयी माहिती सर्वदूर पसरवित आहे.

वरील राष्ट्रीय सहकारी संघाच्या कामगिरीचा अभ्यास केल्यानंतर आपणास सारांशरूपाने असे सांगता येईल की भारताच्या सहकारी चळवळीच्या उभारणीत संघाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. सहकारी संस्थांच्या समस्यांचा अभ्यास, त्यावर संशोधन आणि उपाययोजनांद्वारे सहकाराला गती देण्याचे काम या संघाने पार पाडल्याचे आपणास दिसून येईल.

## ४.२.४ ९७ वी घटनात्मक दुरुस्ती आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यातील प्रमुख बदल

सहकारी संस्थांशी संबंधित ९७ वी घटना दुरुस्तीद्वारे सहकारी संस्थांच्या आर्थिक उपक्रमांना प्रोत्साहित करण्याचे उद्दिष्ट आहे. सहकारी क्षेत्रात अधिक पारदर्शकता येवून राजकीय व प्रशासकीय हस्तक्षेप कमी होवून सहकारी संस्थांची स्वायत्तता व जबाबदारी, लेखापरीक्षण इत्यादी बाबींसाठी ९७ वी घटना दुरुस्ती करण्यात आली.

ऑक्टोबर २०१२ मध्ये केंद्र सरकारने राज्य सरकारांना त्यांच्या संबंधित राज्य सहकारी संस्था कायद्यात घटनेच्या अनुषंगाने ९७ वी घटना दुरुस्ती १५ फेब्रुवारी २०१२ पासून केंद्र सरकारने या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे जाहिर केले. राज्य घटनेतील तरतुदीनुसार राज्याने एका वर्षाच्या आत बदल करावयाचा असतो, त्यानुसार महाराष्ट्रात सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये १६ फेब्रुवारी २०१३ पासून सुधारणा करण्यात आली. हा कायदा संपूर्ण महाराष्ट्रातील २.४७ लाख सहकारी संस्थाना लागू करण्यात आला. सहकारी संस्थांची वार्षिक ६ लाख कोटीची उलाढाल आणि एकूण सदस्य संख्या ५.५० लाख इतकी आहे.

**९७ व्या घटना दुरुस्ती कायदा २०११ नुसार घटनेत केलेले बदल पुढीलप्रमाणे :-**

घटनेच्या तिसऱ्या भागामध्ये 'संघटना' (Unions) या शब्दाच्यानंतर सहकारी संस्था (Co-

operative Societies)) जोडला गेला. भाग IV-A मध्ये नवीन कलम 43 B समाविष्ठ करण्यात आले. ज्यामध्ये असे महटले आहे. ''राज्य स्वयंसेवी संस्था, स्वायत्त कार्य, लोकशाही नियंत्रण आणि सहकारी संस्थांच्या व्यावसायिक व्यवस्थापनास प्रोत्साहन देईल.'' घटनेच्या भाग IX-A नंतर राज्य विरुध्द केंद्र भूमिका सामील करण्यासाठी भाग IX-B घातला गेला.

## ❑ कलम IX-B ची ठळक वैशिष्ट्ये :-

१. सहकारी संस्थांच्या अधिकाराचा हक्क हा मुलभूत हक्क आहे.

२. प्रत्येक सहकारी संस्थेच्या मंडळामध्ये एस.सी./एस.टी.साठी एक जागा आणि दोन जागांसाठी महिला आरक्षणाची तरतूद आहे.

३. सहकारी संस्था निवडणूकीसाठीच्या देखरेखीसाठी एक एजन्सी स्थापन करू शकतात.

४. सहकारी संचालक मंडळाच्या कार्यकाळात (tenure) एकसारखेपणा हे IX-B चे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे.

५. लोकशाही प्रक्रियेच्या तत्वांवर आधारित सहकारी संस्थाची स्थापना, नियमनाची तरतूद आणि संचालकांची संख्या २१ निर्दिष्ट करणे.

६. मंडळाचे निवडलेले सदस्य आणि पदाधिकारी यांच्या संदर्भात निवडणूकीच्या तारखेपासून पाच वर्षासाठी निश्चित मुदतीची तरतूद केली आहे.

७. सहकारी संस्थेचे संचालक मंडळ निलंबनासाठी ठेवले जाऊ शकते, अशा जास्तीत जास्त सहा महिन्याच्या मुदतीच्या कालावधीची तरतूद, स्वतंत्र व्यावसायिक ऑडिटसाठी प्रदान करणे.

८. सहकारी संस्थांमधील सदस्यांना माहितीच्या अधिकाराची तरतूद करणे, राज्य सरकारांना सक्षम बनविणे आणि सहकारी संस्थांच्या कामकाजाचा नियमित अहवाल मिळविणे.

९. सहकारी संस्थांशी संबंधित गुन्ह्यांची तरतूद करणे आणि अशा गुन्ह्याबाबत दंडात्मक आदर करणे.

## ❑ ९७ व्या घटना दुरुस्तीतील तरतूदी :-

९७ व्या घटना दुरुस्तीतील सहकारी संस्थांबाबतच्या तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

१. **संचालक मंडळ :** सहकारी संस्थातील संचालक मंडळ सदस्यांची संख्या ही कोणत्याही परिस्थितीत २१ पेक्षा जास्त असू नये. २१ संचालकांव्यतिरिक्त २ तज्ञ संचालक स्वीकृत

करता येतील, पण त्यांना निर्णय प्रक्रियेत मतदान करता येणार नाही. संचालक मंडळात एस्सी. व एस.टी. करीता १ संचालक जागा व महिलांकरिता २ राखीव जागांची तरतूद केलेली आहे. परंतु व्यवस्थापक संचालक व कार्यकारी संचालक यांची संख्या निश्चित केलेली नाही, त्यावर मर्यादा टाकलेली नाही. सहकारी संस्थाच्या संचालक मंडळाचा कार्यकाळ ५ वर्षे असून, कालावधी संपण्यापूर्वी निवडणूकीद्वारे नवे संचालक मंडळ निर्माण करणे आवश्यक आहे. कालखंडाच्या निम्मापेक्षा कमी काळ राहिला असताना एखादे संचालक पद रिक्त झाल्यास ते भरण्याची जबाबदारी संचालक मंडळाची राहील.

२. **प्रशासक :** एखाद्या सहकारी संस्थेवर प्रशासक नेमल्यास त्याचा कालखंड फक्त ६ महिने असेल व या कालावधीतच प्रशासकाने निवडणूका घेवून संस्थेचा कारभार लोकप्रतिनिधींकडे सोपवावा लागेल. संस्थेच्या भाग भांडवलामध्ये सरकारचा हिस्सा नसल्यास संचालक मंडळ बरखास्त करता येणार नाही. मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटी नसलेल्या परंतु बँकिंग व्यवसाय करणाऱ्या सहकारी संस्थांवर प्रशासकाची मुदत ६ महिन्याऐवजी एक वर्ष राहणार आहे.

३. **वैधानिक हिशोब तपासणीस :** घनेतील कलम 243 Z M मधील विभाग ३ नुसार वैधानिक हिशेब तपासणीस किंवा ऑडिटिंग फर्म यांची नियुक्ती संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सुचनेनुसार होणार. परंतु शासनाने मंजूर केलेल्या ऑडिटर्सच्या अधिकृत यादीमधील ऑडिटरची नेमणूक करावी. ऑडिटसाठीचा कालावधी संस्थेचे आर्थिक वर्ष संपल्यापासून ६ महिन्याच्या कालावधीचा असणार आहे.

४. **अहवाल सादरीकरण :** कलम 243 Z E मध्ये पदाधिकाऱ्यांकडे (Designated Authority) सहकारी संस्थांनी जी माहिती सादर करावयाची आहे. त्यासंबंधी सहा विभागांकडे सोसायट्यांनी सर्व बाबींचा अहवाल सादर करण्याची तरतूद आहे.

५. **विसंगत तरतूदी :** सहकारी संस्थांच्या संदर्भात अस्तित्वातील कायद्यातील तरतूदी ९७ व्या घटना दुरुस्तीच्यामधील तरतूदींशी विसंगत असल्यास ती तरतूद त्या कायद्यात दुरुस्ती होईपर्यंत अथवा घटना दुरुस्ती अंमलात आल्यापासून एक वर्ष पूर्ण होईपर्यंत यांपैकी जो कालखंड कमी असेल तोपर्यंत ती तरतूद लागू राहील.

६. **शिक्षा :** घटना दुरुस्तीमध्ये सहकारी संस्थेसबंधीचे गुन्हे व त्यासंबंधी शिक्षेची व दंडाची तरतूद कलम 243 Z Q 2 मध्ये दिलेल्या आहेत.

७. **पोटनियम :** निबंधक आदर्श पोटनियम तयार करतील. या पोटनियमांच्या आधारे संस्थेने

स्वत:चे पोटनियम तयार करावयाचे आहेत. आदर्श पाटेनियम संस्थेने स्वीकारावेत असे बंधन नाही. पोटनियम दुरुस्तीचा अधिकार हा संबंधित सहकारी संस्थेचा आहे.

८. **सभासद :** सहकारी संस्थेचे सभासद हे साधारण सभासद, नाममात्र सभासद, क्रियाशील सभासद व सहयोगी सभासद या प्रकारचे असतात. यापैकी क्रियाशील सभासदांना सर्व हक्क असतात, तर साधारण सभासदांना फक्त आर्थिक पत्रके पहावयास मिळतील. इतर कोणतेही हक्क त्यांना नाहीत. नाममात्र व सहयोगी सभासदांना सहकारी संस्थेविषयी कोणतेही हक्क नाहीत. क्रियाशील सभासदांनी पाच वर्षाच्या काळात किमान एका सर्वसाधारण सभेस उपस्थिती आवश्यक असते. सतत पाच वर्षे क्रियाशील सभासद म्हणून राहिला नाही तर सभासदत्व रद्द होईल.

९. **लेखापरीक्षण :** निबंधकाला लेखापरीक्षणाचा विशिष्ठ परिस्थितीत अधिकार राहिल. तसेच सहकारी संस्थांमध्ये अनियमित व्यवहार झाल्यास फिर्याद दाखल करता येते. त्यामुळे लेखापरीक्षकांविरुध्द कारवाई होऊ शकणार.

## ❑ महाराष्ट्र सहकारी संस्था सुधारणा अध्यादेश २०१३ (Main Changes in Maharashtra Co-operative Societies Act) :-

केंद्र शासनाने फेब्रुवारी २०१२ मध्ये ९७ वी घटना दुरुस्ती केली. केंद्रशासनाने सर्व राज्य सरकारांना सहकारी कायद्यात एक वर्षात म्हणजे १४ फेब्रुवारी २०१३ पूर्वी बदल करण्यास सांगितले. महाराष्ट्राच्या राज्यपालांनी १४ फेब्रुवारी २०१३ रोजी सही करून महाराष्ट्र सरकारने अध्यादेश काढला व सहकार कायद्यात दुरुस्ती केली. 'महाराष्ट्र सहकारी संस्था सुधारणा अध्यादेश २०१३' तयार केला. या सहकार कायद्यातील तरतूदीनुसार सर्व सहकारी संस्थांनी आपापले पोटनियम दुरुस्त करून ते विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर करून घेणे बंधनकारक केले. या सुधारणेत प्रचलित कायद्यातील ५९ कलमे व उपकलमे घेतली असून १३ कलमे व उपकलमे वगळलेली आहेत, तर ११ कलमे किंवा उपकलमे नव्याने घेतली आहेत.

## ❑ तरतूदी–२०१३ :–

१. सहकारी संस्थेच्या प्रत्येक सदस्याने सलग पाच वर्षाच्या कालावधीत किमान एक सर्वसाधारण सभेस उपस्थित रहावे.

२. सहकारी संस्थेच्या पोट कायद्यांमध्ये नमूद केल्याप्रमाणे सलग पाच वर्षाच्या कालावधीत किमान स्तरावरील सेवांचा एकदा वापर करणे आवश्यक आहे. या सदस्यास अपयशी

ठरल्यास त्याला असक्रिय असलेल्या सदस्याचे वर्गीकरण केले जाईल आणि त्यांना मतदानाचा हक्क असणार नाही.

३. कार्य नसलेला सदस्य वर्गाच्या वर्गीकरणाच्या तारखेपासून पुढील पाच वर्षात सर्वसाधारण सभेच्या कमीतकमी एका बैठकीस उपस्थित नसेल आणि पोट कायद्यांमध्ये नमूद केलेल्या किमान स्तरावरील सेवांचा वापर करीत असेल तर, हद्दपार करण्यासाठी तो सभासद जबाबदार असेल.

४. सक्रिय नसलेल्या सदस्यास पात्रतेच्या निकषांची पूर्तता केल्यावर सक्रिय सदस्य म्हणून पुन्हा वर्गीकृत केले जावू शकते. सहकारी संस्थांना वार्षिक आणि सक्रिय नसलेल्या सदस्यांची यादी दरवर्षी तयार करणे आवश्यक असते.

५. व्यवस्थापन समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांच्या कार्यकालाची मुदत आणि त्याच्या कार्यालयीन कामकाज निवडणूकीच्या तारखेपासून पाच वर्षाचा असेल.

६. व्यवस्थापन समितीतील सदस्यांची जास्तीत जास्त संख्या २१ असेल. त्यापैकी ५ जागा राखीव असतील. महिलांसाठी २, एस.सी./एस.टी. साठी १, मागास प्रवर्गासाठी १, विमुक्त जाती आणि अनुसूचित जमातीसाठी १ राखीव जागा ठेवली जाईल.

७. राज्य सरकार अधीनता, निवडणूक आणि एखाद्या सहकारी संस्थेच्या सर्व निवडणूकांसाठी मतदार याद्यांची पूर्वतयारी करण्याच्या नियंत्रणाकरिता प्राधिकरण म्हणून 'राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणा'ची स्थापना करेल.

८. आर्थिक वर्षाच्या समाप्तीनंतर सहा महिन्याच्या कालावधीत संस्थेची सर्वसाधारण सभा घेतली पाहिजे. सुसंवादी, पारदर्शक समुदाय राखण्यासाठी योग्यवेळी योग्य संवाद साधने फार महत्त्वाचे आहे. समाजातील निर्दोष संप्रेषण नेटवर्क सुनिश्चित करण्यासाठी ADDA व्यवस्थापन समुदाय सदस्यांना कशी मदत करू शकते ते तपासा.

९. कलम 243 ZO (2) नुसार सहकारी संस्थेच्या सभासदांचे सहकारविषयक आणि संस्थेच्या व्यवहारविषयक प्रशिक्षण अनिवार्य असेल. सहकार कायद्यातील कलम २४अ या स्वतंत्र कलमाद्वारे सभासद, प्रशिक्षण, संचालक प्रशिक्षण इत्यादीची शिफारस आहे. प्रत्येक सहकारी संस्था दरवर्षी प्रशिक्षणाकरिता राज्य शिखर शिक्षण संस्था किंवा राज्य सहकारी संस्थेकडे राज्य शासनाने ठरविलेल्या दराने निधीची उपलब्धता करणे. सदरचा निधी संस्थेच्या आर्थिक स्थितीप्रमाणे ठरविण्यात येईल.

१०. लेखापरीक्षण : सहकारी संस्था कायद्यातील कलम 243 ZM मध्ये संस्थांच्या लेखापरीक्षणा-

बाबत तरतूदी आहेत. यानुसार सहकारी संस्थांचे वर्षातून एकदा लेखापरीक्षण अनिवार्य आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेत शासनाने तयार केलेल्या अधिकृत पॅनलमधीलच लेखापरीक्षक (Auditor) नेमणे अनिवार्य करण्याची तरतूद आहे.

## ४.३ सारांश

भारतातील सहकारी चळवळ १९०४ साली सुरू झाली. १०४ वर्षांच्या कालावधीत सहकाराने सर्वच क्षेत्रात विकास केल्याचे दिसून येते. यामध्ये सहकारी पतपुरवठा महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. शेती व ग्रामीण विकासाच्या दृष्टीकोनातून नाबार्ड, राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ आणि भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ यांची कामगिरी महत्त्वपूर्ण आहे.

### अ) नाबार्ड :-

नाबार्डच्या स्थापनेनंतर शेती आणि ग्रामीण विकासाला उत्तेजन मिळाले आहे. शेती, लघुउद्योग, कुटिरोद्योग, हस्तकला व्यवसाय आदी व्यवसायांना आर्थिक मदत मिळाली आहे. जिल्हा आणि राज्य पातळीवरील सहकारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका यांना पुनर्वित्त करण्यात नाबार्ड महत्त्वपूर्ण कामगिरी करीत आहे. तसेच राज्य सरकारांना दीर्घमुदतीच्या कर्जाचे वाटपही नाबार्ड करते. तथापि, नाबार्डला विविध राज्यांतील सहकारी व्यवस्थापनावर पूर्ण नियंत्रण ठेवण्याची क्षमता प्राप्त झालेली नाही. सहकारी बँकांची थकबाकी कमी करण्यासाठी या बँकेने ठोस उपाय योजलेले नाहीत.

### ब) राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ :-

राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने सहकाराबाबत प्रोत्साहनपर भूमिका स्विकारली आहे. सहकाराचा मदतनीस, मार्गदर्शक म्हणून महामंडळाचे कार्य महत्त्वाचे आहे. सहकारी खरेदी-विक्री संस्था, प्रक्रिया संस्था, सहकारी गुदामे आदींना भरीव मदत दिली आहे. शेती उत्पादकता वाढीसाठी महामंडळाने प्रयत्न केले आहेत. तथापि, सहकारी संस्थांनी जागतिकीकरणाच्या स्पर्धात्मक परिस्थितीत नवीन आव्हाने स्वीकारण्यासाठी महामंडळाने भरीव मदत केली पाहिजे. यासाठी स्वत:ची वित्तीय साधने वाढविली पाहिजेत. सहकारी व्यवस्थापनात सुधारणा घडवून आणली पाहिजे.

### क) भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ :-

भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ ही सहकार क्षेत्रातील राष्ट्रीय शिखर संघटना आहे. संघाच्या आतापर्यंतच्या कार्यामुळे सहकारी चळवळ भारतभर विकसित झाली आहे. सहकारी शिक्षण, प्रशिक्षण देण्याचे कार्य संघाने यशस्वीरित्या केले आहे. राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील संस्थांच्या कार्यात समन्वय साधण्याचे कार्य संघाने यशस्वीरित्या पार पाडले आहे.

सध्याच्या खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या स्पर्धात्मक परिस्थितीत सहकारी संस्थांची प्रगती साधावयाची असल्यास नाबार्ड, राष्ट्रीय सहकार विकास महामंडळ आणि भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ या शिखर संस्थांची कामगिरी अधिक यशस्वी असावयास पाहिजे.

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **केंद्रीय अर्थसंकल्प :** केंद्र सरकारच्या आर्थिक वर्षांतील अपेक्षित उत्पन्न व खर्चासंबंधीची माहिती सांगणाऱ्या विवरणास केंद्रीय अर्थसंकल्प म्हणतात.

२. **कुटिरोद्योग :** घरातल्या घरात, कुटुंबातील माणसांच्या मदतीने चालविला जाणारा उद्योग.

३. **पायाभूत सोयी :** विकासाच्या कामासाठी पाया ठरू शकणाऱ्या सोयी, उदाहरणार्थ- वीज, पाणी, रस्ते, दळणवळणाच्या सोयी इत्यादी.

४. **लघु उद्योग :** लहान आकाराचा उद्योग ज्यात गुंतलेले भांडवल अल्प असते. गुंतलेले मनुष्यबळ कमी असते. प्रत्येक शक्तीचा वापर केला जातोच असे नाही.

## ४.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

✡ **अ) गाळलेल्या जागा भरा.**

१. नाबार्डची स्थापना ............... साली झाली.

*अ) १९७२ ब) १९८२ क) १९९२ ड) १८९२.*

२. नाबार्डच्या एकूण भागभांडवलापैकी .............. भागभांडवल रिझर्व्ह बँकेचे आहे.

*अ) २५% ब) ५०% क) ७५% ड) १००%*

३. ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीचा RIDF प्रस्ताव ................. च्या अंदाजपत्रकात मांडण्यात आला.

*अ) १९९४-९५ ब) १९९५-९६ क) २०००-०१ ड) २००८-०९.*

४. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाची स्थापना .............. झाली.

*अ) १९५४ ब) १९५६ क) १९६३ ड) १९९१,*

५. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाचे अध्यक्ष ............... असतात.

*अ) पंतप्रधान क) केंद्रीय कृषीमंत्री*

*ब) अर्थमंत्री ड) कृषी राज्यमंत्री.*

६. सामान्य मंडळातील ............. सभासदांची 'कार्यकारी समिती' तयार केली जाते.

*अ) १५ ब) १२ क) ५१ ड) १००.*

✡ **ब) जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| १. महामंडळाचे अध्यक्ष | अ) कृषी राज्यमंत्री. |
| २. महामंडळाचे उपाध्यक्ष | ब) केंद्रीय कृषीमंत्री. |
| ३. महामंडळाचे सदस्य | क) राज्य सरकारातील मंत्री. |

✡ **क) पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१. भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ ही सहकार क्षेत्रातील राष्ट्रीय पातळीवरील शिखर संघटना आहे.

२. सर लल्लुभाई सामलदास हे भारतीय राष्ट्रीय संघाचे पहिले अध्यक्ष होत.

३. भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाने आंतरराष्ट्रीय महासंघाचे सभासदत्व १९३६ मध्ये स्वीकारले आहे.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

✡ **अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. नाबार्डची कार्ये स्पष्ट करा.

२. नाबार्डची कामगिरी थोडक्यात सांगा.

३. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाची उद्दिष्टे सांगा.

४. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाची कामगिरी स्पष्ट करा.

५. भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाची उद्दिष्टे सांगा.

६. भारतीय राष्ट्रीय सहकारी संघाची कामगिरी सविस्तर सांगा.

✡ **ब) टिपा लिहा.**

१. नाबार्डची कार्ये.

२. राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ.

३. भारतीय राष्ट्रीय सहकारी संघ.

## ४.७ संदर्भ पुस्तके


१. **Bedi R. D.** : *"Theory, History and Practice of Co-operation"*, Loyal Book Depot. Meerut-2001.

२. **Hajala T. N.** : *"Co-Operation- Principles, Problems and Practice"*, Konark Publishers Pvt. Ltd, 2002.

३. **Mathur B. S.** : *"Co-Operation in India"*, Sahitya Bhavan, Agra-1988.

४. **Kulkarni K. R.** (1968) : *"Theory and Practice of Co-operation in India and Abroad, Co-operators"*, Book depot. Bombay-14.

५. **Shahuraja E.** (2000) : *"Co-operatives in New Millennium"*, Vikas Publishing House, New Delhi.

६. **Dutta/sundaram** (2007) : *"Indian Economy"*, S. Chand and Company, New Delhi.

७. **Economic Survey of India, 2010-11** : Govt. of India, Ministry of Finance.

८. **Co-operative Sugar** : National Federation of Co-operative Sugar Factories Ltd. New Delhi.

९. **Indian Co-operative Movement - A Profile** : "National Co-operative Union of India, New Delhi.

१०. **Department of Animal Husbandary, Dairying & fisheries, Annual Report** : Ministry of Agruculture, Govt. of India.

११. **NABARD** : Various Reports.

१२. **Mathur B. S.** (1984) : "Co-operation in India", Sahitya Bhavan, Agra.

१३. **कुलकर्णी/भोसले/चौगुले** : *'सहकाराचा विकास'*, अजब प्रकाशन, कोल्हापूर-जुलै २००५.

१४. **जोशी सी. जे.** : *'सहकाराचा विकास'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, जून २०१०.

१५. **बिरादार माधव** : *'सहकार'*, तिर्थरूप प्रकाशन, भोकर, २००४.

१६. **सराफ मोहन/आचार्य ना.मा.** : *'सहकार'*, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, नोव्हेंबर १९९२.

१७. **रायखेलकर ए.आर./डांगे अशोक** : *'सहकाराची तत्त्वे आणि व्यवहार'*, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, ऑक्टोबर १९८९.

१८. **शहा रूपा/दामजी बी. एच.** : *'सहकार'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर, सप्टेंबर, २००८.

१९. **शिंदे आर. के.** : *'भारतातील सहकार चळवळ'*, राविल पब्लिकेशन, सातारा-१९७८.

२०. **जोशी सी. जे.** (१९६८) : *'सहकार'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२१. **कामत गो. स.** (१९७६) : *'सहकार : तत्त्व, व्यवहार आणि व्यवस्थापन'*, श्री विद्या प्रकाशन, पुणे.

२२. www.rbi.org.

२३. www.nabard.org.

२४. www.ncul.org.

✡✡✡